# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच्.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध

# 'देहू आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास'

**संशोधक**

श्री. सुरेंद्र पोपट पवार

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. त्रिंबक भिमराज राजदेव

सहयोगी प्राध्यापक

इतिहास विभाग

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय,

संगमनेर, जि. अहमदनगर

**संशोधन केंद्र**

इतिहास विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, गुलटेकडी

**ऑक्टोबर २०१६**

# प्रतिज्ञापत्र

मी श्री. सुरेंद्र पोपट पवार, असे प्रतिज्ञापूर्वक जाहिर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, तात्विक व सामाजिक शास्त्रे, शाखांतर्गत इतिहास विभागातील पीएच्.डी. पदवी करीता सादर केलेली 'देहू आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास' हा शोधप्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. या प्रबंधात आवश्यक तेथे पूर्वसूरीच्या मतांनी ऋणनिर्देशपूर्वक नोंद केलेली आहे.

हा शोधप्रबंध मी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी किंवा अन्य परिक्षेसाठी सादर केलेला नाही. ऑक्टोबर २०१६ टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रथमच पीएच्.डी. इतिहास पदवीसाठी सादर करत आहे.

ठिकाण **सुरेंद्र पोपट पवार**

आळंदी दे. ता. खेड, **संशोधक**

जि. पुणे

दिनांक

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो की, सुरेंद्र पोपट पवार यांनी 'देहू आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास' हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे इतिहास विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) या पदवीसाठी सादर करीत आहे.

प्रस्तुत प्रबंध हा श्री. सुरेंद्र पोपट पवार यांचा स्वतःचा आहे. त्यासाठी त्यांनी अस्सल (प्राथमिक) विश्वसनीय साधनाचा वापर केला असून, तो माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या लिहिलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे इतिहास विषयाअंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीच्या पुर्ततेसाठी सादर करण्यात येत आहे.

ठिकाण : संगमनेर

जि. अहमदनगर

दिनांक

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. त्रिंबक भिमराज राजदेव

सहयोगी प्राध्यापक

इतिहास विभाग

सहकारी महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात

महाविद्यालय, संगमनेर, जि. अ.नगर

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, अंतर्गत इतिहास या विषयामध्ये **'देहू,आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास'** या शीर्षकाखाली पीएच.डी (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी शोध निबंध सादर करतांना विशेष आनंद होत आहे.

हा विषय निश्चित करण्यात माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. त्रिंबक भिमराज राजदेव सर यांनी मला मोलाचे सहाय्य केले. माझ्या विषयाच्या अभ्यासाच्या निमित्ताने, गुरूवर्य प्रा. डॉ. त्रिंबक भि. राजदेव यांचे मार्गदर्शन लाभले हे माझे भाग्य समजतो. मी त्यांचा सदैव ऋणी राहील. कामानिमित्त अनेकवेळा मला सरांच्या घरी जावे लागले. सौ. संगिता राजदेव मॅडम त्यांनी मला आपल्या घरातल्या प्रमाणे समजले व सहकार्य केले. त्यांचा मी सदैव ऋणी राहील.

तसेच या संशोधन कामासाठी टिळक महाविद्यापीठ सामाजिक शास्त्र तसेच विभाग अधिष्ठाता डॉ. बी.डी. कुलकर्णी इतिहास प्रमुख डॉ. निलिनी वाघमारे तसेच डॉ. स्वराली कुलकर्णी व विद्यापीठातील पीएच्.डी. संशोधन विभाग प्रमुख, डॉ. पौर्णिमा माटे तसेच त्यांचे सहाय्यक प्राध्यापक व कर्मचारी यांचाही सदैव ऋणी राहील.

प्रा. डॉ. नाथा रामभाऊ कोकाटे, बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगांव, जि. पुणे यांचे नेहमी प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. त्यांचे विशेष आभार मानतो.

त्याचबरोबर मी काम करत असलेल्या माझ्या श्री. ग.म. शिक्षण प्रसारक मंडळ ओतूर या संस्थेचे अध्यक्ष व विद्यमान नगरसेवक पुणे म.न.पा. मा. श्री. विशाल विलास तांबे साहेब, विद्यमान मानद सचिव मा. श्री. वैभव विलास तांबे साहेब, संस्थेचे खजिनदार मा. श्री. मयुर मुरलीधर ढमाले सर, संस्थेचे संचालक मा. श्री. प्रा. के.एस. पाटील सर, प्राचार्य डॉ. पांडुरंग मिसाळ सर, प्राचार्य अतुल पानसरे सर तसेच माझे सहकारी प्रा. पंडित भोसले, प्रा. संजीव कांबळे, प्रा. डॉ. विलास गायकवाड, प्रा. चाँदपाशा मुल्ला, प्रा. सिमा साळुंके, प्रा. सौ. उज्वला काळोखे, प्रा. सौ. शैला तापकीर, प्रा. सौ. मिरा केसकर, प्रा. कदम सर, प्रा. येवते सर, प्रा. सौ. रेखा सुतार तसेच प्रा. अनिल आमले, प्रा. प्रविण भावे, श्री. रामदास जाधव, श्री. चैतन रणवरे, श्री. युवराज, श्री. विकास

गोसावी व इतर सर्व ज्ञात, अज्ञात सहकारी या सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनस्वी आभार व्यक्त करतो.

या बरोबर माझे संशोधन काम पुर्ण करण्यासाठी मित्र परिवारांनी वेळोवेळी प्रोत्साहन व सहकार्य केले. यामध्ये प्रा. सचिन थोरवे सर, मल्टीटेक कम्प्युटर आळंदी, श्री. अविनाश अधोरे, श्री. सतिश पिंजन साहेब, प्रा. सुरेश गुडे सर, श्री. शिवाजी सुरसे, श्री. सचिन मेथे सर, श्रीधर घुंडरे सर, श्री. सुरज आरू, श्री. गणेश रासने, श्री. दिनेश कुऱ्हाडे यांचे अनमोल सहकार्य लाभले.

तसेच शोध प्रबंधनासाठी आवश्यक असणारी धार्मिक माहिती व साहित्य, ग्रंथ उपलब्ध होतांना संत परंपरेतील आदणीय व्यक्तीमत्व व गुरूवर्य शांतीब्रह्म मारोती महाराज कुऱ्हेकर, गाथामुर्ती रामभाऊ महाराज राऊत, श्री. भास्कर महाराज पवार, श्री. परशुराम गिराम सर, गुरूवर्य ज्ञानेश्वर महाराज माऊली, श्री. सोपान म. झाडे, श्री. शांताराम म. गांगुर्डे, श्री. जालिंदर म. गवांदे, श्री. विजय म. जगताप, श्री. तानाजी म. तांबे, श्री. सुभाष म. गेठे यांच्या सदैव ऋणी असेल.

तसेच संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी दे. येथील ग्रंथालय, संत तुकाराम महाराज संस्थान देहू, पालखी सोहळ्याचे चोपदार, मालक इ.

तसेच या कामासाठी माझ्या कुटूंबियांसाठी महत्वाची मदत व सहकार्य लाभले. माझी पत्नी सौ. अनिता पवार, चि. श्लोक पवार, श्री. संतोष पवार सर, श्री. विठ्ठल चिकणे सर, माझी आई सौ. सुमन पोपट पवार हिच्या अथक परिश्रमातून तिने मला शिकविले. तसेच वडिल, भाऊ, बहिण, चुलते, मामा ज्ञात, अज्ञात सर्व मदत करणारे यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

या शोध निबंधाचे संपुर्ण अक्षरजुळवणी व डिझाईन प्रा. सचिन थोरवे सर, मल्टिटेक कंम्प्युटर आळंदी दे., यांचा मी सदैव ऋणी आहे. शोध निबंध पुर्ण करतांना महत्वाचे, अनमोल व महत्वपूर्ण मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक गुरूवर्य डॉ. राजदेव त्रिंबक सर यांच्या चरणी नतमस्तक व कृतज्ञता व्यक्त करतो.

ठिकाण आळंदी देवाची

**पवार सुरेंद्र पवार**

**संशोधक**



# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरण तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | संशोधन पध्दती | २ ते ११ |
| प्रकरण दुसरे | विषय प्रवेश | १२ते ५२ |
| प्रकरण तिसरे | वारकरी सांप्रदायाचा इतिहास | ५३ ते १४६ |
| प्रकरण चौथे | श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा | १४७ ते १८२ |
| प्रकरण पाचवे | श्रीक्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा | १८३ ते २२२ |
| प्रकरण सहावे | महाराष्ट्रातून श्रीक्षेत्र पंढरी (पंढरपूर) कडे येणाऱ्या विविध दिंडया | २२३ ते २६९ |
| प्रकरण सातवे | सिंहालोकन ,निष्कर्ष, शिफारशी | २६९ ते २८० |
| | संदर्भसूची<br>परिशिष्टे व फोटो | २८१ ते २९०<br>२९२ ते ३११ |

## प्रकरण पहिले

# संशोधन पध्दती

१.१ प्रस्ताविक

१.२ अभ्यास विषयाची निवड व हेतू

१.३ अभ्यास विषयाचे महत्व

१.४ अभ्यास विषयाचे उद्दिष्टे

१.५ संशोधन अभ्यासची गृहिते

१.६ संशोधन अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा

१.७ संशोधन पध्दती

अ. प्राथमिक तथ्य संकलन

ब. दुय्यम तथ्य संकलन

१.८ संशोधन आराखडा प्रकरणानुसार मांडणी

# संशोधन पध्दती

## १.१ प्रस्ताविक

इतिहास अभ्यास विषयात गतकालीन घटनांना विशेष महत्व दिले जाते. गतकालीन घटकांचा अभ्यास म्हणजे इतिहास होय. मनुष्य हा समाजशिल प्राणी आहे मनुषयाच्या एकत्रित येण्याने समाज निर्मिती होते. मनुष्य हा समाजाचा. केंद्रबिंदु मानला जातो. त्याचे वर्तन त्याची कृती त्याची वागणुक समाजाची स्थिती ठरवते. त्याची चांगली वागणुकही तत्कालीन समाजाची स्थिती दर्शविते. तो समाज त्या काळचा आदर्श समाज मानला जातो. पुढील येणाऱ्या काळात याच समाजाचा चालीरीती अनेक घटना पध्दती चालु राहतात. परांपरा बंद पडल्या असतील तर त्या पुन्हा सुरू होतात. त्यापैकी चांगल्या चालीरीती घटना याचा काळानुसार विकास व लोकाभिमुख झालेला दिसतात. उदाहरण दाखल अशा अनेक घटना आजच्या स्थितीला या समाजात चालु आहे. अनेक सण उत्सव हे कित्येक वर्षापासुन समाजात मोठ्या उत्सावात आजही चालू आहेत. समाजाला आनंद व विरंगुळया देणाऱ्या या परंपरा उत्सव सण मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. रामनवमी उत्सव, गोकुळाष्टमी उत्सव, दिवाळी, दसरा उत्सव सण साजरे होतात. यातुनच समाजाची समाजशिलता वाढत जाते. परस्पराविषयीची प्रेमभावना बांधिलकी वाढते. पण हे त्या काळापुरती आनंद दायी घटना असतात. कायमस्वरूपी आनंद व आत्मसुख प्राप्त करून देणारी परंपरात्मक तत्वज्ञानाची साधी परंपरा मागील समाजात निर्माण झाली होते ती म्हणजे वारी होय.

वारकरी संप्रदाय ची संघटना संत मंडळींनी उभी केली व पंढरपुरच्या विठ्ठलाला भेटण्यास पायी जाण्याची प्रथा वारी देखील संत मंडळींनी सुरू केली. या दिंडी रूपी वारीचे आगळ वेगळे वैभवशाली रूप आजच्याद काळात निर्माण झाले आहे. एक साधा वारकरी पंढरपुरच्या विठ्ठलाकडे आपली उपास्य देवता म्हणुन दर महिन्याला जातात यामध्ये दिवसानुदिवसे वाढ होत गेली संतमंडळीच्या कार्यामुळे या वारकऱ्याच्या संख्येत प्रचंड वाढ होऊन सुख देणाऱ्या विठ्ठलाकडे येणाऱ्या वारकऱ्यात वाढ झालेली. हे वारकरी एकत्र येऊन विठ्ठलाकडे पायी मजल दरमजल करत दिंडीच्या रूपाने येऊ लागले. ही परंपरा आजतागायत सुरू आहे. संत मंडळींची परंपरा त्यांच्यानंतर त्यांच्या अनुयायांनी पुढे चालु ठेवली. यापैकी आषाढी वारीच्या परंपरेला आज एक मोठे स्वरूप प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरून अनेक वारकरी पायी दिंड्या घेऊन पंढरपुरला पोचतात. देहुहून संत तुकाराम पायी दिंडी सोहळा व आळंदीहुन संतश्रेष्ट श्री ज्ञानेश्वर महाराज पायी

दिंडी सोहळा हे दोन सोहळे लाखो वारकऱ्याच्या दरवर्षीच्या सहभागाने जगाचे लक्ष्य वेधतात. म्हणून संशोधनासाठी 'देहु, आळंदी ते पंढरपुर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास' हा विषय निवडलेला आहे.महाराष्ट्रातुन अनेक ठिकाणाहून गावोगावाहून तसेच संताच्या जन्मभुमी व समाधीभुमी येथुन पंढरपुरकडे येणारे आषाढी दिंडी सोहळे आहेत. यापैकी आळंदी व देहु येथुन पंढरपुरकडे जाणाऱ्या दिंडी सोहळ्यात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील गावागावाहुन लोक येतात. अनेक दिंडी सहभागी होतात. अनेक जातीचे वर्णाचे लोक या दिंडीत सहभागी होतात. लाखो समाज या दिंडीत प्रवास करत असतो. यांच्या प्रवासातील वाटचाल ऐक्य भावना व सहजीवन हा अनोखा व वेगळा अनुभव दिसतो. या सर्व गोष्टीचा आढावा घेणे हा प्रमुख उद्देश या संशोधनाचा आहे.

## १.२ **अभ्यास विषयाची निवड व हेतू**

प्रस्तुत संशोधनासाठी **देहु ,आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास** या विषयाची निवड केली आहे.

### विषय निवडीचा हेतू

महाराष्ट्रातील इतिहासात वारकरी सांप्रदयात भारतीय संस्कृतीत दिडी सोहळा ही अनोखी व वेगळी घटना आहे. इ.स. १६८५ पासुन आजपर्यंत सतत पायी दरवर्षी आषाढी वारी या नावाने आषाढ महिन्यात देहु आळंदीहुन लाखो वारकरी १७ ते १८ दिवस पायी प्रवास करतात व शुद्ध दशमीला ते पंढरपुरला पोचतात. देहु येथुन १६८५ ला तपोनिधी नारायण महाराज तुकोबाराय यांचे सुपुत्र यांनी संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकोबाराय यांच्या पादुका एकाच पालखीत ठेवुन त्यांची पंढरपुरला जाणारी वारी ही परंपरा एकत्र दिंडींच्या रूपाने सुरू केली ही संयुक्त दिंडी परंपरा १८३२ पर्यंत सुरू होती पुढे १८३२ पासुन हैबतबाबा आरफळकर यांनी स्वतंत्र संत ज्ञानेश्वर महाराज यांची दिंडी पालखी आळंदीहुन पंढरपुरकडे नेण्यास सुरूवात झाली. असे दोन स्वतंत्र दिंडी सोहळा देहु व आळंदीहुन सुरू झाले.

या सोहळ्यात अनेक दिंड्या सहभागी होतात. त्यांची सर्व व्यवस्था दिंड्यामध्ये व्यवस्थितपणे केली जाते त्याचा रोजचा सकाळी ६.००/६.३० पासुन रात्री ७.०० वा. पर्यंतचा प्रवास, दिवसभरातील प्रवासातील घटनाक्रम, दुपारचा जेवण व्यवस्था, रात्री राहण्याची सोय याचा अभ्यास करणे.आषाढ महिना हा वर्षाऋतुचा महिना असतो १७ ते १८ दिवस जेष्ठ वद्य अष्टमी ते आषाढ शुद्ध दशमी पायी

प्रवास हे वारकरी करतात. प्रवासात होणारा त्रास सहन करत ते पंढरपुरकडे विठ्ठलाच्या भेटीसाठी पायी प्रवास करतात याचे वेगळे काय रहस्य आहे.

सामाजीक ऐक्य व राष्ट्रीय ऐक्य एकता व सामाजिक प्रेम हा संबंध येथे दिसतो. या प्रवासात प्रंचड आर्थिक उलाढाल होते. दरवर्षी या दिंडी सोहळ्यात दिंड्याची वाढणारी संख्या, वारकरी संख्या त्यांना मिळणारा आनंद याचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

## १.३ संशोधन विषयाचे महत्व

वारकरी सांप्रदयातुन भक्तीमार्गाची आवड आपल्या समाजात निर्माण झाली आहे. त्यात सतत वाढ होताना दिसते. या भक्तीमार्गाने सुख मिळवण्याच्या दृष्टीने संसार व्यापातुन रोजच्या आपल्या वैयक्तिक व्यवहारातून थोडे दिवस बाहेर पडून शाश्वत आनंद, ईश्वराची सेवा, समाजाची सेवा, निसर्गाशी एकरूप जवळीक साधता येणे. विविधतेने दर्शन घडणे, मन वाचा काया पवित्र होऊन कायिक वाचिक मानसिक तप लाभते हा अनुभव दिंडी सोहळ्यामध्ये लाखो वारकरी घेण्याचा प्रयत्न करतात. अनेक व्यक्ती आपले दुःख विसरण्यासाठी या सोहळ्यात सहभागी होतात. आनंदाच्या वारीचा अनुभव ते घेतात. आणि जीवन सफल झाल्याचा आनंद घरी येताना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवतो.

या दिंडी सोहळ्यात समाजातील अनेक वर्गातील जाती धर्मातील उच्च शिक्षित श्रीमंत गरीब लोक एकत्र येतात. कोणताही भेदभाव न करता एकत्र राहतात. केव्हाही न भेटलेले कोणताही संबंध नसलेले हे व्यक्ती दिंडी सोहळ्यात एकत्र राहतात. एकाच ईश्वराची लेकरे या नात्याने ते येथे येतात आणि तसेच ते वागतात. एकात्मकता हे स्पष्टपणे येथे जाणवते. समता बंधुत्व ऐक्य भावना आपल्याला प्रत्यक्ष अनुभवास मिळते.

धार्मिक भावना वाढीस लागुन मनुष्य सदाचारी विचारी विवेकी घडले जातात. हे सोहळ्यातुन होताना दिसते. या सोहळ्याचा प्रभाव वाढताना दिसतो. अनेक लोक दरवर्षी जोडले जातात. चांगले विचार या माध्यमातुन समाजाच्या तळगळापर्यंत पोचतात. समाजात परिवर्तन होण्यास वाव मिळतो. याचा परिणाम सामाजातील अनिष्ट गोष्टी बाजुला जाऊन समाजात चांगल्या विचाराची पेरणी होऊन सांमांजस्य निर्माण होत आहे. वैचारिक क्रांती होऊन सामाजिक परिवर्तनास मोठा हातभार लागतो. या विज्ञानवादी आधुनिक जगात तंत्रज्ञानाच्या युगात विज्ञानवादी मोठा समाज या दिंडी सोहळ्यात सहभागी होत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे राष्ट्रीय

सेवा योजनेच्या अंतर्गत विद्यार्थ्यांची दिंडी या सोहळ्यात सहभागी होत असते. आय टी क्षेत्रातील वर्ग येथे सहभागी होतात. याचा अर्थ विशेष वेगळा अनुभव या सोहळ्यात सहभागी होताना येत असेल असे वाटते. राष्ट्रीय ऐक्य भावना निर्माण होण्यास सामाजिकीकरण घडण्यास ह्या सोहळाचे निश्चित योगदान आहे. महाराष्ट्राच्या व देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडते. व आपल्या वैश्विक धर्माचे जतन होते.

### १.४ संशोधन अभ्यासची उद्दिष्टे

देहू, आळंदी ते पंढरपूर दिंडी सोहळ्यामध्ये सन १६८५ शतकापासुन सन २०१५ पर्यंत दरवर्षी लाखोच्या संख्येने वारकरी सहभागी होतात. सन १६८५ पासुन आजपर्यंत या सोहळ्याचे स्वरूप बदलत गेलेले आहेत. येणाऱ्या वारकऱ्याच्या संख्येत दरवर्षी वाढ होते. संत तुकाराम या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंड्यामध्ये दरवर्षी वाढ होते तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सोहळ्यात नवीन दिंड्या सहभागी होतात.

या दोन्ही दिंडी सोहळ्याचा दिंडी प्रवास मार्ग वेगळा आहे. दोन्ही पालखी सोहळा पुण्यामध्यें नवमीला एकत्र येतात. पुढील प्रवास हा स्वतंत्र प्रवास मार्गाने सुरू होतो. प्रवास मार्ग व मुक्काम ठिकाण वेगळी आहे. वाखरी या ठिकाणी हे पालखी सोहळे व इतर दिंड्या शुद्ध नवमीला गोल रिंगणासाठी व मुक्कामासाठी एकत्र येतात. याच काळात महाराष्ट्रातुन इतर ठिकाणाहुन येणारे दिंडी सोहळे पंढरपुरला येतात काही दिंडी सोहळे एक महिना पायी प्रवास करत पंढरपुरला दाखल होतात. या दिंडी सोहळ्याचा दररोजचा प्रवास त्याचे भोजन राहण्याची व्यवस्था त्यांचा दिनक्रम व पालखी सोहळ्याचा दिनक्रम व मुक्कामाची व्यवस्था या सर्वांहुन होणारे सामाजीकरण, किती प्रचंड आर्थिक उलाढाल होते.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातुन सर्व स्तरातुन येणारे लोक वारकरी त्यांचे एकत्रीकरण निर्माण होणारे सांस्कृतिक दर्शन सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तन जडणघडण तसेच धर्माविषयी व आध्यात्माविषयी लोकांमधील भावना व प्रेम याचे प्रत्यक्ष दर्शन कृतीवरुन स्पष्ट होते. एवढे दिवस पायी प्रवास करणारा आज आधुनिक जगातील वेगळा सोहळा आहे. दरवर्षी यामध्ये भर पडते त्यामुळे या सोहळ्याचा अभ्यास करणे हे गरजेचे वाटते.

या प्रस्तुत विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करताना उद्दिष्ट्यांवर आधारित संशोधन करावे लागते. त्यानुसार सदर संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१) दिंडी सोहळ्याचा उगमाचा अभ्यास करणे.

२) दिंडी सोहळ्याचा ऐतिहासिक प्रवास वाटचालीचा अभ्यास करणे.

३) तसेच महाराष्ट्रातील इतर संताच्या दिंडीचा आढावा घेणे.

४) या दिंडील सोहळ्यांचा समाज जिवनावर झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक ,धार्मिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

## १.५ संशोधन अभ्यासाची गृहितके

प्रस्तुत संशोधन अभ्यासाचे अंतिम निष्कर्ष वास्तव यावेत व संशोधनाला योग्य दिशा मिळावी म्हणुन खालील गृहितके मांडली आहेत.

१) या दिंडी सोहळ्यामुळे वैदिक धर्म संस्कृतीचे जतन झालेल आहेत.

२) महाराष्ट्रत व राष्ट्रीय स्तरावर ऐक्य व समता ही भावना निर्माण करण्यास दिंडी सोहळ्याचे योगदान आहे.

३) दुःखाचे निवारण होऊन सुखाचा अनुभव या दिंडी सोहळ्यातून मिळत आहेत.

४) क्षेत्र आळंदी ते पंढरपुर दिंडी सोहळा व क्षेत्र देहु ते पंढरपुर दिंडी सोहळा या दोन्ही सोहळ्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते.

### नमुना निवड

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी देहु आळंदी ते पंढरपुर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास करताना दिंडी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंड्या व वारकरी व त्यांचे स्वरूप व दिंडी सोहळ्याचा परिणाम अभ्यासताना नमुना निवड खालीलप्रमाणे केलेली आहेत

१. दिंड्यामध्ये सहभागी होणारे वारकरी

२. दिंड्यांचे मालक व चालक

## १.६ संशोधन अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत अभ्यास विषय देहु आळंदी ते पंढरपुर आषाढी दिंडी सोहळा या अभयास पर्यंत मयादित आहे. सदर अभ्यास विषयाचे कार्यक्षेत्र हे देहु आळंदीहुन जाणारा दिंडी सोहळा हे आहे.

देहु येथुन आषाढ महिन्यात श्री संत तुकाराम महाराज पालखी दिंड्यासह पायी प्रवास करत पंढरपुरकडे रवाना होतात. तसेच याच काळात आळंदीहुन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिंड्यासह पंढरपुरकडे रवाना होतात. या दोन्ही पालखी सोहळ्याच्या उगम काळाचे वर्णन

आज या सोहळ्याचे स्वरूप व परिस्थिती या सोहळ्याचा दररोजचा पायी प्रवास व प्रवासाची ठिकाणे यांचा अभ्यास या संशोधनात सिमीत करण्यात आला आहे. देहु येथुन जाणारा दिंडी सोहळा व आळंदी येथुन जाणारा दिंडी सोहळा पंढरपुर पर्यंत पोचताना दोन्ही सोहळ्याचे प्रवास मार्ग वेगळा आहे. या दोन्ही सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंड्यांचे प्रमाण वेगवेगळे आहेत.

## १.७ संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन अभ्यासाचे अंतिम निष्कर्ष वास्तव व सत्य यावेत या हेतुने संशोधन अभ्यास विषयाशी संबंधीत माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे.

### १.७.१ प्राथमिक तथ्य संकलन

प्राथमिक तथ्य संकलनासाठी प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती ,अनुसुची, गॅजेट,शिलालेख आधार घेतला आहे तसेच पुराभिलेखगार पुणे, (पेशवे दप्तर), देहू संस्थान, आळंदी संस्थान, येथून मिळालेले अस्सल कागदपत्रे. प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीचा (Purposive sampling Method ) अवलंब करून अभ्यास विषयासी संबधीत माहिती मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील प्रमुख तिर्थक्षेत्र आळंदी ,देहु पंढरपुर तसेच महाराष्ट्रातुन पंढरपुरकडे जाणाऱ्या अनेक दिंड्या यापैकी देहु आळंदी ते पंढरपुर ला जाणाऱ्या आषाढी दिंडी सोहळा वारकरी दिंड्यांचे स्वरूप मुक्कामाचे ठिकाण व प्रमुख दिंड्या यांची माहिती अनुसुची ,मुलाखती ,निरीक्षण व उपलब्ध साधनाने संकलित केली आहे.

### १.७.२ दुय्यम तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनासाठी अनेक संपादीत व प्रकाशित ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, बातमीपत्रे, इंटरनेट, प्रबंध, शोधनिबंध इ.

संशोधन विषयानुसार संशोधन परिपुर्ण होण्यासाठी व काम व्यवस्थित होण्यासाठी संशोधन आराखड्यानुसार प्रकरणाची रचना करण्यात आली आहे. ती खालीलप्रमाणे आहेत.

**१.८ प्रकरणानुसार मांडणी**

**प्रकरण १ ले – संशोधन पद्धती**

१. प्रस्ताविक

२. अभ्यास विषयाची निवड व हेतु

३. अभ्यास विषयाचे महत्व व उद्दिष्टे

४. संशोधन अभ्यासची गृहिते

५. संशोधन अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा

६. संशोधन अभ्यासाचा कालावधी

७. संशोधन पध्दती

अ. प्राथमिक तथ्य संकलन

ब. दुय्यम तथ्य संकलन संशोधनातील अडचणी

८. संशोधन आराखडा

**प्रकरण २ रे – विषय–प्रवेश**

१. प्रास्ताविक

२. पंढरपुर धाम ऐतिहासिक पार्श्वभुमी

३. पंढरपुरचे ऐतिहासिक स्थान व महत्व

४. पंढरपुरातील धार्मीक स्थळे

५. विठ्ठल शब्दाची उत्पत्ती

६. वारकरी तत्वज्ञान नियम व खुण

७. वारी

८. दिंडी संकल्पना

९. श्री नारायण बुवा दिंडी प्रवर्तक

१०. हैबतबाबा दिंडी प्रवर्तक

११. सारांश

**प्रकरण ३ रे**

**वारकरी सांप्रदायाचा इतिहास**

१) प्रास्ताविक

२) श्री ज्ञानेदेवांच्या पुर्वीचा वारीकरी सांप्रदाय ऐतिहासिक काळ

३) श्रीज्ञानदेव व श्री नामदेव महाराज यांच्या काळातील वारकरी सांप्रदाय

४) श्री भानुदास व श्री एकनाथ महाराज यांच्या काळातील वारकरी सांप्रदयाचा इतिहास

५) श्री तुकोबाराय व श्री निळोबा महाराज यांच्या काळातील वारकरी सांप्रदायाचा इतिहास

६) तद् नंतरच्या ३०० वर्षाचा वारकरी सांप्रदायाचा इतिहास

७) श्री पांडुरंग उपासकाळातील सांप्रदाय

८) वारकरी सांप्रदायाचे तत्वज्ञान

९) वारकरी सांप्रदायाची ग्रंथ संपदा

१०) वारकरी सांप्रदायाची प्रमुख क्षेत्रे

११) वारकरी सांप्रदायाची कामगिरी

**प्रकरण ४ थे– श्रीक्षेत्र देहु ते श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा**

१) प्रस्ताविक

२) देहु येथुन संत तुकाराम महाराज पालखी दिंडी सोहळा प्रस्थान

३) प्रवासातील दररोज नित्यक्रम

४) दिंडी प्रवासाचा मार्ग, वाटचाल ,मुक्काम

५) दिंडी प्रवासतील रिंगण

६) सारांश

**प्रकरण ५ वे श्रीक्षेत्र आळंदी ते श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा**

१) प्रस्ताविक

२) श्री क्षेत्र आळंदी येथुन संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळा प्रस्थान

३) प्रवासातील दररोज नित्यक्रम

४) दिंडी प्रवासाचा वाटचाल मार्ग मुक्काम

५) दिंडी प्रवासतील रिंगण

६) वाखरी येथील भव्य गोल रिंगण

७) परतीचा प्रवास

८) पालखी सोहळ्याची आर्थिक स्थिती

९) सारांश

**प्रकरण ६ वे महाराष्ट्रातुन पंढरपुरकडे येणाऱ्या इतर दिंड्या सोहळ्यांचा अभ्यास**

१. प्रस्ताविक

२. संत निवृतीनाथ महाराज दिंडी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर ते श्री क्षेत्र पंढरपुर

३. संत सोपानकाका दिंडी श्री क्षेत्र सासवड ते श्री क्षेत्र पंढरपुर

४. संत मुक्ताबाई दिंडी श्री क्षेत्र एलाहाबाद ते श्री क्षेत्र पंढरपुर

५. संत एकनाथ महाराज दिंडी श्री क्षेत्र पैठण ते श्री क्षेत्र पंढरपुर

६. सद्‌गुरू चैतन्य महाराज दिंडी श्री क्षेत्र ओतुर ते श्री क्षेत्र पंढरपुर

७. संत गजानन महारज दिंडी श्री क्षेत्र शेगाव ते श्री क्षेत्र पंढरपुर

८. संत साईबाबा दिंडी श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपुर

९. महाराष्ट्रातुन व इतर प्रदेशातुन येणाऱ्या इतर दिंड्या

१०. सारांश

**प्रकरण ७ वे निष्कर्ष व शिफारशी**

१) प्रस्ताविक

२) सिंहालोकन

३) निष्कर्ष

४) शिफारशी

## प्रकरण दुसरे

# विषय प्रवेश

२.१ पार्श्वभूमी

२.२ मानव आणि संस्कृती

२.३ पंढरपुर धाम ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.४ पंढरपुरचे ऐतिहासिक स्थान व महत्व

२.५ पंढरपुरातील धार्मीक स्थळे

२.६ विठ्ठल शब्दाची उत्पत्ती

२.७ वारकरी :- तत्वज्ञान नियम व गुण

२.८ वारी संकल्पना

२.९ दिंडी शब्दाची संकल्पना

२.१० श्री नारायण बुवा दिंडी प्रवर्तक

२.११ हैबतबाबा दिंडी प्रवर्तक

२.१२ सारांश

# विषय प्रवेश

## २.१ पार्श्वभुमी

मानव हा समाजशील प्राणी आहे.तसेच तो आध्यात्मिक देखील आहे. कारण मनुष्य हा नेहमी सुखसाठी धडपडत असतो.आणि मनुष्याचे खरे व शाश्वत सुख आध्यात्म मिळुन देते. सुख मिळवण्याचा अध्यात्मातील एक मार्ग भक्ती. भक्तीचे एक अंग पंढरपूरची वारी मानली जाते व वारकऱ्यांच्या सुखाचा आगर पंढरपुरचा विठ्ठल मानला जातो.सर्व वैष्णवाची मांदीयाळी एकत्र जमवुन दिंडीच्या माध्यमातुन पंढरपुरला पायी जातात. प्रवासात लाखो वारकरी एकत्र येऊन आळंदी,देहू येथून १८ दिवस पायी प्रवास करत विठ्ठलाचे नामस्मरण करत आषाढी शुध्द दशमीला पंढरपुरला पोचतात.दरवर्षी आषाढ महिन्यात पंढरपुरला जाणारा जगातील हा आगळा वेगळा ऐतिहासिक प्रवास आहे.या ऐतिहासिक प्रवासाला अनेक वर्षे लोटुन गेले.आज 'दिंडी'या सोहळ्याचे भव्य दिव्य स्वरूप झाले आहे.अनेक 'दिंड्या'या वारी सोहळ्यात सहभागी होतात.भजन गात,टाळ,मृदंग वाजवत,अभंग गात, आनंद घेत पायी प्रवास करतात.तसेच महाराष्ट्रातील असंख्य वारकरी दिंडीच्या माध्यमातुन पंढरपुरला पोचतात.यापैकी काही दिंड्या आळंदी व देहु येथुन पंढरपुरकडे प्रस्थान करतात. तर इतर दिंड्या आपल्या गावाहुन,तर काही आपल्या जवळच्या गावाकडील दिंडयामध्ये एकत्र येऊन पंढरपुर कडे प्रस्थान करतात. महाराष्ट्रातुन व महाराष्ट्राबाहेरून या पद्धतीने अनेक'दिंडी सोहळे'आषाढ महिन्यात 'शुद्ध दशमीला'पंढरपुरला पोचतात.दुसऱ्या दिवशी 'सर्व दिंडया'नगर प्रदक्षिणा करतात. या सोहळ्यालाच शुद्ध एकादशीला 'आषाढी वारी'असे म्हणतात.

या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंडी सोहळ्यापैकी आळंदी येथुन येणारा 'श्री ज्ञानेश्वर महाराज दिंडी सोहळा' व देहू येथुन येणारा 'श्री संत तुकाराम महाराज दिंडीसोहळा' हा आगळा वेगळा व सर्वात जुना मानला जातो. म्हणुन तो विशेष व महत्वपुर्ण आहे. हा ऐतिहासिक प्रवास इतिहास लेखनापासुन दुर्लक्षित राहिला असल्यामुळे व पुढील येणाऱ्या पिढीला व समाजातील सर्व लोकांना या विषयाची ऐतिहासीक संशोधन या दृष्टीकोनातुन माहिती उपलब्ध व्हावी व या विषयाला न्याय मिळावा म्हणुन 'देहू ,आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास' हा विषय पीएच.डी. संशोधनाकरीता निवडला आहे.

## २.२ मानव आणि संस्कृती

मानवी जीवन सुसंस्कृत करण्यासाठी संस्कृती हा मानवाचा विशिष्ट गुण असुन तेच मानवाचे लक्षण आहे.म्हणुन हा संस्कृती प्रधान प्राणी आहे.संस्कृती म्हणजे मुळ स्थितीत घडवुन आणलेला बदल होय.संस्कारामुळे गुणाधान व दोषापनयन होऊन व्यक्तीच्या ठिकाणी योग्यता निर्माण होते. आपले जिवन आनंदमय करण्याचे प्रयत्न अखंडपणे चाललेले असतात. जीवन साफल्यासाठी आत्मिक सामर्थ्याचा विकास व शक्ती वरील स्वामित्वाची प्राप्ती या मानवी क्रिया अव्याहत सुरू असतात. त्यामुळे मानव व निसर्ग यांचा संघर्ष होऊन त्यातुनच संस्कृतीचा उदय होतो.निसर्गामध्ये मानव विवस्त्र जन्माला येतो.पण संस्कृती त्याला वस्त्राचा पेहराव चढविते. जीवन सफलतेसाठी बाह्य निसर्गाप्रमाणे मानवावर ही संस्कार करावे लागतात. मानवाच्या शरीराला इंद्रीयाला वळण लावणे मनाचा विकास करून त्यातील स्वार्थी दृष्ट प्रवृत्तीचा नाश करणे व त्याची ज्ञान शक्ती वाढविणे याचा अंतर्भाव संस्कृतीत होतो.मनुष्य हा निसर्गता स्वार्थी अहंकारी आत्मनिष्ठ असतो त्याला समाजभिमुख बनवणे,त्याच्या मनोवृत्तीची व्याप्ती वाढविणे, इतरांच्या आत्मसुखात आत्मसुख पाहण्याची वृत्ती निर्माण करणे हे कर्तव्य होय.याचे वर्णन गीतेत सांगितले आहे.

''यस्तु सर्वाणी भूतानी आत्मन्येवानुपश्यति ।
सर्व भूतेषू चात्मानं ततो न विजुगुप्सते।।''[१]

त्याच बरोबर मानवातील पाशवी वृत्तीचा नाश करणे त्यास देवत्व प्राप्त करून देणे हे संस्कृतीचे प्रधान कार्य आहे.समाज व संस्कृती याचा समवाय संबंध असुन समाजाशिवाय संस्कृतीचे अस्तित्व नाही.अर्थात संस्कृतीशिवाय मानवी समाज पशुतुल्य राहील हे गीतेत सांगितले आहेत.

''आहार निद्रा भय मैथुनंच। सामान्य मेतत्पशुभिर्नराणाम।।[२]
धर्मो हि तेषामधिको विशेषो। धर्मेन हीना पशुभीः समाना।।'' – महाभारत

### आध्यात्मिक संस्कृती

निती धर्म ही मानवी गटाची धारणा शक्ती आहे यालाच हिंदु लोक धर्म म्हणतात. मानवाच्या जीवन क्रांतीच्या प्रक्रीयेस व तिच्या कार्यास आध्यात्मिक संस्कृती म्हणतात. संस्कृती ही व्यक्तीनिष्ठ व अतिद्रींय असते. कोणीही व्यक्तीस ती जन्मजात देणगी नसुन प्रत्येकाला ती नव्याने संस्काराने मिळावी लागते.वारसा हक्काने कोणी कोणास संस्कृती देऊ शकत नाही.व्यक्ती संस्कृती घडवीत

नसुन संस्कृती व्यक्तीचे जीवन घडवीते. मनुष्याच्या स्वभावात अधोगतीला,प्रगतीला नेणाऱ्या प्रवृत्ती भरलेल्या आहे त्यापैकी इष्टाचे संवर्धन व अनिष्ठाचे दमन करून व्यक्ती घडविली जाते.प्रत्येक मानवाची जीवनमुल्ये श्रद्धामय असतात. सामाजिक जीवन समृद्ध व सुखी करण्यासाठी भूतसृष्टीला राबविणे आवश्यक आहे. समृद्ध मानवी जीवनाच्या साधनसामग्रीस भौतीक संस्कृती म्हणता येईल.सुसंस्कृत माणूसच जीवनाच्या सुधारणेचा उपयोग जीवनाच्या विकासासाठी करील.सुसंस्कृत मनच भौतिक विश्वावर विजय मिळवु शकेल जेथे भौतिक समृद्धी आहे तेथेच संस्कृतीचा प्रसार होतो. अशा संस्कृतीची जोपासना करून तिचा व्यक्तीतुन समाजापर्यंत पोचविण्याचे कार्य संप्रदाय पंथाद्वारे होत असते. एखादी व्यक्ती दैवी गुणाची प्रतिमा घेऊन या भुतलावर अवतरते व तिच्याद्वारे स्वतः ईश्वर अशा मानवी कल्याणकारी संस्कृतीचे पालन करत असतो.

या भारतवर्षात अशी संस्कृतीची जोपासना करणारे हिंदू ,जैन, बौध्द, ख्रिश्चन, इस्लाम, पारशी, शिख,पंथ व संप्रदाय असुन त्यापैकी महाराष्ट्रात अलौकीक काम वारकरी पंथ करीत आहे. वारकरी पंथ म्हणजे भागवत धर्म. हा एक असा धर्म आहे की ज्यात वैदीक धर्माची नीतीतत्वे प्रतीपादली असुन प्रकृतीची निवृत्तीशी सांगड घालणारा व्यक्तीला समाजापासुन दुर न लोटता व्यक्ती व समाज याची ताटातुट न करता इहपरलोकी जेणे करून कल्याण होईल.व्यक्तीची नव्हे तर विश्वाची काळजी घेणारा असुन तो एका व्यक्तीसाठी जातीसाठी मर्यादित नसुन सर्वांच्या करीता आहे. ज्यात नीतीचा अभ्युदयाचा अंतर्भाव होतो कारण समाजात सुख शांतीचा फैलाव होण्यासाठी धर्म नीतीची, अत्यंत गरज आहे. कारण ''धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा।'' आणि तो असा एकच मानवता धर्म विश्वधर्म म्हणजे की यतो भ्युदयनिः श्रेयससिद्धीःसःधर्मः तोच भागवत धर्म–वारकरी पंथ या पंथाची रचना,संघटना महान संतश्रेष्ठ ज्ञानियांचे राजे श्री ज्ञानदेवांची केली. त्यांच्यानंतरही अनेक साधुसंतानी या पंथाला उजाळा दिला असुन त्याचा सुगंध अजुनपर्यंत उमललेल्या फुलातील सुगंधाप्रमाणे दरवळत आहे. श्री संत ज्ञानदेवांनी कुठल्याही नवीन पंथाची,धर्माची स्थापना केली नसुन वैदिक धर्मालाच उजाळा दिला. हे तुकाराम महाराज यांच्या वचनावरून दिसून येते

बुडता हे जन न देखवे डोळा ।येतो कळवळा हिताचा ।।[३]

त्याच्या ठिकाणी असलेली वात्सल भाव,विश्वबंधुत्व,विश्वव्यापक वृती होय. त्याच वेळची स्थितीत्व अशी की वैदीक धर्मच काही कर्मठांनी मर्यादित ठेवला होता. प्रत्येकाला आत्मोहाराची तळमळ असुनही अधिकार काही वर्गासाठीच होता. श्रेष्ठ आपल्या धर्माभिमानात गुंतून गेले होते. सामान्याचे हित आहेत जाणण्यास त्याच्या ठिकाणी मोहदाधकार आल्याने त्याचे ज्ञान विषयासक्तीने ग्रासले होते.अशावेळी लोकांना गरज होती सनातन धर्मांचे स्वरूप उघडे करणाऱ्या या महान युग पुरूषाची. महाराष्ट्राचे भाग्य उद्याला येऊन महान तपस्वी योगी ज्ञानी भक्त या भुतलावर अवतरला अगदी शितल ज्ञानप्रकाश घेऊन त्याने समाजाच्या अंतरीचा ठाव घेतला. सर्वांची मांदियाळी केली मुक्तीची बाजारपेठ उघडली.ब्रम्हविद्येचा सुकाळ करून साम्राज्य स्वानंद सुखाच्या छायेत सर्वांना उभे केले. वारकरी पंथापुर्वी वैदिक धर्मपद्धतीत समाजाची चार वर्ण,चार आश्रमात विभागणी झाली होती. हिंदू धर्मातील प्रत्येक घटक आपल्या आत्मोध्दारापासून वंचित होत होता कारण सर्वांना आत्मोध्दाराचा अधिकार नव्हता.ज्यांना होता ते जन्मजात पुज्यतेमुळे गर्विष्ठभूत होऊन अभिमानातच अडकुन राहिले होते.अशी असणारी स्थिती या महान संतानी बदलुन हिंदू धर्मास व हिंदु धर्माच्या अनुयायांना वाचविण्यासाठी समाननेवर आधारीत अशी संस्कृती की जिच्यात सर्वांना स्वतःच्या बळावर स्वोद्धार करून घेण्याच्या अधिकार आहे ज्यामध्ये उच्चनिचतेला स्थान नाही.जो आपल्या मानवीय गुणांना अधिकाधिक विकसीत करू शकेल सर्वांना बरोबर घेऊन जाऊ शकेल की ज्यात यातीकुळ,जात,वर्ण महत्व नाही असे तुकाराम महाराज सांगतात.

यारे यारे लहान थोर। याति भलती नारी नर।।[४]

असा महान विचार या पंथामध्ये आहे.या वारकरी पंथाचे उपास्य दैवत पंढरपुरचा पांडुरंग श्री विठ्ठल म्हणजेच भगवान श्री कृष्णाचे बाळ स्वरूप होय या संदर्भात वर्णन असे येते.

जेणे गीता उपदेशिली ।तिही विटेवर माऊली ।।[५]

या पंढरपुरचे महत्व व वर्णन पुढीलप्रमाणें केलेले आहे.

## २.३ ‘पंढरपुरः– धाम’ ऐतिहासिक पार्श्वभूमी

धाम म्हणजेः– भगवंताच्या निवासस्थानास ‘धाम’ असे म्हणतात. ब्रम्ह संहितेमध्ये ब्रम्हदेव सांगतात भगवंताच्या निवासस्थाचे नाव ‘गोलोक’ आहे.

‘गोलोक एव निवसत्यस्त्रिलात्मभुतः’[६]

गोलोकात ही वृंदावन,मथुरा,द्वारका अशी स्थाने आहे. रसराज गोपीजनवल्लभ श्रीकृष्ण 'गोलोकवृदावनामध्ये' निवास करतात तर द्वारकाधीस श्रीकृष्ण 'द्वारका' लोकात निवास करतात.पंढरपुर'दक्षिण द्वारका' भुवैकुंठ आहे. सृष्टीरचनेत गोलो वृदावनाचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे.गोलोक वृदावनाखाली क्रमशः 'वैकुंठलोक','महेशधाम' आणि 'देवीधाम' येते.

**हरिधाम :–**

कृष्ण लोक नावाने जाणले जाणारे हे दिव्य देदीप्यान असे धाम आहे. तेच अपरिचीत आहे या धामात असंख्य देदीप्यान गृह आहे जे स्वयं प्रकाशित आहे त्याला आपण 'वैकुंठ' म्हणतो हरिधामाचे अधिष्ठाता भगवान हरि आहे.

**देवीधाम :–**

भौतिक प्रकृतीच्या अंतर्गत असलेल्या ब्रम्हांडास देवीधाम म्हणतात. देवीधामाचे अधिष्ठाता विष्णू आहेत आणि ब्रम्ह,शिव त्याचे सहाय्यक आहे. सत्वगुण,रजगुण आणि तमगुणाद्वारे या धामाचे नियंत्रण होते. ब्रम्हदेव सृष्टीचे निर्माण करतात. श्रीविष्णू त्याचे पालन करतात. शिव संहार करतात.भौतिक सृष्टीची उत्पत्ती आणि संहार भगवंताच्या इच्छेने होते. भगवंतापासुन वेगळे राहून भोग करण्याची इच्छा असणारे बद्ध जीव येथे राहतात.

**महेशधाम :–**

हरिधाम आणि देवीधामाच्या मध्ये महेशधाम आहे.निर्विशेषवादी दिव्यतेच्या आस्थित्वात एक होण्याची इच्छा करतात,तेव्हा 'महेश धामात' जातात. भगवद्भक्ती करून मनुष्य हरिधामात प्रवेश करतात. ज्ञानायोगाने ते महेश धामात जातात.तर कर्मयोग पद्धतीने मनुष्य वारंवार जन्ममृत्युच्या चक्रामध्ये शरीरे बदलुन या भौतिक जगात जन्म घेण्यास बद्ध होतो.भगवंताचे धाम हे त्यांच्या सान्धिनी शक्ती(सत्शक्ती)ने प्रकट होते. त्याच्या धामात जन्म,मृत्यू, जरा, व्याधी, नाही भुतकाळही नाही आणि भविष्यकाळही. तेथे सदैव वर्तमान स्थिती असते. भगवंताचे धाम हे भौतिक जगाच्या पलीकडे आहे तेथे भौतिक जगातील नियम लागू पडत नाही. भगवद्गीतेतील पंधराव्या अध्यायात भगवंत सांगतात की भौतिक जगात आध्यात्मिक जगताचे प्रतिबिंब आहे. या भौतिक जगत्रूपी झाडाचे मुळ वर असुन शाखा खाली आहेत. असा अनुभव आपण तलावाच्या काठी करतो. तेथे तलावकाठी असलेल्या झाडाची प्रतिमा आपण जेव्हा पाण्यात बघतो तेव्हा त्याचे मुळ वर आणि शाखा खाली दिसतात. याचा अर्थ असा की, तेथे वास्तविकपणे एक वृक्ष आहे आणि

त्याचे प्रतिबिंब आपण पाण्यात बघतो. या भौतिक जगाविषयी भगवंत म्हणतात,हा एक वटवृक्ष आहे, ज्याची मुळे वर आणि शाखा खाली आहे हे जगत आध्यात्मिक जगाचे प्रतिबिंब आहे यावरून हे स्पष्ट होते की,जर भौतिक जगत् आहे तर आध्यात्मिक जगाचे हे आस्तित्व आहे.

''ऊर्ध्व मूलमधःशाख मश्वत्थं प्राहुरव्ययम्।

छन्दासि यस्य पर्णानि यस्तं वेद सवेदवित्''।।१।।[७]

अद्वैत सिद्धांतानुसार अद्वैतींना ब्रम्हज्योतीमध्ये विलीन होण्याची इच्छा असते. ब्रम्हज्योती म्हणजे केवळ भगवंतापासुन निघणारे दिव्य किरण आहेत,ज्यामुळे त्यांच्या धामात सूर्य,चंद्र किंवा अग्निची गरज नसते.

''न तद्भासयते सुर्यो न शशांको न पावकः।''[८]

आपण भगवद्धामात जाण्याच्या प्रगन मार्गाकडे येण्याचा प्रयत्न केला पाहिजे.असा मार्ग संत तुकाराम महाराजांनी तयार केला आणि ते आपल्या गावाला पोचले.

''आम्ही जातो आमच्या गावा। आमचा राम राम घ्यावा।।''[९]

तुकाराम महाराजनी ज्याला आपले गाव म्हटले आहे ते म्हणजे 'वैकुंठधाम'भगवंत जेव्हा पृथ्वीवर आपली लीला प्रकट करतात,तेव्हा दिव्य धामाचा एक भाग भौतिक जगात प्रकट होतो. जसे श्रीकृष्ण आपली लीला पृथ्वीतलावावर करतात,तेव्हा दिव्य गोलोक वृंदावन धामाचा एक भाग भौतिक जगात प्रकट होतो, ते म्हणजे गोकुळ वृंदावन होय. या दोन्हीही धामामध्ये कुठलेही अंतर नाही अंतर केवळ स्थानाचे आहे. एक धाम दिव्य आध्यात्मिक जगात आहे तर दुसरे भौतिक जगात ज्याप्रकारे भगवंताच्या शाश्वत लीला आध्यात्मिक दिव्य धामात होत असतात,त्याच प्रकारे येथील धामातही होतात. भगवंताचे धाम हे अच्युत आहे. भगवान अनन्तशेष संपुर्ण भूमंडलाला आपल्या फणांवर धारण करतात तेव्हा पृथ्वी त्यांच्या एका फणीवर स्थित असते.तसे पंढरपुर हे धामही शाश्वत आहे,चिन्मय आहे. धामातील अधिष्ठाता आराध्य देवास 'धार्मी' म्हणतात.जसे वृंदावन मथुरेचे धार्मी रसराज श्रीकृष्ण,आयोध्याचे धार्मी श्रीराम तसेच पंढरपुरचे धार्मी श्रीविठ्ठल आहे. ज्याप्रकारे आपण भगवंतांची आराधना,पुजा करतो त्याप्रकारे धामाचीही सेवा करायला हवी. भगवंत स्वतः धामाच्या रूपाने स्वतःचा विस्तार करतात.भगवंताचे धाम भगवंताहुन अभिन्न आहे, कारण भगवंताचे नाव,रूप,गुण,लीला तसेच त्यांच्या अवताराचे स्थान(धाम) त्यांच्याहुन भिन्न नाही. दक्षिण भारतातील हे एक प्राचीन तीर्थक्षेत्र, भागवत धर्माचे आद्यपीठ संताचे माहेर,दक्षिण

द्वारका समजले जाणारे पंढरपुर हे भक्त भाविकांचे परम श्रद्धास्थान आहे.महाराष्ट्रातील सोलापुर जिल्ह्यात चंद्रभागा नदीकाठी वसलेल्या या तिर्थक्षेत्रास महाराष्ट्राची'आध्यात्मिक राजधानी' संबोधली जाते.पंढरपूर क्षेत्रास विविध काळात पंढरपूर, पंढरी ,पांडुरंगपूर, पंढरीपूर, पौंडरीक क्षेत्र, पंडरंगे, पांडुरंग वल्ली अशी विविध नावे दिलेली आढळतात.(सोलापुर गॅजेट)आज मात्र जनमानसात रूजलेले नाव म्हणजे 'पंढरीनगरी''तीर्थक्षेत्र पंढरपुर'[१०]पंढरपुरचे मुख्य दैवत हे साजिरे–गोजिरे सावळे श्रीविठ्ठल,पांडुरंग होय.कटेवर हात ठेऊन, पंढरपुरच्या दिशेने येणाऱ्या आपल्या भक्ताचे वाट पाहत भगवंत ऊभे आहेत. पंढरपुर भिमा नदीच्या पश्चिम तीरावर वसलेले आहे.या क्षेत्रात भीमा नदी ऊर्ध्व पौड्रचंद्राच्या कोरीप्रमाणे आकार घेत असल्यामुळे येथे भीमेच्या प्रवाहास 'चंद्रभागा' असे अभिधान प्राप्त झाले आहे. 'भिवरा','भीमा' या नावानीही तिचा उल्लेख आढळतो. पंढरपुर हे १६$^{१/२}$ उत्तरअंशास व ६५$^{१/२}$ पुर्व रेखांश यावर स्थापित आहे.[११]

## २.४ पंढरपुरचे :– ऐतिहासीक स्थान व महत्व

पंढरपुर हे १६ उत्तरअंशास व ६५ पुर्वरेखांश यावर आहे. 'पांडुरंग' हे विठ्ठलाचे पर्यायी नाम म्हणुन आलेले आहे यावरून ते क्षेत्राचे नाव होते. 'पांडुरंग विठ्ठल' हे काशी विश्वनाथ यासारखे नाव आहे. काशी विश्वनाथ म्हणजे काशी क्षेत्राचा विश्वनाथ असा होतो. हैदराबाद मधील तिरूमलै पर्वतावर व्यंकटेश हे मंदिर उभारले आहे. मात्र तेथील भक्तांनी तिरूमलै व्यंकटेश असे नामकरण केले. याचा अर्थ असा होतो. पुढे–पुढे ही प्रथाच रूजली गेली.त्या त्या तीर्थस्थानावरून तेथील देवांचे पर्यायी नाम ठरू लागले.पंढरपुर या क्षेत्राचे मुळ कन्नड नाव पंढरंगे.विठ्ठल मंदिरातील सोळखांबी मंडपातल्या तुळईवर असलेल्या,होयसळ नृपती सोमेश्वराच्या लेखात(११५९)या ग्रामनामाचा उल्लेख आहे.या 'पंढरंगे'पासुनच 'पांडुरंग' हे देवनाम, पांडुरंग,पंढरपुर,पंढरी हे क्षेत्रनाम येते. [१२]पंढरपुर पुर्वी दिंडरवन या नावाने ओळखले जात असे. येथील जंगलात दिंडीरव या राक्षसाचे वास्तव्य होते . त्याचा वध मल्लिकार्जुनाने केला. पुढे शालिवाहन राजवटीत या जंगलाची साफसफाई करण्यात आली आणि तीन योजन अंतरामध्ये एक विस्तीर्ण वस्ती बसविण्यात आली.राजाने खर्च करून मल्लिकार्जुनाचे देऊळ तसेच पांडुरंगाचे देऊळ बांधले. आणि पंढरीनाथाची वास्तु उभी करून नगरीला 'पांडुरंग नगरी 'असे नाव दिले [१३]

इ.स. ५१६ मधील एका शिला लेखामध्ये पंढरपुरचा उल्लेख पांडुरंग पल्ली असा केलेला आढळतो. केरळ कालंटी परिसरात इ.स.७३२ ते इ. स. ७८८ कालावधीत होऊन गेलेल्या श्री

आद्य शंकराचार्य यांनी संस्कृतमध्ये लिहलेल्या श्री 'पांडुरंगाष्टकम्'या अष्टश्लोकी काव्यामध्ये भीमानदीच्या तीरावर उभ्या असलेल्या पांडुरंगाची मी उपासना करतो असे म्हटले आहे.[१४] सोळखांबी शिलालेखात इ.स.१२२६ मध्ये भीमरथी नदीच्या काठी पंडरंगे नावाचे महाग्राम वसले आहे. असा उल्लेख आहे.तसेच इ.स.१२७० साली झालेल्या एका यज्ञाचा तपशील शीलालेखात पंढरपुरच्या उल्लेख पांडुरंगपुर असा केला आहे.इ.स.१२६० ते इ.स १३०९ या यादव काळातील हेमाद्री(हेमांडपंत)या मंत्र्याने आपल्या 'चतुर्वर्ग चिंतामणी' ग्रंथात पंढरपुर व पांडुरंगाचे वर्णन केलेले आहे.इ.स.१३०३ सालच्या चौडरस या कविच्या 'अभिनवदसकुमार'या ग्रंथात पंढरी व विठ्ठलराय असा उल्लेख केला आहे. इ.स.१३०५ साली लिहील्या गेलेल्या 'कृस्नकर्णामृतं'या ग्रंथात भीमच्या काठी असलेल्या या सावळ्या देवाने आपले हात कमरेवर ठेवले असल्याचा उल्लेख आहे.[१५]इ.स.१४९० ते इ.स. १५०८ या काळात निजामशाहीतील दलपतीराज या मंत्र्याने लिहलेल्या 'नृसिंह प्रसाद'या ग्रंथातील तीर्थसार भागातील कथेनुसार सांगायचे तर यात पुंडरीक क्षेत्र भीमेच्या दक्षिण तीरावर राहत असल्याचा उल्लेख आहे. येथे पुंडरीक नावाचा माणुस आश्रम बांधुन राहत होता.तो आपल्या आईवडीलाची करीत असलेली सेवा पाहुन भगवान कृष्ण प्रसन्न झाले व पुंडरीकास वर मागावा असे त्यास सांगितले. तेव्हा पुंडरीकाने हे क्षेत्र माझ्या नावाने पुंडरीक क्षेत्र [१६] म्हणुन प्रसिद्ध व्हावे,असा वर मागितला. त्यांचीविनंती मान्या करून भगवंताने त्याला मी येथे गुप्त रूपाने वास करीन असे आश्वासन दिले. हे क्षेत्र आज सरकार दरबारी पंढरपुर या नावाने ओळखेले जाते.पंढरीनाथाची नाथाची उपासना विविध नावाने केली गेलेली आहे.पंढरीनाथ, पांडुरंग, पंढरीराया, विठाबा, विठाई, विठूमाऊली, विठ्ठल, असे त्याचे अनेक नामे आहेत. आज पांडुरंग आणि श्रीविठ्ठल या नावाने ते अधिक प्रसिद्ध आहे.[१७]

संत मंडळी म्हणतात......

माझे माहेर पंढरी । आहे भीवरेच्या तीरी ।
बाप आणि आई । माझी विठ्ठल रखुमाई ।
माझी बहीण चंद्रभागा। करीतसे पाप भंगा ।।[१८]

पंढरपुर हे संताचे माहेरघर आहे. जशी एखादी सासुरवासीन माहेरी आपल्या आई–वडिलांच्या प्रेमळ छायेत येऊन सुखावते,पांडुरंग आपल्या प्रेमपाहण्यात आपल्या भक्तांना ओलेचिंब करतो.जसा माहेरी आलेल्या मुलीचा पाय माहेरातुन निघत नाही तशी संतांना पंढरी सोडाविशी

वाटत नाही. त्यांचे सुख,समाधान,प्रेम व मायबाप हे सर्वकाही पंढरीतच आहे.पंढरपुर म्हणजे श्रद्धेचा महापुरच.पंढरपुर शहर हे एक आगळेच नगर आहे.महाराष्ट्रातील ते एक श्रेष्ठ भक्तीनगर आहे. भाव आणि भक्ती हेच काय ते येथले कार्य आणि हाच या नगराचा पंच प्राण आहे. दुधासारखे उत्तम पेय,मातृप्रेमासारखे खरेखुरे प्रेम,साधुसंतांसारखा उत्तम सल्ला,मार्गदर्शन व उपदेश परोपकारासारखे दुसरे पुण्य आणि भक्ती सारखा परमेश्वर प्राप्तीचा सुगम उपाय या गोष्टीच्या तोडीच्या दुसऱ्या गोष्टी ज्याप्रमाणे जगात सापडायच्या नाहीत,त्याप्रमाणे पंढरी क्षेत्राच्या तोडीचे अन्य परम पवित्र तिर्थक्षेत्र इतरत्र सापडायचे नाही.पंढरीत जे नाही ते इतर क्षेत्रात नाही व इतर क्षेत्री जे आहे,ते या पंढरी क्षेत्रीही आहे.

श्रीपांडुरंगाच्या वास्तव्यामुळे पंढरपुर हे 'मूर्तीमंत आनंदस्थान'म्हणुन ओळखले जाते. श्रीसंत तुकाराम महाराजांनी एका अभंगातुन या पंढरी क्षेत्राचा गौरव केला आहे. श्रीसंत तुकाराम महाराज म्हणतात

सकल तिर्थाहुनी । पंढरी हे मुकूट मणी ।।

काय सांगो तेथील शोभा । रमावल्लभ जेथे उभा ।।

न लभे व्रत तिर्थादाने । जे या विठ्ठल दर्शनी ।।[१९]

याचा अर्थ पंढरपुर क्षेत्र सर्व तीर्थांचा ' मुकूटमणी' आहे.व्रत,तीर्थ,आणि दान करून जे काही मिळत नाही ते केवळ विठ्ठलाच्या दर्शनाने या ठिकाणी मिळते. संतांच्या अभंगातुन वर्णित झालेले पंढरीमहात्म्य हे त्या संतांना झालेले प्रत्यक्ष अनुभुतीच आहे.त्यांच्या मते पंढरपुर केवळ पंढरपूर नव्हे,तर चंद्रभागा,पुंडलिक,संतदर्शनआणि विठ्ठलाविषयीचे भक्तीप्रेम म्हणजे पंढरपुर होय.तिथे गेल्यावर दिनाचा सोयरा,आनंदाचा कंद,भक्तकामकल्पद्रुम पांडुरंग तर भेटतोच,त्याहुन भक्तीसुखाचा सोपा मार्ग संताच्या सहवासात सहजपणे सापडतो.

श्री संत तुकाराम महाराज म्हणतात

पंढरीस दुःख न मिळे ओखदा । प्रेमसुख सदा सर्वकाळ ।।

पुंडलिके हार भरीयेले पेठ। अवघे वैकुंठ आणियेले ।।[२०]

तेथे सदा सर्वकाळ प्रेमसुख आहे.पंढरीस पुंडलिकाने पेठबाजार भरविला आहे. या बाजारपेठेत पांडुरंगाच्या रूपातील माल सर्वदेशाला पुरेल इतका शिघोशिघ भरला आहे.पंढरीची

पंचक्रोशी ओतप्रोत भरली आहे.संतांना प्रेम सुखाची गोडी असल्यामुळे त्यांची तेथे तृप्ती होईल म्हणुन ते पंढरीत बसुन राहिले आहेत.

तुका म्हणे जन्मा आल्याचे सार्थक । विठ्ठलाची एक देखलिया ।।[२१]

चंद्रभागेचे डोळ्यांनी दर्शन घेताच एकाच वेळी सर्व तिर्थांचे दर्शन घेतल्यासारखे होते.पांडुरंगाचे वास्तव्य असलेली पंढरी पाहताच सर्व पापे दहा दिशांना पळुन जातात.भक्तसम्राट पुंडलिकाला पाहताच विश्वातील सर्व संतांना भेटल्यासारखे होते.श्री संत तुकाराम महाराज म्हणतात विठ्ठलाचे आत्मत्वाने दर्शन झाले तर मानवी जिवन कृतकृत्य झाले असे जाणावे.

पावलो पंढरी वैकुंठी भुवन । धन्य आजी दिन सोनियाचा ।।
पावलो पंढरी आनंद गजरी । वाजतील तुरे शंख भेदी ।।
पावलो पंढरी पार नाही सुखा । भेटला हा सखा मायबाप ।।
पावलो पंढरी येरझारा खुंटली । माऊली बोलली प्रेम पान्हा ।।
पावलो पंढरी आपुले माहेर । नाही संसार तुका म्हणे ।[२२]

हा सोन्याचा दिवस मानला जातो की वैकुंठभुवन पंढरीला आपण पोहचलो. 'धन्योऽहम' मी धन्य झालो.हरिनामाचा गजर करीत पंढरीत आलो.टाळ,मृदंग,विणा,शंख,नगारे,तुतान्या वाजवत आहेत.पंढरीस आल्यावर संत सज्जन अलिंगन देऊन क्षेम शांत करतात पंढरीस आल्यावर येथील सुखाला मर्यादा नाही.पंढरीस पोहोचलो आणि जन्म मरणाची कटकट येरझार संपली. तुकाराम महाराज म्हणतात प्रत्यक्ष देवसुद्धा पंढरीस येण्यास धडपड करीत असतात.कारण अनुषम पंढरी नगरी ही आध्यात्मीक राजधानी आहे.येथे आषाढ शु.११ निमीत्त मोठी यात्रा भरत असते. येथे आषाढ शुद्ध ११ निमित्त मोठी यात्रा भरते.[२३]

इच्छिताती देव । पंढरीचा वास ।।

## २.५ पंढरपूरातील धार्मिक स्थळे

भगवंत येथे चंद्रभागा तिर्थाच्यारूपाने, पंढरपुर क्षेत्राच्या रूपाने आणि विठ्ठल मुर्ती देवतेच्या रूपाने विराजमान आहे. हे क्षेत्र वर्णन पद्मपुराणांतर्गत पांडुरंग महात्म्याच्या सहाव्या, आठव्या, दहाव्या ,सतराव्या, पंचविसाव्या, सव्विसाव्या अध्यायात आढळते.पंढरी हे क्षेत्र त्रिपुरात्मक आहे.[२४] हे क्षेत्र अर्ध योजन रूंद आहे.सव्वा योजन लांब असुन पुष्कर क्षेत्रापेक्षा तीन गुणे,केदार क्षेत्रामध्ये सहा गुणे,काशी पेक्षा दहा गुणे आणि शैल क्षेत्रापेक्षा कैक गुणे श्रेष्ठ आहे. श्रेत्रमुर्तीची जी पुर्वभिमुख

आहे. पुंडलिक आणि लक्ष्मीतीर्थ असे हे त्रिकोणात्मक यंत्र आहे. त्या यंत्राचे मध्यस्थानी बिंदुतीर्थ आहे.बिंदुतीर्थात श्रीहरीचे वैकुंठ हे मुख्य स्वरूप गुप्त आहे. हे तेजोमय,प्रकाशमान क्षेत्र,असुन मुख्य देवस्थान बिंदुतिर्थाच्या आत आहे.बिंदुस्थान हे परम मुख्यस्थान आहे.ज्ञानी आणि शुद्ध भक्तांनांच त्याचे दर्शन होते.या क्षेत्राच्या सभोवती अनेक महत्वपुर्ण तीर्थ आहेत.जी काळाच्या ओघ्यात तृप्त झाली आहेत. पद्मतीर्थ,कुडलतीर्थ,जाबलीतीर्थ,संधर्षण तीर्थ, ब्रम्हतीर्थ, कलशतीर्थ, पितृतीर्थ, चक्रतीर्थ, लक्ष्मीतीर्थ, संगमतीर्थ, सुर्यतीर्थ,सोमतीर्थ आणि सरस्वतीतीर्थ यापैकी पुंडलिकतीर्थ संगम तीर्थ पद्मतीर्थ,कुडलतीर्थ लक्ष्मीतीर्थ ही पंच तीर्थ आहे.

पंढरपुर क्षेत्रास चार मुख्य द्वारे

१. क्षेत्राच्या पुर्वेकडील द्वार म्हणजे संध्यावळी देवी होय.या द्वाराच्या ठायी दोन नद्यांचा संगम आहे. जेथे ब्रम्हदेव अश्वत्थ रूपाने राहतात. या ठिकाणी स्थान उपवास करून दर्शन घेतले असता व्यक्ती पापमुक्त होतो. त्याच्या पुढे सरस्वती तीर्थ आहे.
२. क्षेत्राचे दक्षिण द्वार मासनूर हे होय.येथे शिवलिंग आहे. ज्याचे नाव सिद्धेश्वर आहे. येथे भीमा आणि पुष्पावती नदींचा संगम आहे.
३. क्षेत्राच्या पश्चिम द्वारी भुवनेश्वरी देवी आहे. मानवास इच्छित फळ प्रदान करणारी आहे.
४. क्षेत्राच्या उत्तर द्वारी महिसासुरादी दैत्यांचा नाश करणारी भक्तांस सर्वसिद्धी प्रदान करणारी अशी भगवती दुर्गादेवी आहे.येथे भीमा आणि भरणी नदींचा संगम आहे.

याप्रमाणे या क्षेत्राचे चार अर्नद्वारे आहे. या द्वारांच्या ठिकाणी राहण्याच्या ज्या देवता आहे त्या देवतांचे पुजन करून,दर्शन घ्यावे असे सांगितले जाते.

१. पश्चिमेकडील करवीर हे द्वार श्रीलक्ष्मी जगत्यननीचे आहे
२. दक्षिणेकडील सुर्पालय नामक क्षेत्र श्री शंकराचे आहे.येथे महाशिवरात्रीला यात्रा असते.
३. पुर्वेकडील द्वारी त्रिविक्रम आहे. जे विष्णु आहे. येथे भाद्रपद शुद्ध द्वादशीला पुजेचे महत्त्व सांगितले आहे.
४. उत्तरेकडील द्वारात नुरसिंहपुर आहेत.जेथे श्रीविष्णु नृसिंह रूपाने राहतात. मार्गशीर्ष एकादशीला यात्रा भरते

बिंदुस्थानाचा जो नैऋत्य कोन आहे.तेथे श्री काळभैरव आहे. ते या क्षेत्राचे क्षेत्रपाल म्हणुन समजले जातात.

## २.६ विठ्ठल :- शब्दाची उत्पत्ती

विठ्ठल हे विष्णुरूप आहे.विदा ज्ञानेन ठान् अज्ञजनात लाति गृहणाति म्हणजे अज्ञ जनांना जो ज्ञानाने स्विकारतो.तो विठ्ठल होय. अशी 'विठ्ठल' या नावातील प्रत्येक अक्षराला तात्विक अर्थ प्राप्त करून देणारे एक व्युत्पत्ती परंपरेत स्विकारली आहे. तसेच विदी– ज्ञान, स्थलः स्थिर म्हणजे जो ज्ञानाच्या ठायी आहे तो विठ्ठल होय.इतिहासचार्य राजवाडे,डॉ.म.अ.मेहदळे इत्यादी अभ्यासकांनी विठठल नामाच्या व्युत्पत्ती विषयी विष्ट्र–विठ्ठल अशा प्रक्रियेतुन विष्णुपासुन विठठल नाम बनले.त्यालाच विठठल भक्तीच्या वैष्णव स्वरुपाची पुष्टीही लाभत राहीलेली आहे. डॉ. भांडारकरांनी 'विष्णु'या संस्कृत शब्दाचे कानडी अपभ्रंश रुप 'बिट्ट' असे होते.या अपभ्रंशातुन विठ्ठल शब्द तयार झाला.[२५] विठठल नामात विकार हा ब्रम्हरुप,'ठकार' हा विष्णुरुप आणि लकार हा रुदरुप असल्यामुळे विठठल हा त्रिमुर्ती स्वरुपी आहे.तुकाराम महाराज अभंगातुन रुप सांगतात.

विचा केला ठोबा । म्हणुनी नाव तो विठोबा ।।
कारे नेणत्यांचे नाव । काय वेदासी नाही ठाव ।।[२६]

वि म्हणजे विद् म्हणजे जाणणे म्हणजेच ज्ञान आणि ठोबा म्हणजेच मुर्ती यावरून विठोबा म्हणजेच ज्ञानमुर्ती व्युत्पत्ती पुढे येते. ज्ञानाची सुंदरताच विटेवर उभी राहीली.ज्ञान,भक्ती,कर्म, सदाचार, संयम ,सत्य,यांचे स्वभाविक रुप म्हणजेच सुंदरता आणि हया सुंदरतेचेही खरे सौदर्यरुप म्हणजेच पंढरीचा पांडुरंग कानडा आणि कर्नाटकु.विठ्ठलाला कानडा आणि कर्नाटकु असे संबोधले गेले आहे.[२७]

कानडा हा विठ्ठलु कर्नाटकु । येणे मज लाविले वेदू।

असे ज्ञानेश्वर महाराज वर्णन करतात.कानडा आणि कनार्टकु हे प्रदेश विशिष्ट विशेषणे त्याला लावले आहेत. पंढरपुर हे स्थान महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सिमेवर आहे. पंढरपुरचे पुरातन नाव पंडरंगे हे पुर्णपणे कन्नड आहे. 'कानडा वो विठ्ठलु कर्नाटकु'या अभंगात 'कानडा' हा शब्द अगम्य अनाकलनीय असा आहे.यावरून मराठी संतांनी विठ्ठलाला लाविलेल 'कानडा' हे विशेषण त्याच्या स्वरूपाच्या अगम्यतेचे द्योतक आहे. 'वेदां मौ पडे।श्रुतिसी कानडे।।' [२८] असे नामदेवरायांनी म्हटले

आहे.इतर संतांची वचने ही 'कानडा' शब्दातुन विठ्ठालाच्या अगम्यतेचे दर्शन घडवतात.तर 'कर्नाटकु'या शब्दात कर्नाटक देशाचा उल्लेख नसुन त्या शब्दाचा अर्थ हा देव लाघवी, नाटकी,लीला, दाखवणारा असा आहे हेच संयुक्तिक वाटते.कानडी भाषेतील विट्टरस आणि विट्ट हे शब्द 'विष्णू' या शब्दाची व्युत्पत्ती सांगतात. 'विठोबा' या शब्दाचा अर्थ 'ज्ञानाचा आकार' किंवा 'ज्ञानाची मुर्ती' असाही घेतला जातो. 'वि' याचा अर्थ 'गरूड' आणि 'ठोबा' याचा अर्थ आसन असा होतो. म्हणजे ज्याचे आसन गरूड आहे. बुधवार हा श्री विठ्ठलाचा वार मानतात.

## २.७ वारकरी

वारकरी शब्दापासुन वारी याचा अर्थ येरझारा असा होतो.

जाला म्हणोनी कामवैरी । जाला जेथ ठाणेरी ।।

तेथ सरली वारी । क्रोधाचीही ।।[२९]

ऐसे वैराग्य हे करी । तरी संकल्पाची सरे वारी ।।[३०]

वारकरी या शब्दाचा अर्थ नियमाने उपास्य दैवताकडे जाणारा असाही होतो.जो पंढरपुरास नियमाने जातो तो वारकरी होय. वारकरी म्हटल की तो पंढरीचाच वारकरी म्हटले पाहिजे.जसे वेदांत शब्द उच्चारला की सामान्य मनुष्य श्रीमद् शंकराचार्यांचेच अव्दैत तत्वज्ञान असे समजतो.वारकरी ओळखण्यासाठी गळ्यात तुळशीची माळ, श्रीपांडुरंगाची वारी, याशिवाय तो वारकरी म्हंटले जात नाही वारकरी म्हणजे

जेणे गीता उपदेशिली । तीही विटेवरी माऊली ।। हे ज्ञानेश्वर महाराज सांगतात

काया वाचा मने । जीवे सर्वस्वी उदार ।बापरखुमादेवीवरू । विठ्ठलाचा वारकरी ।।[३१]

वारकरी म्हणजे एकनाथ महाराज वर्णन करतात

आवडे देवासी ऐका तो प्रकार । नामाचा उच्चार रात्रंदिन ।।१।।

तुळशीमाळ गळा गोपी चंदन टिळा । ह्दयी कळवळा वैष्णवांचा ।।२।।

आषाढी कार्तिकी पंढरीची वारी । साधन निर्धारी आण नाही ।।३।।

एका जनार्दनी ऐसा ज्याचा नेम। तो देवा परम पुज्य जगी ।।४।।[३२]

तुकाराम महाराज वर्णन करतात.

संपदा सोहळा नावडे मनाला । लागला टकळा पंढरीचा ।।१।।

जावे पंढरीशी आवडे मनासी ।कधी एकादशी आषाढी हे ।।२।।

तुका म्हणे ऐसे आर्त तयाचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे ।।३।। [३३]

वारकऱ्याची खुण म्हणजे विश्वंभर भाव होय. ज्याच्या दृष्टीला सर्वच विठ्ठलरूप दिसते आहे असे होणे म्हणजे वारकरी होणे होय.

जनाबाई असे म्हणते

वामसत्य दोन्हीकडे । दिसे देवाचे कपडे ।।

अणु रेणु चक्रपाणी । खुण झाली दासी जनी ।।[३४]

## वारकरी तत्वज्ञान

वारकरी हा आदी अंती भक्तीप्रधान आहे. सगुण उपासक असुनही निर्गुणाची इच्छा करणारा.प्राप्तकर्माचा त्याग न करता विहित कर्माचरनाने भगवंताची भक्ती निष्कामपने करने हीच जीवनाची कर्तव्यता मानणारा आहे .

हरी हा व्यापक सर्वगत। हा तव मुख्यत्वे वेदान्त।।[३५]

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ।।[३६]

असे व्यापक स्वरूप वारकरी आसणाऱ्याचे निश्चित असते तोच खरा वारकरी म्हटला जातो.अर्थात ध्येय प्राप्ती नंतरही कर्मकुशलता असुन योग्याचे ध्येय व वारकऱ्याचे ध्येय यांच्या तुलनेअंती वारकरी श्रेष्ठ ठरतो.व्यक्ती मुक्त बनून जगास मार्गाला लावणारी विश्वव्यापक वृत्ती ठेवण्याची प्रतिज्ञा करतांना दिसतात.

आनंदाचे आवारु मांडू जगा ।

अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही जगा ।।[३७]

भक्ती पंथ बहु सोपा । पुण्य नागवे या पापा ।येणे जाणे खेपा । येणेची एक खंडती।।[३८]

## वारकऱ्याचे स्वरूप :-

वारकरी दैनंदिन जीवनात मार्गदर्शक अशा तत्वाचे योजनापुर्वक आचरण करतात कारण दैनंदिन जीवनातील तत्वांच्या आचरणाने पावित्र्य लाभते. सुचिर्भुतपणा येतो.जीवनात परिवर्तन होऊन आत्मानुभूती येते.

वारकरी नित्याच्या आचरणात

- **प्रतिक :-**

कंठी तुळशीची माळ व कपाळी गोपीचंद टिळा।।[३८]

तुळशीमाळ गळा गोपी चंदन टिळा । ह्दयी कळवळा वैष्णवांचा ।। तु.म. ।।[३९]

जयाचिय गळा तुळशीमाळा । यमपद कमळा वंदी त्यांच्या ।।

- **उपास्य दैवत :–** पंढरीस विटेवर उभा असलेला पांडुरंग

विठ्ठल कुळीचे दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।।

- **नित्य संध्या :–**

श्री पांडुरंगाची पुजा ज्ञानदेवाचा हरिपाठ,ज्ञानेश्वरी,गाथा वाचन , तुळशीला पाणी,हे अन्न ग्रहन करण्यापुर्वी म्हंटले जाते.

नित्य सत्यमित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।।

देवाच्या पुजेने । प्रदक्षिणा तुळशीच्या ।। तु. म.।।

- **ग्रंथ :–**

श्री ज्ञानेश्वरी,श्रीतुकाराम गाथा,श्री एकनाथी भागवत,

गीता भागवत करीती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे ।।[४०]

- **जपमंत्र :–**

'रामकृष्णहरी'

बाबाजी आपुले सांगितले नाम। मंत्र दिला रामकृष्णहरी ।।[४१]

कृष्णविष्णू हरी गोविंद । या नामाचे निखळ प्रबंध ।।

रामकृष्णनामे रंगले ते नर । तुका म्हणे घर वैकुंठी त्या ।।

वारी करताना व वारीशिवाय रोज नित्याने देवाचे नामचिंतन करावे.श्रद्धेने नामस्मरण करणाऱ्यास परमात्मास्वरूपाची प्राप्ती होऊ शकते.संतांनी या नाममंत्राचे फार मोठे पुरश्चरण करून परमात्म प्राप्तीचा अनुभव संपादन केला आहे.हा स्वनुभव सर्वांना प्राप्त व्हावा म्हणुन विश्वाच्या उद्धारासाठी अत्यंत कारूण्य भावनेने कृपायुक्त होऊन हा महालाभ प्राप्त करून दिला.नामाने सर्व काही प्राप्त होते.

कळे ना कळे ज्या धर्म ।सांगतो रे वर्म ।।

माझ्या विठोबाचे नाम। अट्टाहासे उच्चारा ।।[४२]

या नामस्मरणाने पापाची निवृत्ती होऊन अंतरी सत्प्रवृत्ती वाढते.इतर सांप्रदायात अनेक मंत्र दिले जातात. पण या वारकरी सांप्रदायात सर्वांसाठी एक मंत्र आहे तो म्हणजे

उघडा मंत्र जाणा । रामकृष्णहरी म्हणा ।।[४३]

हा षडअक्षरी मंत्र असुन,भगवंताच्या तीन नामांचा उच्चार एकत्र होतो. प्रत्येक नाम हे पुर्ण अवताराचे द्योतक आहे.

- **जय घोषवाक्ये :–**

पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम।

- **ध्वज :–**

भगवी पताका कुंचे पातकाचे भार । आले वैष्णव डिंगर ।।

- **वाद्ये** :–टाळ,मृदंग,विणा,

लावुनी मृदंग श्रुती टाळ घोष । सेवु ब्रम्हरस आवडीने ।।

- **ब्रीदवाक्ये** :– विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद धर्म अमंगळ ।।[४४]
- **तत्वे** :– सत्य,अहिंसा, सेवा,त्याग, परोपकार ,दया, क्षमा, शांती,सहिष्णुता
- **उपवास** :– एकादशी करावी

कंठी मिरवा तुळशी ।व्रत करा एकादशी ।।[४५]

वारकरी सांप्रदयात एकादशी हे प्रमुख व्रत आहे.हरीचरणी चित्त स्थिर होण्यासाठी करायचे व्रत उपवास म्हणुन एकादशीला हरीदिनी म्हटले जाते. हे विष्णुचे व्रत आहे.एकादशी ही दर पंधरा दिवशी येते.मराठी महिन्यातील अकरावी तिथी ही एकादशी असते त्यापैकी शुद्ध आणि वैद्य दोन पंधरवाडा आहे.शुद्ध पक्षात येणारी एकादशी तिथीला पंढरपुरची वारी म्हटली जाते.तर वैद्य पक्षात येणाऱ्या एकादशी तिथीला आळंदीची वारी म्हटली जाते.आषाढ महिन्यातील शुद्ध एकादशी तिथीला पंढरपुरला आषाढी वारी भरते. महाराष्ट्रासह भारतातील व परदेशातुन अनेक वारकरी येथे वारीला येतात.आळंदी–देहू येथुन संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांचा पायी दिंडी सोहळा दशमीला पंढरपुरात लाखो वारकऱ्यांना बरोबर येतो.महाराष्टातुन अनेक दिंड्या वारकऱ्यांसह पंढपुरात येतात. आषाढ शुद्ध एकादशीला वारकरी चंद्रभागेच्या पवित्र प्रवाहात स्नान करून शुचिर्भुत होतात.कपाळी गोपीचंद व बुक्क्याची नाममुद्रा लावतात.

आषाढी कार्तिकी विसरू नका मज । सांगतसे गुज पांडुरंग ।।[४६]

असे पांडुरंग स्वतः नामदेवरायांना आपले गुपित सांगतात. दर महिन्याला एकादशीला वारकरी पंढरपुरला येतात. दिवसभर उपवास पारणे करतात.एकादशी उपवास हा तीन दिवसांचा असतो दशमी एकादशी व द्वादशी असे तीन दिवस वारकरी उपवास करतात. उपवास म्हणजे भगवंता जवळ जाणे.

## वारकरी नियम

१. गळ्यात तुळशीची माळ अखंड धारण करणे

२. प्रत्येक एकादशीस उपवास करणे

३. मद्य, मांस, परस्त्री, परधनापहार वर्ज्य करणे

४. सांप्रदायाचे नित्य कर्म पुजा,भजन,नामस्मरण,तुळशीला पाणी घालणे इत्यादी

५. सत्य,अहिंसा, सर्वाभूती, दया,अपरिग्रह इत्यादी दैवी गुण

६. पंढरपूरची व आळंदीची वारी, संतांच्या वाऱ्या नियमित करणे

७. कोणत्याही परिस्थीतीत व कोणत्याही अभिलाषासाठी गळ्यातील माळ काढु नये.

८. हरिपाठ,श्रीज्ञानेश्वरी,श्रीतुकाराम गाथा,एकनाथी भागवत,भजनी मालिका,असे संत वाङमय वाचणे.

९. वारकरी संताची शिकवण आचरणात आणणे.

१०. असत्य बोलु नये

११. निष्कामपणे फळाची अपेक्षा सोडुन भगवत्सेवेत तत्पर राहणे.

१२. मनात द्वेष,मत्सर न ठेवता सर्वाभुती स्नेहभावनेने वागावे

१३. शास्त्रानिषिद्ध कर्म न करणे.कोणत्याही प्रसंगी धर्माने वागावे

१४. सर्वसुख–साधनाने जीवन समृद्ध करूनही भगवत्‌भक्ती करावी.

१५. अपार संपत्तीची इच्छा न करता प्राप्त संपत्तीचा सत्कारणी उपयोग करावा.

१६. साधुसंत धर्मशास्त्र देव स्वर्ग आश्रमधर्म यावर निष्ठा असावी.

१७. स्वधर्म निष्ठा परधर्माबद्दल सहिष्णुता बाळगावी.

१८. पांडुरंगाची सेवा ही व्रत म्हणुन करणे.

१९. एकादशीचे व्रत करणे.

### वारकऱ्यातील गुण

१. भुकेल्यांना यथाशक्ती अन्नदान करणे.पंचयज्ञ करणे.

२. बाह्य इंद्रियांचा संयम,चांगलेबोलणे,ऐकणे,पाहणे

३. धार्मिक व सामाजिक कार्यात सहभाग घेणे.

४. अपार पुण्य संपादन करण्यासाठी शास्त्राचे अध्ययन व सत्कर्म करणे.

५. सदा सर्वकाळ सर्वांशी मनाचा सरळपणा कायम ठेवणे.

६. प्राण्यांना पिडा न देता भुतमात्रांवर प्रेम करणे

७. प्रसंगावरून दुसऱ्याची पिडा होऊन क्रोध आल्यास त्याचे क्षमण करणे.

८. अंतकरणातील वासनांकुर नष्ट करणे.

९. कोणाची निंदा न करणे.

१०. दुःखीत जिवावर दया करणे व भुती भगवत् भावना ठेवणे.

११. विषय जवळ आले असता इंद्रियांवर ताबा ठेवणे.

१२. थकवा आला तरी भगवत् भजनाबद्दलउत्साह कायम ठेवणे

१३. मनातील द्वेष, राग काढुन टाकणे. अंतकरणातील निर्मुलता टिकवणे [४७]

।। प्रत्ययः स्त्रीषु मुष्णाति विमर्ग विदुणामपि ।।

### वारकरी दिक्षा

ज्यांना संसारात उपरती झाली व भगवत् भक्ती कडे वळवुन जिवनात शांती,समाधान मिळावे,जिवनाचे कल्याण व्हावे असे वाटणारे मार्ग शोधतात.तेव्हा इतर साधने,मार्ग कठीण व अशक्य वाटतात.असलेल्या सर्व सुखाचात्याग न करता पारलौकिक सुख मिळणारे सरळ सोपे साघन म्हणजे वारकरी होय.तो एकदा वारकरी झाला की तो पारलौकिक सुखाचा अधिकारी होतो. याबाबत असे

पंढरीची वारीचिया कुळी । त्याची पाय धुळी लागो मज ।।संत नामदेव महाराज म्हणतात.[४८]

वारकरी म्हटला की सज्जन पणाचे प्रतिक. सज्जन माणुस म्हणुन समाज त्याच्याकडे पाहतो.त्यातही वारकरी परंपरेचे घराणे असले की त्यास समाजात विशिष्ट प्रकारचे मुल्य असते.

सध्याच्या काळात वारकरी घराण्यात वासकर फड,मोरे घराणे,देगलुरकर घराणे इ.मानाचे मानले जातात. ज्याला कुणाला वारकरी व्हायचे असेल,त्यांनी ज्याचे घराणे वारकरी आहे हे

वारकरी सांप्रदायाची परंपरा सांभाळीत आले आहे.अशा कोणत्याही फडाच्या प्रमुखाकडुन,अगर कोणी वारकरी तत्वाचे यथायोग्य पालन करीत आहे अशा अधिकारी व्यक्तीकडुन, वैष्णवांकडुन तुळशी माळ घालावी.वारकरी होताना दक्षिणा,पुजा,पुजन,विधी इ.साठी विशेष काही खर्च लागत नाही. वारकरी होणाऱ्याने शुद्ध अंतकरणाने मनाची तयारी करून स्वतः तुळशीची माळ आणायची असते.ज्यांच्याकडुन ती घालायची,त्यांच्याकडे जावे.ती वारकरी व्यक्ती,वैष्णव तुळशीमाळ ज्ञानेश्वरीवर ठेऊन त्यास वारकरी पंथाची, तत्वाची, संतांच्या शिकवणीची कल्पना देतात. संप्रदायाच्या अटी जिवनात अचरण्याचे बंधन घालतात,नंतर ती माळ ''पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम''असा गजर करून त्यांच्या गळ्यात घालतात.माळ घातल्यानंतर ज्याला बंधने पाळावी लागतात.त्यांच्या ठिकाणाचा अभिमान कमी होऊन,तो सर्वांच्या पायावर मस्तक ठेवतो.भगवत्सेवा व प्रारब्ध प्राप्त व्यवसाय करीत राहतो.

''आले भागाते करीतो। तुझे नाम उच्चारिता'' [४९]

वारकरी म्हणजे गळा तुळशीची माळ,कपाळी गोपी चंदनाचा टिळा,सात्विक आहार,नियमित वारी,साधुसंतांवर विश्वास,भगवत्सेवा भजनाची आवड,दारात तुळशीचे वृंदावन,पताका असा तो असतो वारकरी व भाविक यात फरक आहे भाविक भजन-पुजन,तिर्थयात्रा,वारी इ.करत असला तरी त्याला वारकरी म्हणता येत नाही. जसे स्त्रीस सर्व अलंकार असते पण गळ्यात मंगळसुत्र व कपाळी कुंकू नसेल तर सौभाग्यवती म्हणता येणार नाही.

''कंठी मिरवा तुळशी। वृत करा एकादशी'' [५०]

असा वारकरी नियमित पंढरीची वारी करतो.एकनिष्ठता हा वारकऱ्यांचा स्वभाव धर्म आहे.पंढरीच्या वारीसाठी त्याला कोणतिही पर्वा नसते.भिकारी होण्याची वेळ आली तरी त्याला पर्वा नसते.अशाच व्यक्ती उच्चपदाला पोहचतात.

पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ।।

## २.८ वारी

वारी- या शब्दाची व्युत्पत्ती - वारि - री =वारी म्हणजे प्रवाशांची टोळी अर्थात वारीला जाणारा प्रवासी ,अमरकोशात वार या शब्दाचा अर्थ 'समुदाय' अगर संघात वारकरी म्हणजे समुदाय करणारा पंढरीची वारी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक लोकजिवनाचा संस्कार प्रवाह आहे. भक्ती प्रेमाची अनुभूती घेऊन सदाचारी जिवनाची वाटचाल घडविणारी ती नैतिकतेची मुर्तिमंत पाठशाला

आहे.ज्ञानवंतांनी पंढरीनाथांचे ज्ञान स्वरूप ऊभे केले तर भोळ्या भाविकांनी भक्तीभांवांने त्याचे भावदर्शन अनुभवले याविषयी नामदेव महाराज वर्णन करतात–

ज्ञानियांचे ज्ञेय,ध्यानियांचे ध्येय । पुडलिकांचे प्रिय सुख वस्तु ।

जे तपस्वीयांचे तप, जे जपकांचे जाप्य ।

योगियांचे गोप्य,परतधाम।ते हे समचरण ऊभे विटेवरी ।।

पहा भिमातीरी विठ्ठलरूप।। [५१]

ज्याला ज्ञानाने जाणायचे ते म्हणजे 'ज्ञेय',तर ध्यानाने ज्याला जाणायचे आहे ते 'ध्येय'असे ज्ञानियांचे ज्ञेय ध्यानियांचे ध्येय, तपस्वियाचे तप, जपकांचे जाप्य, योगियांचे गौप्य,जिथे विटेवर समचरण उभे आहे त्याला प्रेमाने अलिंगन देण्यासाठी निघालेला वैष्णवांचा महामेळा म्हणजे वारी होय येथे ज्ञान आणि प्रेम हातात हात धालुन चालतात.फळांचा रस,फुलांचा वास,शब्दांचा अर्थ आणि भक्तीचे सामर्थ्य हे खरे स्वभाविक सौदर्य. या सौदर्याला सदाचाराचा सुगंधाने ग्रंथित करणारी वाटचाल म्हणजे पंढरीची वारी.आषाढीला आणि कार्तिकीला पंढरीला नामाचा बाजार भरतो.भक्तीची पेठ फुलते,विठ्ठलांची भेट घडते. त्या भक्तीचे मुर्त रूप म्हणजे पांडुरंग.आर्त रूप म्हणजे वारी होय.महाराष्ट्राच्या लोक संस्कृतींशी एकरूप झालेल्या लोक जिवनांचे उत्कृष्ट भावदर्शन म्हणजे वारी 'वारी'हा भगवंत भक्तीचानुसता अविष्कार नसुन भक्तीप्रेमाची अनुभुती घेण्याची ती सहज स्थिती आहे. आचार्य अत्रे म्हणतात,– महाराष्ट्राचा देव विठोबा,मोक्ष पीठ पंढरपुर आणि आषाढी–कार्तिकीची वारी हाच महाराष्ट्र धर्म.मराठी माणासच्या जीवनात दोन सण आहेत. १.आषाढी आणि २. कार्तिकी,पण हे सण भोजनाचे नव्हे तर भजनाचे आहेत.या दोन सणांचा अपुर्व सोहळा पंढरीस पहावयास मिळतो. चंद्रभागेच्या वाळवंटात विठ्ठल नामाचा प्रचंड बाजार भरलेला असतो. वैकुंठीचे सर्व 'केणे'तेथे ह्या दिवशी आलेले असते.कैवल्याच्या राशी येऊन पडतात.मोक्षाची पर्वती होते.पंढरी ही महाराष्ट्रातल्या सर्व वारकऱ्यांची मिरास आहे.

तुकाराम महाराज म्हणतात–

आमची मिरास पंढरी । आमुचे घर भीमातीरी । [५२]

ज्ञानेश्वर महाराज रूपक मांडतात.एक माणुस वाटचाल करत गावोगावी मुक्काम करत आपल्या गावाला निघाला एक मुक्काम संपला की आपले गाव एका मुक्कामाने जवळ आल्यांचा

आनंद त्याला व्हायचा मुक्काम दर मुक्काम करीत एक दिवस त्याला असा अनुभव आला की आपण ज्या गावाला चाललो तो गावच आपण होऊन गेलो आहे.

येणे मार्ग जया ठाया जाईजे । तो गावो आपणाची होईजे ।

हे सांगो काय सहजे । जाणसी तू ।। [५३]

परब्रम्हाला साठवित साठवित विवेकाच्या दिशेने होणारी उन्नत वाटचाल म्हणजे वारी.मानवी जिवनात परिवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. प्रत्येक क्रियामध्ये साधन आणि साध्य ह्या दोन बाजु असतात. साधनेनेच साध्य गाठायचे असते. साधन आणि साधना खडतर आणि कठीण असते तर साध्य हे आनंदरूप होय.वारीच्या वाटचालीत साधन साध्य हे दोन्हीही आनंदरूपच. चार वाऱ्या प्रमुख आहे.

१) **चैत्रवारी** – चैत्र महिन्यात म्हणजे हिंदू संस्कृती मध्ये नववर्षारंभ या महिन्याच्या एकादशीला पंढरपुरात वारी भरते.

२) **आषाढ वारी** – आषाढ महिन्यात शुध्द एकादशीला सर्वात मोठी वारी व यात्रा पंढरपूरला भरते अनेक पालख्या, दिंडयासह पंढरपूर पायी येत असतात.

३) **कार्तिकी वारी**– कार्तिकेशुध्द एकादशी

४) **माघीवारी**– माघ शुध्द एकादशी[५४]

ज्ञानरूप परमात्मा हे साध्य तर भक्तीरूप वाटचाल हे साधन तुकोबाराय या बाबत सांगतात.

होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।

काय करावे साधने । फळ आवघेचि येणे ।

अभिमान नुरे । कोड अवघेचि पुरे ।

तुका म्हणे डोळा । विठो बैसला सावळा ।।

वारी हे भगवंताकडे नेणारे एकमेव साधन. अभिमान जावा,द्वैतभाव संपावा आणि केवळ भक्तिभाव उरावा ,हा अनुभव वारीत येतो.अद्वैताचे चिंतन तत्ववेते करतात पण त्याचा अनुभव मात्र वारकरी घेतात.अद्वेताचा सामाजिक स्थरावर सामुहिक अनुभव घ्यायचा असेल तर, एकदा तरी वारी करावीच. भक्ती, निती आणि कृती यांचा समन्वय साधुन पुरूषार्थ प्रधान परमार्थ घडविणारी जिवन प्रणाली म्हणजे वारी होय.तत्वदर्शनाचे आचारदर्शन घडविणारे ते एक जीवनदर्शन आहे.नीती जेव्हा

कृतीत उतरते तेव्हा वारकरी हे व्यक्तीत्व उभे राहते ज्ञान,पांडित्य,यापेक्षाही निराभिमानी होण्यासाठी,अंगी नम्रता येण्यासाठी,भगवत्‌भाव जागविण्यास सहिष्णुता प्रस्थापित करण्यासाठी ममत्त्व सांडुन समत्त्व नांदण्यासाठी वारकरी व्हावे. भक्ती प्रेमाने भरलेले सदाचारी जीवन म्हणजे वारकरी आणि जीवनप्रणाली म्हणजे वारी होय.

**पंढरपुरची वारी**–

पंढरपुरच्या वारीला किमान एक हजार वर्षाची परंपरा आहे.ही वारी ज्ञानदेवाच्या पुर्वीही होती. त्याचे वडील विठ्ठलपंत हे पंढरीचे वारकरी होते. ज्ञानदेवांना पंढरीच्या वारीची दिशा त्यांचे सद्‌गुरू आणि वडीलबंधु निवृत्तीनाथांनी दिली.माझ्या सद्‌गुरूंनी माझ्या डोळ्यांत कृष्णांजन घालुन पंढरीचा मार्ग मला दाखविला असे माऊलींनी आंधळा या रूपकात व्यक्त केले आहे.

साधु संत माय बाप तिही केले कृपादान । पंढरी यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान ।

कृष्णांजन एक वेळा डोळा घातिला अढळ । तिमीर दुःख गेले फिटले भ्रांती पडळ ।

श्रीगुरू निवृत्तीराये मार्ग दाविला सोज्वळ। बापरखुमादेवीवरू विठ्ठल दिनांचा दयाळ ।।[५५]

वारीने परंपरा गत कर्मकांडातील आणि लौकिक व्यवहारातील जडत्व त्यांना घालावायाचे होते.त्यासाठी लोकाभिमुख होऊन जनलोकात वावरून बहुजन समाजाच्या अंतरंगात आणि बाह्यचारात नवचैतन्य आणण्याच्या प्रयत्न त्यांनी केला भक्तीपंथाचा उद्‌य देशभाषेची प्रतिष्ठा आणि त्यांच्या अनुषंगाने लोकजिवनाच्या पृथगात्मतेची जाणिव या तीनअंगाने त्यांनी भागवत धर्माचे पुनर्जिवन केले. संत परंपरेने'वारी'ह्या लोकसंस्थेचे मोठेपण सांगताना तुकाराम म्हणतात.

सोपे वर्म आम्हा सांगितले संती । टाळ दिंडी हाती घेऊनी नाचा ।।[५६]

विठाई आमुची माऊली आणि पंढरी आमचे माहेर या भावनेने सकळ संतांनी विठ्ठलाशी आपले भावनिक नाते जोडले आहे. मातेच्या रूपाने देवाला कल्पुन देवाची खरी ओळख करून दिली आहे. भक्ताने भक्तीप्रमाने नटावे. भक्तीप्रेमाने नटलेले भक्तांचे रूप भगवंतांने न्याहाळावे.आणि दोघांनीही एकमेकांना पाहुन आनंदित व्हावे.हीच भक्तीप्रेमातील अद्वयानंदाची अवस्था होय.ज्ञानेश्वर महाराज सुंदर दृष्टांत देतात.

अगा बाळकाते लेवविजे लेणे । त्याप्रमाणे ते काय करणे ।

तो सोहळा भोगणे । जननेयेसी दृष्टी ।।[५७]

आई तहान्या मुलाला मौल्यवान दागिने घालुन नटविते.त्याच्या अंगात भरजडी अंगडे टोपडे घालवुन त्याला सजविते.दृष्ट लागु नये म्हणुन काळा टिक्का लावते.त्या दागिन्याचे मोल त्या तहान्या लेकराला काही समजत नसते. पण त्या मुलाला नटविणे आणि त्याला नटलेल्या रूपात पाहणे ही दृष्टी केवळ आईलाच असते.वारकऱ्याला भक्तीप्रेमाने नटवुन वारीच्या रूपात त्याचे हे नटलेले रूप पाहण्याची दृष्टी त्या विठाई माऊलीची असते. वारकरी सांप्रदायाचा एकात्मिक विराट अविष्कार म्हणजे वारी सोहळा. साहित्यिक गं.बा. सरदार म्हणतात वारकरी पंथाचे प्रसाराचे व लोकप्रियतेचे रहस्य हेच की त्यांच्या प्रववयात बुद्धी आणि भावना यांच्या गुणांचा मनोथ मनोज्ञ झाला होता. ।। [५८] त्यांच्यापाशी विचारांचे वैभव कमी नव्हतेच,पण भावनेचे ऐश्वर्य ही अपार होते. निष्ठा,त्याग,धैर्य,सहिष्णुता व उदारता या गुणांनी त्यांनी लोकांची मने वेधुन घेतली. लोकांच्या चांगुलपणावर व गुणग्राहकतेवर त्यांचा विश्वास होता. निकोप जीवनदृष्टीच्या खंबीर पायावर संतांनी सामाजिक प्रबोधनाचे यशोमंदिर उभारले.स्वतःमधील दिव्यत्व पाहायला शिकवले.स्वतःमधील विकृती,अविचार शोधायला लावले.मानवी जिवनात सुंदरतेची मुर्ती ऊभीच आहे,पण विकार,वासना,अज्ञान मलिनतेने ती व्यापली आहे. हा अनावश्यक भाग दुर केला की जिवनाची सुंदरता उभी राहते.यासाठीच वारी आहे.

## वारी– एक संस्कार प्रवाह

वारकरी सांप्रदायने ज्ञान–भक्ती आणि कर्म या तिघांनाही मोठेपण दिले आहे.

कर्माचे डोळे ज्ञान । हे निर्दोष होआवे ।। ’[५९]

ही संतांची धारणा आहे परमात्मा ज्ञानाने जाणायच्या भक्तीने मिळवायचा आणि कर्माने राखायचा. म्हणुनच ज्ञान, भक्ती व कर्म यांच्या समन्वयाचा विवेक प्रवाह म्हणजे पंढरीची वारी.श्रीगुरूंनी दाखविलेल्या वाटेने विवेक तिर्थाच्या तीरावर येऊन बुद्धीचाही मळ ज्याने धुवुन टाकला जातो,असा व्यक्तीगत जीवनाला आणि सामुहिक लोकजिवनाला निर्मळता प्राप्त करून देणारा प्रवाह म्हणजे पंढरीची वारी.द्वैतभावाची वाटचाल, अद्वैत भावाचा मुक्काम पण प्रेम भावाचा विसावा म्हणजे पंढरीची वारी . आध्यात्मिक आनंदाबरोबर स्वतःच्या जिवनाला वळण देणारा तो एक संस्कार प्रवाह आहे. संत चोखोबाराय म्हणतात, ‘‘गंगेला अनेक ओहळ मिळतात पण गंगेच्या पात्रात गेल्यावर त्या गंगारूप होतात. गंगेला मिळाल्यावर ते कसे शुद्ध होतात हे समजत नाही.त्याप्रमाणे ‘कुणीही यावे आणि शुद्ध होऊनी जावे’ ही वारीची किमया आहे.’’जीवनाचा प्रवाह

हा या वारीच्या प्रवाहात असाच विरून जातो. त्यामुळे अहंकार संपेल,द्वैत सांडेल,विषमता नाहीशी होईल,विषय वासना समुळ नष्ट होतील.वारी हा जसा आध्यात्मिक सुखाचा प्रवाह आहे,तशीच एकात्मतेची गंगोत्री आहे.खांद्यावरची भगवी पताका हे त्या एकात्मतेचे भव्य आणि दिव्य प्रतिक आहे.सारे भेदभाव विसरून एकरूप होण्यासाठी दिंडीच्या माध्यमातुन सामाजिक समतेची परंपरा संतांनी प्रस्थापित केली. ज्ञानभक्तीच्या समाचरणावर निती आणि कृतीच्या समचरणावर आचार आणि विचारांच्या समचरणावर ऊभी असलेली विठाई माऊली वैष्णव वारकऱ्यांना माहेरपण देते. तुकोबाराय म्हणतात , पंढरीस जा वारकरी व्हा खांद्यावर पताकाचा भार घ्या व कपाळाला बुक्का लावा

चला पंढरीसी जाऊ । रखुमादेवीवरा पाहु ।।
डोळे निवतील कान ।मना तेथे समाधान ।।[६०]

ज्ञान,ध्यान,भक्ती आणि समाधान यांचे एकत्रीकरण म्हणजे पंढरीची वारी .सुर्य हाच विश्वचक्षु आहे.तो उगवल्यावर विश्व धवळते. पण सुर्यालाही विश्वाकडे पाहण्याची दृष्टी देणारा कोण ? या अद्वितीय,शक्तीमान दिव्यत्वाचा शोध म्हणजेच ज्ञान. ते तर विठ्ठल रूपाने दिसते.ज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती । रत्नतीळ फाकती प्रभा ।।

पांडुरंगाच्या दर्शनात दिव्य तेजाची अनुभुती यावी पण त्यासाठी वाटचालीत पडणाऱ्या प्रत्येक पावलागणिक नामगजराबरोबर पांडुरंगाचे ‘ध्यान’ घडावे हेच वारीचे वेगळेपण.ज्ञान ,ध्यान याबरोबर समाधान देणारे अनुभुती म्हणजे वारी होय.संतांच्या प्रतिभेचं, ज्ञानवंतांच्या प्रज्ञेचं तर लोकजिवनाच्या श्रद्धेचं स्फुर्तीस्थान म्हणजे पंढरीचा पांडुरंग. ज्ञानवांतंच ज्ञानदर्शन आणि सामान्यांचेही भावदर्शन जिथे एकवटते ते हे विटेवरील सावळे रूप.वारकरी होऊन वारी करणे ही भक्तीची उच्चतम अवस्था गाठणे आहे.ज्या मार्गावरून वाटचाल करताना आनंदाचा मुक्काम गाठता येतो तो मार्ग म्हणजे परमार्थ मार्ग होय.वारकरी हाच त्या परमार्थ मार्गाचा अधिकारी आहे.पंधरा–अठरा दिवस अखंडपणे भगवत् नामाचा गजर करीत चाललेली वारी ही महाराष्ट्राचे चालते–बोलते लोक विद्यापिठ आहे. ज्ञान, भक्ती, प्रीती, संयम, शांती, समाधान, शुर्चिता, अहिंसा, श्रद्धा, अपैशुन्य, मार्दव, क्षमा, अद्रोह या सदगुणांची अनुभूती देणारे हे एक स्वतंत्र्य विद्यापीठ आहे. पंढरीचा पांडुरंग हा या विद्यापीठाचा पदसिद्ध कुलपती आहे.अठ्ठाविस युगे या

कुलपती पदावर विराजमान होउन हा विठ्ठल एकिकडे चैतन्याची शोभा वाढवित आहे.तर दुसरीकडे आपल्याच प्रेरणेने सदाचारातून आणि नितीबोधातून चैतन्याचे मळे फुलवित आहे.भक्त पुंडलिक हा या विद्यापीठाचा आद्य कुलगुरू त्यानेच सद्भक्तीचे अधिष्ठान म्हणुन वीट भिरकावली आणि त्याच विटेच्या अधिष्ठानावर अठ्ठावीस युगे हा लोक विद्यापीठाचा कुलपती स्थिरावला. पुढे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली, नामदेव,नाथ महाराज, तुकाराम महाराज यांनी हे कुलगुरूपद मोठ्या वैभवाने भुषविले आणि महाराष्ट्रातील लक्षावधी लोकांच्यानिःसत्व जिवन क्रमाला आध्यात्माची जोड मिळवुन दिली. अद्वैत , भक्ती, ज्ञान आणि उपासना श्रद्धा आणि विवेक याच्या एकात्मतेवर भर दिला.असे मत डॉ. रामचंद्र देखणे यांनी वारी स्वरूप आणि परंपरा या पुस्तकात नमुद केले आहे

आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे ।।[६१]

सच्चिदानंद वारकरी हीच या विद्यापीठाची पदवी ठरली.या वारकरी पदवीधारांनी अतःकरणाच्या शुद्धतेसाठी नितीमुल्यांचा आग्रह धरला आणि भक्तीही ज्ञानोत्तर ही विराजमन पावणारी जिवननिष्ठा मानली.अत्यांतिक सुखाला साठवित वैष्णवांचे पाऊले पंढरपुरी निघाली.संपुर्ण विश्वाला सुखी करण्याचे सामर्थ्य एकट्या वारीत आहे.हे वैष्णवाने ओळखले आणि नामगजराने नामसंकीर्तन करीत पावलापावलावर वैकुंठ ऊभे राहिले. ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आळंदीहून,संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी देहुहून सकल संतांच्यादिंड्या आणि पालख्या विठूरायाला भेटायला येतात.देहू आणि आंळदी यांचे देह आत्म्याचे नाते .त्या देहात्म्याने बांधलेला परमार्थिक जीव म्हणजे वारकरी होय. देहू हा देह आहे आळंदी हा आत्मा आहे. तर पंढरपुर हे त्या दोन्हीला जोडणारे चैतन्य आहे. चैतन्यालाच घेऊन चैतन्याच्याच गावी जायचे. चैतन्यरूप परब्रम्हाला साठवित विवेकाच्या दिशेने होणारी उन्नत वाटचाल म्हणजे वारी. मानवी जिवनात परीवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. जीवन शुद्धी आणि जीवनसिद्धी देणाऱ्या नैतीकतेच्या राजमार्गावरील वाटचाल म्हणजे वारी होय.

## २.९ दिंडी संकल्पना

दिंडी या शब्दाचा अर्थ लहान दरवाजा किंवा पताका असा घेतला जातो. त्याचप्रमाणे वीणेसारख्या एका वाद्यालाही दिंडी असे समजले जाते. 'दिंण्डु' या कानडी शब्दापासुन दिंडी शब्द येतो।।[६२] दिंण्डु शब्दाचा अर्थ स्वाभिमानी, श्रेष्ठ अशा लोकांची मिरवणुक. पताकाधारी, तुळशीधारक, वीणेकरी, टाळकरी,पखवाज वादक,यांचा सामावेश होऊन व त्यांचे रूपांतर दिंडीत

होते.दिंडीची स्वतः ची अशी एक शिस्त असते. दिंड्यांचे काही अलिखीत असे नियम असतात. विणाधारी वारकरी हा दिंडीचा मुख्य असतो. वारकऱ्यांच्या खांद्यांवर भगवी पताका असते. म्हणुन वारकऱ्यांच्या सामुदयाला दिंडी हे नाव मिळाले. तर विणेकऱ्यांच्या खांद्यावरील विणा हे वाद्य बघुन ही दिंडी आहे असे सजमले जाते. वीणा घेऊन चालण्याच्या संगतीने नादगजर करीत वाटचाल करणे म्हणजे दिंडी होय असे मत सोनोपंत दांडेकर मामांनी मांडले.

### ज्ञानोबा–तुकोबारायांची संयुक्त दिंडी

पंढरीच्या वारीची परंपरा संत श्रेष्ठ तुकाराम महारांजांच्या घरात पिढ्यानपीढ्या चालु होती. विश्वंभर बाबा हे तुकाराम महाराजांच्या घराण्यांचे मुळ पुरूष तुकाराम महाराज हे त्यांच्यापासुन आठव्या पिढीचे वंशज होत. विश्वंभर बाबा दर पंधरा दिवसाच्या एकादशीला पंढरपुरला जात असत. विश्वंभर बाबांनी सुरू केलेली परंपरा तुकोबारायांचे वडील बोल्होबापर्यंत चालु होती.बोल्होबाने चाळीस वर्षे पंढरीची वारी केली.

चाळीस वर्षे ते भवसरी । केली पंढरीची वारी ।।[६३]

हे तुकाराम म. चरित्रात महिपतीने वर्णन केले आहे. बोल्होबानंतर पंढरीची वारी श्री तुकाराम महाराज करू लागले. त्यांची मोठी दिंडी होती. त्या दिंडीत १४०० टाळकरी होते. हे सर्व मंडळी वारीच्या वेळी देहूला जमत असत. तुकाराम महाराज दर वैद्य एकादशीला दिंडी घेऊन आळंदीला जात असत. किर्तन करत असत.ही परंपरा आणि तीच आजही चालु आहे.

तुकयाचे सप्रेम किर्तन । ऐकोनी भक्तीशी लागले जन ।।
ते चौदासे पताका घेऊन । पंढरीस जाण चालीले ।।११४।।
तुकया समागमे जावया पाही । वारकरी आले देहू गावी ।
मग चोवीस अभंग लवलाही । पत्राने समयी पाठविले ।।[६४]

नंतर तुकोबा सर्वासह मोठ्या सोहळ्याने निघत. तुकोबाच्या वारीचा नेम काही टळला नाही. ते वैंकुठाला गेले त्यावेळी त्यांची मुले लहान होती. तेव्हा पंढरीच्या वारीची परंपरा त्यांचे धाकटे बंधु कान्होबा यांनी चालु ठेवली. तुकोया बंधु आपल्या हयातीतच वारीची, परंपरेची, आणि सांप्रदायाची धुरा तुकोबांचे धाकटे पुत्र नारायण बाबा यांच्या खांद्यावर दिली. कान्होबा आणि नारायण बाबा दोघेही दिंडीबरोबर जात असत.कान्होबाच्या निधनानंतर सर्वभार नारायण बाबांवर आला. ज्ञानेश्वर महाराजांच्या आणि तुकाराम महाराजांच्या पादुका एकाच पालखीत ठेवून 'ज्ञानोबा तुकाराम'भजन

करीत आषाढी एकादशीला पंढरपुरला जाण्याची परंपरा नारायण बाबांनी सुरू केली.ज्ञानेश्वर माऊली आणि तुकाराम महाराज आपल्या बरोबरच आहेत.आणि आपण त्यांच्या बरोबरच आहोत या श्रद्धेने ही वारी निघत असे. जेष्ठ वद्य नवमीला पालखी देहूहुन निघुन आळंदीस जाई. आणि दशमीला आळंदीहुन पुण्याकडे रवाना होई. ज्ञानेश्वर महाराज आणि तुकाराम महारात यांच्या संयुक्त पालखीचा सोहळा १६८५ पासुन सुरू झाला.[६५] तो १८३२ पर्यंत अव्याहत पणे चालु राहीला. १८२९ च्या सुमारास देहू संस्थानामध्ये तुकोबांच्या वंशजामध्ये मालकी हक्कावरून आणि सेवेच्या प्रश्नावरून वाद सुरू झाला. याचा उपसर्ग पालख्री सोहळ्याला होवु नये या भुमिकेतुन वैकुंठवासी हैबतबाबा पवार आरफळकर यांनी सन १८३२ पासून आळंदीहुन स्वतंत्रपणे पालखी नेण्यास सुरूवात केली.

### २.१० – श्री नारायण बुवा दिंडी प्रवर्तक

माझे जीवीची आवडी । पंढरपुरी नेईन गुढी ।।
पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुणी वेधीले ।।

श्री तुकाराम महाराजांची पालखी आषाढी वारीला श्री क्षेत्र देहू गावाहुन निघुन पंढरपुरला प्रतिवर्षी जात असते.हा पालखी सोहळा महाराजांचे सुपुत्र नारायण महाराज यांनी सुरू केला. श्री नारायण महाराज हे श्री संत तुकाराम महारांजांच्या पादुका व ज्ञानेश्वर महारांजांच्या पादुका एकाच पालखीत ठेवुन समारंभपुर्वक मोठ्या सोहळ्याने दिंड्या,पताका, गरूडटक्के, टाळामृदंगाच्या घोषात वैष्णवमंडळीसह ज्ञानोबा तुकाराम भजन करीत आषाढी वारीला देहूहुन पंढरपुरला जात असत.यापुर्वी कोणाही संताची पालखी त्यांचे जन्मगावाहुन आषाढी वारीला जात नव्हती. श्री नारायण महाराजांनी पालखी सोहळ्याचे आणि ज्ञानोबा तुकाराम भजनाचे प्रथा सुरू केली. पंढरीची वारी ही श्री तुकाराम महारांजाचे घराण्यात पिढ्यान्पीढ्या चालु होती. तु.म. सांगतात की ...

पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तिर्थव्रत ।। [६६]

तुकाराम महाराज घराण्याचे मुळ पुरूष विश्वंभर बाबा तुकाराम महाराज त्यांचे पासुन आठव्या पीढीचे वंशज आहे. विश्वंभर बाबा दर पंधरा दिवसाच्या एकादशीला पंढरपुरला जाऊ लागले.[६७] हे अभंगातून दिसते.

मग पंधरा दिवसा एकादशी । जातसे पंढरीसी ।
नेमे वारी धरीली ऐसी । अनुपम्य सुखासी सोहळा ।। तु. म.

मुळ पुरूषा एवं विश्वंभरा । विठ्ठलाचा भक्त थोर ।

त्याचे भक्तीने पंढरी सोडुन । देहुस आले हरी ।। [६८]

विश्वंभर बाबा नंतर त्यांचे पुत्र हरी व मुकुंद हे क्षात्र वृत्तीने राहु लागले . देहू सोडुन राजाश्रमाला गेले. पुढे त्या राज्यांवर इस्लामी परचक्र आले. त्यामध्ये धारातीर्थी पडले. धाकट्या मुलाची पत्नी पती बरोबर सती गेली.

धाकट्या मुकुदांची राणी । तत्काळ अग्नी प्रदीप्त करोनी । सहगमनी निघाली ।

थोरल्या मुलाची पत्नी गरोदर होती. पुढे तीला मुलगा झाला त्यांचे नाव विठ्ठल ठेवले. त्यांनी श्री विठ्ठलाची सेवा पुन्हा सुरू केली.

मागील दुःखांना ठेवुनी अंतरी। चालविली वारी पंढरीची ।

योग क्षेम तो निर्धारी ।चालविसी हरी तयाचा ।।

त्या विठोबाचे पुत्र । पदाजी त्याचे नाम निधान ।।

त्यांने हे करोनी सप्रेम भजन । रूख्मीनी रमन आराधिला ।।

पदाप्तीचा पुत्र शंकर । त्याने पुजीला रूख्मीनी वर ।।

कान्हया शंकराचा कुमर । बोल्होबा कुमर तयाचा।।

त्या बोल्होबाच्या पोटी। परम वैष्णव भक्त तुकाराम।।

बोल्होबांनी चाळीस वर्षे पंढरीची वारी केली

चाळीस वर्षे ते अवसरी । केले पंढरीची वारी ।।[६९]

या अभंगातुन तुकाराम महाराज यांनी आपली वंशावळ मांडली आहे.

बोल्होबा नंतर पंढरीची वारी श्री तुकाराम महाराज करू लागले. त्यांची मोठी दिंडी होती. दिंडीत चौदासे टाळकरी होते. वी सर्व टाळकरी मंडळी वारीच्या वेळी देहूला जमत असत. तुकाराम महाराज दर वद्य एकादशीला दिंडीसह वर्तमान आळंदीसही जात व किर्तन करीत. तुकाराम महाराज वैकुंठाला जाईपर्यंत हा नेम कधी टाळला नाही. ते वैकुंठाला गेले त्या वेळी त्यांची मुले लहानच होती. तेव्हा पंढरीच्या वारीची परंपरा त्यांचे धाकटे बंधु कान्होबा यांनी चालु ठेवली. कान्होबा व नारायण बाबा दोघेही दिंडीबरोबर जात असत. कान्होबाच्या निधनानंतर सर्व भार नारायण बाबांवर येऊन पडला. ज्ञानेश्वर महाराजांच्या आणि तुकाराम महाराजांच्या पादुका एकाच पालखीत ठेवुन ज्ञानोबा तुकाराम असे भजन करीत आषाढी एकादशीला पंढरपुरला जाण्याची परंपरा नारायण

बाबांनी सुरू केली.ज्ञानेश्वर माऊली आणि तुकाराम महारात आपल्या बरोबर आहेत आणि आपण त्यांचया बरोबर आहोत या श्रद्धेने ही वारी निघत असे. जेष्ठवद्य नवमीला पालखी देहुहुन निघुन आळंदीस जाई आणि दशमीला आळंदीहुन पुण्याकडे रवाना होई. ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महारात यांच्या संयुक्त पालखीचा सोहळा १६८० पासुन सुरू झाला.

## तपोनिधी नारायण महाराज

तुकयाबंधु कान्होबानी आपले हयातीतच वारीची परंपरेची, संप्रदायाची धुरा तुकोबांचे धाकटे सुपुत्र नारायण बाबा यांच्या खांद्यावर दिली.नारायण बाबांनी तुकोबांच्या शेकडो अभंगाचे पाठांतर केले.

तुक्याचे अभंग साचार । बहुत केले पाठांतर ।।
नारायण बाबा वैष्णव वीर । कीर्तन गजर करीतसे ।। [७०]

कान्होबा प्रसंगानुरूप नारायणबाबांना किर्तनासही उभे करीत. गवारशेठ वाणी तुकोबांचे टाळकरी यांनी अंत्यसमयी कान्होबा व नारायण बाबा यांना निरोप पाठवुन आपले गावी सुदुंबऱ्यास बोलावून घेतले. त्यासमयी नारायणबाबांनी किर्तन केल्याचा उल्लेख या अभंगात येतो.

सन्तिध मृत्यु पातला हे जानून । शिहर पातले नारायणे।।
त्यास सांगितले पुर्वकथन । हाक तुक्याने दिधली ।।

## सामाजिक कार्य

नारायणबाबांनी जसे पारमार्थिक धार्मिक कामात लक्ष्य घातले त्याप्रमाणे त्यांनी सामाजिक कार्यही केले.

१.त्यांनी ढोंगी मंबाजीला देहुगावाहेर हाकलून दिले.

२.सेनापती दाभाडे यांचा सरदार लोदीखान पठाण देहुजवळील सांगुर्डी गावात राहत होता. तो थोडे सैनिक बाळगुन होता. सैन्याचा उपयोग तो सभोवतालची गावी लुटालुटकरण्यास करत. पुढे तो फारच प्रबळ झाला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी नारायण महाराजांनी सभोवतालाच्या लोकांना जमा करुन त्याच्यावर हल्ला चढवला.धुमश्चक्री झाली. नारायणबाबांनी त्याचा पराभव करुन त्याला सांगुर्डी गावातुन हकलुन लावले.

३.तुकाराम महाराजांनी दुष्काळ पडला तेव्हा दुष्काळपीडीत लोकांना जवळचे द्रव्य वाटून टाकले.

नारायण महाराजांच्या वेळीही दुष्काळ पडला. अशा परस्थितीत नारायनबाबांनी तुकाराम महाराज बांधले देउळ वाढत्या यात्रेला अपुरे पडु लागले म्हणून नविन देउळ बांधण्याचे काम सुरू केले दुष्काळ ग्रस्त लोक कामावर लावले. त्यांना आपल्याकडील धान्य दिले पुढे छत्रपती शाहु महाराजानी ५००० रु.देवळाच्याकामाकरता पाठवले. तसेच फलटणचे राजे रंभाजी बाजी निंबाळकर तळेगावचे सेनापती खंडेराव दाभाडे यांनी देवळाच्या कामाला मदत केली.नारायणमहाराजांनी स्वतःच्या घरदारावर तुळसी पत्र ठेवले. वाडा लुटविला, यात्रा महोत्सव,सदावर्त,अन्नछत्र, अतिथ्य,अभ्यगतांचा परामर्ष,देवाची पूजा अर्चा,यथासंग चालवित म्हणून मराठा साम्राज्याकडुन इनाम मिळवली.

**औरंगजेब बादशाचा स्वारीकालीन प्रसंग–**

औरंगजेब बादशाहाचा प्रचंड सैन्य आणि विद्युत युध्द सामुग्री सह शिवाजी महाराजांनी स्थापन केलेली स्वराज्य नष्ट करण्याकरता महाराष्टात उतरलेला होता. सैन्याच्या हालचाली दोन्ही बाजुनी जोरात चालू होत्या. संभाजी महाराजाचा वध करण्यात आला.मुघलविरोधात लढाईचे नेतृत्व राजाराम महाराजांकडे आले प्रसंग गंभीर होता अशा समयी संत महंतांच्या दर्शनाची अभिष्टचिंतनाची जरुर होती हे राजाराम महाराजांनी इ.स.१६९४ मध्ये दिलेल्या टोलवंडी गावाच्या इनाम सनदेत आढळतो.आज दिवणे रामश्री भानजी रघुनात सरहवालदार व कारकुन पा.चाकण मोकदमे मौजे येलवाडी ता.मद सुरसतरकमल तिसेन अलक सुदहुन सादर झाली.तेथे जहिल की राजश्रीपंतसचिव स्वामीचे आज्ञापत्र ६०२ रजवींचे आदालत झाले. तेथे आज्ञा की राजश्री तुकोबा गोसावी यांचे पुत्र नारोबागोसावी बहुत थोर संत पुरूष विश्ववंद्य वास्तव्य मौजे देहू प.म. पुणे यांचा महिमा अलौकीक आहे. यांचे दर्शना पै करून राजश्री छत्रपती स्वामींचे कल्याण त्याशी स्वामींचे दर्शनास कित्येक दडी तापडी येताती. त्यासी अन्नदाने गोसावी करीताती कित्येकास प्रसाद घालावा लागतो व यात्रा महोत्सव प्रत्येही होती. तेथे कित्येक व्येये होती येसी यासी आशा स्थळी राजश्री स्वामींचे राजीयांसी वंशावळी यांचे उत्तरोत्तर कल्याण आहे. याकरीता नुतन गाव मौजे मजकुर का.मा. देहू व १ कुलबाज कुलकानु जलतनु काष्ट पाषाण निधी निक्षेप सहित खेरीज इनामदार व हवालदार करून साम चतुःसीमा पुर्वक मर्यादेप्रमाणे शासनेपुर्वक सर्व पाने करून दिला असे. सैन्याच्या हालचाली चालु असल्यामुळे श्री पंढरपुर व श्री क्षेत्र देहू इथल्या यात्रेस जाणाऱ्या यात्रेकरूंना सैनेचा उपद्रव होत होता. त्यांचा उपद्रव दुर व्हावा म्हणुन छत्रपती राजाराम महाराजांना

श्री नारायण महाराजांनी पत्रांनी कळविले होते. त्यांचे उत्तर राजाराम महाराजांनी खाली दिलेल्या पत्राने कळते. श्री तपोनिधी नारायण गोसावी यासी प्रती राजाराम छत्रपती दंडवत उतरी तुम्हा पत्र पाठविले ते पावले. श्री पंढरपुर व श्री महादेव व स्थानेश्वर देहू यंथील यात्रेस लोक जात असतात. त्यास आपल्या सेनेचा उपद्रव लागतो.सुप्रवृत्तीने येऊ जात देत नाही .त्यासी आपण आपल्या सैन्याला पत्रे देण उपद्रव द्वारे ते गोष्टी केली पाहिजे म्हणोन लिहले ते कळो आले त्यावरून आपल्या सैन्यास पत्र दिली. असेल ते यात्रेच्या लोकांना उपद्रव देणार नाही.सुपृत्तीने जाऊ येऊ देतील तुम्ही निरंतर आम्हास आशिर्वाद चिंतुन.यावरून असे स्पष्ट समजते की राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत नारायण महाराज हा दिंडी सोहळा देहू येथुन पंढरपुरला घेऊन जात असे. नारायण महाराजांनी राजांकडुन सोहळ्यास व यात्रेस उपद्रव होऊन नये म्हणुन मदत मागितली असल्याने स्पष्ट होते. रामचंद्र पंत निळकंठ व नारायण महाराज यांच्या पत्रव्यवहार झाले श्रींचे पुजेसाठी राजाराम महाराज यांच्याकडुन रामचंद्र पंत अमात्या यांनी देहू गाव इनाम दिले यासंदर्भात रामचंद्र पत अमात्य यांनी पाठविले पत्र खालीलप्रमाणे आहे[७१]

श्रीहरी गुरूमुक्त परायण राजमान्य राजश्री नारोबा गोसावी स्वामी गोसावी यासी स्नेहाभिलाषी रामचंद्र निळकंठ कृतानेक विज्ञापना उपरी येथील कुशल आपले दयेवरून जाणुन स्वानंत कुशल लेखन अज्ञात केले पाहिजे. विशेष श्रीच्या उत्सवाकरीता राजश्री सखोबा गोसावी आले होते. त्यांनी सविस्तर वर्तमान आपले सांगितले व आपली आज्ञाही सांगितली होती मातोश्री आई साहेबास पत्र व प्रसाद पाठविला तो त्यास प्रविष्ठ केला. श्री चे पुजेकरीता मौजे देहू गाव द्याव म्हणुन विनंती करून इनाम गाव देऊन याविषयी राजपत्र करून पाठविली आहे. इ.स.१७०४ देहुगावाच्या सनदेतील काय महत्वाचे उल्लेख सनद ही रामचंद्र पंत नीळकंठ अमात्याचे हातची आहे.ते तुकोबाराय यांच्याबद्दल असे लिहीतात की,श्री तुकोबा गोसावी सत्पुरूष हे मौजे देहू ता. हवेली जि. पुणे येथे भगवतकथा करत असत अदृश्य झाले हे गोष्टी विख्यात आहे. तुकोबा गोसावी स्वहस्ते श्री सा देवाची पुजा करीत होते. ती पुजा नारोबा गोसावी चालवित आहे. देव बहुत जागृत स्थान आहे. तेथे पुजा पुरस्कार उत्तरोत्तर उत्तम प्रकारे नियम करून चालल्याने स्वामी व स्वामीचे राज्यास कल्याण आहे. श्रींचे पुजा उत्सवाचे अनुकुलतेस सारा देहू गाव इनाम दिला असे.रा. तुकोबा गोसावी हे बहुत थोर सत्पुरूष होते. त्यांचे पुत्र नारोबा गोसावी हेही भगवत् पारायण आहे. तसेच छत्रपती शाहुंनी देखील पुरोत्त काळात महाराजांना किन्नही हे गाव देवाकरिता इनाम म्हणुन

दिले. शाहू महाराज राणे सकवार बाई वीरूबाई हे श्रीनारायण महाराजास पुत्र मानीत असत. शाहु महाराजांकडे साताऱ्याला नारायण महाराजांचे शिष्य सरवोबा गोसावी मरकळकर व देवबा यांचे नेहमी देवस्थानाचे कामाकरिता जाणे असे. नारायण महाराज देखील साताऱ्यास शाहु महाराजांकडे भेटायला गेले होते. अर्थात दोघांमध्ये आध्यात्म्य व्यवहारीक असे संबंध दृढ होते. यामुळे राजाकडुन नारायण महाराजांकडुन पंढरपुर वारींसाठी निश्चित मदत झाली असे दिसते. नारायण महाराजांनी सुरू केलेल्या पालखी दिंडी सोहळा आज देहू संस्थानाचा माध्यमातुन दरवर्षी देहुहून मोठ्या उत्सवाने जात आहे.

## २.११ हैबतबाबा– पालखी सोहळा प्रवर्तक

कुलं पवित्रं जननी कृतार्थः वसुंधरा पुण्यवतीचतेन ।

अपार संवित्सुखसागरे स्मिन लीनं परब्रम्हानी यस्य चेताः ।[७२]

जयांचे चित्त अपार परब्रम्ह सुख सागरात निमग्न झाले आहे अशा महात्म्यांचे कुल पवित्र आहे, जननी कृतार्थ आहे व त्यांच्या वास्तव्यांने पृथ्वी पवित्र झाली आहे असा वरील श्लोकाचा अर्थ आहे.

पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ।।

या वचनाने तुकाराम महाराजांनी या महापुरूषांचे वर्णन केले आहे. अशाच एका पवित्र कुळात पावन देशात प्रस्तुत चरित्रनायक वै. हैबतरावबांबांचा जन्म सातारा जिल्ह्यातील आरफळ नावाच्या गावामध्ये झाला. हे आरफळ गावाचे देशमुख. त्यांचे उपनाव पवार. कृष्णमाईंच्या काठांवर वसलेले आहे. महाबळेश्वर मध्ये उगम पावुन जनास पावन करीत जाणारे कृष्णा नदी हे सातारा जिल्ह्याचे वैभव आहे. उगमापासुन मुखापर्यंत कृष्णेच्या पात्रात व काठावर एवढी मंदीरे आहते एवढी मंदीरे अन्य कोणत्याही नदीवर नाहीत.कृष्ण काठ जसा पावन आह तसाच तो शुरांचा व वीरांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. या भागात अनेक मातब्बर क्षत्रीय घराणे झाले. शिवरायांच्या कार्यात सहकार्य कराणारे नामवंत कुळे याच जिल्ह्यात आहेत . छत्रपती शिवरायांची वंशपरंपरेची गादी याच साताऱ्यात आहे. अनेक क्षात्र घराण्यांपैकी पवार हे घराणे आहे. ''पवनार'' हे त्यांचे राजपती नाव आहे. आरफळ गावी हे घराणे पुर्वीपासुन स्थित झाले आहे व हा सर्व गाव पवार भावकींचा म्हणुन ओळखला जातो. अशा क्षात्रवंशीय घराण्यात बाबांचा जन्म सुमारे १७५० च्या सुमारास झाला. हे घराणे शुर आणि धार्मिक वृत्तीचे होते. बाबांच्या घरांमध्ये पुर्वीचीच विठ्ठल भक्ती परंपरा होती. या

संस्काराने बाबांचे मन भजनामध्ये रंगले होते. लहान असताना मातापित्यांचे सोबत बाबांनी पंढरीची वारी चालु केली होती. तसेच आळंदीची प्रत्येक वर्षांची यात्राही केली होती. मात्र पंढरीनाथापेक्षा बाबांचे बालमन ज्ञानोबारायांच्या समाधीस्थानी जास्त आकर्षित झाले. आळंदीतील रम्य वृक्षराजी व इंद्रायणीचा अखंडित प्रवाहाने त्यांच्या मनाला ओढ लावली आपण याच ठिकाणीच रहावे असे त्यांना सतत वाटत असे. कालमानानुसार बाबांचे वय वाढले व घराण्याच्या क्षात्रवृत्तीनुसार बाबा सैन्यात भरती झाले. ग्वाल्हेरचे महादजी शिंदे यांचे पदरी ते सरदार म्हणुन सेवा करीत असत या कालावधीतच गाव आळंदी, पंढरी सहवास कमी झाला तरी अंतरीक ओढा होताच या दरम्यान बाबांचे लग्न झाले.पुर्वायुष्यात तसा भक्त म्हणुन त्यांचा लौकीक नव्हता, उलट शिंद्यांचे मातब्बर लढवय्या सरदार म्हणुन ते प्रसिद्ध होते. मात्र ईश्वराचा संकेत काही औरच होता हैबतबाबा हे वीर विठ्ठलाचे भक्त म्हणुन त्यांचा लौकीक व्हावा असा तो संकेत होता. म्हणुन पुर्वायुष्यातील संपुर्ण वळणच बदलुन ज्ञानोबारायांचे एकनिष्ठ भक्त म्हणुन ते संत मालिकेत समाविष्ट झाले तो एक प्रसंग एक वेळ बराच पराक्रम गाजवुन बाबांनी शिंद्यांचे परवानगीने जन्मभुमीच्या दर्शनाकरीता जाण्याचा संकल्प केला. शिंदेनी बाबांचा गौरव करून त्यांना विपुल द्रव्य व पुरेसे सैन्य देवुन गावी जाण्याची अनुमती दिली. आपल्या लव्याजम्यासोबत बाबा महाराष्ट्रात येत असता सातपुड्याचे पर्वत प्रदेशात एका भिल्लाचे टोळीने त्यांच्यावर हल्ला केला व त्यांना सैन्यसह कैद करून त्यांची संपत्ती लुटून टाकली अचानक निर्माण झालेल्या या प्रसंगाने बाबा गांगरून गेले व बालपणी ऐकलेल्या किर्तन श्रवणाचे त्यांना स्मरण झाले. व संकटकाळी भगवान आपले रक्षण करतो याचे भान होऊन त्यांनी माऊलींचा धावा केला. यासमयास असा प्रसंग घडला की त्या भिल्लाची पत्नी गरोदर होती तीला प्रसववेदना होऊ लागल्या व ती प्रसुत होऊन तिला पुत्र प्राप्ती झाली त्या भिल्लास मुलगा नव्हता. आपण ज्यांना कैद केले आहे त्यांच्या पुण्याईनेच हे पुत्र प्राप्ती झाली असे वाटुन तत्काळ भिल्लाने बाबांना व त्यांच्या सहकाऱ्यांना मुक्त केले. व त्यांचे द्रव्यही परत केले. व आपल्या देशात जाण्याचे सांगितले.आपणांस ज्यांनी लुटले व कैद केले तोच भिल्ल अचानक मुक्त करतो काय व आपले द्रव्य परत करतो काय याचे गौडबंगात इतरांना जरी उमगले नाही तरी बाबांना मात्र कळले की आपण केलेल्या माऊलींच्या धावेनेच हा बदल झाला आहेत व आपण मुक्त झालो आहोत. एरव्ही आपण या संकटातुन जिवंत राहु याचीही त्यांना आशा नव्हती. या प्रसंगाने बाबांचे प्रापंचिक वृत्ती पुर्ण पालटली व त्यांनी मनात संकल्प केला की ज्या माऊलींच्या कृपेने आपणास हे जीवदान

मिळाले.[७३] त्यांच्यासाठीच उरले ते हरी तुम्हा समर्पण ।पुणे प्रांतात आल्यानंतर आपल्या सर्व सोबत्यांना व कुटुबीयांना आपला निर्णय व निश्चय सांगितला व संपत्ती, विलास, भोग,व लौकीक या सर्व मोहपाशांचा त्याग करून बाबा आळंदीत आले. ज्ञानोबारायांचया समाधीवर मस्तक ठेवले. शिंदेचा मातब्बर सरदार ज्ञानोबारायांचा एकनिष्ठ शिलेदार झाला व माऊलींच्या भजनात रंगुन गेला.जगद्गुरू तुकोबारायाप्रमाणेच हा वैराग्याचा अविष्कार होता पुर्वायुष्यातील प्रापंचिक जीवन बदलुन केवळ वैराग्यमुर्ती परमार्थिक स्वरूप प्रगट झाले होते. प्रारंभीच्या काळात बाबा सिद्धबेटात राहत होते. बारा वर्षे त्यांनी फक्त लिबांचा पाला खाऊन सिद्धबेटात साधना केली. एक वेळ इंद्रायणीस महापुर आला सिद्धबेट पाण्याने वेढले गेले. तेव्हा बाबा एका झाडावर बसुन राहिले. इकडे आळंदीकर ग्रामस्थांचे स्वप्नात माऊलींनी दृष्टांत दिला की आमचा एकनिष्ट भक्त पुरात अडकला आहे. त्यास घेऊन यावे त्याचप्रमाणे ग्रमस्थांनी होडी पाठवुन बाबांना आणले. व माऊलींचे ओवरीत राहण्यास जागा दिली याप्रसंगानेच आळंदीकरांचया मनात बाबांविषयी आदर निर्माण होऊन संत बुद्धी तयार झाली सर्व लोक बाबांना मानु लागले यानंतर बाबांचे भजन माऊलींपुढे होऊ लागले.अंगामध्ये शिलेदाराचा पोशाख, डोक्यावर पगडी व पायांमधी चाळा बांधुन बाबा विणा चिपळ्यासंह माऊलींच्या भजनात तासोनतास रमुन जायचे. एकदा गावतील काही लोकांनी उपद्रव दिल्यामुळे बाबा श्री क्षेत्र भंडारा डोंगरावर राहण्यास गेले. तेव्हा पुजाऱ्यास व गावातील लोकास श्री ज्ञानोबारायांचा दृष्टांत झाला की आम्हाला बाबांच्या भजनाशिवाय करमत नाही. त्यांना परत घेऊन या

तयाचे आम्हा व्यसन । ते आमुचे निधी निधान । किंबहुना समाधान । ते मिती तै ।।[७४]

असा अन्योन्य संबंध जाणुन सर्व गावकरी मंडळींनी बाबांना पुन्हा आळंदी येथे आणले पुर्ववत बाबांचे भजन सुरू झाले.रात्रीची शेजारती झाल्यानंतर सकाळचे पुजेपर्यंत वीणा घेऊन 'महाराज ज्ञानेश्वर माऊली' हे भजन करत. समाधीकडे पाहत नाचावे असा नित्यक्रम असे.माऊलींविषयी बाबांची एवढी एकनिष्ठा होती की महाराज ज्ञानेश्वर माऊली या भजनानेच आपल्या जागराची व इतर भजनाची सुरूवात करीत. आजही बाबांचे परंपरेमध्ये केव्हाही याच भजनाने सुरूवात होते. आळंदी परीसरातील दिंड्यामध्येही किर्तन भजनाची सुरूवात आजही या भजनानेच होते हे विशेष ज्या ओवरीत बाबा राहत ती ओवरी आजही हैबतराव बाबांची म्हणुन प्रसिद्ध असुन तेथे बांबांच्या पादुकांची नित्य पुजा अर्चा केली जाते. पालखी सोहळा सुरू करण्यास

बाबांचे एकनिष्ठ सहकारी श्री खंडोजी बाबा पुणेकर सर्वतोपरी सहकार्यास तयार झाले. त्यामुळे बाबांचे नंतर दोन नंबरची दिंडी म्हणुन यांचा मान आहे. त्याचप्रमाणे राजपुरकर, शेडगे, मरकळ , डांगे, नांदेड, वाकळ, चाकण, इत्यादी परीसरातील दिंड्या या सोहळ्यात सहभागी झाल्या.पुण्याप्रमाणे सातारा परिसरातही बाबांनी लोकांना प्रवृत्त केले. याभागातील लिंब घोरपडे, वालुबाई पाडळकर, दुधीकर, केदारबाबा कराडकर, शिरवळकर, वडगावकर,मराठवाड्यातील माई दिंडी, ऊखळीकर तसेच राशिनकर या दिंड्यांचा सहभाग सन १८३६ ला सोहळ्यात झाला त्याच वर्षी हैबतबाबा वैकुंठवासी झाले.त्यांची ही परंपरा आजपर्यंत त्यांचे वंशज आरफळकर दिंडी मालक या नात्याने संत ज्ञानेश्वर म. संस्थान आळंदी देवाची यांचे बरोबर हा पालखी दिंडी सोहळा चालवत आहे. ही परंपरा पुर्वीप्रमाणे आज सुरू आहे. पुर्वीप्रमाणे पहिल्या मानाच्या दिंड्यांचा क्रम आजही पालखी सोहळ्यात दिसतो.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी

आजच्या काळात परंपरेनुसार पालखी सोहळा चालु आहे. परंपरा जतन करणारे एक महत्वाचे अंग म्हणजे दिंड्या होय. दिंडी ही तात्पुरती वारकऱ्याचा समुदाय आसतो.पण फडकरी हे अव्याहतपणे पाडुरंगाची सेवा परंपरेनुसार चालू ठेवतात. अशा दिंडीमुळे पालखी सोहळ्याला वैभव प्राप्त झाले. पालखी सोहळयात या दिंडीची रचना अशी माउली पालखी रथ मध्यभागी त्या पुढे २७ दिंडया रथामागे ही दिंड्या त्यांची संख्या आजपर्यंच्या ११६ एकुण १४३ दिंड्या यांची ज्ञानेश्वर महाराज संस्थान कार्यालयात नोंद असल्यामुळे अधिकृत नंबरच्या दिंड्या या व्यतिरीक्त मोकळा चालण्याऱ्या दिंड्या मिळून ४०० दिंड्या आहेत शिवाय दिंढ्याही बऱ्याच आहेत शिवाय दिंढ्या सोडुन पालखी समवेत गटागटाने चालणारे वारकरी भरपूर आहे.सोहळ्यापुढे नगारा वाजविण्यासाठी बैलगाडी त्याच्याबरोबर शितोळे सरकार यांचा माउलीचा घोडा जो मोकळा असतो व एक दुसरा घोडा घोडेश्वार सह असतो.यांच्यापाठीमागे रथाच्या पुढील दिंड्या असतात.घोडे व नगारा निघाला म्हणजे पालखी सोहळ्याची सुरवात असते. विशेष म्हणजे या सर्व दिंड्या दररोज आपल्या नंबराप्रमाणे टाळ,मृदंग,वीणा,पताका घेवुण भजन करत क्रमाक्रमाने चालतात. या दिंड्या रथा समोरून सुरू होतात.

## २.१२ सारांश

विषय प्रवेश या प्रस्तुत प्रकरणात पार्श्वभूमी,मानव आणि संस्कृती ,पंढरपुर धाम ऐतिहासिक पार्श्वभूमी , पंढरपुरचे ऐतिहासिक स्थान व महत्व ,पंढरपुरातील धार्मीक स्थळे ,विठ्ठल शब्दाची उत्पत्ती ,वारकरी :– तत्वज्ञान नियम व गुण ,वारी संकल्पना ,दिंडी शब्दाची संकल्पना ,श्री नारायण बुवा दिंडी प्रवर्तक ,हैबतबाबा दिंडी प्रवर्तक इ. घटकांची मांडणी केलेली आहे.

## संदर्भ


१. नागनाथ जाधव ,वारकरी स्वाध्याय,ना. जाधव पाचवी आवृत्ती १९९८ पृ. २०

२. कित्ता, पृ.२१

३. नागनाथ जाधव ,पायी वारी पंढरीची ,ना. जाधव पाचवी आवृत्ती २००३ पृ.२५ .

४. वारकरी शिक्षण संस्था, भजनी मालिका पृ.३२९ अभंग क्र. १००८

५. नागनाथ जाधव ,वारकरी स्वाध्याय,ना. जाधव पाचवी आवृत्ती १९९८ पृ.२४

६. लोकनाथ स्वामी, भु वैकुण्ड, पंढरपुर, पदयात्रा प्रेस, पंढरपुर, जुलै २००९, पृ.२.

७. गीता प्रेस, गोरखपुर, श्री.मद्धभगवतगीता विष्णुसहस्त्रनामसहित, गोरखपुर, अध्याय १५ श्लोक १ , पृ.८५

८. कित्ता, अध्याय १५, श्लो ६, पृ.८६

९. गीताप्रेस, गोरखपुर श्री सकलसंतवाणी (मराठी) खंड दुसरा, श्री. तुकाराम गाथा, गोरखपुर. अभंग क्र. ३६२७

१०. प्रा. श. वा. दांडेकर, वारकरी पंथांचा इतिहास, वारकरी प्रकाशक मंडळी नागपुर, जुन १९९४, पृ.१०

११. लोकनाथ स्वामी, भुवैकुंठ पंढरपुर पदयात्रा प्रेस पंढरपुर, जुलै २००९, प्रथम आवृत्ती, पृ. ६

१२. मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य, सांस्कृतिक मंडळ, खंड ९, १९८० पृ. ४५,६१५

१३. मालू सोनार, मालूनार ग्रंथ अध्याय ३२

१४. भा.प. बहिरट , प.ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९८ पृ.४

१५. लोकनाथ स्वामी, भूवैकुंठ पंढरपुर, पदयात्रा प्रेस, पंढरपुर जुलै २००९. पृ.२८५

१६. कित्ता पृ.२८६

१७. वारकरी संप्रदाय विशेषांक, श्री सदगुरू साईकृपा,२००९ पृ.३१

१८. गोताप्रेस,गोरखपुर,श्रीकलसंतवानी (मराठी) खंड दुसरा, श्री एकनाथ गाथा, गोरखपुर, अभंग क्र. ४३४, पृ.७५

१९. देहू संस्थान तुकाराम महाराज गाथा पृ.८८७ अभंग क्र ४४२७

२०. कित्ता, अभंग क्र. ७९०, पृ.५५५

२१. वारकरी शिक्षण संस्था आळंदी, भजनी मालिका पृ.२४९ अभंग क्र ६६८३

२२. कित्ता अभंग, क्र. ३०४१,

२३. केसरी अंक, मंगळवार २१ जुलै सन १८८५ पृ. ३

२४. लोकनाथ स्वामी, भूवैकूंठ पंढरपुर, पदयात्रा प्रेस पंढरपुर, जुलै २००९ पृ.१२

२५. डॉ. रामचंद्र देखणे, वारी, स्वरुप आणि परंपरा, (महाराष्ट्रचा लोकदेवश्री विठ्ठल) पद्मगंगा प्रकाशन पुणे, १ जुलै २००७ पृ.९१

२६. गीताप्रेस, गोरखपुर, श्रीकल संतवाणी (मराठी) खंड दुसरा.

श्रीतुकाराम गाथा, अभंग क्र. ३१८५, पृ.७३८

२७. पं. महादेव शास्त्री जोशी, भारतीय सांस्कृतिक कोश, खंड ८, सन १९७९, पृ. ६७७

२८. रा.चि. ढेरे, श्री विठ्ठल : एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन २००५ पृ.१५

२९. संजय शिवाजी काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे, २१ जुलै २०१०, अध्याय १८ ओवी १०६१

३०. कित्ता, अध्याय ६ वा ओवी ७७७

३१. वारकरी शि. संस्था भजनी मालिका पृ.२३७

३२. गीताप्रेस, गोरखपुर श्रीसकलसंतवाणी (मराठी) खंड दुसरा श्री. एकनाथ गाथा गोरखपुर, अभंग क्र. १६५६ पृ.१८५

३३. गीताप्रेस, गोरखपुर श्रीसकलसंतवाणी (मराठी) खंड दुसरा श्री. तुकाराम गाथा, अभंग क्र. २२४० पृ.६८५

३४. गीताप्रेस, गोरखपुर, श्री. नामदेवांची गाथा, गोरखपुर अभंग क्र. १७९

३५. संजय शिवाजी काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे, २१ जुलै २०१०.

३६. श्रीसकलसंतवाणी (मराठी) खंड दुसरा पृ.४८९ अभंग क्र १२१

३७. गीताप्रेस, गोरखपुर, श्रीसकलसंतवाणी, श्री ज्ञानदेव गाथा, पृ.८ अभंग क्र ५४

३८. संजय शिवाजी काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे, २१ जुलै २०१०,

३९. गाताप्रेस, गोरखपुर, श्रीसकलसंतवाणी (मराठी) खंड दुसरा त्तर तुकाराम गाथा

४०. नथुसिंह डोंगरसिंग रजपुत, संत तुकाराम महाराज सार्थ गाथा, वा. शि. संस्था आळंदी ५ जुलै १९९६, पृ.१४१, अभंग क्र. २३१७

४१. ह.भ.प. ला.रा. पांगरकर, संत तुकाराम चरित्र, वरदाबुक्स पुणे, १९२०, १९९८ पृ.१५०

४२. कित्ता, पृ.१५२

४३. कित्ता, पृ.१५४

४४. गीताप्रेस, गोरखपुर, श्री सकलसंतवाणी (मराठी) खंडदुसरा श्री ज्ञानदेव गाथा,पृ.४८९ अभंग क्र.२१

४५. वारकरी शि. संस्था भजनी मालिका २०११ पृ.१९३ अभंग क्र.५६६

४६ कित्ता , पृ.२४१ अभंग क्र.६८८

४७. नागनाथ जाधव, पायी वारी पंढरी, पृ.५८

४८. गीताप्रेस, गोरखपुर, श्री नामदेवांची गाथा, गोरखपुर, पृ.६५अभंग क्र.४३६

४९. गीताप्रेस, गोरखपुर, श्री तुकाराम गाथा, गोरखपुर, पृ.६६६अभंग क्र.२०२१

५०. वारकरी शि. संस्था भजनी मालिका २०११ पृ.१९३ अभंग क्र.५६६

५१. गीताप्रेस, गोरखपुर, श्री नामदेवांची गाथा, गोरखपुर, पृ.७०२ अभंग क्र.२४२२

५२. वारकरी शि. संस्था भजनी मालिका २०१८ पृ.२४५ अभंग क्र.७०२

५३. संजय शिवाजी काकडे , श्री सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे २०१०

५४. केसरी मंगळवार १८ माहे नोव्हेंबर सन १९१३ इ.स.वि.

५५. सकल संतवाणी श्री तुकाराम महाराज गाथा पृ.२६ अभंग ७५

५६. कित्ता पृ.५५० अभंग क्र ७३८

५७. संजय शिवाजी काकडे , श्री सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे २०१०

५८. डॉ. रामचंद्र दिखणे, वारी स्वरुप आणि परंपरा पम्दगंगा प्रकाशन, १ जुलै २००७, पृ.१३

५९. संजय शिवाजी काकडे , श्री सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे २०१०

६०. डॉ. रा.द. तथा गुरूदेव रानडे,मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग १९९३ पृ.३१६

६१. वारकरी शि. संस्था आळंदी ,भजनी मालिका पृ.३३९ अभंग क्र १०५२

६२. डॉ. रामचंद्र देखणे, वारी स्वरूप आणि परंपरा, पद्मगंधा २००७ पृ.२१.

६३. महिपतीकृत ओवीबध्द, तुकाराम महाराज चरित्र का.अ. जोशी पुणे

६४. संत तंकाराम महाराज संस्थान, श्री संत तंकाराम पालखी सोहळा उगम व विकास,२०१२ वै.श्रीधरबुवा , डॉ सदानंद मोरे. पृ.९

६५. मुलाखत अध्यक्ष संत तुकाराम महाराज संस्थान देहू, (मा. श्री. अशोक मोरे, २०.१२.२०१५)

६६. सकल संतवाणी, संत तुकाराम महाराज गाथा, पृ.२४३ अभंग ६९६

६७. संत तंकाराम महाराज संस्थान, श्री संत तंकाराम पालखी सोहळा उगम व विकास,२०१२ वै.श्रीधरबुवा , डॉ सदानंद मोरे, पृ.८

६८. ला.रा.पांगारकर , संत तुकाराम चरित्र, वरदा बुक्स पुणे १९९८ पृ.३८

६९. संत तंकाराम महाराज संस्थान, श्री संत तंकाराम पालखी सोहळा उगम व विकास,२०१२ वै.श्रीधरबुवा , डॉ सदानंद मोरे. पृ.८

७०. कित्ता पृ.१०

७१. छत्रपती राजाराम महाराज यांनी नारायण महाराज यांना लिहीलेले पत्र व रामचंद्रपंत अमात्य यांचे पत्राचा अनुवाद, संत तुकाराम महाराज देहू संस्थान

७२. पं. महादेव शास्त्री जोशी, भारतीय सांस्कृतिक कोश, खंड १० १९७९, पृ. ४०६

७३. वारकरी शिक्षण संस्था, भजनी मालिका, मंगल चरण, पृ.६ अभंग क्र २०

७४. श्रीगुरू हैबत बाबा भजनी मालिका, २०१३ पृ.६

प्रकरण तिसरे

# वारकरी सांप्रदायाचा इतिहास

३.१ प्रास्ताविक

३.२ श्री ज्ञानेदेवांच्या पुर्वीचा वारकरी सांप्रदाय ऐतिहासिक काळ

३.३ संत ज्ञानदेव व संत नामदेव महाराज यांच्या काळातील वारकरी संप्रदाय

३.४ श्री भानुदास व श्री एकनाथ महाराज यांच्या काळातील वारकरी सांप्रदयाचा इतिहास

३.५ श्री तुकोबाराय व श्री निळोबा महाराज यांच्या काळातील वारकरी सांप्रदायाचा इतिहास

३.६ तद् नंतरच्या ३०० वर्षाचा वारकरी सांप्रदायाचा कालखंड

३.७ श्री पांडुरंग उपासकाळातील सांप्रदाय

३.८ वारकरी सांप्रदायाचे तत्वज्ञान

३.९ वारकरी सांप्रदायाची ग्रंथ संपदा

३.१० वारकरी सांप्रदायाची प्रमुख क्षेत्रे

३.११ सारांश

# वारकरी सांप्रदायाचा इतिहास

## ३.१ प्रास्ताविक

महाराष्ट्रात वैदिक धर्मांतर्गत जे अनेक सांप्रदाय आहेत त्यापैकी ज्याने महाराष्ट्राचा बराचसा भाग व्यापला आहे.असा हा वारकरी सांप्रदाय होय हा सांप्रदाय महाराष्ट्राच्या बाहेरील अनेक राज्यात पसरलेला आहे. आज जगातील अनेक देशात वारकरी सांप्रदाय पोहचला आहे. वारकरी सांप्रदाय हा भारतातील अनेक भक्ती सांप्रदायापैकी एक प्रमुख असा सांप्रदाय होय. या सांप्रदायाचे उपास्य दैवत पंढरपुरचे श्री विठ्ठल आहे. या सांप्रदयाची व्याप्ती जरी मर्यादित वाढत असली तरी तिच्या अधिष्ठात्री देवतेचे स्वरूप अत्यंत विशाल आहे. अनुयायांमध्ये ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, आदि दिगंत किर्तीचे संत श्रेष्ठ महानुभव संत असुन त्यांनी निर्मिलेले वाङमय ही जागतिक वाङमयास भुषणभुत ठरलेले आहे. हे वाडमय केवळ महाराष्ट्राचे अमुल्य धन आहे. असे नव्हे तर अखिल जगताचा अमुल्य ठेवाच आहे.युनेस्कोसारख्या जागतीक संस्थेने आखलेल्या महत्वाच्या योजनानुसार भारतातील १४ भाषांमधील दोन उत्कृष्ठ ग्रंथ निवडुन त्या प्रत्येकाचे भाषांतर आंतर जागतिक प्रसारासाठी युनेस्कोने इंग्रजी,स्पॅनिश व फ्रेंच भाषेत करावयाचे ठरवुन काम सुरू झाले आहे. या संस्थेने मराठी भाषेतील उत्कृष्ठ ग्रंथ म्हणुन जे ग्रंथ निवडले आहे ते म्हणजे ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी व तुकोबांची गाथा हे होत. हे दोन्ही ग्रंथ वारकरी सांप्रदयातील शिरोधार्य ग्रंथ होय.यावरून वारकरी सांप्रदायाची ख्याती जगभर पसरलेली दिसते संप्रदायाच्या उदय काळातील सर्व संत मंडळी ते अलीकडील संतांने केलेल्या कार्याचा आढावा या प्रकरणात मांडलेला आहे.

## ३.२ श्री ज्ञानेदेवांच्या पुर्वीचा वारकरी सांप्रदाय ऐतिहासिक काळ

ज्ञानदेवाच्या पुर्वीचा वारकरी सांप्रदायाच्या कालविषयी निश्चित इतिहास व पंढरपुरची वारी या संदर्भात खालील गोष्टीचा विचार करता येतो.

१. वारकरी पंथाचे उपास्य दैवत पांडुरंग मुर्तीचा कालखंड

२. पुंडलिक भक्ताकरिता श्री पांडुरंग आले त्याचा काळ

३. श्री पंढरपुर क्षेत्राचा इतिहास

वारकरी पंथाचे उपास्य दैवत पांडुरंग मुर्तीचा काळ ठरविताना अनेक पुराव्यांचा आधार घेतला गेलेला आहे. अनेक संत वाडमयचा आधार तसेच अनेक संशोधकाचा आधार घेतलेला आहे. वारकरी पंथाचा उगम केव्हा झाला हे निश्चित ठरविता येईलच असे नाही. कारण विठ्ठल भक्ती

आणि वारकरी पंथ ह्या दोन गोष्टी एकच नाही. वारकरी हा विठ्ठलाचा भक्त असतो हे खरे, पण प्रत्येक विठ्ठल भक्त वारकरी असेलच असे नाही. वारकरी सांप्रदयाचा आरंभ श्री ज्ञानेदेवांनी तेराव्या शतकात केला असा उल्लेख गॅझिटियर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी,व्हॉल्युम २०सोलापुर पृष्ठ ४७१ वर पंढरपुर व वारकरी या संबंधाने आली आहे. हे विधान चुकीचे आहे. हे विधान कदाचित तुकाराम महाराजांचा जो प्रसिद्ध अभंग आहे यातील वर्णनावरून केलेला असेल असे दिसते[१] अभंग पुढीलप्रमाणे

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेव रचिला पाया । रचिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ।।
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।।[२]

या अभंगात वारकरी पंथरूपी वाढीचा इतिहास वर्णन केला आहे. त्यातील रचिला पाया याचा अर्थ श्री ज्ञानदेव यांनी पंथाचा आरंभ केला आहे. असा नव्हे श्री तुकाराम यांनी श्री ज्ञानदेवांची योग्यता व कार्यही ज्या अभंगात सांगितले आहे त्यात ते म्हणतात.

'जयाने घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ।।[३]

अर्थात या कडव्यात तुकाराम महाराज ज्ञानदेवांनी वैष्णवांची संघटना केली. हेच वस्तुस्थितीस धरून आहे. श्री ज्ञानदेव यांच्या काळापूर्वी वारकरी भक्त होते. व पंढरपुर क्षेत्रात मोठे यात्रा भरत होती. हे नामदेवरायांनी ज्ञानदेवाच्या वडिलांच्या हकीकतीवरून स्पष्ट होते. नामदेव रायांनी वर्णन केले.ते असे विठ्ठलपंथ व रूख्मिणी यांचा विवाह झाल्यावर त्या वधु वरास आपल्या कुलदेवताच्या पाया पडण्यास म्हणुन शिदोपंथानी पंढरपुरास नेले त्या वेळी तेथे मोठी यात्रा भरली होती.

कुळदेव स्मरण म्हणती सावधान । उभयतांचे मन पांडुरंगी ।।
झाले पाणी ग्रहण विन्धीसी अर्पण ।वंदिले चरण शिदोपंथी ।।
पंढरी हे क्षेत्रा मिळाली से यात्रा ।आले पंढरपुरा भक्तराज ।।
गरूडटक्के पताका मृदंग वाजती । वैष्णव गर्जती जयजयकार ।।
गरूडपारी ऊभे दाटी वैष्णंवांची । उपमा वैकुंठीची पंढरीये ।।

राऊळा भितरी प्रवेशली दोघे । देखियेले ऊभे पांडुरंग ।।

काया वाचा मने पाऊजले नयनी । मस्तकी चरणी ठेवयेले ।।[४]

विठ्ठलासी ध्यान रामकृष्ण माळा । हदयी जिव्हाळा श्री मुर्तीरया ।।

लग्न झाल्यानंतरही विठ्ठलपंथ हे पंढरपुरी आषाढी कार्तिकीची वारी करीत असत. असा उल्लेख नामदेवरायांच्या अभंगातुन येतो. नित्य हरिकथा नामसंकिर्तन । संताचे दरूशन सर्वकाळ ।।

पंढरीची वारी आषाढी कार्तिकी । विठ्ठल एकाएकी सुखरूप ।।[५]

या अभंगावरून वारकरी पंथ पुरातन असुन श्री ज्ञानदेवाच्या पुर्वीही पंढरपुरात वारकरी भक्त जमत असत. वारकरी पंथ हा नामदेव रायाच्या पुर्वीही होता. हा सांगणारा पुरावा साधना साप्ताहिकाच्या २५ ऑगष्ट १९५६ च्या अंकात श्री पांडुरंग देसाई यांनी दिला आहे. यांनी धारवाड जवळ हेबळी गावी सापडलेला आहे इ.स. १२४८ (शके ११७०) मधील शिलालेख. शिलालेख कानडी आहे. तो देवगिरीचा कृष्ण राजाचा आहे. कानडी ओळीचे मराठीत भाषांतर असे

श्री पंडरंगेय श्री विठ्ठल देवर वारीय श्री हरी दिनंगळ

धर्मक्के कुलवर सिंगगावडंनु कोट्र वृत्ती वोंदु

याचा मराठी अनुवाद

श्री पंडरंगेच्या श्री विठ्ठलदेवाच्या वारीच्या श्री हरी दिनी धर्म चालावा म्हणुन कुलवर सिंगगावुंडाने एक वृत्ती दिली[६] वृत्ती म्हणजे चार पाच जणाच्या कुटुंबाचा निर्वाह होऊ शकेल एवढ्या जमिनीच्या उत्पन्नाची व्यवस्था[७] श्री ज्ञानदेव यांनी विखुरलेल्या वारकरी भक्तांचे आपल्या सामर्थ्याने संघटना केली. ज्ञानेश्वरी लिहुन या पंथास सुव्यवस्थिता आणली. या पंथाची संघटना करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता म्हणुन बहिणाबाईनी ‘ज्ञानदेव रचिला पाया’असे म्हटले खरे वाटते

### श्री पांडुरंग मुर्तीचा काळ

वारकरी सांप्रदयातील प्रमुख गोष्टही पंढरीनाथाचे वारी होय. वारकरी सांप्रदयाचा इतिहास पाहताना तो पांडुरंगाची पंढरपुरातील श्री पांडुरंग मुर्तीचा काळ पाहणे महत्वाचे वाटते.पांडुरंग मुर्तीचा काळ विचारात घेताना पुंडलिकाचा काळही विचारात घ्यावा लागतो कारण श्री विठ्ठल अवतार हा पितृ सेवक जो पुंडलिंक यांच्या करिता आहे भगवान श्रीकृष्ण हे पुंडलिकाच्या सेवेने संतुष्ट होऊन त्याच्याकरिता पंढरीस आले व विटेवर ऊभे राहिले. ही गोष्ट सकळ संतांनी मान्य केली आहे.देव

पंढरपुरास वैकुंठातुन, गोकुळातुन, द्वारकेकडुन आले याबाबत वेगळे दाखले,प्रमाण मिळतात पण ते पुडलिका करिता आले ही गोष्ट सर्व संताना सारखीच सांगितलेली आहे.

दाखले :-

उदार चक्रवती। वैकुंठीचा भुपती ।। पुडलिकाचिया प्रीती । विटे उभा राहिला ।।[८]

तुकाराम महाराज या अभंगातील कडव्यातुन स्पष्ट सांगतात वैंकुठीचा राजा पुंडलिकाचिया प्रेमापोटी विटेवर ऊभा राहिला.

वैकुंठीचा देव आणिला भुतला । धन्य तो आगळा पुंडलिक ।।[९]

पुंडलिकाच्या भावार्था । गोकुळी हुनी जाला येता ।।

निज प्रेम भक्ती भक्ता । घ्या घ्या आता म्हणतसे ।।[१०]

या कडव्यातुन ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले की पुंडलिक यांच्या भावार्थापोटी भगवंत गोकुळाहुनी आला. आता तुम्ही भक्तजन ही प्रेमभक्ती तुम्ही घ्या

प्रमाण :-

द्वारकेचे केणे आले याची ठाया । पुढे भक्तराया चोजवीण ।। [११]

नागरगोडे बाळरूप । ते स्वरूप काळीचे ।।१।।

गायी गोपाळांच्या संगे । आले लागे पुंडलिका ।।२।।[१२]

नामदेवराया या संदर्भात सांगतात

युगे अठ्ठावीस विटेवर ऊभा । वामांगी रूख्माई दिसे दिव्या शोभा ।।

पुडलिका भेटी परब्रम्ह आले गा । चरणी वाहे भीमा उद्धरती जगा ।। [१३]

तसेच नेणो विठो मार्ग चुकले । उघडे पंढरपुरा आले ।।

भक्ते पुंडलिका देखिले । ऊभे केले विटेवरी ।।[१४]

याशिवाय सर्व वारकऱ्याची महाराष्ट्रातील लोकांची उद्‌घोषना, **पुडलिका वरदे हरी विठ्ठल** ही आहे याचा अर्थ पुडलिकाला वर देणाऱ्या हे हरी विठ्ठला असा संबोधन स्वरूपाचा आहे. श्री पांडुरंगाची मुर्ती संबंधी पुरावे सह खालीलप्रमाणे मांडता येतात.

१. पौराणिक

२. अंभगीय

३. शिलालेखीय

### १. पौराणिक

विठ्ठलाच्या कालाचे,मूर्तिचे जे पुरावे आहेत त्यापैकी हा एक पुरवा पौराणिक मानला जातो. नरहरी धुंडिराज मालु यांचा नवनाथ भक्तीसार हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांनीच मालुतारण नावाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहला आहे. मालुतारण या ग्रंथात त्यांनी पंढरपुरच्या स्थापनेचा इतिहास दिलेला आहे. यातील ३२ अध्यायाची सारांशची पुस्तिका पंढरपुर चे श्री वासुदेव अभंगराव यांनी प्रसिद्ध केली आहे. त्यातील माहितीनुसार शालीवहन राजाचे प्रधान रामचंद्र सोनार होय. शालीवाहनावर विक्रम राजाने स्वारी केली तेव्हा रामचंद्र प्रधानास चार कोळी सरदारांनी आपल्या सैन्यानिशी सहाय्य केले.शालिवाहन राजाने शक सुरू करून पंढरपुर वसविले. व मालकी रामचंद्रास दिली. दिंडीरवनातील अरण्य तोडून पांडुरगाचे व इतर देवळे बांधले गेले. रामचंद्राने वरील कोळी सरदारास पांडुरंग, पुडलिक, मल्लिकार्जुन, काळभैरव इ. देवाचे उत्पन्न व ४८ चाहुन जमीन बक्षीस दिले. हे बक्षीसपत्र शके सुंदर नाम संवत्सर, चेत्र शुक्ल ७ रविवार या दिवशी दिली.[१५] .

### २. अभंगीय

अभंगातुन संत लोकांनी पांडुरंग मुर्तीच्या काळासंदर्भात दाखले दिले आहे. याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.नामदेव महाराज एका अभंगातुन पांडुरंगाचा काळ सांगतात.

युगे अठ्ठावीस विटेवरी ऊभा। वामांगी रखुमाइ दिसे दिव्य शोभा ।।

यासंदर्भात ज्ञानेश्वर महाराज सांगतात की

हे नव्हे आजीकालीचे । युगे अठ्ठावीसाचे ।।[१७]

युगे अठ्ठावीस झाली । परी न बैसतो खाली ।।[१८]

तुकाराम महाराजांच्या अभंगात

युगे झाली अठ्ठावीस । अजुनी न म्हणसी बैस ।।

'युगे अठ्ठावीस'हा शब्द अष्टविंशमितमे युगे अठ्ठाविसाव्या युगी अशा अर्थाने वापरलेला आहे पंचागाच्या प्रारंभी जी माहिती दिलेली असते त्यावरून आपल्याकडील कालगणनेप्रमाणे हे

वैवस्त मनुचे अठ्ठाविसावे महायुग चालु आहे. अर्थात युगे याचा अर्थ युगी युगांत असा केला तर नामदेवाच्या आरतीचा अर्थ शक्य आहे या अभंगाच्या पुराव्यानुसार तुकाराम महाराज म्हणतात

जुनाट युगादीचे नाणे । बहुता काळाचे ठेवणे ।।

यावरून अनेक युगापुर्वीची पांडुरंग आहेत हे स्पष्ट होते. येथे एक गोष्ट स्पष्ट करावी लागते की संत मंडळींनी जे अभंग वर्णन केलेले आहे. त्यामध्ये त्यांना प्रत्यक्ष कातड्याच्या डोळ्यांना दिसणाऱ्या गोष्टी लिहतात त्यांना त्या स्वरूपाच्या आवडणाऱ्या वाटणाऱ्या गोष्टी लिहतात. त्यामुळे शब्दशः अर्थ केला तर पंचाईत होईल. हे संशोधन करताना या संताच्या लिखाणाचा संप्रदाय शुद्ध विचार करावा आणि त्यानुसार आपली अनुमाने बसवावी लागतात. तसे केले नाही तर त्यांच्या शब्दावरून काढलेली अनुमाने चुकीची ठरतील. थोडक्यात असे स्पष्ट होते की पांडुरंगाची मुर्ती ही ज्ञानदेव नामदेव पुर्वीची आहे. श्री ज्ञानदेव श्री नामदेव पुर्वीही पंढरपुरास यात्रा जमत होती. हा काळ सांगताना आद्य शंकराचार्यांचा खालील पुरावाही पाहता येतो.

महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुंन्डरीकाय दातुं मुनींद्रैः ।

समागत्य तिष्ठ न्तमानंदकंद परब्रम्हलिंगं भजे पांडुरंगम।।१।।[१९]

पांडुरंगाष्टकातील पहिला हा श्लोक आहे. या अष्टकावरून श्री मदाचार्य यांच्या काळीही श्री पांडुरंग दैवत प्रसिद्ध होत ही गोष्ट सिद्ध होते. श्री मदाचार्य यांचा काळ आठवे शतक होय. हे अष्टक शंकराचार्यांचे आहे किंवा नाही याबद्दल संशय आहे. पण हे आद्य शंकराचार्यांचे असले पाहिजे याचा पुरावा श्रीमद् आद्य शंकराचार्य यांच्या ग्रंथाचे संशोधन करून शृंगारी मठातर्फे वाणीविलास छापखान्यात त्यांच्या ग्रंथाची प्रत प्रसिद्ध झाली आहे. विभाग १८ पान ३६ वर अष्टकाचा सामावेश आहे.[२०]

### ३. शिलालेखीय

पांडुरंग मुर्ती काल ठरविण्याच्या संदर्भातील हा तिसरा पुरावा आहे. म्हणुन शिलालेख आहेत. उपलब्ध शिलालेखापैकी

१. श्री पांडुरंगाच्या मंदिरातील चौऱ्यांशीचा शिलालेख शके ११९५

२. सोळखांबीस जाताना वरच्या बाजुस असलेल्या शिळेवरील संस्कृत शिलालेख शके ११५९

३. श्री क्षेत्र आळंदी येथील हरिश्चंद्रस्वामीच्या मठात सापडलेला कोणा कृष्ण स्वामीच्या समाधीवरील शके ११३१ मधील चैत्र वद्य १० भौम वासरचा या तिन्ही शिलालेख चर्चा राजवाडे,

पांगरकर यांनी केले आहे.तिसरा शिलालेख हा सर्वांत जुना शिलालेख आहे. श्री क्षेत्र आळंदी येथील कृष्ण स्वामीच्या समाधीवर हा शक दिलेला आहे. त्यावर श्री विठ्ठल रूख्मिणी ची मुर्ती आहे. ही समाधी पंढरपुरातील नसुन श्री क्षेत्र आळंदी येथील श्रीसंत ज्ञानदेव यांच्या जन्माच्या पुर्वी साठ वर्षाची आहे. अर्थात यावरून असे स्पष्ट होते की ज्ञानदेव यांच्या कालाच्या चारशे पाचशे वर्षे तसेच श्रीमदाचार्यांनी यावर अष्टक केलेले आहे. ही गोष्ट विचारात घेऊन हे दैवत शालीवाहन शकाच्या आरंभीच दोन तीन शतकापासुन भरभराटीत असावे असे निश्चित मानण्यास कोणतेही हरकत नाही.

### श्री पुंडलिकाचा काळ

वारकरी पंथाचा काळ ठरविताना पुंडलिकाचा काल महत्वाचा आहे. पुंडलिक हा ब्राम्हण होता. तो काशीस जात असता कुक्कट स्वमीच्या आश्रमात त्यास गंगायमुना नदीचे दर्शन झाले. तेथुन पश्चात्ताप होऊ न तो पितृमातृ भक्त झाला. या त्याच्या सेवेने संतुष्ट होऊन देव त्याच्याकरिता आले. त्याने विट मागे भिरकावली व त्यावर देव ऊभे राहिले. याबाबतीत गॅझिटिअरचे लेखक यांनी चुकीचे विधान केले आहे. जानुदेव व मुक्ताबाई असे पुंडलिकाचे वडील व मातोश्री यांची अनंक्रमे नावे देऊन लेखक म्हणतात की काशीस जात असताना पुंडलिकाचा मुक्काम वैष्णव रोहिदास चांभार यांच्या घरी होता.(मुंबई गॅझेटिअर व्हॉल्युम २० सोलापुर पान ४३३ ) रोहिदास हा श्री ज्ञानदेवांच्या समकालीन आहे म्हणुन पुंडलिक हे रोहिदास चांभारच्या घरी उतरले असतील हे असंभवनीय आहे.ज्ञानदेवाच्या पुर्वी पुंडलिक होऊन गेले या संदर्भातील पुरावे या अगोदरील मुर्तीकालचा इतिहास चर्चा मध्ये झालेले आहे. यावरून हे सिद्ध होते तात्पर्य गॅझेटिअर मधील ही माहीती निराधार आहे.पुंडलिकाबाबत आणखी एक मत प्रचलित आहे. कै. गु. डॉ. रानडे व डॉ करमरकर यांनी आपल्या पुस्तकात हा कानडी संत होता असे म्हटले आहे. डॉ करमरकर म्हणतात पुंडलिक एक कानडी संत हा पंढरपुराच्या देवाचा मोठा भक्त होता. पण या संताना काल पंडित संशोधकांना अजुन निश्चितरित्या ठरविता आला नाही. या संदर्भात नवीन पुरावा नुसार पुंडलिक हा कानडी संत नाही हे फादर डलरी यांनी आपल्या निबंधात स्पष्ट केले आहे.

"The assumption made by Dr. Karmarkar and by prof. Rande that pundalik was a kannad assetic is not supported by historical evidence."[21]

यावरून पुंडलिक हा कानडी संत आहे. यास दुजोरा देता येत नाही.

**पंढरपुरचा काळ**

पंढरपुर हे पवित्र क्षेत्र म्हणुन प्रसिद्ध आहे. त्याचा उगम पुंडलिकाच्या आग्रहास्तव श्री पांडुरंग वैकुंठातुन येऊन  पंढरपुरात विटेवर उभे राहिले.तुकाराम महाराजांनी पंढरी महात्म्य सांगताना अभंग लिहलेला आहे.

भीमातीरी एक वसविले नगर । त्याचे नाव पंढरपुर रे ।।[२२]

तर भागवतात स्कंद ५ अ. १९ मध्ये भीमा नदीचा उल्लेख खालीलप्रमाणे येतो.

एता सामपो भारत्यः प्रजा नाम भिरेव पुनन्ति नामात्मना चोपस्पृशन्ति ।।

चंद्रवस ताम्रपणी अवरोवा कृतमाला वैद्यसाी कावेरी वेणी पयस्विनी शर्करावर्ता तुंगभद्रा कृष्णा वेण्या भीमारथी गोदावरी निर्विन्ध्या पयोष्णी तापी रेवा सुरसा नर्मदा चर्मन्वती सिन्धुरन्धः शोणश्च नदौ महानदी वेदस्मृती ऋषिकुल्या त्रिसामा कौशिकी मंदाकिनी यमुना सरस्वती दृषव्दती गोमती सरयु रोधस्वती सप्तवती सुषोमा शमद्रु :

चंद्रभागा मरूद्वृधा विनस्ता असिवेनी विश्वती महानदाः।।

महाभारतातही भीष्मपर्व अ.९ मध्ये खालीलप्रमाणे चंद्रभागेचा उल्लेख आढळतो.

गोदावरी नर्मदांच बाहुदा च महानदीम्।।

शतद्रु चंद्रभागांच यमुनांच महानदीम्।।[२३]

यावरून स्पष्ट होते की पंढरपुर क्षेत्र व भीमानदी ही भागवत व महाभारत रचनाकाली प्रसिद्ध असावित .पंढरपुर बाबत फादर डलरी यांनी स्पष्ट म्हटले की पंढरपुरचा सर्वात जुना उल्लेख  इ.स. ५१६ चा सापडतो.

The Oldest mention of pandharpur is in  the inseription dating as per back as 156 a.g.

हा उल्लेख असलेला ताम्रपट कोल्हापूर येथे सापडला. १९०३ च्या पंढरपुरच्या वारीचा अहवालात कलेक्टर ने म्हटले आहे. ते पुढीलप्रमाणे

Pandharpur was named after pandurang one of the names of vithoba by king shaslivahan सन ८३ मध्ये शालीवाहन राजाने पांडुरंगाच्या नावावरून पंढरपुर हे नाव रूढ केले. तात्पर्य पंढरपुर हे जुनाट क्षेत्र आहे. ती पांडुरंग मुर्ती व तिची उपासना ही पुरातन आहे.पंढरपुरचे देवस्थानचे अस्तित्व दाखविणारा उपलब्ध सर्वात जुना लेख इ.स. ५१६ च्या ताम्रपटावरील आहे. याचा उल्लेख म्हैसुर सरकारच्या इ.स. १९२९ सालच्या आर्किऑलजी खात्याच्या अहवालात आहे. या ताम्रपटात राष्ट्रकुट अविधेय राजा याने जयव्दिटू या नावाच्या ब्राम्हणास अनेवरी चाल कन्दक दुट्टुपल्ली या गावासह पांडुरंगपल्ली हे गाव दान केल्याचा उल्लेख आहे. ही गावे म्हणजे हल्लीची अनवळी,चळे, कोंडर्की व पंढरपुर होत.[२४] पांडुरंग पल्ली नाव पांडुरंगावरून पडलेले अर्थात पांडुरंगाची प्रसिद्धी त्याकाळीही होती .यावरून असे स्पष्ट होते कि ज्ञानदेवांच्या पुर्वीपासून पंढरपूर व पांडूरंग यांचे अस्तित्व होते.

## ३.२ संत ज्ञानदेव व संत नामदेव यांच्या काळातील संप्रदाय

श्री ज्ञानदेव व श्री नामदेव या जोडीचा कालखंड म्हणजे शके ११९३ ते शके १२७२ पर्यंत येतो. हा काळ वारकरी सांप्रदायाच्या इतिहासात अत्यंत वैभवशाली व सुवर्णाक्षरांनी लिहुन ठेवण्याच्या योग्यतेचा होय.

ज्याप्रमाणे का जगाचे आद्य फेडीत ।श्रीयेची राऊळे उघडीत ।

निघाला जैसा भास्वत । प्रदक्षिणे ।।[२५]

या उक्तीप्रमाणे ज्ञानेश्वररूपी देदीप्यमान दिनकर वारकरी संप्रदयाच्या क्षितीजावर उद्य पावला.

''उषःकाल संपुन'' दुरीतांचे तीमीर जावो । विश्वस्वधर्म पाहो ।[२६]

असा उद्घोत करीत माऊलीच्या रूपाने ज्ञानाचा सागर पृथ्वीतलावावर अवतरला अशा परिस्थितीत पांडुरंगाच्या अत्यंत प्रेमळ बालह्दयाच्या भक्त नामदेवाचा काळ येतो

नाचु किर्तनाचे जगी । ज्ञानदीप लागु जगी ।।[२७]

या उक्तीनुसार किर्तनाच्या माध्यमातून नामदेवानी ज्ञानदीप लावण्याचे कार्य सुरू केले भागवत धर्माची द्वारे सर्व जाती जमानींना खुली असल्याने सर्व जमातीतुन श्रेष्ठ संताची श्रेणीच निर्माण झाली. व ज्ञानदेवाच्या प्रभावलीत ही संतमंडळी येतात.या प्रभावलीत गोरोबा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, जनाबाई, चोखामेळा, व त्यांची पत्नी सोयराबाई

आणि वेश्या कुलातील कान्हुपात्रा इ. संताची मांदियाळी आपल्या अमृतमय अभंगावाणीतुन भक्तीरसाचे पाट पसरवू लागले. या सर्वांचे आद्य स्फुर्तीस्थान ज्ञानदेव। ज्ञानदेवाचे स्फुर्तीस्थान नाथसंप्रदाय. त्यांनी आपली परंपरा ज्ञानेश्वरीच्या शेवटी दिली आहेत.

क्षीरसिंधु परिसरी । शक्तीचा कर्णकुहरी ।।
नेणो कै श्री त्रिपुरारी । सांगितले जे ।।
ते क्षीरकल्लोळा आत । मकरो दरी गुप्त ।।
होता तयाचा हात । पैठे जाहले ।।
तो मत्स्येंद्र संप्तशृंगी । भग्नावया चौरंगी ।।
भेटला की तो सर्वांगी । संपुर्ण झाला ।।
मग समाधी अव्य त्यया । भोगावी वासना या ।।
ते मुद्रा श्रीह गोरक्ष राया । दिधली मनी ।।
जेणे योगाब्जीनी सरोवर । विषयविंध्व सैकवीर ।।
ती ये पदीका सर्वेश्वर । अभिशिकेले ।।
मग तिही ते शांभव । अद्वयानंद वैभव ।।
संपादिले सप्रभ । श्री गहिनीनाथ ।।
तेणे कळिकळित भुता । आला देखुनी निरूता ।।
ते आज्ञा श्री निवृत्तीनाथा । दिधली ऐसी ।।
ना आदी गुरु शंकरा । लागुनी शिष्य परंपरा ।।
बोधाचा हा संसार । जाला तो आमुते ।।[२८]

## वारकरी सांप्रदयाची परंपरा–

आदिनाथ – शक्ती – मस्तेंद्रनाथ – गोरक्षनाथ – गहिनीनाथ – निवृत्तीनाथ –ज्ञाननाथ अथवा ज्ञानेश्वर अशी गरूपरंपरा कथन करणारा एक अभंग अत्यंत महत्वाचा आहे. तो असा

आदिनाथ उमा बीज प्रगटले । मच्छिंद्र लाधले सहजस्थिती ।।
तेचि प्रेम मुद्रा गोरक्षा दिधली । पुर्ण कृपा केली गहिनीनाथा ।।
वैराग्य तापला सप्रेम निवाला । ठेवा जो लाधला शांतीसुख ।।
निद्वंद्व निःशंक विचारता मही । सुखानंद हदयी स्थिरावला ।।

विरक्तीचे पात्र अन्वयाचे सुख । येऊनी साम्यक् अनन्यथा ।।

निवृत्ती गहिनी कृपा केली पुर्ण । कुळ हे पावन कृष्णनामे ।।[२९]

या अभंगात मच्छिंद्रनाथाने गोरक्षानाथांना प्रेममुद्रा दिली व तीच पुढे गहिनीकडुन निवृत्तीनाथास मिळाल्याचे वर्णिले आहे. या प्रेममुद्रेने गहिनीनाथांचे वैराग्यानं तप्त झालेले जीवन शितळ झाले. त्यांना शांत सुखाचे वारसाने धन मिळाले. महिवर निशंकपणे हिंडत असता हृदयाचा सुखानंद ढळला नाही विरक्तीच्या पात्रात अन्वयदृष्टीची मेजवानी मिळुन अनन्यतेची समदृष्टी प्राप्त झाली. हा सर्व वारसा गहिनीनाथांकडुन निवृत्तीनाथांना मिळाला. त्यांना कृष्ण नामरूपी प्रेमभक्ती लाभुन सर्व कुळच पावन झाले. तोच वारसा ज्ञानेश्वरांनाही व त्यांच्या भावंडानांही लाभला. वारकरी पंथ हा जरी श्री ज्ञानदेव व श्री नामदेव या जोडीच्या कालाच्या पुर्वी होता पण कार्य या दृष्टीने पंथाचा आरंभ या जोडीच्या कालातच झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. देवाचा मोठेपणा एका दृष्टीने त्याच्या भक्ताच्या श्रेष्ठपणावर अवलंबुन आहे. हे श्री ज्ञानराज हे ज्ञान्यांचे चक्रवती राजे योग्यातील योगी व अनुभवियांचे शिरोमणी होते. हे जेव्हा बापरखुमादेवीवर विठ्टलाचे भक्त बनले त्यावेळी या दैवताच्या भजनास विशेष जोर वाढला. श्री ज्ञानदेव महाराज म्हणतात.

माझे जीवींची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।। १।।

पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुणी वेधिले ।।२।।

जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ।।[३०]

सर्व भावंडाचा काल असा येतो –

श्री निवृत्तीनाथ (शके ११९५)सन १२७३ ते १२९७ , श्री ज्ञानदेव (शके११९७) सन १२७५ ते १२९६, श्री सोपानदेव (शके११९९) सन १२७७ ते १२९६ व मुक्ताबाई (शके १२०१) सन १२७९ ते १२९७ ही चार अलौकीक भावंडे होती.[३१] यांच्या कुळात यांची आजी नीराबाई हीला गहिनीनाथाचा उपदेश होता.[३२]

नामदेव महाराज देखील सांगतात.

विठ्ठल आवडी ठेवियेले नाम । निराईस प्रेम गहिनीनाथा ।।[३३]

निवृत्तीनाथांच्या अल्पवयातच गहिनीनाथांचा त्यास उपदेश मिळुन ते कृतार्थ झाले.व त्यांनी आपले बंधु व बहिण यांनी कृतार्थ केले.निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांनी उपदेश मिळाला. तसेच ज्ञानेश्वरांना

नाथपरंपरेतुन योगाचा वारसा मिळाला हे ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील योगवर्णनाच्या उत्कृष्ट ओव्यावरून स्पष्ट होते.

पिडें पिंडाचा ग्रास । तो हा नाथ संकेतीचा देश ।।

तया ध्वनीनाचे केणे सोडुनी । यर्थाथाची घडी झाडुनी ।।

उपविली म्या जानोनी । ग्रहीक श्रोत ।[३४]

याचा अर्थः

पिंडाने पिंडाचा ग्रास करने म्हणजे पंचमहाभुतांनी पंचमहाभुतांचा लय करने हे नाथ संप्रदायाच्या खुणेचे वर्म आहे. ते श्री महाविष्णुंनी उल्लेखुन ठेवले. त्या सूचित केलेल्या गोष्टीची ग्रथी सोडुन, श्रोते ग्रहण करनारे आहेत हे जाणुन, मी यथार्थरुप वस्त्राची घडी उलघडून दाखविली आहे.नाथ संप्रदायात योगा बरोबर भक्तीचाही निर्झर आहे हे देखील ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे. अदिनाथापासुन नाथ सांप्रदाय प्रवर्तित झाला आहे. अदिनाथानी प्रथम शक्तीच्या कानात एकान्तामध्ये रहस्य कथन केले. हे रहस्य कोणते याचा उलगडा ज्ञानेश्वरांनी त्यांच्या अभंगात केला आहे.

जे शंभूने धरिले मानसी । तेचि उपदेशिली गिरिजेसी ।।

नाम बरवे बरवे । निज मानसी धरावे ।।

गंगोदकाहुनि निके । गोडी अमृत झाले फिके ।।

शीतळ चंदनाहुनी वरते । सुंदर सोनियाहुनी परते ।।[३५]

शिव भवानीये उपदेशी प्राणप्रीये । निजमानसी ध्याये परमानंदु पाटे ।।

रामु सखा हरी रामु सखा हरी । रामु सखा हरी रामु सखा ।।

हाच निजधर्म हेचि निजकर्म । हेचि परब्रम्ह वर्म हेचि एक ।।

जीवाचे जिवन मनाचे मोहन । सुखाचे साधन भवती ज्ञानाचे अंजन ।।[३६]

वरील अभंगाचा अर्थ थोडक्यात शंकरांनी गिरीजेस वर्ग सांगितले ते नामाचे म्हणजे भक्तीप्रेमाचे होय.तसेच ओव्यात 'अव्यत्यय समाधीचा' भोग होण्यास मत्स्येंद्रनाथांची गोरक्षास 'मुद्रा' दिली आहे असे म्हटले आहे. ती नुसती योगमुद्रा नसुन प्रेममुद्रा आहे. योगसमाधी मध्ये व्युत्थान असते. पण प्रेम समाधी सर्व व्यवहारात व जागृत्यादी सर्व अवस्थांत अखंड असल्याने तीच अव्यत्यया समाधी होय. या प्रेम समाधीतच कथा किर्तनही चालते.

ज्ञानदेवे घेतले दान । हदयी धरूनिया ध्यान । समाधी बैसला निर्वाण । कथा किर्तन करितु।।

या ओवीतुन असे स्पष्ट होते की कथा,किर्तन करणे महत्वाचे ज्ञानदेवाने घेतलेल दान आहे. त्याचा प्रचार प्रसार त्यांनी पुढे केलेला आहे. निवृत्तीनाथ ही अभंगातुन गुरूपरंपरेने दिलेले धन व त्याचे महत्व सांगतात

निवृत्ती गुरू गयनी सांगितले हरी ।

नाम चराचरी विस्तारीले ।।

निवृत्तीने कोंदले सदगुरूनी दिधले ।

हरीधन भले आम्हा माजी ।।

निवृत्ती म्हणे मज गुरूबोध दिली ।

भक्तीनाम पेटी उघडली ।।

निवृत्ती निमग्न नाम सेविताहे ।

ब्रम्हरूप होय सदोदित ।।[३७]

ज्ञानदेवांचे धाकटे बंधु सोपानदेव यांनीही उमाशंकराचे गुरूनाम सांगितले आहे. गुरूपरंपरेची परंपरा त्यांनीही सांगताना उमा शंकरापासुन सुरूवात होते असे स्पष्ट होते.

ऐसे अगाध नाम बीज ।

उच्चारी तो होय चतुर्भुज ।।

सोपान म्हणे हे गुज ।

उमाशंकर देवाचे ।।

कळिकाळाची दाटुनी नाम।

रूद्रे धरिले महाप्रेम।।

त्रिभुवनी विस्तारीले सप्रेम।।[३८]

एकनाथ महाराज देखील ही गुरूपरंपरा आपल्या अभंगात सांगतात. शंकरापासुन हे नाम मच्छिंद्रापर्यंत आले. ते नाम आहे रामनाम म्हणजे राम राम जप होय.या संदर्भात तुकाराम महाराजांची शिष्या बहिणीबाईंनी देखील गुरूपरंपरा सांगितली आहे. त्या म्हणतात..

अदिनाथे उपदेशे पार्वतीसी केला ।

मत्स्येंद्रे ऐकीला मच्छगर्भी ।।

शिवहृदयीचा पंत्र पै अगाध ।

जालासे प्रसिद्ध भक्ती योगे ।।

तेणे त्या गोरक्षा केले कृपादान ।।[३९]

या अभंगातुन बणिाबाई स्पष्ट करतात की आदिनाथाने पार्वतीला उपदेश केला तो मच्छिंद्रनाथाने मच्छाच्या गर्भामध्ये ऐकला. या शिव हृद्यातुन आलेला मंत्र अगाध असुन तो भक्तीयोग प्रसिद्ध झाला. तो गोरक्षाकडे आला. हाच प्रेम पुरक भक्तीचे ज्ञानरूपी झऱ्या निवृत्तीनाथापर्यत वाहत आल्या. निवृत्तीनाथाकडे आलेल्या ज्ञानातुनच विठ्ठलाचा संबंध झाला. नामप्रेमाने अंतरात विठ्ठलाचे रूप तयार झाले होते. हे ज्ञान निवृत्तीनाथांना गहिणीनाथांकड्डुन मिळाले. हे अभंगातुन स्पष्ट केले.

निवृत्तीचे गुज विठ्ठल सहज । गयनीराजे मज सांगितले ।।

निवृत्ती म्हणे ते रूपडे अनंत । विठ्ठल संकेत तरणो पाय ।।[४०]

अजुन एका अभंगात सांगतात......

निवृत्तीचा सखा विठ्ठलरूप देखा । निरालंब शिखा गगनोदरी ।।[४१]

निवृत्तीनाथांचे आजोबा गोविंदपंत व आजी निराई यांना गहिनीनाथांचा अनुग्रह होता. त्यांनीही गहिनीनाथांकड्डुन विठ्ठल उपासना मिळाली.[४२] नामदेवांनी या संदर्भात पुढील अभंगगात वर्णन केलेल आहे.

बैसोनी एकांती गुरूगम्य गोष्टी । वेदांत परिपाठी शास्त्रबोध ।।

नित्य शुद्धबुद्ध निर्वीकार पुर्ण । उमेसी जे ज्ञान शिव सांगे।

तेचि सच्चिदानंद साकार जिव प्राण । शरीर जाये क्षीण जयावरी ।।[४३]

वरील अभंगातुन असे स्पष्ट होते की ज्ञानेश्वर महाराजांची गुरूपरंपरा ही आदिनाथापासुन सुरू होते. आदिनाथांकड्डुन सांगितलेला ज्ञानरूपी उपदेश तो परंपरेनुसार निवृत्तीनाथ वडील बंधु गुरू म्हणुन त्यांच्याकड्डुन ज्ञानेश्वरांना मिळाला. त्यांच्या ज्ञानरूपी उपदेशात ज्ञानाचा मुख्य विषय हा पंढरपुरचा विठ्ठल स्पष्ट दिसतो. निवृतीनाथांची विटेवर असलेली विठ्ठलाची प्रेमखुण ज्ञानदेवांना दाखविली. ज्ञानदेव त्या विठ्ठलासी तेव्हापासुन रममाण झाले त्या विठ्ठलरूपासी त्यांचे तादात्म जोडले गेले. याचे वर्णन त्यांनी अभंगातुन केले आहे ते असे.

नामरूपी प्रती की ध्यानी सगुणमुर्ती ।

हेची तुझी यशकिर्ती जानोनिया ।।

हृदयी तझे रुप मुखी नामघोष। नैवद्य प्रसाद जठरी आम्हा ।।

निर्माल्य मस्तकी वंदु चरण।

हाची अच्युता तुमचे महीमा रथा।।

अखंड नाम वाचे हेची तप साचे।। तेचि स्वरुप दिले हृदयी तुझे।।

बापरखुमादेवीवरा आनंद सुखाचा वोवरा।

पाहे तंव भरला दशदिशा दुसरा न दिसे सोयरा।।

तेची गुणनाम किर्ती तेची आम्हा मुर्ती। हृदयी न विसंबे दातारा।।

येणे निवृत्तिराये खुणा दाऊनी। सकळ आता जोडलासी माहेरा रथा।।[४४]

या वरील अभंगातुन असे दिसते की श्री ज्ञानदेवांना नाथ सांप्रदयातुन विठ्ठलभक्ती मिळाली आहे. ती त्यांनी आपल्या हृदयात साठवुन ठेवली. ज्ञानदेवांना योगाचा ही अनुभव होता पण योगाचा समाधी सुखाचा अनुभवाहुन भक्तीप्रेमसुखाचा अनुभव अधिक मधुर आहे. हे त्यांना जाणवले यामुळे त्यांनी पुढील उद्गार काढले.

योगिया दुर्लभ तो म्या देखिला साजणी । पाहता पाहता मन न पुरे धणी।।[४५]

तसेच या संदर्भात ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायात म्हणतात

मी वैकुंठी नसे । भानुबिंबिही न दिसे । योगियांची मानसे । उमरडोनी जाय ।।

परी तयापाशी पांडवा । मी हरपला गिवसावा । जेथ नामघोष बरवा । करीता माझा ।।[४६]

या वरील दोन्ही संदर्भात ज्ञानदेवांनी भक्तीचा महिमा सांगितलेला आहे. अर्थात ते भक्तीपंथामध्ये पुर्ण समरस झाले. त्यांनी पंढरीच्या भक्तीपंथाचा पुरस्कार केला. पुर्वापार चालत आलेल्या या भक्तीपंथात ज्ञानदेवांनी नवीन आशय अतिशय सोप्या भाषेत व सरळ साधा मार्गाने सर्वांना रूचेल व सर्व सामान्यांना शक्य होईल असा भक्तीपंथाच्या रूपाने पुढे आणला. त्यांच्या या प्रयत्नाने पंढरी अर्थात पंढरपुर या भक्ती केंद्राला नवीन तेज प्राप्त झाले. या ठिकाणी एकत्र येऊन त्याला वारीचे भव्य स्वरूप प्राप्त झाले. यातुन मिळणारा आनंद ज्ञानेश्वरांनी लुटला व इतरांना लुटविला.

या संदर्भात ते म्हणतात...

माझ्या जिवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुंढी ।।
पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुणी वेधले ।।
जागृती स्वप्न सुसुप्ती नाण्वे । पाहता रूप आनंद साठवे ।।
बापरखुमादेवीवरू सगुण निर्गुण । रूप विटेवरी दाविली खुण ।।[४७]

पंढरपुर म्हणजे फक्त प्रेमरूप आहे. तेथे जमणारे सर्व प्रेमपिसे असतात. तेथे येणाऱ्या मध्ये ऐक्य आहे. ते ऐक्य निर्माण करतात. ऐक्याची जोपासना करतात. हे सर्व प्रमाने सहज शक्य होत.हे पंढरपुरच्या विषयी भक्तीची निर्माण केलेली स्थिती आहे. पंढरीनाथाकडे पंढरपुराला जाणाऱ्या या पंढरीच्या वारकऱ्यांचे ज्ञानदेवांनी कौतुकाने वर्णन केले आहे.

कुंचे पातकाचे भार । आले वैष्णव डिंगर ।
भेणे पळती यमकिंकर । नामे अंबर गर्जतसे ।।
आले हरिदासाचे थाट । कळिकाळा नाही वाट ।
विठ्ठल नामे करिती बोभाट । भक्ता वाट सापडली ।।
टाळ घोळ चिपळीया नाद । दिंडी पताका मकरंद ।।
नाना बागडींयांचे छंद । कवच अभेद नामाचे ।।
वैष्णव चालीले गर्जत । महावीर ते अद्‌भुत ।।
पुढे यमदुत पळत । पुरला अंत महादोष ।।
निवृत्ती संत हा सोपान । महावैष्णव कठीण ।।
मुक्ताबाई तेथे आपण । नारायण जपतसे ।।
ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठलाचे मुक्त पेठा ।।
स्नान दान घडे श्रेष्ठ । वैकुंठ वाटा संत गेले।।[४८]

या वर्णनात ज्ञानदेव म्हणतात. तत्कालीन वारीस येणाऱ्या वारकरी नाचत बागडत भजनात रंग नाचणारे टाळ, विणा चिपळ्यांच्या नादात विठ्ठल नामात तल्लीन होणाऱ्या प्रेमळ वारकऱ्यांचे दर्शन दिसते. ज्ञानदेवांच्या काळात पंढरपुर हे महाग्राम झाले होते. महा हा शब्द पावित्र्यदर्शक आहे. ज्ञानदेवाच्या विभुतीमत्वामुळे व वाङमयामुळे या पंढरपुर क्षेत्राचे महात्म्य वाढीस लागले. ज्ञानदेवांचा

काळ हा यांदवांच्या राज्यांचा काळ होय. या संदर्भांत ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी या संदर्भात असे म्हंटले आहे की

तेथ यदुवंशु विलासु । जो सकळकळा निवासु । न्यायाती पोषी क्षीतीषु । श्री रामचंद्र ।।[४९]

तसेच या राज्याचा श्री करणाधीप हेमाद्री होता. या हेमाद्रीने चतुर्वर्ग चिंतामणी या ग्रंथात वारकरी पंथाचे महत्व वाढु लागले होते असे लिहीतात.

रामदेवरायास ज्ञानदेवांनी न्यायाचा पोषण करणारा असे म्हटले आहे.तर रामदेवरायांच्या कार्याच्या बाबतीत प्रा वाफगावरकर लिहतात की इ.स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी लिहली गेली. त्याच्या दोन तीन वर्षे अगोदर रामदेवाने काशी मुक्काम करून तेथे शार्ङगधर मंदीर उभारले होते. यावेळी नेवासे येथे ज्ञानेश्वरी लिहली जात होती. त्यावेळी काशी प्रत्यक्ष रामदेवाच्याच ताब्यात होती. म्लेच्छाक्रांत काशी मुक्त करणाऱ्या रामदेवाच्या अभुतपुर्व पराक्रमामुळे ज्ञानेश्वरांना ज्ञानेश्वरीत त्यांचा गौरव करावसा वाटला. तसेच रामदेवराय ज्ञानेश्वरांना विठ्ठलाचा पांढरीफडमुख्य असल्याचे ११९४ च्या पांडुरंगाच्या देवळातील चौऱ्यांशीचा शिलालेख सांगतो. राजांनी यादवकाळात हिंदु धर्माचे पुनरूज्जीवन व व्रतकैवल्यदिकांची पुनर्व्यवस्था करण्याचे काम वाजांनी व तत्कालीन संतानी केले. अशा परिस्थीतीत दुसरीकडे जैन महानुभव व लिंगायत सांप्रदयाचा प्रसार होऊ लागला होता. बौद्ध धर्माचा प्रभाव कमी झाला होता.बौद्धाच्या मानाने जैनांनी आपले बस्तान चांगले बसविले होते. जैन पंथापैकी श्वेतांबराचे गुजरातमध्ये व दिगंबराचे कर्नाटकात अनेक शतके धार्मिक वर्चस्व होते. याचा परिणाम महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ, कर्नाटक जवळील सांगली, कोल्हापुर भागात अनुक्रमे श्वेतांबर व दिगंबर जैनाचे कार्यक्षेत्र बनले होते.

एलिचपुरसारखीच दक्षिणेला कोल्हापुर नेर सारखी जैनाची तीर्थक्षेत्र महाराष्ट्रात होती.[५०]

याचबरोबर याच काळात जैन धर्माबरोबर स्पर्धा करणारे लिंगायत व महानुभव हे पंथ होते. बाराव्या शतकाच्या मध्यावर बिज्वल कलचुरीच्या कारकीर्दीत बसवेश्वराने वीरशैव पंथाची संघटना निर्माण केली. तेव्हापासुन कर्नाटक प्रांतात वीरशैवाचे प्राबल्य वाढत गेले. तेच लिंगायत यांनी जैनधर्मावर जोराचा हल्ला चढविला. महाराष्ट्रात याच काळात जेवढा भाग दक्षिणेतर जैनांनी व्यापला होता तेवढ्याच भागात वीरशैव धर्मप्रवक्त्याचे धर्मप्रचाराचे काम चालु होते याचे कारण म्हणजे असे जाणवते की दिंगंबर जैन आणि वीरशैव या दोन्ही पंथांनी आपला धर्म प्रसाराची भाषा कानडी स्विकारली होती. बसवेश्वर नंतर शंभर वर्षाच्या आत चक्रधरने महानुभाव पंथाची स्थापना केली.

त्याने आपल्या मत प्रचाराची भाषा मराठी स्विकारून जैन विरोधी आघाडी उघडली. त्यामुळे श्वेतांबराच्या धर्मप्रसाराला आळा बसला. विदर्भापासुन ते फलटणपर्यंत बहुतांश महाराष्ट्रातील सर्व भागात महानुभव पंथाचा प्रसार झपाट्याने झाला.यादवकाळातील धार्मिक परिस्थीती पाहता ज्ञानदेवांनी केलेल कार्य अलौकीक आहे. त्याचे कारण वरील परिस्थीतीत इतर पंथाचा प्रभाव महाराष्ट्रभर असताना वारकरी सांप्रदयाचा प्रसार झाला. ते म्हणजे ज्ञानदेवांच्या ठिकाणी असलेला अद्वयानंदानुभव  योगाचे व प्रेम भक्तीचे परिणत स्वरूप दलितोधारची कारूण्यबुद्धी व बोलीभाषेत ग्रंथरचना करण्याची प्रेरणा या सर्व गोष्टी नाथ सांप्रदयाकडुन मिळालेल्या वारशाचे द्योतक होय.हा सर्व वारसा घेऊन स्वतःच्या विशाल प्रतिभेने त्यांनी वारकरी सांप्रदयाची पायभरणी केली.पांरपारीक वैदिक धर्माच्या पुनरूज्जीवनाच्या प्रयत्नातील पुरोगामित जैन धर्मातील निरीश्वशवादिता व अहिंसेबद्दल संकुचित व विपरीत कल्पना लिंगायत पंथातील एकांगी शिवोपासना महानुभव पंथातील मानवी जिवानास शुल्क करणारी अतिरेकी विरागता या सर्व गोष्टीची जाणीव व ज्ञान त्यांना होते. तसेच वैदीक धर्माची विकसनक्रीया वेद उपनिषदे गीता भागवत धर्मग्रंथातुन होताना ज्ञानेश्वरांनी पाहिली. त्यांनी वैदीक धर्मातील अनावश्यक व जीर्ण भाग बाजूला सारुन त्यांनी गाभ्यास हात घातला. त्यानी भागवत धर्मात प्रगट झालेले सार रुप स्वरुप वारकरी सांप्रदायाद्वारा स्पष्ट केले.या संदर्भात नामदेवरायानी वर्णन केलेः..

काठेनिया गुह्य वेद केले फोल । आठवती बोल मनामाजी ।।

याचा अर्थ असा की वेद फोल केले म्हणजे  परंपरेतील सारभुत अशी भक्तीप्रेमधर्माची गोष्ट स्विकारुन अन्य गोष्टी बाजुला काढल्या. अर्थात ज्ञानदेवाची ही वारकरी संप्रदायाचा पाया संघटात्मक रचण्याची कामगीरी खालील चार स्वरुपात सांगता येते.

अ) सुसंगत व तर्कशुध्द तत्वज्ञान

ब) सूक्ष्म नीतीमीमासा

क) धार्मिक अनुभवांचे मूल्यमापन

ड) लोक जागृती

### अ) सुसंगत व तर्कशुध्द तत्वज्ञान

ज्ञानदेवानी वारकरी संप्रदायाची संघटना उभारतांना संप्रदायला अनुकुल व सामान्यापर्यत पोचणारे व त्यांना समजेल व रुचेल व सुखाचा शोध घेता येईल असे तत्वज्ञान

स्विकारले. तत्वज्ञान हे धर्माचा पाया असतो. जडवादी तत्वज्ञानामध्ये असे येते की ईश्वरच नाही,धर्म व नितीस मानवी जिवनात स्थानच राहत नाही. मग भक्ती कोणाची करायची. जडवादी तत्वज्ञानात यथेच्छ इंद्रिय सुखांचा उपभोग हेच ध्येय असते. त्याच नितीचा मार्ग येथे स्विकारला जातो.या तत्वज्ञान विरोधाचे दुसरे तत्वज्ञान म्हणजे चिद्वाद तत्वज्ञान एक चैतन्यच खरे व इतर सर्व दृश्यजात मिथ्या म्हणजे खोटे मानले जाते. त्यामुळे सर्व दृश्य जगाचा त्याग करण्याचा मार्ग अवलंबला जातो. भोगवादाचे एक टोक तर त्यागवादाचे दुसरे टोक ज्ञानदेवांनी दोन्हीमधील साधा,सोपा,सुर्वणमध्य साधून चिद्वीलास तत्वज्ञानाची मांडणी केली. व त्याच दृष्टीवर भक्ती पंथाची उभारणी केली. ज्ञानदेंवानी चिद्विलास या तत्वज्ञानाचे विवरण त्यांच्या अमृतानुभव या ग्रंथात केले आहे. सांख्यांचा द्वैतवाद,बौद्धांचा विज्ञानवाद व शुन्यवाद. केवलाद्वैतीचा अज्ञानवाद यांचे खंडण करून स्वाभिप्रेत चिद्विलासवाद त्यांनी मांडला. ज्ञानेश्वरीत देखील हे तत्वज्ञान त्यांनी मांडले. तसेच चांगदेव पासष्टीत सिद्धांतरूपाने हे तत्वज्ञान मांडले आहे.

### ब ) नीती–मीमांसा

निति हा धर्माचा व तत्वज्ञानाचा कणा मानला जातो. नीतीशिवाय धर्म व तत्वज्ञान हे पांगळे होते.नीतीविहीत तत्वज्ञान हे शुल्क व अहंकारी पांडित्य होय. अशा नितीशुन्य दंभाचारावर व कोरड्या शब्दपांडित्यावर ज्ञानेश्वरमहाराजासह सर्व संतांनी खंडण करून टिका केली आहे. मानवी जीवनात नीतीला या श्रेष्ठ स्थान असल्यामुळे व्यक्तीच्या व समाजाच्या नीतीमत्तेचा व सद्गुणाचा विकास व्हावा या कळकळीने ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायात उत्कृष्ट नीती मीमांसा केली आहे. तर डॉ. रा.द.रानडे यांनी ज्ञानेश्वरी वचनामृत या ग्रंथात म्हटले आहे ज्ञानेश्वरांनी ठिकठिकाणी आपल्या ग्रंथात अत्युत्तम नीती मीमांसा सांगितली आहे.ज्ञानेश्वरीतील अध्याय १३ वा हा नीतीमीमांसाचा एक एक आकार आहे.[५१] ज्ञानेश्वरांनी उपमा,उदाहरणे व दृष्टांत देऊन विषय माणसाच्या हृदयापर्यंत पोहचण्याची शैली या नीतीमीमांसेत दृष्टीस पडते.गीता या ग्रंथात अमानित्व अदांभित्व अहिंसा अशा गुणांची यादी दिली आहेत. यावर ज्ञानेश्वरांनी स्वातंत्र्य सद्गुण घेऊन त्यावर व्याख्यानाच्या रसिकांसमोर रक्तमांसमय आदर्श पुरूषच उभा केला आहे.

### क ) धार्मिक अनुभवांचे मुल्यमापन

धर्मात अध्यात्मात ईश्वर प्राप्तीचे अनेकांनी वेगवेगळे मार्ग,उपाय ,उपासना व साधने सांगितली आहे.तसेच परमार्थिक ध्येयाबद्दल प्रत्येक विचार सरणीत वेगळेपणा दिसतो. या

मतभिन्नतेमुळे साधकांच्या मनात संभ्रम निर्माण होतात. हा संभ्रम दुर होऊन एक ध्येय मार्ग ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत अभगवाणीत साध्यचिकीत्सा व साधन चिकीत्सा केली आहे. मानवी जीवनाचे परमश्रेष्ठ ध्येय मोक्ष नसुन भक्ती हे आहे. मोक्ष हा चतुर्थ पुरूषार्थ आहे.तर त्याहुन श्रेष्ठ भक्ती पंचम पुरूषार्थ म्हटला आहे. ते म्हणतात

चहुपुरूषार्थ शिरी भक्ती जैशी[५२]

ज्ञानेश्वरीत कर्ममार्ग, ज्ञानमार्ग, योगमार्ग व भक्तीमार्ग याचे वर्णन केले आहे. हे वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी मुल्यमापन करून साधन मार्गाने ते अनुभवापेक्षा भक्तीचा अनुभव श्रेष्ठ आहे. हे दाखविले आहे. भक्ती हेच साधन व भक्ती हेच साध्य विशद केले आहे. याच बैठकीवर वारकरी सांप्रदयाची उभारणी झाली आहे.

## ड) सांप्रदायिक संघटन

ज्ञानदेवांनी पुर्ण विचार करून व पुर्ण अनुभव घेऊन भक्ती मार्गाने ईश्वर प्राप्ती होण्यासाठी वारकरी सांप्रदयाची संघटना केली.ही संघटना म्हणजे इतर अन्य संघटना प्रमाणे नव्हे आपल्या आथांग प्रेमानुभुतीने अलौकीक व दिव्य असा व्यक्तीमत्वाने त्यांनी जनता आपल्याकडे ओढली व त्या ओढीवरच अकृत्रीम संघटना उभारली.व त्यामार्गे पंढरीच्या विठ्ठलासी यांनी प्रेम अनुभविले व पंढरी नगरीसह सर्व समाजावर प्रेमानुभुतीचा वर्षाव केला. ज्ञानदेव महाराज म्हणतात....

जिवाचिया जीवा प्रेम भावाचिया भावा[५३]

त्याचे श्री नामदेवांशी सख्य जोडले वारीच्या प्रथेस उत्साहाने उत्तेजन दिले. दिंडीसोहळ्यांचे कौतुक केले.त्याचे वर्णन असे करतात

नामे रूपदंत नाचत रंगणी प्रेम विठ्ठल चरणी[५४]

कुचे पताका झळकती । टाळ मृदंग वाजती ।।[५५]

टाळघोळ चिपळ्या नाद । दिंड्या पताका मकरंद ।।

नाना बागडियांचे छंद । कवच अभेद्य नामाचे ।।[५६]

ज्ञानदेवांनी वारकरी एकत्र करून प्रेमपुर्वक प्रेमरूपाने वारकरी संघटना निर्मान केली हे स्पष्ट होते.

**नामदेव महाराज**

ज्ञानदेव व नामदेव हे समकालीन विठोबाचे भक्त व वारकरी सांप्रदयाचे संघटक होते. दोघेही एकमेकांचे जिवलग. या दोघांचा संगम म्हणजे ज्ञानाचा व भक्तीचा संगम होय. नामदेवांचा जन्म पंढरपुरात शके ११९२–सन १२७० कार्तिक शुद्ध एकादशीला झाला. ते बालपणापासून पंढरीरायाचे लडिवाळ लेकरू होते. पांडुरंगाच्या आज्ञेवरून ज्ञानदेवांचे शिष्य विसोबा खेचर यांचा अनुग्रह घेतल्यानंतर त्यांची भक्ती अधिक सखोल व व्यापक बनली त्यांच्या प्रेमळपणा व सगुण प्रीती अधिक उत्कृष्ट बनली. ज्ञानदेव ज्ञानी व योगी होते. तरी ते विठ्ठलाच्या प्रेमभक्तीत रंगलेल असल्याने त्यांनी प्रेमळ नामदेवास बरोबर घेऊन उत्तरेस तीर्थयात्रेच्या निमित्ताने जाऊन प्रेम भक्तीचा आनंद लुटला याचे वर्णन ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत केले आहे.

किर्तनाचेनी नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे ।।
जे नामची नाही पापाचे । ऐसे केले ।।
यमदम अवकळा आणिली । तीर्थ ठाया वरूनी उठविली ।।
यमलोकीची खुटली । रहाटे आघवी ।।
यम म्हणे काय यमावे । दम म्हणे कवणाते दमावे ।।
तीर्थ म्हणती काय खावे । दोष औषधांसी नाही ।।
ऐसे माझेनी नाम घोषे । नाहीची करीती विश्वाची दुःखे ।।
अवघे जगाची महासुखे । दुमदुमीत भरले ।।
कैसे माझ्या गुणी घाले । देश काळ ते विसरले ।।
किर्तन मुखे सुखावले । आपणापंची ।।[५७]
जैशी कमळ कलीका धालेपणे । हृदयीचिया मकरंदा राखो नेणे ।।
दे राया रंका पारणे । अमोदाचे ।।
तैसीच माते विरवी कथित । कथितेने तोषे बधु विसरत ।।
मग तया विसरामाजी विरत । अंगे जीवे ।।[५८]

यावरील ओवीद्वारे ज्ञानदेवांनी किर्तन रंगाचे वर्णन करताना किर्तनाचे पापाचे नाश कसा होता ते सांगितले. या भक्तीचा आनंद नामदेवांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला व उधळला.ज्ञानदेंवाच्या बरोबर नामदेवराय उत्तर भारतात तिर्थटन करताना किर्तन रंगाच्या द्वारे विठ्ठल भक्ती व वारकरी

सांप.दयाची पताका फडकली. ज्ञानदेवाच्या समाधीनंतर  नामदेवराय हे ५४ वर्षे हयात होत. ते दुसऱ्यांदा पुन्हा उत्तर भारतात जाऊन त्यांनी विठ्ठल भक्तीची स्वातंत्र परंपरा सुरू केली. ज्ञानदेवांच्या समाधीनंतर शके १२४८ सन १३२६ या सुमारास गुजरात, राजस्थान व पंजाब या भागात प्रवास केला. पुर्व पंजाब गुरूदासपुर जिल्ह्यातील अमृतसर पासुन काही मैलावर असलेल्या घुमान या गावी काही वर्षे वास्तव्य केले. या काळात ही इस्लामी आक्रमणाचा धुमाकुळ ही सर्वत्र चालु होता. असा प्रतीकुल परीस्थीतीत ही नामदेवांनी भागवत धर्म प्रचाराचे कार्य नेटाने चालु ठेवले. किर्तनद्वारे धर्म प्रचार केला. उत्तर भारतीय हिंदी भाषेत त्यांनी पद्मरचना करून तेथील समाजाला साठी ज्ञान खुले केले. या पद्मरचनेपैकी ६१ पद्यांचा सामावेश शिख धर्माचा ग्रंथसाहेब या ग्रथांत गुरू अर्जुनसिंगानी केला आहे. सुमारे १०० वर्षानंतर शीख धर्माचा उद्‌य पंजाब प्रांतात झाला. त्यापुर्वी वारकरी सांप्रदयाच्या तत्वज्ञान उत्तर भारतात नामदेवांनी पोहचवले होत.घुमान या प्रांतातील वास्तवात नामदेवांचे अनेक शिष्य झाले. त्यापैकी प्रमुख–

१. विष्णुस्वामी – हे मथुरा वृंदावनाकडील ब्राम्हण होते.

२. बहोरदास – हे पंजाबी शिंपी होते.

३. जाल्लोसुतार – हे भटीवाल येथील सुतार होते.

४. लध्धाखत्री – हे घुमान जवळच्या सखोवाल गावी राहत व किराणा वस्तुचा व्यापार करत

५. केसोकालाधारी – हे पंजाबी ब्राम्हण हे गुरूदासपुर जिल्ह्यातील तारा या गावी राहत.यांच्याबाबत नामदेवाच्या कृपेने असाध्य रोगाने मुक्त झाल्यावर ते नामदेवांच्या जवळ जाऊन राहु लागले.[५९]

हे पाचही शिष्य म्हणजे नामदेवांनी निर्माण केलेले  समाजातील जातीचे ऐक्य रूप होय.कोणताही भेदभाव भागवत धर्मात नसुन भकती करणाचा अधिकार सर्वांना आहे. ही भावना कार्यात उतरवली होती.त्याचे हे उदाहरण होय.आज बहारेदासाचे वंशज घुमानच्या नामदेव मंदिराची व्यवस्था पाहतात. तर जाल्लोसुतार  हा पंढपुरास नामदेवरायाबरोबर आला व एकनिष्ठ वारकरी बनला. भटिवाल येथे त्याचे स्मारक बनवले आहे. लध्धाखत्रीचे स्मारक सखोल येथे आहे. केसोकालाधारी बहाल संस्थानाथ केसोकलाधारी की गद्दी या नावाने प्रसिद्ध आहे. घुमान  येथे नामदेव रायांचे मंदिर त्यांच्या कार्याचे स्मारक म्हणून उभारण्यात आले आहे. तेथे दरवर्षी माघ शु.२ ला मोठी यात्रा भरते. तर माघ शु. ५ ला नामदेवांचा जन्म दिवस मानला जातो. शिंपी, हिंदू व

शिख एकत्र येतात. पंजाबमधील बहुतेक शिंपी नामदेव संप्रदायी आहेत, त्यांना चिंम्बा असे म्हटले जाते. हे लोक शिखाप्रमाने लांब केस ठेवतात. ते हातात कड घालतात. केसात फणी किंवा कंगवा ठेवतात. कछ म्हणजे लहान विजार वापरतात. विशेष ते जवळ हत्यार बाळगत नाहीत. गळ्यात तुळशीच्या माळा घालतात व एकादशी व्रत करतात. तसेच रामनवमी, गोकुळअष्टमी, नामदेवांची जयंती व पुण्यतिथी यांचे उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरे करतात.पंजाब व राजपुताना या दोन्ही प्रांतातील सर्व शिंपी संत नामदेव यांचे अनुयायी असल्यामुळे या दोन प्रांतातील नामदेव सांप्रदायातील मंडळींनी शेकडो मंदीरे अर्वाचीन काळी बांधली आहे. पंजाबात सुमारे २०/२५ खेड्यात मिळुन नामदेवांचे मंदीर असे प्रमाण येते. तर राजपुतन्या मोठमोठ्या शहरात सर्वत्र नामदेवांचे मंदीरे आहेत. काही मंदीरे खाजगी तर काही सार्वजनिक आहे. अर्थात राजपुतना व पंजाब या दोन प्रांतातील नामदेव सांप्रदायिक लोकांचे घोमान म्हणजे उत्तरेकडील पंढरपुर म्हटले जाते. हरीद्वारापासुन थोड्या अंतरावर ज्वालापुर नामदेवांचा मठ आहे. पंजाबात लाहोर, अमृतसर, गुरूदासपुर, लायलपुर, जालंबर, लुधियाना, अंबाला, रोघेतक, भिवानी, हीसार या ठिकाणी तर राजपुतन्यात जयपुर जोधपुर बिकानेर आणि अलवर येथे संत नामदेव यांचे सार्वजनिक व मोठी मंदीरे आहेत.[६०] तसेच नामदेव महाराजांनी वारकरी सांप्रदयाचा प्रसार असाच वाढत ठेवण्यासाठी अखील भारतीय यात्रा चालु ठेवली त्यांनी एकंदर पाच मोठ्या तीर्थयात्रा केल्या. महाराष्ट्रातुन कर्नाटक कडे नंतर म्हैसुर तमिळनाडु रामेश्वरपर्यंत गेले. हे दक्षिणेकडील यात्रा त्यांनी केल्या. तर उत्तरेकडील गुजरात, सौराष्ट्र, सिंधूप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश व पंजाब येथे पर्यंत त्यांनी भक्तीप्रचार केला. तामीळनाडुपर्यंत ते पोहचले यांची माहिति अर्कोट जिल्ह्यातील सेन्सस रिपोर्ट मध्ये मिळते. तामिळनाडु राज्यातील घिपिगा भूसागर आणि मल्ला या जमातीवर त्यांचा प्रभाव पडला. ते स्वतःस नामदेव म्हणु लागले.[६१] एकंदरीत भारतातील बहुतांशी भागात भक्ती जवळ नामदेवांनी पोहचवली. तिचे मोठे महत्व वाढविले. आजही या भागात भक्ती व वारकरी सांप्रदायाचे तत्वज्ञान जागृत आहे. पंजाबात व उत्तरभारतात नामदेवरायांनतर १०० वर्षांनी शिख धर्माचा उद्य झाला. शिख धर्म ग्रंथात ग्रंथसाहेबात नामदेवांचे ६१ पदे सामाविष्ट केलेली आहेत यावरून स्पष्ट होते की नामदेव महाराजांनी सांगितलेली तत्वज्ञान व त्या काळातील व पुढील काळातील समाजासाठी निश्चित अनुकूल आहेत. त्याचे तत्वज्ञानाने प्रभावित होऊन शिंपी समाजाबरोबर टाक, क्षत्रिय, श्रीपा, दर्जी, जस्सल, तोप्मी असे कितीतरी दलीत उपेक्षित समाज त्यांच्या विषयी

श्रद्धा बाळगुन संत नामदेवरायांनी आपल्याला जीवन जगण्यासाठी प्रतिष्ठा मिळवुन दिली. असा त्यांचा भाव आहे.[६२] अर्थात नामदेवांची भक्ती व वारकरी तत्वज्ञान समाजात आत्मविश्वास जागृती ऐक्य भावना निर्माण करून जगण्याची ताकद निर्माण करणारे आहेत हे स्पष्ट होते. त्यांच्या या उत्तर भारत यात्रेमुळे त्यांचा प्रभाव त्यावेळी व त्यांच्यानंतर कबीर नानकादी थोर महात्म्यावर ही पडला होता.[६३] नामदेवांच्या पंजाबमधील कार्याचे विशेष सांगायचे म्हणजे ग्रंथसाहेबातील ६१ पंद्यापैकी काही विठ्ठलाचा उल्लेख आहे.

उदा. इभे बीठलू उभे विठलू बोल बिनु संसार नाही

नामेची सुहाभी विठ्ठले जिने तीनै जरिआ

मेरे बापू माधरू तू धनू कैसे सावळा बिठूलाई ।।

नामदेव हे बालभक्त होते. खेचर हे गुरूपासुन ज्ञान मिळाले तरी ते ज्ञान जिरवुन ते अखेरपर्यंत बालच राहिले. ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर त्यांनी असे उद्‌गार काढले नाथा नकोरे अंतरू । तुझ्या कासेचे वासरू ।।[६४] यावरून ते बालहट्टी होते असेही दिसते. उत्तरेतील कार्य संपुन परतल्यावर पंढरपुरात व महाराष्ट्रात त्यांनी किर्तनाच्या माध्यमातुन ज्ञानाचा रंग ओघळला. पंढरीचे व वारकऱ्यांचे कौतुक व वर्णन त्यांनी पुढीलप्रमाणे केले.

ऐसे तीर्थ कोणी दारववा गोमटे ।

जेथे प्रत्यक्ष भेटे परब्रम्ह ।।

नामा म्हणे आम्हा दोनांचे माहेर ।

धन्य पंढरपुर गीती गान ।।[६५]

नामदेवांच्या काळात पंढरीच्या वारीचा सोहळा अधिकच वाढत चाललेला होता. गावोगावांचे वैष्णव वारकरी दिंड्या पताका घेऊन पंढरपुरात अधिकच आनंदाने येऊ लागले. या सोहळ्यांचे वर्णन ही नामदेवांनी केले.

कार्तिकी एकादशी ।पोटा मिळाला पंढरीशी ।।

तेथील महिमा वर्ण कैसी । ब्रम्हादिकांनी न वर्णावे ।।

दिंड्या गरूडटक्यांचे भार । वैष्णव नाचती जयजयकार ।।

मृदंग वाजती अपार । नादे अंबर गर्जतसे ।।[६६]

आषाढी कार्तिकी वारीचे दिवस म्हणजे सुगीचेच दिवस होत.

आषाढी कार्तिकी हेची आम्हा सुगी ।

शोभा पांडुरंगी घनवटे ।।

संताची दर्शन हेचि पीक जाण ।

देता अलिंगन देह नीमे ।।[६७]

नामदेवरायांनी आपल्या किर्तनातुन देवाच्या ह्दयातील गुज बाहेर सांगतात.

देव गुज सांगे पंढरीसी यारे ।

प्रेम चित्ती घ्यारे नाम माझे ।।[६८]

नामदेवांचे भागवत धर्म व वारकरी सांप्रदयाचे विस्ताराचे कार्य पूर्ण झाल्यावर त्यांनी पांडुरंगास आपल्या चरणासानिध्य समाधी देण्याबद्दल विनंती केली. देवांनी नामदेवांनी आपल्या चरणाजवळ स्थान दिले. यांचे वर्णन नामदेवाचे पुत्र गोदा यांनी केले.

आवडला नामा देवा विठ्ठलासी । ठेवी चरणापाशी अखंडित ।।

नामयाची कुडी घातली पायरी । येता जाता हरी पाय देती ।।

आणीकही पाय देती साधुसंत । ऐसा पुर्ण भक्त उद्धरीला ।।[६९]

नामदेवांचे समाधीस्थान पंढरपुरात ‘नामदेवांची पायरी’ म्हणुन प्रसिद्ध आहे. वारकरी संत मंडळी यांचे चरण लागावेत त्यांचा सहवास नेहमी राहावा म्हणुन त्यांनी पायरीला आपली समाधी घेण्याची इच्छा केली होती. ही इच्छा त्यांनी आपल्या अभंगात व्यक्त केली आहे. आज ही अभंग पंढरपुर येथे महाद्वारात नामदेवाच्या पायरीजवळ दिंडी आली म्हणजे म्हटला जातो.

वर्तन आमचे मिरासी पंढरी । विठोबाचे घरी नांदणुक ।।

सेवा करू तेथे नित्य महाद्वारी । नामाची उजरी जागवुन ।।

साधुसंता शरण जाऊ जीवेभावे । प्रसाद स्वभावे देती घेती ।

नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे । संत पाय हिरे वर देती ।।[७०]

ज्ञानदेव व नामदेवांनी भागवत धर्माची अथवा वारकरी पंथाची द्वारे स्त्री पुरूषांना अबालवृद्ध व सर्वं जमांतींना उघडी असल्याचा उद्‌घोष केला. देवाच्या दरबारात कोणी उंच नाही,कोणी निच नाही ह्दयात भक्तीप्रेम असणारे सर्वच देवाचे लाडके असतात. असे स्पष्ट केले त्यामुळे त्या काळात सर्व जमातीत संत निर्माण झाले. ज्ञानदेव व  नामदेव यांचा काळ अनेक दृष्टीने मोठा अपुर्व होता त्यांच्यानंतर जी संत मंडळी निर्माण झाली त्यास सर्व जातीतील आहेत. हे त्यांनी केलेल्या

कार्याची पावती आहे. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई ,विसोबा खेचर, परिसा भागवत हे ब्राम्हण तर ढोकीचे गोरोबा हे कुंभार, अरणचे सावता हे माळी, मंगळवेढेची कान्होपात्रा हे वेश्येची कन्या,नामदेव हे शिंपी जनाबाई ही दासी, चोखोबा राका बंका हे महार, रोहिदास हे चांभार,तर नरहरी हे सोनार होते. सर्व संतमंडळींनी अभंगरचना केली. या रचनेत वारीचे दर्शन घडते.

जनाबाई वर्णन करते

संत भार पंढरीत । किर्तनाचा गजर होत ।।[७१]

कान्होपात्रा वर्णन करते

माझे माहेर पंढरी । सुखे नांदु भीमातीरी ।।
येथे आहे माय बाप । हरे ताप दुरूशने ।।[७२]

गोरोबा काका वर्णन करतात

म्हणे गोरा कुंभार मौन्य सुख घ्यावे । जिवे ओवाळावे नामयासी ।।
म्हणे गोरा कुभार जिवनमुक्त होणे । जग हे करणे शहाणे बापा[७३]

नरहरी सोनार हे तर आषाढी व कार्तिकेला महापर्वच आहे असे म्हणतात..

पंढरी नगरी दैवत श्रीहरी । जाती वारकरी व्रतनेमे ।।
आषाढी कार्तिकी महापर्वे थोर । भजनाचा गजर करती तेथे ।। ,
साधुसंत थोर पताकांचा भार । मुखी तो उच्चार नामामृत ।।
आनंदाचा काला गोपाल काला । ह्द्यी बिंबला नरहरी ।।[७४]

सावता माळी वर्णन करतात

शांती शेवंती फुलली । प्रेम जाई जुई व्याली ।
सावताने केला मळा । विठ्ठल देखियेला डोळा ।।[७५]

पंढरीच्या वारीस जाण्यास केवढा आनंद वाटतो . सेना न्हावी सांगतात

जाता पंढरीशी सुख वाटे जीवा । आनंद केशवा भेटताची ।।
या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी । पाहिली शोधुनी अवघी तीर्थे ।।
ऐसे नामघोष पताकांचे भार । ऐसे वैष्णव डिंगर दावा कोठे ।।
सुखे घाली जन्मासी । हेची बरे का मानसी । ।
वारी करीन पंढरीची । जोडीही माझी संताची ।।[७६]

चोखामेळा यांचे सर्व कुटुंबच अभंग गातात. त्यांची पत्नी सोयराबाई बहिण निर्मला मुलगा कर्ममेळा व मेहुणा बंका हे सर्वच विठ्ठल भक्तीत मग्न झाले होते.

चोखामेळा नामदेवास गुरू मानत

चोखा म्हणे धन्य नामया तु गुरू । फेडीला आधारू जिवीत्वाचा ।।
चोखा म्हणे तुम्ही माय हो माऊली । कृपेची सावली ज्ञानदेव ।।
आवडीचे प्रेम नामया लाधले । ते आम्हा पावले जन्मोजन्मी ।।[७७]

पंढरीची वारी म्हणजे प्रेमसुखाचा सोहळा.

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट ही चालावी पंढरीची ।।
पंढरीचा हाट । कडलाची पेठ । मिळाले चतुष्ठ वारकरी ।
पताकाचे भार मिळाले अपार । होतो जयजयकार भीमातीरी ।।
हरी नाम गर्जता भय नाही चिंता । ऐसे बोले गिता भागवत ।।
खटनट यावे शुद्ध होऊनि जावे । दवंडी पीटी भावे चोखामेळा ।।[७८]

या सर्व अभंगातील विवेचनातुन असे स्पष्ट होते की सर्व जातीतील संत मंडळींनी वारीचा अनुभव आपल्या अभंगातुन मांडला. वारी ही आनंद देणारी साधन आहे. प्रेम देणारी आहे. खटनट म्हणजे उच्च निच लहान मोठे वाईट चांगले सर्वांनी यावे शुद्ध होऊनी जावे. श्री ज्ञानदेव व श्री नामदेव यांच्या कालखंडात वारकरी सांप्रदयाचा प्रचंड विकास झाला. महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर सांप्रदाय पोहचला. सर्व सामान्यापर्यत सांप्रदायाला पोहचले. अतिशय साधी सरळ तत्वज्ञानाची भाषा व पद्धत श्री ज्ञानदेवांनी वापरली. वारीचे महती व महत्त्व लोकांपर्यंत पोहचविले. त्यांना पटवुन दिले. सुख व आनंद म्हणजे वारी ही भावना लोकांपर्यंत पोहचली. तसेच भजन किर्तन अभंग यांचे महत्व वाढविले.तसेच वारकरी तत्वज्ञान सांगणारे आध्यात्मिक ग्रंथाची निर्मीती प्राकृत मराठी भाषेमध्ये केली. जगातील महान तत्वज्ञान आपल्या साध्या व सरळ सोप्या भाषेत उदाहरण व दृष्टांताच्या सह अनुभवातुन लोकांपर्यंत ग्रंथाच्या माध्यमातुन व अभंगातुन पोहचविले. त्यांच्या या कार्यामुळे सांप्रदयाची मुळे खोलवर रूजली गेली. व आज जगातील मोठ्या सांप्रदायापैकी एक सांप्रदाय व महान तत्वज्ञान ते जगाला शांतीचा उपदेश करू पाहते तो म्हणजे वारकरी सांप्रदाय होय. यांची भक्कम पाया भरणी संघटना निर्माण करण्याचे कार्य ज्ञानदेव व नामदेव काळात झाले.

## ३.४ श्री भानुदास एकनाथ महाराज यांच्या काळातील वारकरी संप्रदयाचा इतिहास

नामदेवांनी शके १२७२ सन १३५० ला समाधी घेतली. तर ज्ञानदेवांनी शके १२१८ (२५ ऑक्टोबर १२९६) या दिवशी समाधी घतली. नामदेवांच्या समाधीनंतर सुमारे १०० वर्षांनी एकनाथांचे पणजे भानुदास हे पैठण येथे होते. ज्ञानदेव नामदेव यांच्या नंतर वारकरी सांप्रदायात भानुदास हे श्रेष्ठ संत जन्माला आले.भानुदास महाराजांच्या काळात मंगळवेढ्याचे दामाजीपंत हे समकालीन होते. ते भानुदास विषयी लिहतात.

वंदु भानुदास वैष्णवांचे कुळी । ज्याची वनमाळी मागेपुढे ।।
बालपणी जेणे भानु आराधीला । वंश निरवीला देवराया ।।[७९]

भानुदास महाराज हे लहानपणापासुन सुर्याचे उपासक होते. व त्यांच्या घराण्यात विठ्ठल भक्तीची परंपरा होती. याबाबत ते म्हणतात.

आमुचिये कुळी पंढरचा नेम।
मुखी सदा नाम विठोबाचे ।।[८०]

भानुदास महाराजांकडे घराण्यातुनच वारीचा नेम आलेला होता. त्यांनी वारीच्या पंरपरा पुढे नेटाने चालु ठेवली हे करत असताना वारीच्या संदर्भात जन सामान्या पर्यत वारीची परंपरा पोचविण्याचे काम त्यांनी केले. आध्यात्म्य तत्वज्ञान हे अभंगाच्या माध्यमातुन लोकांसमोर मांडले. ते साध्यासुध्या भाषेत लोकांना पटेल व रूचेल अशी मांडणी त्यांनी केली. त्यांनी आपल्या निरपेक्ष वारीच्या तपाने वारकरी साधन मार्गात काय तेज आहे हे पुन्हा लोकांच्या चांगलेच निर्दशनास आणले. मधल्या काळात समाज जो दुर गेलेला होता त्यांना पुन्हा वारीच्या वाटला आणायचे महान कार्य त्यांनी सुरू केले. ज्ञानदेव व नामदेवांनी वारकरी सांप्रदाय वारीचे महान कार्य महाराष्ट्रात सुरू ठेवले व वाढविले होते. ते कार्य त्याच पद्धतीने पुढे सुरू ठेवण्याचें व वाढविण्याचे व परंपरा निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. हे करत त्यांनी पंढरपुरच्या विठ्ठलाचे प्रेम आपल्या हृदयात साठवुन त्याचे सतत चिंतन करणे व ते नामचिंतन लोकांना करण्यास प्रवृत्त करणे. त्यांची भक्ती विठ्ठलास एवढी महान होती त्या भक्तीच्या जोरावर त्यांनी विजयनगरच्या राजाने आपल्या राजधानीत नेलेली पांडुरंगाची मुर्ती पंढरपुरात आणली या संदर्भातला सविस्तर वृतांत असा एका ब्राम्हणाने विद्यानगर अथवा विजयनगर अनागोंदी येथील राजा रामराजा जवळ पंढरीची व तेथील मुख्य देवता पांडुरंग यांची स्तुती केली व ती सहन न झाल्याने स्तुती करणाऱ्या ब्राम्हणास कैदेत टाकुन राजा

पंढरपुरास त्या ब्राम्हणाने केलेले वर्णन व ऐश्वर्य आहे का हे तपासण्याकरीता आला तेव्हा त्याला त्या ब्राम्हणाच्या वर्णनापेक्षा अलौकीता तेथे दिसुन आली. तेव्हा समर्थ असलेल्या राजाने श्री विठ्ठलाची मुर्ती उचलुन अनागोंदीस नेली व आपल्या पुजेकरीता स्वतंत्र मंदीर बांधुन त्यात ती मुर्ती ठेवली. पुढे आषाढी एकादशीला यात्रेला चर्चा झाली देवळातील मुर्ती अनागोदीस नेली तेव्हा भानुदास महाराज यांनी घाबरलेल्या भक्तांस आश्वासन दिले कि मी मुर्ती घेऊन येतो तुम्ही बसा त्यानंतर ते जे निघाले ने थेट विजयनगर बाहेर तुंगभद्रेच्या काठी येऊन पोहचले. रात्र पडल्यावर देवाच्या दर्शनास गेले असता भगवंतानी आपल्या गळ्यात असलेला रत्नाचा हार त्यांच्या गळ्यात घातला व पंढरपुरास दुसऱ्या दिवशी येण्याचे कबूल केले.

याचे वर्णन अभंगात भानुदास महाराज सांगतात –

भक्त भागवत सकस पाऊसले ।

चंद्रभागेतीरी उभा विटेवरी । विठ्ठल राज्यकरी पंढरीये।।

भक्त भागवत पाऊसले।

निःशब्द जे ठेले तुजविण ।।

रखुमाई आई ते जालीसे उदास ।

पुंडलीका कैसे पडीयेले मौन ।।

येसी नरी येई पंढरीच्या राया ।

अगा कृपावर्या पाडुरंगा ।।

धन्य पंढरपुर विश्राती माहेर ।

धन्य भिमातीर वाळवंट ।।

भानुदास म्हणे चला आम्हा सवे ।

वाचा ऋण देवे आठवावे ।। [८१]

दुसरे दिवशी सकाळी देवाच्या गळ्यातील रत्नाचा हार कड्याकुलपातुन चोरीस गेला असे आढळुन आले. शोध करीता तो हार भानुदासाच्या गळ्यात दिसुन आला. त्यास कैद करून त्याचा इन्साफ करून त्यास सुळावर दिण्याची शिक्षा सांगण्यात आली. सुळावर जाण्यापुर्वी एकदा भगवंताच्या दर्शनाची परवानगी असावी असे त्यांनी सांगीतल्यावरून त्यास ती देण्यात आली. वाटेत दर्शनाला गेला असता त्यांनी देवासमोर ह्रदयास पाझर फुटणारी विणवनी अभंगातुन करतात.

जै आकाश वरपडों पाहे । ब्रम्हगोल भंगा जाय ।

वडवानळ त्रिभुवन खाय । तरी तुझीच वाट पाहे गा विठोबा ।।[८२]

नकरी आणिकांचा पांगीर । नामधारक तुझाची अंकीला ।[८३]

सटण सागर एकवट होती । जे हे विरूनी जाय क्षिती ।।[८४]

पंच महाभुते प्रलये पावती । परी मी तुझाची सांगाती गा विठोबा ।।

भल तैसे वर पडोभारी । नाम न संडो नेमा न टळो निर्धारी ।।

जैसी पतिव्रता प्राणेश्वरी । विनवी भानुदास म्हणजे अवधारी गा विठोबा ।।[८५]

या वरील अभंगातुन ते करूणा भाकीत होते. अशा स्थितीत असताना शिपायांनी त्यास सुळापाशी ओढुन नेले. चमत्कार झाला की सुळाचे पाणी झाले. ही बातमी राजाच्या कानावर गेल्यावर राजा स्वतः तेथे आला. व भानुदास महाराजांचा आदर सत्कार करून मुर्ती परत घेऊन जाण्यास परवानगी दिली व भानुदास महाराजांनी ती मुर्ती परत पंढरपुरास आणली. यावरील वृतांत सदर्भात इतिहास संशोधकामध्ये वेगवेगळी मते आढळुन येतात.

पहिले मत :– अनागोंदीस पंढरपुर वरून जी मुर्ती नेली ती परत आणली गेलीच नाही. ती तेथेच ठेवली गेली.व पंढरपुरीस दुसरीच मुर्ती बसवली.

दुसरे मत :– कित्येकांच्या मते पंढरपुरची मुर्ती अनागोंदीस नेलीच गेली नाही. परंतु वरीलप्रमाणे विचारत घेऊन जुने लोक सांगतात. व वारकऱ्यांना मान्य असलेली हकीकत मांडली आहे.

भानुदास महाराज पांडुरंग चरणी एकनिष्ठ होते. अन्य देवतांशी त्यांचे मन रमले नाही.

आणिक दैवता नेघे माझे चित्त । गोड गाता गीत विठोबाचे ।।

भ्रमर मकरंदा मधासी नी माशी । तैसी या देवासी मन माझे ।।[८७]

ते म्हणतात ज्याप्रमाणे मधमाशी मकरंदा मध्ये मग्न असते त्याप्रमाणे विठोबासी मन माझे मग्न आहे. ते अहोरात्र विठ्ठलाचे गुणगान गात होते. वैष्णावाच्या संगतीत राहण्याच्या अट्टाहास धरतात. त्याची आस त्यांना सदैव आहे.

टाळ घोळ चिपळ्या नाद । दिंड्या पताका मकरंद ।।

गाती विठ्ठल नाम अल्हाद । अट्टाहासे करूनी ।।

भानुदासी अहोरात्री । देवा करीतसे विनंती ।।

या वैष्णावाच्या संगती । मज जन्म दे देवा ।।[८८]

त्यांनी सर्व सामान्य उपदेश करताना स्पष्ट सांगितले की अन्य साधनाच्या भानगडीत न पडता पंढरीचे वारी हे सोपे साधन सांगितले. त्याचे वर्णन भानुदास महाराज करतात.

व्रत करीता एकादशी । नेमे जायी पंढरीशी ।।

आषाढी आणि कार्तिकीशी । दोन्ही वारी चुको नको ।।

नको फिरू रानी वनी तु दुर्ग घाट। सोपी आहे वाट पंढरीची ।।

नको करू जप तप अनुष्ठान । सोपी आहे जाण पंढरी हे ।।

नको जाऊ तिर्था मनाच्या हव्यासे । जाई तो उल्हासे पंढरीशी ।।

नको करू योग अष्टांग निर्वाण । सोपे ते भुवन पंढरी जगी ।।

भानुदास म्हणे सोपे वर्म राम। काशयासी श्रम करीसी बहु ।।[८९]

भानुदास महाराज यांनी आपल्या निष्ठावान भक्तीनी व आपल्या समर्थ व्यक्तीमत्वाने पंढरीच्या वारीच्या प्रथेस व परंपरेस अधिक उत्साहाचे वातावरण निर्माण केले. त्यांनी विठ्ठल भक्तीचा एवढा मोठा प्रभाव निर्माण केला आहे की त्यांच्या काल्याच्या प्रकरणातील अभंग आजही काल्याच्या प्रसंगी म्हटला जातो.

अवघ्या सोडियेल्या मोटा । आजीचा दहीकाला गोमटा।।

घ्यारे घ्यारे दहिभात । आम्हा देतो पंढरीनाथ ।।[९०]

यावरुन भानुदास महाराजांचे वारकरी संप्रदायात अत्यंत महत्व प्राप्त झाले हाते. हे फक्त भक्तीनेच झालेले दिसते. त्यांनी आपल्या घरात वारीचा पाया घातला. भक्तीचा ज्ञानदेवांचा वसा व वारसा आपल्या घरात निर्मान केला याचा परीणाम पुढच्या पिढीत एकनाथ महाराजा सारखे शांती ब्रम्ह जन्माला आले.एकनाथ महाराजांनी भानुदास महाराजांच्या कर्तृत्वाबद्दल व कार्याबद्दल अनेक अभंगातुन गौरवाचे उद्गार काढले आहेत. उदा.–

पूर्वी भानुकृपा सौरस । पिता महापिता भानुदास ।।

त्यापासोनी हा वंश । जनार्दन प्रिय ।।[९१]

हे भानुदास कवित्व कुळवल्ली । निजात्म मंडपा वेली गेली ।

एका जनार्दनी पुष्पी फळली । संत सुखीये होनु ।।[९२]

वंदु भानुदास आता । जो का पिता महापिता ।।

ज्याचेनी वंश भगवंता । जाला सर्वथा प्रियकार ।।
जेणे बाळपणी आकळीला भानु । स्वये जाहला चिद्भानू ।।
चिंतोनी मानाभीमानु । भगवत्पावनु स्वये जाला ।।
जयाची पदबंध प्राप्ती । पाहो आली श्री विठ्ठल मूर्ती ।।
कानी कुंडले जगज्योती । करीता राती देखीला ।।[९३]
(वंदु भानुदास वैष्णवाचे कुळी । ज्याशी वनमाळी मागेपुढे ।
बाळपणी जेणे भानुआराधीला । वंश निरविला देवराया ।।)

श्री भानुदास यांनी लहानपणा पासुन श्रीकृष्ण देवराय विष्णु चे स्मरण आरंभिले ते भगवंत मागे पुढे त्याच्या उभे राहतात. ते विठ्ठल सदा ह्रदयात त्यांनी साठवुण ठेवले व पंढरीची वारी उत्साहाने त्यांनी सुरु ठेवली.

**श्री एकनाथ महाराज–**

(सन १५३३–१५९९) जन्म शके १४५३ (इ.स.१५३३) च्या संधीस पैठण येथे मुळ नक्षत्रात झाला . वडील सुर्यनारायण व आई रूक्मिणीबाई यांच्या पोटी जन्म झाला. त्यांची माता पितरे त्यांना बालपनातच सोड्डुन देवाघरी निघुन गेली. तेव्हा पासून आपल्या आजी–आजोबाच्या प्रेमळ सावलीत वाढले. नाथाच्या जन्मकाळी अहमदनगरच्या निजामशाहीचा बुऱ्हान शहा हा गादीवर होता. नाथाची जन्मभुमी व कर्मभुमी पैठण ही निजामशाही अमलाखाली आलेली होती. या राज्यकर्त्यास कर्तबगार हिंदुचे सहकार्याची गरज जाणवू लागली हाती. म्हणुणच निजामाने नरसो पंडीत, कंवर सेन, संभाजी चिटणीस यांच्या सारखे माणसे महत्वाच्या हुद्यावर नेमले होते.एकनाथ महाराजांचे गूरू जनार्दन स्वामी हे चाळीसगावाचे देशपांडे होते त्याची नेमणूक दौलाताबाद किल्याचे सूभेदार म्हणून केली होती हा काळ राजकीय गोंधळाचा होता.तसाच तो धार्मिक अवनतीचा काळ आहे. देवळांची मोडतोड करून त्या जागी मशिदी उभारणे. तीर्थस्थानांचा विघ्वंस करणे यात्रा उत्सवास प्रतिबंध करणे असे प्रकार घडत होते तसेच हिंदु धर्मात खुदं हिंदु प्रजेतही नविन विधी प्रविष्ट झाल्या दावलमलकाची पुजा देवऋषीची स्तोम जंगल महानुभाव पोटभाउंचा सुकाळ क्षुद्रदवताचा बळी देणे वैगरे गोष्टी चालु होत्या. धार्मिक पुढारी म्हणविणारा ब्रम्हणवर्ग ही जारणमारण मंत्रांच्या

नादी लागला होता हे नाथ महाराज समाजात स्पष्टपणे दिसत हाते अशा तत्काळीन परीस्थितीचे वर्णन त्यांनी जोहार या भारूडात केलेले आहे.

आम्ही ब्रम्हण म्हणती । स्नान संध्या वेदपठन न करीती ।।

अशीच कर्म जारण मारण जपती । मोहन स्तंभणादीक कीजी मायबाप ।।

मग डोला होता थंडा । खाती हिंदू तुर्काचे खरकटे की ।।[९५]

अशा परिस्थीतीत सर्वाना तोंड देऊन एकनाथ महाराजांनी वारकरी सांप्रदायाच्या पुनरूज्जीवनाचे कार्य उत्साहाने व यशस्वी पद्धतीने पार पाडले. महाराष्ट्रातील देवधर्मासंबंधीच्या अभिमानाला एकनाथांच्या शिकवणी नवचैतन्य पुरवुन वारकरी सांप्रदयाच्या रूपाने जी संघटना ज्ञानेश्वरापासुन आस्तित्वात होती. तिचे शौधित्य व कर्त्या पुरूषाच्या अभावी ह्या संघटनेला आलेले दैन्य एकनाथांच्या शिकवणीने नाहीसे केले. लोकांमध्ये देवधर्मांच्या अभिमानाचा उत्साह संचारला आणि ह्याला पुढे पन्नास वर्षांनी स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नाने फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रातील जनतेस भोगावया मिळाला.श्री एकनाथ महाराजांचा जीवनपट इ.स. १५३३– १५९९ या ६६ वर्षे काळात त्यांनी विविध अंगानी कार्य केले. दक्षिण काशी म्हणुन संबोधल्या जाणाऱ्या प्रसिद्ध असणाऱ्या पैठण येथे जन्म झाला. सुरूवातीचे बारा वर्षे बालपण व पुढील बारा वर्षे गुरू जनार्दन स्वामी यांच्या सानिध्यात दौलताबाद येथे सहवासात राहिले. व गुरूंची सेवा केली. नंतर त्यांनी गुरू आज्ञेने काशीवास तीर्थाटन केले. तीर्थयात्रा नंतर विवाह करून गृहस्थाश्रम स्विकारला.या काळात त्यांनी किर्तन, भजन, वारी, उत्सव व अनेक ग्रंथरचना केली त्यांनी सर्व आयुष्य त्यांनी विठ्ठल भक्ती व तीचा प्रसारात व्यथीत केले .

**त्यांनी केलेली विविध कार्ये :–**

एकनाथांनी सुरूवातीच्या गुरूसहवासात गुरू गृही बारा वर्षे श्रीगुरूची मनोभावे सेवा केली. त्याचबरोबर ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, उपनिषदे, वेदान्त, षडदर्शने ,रामायण भागवत इत्यादी संस्कृत वाङमयाचे व ग्रंथाचे अवलाकेन केले. हे त्यांच्या त्यांनी लेखन केलेल्या ग्रंथांतील विवरणावरून दिसते. विशेषताः पुर्वसुरीच्या ग्रथांतील बोध त्यांनी पचविला त्याचे योग्य रसग्रहण केले. या अध्ययनाच्या गृहणानंतर व गुरूच्या आशिर्वादाने त्यांनी प्रथम कर्मठेतर हल्ला केला. ज्ञानेश्वराच्या पाऊलावर पाऊल ठेऊन या कार्याची सुरूवात केली. त्याचे उदाहरण भागवताच्या सुरूवातीला त्यांनी केलेले शंकर चार्याचे वर्ननातुन दिसते.

वंदु आचार्य शंकरू । जो का ग्रंर्थाथ विवेक चातुरू ।

सारूनी कर्मठतेचा विचारू । प्रबोध दिनकरू प्रकाशिला. ।।[९६]

शंकराचार्यांनी सांगितलेल्या मायावादीतील ग्राह्या तेवढा भाग विचारात घेऊन त्यापुढे जाऊन ज्ञानेश्वरांनी चिद्रीलास यावर विचार मांडले. ते त्याचे विचार व भावना व कार्य आत्मसात केले व तोच वसा त्यांनी आपल्या विचाराने पुढे सुरू ठेवला. नाथांनी जे ग्रंथ लिहीले त्यापैकी बहुतांश ग्रंथामध्ये ज्ञानेश्वरांच्या विचाराचे सुबोध विवरण केलेले स्पष्टपणे दिसते. भक्ती मार्गाचे सोपे रूप जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी कोरडे पांडित्य स्विकारलेले आहे. वेष धारण करून पांडित्य मिरवणारे त्यांचा उपयोग फक्त उपभोगाकरीता करणाऱ्या पंडीतांना नाथांनी त्यांना कोरडे म्हटले आहे. श्री एकनाथ महाराजांनी आपल्या गुरूगृही अर्थात जनार्दन स्वामी यांच्या आश्रमात जाऊन ज्ञानार्जन केले. जनार्दन स्वामींनी नाथांचे ज्ञान नम्रता सात्विकता हे गुण पाहुन आपल्या जवळ ठेवुन घेतले. जनार्दन स्वामी हे अत्यंत व्यवहारकुशल व परमार्थातील अधिकारी होते.एकनाथांनी गुरूजवळील ज्ञानाचा व त्यांचा आदर्श गृहस्थाश्रमांचा संस्कार व विचारधारा स्विकारून सन्यास आश्रमास महत्व न देता गृहस्थाश्रम स्विकारून त्यांचे महत्व जनसामान्य वाढविले जनार्दन स्वामी हे दत्तउपासक होते. व एकनाथांवर या उपासनेचा प्रभाव पडला होता. नाथांचा उपासनावर आत्मचिंतनाने त्यांनाही दत्तांचा साक्षात्कार झाला होते. दत्त सांप्रदयात कर्मठपणा सोवळे ओवळे या गोष्टींचा प्रामुख्याने सामावेश होता. नाथांनी या गोष्टी बाजुला सारून त्यांनी फक्त दत्त देवतेकडे पाहिले. दत्ताकडे व स्वामीकडे त्यांनी प्रेमळ माऊलीच्या दृष्टीने पाहिले. स्वामीकडुन त्यांनी आपल्या घरात चालत आलेली श्री विठ्ठल स्वरूपी प्रेम देवतेचीच उपासना मानुन घेतली . सावळे रूप माझ्या मनासी नित्य राहो. या अभंगाच्या पंक्तीमधुन व नाथ महाराज स्पष्ट सांगतात की माझ्या मनामध्ये नित्य विठ्ठल म्हणजे सावळे रूप राहु द्या त्रिगुणात्मक व त्रिमुर्तीयुक्त या रूपाने युक्त असण्याच्या प्रेम स्वरूप विठ्ठलाच्या छंदात ते दंग झाले हे पाहुन स्वामींनी देखील त्यांना असे सांगितले की तुम्ही या विठ्ठलाच्या रूपाच्या भक्तीशिवाय व वारीशिवाय इतर काही करू नये.

विधीनिषेध धारा आवरी पसारा ।

न जाये तु सैरा आणिक पंथा ।।

पंथ सोपा जाणा पंढरी पावन ।

याहुनीया आत वंद्य कोण ।।

सर्वोत्तम तिर्थ देव आणिक नाम।

पुरती सर्व काम विठ्ठल पाही ।।

म्हणे जनार्दन ऐके एकनाथा ।

शरण तत्वथा संता रिघे ।।

सर्वभावे वारी करी पंढरीची ।

आणिक व्यापारी गुंतु नको ।।[१७]

या अभंगात सोपा पंथ हा पंढरी वैद्य हा देखील पंढरी देव आणि विठ्ठलाचे नाम सर्वोत्तम म्हणुन त्याला शरण जाऊन सर्वभावाने पंढरीची वारी कर. या स्वामीच्या उपदेशाने प्रेरीत एकनाथ महाराजांनी दत्तउपासनाच्या मुळ प्रेमास्वरूपात म्हणजे विठ्ठल स्वरूपात आपली भक्ती विरवली. नाथ महाराजांनी अनेक ग्रंथांची निर्मीती केली. या प्रमुख ग्रंथामध्ये एकनाथांनी भागवत, अभंगगाथा, भारूड, हे प्रसिद्ध मानले जातात. सर्व ग्रंथ रचनेमधुन भागवत धर्माची सुबोध स्पष्टीकरण सोप्या पद्धतीने मांडले आहे. त्या काळात संस्कृत व फारशी भाषेच्या कैचीत मराठी भाषा सापडली होती. त्या काळात राजभाषा फारशी म्हणुन तिचा मान व दरबार सरकारी कामात उपयोग होत होता. तर संस्कृत ही देववाणी म्हणुन तीला विशेष महत्व होते. पंडीत लोक ग्रंथनिर्मीती ही संस्कृत भाषेतुन करत होते. प्राकृत मध्ये लेखन करणे हे त्यांना उपहासास्पद होऊन बसले होते. पैठण मध्ये तर त्या पंडीतांचे प्रचंड प्राबल्य होते. या पंडीताच्या विरोधात जाऊन नाथांनी मोठ्या धैर्याने रचना मराठी भाषेत करण्यास सुरूवात केली. मराठी या भाषेचा उपहास करण्याच्या विरोधात स्पष्टपणे लेखन केले.

संस्कृत ग्रंथकर्ते ते महा कवी । मा प्राकृती काय उणीवी ।।

नवी जुनी म्हणावी । केसेनी केली सुवर्णसुमने ।।

कपीलेचे म्हणावे शीर । मा इतरांचे ते काय नीर ।।

वर्ण स्वाहे एकची मधुर। दिसे साचार सारिखे ।।

संस्कृत वाणी देवे केली । प्राकृत तरी चोरापासुनी जाली ।।

अस्तेत या अभिमान भुली । वृथा बोली काय काज ।।[१८]

आता संस्कृता आणि प्रकृता ।

भाषा जाली जे हरीकथा ।

ते पावनाची तत्वथा ।

सत्य सर्वथा मानली ।।[९९]

अर्थात ज्ञानदेवानंतर त्याच्या प्रमाणे मराठी भाषेत नाथांनी ग्रंथरचना करून सामन्यांना ज्ञानाची द्वारे खुली केली या कार्यामुळे वारकरी तत्वज्ञान भागवत धर्म भक्ती इतर गोष्टीचा प्रचार प्रसार होऊन वारीच या मार्गाकडे जाऊन सामुदायिक आकर्षित होऊन वारकऱ्यांची संख्या वाढली.नाथ महाराजांनी ज्ञानदेव नामदेवानंतर वारकरी सांप्रदयाचा झेंडा महाराष्ट्राच्या बाहेर उत्तर भारतात फडकविला. पंडीताचे अगार अशा काशी क्षेत्रात जाऊन तेथे आपले विचार मांडले. आपल्या प्राकृत भाषेत प्रथमच भागवत लिहले. पैठणच्या ब्रम्हवृंदानी या विरोधात तक्रार मांडली. त्यामुळे हे केलेल लेखन नाथ महाराज काशीला घेऊन गेले व तेथे नाथांची अमृततुल्य अक्षरे पाहुन संन्याशांची हृद्य पाझरली व त्यांनी प्राकृतात भागवताची लेखन करण्याची परवानगी दिली. नाथांनी पाच अध्यायाच्या पुढील ग्रंथ काशी या क्षेत्रातच पुर्ण केला.

वाराणशी महामुक्ती क्षेत्र । विक्रम शक वृष संवत्सर ।।

शके सोळासे तीसांतर । टीका एकाकार जनार्दन कृता ।।[१००]

या ओवीत शके सोळासे तीसोत्तर व विक्रम शक वृष संवत्सर मध्ये वाराणशी या महामुक्ती क्षेत्रात टीका म्हणजे रचना केल्याचे वर्णन करतात.

ग्रंथारंभ प्रतीष्ठांनी । तेथ पंचाध्यायी संपादुनी ।

इतर ग्रथांची करणी । आनंदी वनी विस्तारली ।।[१०१]

ग्रंथ पुर्ण लिहुन झाल्यानंतर काशी क्षेत्री या संस्थानाची मोठ्या थाटाने मिरवणुक काढली. व या ग्रंथाचे महत्व काशी येथील लोकांनी वाढविले. यावरून या ग्रंथाची महती व महत्व स्पष्ट होते. एकनाथांनी भागवत म्हणजे वारकरी सांप्रदयाचा मजबुत स्तंभच होय. अर्थात या त्यांच्या ग्रंथ रचनेमुळे वाराणशी क्षेत्रात व वारकरी सांप्रदयाची महती व प्रसार वाढला. वारकरी सांप्रदयाला व तत्वज्ञानाला एक प्रकारे काशी पंडीतांनी मान्यता दिली. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा गीता या ग्रंथावर अलौकीक असा अलंकार चढविला आणि संस्कृत भाषेतील गोड ज्ञान मराठी भाषेत उपलब्ध केले.

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रम्हानंद लहरी प्रगट केली ।।[१०२]

ज्ञानेश्वरी हा महान तत्वज्ञान ग्रंथ नाथांच्या काळापर्यंत दुर्मीळ झाला होता. त्यात अबद्ध शब्दही शिरले होते. नाथांनी त्याचे संशोधन करून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत व जी ज्ञानेश्वरांनी तयार केली होती. तशीच प्रत तयार केली.

श्री शके पंधराशे साहोत्तरे । तारण नाम संवत्सरी ।।
एका जनार्दनी अत्यादरी । गीता ज्ञानेश्वरी प्रती शुद्ध केली ।।
ग्रंथ पुर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरी शुद्ध अबद्ध ।।
तो शोधोनीया एकविध । प्रतीशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ।।[१०३]

नाथ महाराजांनी वरील ओवीतुन ज्ञानेश्वरी शुद्ध केल्याचे स्पष्ट केले. व ते असे म्हणतात की ज्ञानेश्वरीचा पाठात कोणी स्वतः ची ओवी रचुन घातल्यास ती अमृताच्या ताटात नरोटी ठेवल्याप्रमाणे होईल. यानंतर ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रती निघाल्या. ज्ञानेश्वरांनी ज्याप्रमाणे गीतेतील कृष्ण व अर्जुन संवादावर रचना केली त्याच प्रमाणे नाथांनी त्याच धरतीवर भागवत एकादश स्कंधात कृष्ण उद्धव यांच्यातील संवांदाचे विवरण केले आहे. एकनाथांनी रचना करताना तत्कालीन चालु भाषेत ओव्यांची रचना केली. ज्ञानेश्वरीतील अनेक ओव्यांचे सोप्या भोषेत विवरण एकनाथांनी आपल्या भागवत ग्रथांमध्ये केले आहेत. नाथांना स्वप्नात माऊलींनी म्हणजे ज्ञानेश्वरांनी दृष्टांत दिल्यानंतर ते आळंदीस जाऊन समाधी स्थानाचा शोध करून आळंदीची प्रसिद्धी केली व आळंदीची वारी सुरू केली. श्री एकनाथ महाराजांच्या ठिकाणी लोकांविषयी अत्यंत तळमळ होती त्यांनी स्वतः भक्ती रसांचे सेवन करून अनुभव घेतला. सर्वांना वाटुन सर्वाचा उद्धार करण्यासाठी हरीकिर्तन सुरू केले. किर्तनेतुन ते श्रोत्याना भक्तींचा महिमा सांगत असे. रोज त्यामध्ये नवा रंग ओतत. त्याच्या हरीकिर्तनाने श्रोत्यांच्या अतःकरणातील तळमळ निघुन त्यांनी सद्गुणांची व सद्भावनाची पेरणी होईल. दिवसांदिवस श्रोत्यांची संख्या वाढत होती त्याचप्रमाणे वारकरी सांप्रदयाचा प्रसार वाढत होता. किर्तन प्रसाराचे माध्यम म्हणुन नाथांनी त्याचा पुरेपुर उपयोग केला.

नित्य नवा कीर्तनी कैसा वोढवला रंग । श्रोता आणि वक्ता स्वये झालासे श्रीरंग।।
अल्हादे वैष्णव करीती नामाचा घोष । हरीनाम गर्जता गगनी न माये हरूष ।।
पदोपदी कीर्तनीवताहे जनमन । आवडी भुकेली तीने गिळीले गगन ।।
एका जनार्दनी गातास हरीचे नाम। निमाले इंद्रीय विषय विसरली काम ।।[१०४]

वारकरी सांप्रदायात किर्तन परंपरेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. लोकजागृतीच्या कार्यात किर्तने हे अत्यंत प्रभावी साधन मानले जातील. हरीकिर्तन हे भक्त मनोरंजनाचे साधन नसुन ते भक्ती, ज्ञान, वैराग्य प्रसाराचे आनंद, सुख मिळविण्याचे अद्‌भुत साधन आहे. याशिवाय कीर्तनात दुसरे काही असु नये. त्याच्या मर्यादा कशा असाव्या हेही त्यांनी शिकवले.

सगुणचरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी ।
सज्ज्न वृदे मनोभावे आधी वंदावी ।।
संत संगे अनंत रंगे नाम बोलावे ।
कीर्तन रंगी देवास सानिध्दसुखे डोलावे ।।
भक्तीज्ञान विरहीत गोष्टी इतरा न कराव्या ।
प्रेम भरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या ।।
जेणे करूनी मुर्ती ठसावे अंतरी श्रीहरी ।।
ऐसी कीर्तन मर्यादा हे संताच्या घरची ।।
अद्वय भजने अखंड स्मरणे वाजवी करटाळी ।
एका जनार्दनी मुक्त होय ना काही ।।[१०५]

त्यांनी किर्तनाबरोबर अनेक उत्सव सुरू करून लोकांचा सहभाग वाढविला. रामनवमी, गोकुळअष्टमी इत्यादी उत्सव थाटामाटात व उत्साहाने साजरे करावे अशी शिकवण त्यांनी दिली.श्री एकनाथांनी किर्तनाच्या माध्यमातुन भक्ती मार्गाचा पंढरीच्या वारीचा जोरदार प्रचार केला . पंढरीच्या वारीचा आनंद कसा अनुपम्य आहे. ते त्यांनी लोकांपर्यंत पोहचविले. वारीचा महिमा त्यांनी वर्णन करताना वारी ही सर्वाना आनंद देणारी व सर्वांना सरळ सुलभ व सहज प्राप्त होणारे अनुपम्य साधन आहे. हे स्पष्ट होते.

अनुपम्य भाग्य नांदते पंढरी । विठ्ठल निर्धारी उभा जेथे ।।
अनुपम्य वाहे पुढे चंद्रभागा । दोष जाती भंगा नाम घेता ।।
अनुपम्य मध्ये पुंडलीक मुनी । अनुपम्य मिठी चरणी त्यांच्या ।।
अनुपम्य संत सोबती दोही बाही । अनुपम्य देही सुख वाटे ।।
अनुपम्य एका जनार्दनी ठाव । अनुपम्य पंढरीराव विटेवर ।।[१०६]

ही पंढरीची वाट सोपी आहे. सर्वांनी त्वरा करा त्या वाटेन आवर्जुन जावे. असे एकनाथ महाराजांनी सांगितले.

करा करा पाठलाग । धरा पंढरीची वाट ।।

पुंडलीकाची पेठ । सोपी आहे सर्वांशी ।।[१०७]

पंढरीची उपासना ही देखील अनुपम्य आहे. आणि पंढरीची भक्ती गोडी अनुपम्य आहे. याचे वर्णन एकनाथ महाराजांनी अभंगातुन वर्णन केले.

अनुपम्य उपासना । अनुपम्य चरणा संताचिये ।।

अनुपम्य भक्ती गोड । अनुपम्य लिगाड तुटत ।।

अनुपम्य पंढरीचा वास । अनुपम्य देवास देव त्यांचे ।।

अनुपम्य नाचती वैष्णव । अनुपम्य गौरव तयांचे ।।

अनुपम्य एका जनार्दनी । अनुपम्य चरणी संताचिये ।।[१०८]

सर्व संत मंडळी ही पंढरीच्या विठ्ठलाला भुषने वाटतात. हे सर्व विठ्ठलाचे किती जवळचे व विठ्ठलाचे सर्व भक्तांना कसे अलंकाराप्रमाणे धारण केले आहे.याचे वर्णन एकनाथ महाराजांनी केले.

निवृत्ती शोभे मुकुटाकार । ज्ञान सोपान वटेश्वर ।।

विटु पंढरीची राणे । त्याले भक्तीची भुषणे ।।

खेचर विसा जगमित्र नागा । कुडले जोडा विठोबा जोगा ।।

बाहु शोभे बाहुवट । गोरा सावता दिग्पाट ।।

गळा शोभे वैजयंती । तिसी मुक्ताई म्हणती ।।

अखंड शोभे माझ्या बापा । पदकी नामयाचा शिंपा ।।

जाणु जगण सरळ । ते हे कान्होपात्रा विशाळ ।।

चरणी विट निर्मळ । तो हा झाला चोखामेळा ।।

चरणजळील उध्र्वरेखा । झाला जनार्दन एका ।।[१०९]

नाथ महाराजांनी नामस्मरणात रथ झालेला नामधारकाची योग्यता अभंगात कोष्टक रुपाने सांगितले

गावंडी सहस्त्र ब्राम्हण । तृप्त केलीया भोजन ।

पुण्य क्षत्रीचा एकची जाण । सुकृत तितुकेची जोडे ।।[११०]

यानुसार कोष्टक दिले

पुण्यक्षेत्री १००० ब्राम्हण = १ वेदपाठ

१००० वेदपाठ = १ पंडीत

१००० पंडीत = १ संन्यासी

१००० संन्यासी = १ परमहंस

१००० परमहंस = ब्रम्हवेत्ता

तसेच ते म्हणतात–

ऐसे वेत्ते अपरंपार । नमे नाम धारका बरोबर ।।

नामधारका सादर । पाहे एका जनार्दनी ।।[१११]

एकनाथ महाराजांनी ब्रम्हवित्ता कोणास म्हणावे हे याद्वारे लोकांना सांगण्याचा प्रयत्न केला. वेदपाठ ते पंडीत ते संन्यासी ते परमहंस ते ब्रम्हवेत्ता हा प्रवास नाथांनी मांडलेला आहे. हे सर्व नामस्मरणांने साध्य होते हे नाथांनी आवर्जुन आधोरेखीत केलेले आहे. श्री एकनाथांनी वाङमय कार्य करताना अनेक ग्रंथ लेखन केले. विविध अंगानी ग्रंथाची रचना केली. ग्रंथ रचना करतांना नाथांनी समाजातील निरनिराळे थर लक्षात घेतले.

१. त्यांनी तात्वीक व नैतिक विचारावर आधारीत ग्रंथ रचना केली.

२. पौराणिक आख्याने सांगणारे ओवीबद्ध ग्रंथ –

३. नामप्रेम ,निष्ठा,उपदेश,भक्तीरस यांनी ओथंबलेले अभंग वाडमय–

४. संत चरित्रे, रामकृष्णादिकांच्या चरित्रातील ह्दय स्पर्शी प्रसंगावर रचलेली गोड गाणी–

५. लोकभाषेत गुफंलेली नाट्यपुर्ण भारुडे–

या ग्रंथ वाङमयाच्या निर्मीतीतुन नाथाची निरनिराळ्या प्रकृतीच्या व वर्गाच्या जनमानसात सद्‌भक्तीची सरिता खेळविली आहे. त्यांनी कर्ममार्ग, योगमार्ग, व ज्ञानमार्ग याहुन श्रेष्ठ व सुलभ, सदगुण विकासाचे महत्त्व त्यांनी पटविले. अर्थात यासाठी भक्ती हाच एक महामार्ग आहे म्हणुन त्यास पंचम पुरुषार्थ असे म्हटले आहे तर भजन हा खरा स्वधर्म आहे.

चहू पुरुषार्थाचे माथा । भक्ती सर्वथा मज पढियंती ।।[११२]

माझे भजन हाची स्वधर्म। यांची नाव गा निजकर्म ।।[११३]

भक्ती शिवाय इतर जे कर्म करतात त्यास नाथ महाराज अधर्म म्हणतात–

माझेनी अनुसंघाने वीन । स्नान संध्या जप होम दान ।।

ते अवघेची अधर्म जाण । मद्भजन ते नव्हे ।।[११४]

असा या भक्ती करणाचा अधिकार सर्वांना आहे. सर्व वर्णांना तो अधिकार आहे. असे वर्णन करतात–

सर्व वर्ण आणि आश्रम । भगवद्भजने गती उत्तम ।

हे भक्तीचे निजवर्म । भक्त निष्काम जाणती ।।[११५]

वरील सर्व वर्णनातुन एकनाथ महाराजांनी भक्तीचा मंत्र लोकापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले हे दिसते. भक्तीचा प्रसार हा त्यांचा मुख्य हेतु होता. भक्ती शिवाय सोपा मार्ग नाही. हे त्यांनी आपल्या प्रचाराचे केंद्र बिंदू ठेवला. रूक्मिणी स्वयंवर हा ग्रंथ नाथांनी वाराणशीस लिहीला. या ग्रथाचा मुख्य विषय हा परमात्म्याच्या भेटीची आर्त लागलेल्या रूक्मिणीच्या रूपाने जिवाच्या संदर्भात वर्णन केले आहे. शेवटी दृढ निश्चयाने शिशुपालादीकासारखी विघ्ने ओलांड्ुन जिव कसा परमात्माशी एकरूप होतो हे दाखविले आहे. तसेच या ग्रंथात विनोद उपरोध, भक्तीरस, खेळकर पणा याचा सुंदर संगम साधला आहे.भावार्थ रामायन– हा श्री एकनाथ महाराजांचा शेवटचा ग्रंथ आहे. सुमारे ४०००० ओव्यांची ही ग्रंथ रचना आहे. नाथांनी युद्धकांड पर्यंत याची रचना केली. तर पुढील ४५ अध्यायपर्यंतची रचना नाथ शिष्य गावबा याने केली आहे. ही रामकथा त्यांनी मकरंद वृत्तीप्रमाणे, रसाळपणे सजवली. या रामकथेत नाथांनी तात्कालीन समाजासमोर श्री रामचंद्राचा आदर्श ठेवला आहे. तर उत्तम पुत्र ,पिता,स्वामी,भ्राता, मित्र कसा असावा हे दाखवुन समाजातील घटकात नैतिक जागृती व आकांक्षा निर्मान केली आहे.हनुमंताचे अद्भूत शौर्य व अन्यन्य सेवा भाव वर्णन केलेले आहे .भक्ती रसाच्या विविध छटा–नाथांनी आपल्या वाङमयातुन वर्णन केलेले आहेत– त्यापैकी बालभाव, भोळाभाव,अभावनेचा भाव इ.,दंभाचार सोड्ुन प्रांजळ भक्तीने प्रभु संतुष्ट होतात ही शिकवन जनतेला दिली.श्री एकनाथ महाराजांचे वैशिष्ट्यपुर्ण व आगळे वेगळे लेखन म्हणजे भारूड होय. भारुड म्हणजे एकनाथ महाराज असे समीकरण आहे. भारूड हे रूपकात्मक असुन सर्वच विषयावर भारूड लेखन केले असुन निती व धर्म यांच्या लोकशिक्षणाचे अत्यंत प्रभावी साधन म्हणुन मोठ्या कुशलतेने हे वापरले आहे.

**समाजातील सर्व संचारी व्यक्ती –**

जोशी, आंधळा पांगळा, मुका, वासुदेव, बाळसंतोष, फकीर , वाघ्या, कोल्हाटी, गारूडी,मानभाव, जंगम,इ.नाथांचा वासुदेव हा रामनामाची भिक्षा मागतो.

**जोशी–** वार्धक्याच्या संकटाच्या आत देहाचे सार्थक करण्याचा उपदेश करतो. व्दारी तुळशी वृदावन लावुन एकादशी व्रत हरी कथा, पुराण, श्रवण शिकवितो.

**बाळसंतोष–** आपण परात्पर भिकारी असे सांगुन भक्तीची भाकरी मागतो.

**आंधळा–** हा पंढरी पेठ पाहून दृष्टी आली म्हणतो.

**मुका–** हा साधुच्या निंदेने मुका झालो.

**बहिरा–** हरी किर्तन ऐकले नाही म्हणुन बहीरा झालो.

**वाघ्या–** हा पंढरीच्या महाद्वारात ज्ञान दिवटी उजळुन प्रेमाचा नगारा वाजवितो.

**होळीवाला–** बोंब पडे दे नामाची असे म्हणतो.

**महारीण–** असे म्हणतो असा उद्देश

एका जनार्दनी महारीन । करा चंद्रभागे स्नान ।

घ्यावे पुंडलीक दर्शन । पहावे विठ्ठल चरण ।।[११६]

**गोंधळी–** हा उदो उदो करतो तो विटेवरच्या जगदंबेचा म्हणजे विठ्ठलाचा .विठ्ठलाला तो जगदंबा म्हणुन पहातो.

आषाढी कार्तिकी तुझ्या गोधंळाची दाटी वो ।

पुंडलीक दिवटा शोभे वाळवंटी तो ।।

एका जनार्दनी अंबा उभी । कर ठेवुनी कटी वो ।।

या भारूडात एकनाथ महाराज वर्णन करतात–

ही अंबा मोहरूपी महिषासुराची मर्दिनी आहे. जगाने बकरी बळी द्यायची नसुन कामक्रोधाची बकरी बळी द्यावयाची असते. हिचे गोंधळीही सामान्य नसुन शुत्रघ्न सनकादिक आहे

**फकीर–** म्हणतो

देखो रे साई देखो रे साई । विटवर खडा रहिया भाई ।।

हजरत मौला मौला । सब दुनिया पालन वाला ।।[११७]

हे सर्व समाजातील लोक वेगवेगळे घटक पांडुरंगाकडे नाना देवताच्या रूपाने पाहतात व सगळ्या देवामध्ये विठ्ठलच आहे असे सर्वत्र फिरणाऱ्या व्यक्तिची कल्पना भारूडात मांडली.

तसेच दैवते–

खंडोबा, बहिरोबा, मेसाई,जोरवाई,यल्लमा,महालक्ष्मी,अंबाबाई इ.

**पशुपक्षी –**

एडका, कुत्रा, पोपट, बुलबुल, बैल, टिटवी, विंचू, सर्प, वटवाघूळ,

**खेळ –**

हमामा, हुतुतू, चेंडू, टिपरी भोवरी, फुगडी, पिंगा, एकीबेकी इ.

**कर्मे –**

राहट,जाते,दळण, कांडण,घाणा,डेरा,इ.

**नाती–**

नवरा,नवरी,सासर,माहेर,इ.

**पिशाचयोनी–**

हडळ,भुत, इ. वरिल सर्व रूपकातुन नाथांनी समाज परीवर्तनाचे कार्य करताना समाजातील परंपरेचाच उपयोग केलेला आहे. थोडक्यात भानुदास व एकनाथ महाराजांच्या कारकिर्दीत या दोघांनी सर्व विद्वता भक्ती मार्गाचे महत्व वाढविण्यासाठी उपयोगात आणली. एकनाथांनी तर वारकरी सांप्रदायाची ध्वजा वारानसीत फडकवली,ज्ञानेश्वरीचे संशोधन केले व प्रसार केला.किर्तनाची मर्यादा आखुन दिली. पंढरीच्या वारीचा नेटाने व उत्साहाने पुस्कार केला. भारूडाच्या माध्यमातुन खेड्यापाड्यातुन नाना दैवतांचे पुजन व हिंसा या पासुन लोकांना परावृत्त करून विठ्ठल भक्तीकडे वळविले. या पद्धतीने वारकरी सांप्रदायाच्या विकासाचे महान कार्य केले. श्रीएकनाथमहाराजांचा जन्म त्यांचेच सदगुरू जनार्दन स्वामी यांचा जन्मदिवस एकच असुन त्याच दिवसी जनार्दन स्वामींना दत्त दर्शन घडले,ज्या दिवसी जनार्दन स्वामींचा नाथावर अनुग्रह झाला,ज्या दिवसी स्वामींनी आपला देह ठेवला आणि त्याच दिवसी शके १५२१ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस या महापुरूषाने गोदावरी नदीत (दक्षिण गंगा) देह अर्पण केला.[११८]

## ३.५ श्री तुकाराम महाराज व श्री निळोबा महाराज

### श्री तुकाराम जन्म

इंद्रायणी नदी च्या काठी देहू गावी शके १५३० ला जन्म झाला तर ते वैकुंठगमन शके १५७१ ला झाले. श्री एकनाथ महाराजांच्या प्रयानानंतर ९ वर्षांनी श्री तुकाराम महाराजांचा जन्म झाला. याच संतविराने वारकरी मंदीरावर कळस चढविला असे आपल्या अंभगात बहीणाबाईनी म्हटले आहे.

तुकाराम महाराज याच्यांकडे वयाच्या तेराव्या वर्षी वडिलांनी संसाराची जबाबदारी सोपवली. त्याचे दोन विवाह झाले. पहीली पत्नी रखमाबाई दुसरी जिजाऊ किंवा आऊली व घरात महाजनकी सावकारी व  शेती होती. घरात आठपिढ्या पंढरीच्या विठलाची उपासना होती.भक्तीभावाचे वातावरण होतेच.असा जीवनाचा २७ वर्षाचा पुर्वार्धानंतर काळ बदलला. शके १५५१ मध्ये भयानक दुषकाळ पडला. द्रव्य आटले, दिवाळे निघाले आवडता पुत्र संतु व थोरली पत्नी मरण पावली.प्रपंच उदधवस्त झाला. दु:खाचा कडेलोठ झाला. या अवस्थेत धीर न सोडता कुलदैवत श्री पाडुरंगाचे पाय ह्दयी दृढ धरले. भामगिरी येथे जावुन त्यांनी निर्वाण मांडले.त्याचा परिणाम साक्षात्कार होवुन पांडुरंगाच्या निर्गुण स्वरुपाचा अनुभव आला. आणि तुकाराम महाराजाचे नवीन अध्यात्मीक जीवन सुरु झाले.विठठलाच्या सगुण भक्तीच ते उपासक झाले.संसार करता करता त्यांनी विठठलाच्या भक्तीचा प्रसार त्यासाठी मंदिराचा जीर्णोधदार, ज्ञानेश्वरी. भागवताचे अहर्निश अमृतपान सुरु केले.रोज  किर्तनाचा रंग उधळु लागले.

कमलकलीका धातेपणे। हदयीच्या मकरंदा राखो नेणे.।।

एकांतातील प्रेमसुखाचा आनंद धेवुन त्याची एकप्रकारे खैरात मेघवृष्टी प्रमाणे लोकांना वाटली.श्री ज्ञानदेव श्री नामदेव व श्री एकनाथ या संत मंडळी नंतर याचा वारसा तुकोबाना मिळाला व त्यांनी तो नेटाने पुढे चालु ठेवला. तुकोबाची कारकिर्द जीवन प्रवाह वेगळा दिसतो. तुकोबाच्या जीवनासी व परिस्थीतीशी तुलना केल्यास अगदी भिन्न चित्रे दिसते. प्रांपचिक सुख दुःखे, कुटंबातील जिजाबाईसारख्या पत्नीची ऐहीक ओढतान, परीसरातील लोकांचे मत्सर, द्वेषाचे प्रसंग जगासी व मनासी झगडत शुद्र वंशी जन्म व ब्राम्हण विरोध अशा स्थितीत  बाबाजी गुरूभक्त स्वप्नात भेटले. व बाबाजी चैतन्य यांनी स्वप्नातच त्यांना अनुग्रह दिला. सर्वसामान्य परिस्थितीवर मात करुन ते असामान्य झाले. या सर्व अनुभवातुन गेल्यामुळे त्यांचे अतःकरण सहानुभुती पुर्ण व तितकेच ध्येय निष्ठेच्या बाबतीत तडजोड न करता कठोरवाणी उच्चारणारे बनले. लोकांना आपल्या दैनंदीन जिवनातील भावनेचे पडसाद त्यांच्या वाणीतुन पहावचयास मिळतात. त्याचा परिणाम त्या काळातील व आजच्या समाजातील लोकांना ते आपल्यातले व आपलेसे वाटले. त्यांची वाणी अगदी अशिक्षीत खेड्यावळणाची ह्दयात घुसुन विठ्ठल भक्तीच व सदाचाराचे पाझर फोडु लागले जसे एकनाथांनी भारूडाद्वारे वारकरी सांप्रदयाचे लोन खेडुताच्या सिमेपर्यंत पोहचविले.तर तुकोबांनी त्यांच्या ह्दयात घुसुन अढळ स्थान मिळविले व ह्दयातुन शुद्र देवता व शुद्र हिंसात्मक अचार

त्यांना हुसकावुन त्या ठिकाणी श्री विठ्ठलाची स्थापना केली व वारीच्या राज मार्गावर त्यांची पावले. दिंड्या पताकाच्या वैभवात टाळ चिपळ्या मृदंगाच्या नादात भीमा तीरावर संतानी वसविलेल्या नगराच्या दिसेन वाटचाल सुरू ठेवली. सर्वांना पोहचविण्याचे काम केले.

भीमातीर एक वसविले नगर । त्याचे नाव पंढरपुर रे ।।
तेथील मोकाशी चार भुजा त्यासी । बाईल सोळा हजार रे ।।
नाच जाऊ त्याच्या गावा रे खेळीया । सुख देईल विसावा रे ।।
पुढे गेले ते निधाय झााले । वाणीतील त्यांची सीमा रे ।।
संत सज्जनी मांडली दुकाने । जे जया पाहिजे ते आहे रे ।।
भुक्ती मुक्ती फुकाची साठी कोणी तयाकडे न पाहे रे ।।
न वजो म्हणतो आम्ही वैकुंठा जीही देखिली पंढरी रे ।।[११९]

या अभंगातुन भीमा तीरावर पंढरपुरात चार भुजा असलेला सोळा हजार स्त्रीयांचा मालक याच्याकडे नाचत खेळत जाऊ. तेथे सुख विसावा आहे तेथे या अगोदर गेले ते धन्य झाले. तेथे संताची आध्यात्माची दुकाने आहेत. जसा असेल तसे त्याला दुकानात मिळते. तेथे घनदाट असे दोन घाट भरलेले आहे ते वारकऱ्यांनी.

### श्री संत तुकारामाचे कार्ये

बहुजन समाजास प्रवृत्त :- श्री तुकाराम महाराजांनी भूवैकुंठ पंढरीकडे मोठ्या जमावाने व सोहळ्याने नाचत गात जाण्यास व आषाढी-कार्तिकरुपी दोन्ही बाजारात आपल्या जिवनास कृतकृत्य करणारी भक्तिप्रेम सुखाच्या संपत्तीची पुरेपुर साठवण करण्यास बहुजन समाजास प्रवृत्त केले. पंढरीरायाचे खेळकर सोंगडी सगळ्यांनी बनावे यासाठी त्यांनी अत्यंत कळवळीत उपदेश केला. त्या उपदेशामुळे सामाजीक जिवनात पांडुरंग प्रितीचे लळा लगला व त्यांची चित्ते ही नवनीताहुन निर्मळ होण्यास सहाय्य झाले आणि त्यांना खरेखुरे भाई बनवले. तुकाराम महाराज म्हणतात-

खेळ मांडियेला वाळवंटी धाई । नाचती वैष्णव भाई रे ।।
क्रोध अभिमान केली पावटणी । एका एका लागती पायी रे ।।
नाचती आनंदकल्लोळी पवित्र । गाणे नामावली रे ।।

कळीकावर घातली कास । एक एकाहुणी बळी रे ।।

गोपीचंद उटी तुळशीच्या माळा । हार मिरवीती गळा रे ।।

टाळ मृदंग घाइ पुष्प वरुषाव । अनुपम्य सुख सोहळा रे ।।

लुब्धली नादी लागली समाधी । मूठ जन नरनारी लोका रे ।।

पंडीत ज्ञानी योगी महानुभाव । एकची सिद्ध साधका र।।

वर्ण अभिमान विसरली यानी । एक एक लोटांगनी जाती रे ।।

निर्मळ चित्ते झाली नवनिते ।। पाषाणा पाझर फुटती रे ।।

होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले वैष्णव वीर रे।।

तुका म्हणे सोपी केली पायवाट । तारावया भवसागर रे ।।[१२०]

ते ज्ञानेश्वरांना बाप मानत होते व या बापाने मला उत्तम ज्ञान दिले. त्यांच्याकडुन अपणास ज्ञान मिळाले तेच मी लोकापर्यंत पोहचवत आहे. ते तुकाराम महाराज स्वतः सांगतात–

माझे बापे मज दिधले भातुके । म्हणुनी कवतुके क्रिडा करी ।।

केली आळी पुढे बोलीलो वचन । उत्तम हे ज्ञान आले त्याचे ।।

घेऊनीया विभाग जावे लवलह्या । आलेती त्या ठाया आपुलीया ।।

तुका म्हणे ज्ञानदेवी समुदाय । करावा मी पाय येईन वंदू ।।[१२१]

१) वैष्णवाचा समुदाय वाढविला–

ज्ञानेश्वरा सारख्या संतांचा संदेश घराघरात पोहचविणे व वैष्णव भक्ताचा समुदाय घेवुन ज्ञानेश्वरांच्या व पाडुरंगाच्या दर्शनास पोहचविणे हे तुकोबांनी आपले जिवन कार्य मानले.तुकोबांनी भक्तिप्रेम सुख सेवन केले व ते आपल्या अभंगाद्वारा त्यांनी सर्वांना वाटला–

सेवितो हा रस वाढितो आणिका ।

ध्यारे होऊ नाका रानभरी ।।

विटेवरी ज्याची पाऊले समान ।

तोची एक दानशुर दाता ।।

मनाचे संकल्प पाववील सिद्धी ।।

घरी राहे बुद्धी याचे पायी ।

तुका म्हणे मज धाडीले निरोपा ।

मार्ग हा सोपा सुखरूप ।।[१२२]

संतांनी धन्याच्या भांडारा प्रमाने,आध्यात्म,शांती,सुख देणारे भांडार मांडले आहे व वाटणारा मी हमाल आहे असे तुकोबा सांगतात.

संती पाहिले लाविले निशाण । ते खुणा पावेन नामगर्जु ।।

फोडीले भांडार धान्याचा हा माल । मी तव हमाल भारवाही ।।

**संतांचा मार्ग साफ व स्वच्छता**

जगामध्ये अनेक प्रकारचे लोक व इतर नाना प्रकारचे साधने स्विकारून आडरानात फिरताना दिसतात. हे तुकोबांनी पाहिले. या अडरानात अडकलेल जग आहे. संताच्या मार्गावरही केरकचरा टाकण्यात आला. तो साफ करणे हे कर्तव्य आहे. ते तुकाराम महाराज म्हणतात

झाडु संताचे मारग । आडरानी भरले जग ।।

उच्छीष्ठांचा भाग । शेष उरले ते सेवू ।।[१२३]

**सेवकांचे काम व कर्तव्य**

संतांच्या घरातले अन्न खात आहेत. त्याची इमानाने केली तर त्या अन्नावर आपला हक्क असतो. प्राणपणाने स्वामींची आज्ञा पाळणे. इतर कोणाचही धाक न धरता निर्भीडपणे निरोप सांगणे हे सेवकांचे ब्रीद होय हेच तुकोबांनी केले. संतांनी जे सांगितले तेच निर्भीडपणे लोकांना सांगितले. व लोकांना त्याचप्रमाणे सेवकाचे काम करावे ते टाळु नये जोयपर्यंत प्राण आहे तोपर्यंत प्रामणीक पणे काम सेवक म्हणुन करणे.

सेवकांशी आज्ञा स्वामींचे प्रमाण । जोवरी हा प्राण जायी त्यांचा ।।

आणिकाचा धाक न धरावा मनी । निरोप वचनी टाळु नये ।।

समय सांभाळुनी आगळे उत्तर । द्यावे भीदी व्रज तयापरी ।।

तुका म्हणे तरी म्हणवावे सेवक । खादले ते अन्न हक्क होय ।।

निरोप सांगता । न धरी भय न करी चिंता ।।[१२४]

समाजातील काही वर्ग ढोंगी पणा करून समाजाला व स्वतःलाही फसवतात अधोगतीच्या मार्गाने जातात. तुकाराम महाराज या वर्गामध्ये प्रथम ब्राम्हण ढोंगी गुरू शाक्त मनभाव देवधर्माची

निंदा करणारे पाखंडी तसेच राजकीय पारतंत्र्य, अनाचार मोगली काळातील धर्माची बिघडलेली स्थिती याबाबत तुकाराम महाराज या अभंगातुन वर्णन करतात.

सोडोनीया राम राम । ब्राम्हण करती दोम दोम।।

सांडीले आचार । द्वेज घाले चहाडखोर ।।

टिळे लपविती पाथाडी । लेती विजारा कातडी ।।

संता नाही मानी । देव मानी मुसलमान ।।[१२५]

अशा विरोधी स्थितीत तुकोबांनी खंबीर पणे तोंड देवुन निर्भिड पणे खऱ्या भक्तिधर्माचे स्वरूप जनतेस दाखवुन दिले पंढरी सारख्या श्रेष्ठ धर्मभुमीकड वारी करण्याची जनतेत आवड व उत्साह निर्मान केला.या संदर्भात त्यांनी वारंवार उपदेश केला–

जाय जाय तु पंढरी । होय होय वारकरी ।।

सांडोनिया वाळुवंट । काय इच्छिसी वैकुंठ ।।

खांद्या पताकांचे भार । तुळसी माळा आणि अबीर ।।

साधुसंताच्या दाटणी । तुका लोटांगणी ।।[१२६]

वारी याच मार्गांनी सर्वांनी जावे, कारण साधुसंत याच मार्गाने अगोदर गेले, त्याच मार्गांनी आपण जावे असे तुकाराम महाराज सांगतात.

मारगी बहुत: । याची गेले साधुसंत ।।

नका जाऊ आडराने । ऐसी गर्जती पुराणे ।।

चोखाळिल्या वाटा । नलगे पुसाव्या धोपटा ।।[१२७]

वारीत पंढरपुरला जाणाऱ्या मध्ये कोणताही भेदभाव राहत नाही. खळ म्हणजे वाईट व्यक्ती, त्याला देखील पाझर फुटतो.–

उठा उठी अभीमान । जाय ऐसे स्थळ कोण ।।

ते या पंढरीस घडे । खळा पाझर रोकडो ।।

नेत्री अश्रुंच्या धारा । काठे रोमांच शरीरा ।।

तुका म्हणे काला । कोठे अभेद देखीला ।।[१२८]

तुकोबांनी पारमार्थिक शिकवन चोखपणे दिली त्याचप्रमाणे व्यवहारिक दिली. गबाळ प्ररमार्थ त्यांना अजीबात मान्य नव्हता त्याचप्रमाने गबाळ व्यवहारही त्यांना मान्य नव्हता. तुकाराम महाराज धन मिळवीतांना व ते खर्च करतांना उत्तम व्यवहार असावा असे म्हणतात.–

जोडुनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।[१२९]

ज्या प्रमाने शिवाजी राजानी आपली सर्व शक्ती मराठ्यांचे हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी रणक्षेत्रात वापरली. त्याच प्रमाने तुकोबांनी आपले सर्व सामार्थ्य धर्मक्षेत्रात भक्तिधर्माचे साम्राज्य रूढविण्यासाठी खर्च केले व ते सार्थ ठरवीले. म्हणुन त्यांच्या कार्यामुळे त्यांना तुका झालासे कळस ही उक्ती सार्थ ठरते.वारकरी संप्रदायाचा प्रेम धर्माची ध्वजा त्यांनी उंच उभारली. भक्ती प्रेमाच्या आड येणाऱ्या सर्व भ्रामक समजुटीचे उच्चाटन करण्याचा निकराचा प्रयत्न त्यांनी आपल्या कणखर शब्दांनी केला. तुकोबांच्या प्रेमाच्या मंडळीत महाजीपंत कुलकर्णी देहुकर, गंगाराम मवाळ कडुसकर, संताजी तेली जगनाडे, गबरशेट वाणी संदुबेकर, मालजी गाढे येलवाडीकर, मल्हारपंत कुलकर्णी चिखलीकर, कोंडोपंत लोहकरे, शिवबा कासार, नावजी माळी, अंबाजी लोहगावकर, कोंडाजी पाटील खांदवे, रामेश्वर भट, ही मंडळी तुकोबारायांचे किर्तनाचे टाळकरी होय. संत तुकाराम महाराज यांच्या वारकरी परंपरा पुढे सुरू ठेवणारे योग्यतेचे पुरूष निराळेच होते. ते म्हणजे पिंपळानरेचे निळोबा होय. निळोबा हे तुकोबारायांचे पुत्र नारायण महाराज यांचे समकालीन होते. नारायण व निळोबा यांची भेट झाली.या भेटीदरम्यान निळोबांना तुकाराम महाराज यांची भक्ती महिमा श्रवण झाल्यावर निळोबांना तुकोबांचा ध्यास लागला त्याचा या ध्यासाने त्यांना तुकोबाचा दृष्टांत झाला व प्रसाद मिळाला.

जगद्‌गुरू तुका अवतार नामयाचा । सांप्रदाय सकळांचा तेथुनिया ।।

निळा म्हणे मज उपदेश केला । सांप्रदाय दिला सकळजणा ।।[१३०]

तुकोबांच्या प्रसादानंतर निळोंबांनी अभंगरचना केली. व त्यांनी किर्तन भजना द्वारे सांप्रदायाचे उत्तम सेवा केली. विशेषतः त्यांनी ३३२ श्लोकात श्री तुकोराम स्तुती वर्णिली आहे.त्यांच्या अभंगाचे भाषा अगदी अर्वाचिण आहे. व वाणीत प्रसाद आहे. त्यांच्या अभंगरचनेत गौळणी हे विशेष प्रकरण आहे. त्यांच्या उपलबध अभंग १५०० च्या जवळपास आहेत . एका गौळणी अभंगातुन ते तुकोबारायांचे वर्णन अत्यंत ह्रदय पुर्वक करतात.

दळणी कांडणी गाईन मंगळी । कान्हो वनमाळी प्राणसखा ।।

हरीचिया नामे हरीती महादोष । तुटती कर्मपाष निमीष मात्रे ।।

श्री सद्गुरूरायांची पाऊले गोमटी । वंदीताची भेटी हृद्यस्था ।।

माझ्या सद्गुरूचे अवलोकिता मुख । समाधीचे सुख तुच्छ वाटे ।।

सद्गुरूरायाचें स्वरूप पाहाता । विश्वी एकात्मतता भासु लागे ।

नित्य सद्गुरूची अळविता नामे । येती निजधामे भेटो सये ।।

सद्गुरूस्वामीचा महिमा अगाध । वचनेची बोध करी शिष्या ।।

सद्गुरू सद्गुरू करिता उच्चार । येती हरीहर भेटो सये ।।

सद्गुरूच्या नामे पोट माझे घाये । आनंदाचा होय पाहुणे ।।

निळा म्हणे माझ्या सद्गुरूची मुर्ती । सकळाही विश्रांती विश्रांतीसी ।।[१३१]

निळोबा हे तुकाराम महाराजांना गुरू मानत असल्याने ज्याप्रमाणे कुस्ती शिकविण्याऱ्यास वस्ताद म्हणजे गुरू मानले जाते तसे आध्यात्म्य व वारकरी सांप्रदायात तुकाराम महाराज म्हणजे वस्ताद असे निळोबाराय म्हणतात. हे वस्ताद आपल्या सर्व शिष्याना रोगाचे दिव्य औषध देऊन रोग बरा करून देण्याची पैजेने सांगतात.

वंदुनी तुकया सद्गुरूचे चरण । ब्रम्हानंदे गर्जोनी पुर्ण ।।

स्वानुभव भरे हाकारून । औषध घ्या घ्या म्हणतसे ।।

निजात्म नगरी होणे धडफुडा । वैद्य आलो गा तुमचिया चाडा ।।

तोडीन नाना व्याधींचा झगडा । करीन तो रोकडा अमर ऐसा ।।

घेता माझी दिव्य ओषधे । सनकादिका निघाली दोंदे ।।

महर्षी मातले ब्रम्हानंदे । जाणिजे नारदे प्रतीतीहे ।।

निळा म्हणे वस्ताद माझा । शिदी असता सद्गुरूराजा ।।

निवारीन रोग घेऊनी पैजा । धरीता ओझा विश्वास मनी ।।[१३२]

या गौळणीवरून वस्ताद तुकोबाराया मानुन तुकोबाराय ब्रम्हानंद घेतात व ते इतरांनी नारदाप्रमाणे आनंद देतात. असे वस्ताद हे माझे सद्गुरूराजा आहे.हे निळोबा सांगतात.साधारणतः भक्त देवाकडे मागणी मागतो पण निळोबाराय हे गौळणीद्वारे स्पष्ट सांगतात की भक्त असे बलवान आहे की देवच भक्ताकडे मागणी मागतो. की मी तुमच्या संगतीत राहो. माझ्या विश्रांतीचे घर हे तुम्ही धारण केलेले शरीर आहे.

राहेन आता तुमच्या संगे । हेची मागे भक्तासी ।।

हेची द्या आता उदारपणे । माझे करणे रूपनाम।।

विश्रांतीचे माझे घर । तुम्ही जे शरीर धरीले ।।

निळा म्हणे भक्तापासी । भाकी ऐसी कीव देव ।।[१३३]

या पद्धतीने त्यांनी अभंग गौळणीच्या आधारे किर्तनातुन निळोबारायांनी उपदेश केला. मनुष्याने मनुष्य जन्माचे हित साधण्यासाठी पंढरी मार्ग धरला पाहिजे. निळोबा अभंगातुन सांगतात.

सांगतो हे मनी धरा । हित करा आपुले ।।

जारे पंढरीसी आधी । कृपानिधी भेटल ।।

अवघीच सुखे अलौकीके । देईल एके दर्शने ।।

निळा म्हणे ऋद्धी सिद्धी । मुक्ती पदी लागती ।।[१३४]

आधी पंढरीला जा तेथे अलौकीक सुख आहे. वारी करा वारीतुन सुख मिळेल हे निळोबाराय सांगतात. अखंड विठोबाचे नामस्मरण व गुरूतुकाराम महाराजांच्या उपदेशानुसार मार्ग क्रमण करून समाज घडविण्याची महान कार्ये करून आपल्या गुरूच्या निर्वाण दिवशी म्हणजे फाल्गुन वैद्य २ आपला देह ठेवला.

## ३.६ तदनंरच्या वारकरी संप्रदायाचा कालखंड

निळोबारायांनतर ३०० वर्षांच्या कालखंडात वारकरी सांप्रदयाची धुरा सांभाळणारे अनेक सद्पुरूष पुढे आले. त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांपासुन ते निळोबाराय यांच्यापर्यत आलेल वारकरी सांप्रदयाची धुरा व परंपरा पुढे चालु ठेवली. यापैकी सद्पुरूष महिपतीबुवा कांबळे नाराहाबादकर शके (१६३७– १७३२) यांनी संतलीलामृत भक्तीलीलामृत असे उत्कृष्ठ ग्रंथ लिहले. या ग्रंथांत त्यांनी संत व साधु यांचे चरित्र वर्णन केलेले आहे. श्री शंकरा स्वामी शिरूरकर – यांना निळोबानंतर उपदेश प्राप्त झाला. यांनी हे परंपरा पुढे चालु ठेवली. त्यांची समाधी औरंगाबाद जाळ शिरूर गावी आहे. येथेच बहिणाबाई यांची समाधी आहे. मल्लापा वासकर शके (१६३१ १७२१)शंकर स्वामी यांपासुन यांस उपदेश प्राप्त झाला. यांनी प्रथम फड ही पद्धत सुरू केली नाथांच्या पुर्वी भजनाचे फड होते. पण तुकाराम महाराजानंतर ही परंपरा लुप्त झाली असावी ही फड परंपरा मल्लापा यांनी पुन्हा सुरू करून वारकरी भजनी मंडळ यांना एकत्र आणले व नियोजन नियम तयार करून भजनाची व किर्तनाची पद्धत आमलात आणली. पुढे या फडातुन देहुकर बाहेर

पडले. त्यांनी स्वतंत्र फड तयार केला. पुढे फडांची संख्या वाढली. पण आप्पटी वासकरांच्या फडाचे विशेष महत्व व अग्रस्थान मानले जाते.यानंतर पुढे पालखी सोहळ्याचे प्रवर्तक हैबतबाबा ,वासुदेव बुवा देहुकर, ठाकुरदास बुवा, चातुर्मास्य महाराज बाबासाहेब आजरेकर, भाऊसाहेब काटकर, भानुदास महाराज बेलापुरकर, रामभाऊ देहुकर, कृष्णा महाराज गाखडेकर, गंगु काका शिरवळकर , साखरे महाराज, विष्णुबुवा जोग, दादा महाराज सातारकर मामासाहेब दांडेकर, कराडकर बंकटस्वामी लोहिया महाराज इत्यादी प्रसिद्ध कर्तबगार सद्पुरूष जन्माला आले. व त्यांनी वारकरी सांप्रदयाचे कार्य व संतांनी सांगितलेली परंपरा आजपर्यंत टिकवुन ठेवली. ही परंपरा आज यावरील सर्व मंडळींच्या शिष्याकडुन पुढे अविरत पणे चालु आहे.आज महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर वारकरी सांप्रदयाची वाढ दिसते. त्यामध्ये महत्वाचे कार्य करीत वर्णन केलेल्या संत मंडळी व त्यांचे शिष्य परंपरातील आजचे शिष्य, किर्तनकार प्रवचनकार भगवतभक्त उपासक प्रबोधनकार हे कार्य करतात. त्यांच्या या कार्यातुन आज भक्तीचा व वारीचा प्रवाह अति उत्साहाने सुरू आहे. आषाढ महिन्यात पंढरीला जाण्याची वारी ही परंपरा मोठ्या उत्साहाने व प्रंचड लाखोच्या संख्येने वारकरी एकत्र येऊन आळंदी ते पंढरपुर, देहु ते पंढरपुर, व महाराष्ट्र व महाराष्ष्बाहेरील इतर भागातुन पंढरपुरला दिंडीच्या रूपाने दरवषी येतात. दरवर्षी या संख्येत वाढ होत आहे. हे वारकरी सांप्रदयात कार्यरत असणाऱ्या सध्याच्या किर्तनकार व संताच्या शिष्यपरिवाराचे पाईक असणाऱ्यांचे फलीत होय.

## ३.७ श्री पांडुरंग उपासकांचे चार सांप्रदाय

वारकरी सांप्रदाय हा विठ्ठलाचा प्रमुख उपासक म्हणजे भकती करणारा वारकऱ्यांचा सांप्रदाय मानला जातो समाज जिवनात कशाप्रकारे मार्गक्रमण करायचे कोणावर व कसा विश्वास व श्रद्धा ठेवावी, कोठी ठेवायची, क्षेत्र व तत्वज्ञान त्याचा अनुभव या सर्वांचा मिळुन होतो तो सांप्रदाय. याचा विचार करून वारकरी सांप्रदयात मार्गक्रमण करून आपला वेगळा विचार मांडुन विठ्ठलाची उपासना, भक्ती करणाऱ्या उपासकाचे चार सांप्रदाय वारकरी सांप्रदयात अंतर्भुत होतात. चैतन्य, स्वरूप, आनंद, प्रकाश

**१. चैतन्य :-**

या सांप्रदयात नाममंत्र उच्चारणावरून दोन भाग पडतात. एक आहे तो रामकृष्णहरी हा षडाक्षरी मंत्र आहे. दुसरा मंत्र ओम नमो भगवते वासुदेवाय . हा द्वादशाक्षरी मंत्र आहे. रामकृष्णहरी या

मंत्राविषयी सविस्तर माहिती देणारा तुकाराम महाराज व निळोबाराय यांचा अभंग उपलब्ध आहे. या अभंगातुन रामकृष्णहरी हरी हा मंत्र बाबाजी यांनी तुकाराम महाराज यांना दिला. तो दिवस माघ शुद्ध दशमी वार गुरूवार होता.

सत्यगुरूराय कृपा मज केली । परी नाही घडली सेवा काही ।।
सापडविले वाटे जाता गंगास्नाना । मस्तकी तो जाणा ठेवीला कर।।
भोजन मागती तुप पावशेर । पडीला विसर स्वप्नमाजी ।।
काही कळे उपजला अंतराय । म्हणोनीय काय त्वरा झाली ।।
राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खुण मालिकेची ।।
बाबाजी आपुले सांगितले नाम। मंत्र दिला रामकृष्ण हरी ।।
माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरूवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।[१३५]

निळोबारायांनी चैतन्य सांप्रदयाचे मुळ सांगितले आहे. त्यांची परंपरा सांगितली आहे. तो अभंग पुढीलप्रमाणे –

मुख्य महाविष्णु चैतन्याचे मुळ । सांप्रदाय फळ तेथुनिया ।।
हंसरूपी ब्रम्हा उपदेशी श्रीहरी । चतुःश्लोकी चारी भागवत ।।
ते गूज विधाता सांगे नारदासी । नारदे व्यासासी उपदेशीले ।।
राघवचैतन्य केले अनुष्ठान । त्यासी द्वैपायेन कृपा केली ।।
कृपा करूनिया हस्त ठेवीयली क्षिरी । बोध तो अंतरी ठसावला ।।
राघवाचरणी केशव शरण । बाबजीशी पुर्ण कृपा त्याची ।।
बाबजीने स्वप्नी येऊनी तुकयाला । अनुग्रह दिला निजप्रती ।।
जगद्‌गुरू तुका अवतार नामयाचा । सांप्रदाय सकळांचा तेथुनीया ।।
निळा म्हणे मज उपदेश केला । सांप्रदाय दिला सकळजना ।।[१३६]

या अभंगात राघवचैतन्य केशवचैतन्य बाबाजी असे तीन व्यक्तीची नावे आली आहेत. कै. पांगारकर प्रभुती यांनी याला मान्यता दिली. तर काही संशोधकांनी केशवचैतन्य हेच राघवचैतन्य असल्याचे सांगुन दोन व्यक्ती मानतात. तर अलीकडील संशोधकांनी या तीन व्यक्ती असल्याचे मानले आहे. राघवचैतन्य यांची समाधी कल्याणगुलबर्न्याजवळ आळंदरगुर्जोपीस आहे. केशवचैतन्य यांची समाधी पुणे जिल्ह्यातील ओतुर गावी आहे. तर बाबाजी चैतन्य यांची समाधी मन्याहाळ येथे

आहे. अशी माहीती इतिहास संशोधक श्री बेंद्रे हे देतात. तसेच या सांप्रदयाचे माहीती देणारा दुसरा एक अभंग आहे.

आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।

मच्छिंद्रानी बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वळला गहिणीप्रती ।।

गहिणीप्रसादे निवृत्ती दातार । चोजविला सार ज्ञानदेवा ।।[१३७]

ही एक परंपरा सांगितली जाते. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील बहुतेक वारकरी चैतन्य संप्रदायाचेच आहे.

**२. स्वरूप संप्रदाय–**

या संप्रदायाचा श्री राम जय राम जय जय राम असा तेरा अक्षरी मंत्र आहे. या मध्ये दोन भाग येतात.

अ. रामानुजीय –

या पंथाचे सर्व शिल्प हे कपाळावर गंध रूपाने नाबंडी रेषा लावतात.या पंथाचे मुख्य शिष्यामध्ये मुल्हेकर, सखारामबुवा अंमळणेकर व भानुदास बेलापुरकर इ.

आ. रामानंदी –

या पंथाचे शिष्य हे कपाळावर गंध रूपाने हे पांढरी रेषा लावतात. ही या पंथाची ओळख असते.

या पंथाच्या शिष्यामध्ये रामानंद, कबीर, कमाल इ. मंडळी येतात. स्वरूप संप्रदायाची वेगळी ओळख ही त्याच्या शिष्य मंडळीच्या कपाळावरील गंध लावण्याच्या पद्धतीने स्पष्ट जाणवते.स्वरूप संप्रदायाचे दोन भाग हे रामानुज व रामानंद यांच्या तत्वज्ञान सांगणाऱ्या मागणीमुळे व तत्वज्ञानाचे दर्शन समाजाला पटवुन देण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे पडतात. त्यामुळे त्यांच्या नावानेच सांप्रदाय ओळखला जातो.

**३. आनंद सांप्रदाय**

या सांप्रदयाचा मंत्र श्रीराम असा तीन अक्षरी असा आहे. व राम असाही घेतला जातो. या सांप्रदयाचे मुख्य प्रवक्ते नारद, वाल्मीकी सेना न्हावी इतर मंडळी आहे.

### ४. प्रकाश सांप्रदाय

या सांप्रदयाचा मंत्र हा ॐ नमो नारायण असा आहे. यात मुख्य शिष्य श्री एकनाथ महाराज हे येतात. एकनाथ महाराजांनी प्रकाश यांप्रदयाचे वर्णन अभंगातुन केले आहे. जो निर्गुण आहे. तो निराभास आहे. तो दिसत नाही. या सांप्रदयात आदि गुरू आदिनारायण यास म्हटले जाते. आदिनारायण याने ब्रम्हाला अनुग्रह दिला तर ब्रम्हाने अत्री या उपदेशिला अत्री याने दत्तात्रय यास उपदेश दिला दत्तात्रयाकडुन सहस्त्रार्जुन यदु व जनार्दन स्वामी यांच्याकडुन श्री एकनाथ महाराजाला मंत्र मिळाला.

जो निर्गुण निराभास । जेथुनी उद्‌भद शबल ब्रम्हनाश ।।
आदिनारायण म्हणती ज्यास । तो सर्वास आदिगुरू ।।
तयाचा ब्रम्हा अनुग्रहितु । ब्रम्हा अत्रीस उपदेशित ।।
अत्री पाद प्रसादित । श्री अवधुत दत्तात्रय ।।
दत्तात्रय परंपरा । सहस्त्रार्जुन यदु दुसरा ।।
जनार्दन शिष्य तिसरा ।। केला खरा कलियुगी ।।
जनार्दन कृपेस तव जाणा । समुळ निसरले भवबंधण ।।
एका जनार्दनी शरण । झाली संपुर्ण परंपरा ।।[१३८]

वरील चारही सांप्रदयाची मंत्र वेगवेगळे आहे. पण सर्व मंत्राचा उच्चार केल्यानंतर मिळणारे फळ एकच आहे. ते सर्व सर्व देवांच्या आदि देव विठ्ठल यांच्या भक्तीसाठी निवडलेला मंत्र उच्चार आहे. हे संप्रदाय वारकरी संप्रदायाला अनुसरूनच आहे.

## ३.९ वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान

संत ज्ञानेश्वरांपासुन पुढे अनेक संतांनी व तत्ववेत्यांनी वेद उपनिषदे गीता या ग्रंथाचे व भगवंताचे जगताचे स्वरूप आपल्या ग्रथांतुन व अभंगातुन व वाणितुन तत्वज्ञान या स्वरूपाने मांडले आहे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी एकनाथांचे भागवत व तुकोबारायांची गाथा हे वारकरील सांप्रदयाची प्रमुख ग्रंथावली मानली आहे. सर्व संताच्या विचारांचा एक परिपुर्ण अर्थ म्हणजे वारकरी सांप्रदाय हा पुर्णपणे शुद्ध भक्ती मार्गे आहे. यावरून महत्वाचे तीन प्रवाह मांडता येतात.

१. ज्याची भक्ती करायची तो परमेश्वर त्याचे स्वरूप
२. जो भक्ती करतो त्या मानवी जीवनाचे स्वरूप

३. जगाचे स्वरूप

परमेश्वर व अंतीम सत्य जाणण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. यथार्थ ज्ञानाचे साधन म्हणजे प्रमाण होय. ज्ञानाचे साधन सहा मानले जातात. प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, उपमान, अर्थाप्ती व अनुपल्लत्वी या आधाराने आत्मज्ञान दर्शन प्राप्ती येते.

**स्वतः सिद्ध परमात्मा**

संत ज्ञानेश्वर असे म्हणतात की कोणताही मानवी जीवनातील व्यवहार हा चैतन्य स्वरूप आत्मा शिवाय घेऊ शकत नाही. आत्मा आहे म्हणुंन नेत्राने पाहता येते. बुद्धी अनुमान करू शकते. अर्थात सर्व मानवाचे व्यवहार आत्मानेच चालते. आत्मा हा स्वतः सिद्ध आहे. ज्ञानेश्वर महाराज सांगतात

कोणाही प्रमानेचोनी हाते । वस्तु घेणानेघे आपणयाते ।।

परमात्मा कोणत्याही स्वरूपाने सिद्ध करता येत नाही. तो त्याचप्रमाणे सिद्ध करता येते. ज्याप्रमाणे दिवा हा दिवा लावण्यामुळे दिवा सिद्ध होते. त्याचप्रमाणे ज्याप्रमाणे तो सिद्ध करायचा याच्या आस्तित्वामुळे सिद्ध असते हे ज्ञानेश्वर महाराज उदाहण सांगतात

दिपु दावी तयाचे रची । की तेणेची सिद्धीदिपाची ।।

तैसी सत्ता निमीत्ताची । येणे साच ।।[१३९]

म्हणजे परमात्मा प्रकाशमान आहे. व स्वतः सिद्ध आहे. ज्ञानेश्वर महाराज तेच सांगतात.

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।।

जे जे स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।[१४०]

याचा अर्थ आत्मा व स्वयं वैद्य आहे. तो स्वतः चा प्रकाशित आहे. जसा सुर्याने सुर्य दिसतो हे एकनाथ महाराजांनी भागवतात सांगितले आहे.

एवं सर्वाचे ते जाणते । परी सर्व सर्वया येणे जाते ।।

ज्यासी जाण वयालागी येथे । आणिक जाणते असेना ।।

ऐसे स्वयं वैद्य निजज्ञानी ।[१४१]

जो सर्वांचे जाणणारा तो सर्वथा आहे. त्याला जाण्यासाठी एकच स्वयंत निजज्ञान आवश्यक आहे.

## सच्चिदानंदरूपता

परमात्मा हा आनंदरूप व चिद्रुप आहे. म्हणुन त्याला सच्चिदानंद म्हणतात. यामध्ये सत् चित्त् व आनंद ही पदे येतात. यातीन ही पदाचा अर्थ एकच हे दृश्यतानी स्पष्ट करताना सत्ता प्रकाश व सुख असा अर्थ सत् चित् आनंद या पदाचा होतो.उदाहरण ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट करतात.

१. जसे कांती कठिणपणा व सुवर्णत्व मिळुन एकच सोने तयार होते.

२. पाताळपणा गोडी व अमृततत्व मिळुन एक अमृत

३. सुगंध शुभ्रपणा व मृदता मिळुन कापुर

हे दृष्टांत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत सांगतात.

कांती काठिण्य कणक । तिन्ही मिळुनी कनक एक ।।
द्राव गोडी पीयुख । पीयुखची जेवी ।।
उजाळ दृती मार्दव । या तीही तीही उणीव ।
हे देखिजे सावेव । कापुरी एकी ।
अंगे कीर उजाळ । ही उजाळ तेची मवाळ ।।
दोन्ही ना परिमळ । मात्रची ते ।।
ऐसे एके कापुरपणी । तिन्ही इये तीन्ही उणी ।।
इयापरी आटणी । सत्तादिकांची ।।[१४२]

याप्रमाणे सत् असत् नाही. चित् हा जड नाही. व आनंद हा दुःख नाही. असा सांगणारा सच्चिदानंद स्वरुप परमात्मा आहे. पण या शब्दवाचकाच्याही पलीकडे परमात्मा आहे. त्यास अनयव्यवृत्तीवाचक असे म्हणतात. याच्या पलीकडे परमात्मा आहे.

एवं सच्चिदांनदु । आत्मा हा ऐसा शब्द ।
अन्यव्यावृत्तीसिद्ध । वाचकु नव्हे ।।
जेथे नाही गुणागुण । नाही काथीसी कारण ।
तो तु गुणीातीत । परीपुर्ण रे ।।
कान्हो सच्चिदांनद शब्द अरूतारे ।।[१४३]

## शुन्यवाद

परमात्मा आहे व नाही याच्यापलीकडे म्हणजे तो शुन्यच म्हणावे.या बौद्ध तत्वाचे ज्ञानेश्वर म. व इतर संतानी खंडण केले आहे. शुन्य आहे असे सांगणारा तो शिल्लक असतो. हे ज्ञानेश्वर महाराज दृष्टांतात व उदाहरणासह स्पष्ट करतात.

तरी काही नाही सर्वथा । ऐसी जरी व्यवस्था ।।
तरी नाही हे प्रथा । कवणासी पा ।।
शुन्य सिद्धांत वोधु। कोणे सत्ता होय सिद्धु ।।
नसता हा अपवादु । वस्तुसि जो ।।[१४४]

वरील ओव्यांच्या माध्यमातुन ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत शुन्यवाद सिद्धांताला अपवाद आहे हे स्पष्ट करतात. हे स्पष्ट करताना ते समर्पित दृष्टांत देतात

माल्हविता दिवे । माल्हाविते जरी म्हालवे ।।
तरी दिपु नाही हे फावे । कोणासी पां? ।।
का निदेचिनी आलेपणे । निदेले ते जाय प्राणे ।।
तरी नीदभली हे कोणे । जाणिजेल पा ।।
घटु घटपणे भासे । तदभंगे भंगु अभासे ।।
सर्वथा नाही तै नसे । कोणी म्हणावे ।।[१४५]

या दृष्टांताचा अर्थ

ज्याने दिवा मालविल्या असतो तोच मेला तर दिवा नाही असे कोण सांगणार. झोप आल्यावर जर त्याला झोप आली तर तो झोपेतच मेला तर झोप कशी झाली झोप चांगली कि वाईट झाली हे कोण सांगणार. जर घट दिसत असेल व तो नंतर नाश झाला तर तो पाहण्याऱ्या सह सर्वच नाश झाले तर हे कोण सांगणार याप्रमाणे शुन्य सांगणारा जर शुन्य झाला तर शुन्य कोण म्हणणार याचा अर्थ असा परमात्मा आहे. नाही त्याच्या पलीकडे देखील तो शुद्ध आस्तित्वात असतो. यासाठी दुसरे एक उदाहरण

जो निरंजनी निदेला । तो आणि की नाही देखिला ।।
आपुला ही निमाला । आठवु तया ।।
परी जीवे नाही नोहे । तैसे शुद्ध असणे आहे. ।।

हे बोलणे न साहे । असे नाही चे ।।[१४६]

निर्जन अरण्यात एखादा व्यक्ती झोपलेला असेल तर तेथे कोणी दुसरा नसल्यास दुसरा विषय नाही म्हणजे तो नाही असे होत नाही या शुन्य वादाला बौद्ध मताला ज्ञानेश्वरीत गणेशांच्या हातातील मोडक्या दाताची उपमा दिली .

एके हाती दंतु । जो स्वभावता खंडितु ।।
तो बौद्ध मन संकेतु । वार्तिकांचा ।।[१४७]

एकनाथ महाराजांनी देखील शुन्यवाद कसा चुकीचा आहे हे दृष्टांताने स्पष्ट केले आहे.

सुख सुखत्व जेथ नाही । तरी शुन्यवाद आला पाही ।।
शुन्य जाणवले जिये ठायी । ते तव शुन्य नव्हे की ।।
हो का चंद्रमा तिथे अवसे । स्वयं प्रकटे ना कोणा दिसे ।।
मी चंद्रमा आहे ऐसे । तो तव जाणे ।।
राय विनोदे जाला संन्यासी । स्वंये संपादु जाणे तया वेषासी ।।
सत्यत्व मानले लोकांसी । परी तो आपणापे जाणी ।।
सर्व ग्रस्तोदय ग्रहणी । स्वंय प्रगटी तरणी ।।
पाहतान देखिची कोणी । तरी काय सुर्य नाही ।।
तैसे शुन्य तरी जेणे जाणितले । त्यास शुन्य जाय केवी केले ।।
आंख गणिता शून्य आले । परी गणकू शून्य नव्हे की ।।
यालागी शून्य समतवादा । माथा नुधवेची शब्दा ।।
शुन्य साक्षित्व शून्यवादा । नास्तिक्य आली ।।[१४८]

अर्थात शुन्यवादाचे खंडण आपल्या संताने केले आहे,
शून्यता शून्यवाद प्रतिपादणारा शिल्लक राहतो.

## प्रकृती

प्रकृतीमध्ये पुरूष हा चेतन व प्रकृती ही जड आहे. तसेच पुरूष व प्रकृती ही स्वातंत्र्य नावे आहे. हे मत सांख्य दर्शनकाराने मांडले आहे. भारतीय तत्व विचारात ब्रम्ह, माया, पुरुष, प्रकृती या जोड्या मांनलेल्या आहे. तसेच देव व देवी अर्थात हे एकच सर्व हे रूप देव हे रुप देवीच्या रूपाने अविकृत म्हणजे प्रगट होत असते. तिच शिव आणि शक्ती रूपाने प्रगट होतात. म्हणजेच

स्व संवेद्य हे जे माऊली सांगतात व त्याची संवदता म्हणजे देव आणि देवी. कैवल्यद्वैत विचारात ब्रम्ह व माया ही जोडी दिलेली आहे.माया ही मिथ्या असुन ब्रम्हाची उपाधी आहे. ज्ञानेश्वरीत शिव– आणि शक्तीचे ऐवजी क्षर व अक्षर पुरूष असे सांगितले आहे. या दोहीचे मुख्य आधिष्ठान पुरूषोत्तम आहे. देव आणि देवी या गोष्टी भिन्न असली तरी सत्ता मात्र एकच आहे. याचे स्पष्टीकरण वर्णन करतात

दो दांडी एकश्रुती । दोहो फुली एकदृती ।।

दोहो दिवी दिप्ती । एकची जीवी । ।

धोठी एक गोठी । दो डोळा एक दिठी ।।

या ओवीचा अर्थ दोन दांडी असलेला विणा दोन असल्या तरी नाद एकच येतो. दोन फुले पण सुवास एकच येतो. दोन दिवे असले मात्र प्रकाश एकच असतो डोळे दोन पण दिसणे एकच व ओठ दोन पण शब्द एकच याप्रमाणे देव व देवी दोन पण आस्तित्व एकच आहे.

**जगाचे स्वरूप**

या तत्वाचा विचार करताना स्पष्ट हे आहे कि जगात मुलतत्व एक आहे तर अपणास दिसणारे पदार्थ अनेक आहेत एक असुन अनेक दिसतात याचे स्पष्टीकरण करताना शंकराचार्य हे केवल द्वैतवादी म्हणतात एकतुन अनेकत्व दिसते याचे कारण म्हणजे मानवाचे अज्ञान होय. तत्व एकच आहे पण अज्ञान,अविद्या, किंवा माया यामुळे ते अनेक दिसतात जग हे जे दिसते त्या अज्ञानाचे कार्य असे तत्वज्ञान मानते. ज्ञानेश्वरांनी अद्वैत समजुन सांगण्यासाठी ज्ञानेश्वरीत काही ठिकाणी अज्ञानाची कल्पना मांडतात .उदा. आई लहान मुलाला जेवू घालण्यास एका घासाचे चार ठिकाणी चार घास करते. ते मुलाला खावु घालते. त्या प्रमाने एकच परमात्मा पटवुन सांगण्यासाठी ज्ञान, अज्ञान, क्षेत्र, आणि क्षेत्रज्ञ, असे चार भाग केलेले आहे.

हे ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत स्पष्ट करतातः–

येऱ्हवी अवघेची आत्मा । हे सांगोनी वीरोत्तमा ।।

परी तुझीया मनोधर्मा । मिळेल ना ।।

म्हणोनि एकचि संचले । चतुर्धा आम्ही केले ।।

जे अढळपने देखिले । तुझिये प्रज्ञे ।।

पै बाळा जै जेवविजे । तै घास एक विसाठायी कीजे ।।

तैसे एकची हे चतुर्व्याजे । कथिले आम्ही ।।

एक क्षेत्र एकज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान ।।

भाग केले अवधान । जाणोनिया तुझे ।।[१४९]

या विषयी दुसरा विचार ज्ञानेश्वर महाराज अमृतानुभवात मांडतात .जगाची उत्पत्ती सागतांना अज्ञानाच्या कल्पनेची गरज नसुन ते स्वतंत्रपणे मांडता येतात. हे स्पष्ट करतांना अमृतानुभवात अज्ञानाचा धांडोळा म्हणजे साधक बाधक विचार करून अज्ञानवादाचे खंडण केले आहे.

**अ.** अज्ञानाचे आस्तित्व मानल्यास त्याला कोणतातरी आधार देणे गरजेचे असते. कारण ते अज्ञान आहे. म्हणजे त्याला ज्ञानरूप आत्म्यावरच अवलंबुन राहते असे म्हटले तर अंधार व प्रकाश एकत्र राहत नाही. तसे ते एकत्र राहु शकत नाही.

अज्ञान तम मेळणी । आत्मा प्रकाशाची खाणी ।।

आता दोन्ही मिळणी । एकी कैसी ।।

अज्ञान वरच जर अज्ञान असेल तर अज्ञान हे अज्ञानाचा आश्रय होऊ शकत नाही. आणि असे म्हटले तर सर्वच अज्ञानमय होईल मग हे अज्ञान आहे अस कोण सांगणार कारण की अज्ञान स्वत: काही सांगु शकत नाही.

अज्ञान तव आपणयाते । जडपणे नेणे निरूते ।।[१५०]

**ब.** अज्ञान आहे आणि ज्ञेय ही म्हणजे कळते ही आहे असे ग्रहीत धरले तर ते निष्क्रीय ठरते. कारण अज्ञान हे स्वभावता ज्ञान दुर करते पण येथे ते आत्म्याच्या ठिकानी राहुन आपल्यर अस्तित्वाचे ज्ञान करून देते.म्हणजेच ते स्वभाव विरूद्ध होऊन शक्ती हीन झाले.

**क.** आता जर अज्ञानाची शक्ती ग्रहीत धरली तर ते ज्ञानाला खाऊन घेते त्यामुळे आता ते सांगण्यास कोणी उरणार नाही.

१. प्रमान शास्त्राच्या आधारे–

प्रमाता,प्रमेय व प्रमाण याचा विचार करून अज्ञानाची निराश्रयता प्रमाणाच्या कसोटीवर सिद्ध करता येत नाही. त्रिपुटी अज्ञानाचे कार्य आहे.

२. अज्ञानाच्या संदर्भात तिसरे मत असे कोणी म्हटले की येवढा दृश्याचा पसारा दिसतो तर तर्कने अज्ञानाचे अस्तित्व सिद्ध होते.

उदा. झाडे टवटवित दिसतात पण पाणी काठे दिसत नाही तेव्हा मग जमीनितील मुळातुन ते घेत असेल हे उघड आहे. त्याच प्रमाणे दृश्य पसाऱ्याच्या मुळाशी अज्ञान असले पाहीजे.

भुमी वेगळी झाडे । पाणी घेती कवणीकडे ।।
न दिसती आणि आपाडे । साजी असती ।।
तरी भरवसेनी मुळे । पाणी घेती हे न ढळे ।।
तैसे अज्ञान कळे । दृश्यास्तव ।।[१५१]

अज्ञान हे आपल्या आवरण शक्तीने परमात्म्यास जाळते व विशेषशक्तीमुळे एका परमेश्वराची ठिकाणी अनेकत्व रूप जगाचा अभास निर्माण करते. हे ज्ञानेश्वर महाराजांना मान्य नाही.ज्ञानेश्वर महाराज याबद्दल म्हणतात की जग हे अज्ञानकार्य नाही ते परमेश्वराचा अविष्कार आहे क्रीडा किंवा विलास आहे. एक परमात्माच अनेक रूपांनी प्रगट होत आहे. अद्वैत्वच द्वैत्वरूपाचे प्रकट आहे.

द्वैतदशेचे आंगण । अद्वैत वोळगे आपण ।।
भेदु तवतव दुण । अभेदासी ।।[१५२]

दृश्य विश्व क्षणभंगुर असते. ही वास्तुस्थीती आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराज या विश्वास मायाकार म्हटले आहे. तरच क्षणभंगुरत्वाची दुसरी बाजु नित्य नावीन्यत्व आहे. म्हणजे परमात्मा क्षणाक्षणास नित्य नव्या रूपाने प्रगट होतो. उदाहरणार्थ पाण्यावरील तरंग हे वरवर पाहिल्यास केवळ क्षणभागुर लाटा दिसतात, पण जलाशयाकडुन पाहिल्यास एक पाणीच नित्य नव्या रूपाने वावरताना दिसते. ही वस्तुस्थिती ज्ञानेश्वर महाराजांनी आरश्याचा व वस्त्रांचा दृष्टांत उदाहरण म्हणुन दिलेला आहे. परमात्मा हा दृश्यरूपी रत्नाच्या आरश्यात आपले रूप पाहतो. तो एकढा रशिक आहे की क्षणाक्षणाला त्याला नवीन आरसा असावा वाटतो. त्याला एका क्षणाचा आरसा असावा वाटतो. त्याला एका क्षणाला आरसा शिळा वाटतो. त्यामुळे तो नवीन आरसा पाहुन आपले रूप नित्य नव्या आवडीने पाहतो.

दर्शन रिद्यीचिया बहुवसा । चित्शेष मातला ऐसा ।।
जो शिळा न पाहे आरिसा । वेद्य रत्नाचा ।।[१५३]

अर्थात परमात्मा हा क्षणाक्षणास नवीन वस्त्रे नेसवितो. कारण त्यास वस्त्रे पारूसे वाटतात. असा हा परमात्म्याचा अलौकिक प्रेमाचा विलास आहे. हे एकनाथ महाराज याविषयी म्हणतात. हे सकळ चराचर चिद्रत्नाची कळा असुन जगदाकार रूपाने परमेश्वराची शोभाच प्रकट होत आहे.

जैसे सुर्याची किरणे । सुर्यापुढे धावती जाण ।।
तेणे प्रकाश सुर्यपणे । अधिकाधिक ।।
का रत्नाची कीळ । रत्नावरी वाढे प्रवळ ।।
तेणे रत्नासीची केवळ । प्रबळता आणि ।।
का चंदनाचा वासु । चंदनाहुनी चौपसु ।
धावे तेणे अती सुवासु । चंदना आणि ।।
का अग्निचि ज्वाळा । अग्नीवरी वाढती प्रबळा ।।
तिने अतिरूप आणला । आणिले जैसे ।।
तैसे विश्व प्रेकाशीतया गभस्ती । त्याची किरणे नाना भक्ती ।।
तेथे नास्तिकता ते देखती । ते मुर्ख मृग तृस्निका ।।
हो का चिद्रत्नाची कळा । ते हे चराचर सकळ ।।[१५४]

श्री तुकोबाराय यांनी ही याचा अनुवाद आपल्या अभंगात करतात.

आवडी धरूनी आले ती आकार । केले हा पसार याजसाठी ।।
अभेदुनी भेद राखियेला अंगी । वाढावया जगी प्रेमसुख ।।[१५५]

अर्थ –

प्रेमसुख वाढवावा यासाठी एक परमात्मा भिन्न भिन्न रूपाने नटला आहे. विश्व हे अमंगळ नसुन परमात्म्याचे मंगल दर्शनच आहे थोडक्यात जगात ईश्वरतत्व एकच असुन त्याचे हे निरनिराळे रूप आपणास दिसतात. त्याचे मुळ कारण अज्ञान होय.

**जिवाचे स्वरूप :–**

परमेश्वराने ज्याप्रमोन जडसृष्टी म्हणजे निर्जीव जीव सृष्टी निर्माण केली तसीच निर्माण केली. तसीच जीवसृष्टी ही निर्माण केली. वाऱ्याप्रमाणे पृथ्वीवरून जसे असंख्य परमाणु उधळतात. तसेच एकाच परमश्वराच्या अंगातुन असंख्य जीव तयार झाले ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

तेजाचा तेजौनी निघाला । परी तेजीची असे लागला ।।
तया रश्मि ऐसा भला । बोध होआवा ।।
पै परमाणु भुतळी । हीमकण हीमाचळी ।।
मज माजी न्याहाळी । अहं तैसे ।।[१५६]

परमात्म्याचा अंश जीव हा चेतन आहे. परमेश्वराने स्वतः च्या प्रेमाने हा चेतन जीव बनवला. हेच त्याचे प्रयोजन आहे. प्रभु जगामध्ये प्रेमानंदाने नटला आहे. त्याला आनंदाची अनुभुती जगातील पदार्थ घेऊ शकत नाही. ते चेतन जीवच घेऊ शकतो. भगवंत प्रेमाच्या कडे जाण्याचे प्रमुख द्वार हे जीव आहे. ते खरे स्वरूप आहे. ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर महाराज यासंदर्भात वर्णन करतात. अर्जुन म्हणजे प्रभुच्या शृंगारलेल्या मनाचा आरसा

म्हणवती भावार्थ तो ऐसा । अर्जुन मैत्रीयचा कुवासा ।
की सुखे शृंगालीया मानसा । दर्पुण तो. ।।[१५७]

एकच स्वरूप हे श्वास व नाक, कान व शब्द, डोळा व आरसा, हे होते. म्हणजेच प्रभु स्वप्रीती मुळे आपण प्रभू होते आणि जीवही होतो. हे ज्ञानेश्वर महाराज अमृतानुभवात वर्णन करतात.

आता अमोद सुनास जाले । श्रृतीसी श्रवण रिघाले ।
आरिसे उठिले । लोचनासी ।।
जिव्हा लोघली रसे । कम सुर्यपणे विकासे ।
चकोरचि जैसे । चंद्रमा जाले ।।
फुलेचि जाली भ्रमर । तरूणीचे जाले नर ।
जाले आपुले शेजार । निद्राळुची ।।[१५८]

एकनाथ महाराज म्हणतात. परमेश्वर हा एक स्वरूप पदार्थ होतो त्याची प्रचीती घेण्याचे द्वार हे तोच होतो.

मीची डोळा मीची देखता । दृश्य द्रष्य मीच तत्वया ।।
मज वेगळी देखणी अवस्था । नाही सर्वथा तिही लोकी ।।
मीचि घ्राणचि वास । मीचि जाणता सुवास ।।
मीचि रसु मीचि रसना । स्वादु सेविता मीचि जाणा ।

एकनाथ महाराज हिच स्थिती भावार्थ रामायणात देखील वर्णन करतात. रावणाच्या वधानंतर सिता रामदर्शनास येते तेव्हा ती अतीशय आनंदी असते तेव्हा रामाला शंका येते त्याचे निरसन मारूती करतात. कि सिता राम वियोगाने दुःखी झालेली पण त्यांच्या रामदर्शनाने ती आनंदी होते. हा रामदर्शनाचा अनुभव फक्त सीतेसारखा भक्तच अनुभवतो .

तुझीया दर्शनाचे सुख त्यांच्या । श्रीरामा तुज अनोळख ।
भक्त जाणती सात्विक । जे नैष्ठिक व्रतधारी ।।
तुज देखता रघुनाथा । अष्टोभाव सात्विकता ।
गुढी उभरावली स्वानंदता । बाहेरी तत्वथा ते आली ।।
तेणे पुष्ट झाली सिता ।[१५९]

थोडक्यात,

मानवी जीवास आरश्याची उपमा दिली आहे. आरश्याच्या समोर जो व्यक्ती ऊभा राहतो त्याचे प्रतिबिंब तो दाखवतो. त्याच्या पुढे माकड ऊभा केल्यास तो माकडच दाखवतो. देवाची मुर्ती ठेवल्यास देवाची मुर्तीच दिसेल आरशाला ज्याप्रमाणे प्रतिबिंब ग्रहण करण्याची शक्ती आहे. त्याचप्रमाणे मानवची जीवास अनुभुती घेण्याची शक्ती असते. म्हणुन त्याचे श्रेष्ठ व सर्वोत्तम अनुभव घेण्यासाठी सतत प्रयत्न केला पाहिते. त्यातच त्याचे साफल्य आहे. परमात्म्याची भक्ती व पुजा हा सर्वश्रेष्ठ अनुभव आहे व तो साठवुन इतर गोष्टींनी समृद्धता मिळत असल्यातरी निरर्थक आहे. ज्ञानेश्वरीत हे वर्णन केलेल आहे.

एथ पार्था पुढतपुढती । तेची ते सांगो किती ।
जरी मीया चाड तरी भक्ती । न विसंबे गा ।।[१६०]
निंबनिंबोळीया मोडोनी आला । तरी तो काउळियासीचि सुकाळु जाहला ।
तैसा भक्तीवीन वाढीन्नला । दोषची लागी ।।
तरी झडझडोनी वाहिला निध । इया भक्तीचीया वाटे लाग ।
जिया पावसी अव्यंग । निजधाम माझे ।।[१६१]

यावरील ओव्यामधुन भक्तीशिवाय इतर गोष्टी निरर्थक व भक्तीने निजधाम म्हणजे माझे स्थान मिळते. हे सांगितले आहे.

**भक्तीचे स्वरूप**

ज्ञानदेवानी भक्ती हा पाचवा पुरूषार्थ मानला आहे. वैदीक परंपरेनुसार विचारात धर्म, अर्थ, काम, व मोक्ष हे चार पुरूषार्थ मानले आहे. पहिल्या तीन धर्म, अर्थ, काम या पुरूषार्थांनी चौथा मोक्ष पुरूषार्थ साध्य होतो. या मोक्ष पुरूषार्थात जीवनाचे साफल्य समजले जाते.तरी देखील ज्ञानेश्वरांनी सारासार विचार व चिकीत्सा करून भक्ती हा पाचवा पुरूषार्थ मानला.

चंहु पुरूषार्था शिरी । भक्ति जैसी ।।[१६२]

ज्ञानेश्वर महाराज हे पुर्ण आत्मानुभवी होते. त्यांनी योगाच्या समाधीचा, मुक्तीतील आत्मनंदाचा व भक्तीच्या प्रेमसुखाचद अनुभव घेतलेला होता. या अनुभवाच्या आधारेच त्यांनी भक्तीस सर्वोच्च स्थान दिले.प्रेमसुखाचा आनंद मन, बुद्धी सर्व इंद्रीय घेतात. नारद भक्तीसुत्रात भक्ती ही स्वयं फलरूप असुन ती ज्ञानापेक्षा व कर्मापेक्षा अधिक तर आहे.

सातु कर्म ज्ञान योगाभ्योऽप्यअधिकतर । फलरूपत्वात ।।

श्रीमदभागवतात ही भगवंताची भक्ती हाच सर्वात श्रेष्ठ धर्म आहे. असे सांगितले आहे.

सर्वे पुंसां परौ धर्मः येतो भक्तीर धोक्षजे ।

भक्तीसंदर्भात नामदेव महाराज म्हणतात

नलगे पुरूषार्थ चारी मुक्ती ।

झणी मुक्तीपददेशी पांडुरंगा । मग या संता संगा कोठे पाहु ।।

मुक्ती पद मिगा अभिलाशीन चित्ती । झणी अंतरती पाय तुझे ।।

श्री ज्ञानेश्वर यांच्या प्रभावलीत म्हणजे त्यांच्या पंक्तीतील संतमंडळी प्रभावळील संत चोखोबा भक्ती विषयी म्हणतात

नलगे भुक्ती मुक्ती वैकुंठाचा वास ।

नको मोक्ष, नको वैकुंठ, फक्त भगवंताची भक्ती मिळावी

नरहरी सोनार म्हणतात

चारी मुक्ती तेथे हिंडती दोन रूप । येऊनेदी समीप कोणीतया ।।

श्री एकनाथांनी भक्ती ही चारी पुरूषार्थाच्या माथ्यावर आहे असे म्हटले आहे.

चहु पुरूषार्थाचे माथा । भक्ती सर्वथा मज पढीयंती ।।[१६३]

श्री तुकाराम महाराजांनी भक्ती हीच सर्व पुरूषार्थाची मुगोरश्मी आहे.

तुका म्हणे मुकुटमणी हरीभक्ती । आणिक विश्रांती आरतीया ।।

भक्ती ही सत्य स्वभावरूप आहे. जसे आईचे प्रेम आपल्या मुलावर सहज असते त्याप्रमाणे प्रभुच्या ठिकाणी सहज प्रेम असते.

हे ज्ञानेश्वरीत माऊली सांगतात.

माझिये सहज स्थिती । भक्तीनाम ।

ऐसा हा सहज माझा । प्रकाशु जो कपीध्वजा ।।

तो भक्तीवा वोजा । बोलीजे गा ।।[१६४]

भक्ती ही सहज करता येते त्यासाठी विशेष काही लागत नाही शुद्ध अंतकरणाने देवाची भक्ती करावी . देवाची भक्ती म्हणजे देवाचे चिंतन करणे, नामस्मरण, हरीकिर्तन श्रवण करणे, संताची सेवा करणे,समाजसेवा करणे इत्यादी गोष्टी होय. अखंड देवाचे चिंतन करत राहणे. याला भक्ती म्हटले जाते. या भक्तीने मनुष्य देवरूप होतो. वैदिक धर्माचे तत्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत मांडून ते भक्ती मार्गात आणले.

### वारकरी संप्रदयाची ग्रंथसंपदा

वारकरी सांप्रदयाच्या प्रभावकाळातील संत मंडळींनी वारकरी तत्वज्ञान, विचार व वेदतत्वज्ञान, गीता, भागवत, उपनिषद, स्मृतीग्रंथ, दर्शनकार. इत्यादी ग्रंथावर अर्तभुत सर्व सामान्यांना रूचेल व कळेल अश्या मराठी भाषेत व सोप्या पद्धतीने श्री निवृत्तीनाथ यांच्यापासुन ते संत निळोबा पर्यंत सर्व संत मंडळींनी म्हणजे इ.स. च्या तेराव्या शतकापासुन अठराव्या शतकापर्यत च्या कालखंडातील संतमंडळीनी लिहीलेले ग्रंथ ही वारकरी सांप्रदयाची ग्रंथ संपदा मानली जाते.

पुढीलप्रमाणे अनुक्रमे योणाऱ्या संतमंडळीची ग्रंथ संपदा

१. श्री निवृत्तीनाथ शके ११९५ – १२१९

यांनी अभंगरचना केली

अ. अभंगगाथा – ३७४ अभंग उपलब्ध आहे[१६५]

२. श्री ज्ञानेश्वर महाराज शके ११९७–१२१८

अ. ज्ञानेश्वरी – अध्याय १८, श्लोक ७००, ओव्या ९०३२ [१६६]

इ. अमृतानुभव – अध्याय १०, ओवी ८०६

उ. चांगदेव पासष्टी – ओव्या ६५, चिहीलास प्रतीपादन [१६७]

ऊ हरीपाठ २८ अभंग उरलेला ग्रंथ [१६८]

ए. नमन – ओव्या १०८, परमेश्वराची प्रार्थना

ऋ अभंग गाथा – ९६९ अभंग [१६९]

ॠ उत्तरगिता

क योगवाशिष्ठ

ख. प्राकृत गिता

ग. स्वात्मानुभव

घ. भक्तराज

३. सोपानदेव शके ११९९ – १२१८

१. अभंगगाथा – ५२ अभंग,[१७०]

२. पंचीकरण

४. मुक्ताबाई शके – १२०१ – १२१९

१. अभंगगाथा – ५३ अभंग, ताटीचे प्रसिद्ध ११ अभंग [१७१]

५. श्री नामदेव सन १२७०– १३५०

१. अभंगगाथा आत्मचरित्रपर अभंग, ज्ञानदेवाच्या समाधीपर अभंग, तीर्थावळी बालक्रीडा, कृष्णचरित्रपर अभंग, संताची चरित्रे, स्फुटरचना[१७२]

२. बाळक्रिडा – कृष्णजन्मापासुन ते कंसवध, उद्धव व अक्रुर यांनी केलेले शांतवणा पर अभंग

३. ज्ञानदेव समाधी –या संबंधात नामदेव रायांनी, ज्ञानेदवाच्या समाधी प्रसंग वर्णन करणारे अभंग लिहले आहे.

४. तीर्थावळी – नामदेव व ज्ञानदेव यांचा गोड संवादाने भक्तीप्रेमाचे वर्णन या अभंगातुन केलेल आहे.

६. श्री जनाबाई

१. अभंगगाथा – ३४८ अभंग [१७३]

२. सेना चरित्र

३. थालीपाक

७. श्री एकनाथ सन १५३३ – १५९९

१. एकनाथी भागवत – ३१ अध्याय, ओव्या १८००० भागवत धर्माचे वर्णन, भक्तीमार्गाचे वर्णन व विवेचन

२. हस्तामलाक शंकराचार्याचे १४ श्लोकावरी स्तोत्र ६७४ ओवी

३. स्वात्मसुख ओव्या ५११ चराचराचे वर्णन शुन्यपादाचे खंडण ब्रम्ह माया

४. आनंदलहरी ओव्या १५४ सगुण निर्गुण

५. शुकाष्टक ओव्या ४५८ जीवनातील प्राप्तकाळ यासंदर्भात लेखन

६. रूख्मिणी स्वयंवर ओव्या १७१२ शके १४९३ चैत्र शुद्ध ०९ रामनवमीला समाप्त श्रीकृष्ण व रूख्मिणी यांच्या विवाहाची कथा

६.भावार्थ रामायण – ओवी ४००००

शिव शैव आगम पंचरात्र गुहाळ हनुमंत

मत्स्य कुर्म वराह कालिकाखंड इ. विषय या संधान येतात.[१७५]

७. अभंग गाथा – अभंग तीन हजार

पंढरी माहात्म्य विठ्ठल माहात्म्य सदगुरू महिमा उपदेश श्री कृष्णा बालक्रिडा धुवादिकांची पौराणिकचरीत्रे ज्ञानदेव चोखोबा सावतोबा चरित्रे भारूडे इ. अघारित अभंग लेखन केले.[१७६]

श्री तुकाराम महाराज – इ.स.१६०८ ते इ.स.१६४९

१. अभंग गाथा – अभंग ४०९२[१७७]

संतांची बाबांच्या वह्यावर लेखन शके १५६८ व शके १६१० असे लिहिलेले असते

बहिणाबाई – संत बहिणाबाई अभंग – २२[१७८]

श्री निळोबाराय –

भाग पहिला व भाग दुसरा – अभंग रचना १५२०

मंगलचरण, बालक्रिडा, गौळण ,विरहणी, श्रीकृष्ण लीला, कला प्रकरण खेळ , गोपीचे खेळ,गोपाळांचे खेळ, काला पुंडलिक, भक्तिसामर्थ्य ,पंढरीमाहात्म्य, श्री विठ्ठल महात्म्य ,नाम

महिमा ,संत महिमा, करूणा, भाळ, संतकृपा ,संत कृपेचा धन्यवाद ,देवभक्तांचा संवाद, भक्तापाशी देवाचे मागणे,देवभक्ताची एकरूपता, भक्तवत्सालता, श्री सदगुरू तुकोबाची स्तुती कवित्व – श्री विठ्ठल गुणवर्णन, करूणा, प्रेमकलह, मागणे ,स्वस्थिति, देवाची उद्गार, आनंदस्थिति, जनाशी उद्गार जनास उपदेश ,भक्तिस्तोम माजविणाऱ्या बाह्य वेष धाऱ्यास उपदेश, मुमुक्षू उपदेश, अद्वैत चांगदेवाचे चरित्र, आळंदी महिमा ,श्रीज्ञानदेवाची पंरपरा ,आरत्या ,प्रकरणावर अभंग रचना केली.[१७९]

## ३.१० प्रमुख क्षेत्रे

वारकरी संप्रदायाची लोकांच्या भावना विकसित करणारे व इच्छपुर्ती करणारे अनेक धार्मिक क्षेत्र महाराष्टाबाहेर निर्माण झालेले आहेत या धार्मिक क्षेत्रामध्ये वारकरी संप्रदयाची अनुयायी या क्षेत्रांच्या ठिकाणी वारी निमित्ताने येतात. दररोज व दरवर्षी तीर्थाच्या ठिकाणी वारी निमित्ताने लाखो जण पोहचता हे सर्व तीर्थक्षेत्रे आपल्या अध्यात्म शक्तीने पावन झालेले आहेत .भक्ती भावाने येणाऱ्या सर्व वारकऱ्याना ते समाधान व सुख देतात व संप्रदायाचा प्रसार करतात.

**प्रमुख क्षेत्रे पुढील प्रमाणे –**

**पंढरपूर –**

महाराष्टातील सोलापूर जिल्ह्यामध्ये भीमा नदीच्या पश्चिम तीरावर वसलेले पंढरपुर हे वारकरी संप्रदयाचे आराध्य विठ्ठल देवतेचे आद्य क्षेत्रे होय. भीमा नदी या क्षेत्राजवळ चंद्रकार आकराची असल्याने या नदीला चंद्रभागा असे नाव पडले आहे . चंद्रभागा वाळवंट श्रीपुंडलीकाचे मंदीर अंमळनेकर गुंडामहाराज देहुकर चोपडकर साधुसंताच्या समाध्या आहेत मालुतारण ग्रंथात पांडुरगांचे मंदीर शके ११८४ मध्ये नविन बांधले असल्याचा उल्लेख येतो या नव्या मंदिरात देवाची जुनी मुर्ती आशाढ शुध्द १४ बुधवारी स्थापन करण्यात आली.चौदाव्या शतकात अखेरीस या देवळात उपसर्ग होऊन मोडतोड झाली . त्याची दुरूस्ती चांगा मुधेश याने केल्याचा उल्लेख सापडतो.तुकोबाने पांडूरंगास बौध्द म्हंटले आहे तो मौन धरून उभा आहे म्हणुन म्हटले आहे.

बौध्द अवतार माझिया अदृष्टा । मौन्य मुखे निष्ठा धरियेली ।।

प्रा.बेंद्रे म्हणतात हा बौध्द(विठ्ठल)घर मोडलेला सन्याशी न्हवता तर मांडणारा कैवारी होता. [१८०]

**गोपाळपुरा –**

पंढरपुर जवळ दीड कि.मी. अंतरावर दक्षिण पुर्व दिशेला टेकडीवर गोपाळपुरचे मंदिर आहे.या टेकडीवरील पर्वतास गोवर्धन पर्वत म्हणतात.श्री कृष्ण पंढरपुरला निघाले हे पाहुन गोवर्धनही निघाले.प्रभु रागवतील म्हणुन दुसऱ्या रूपाने ते येथे राहीले. हे वर्णन स्कंद पुराणात पांडुरंग माहात्म्याच्या दुसऱ्या अध्यायात येते. गोपाळपुरा मंदिराच्या पायथ्याशी प्रतिकात्मक यशोदेच्या दही मंथनाची जागा आहे.

**आळंदी देवाची –** 'सिद्धपीठ अलंकापुरी'

आळंदी हे गाव पुण्य भुमी ठाव । दैवताचे नाव सिद्धेश्वर ।।

आळंदी हे गाव इंद्रायणी नदीच्या पुर्वेकडील तीरावर वसलेले पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीने पावन झालेले पवित्र क्षेत्र होय.शके १२१८ मध्ये कार्तिक वद्य त्रयोदशी श्री ज्ञानेश्वरांनी आळंदी येथे अजान वृक्षवनात सिद्धेश्वर मंदिराजवळ संजीवन समाधी घेतली. आळंदी स्कंद पुराणातील सह्याद्री खंडात ६४ व्या अध्यायावरून, वाकणा, अलका,कणिका, आनंद, व सिद्ध सिद्ध क्षेत्र अशी नावे आलेली आहे. संत मंडळींनी आळंदीस अलंकापुर असे म्हटले आहे. इंद्रायणी हे नाव इंद्राने येथे पृथ्वीवर येऊन यज्ञयाग केले. हे नाव मिळाले असे म्हणतात. तसेच कुबेर गंगाही असे म्हणतात. कारण कुबेराने आपले धन याच नदीच्या काठी पुरून ठेवले अशी अख्यायिका आहे. देऊळ वाड्यात असलेला समाधीचा गाभारा सन १७५०– १७९० पुरंदरचे श्री आवेकर देशपांड्यांनी बांधला. शिखर सन १८७१ ला नंदराम नाईकांनी बांधले. मुक्ताबाई देऊळांचा मंडप श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांनी १८८१ मध्ये बांधला. देऊळात प्रवेश करताना हैबतराव बाबांची पायरी आहे. आत शिरल्यांनतर डाव्या बाजुला ओवरीत त्यांच्या पादुका आहेत. त्यांचे दर्शन घेऊन पुढे जावे असा एक प्रघात आहे. या ओवरीसमोर नाथपार असुन त्याच्या शेजारी शिवदीन केशरीचे गुरू केशरीनाथ व लक्ष्मीनाथ आणि भोजलिंग काका यांच्या समाध्या आहेत. देऊळ वाड्याच्या उत्तरेला महाद्वाराच्या दोन्ही बाजुच्या भिंती, दरवाजा ,ओवऱ्या सन १७५० मध्ये शिंदे व जाधव यांनी बांधल्या १८०० मध्ये दौलतराव शिंदे यांनी नगारखान्याची इमारत बांधली. १८४० मध्ये पश्चिमेकडील दरवाज्यावरील नगारखाना दुसरे सयाजीराव गायकवाड यांनी बांधला .मंदिरात प्रवेश करताना श्री हैबतराव बांबांच्या पायरीला वंदन करून आत प्रवेश केल्यानंतर गरूड हनुमंत आत आल्यानंतर आपल्या उावया व उजव्या बाजुला

देवडी वजा मोनले दोन सोपे आहे. वरती चिरेबंदी घुमट पाहण्याजोगा आहे. देऊळ वाड्याभोवतीचा संपुर्ण तट चिरेबंदी आहे. तटाच्या आतील भिंतीच्या खेटुनच ह्या सोप्याच्या डाव्या अंगास गरूड व उजव्या अंगास हनुमंत यांची लहान देऊळे आहेत. यांचे दर्शन करून पुढे चालावे. पुढे मोकळे अंगण आहे.

### सभामंडप

पुढे भव्य व कोरीव काम केलेला मंडप हा भजनी मंडप अथवा वीणामंडप या नावाने ओळखला जातो. तुटक्या कमानीवर उभारलेले असे वेगळेपण जाणवते. मंडप शिंदेसरकाराचे दिवाण श्री रामचंद्र मल्हार शेवणी यांनी १७६० ला बांधला येथे भजन किर्तने चालतात. याच्या उाव्या बाजुचा मंडप इ.स १९०७ मधये श्री आप्पासाहेब नागपुरकर यांनी बांधला येथे आखंड वीणा चालु असतो.

### कारंजे मंडप

वीणामंडपातुन आत प्रवेश केल्यांनतंर हा मंडप आहे. या मंडपात पुवीृ एक कारंजे होते म्हणुन यास कारंजे मंडप असे म्हणतात. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे कारभारी श्री अनाजी मानकेश्वर यांनी इ.स. १७९९ मध्ये बांधला. असे लेखन मंडपातच आढळते पुढे संस्थानने इ.स. १९२५ ला त्याची दुरूस्ती केली येथे हरदासी किर्तन व भजनसंध्या होत असते. श्रीची आरती चालु असताना मंदिराचा चोपदार हातात चांदीची काठी घेऊन या मंडपात ऊभा असते.

### समाधी मंदीर गाभारा

हा मंडप श्री माऊलींची समाधी असलेले गाभारा होय . याचे द्वार पुर्वी फार ठंगणे होते. वाकुन आत प्रवेश करावा लागे. इ.स. १७९३ आगष्टमध्ये  हा दरवाजा उंच व रूंद करण्यात आला. गाभारा साधारण सहा बाय साडेसहा फुट लांबी रूंदीची आहे. मध्यावर एकावर एक असा चार शिळांनी बनेलेली समाधी आहे. संत तुकाराम महाराजांनी या गाभाऱ्याचे बांधकाम केले[१८१]

### गणेश मंदीर

पुर्वद्वारातुन प्रदक्षिणेला बाहेर पडल्यास सोळा खांब असलेला सोळा खांबी मंडप यास गणेश मंडप म्हणतात. याची बांधणी हेमाड पंथी आहे. हा फारच प्राचीन मानला जातो. या मंडपात श्री गणेशाची पुवाभिमुख पुरातन मुर्ती आहे उजव्या बाजुला कोपऱ्यात माऊलीचे लाकडी शेजघर आहे. तसेच तेथे शेजारी गरूडखांब आहे. नंतर मुक्ताबाई मंदीर गाभाऱ्याबरोबर पाठीमागे आहे.

## सिद्धेश्वर मंदीर

शेजारी मुक्तापबाई मंउपातुन सिद्धेश्वर प्राचीन आद्य दैवत श्री सिद्धेश्वर यांचे मंदिर आहे. या मंदिराचे तीन भाग १. नंदी २. मंडप ३. गाभारा दगडी देवळीत सिद्धेश्वराच्या समोर नंदीकेश्वराची मुर्ती विराजीत आहे. मुर्ती कृष्णपाषाणाची असुन ती पश्चिमाभिमुख आहे. या नंदीमाझारी द्वार आहे. तुथुनच समाधी मध्ये आत जाता येते.

## मंडप

हा औरस चौरस असुन सर्व दगडी आहे. मंडपाची द्वारे ठेंगनीच आहे. मंडपाच्या पश्चिम भिंतीतील ठेंगण्या प्रवेशद्वारातुन आत श्री सिद्धेश्वराच्या गाभाऱ्यात आत जाता येते. मध्यावर शिवपींड व त्यावर एक अभिषेक पात्र टांगलेले आहे. उजव्या हाताच्या कोपऱ्यात एका देवळीत गणेशमुर्ती आहे हे स्थान अतीप्राचीन व ज्ञानेश्वरांचया अधिपासुन प्रसिद्ध आहे. माऊलीची पालखीची वारी निघताना श्री सिद्धेश्वर हे माऊलींना निरोप देतात.

## अजानवृक्ष

सिद्धेश्वरानंतर आजान वृक्ष बाग शेजारी आहे. सध्याला चार ते पाच झाडे अजान वृक्षाची आहे. हा वृक्ष प्रासादीक आहे. समाधी विवरला स्वहस्ते शिळा लावल्यानंतर निवृत्तीनाथांनी अजानवृक्षाचा शुष्कदंड येथे रोवला. त्या शुष्ककाष्टाला पालवी फुटली. आज हेच वृक्ष येथे आहे. हा वृक्षाआरोग्य प्रद आहेत. या झाडाची पाने कोणी तोडत नाही. ते गळुन पडतील तेच पाने तेच घेतली जातात.

एकनाथ महाराज लिहतात.

अजानवृक्षदंड आरोग्य अपार । समाधीसमोर स्थानपियेला ।।
कोरड्या काष्टी फुटयेला पाला । तेव्हा अवघे त्याला नमस्कारी ।।
अजानवृक्षाची पाने जाण । जो भक्षुनी करूनी अनुष्ठान ।।
त्यासी साध्य होईल ज्ञान । येथे संशय नाही ।।

## सुवर्णपिंपळ

मंदीरात प्रवेश करताच उजव्या बाजूला सोन्याचा पिंपळ आहे. या पिंपळाभोवती संस्थानाने १९३४ ला चिरेबंदी पार बांधला आहे. याच पिंपळाची श्री विठ्ठलपंताची पत्नी रुख्मिणीबाई पुजा करीत होत्या. तेथे काशीचे रामानंदस्वामी यांचा मुक्काम तीर्थाटन करताना

पडला होता. प्रदक्षिणा करताना रूख्मिणींनी त्यांना नमस्कार केला. त्यांनी पुत्रवती भव असा आशिर्वाद दिला. यावर त्यांनी हकीकत सांगितली. यानंतर त्यानी विठ्ठलपंताना काशीवरून इकडे पाठविले त्यानंतर ही चार भावंडे झाली म्हणुन पिंपळाला अश्वत्था म्हणतात.

**श्री नृसिंह सरस्वती स्वामींचा मठ**

श्री नृसिंह सरस्वती स्वामी हे शृंगेरी मठाचे अधिपती होते. ते ज्ञानेश्वरांचे आध्यात्म्य शक्तीने आकर्षिले गेले. त्यामुळे शके १७९६ मध्ये ते आळंदीत येऊन राहिले त्यांनी शके १८०७ पौष शुद्ध १५ ला समाधी घेतली यानंतर शिष्यमंडळींनी आळंदीत या मठाचे मंदिर बांधले

**हरीहरेंद्र स्वामींचा मठ**

हे हरीहरेंद्र स्वामी मुळचे पैठण येथील होय. ते आळंदीस आल्यावर त्यांनी ज्ञानदेवाच्या अमृतानुभव या ग्रंथावर राष्ट्रभाष्य नामक टीका केली. त्यांनी १६२१ ला समाधी घेतली ते आज त्यांच्या नावाने मठ प्रसिद्ध आहे.

**मल्लापा वासकर समाधी मंदीर**

वासकराचे मुळ पुरूष मल्लाप्पा शके १७९६ ला कार्तिक वद्य अष्टमीला आळंदीस देह ठेवला . इद्रायणी काठी यांची समाधी मंदीर असुन दरवर्षी पुण्यतीथी उत्सव साजरा केला जातो.

**चालविलेली भिंत**

योगी चांगदेव ज्ञानदेवांच्या भेटीला आळंदीस आल्यावर त्याचे गर्वहरण व्हावे म्हणुन ज्ञानदेवांनी भावंडासह भिंत चालवुन त्यांचे स्वागत केले. या भिंतीचे काम पुढे शके १८९८ ला खानदेशाच्या एका भाविक बाईंनी केले तर आता ज्ञानेश्वर संस्थानच्या वतीने देणगीच्या रूपातुन भितींचे नवीन सुशोभीकरण सुरू आहे.

तसेच सिद्धबेट, विश्रांतीवड, विष्णुमंदीर, राममंदीर, इत्यादी दर्शन्य स्थाने आहेत. आळंदीनगर परिषद २१/११/१८६९ पासून आळंदी शहराचा कारभार पाहत आहे.

ज्ञानेश्वर महाराज मंदीर स्वतंत्र समीती आहे ती मंदीराची व्यवस्थापन कामकाज पाहते. की कमीटी कलेक्टरांनी २५/०५/१८५२ ला सहा पंचांची स्थापन केली. ज्ञानेश्वर संस्थान सध्याला ज्ञानेश्वर मंदीर दुरूस्ती व देखभाल व दर्शनबारी नवीन मंडीपाचे काम करत आहे. तसेच

संस्थानच्या वतीने दररोज सकाळ व संध्याकाळी येणाऱ्या भाविकास पास देऊन भोजन व्यवस्था सुरू आहे. संस्थानने निवासासाठी भक्तनिवास सदन उपलब्ध आहे तसेच अभ्यासासाठी ग्रंथालय उपलब्ध आहे. संस्थान वर्षभरात अनेक नवीन उपक्रम राबवीत असते ज्यामुळे ज्ञानेश्वरी व ज्ञानदेवाच्या तत्वज्ञान व विचाराचा प्रचार व प्रसार होईल

**श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था**

वैकुठवासी विष्णुबुवा जोग यांनी सन १९१७ ला वारकरी शिक्षण संस्था सुरू केली . आजपर्यत अविरतपणे या संस्थाचे वारकरी किर्तनकार व साधक घडविण्याचे कार्य सुरू आहे. या संस्थेचे वैशिष्ट्ये येथे शिक्षकांना पगार, मोबदला, मानधन नाही. व विद्यार्थ्यांना कोणतीही फी नाही. आळंदीत आलेले विद्यार्थी धर्मशाळेत राहुन किर्तन शिकण्यासाठी या संस्थेत प्रवेश घेतात. एकुण चार वर्षाचा कोर्स संस्थेमध्ये करावा लागतो. संस्कृत व्याकरणाची परीक्षा पास झाल्यानंतर संस्थेच्या नियमानुसार कार्तिक वद्य यात्रेनंतर प्रथम वर्षात विद्यार्थ्याना प्रवेश मिळतो व शेवटच्या चौथ्या वर्षी कोजागरी पौर्णिमेला किर्तनाची परीक्षा दिल्यानंतर या संस्थेचा अभ्यासक्रम पुर्ण होऊन विद्यार्थी साधक रूपाने बाहेर पडतो. पुढे तो किर्तनकार होतो किंवा साधक म्हणुन भक्ती करतो. समाज प्रबोधन व वारकरी सांप्रदयाचा प्रचार प्रसार करण्याचे कार्य हे विद्यार्थी करतात.

**साधकाश्रम**

इंद्रायणी नदीच्या मोठ्या बंदाऱ्याजवळ साधकाश्रम आहे. श्री विनायक महाराज साखरे यांनी इ.स. १९०५ ला श्रीगुरू साखरे संस्था पुण्यास स्थापण केली पुढे १९५७ ला साधकश्रम नामकरण झाले आळंदी येथे १९२० पासुन सुरू झाले. साखरे महाराजांनी काशी यात्रेस नेलेल्या चांदीच्या पादुका येथील गाभाऱ्यात आहेत.१९४६ ला येथे माऊलींची मुर्ती स्थापन केली . या आश्रमात विद्यार्थ्याना ज्ञानेश्वरी, विचारसागर, वृत्तीप्रभाकर इत्यादी शिक्षण दिले जाते.

**श्रीचैतन्य आश्रम**

हा आश्रम इंद्रायणीच्या दक्षिण तीरावर आहे. हा आश्रम इस. १९४२ ला दत्तोपासक व सिद्धपुरूष श्री निजानंदबाबा चैतन्य यांनी स्थापन केला. वस्तु पुर्वाभिमुख असुन आत श्री दत्तात्रयाची लहानसी चांदीची मुर्ती आहे. वास्तुखाली बाबांची गुफा असुन तेथे त्यांना इ.स. १६९३ ला समाधी देण्यात आली.

## देहुकर ज्ञानोबा माऊली यांची वारकरी शाळा

तुकाराम महाराजांचे वंशातील आठवे पुरूष ह.भ.प. ज्ञानेश्वर विष्णु देहुकर माऊली यांनी ही संस्था इ.स. १९४५ मध्ये स्थापन केली. या सस्थेंत २०–२५ विद्यार्थी होते.श्रीमती तानुताई थोरात यांच्या इमारतीत ही संस्था चालू आहे.येथे १९५९ मध्ये येथे संत तुकाराम म. ची मुर्ती स्थापन केली.इ.स. १९६९ मध्ये संस्थेचा ट्रस्ट करण्यात आले.

**धर्मशाळा –**

आळंदी परीसरात अनेक संतांच्या नावाने धर्मशाळा उभारल्या आहेत.तसेच गावोगावीच्या लोकांना यात्रेच्या काळात मुक्कामाला राहण्यासाठी या धर्मशाळेचा उपयोग होतो.सध्याला अनेक धर्मशाळा परिसरात उपलब्ध आहे. या धर्मशाळेत मुलांना संस्कार शिक्षण संस्था सुरु आहे.

## इंद्रायणी घाट

इंद्रायनी घाटाचे बांधकाम आळंदी देहु विकास परीसर समिती यांच्या माध्यमातुन चालु आहे. इद्रायनी तिरावर जागतिक दर्जोचे विश्वशांती केंद्र आहे जेथे मोठे व्यासपिठ व भव्या पडदा उभारला आहे. तेथे ज्ञानेश्वर तत्वज्ञानाच्या प्रसाराचे केंद्रबिंदु म्हणुन पाहीले जाते.

इंद्रायनीमध्ये मोठा गरूड खांब उभारलेला आहे. २०१४–१५ हे वर्ष ज्ञानेश्वरीचे सप्तशतकोत्तर रौप्य वर्ष म्हणुन साजरे होत आहे. १२९०–२०१५ हा ज्ञानेश्वरीचा आजपर्यंत प्रवाह आहे.त्यामुळे हे ७२५ वे वर्ष म्हणुन साजरे करतांना ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने मंदीरात वर्षभर ज्ञानेश्वरी पारायण चालु ठेवले आहे. श्री क्षेत्र आळंदी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या श्री नैवेद्य व नंदादीप वगैरे खर्च व सेवेकरी तसेच वसंत ब्राह्मण वर्षासन दिलेले होते.[१८२] छत्रपती राजारामांनी सन १६७१ ते पुढे तसेच चालू ठेवले तसेच पेशव्यांनी ते पुढे चालू ठेवले.

**श्रीक्षेत्र पैठण :–**

पंढरपुर, आळंदी नंतर प्रतिष्ठान उर्फ पैठण हे महत्वाचे क्षेत्रस्थान मानले जाते. क्षेत्र प्रतिष्ठाण नांदे गोदातीर। असे निळोबाराय वर्णन करतात. या पैठण क्षेत्राला सुमारे २५०० वर्षाची संस्कृतीची परंपरा आहे. ख्रिस्त पुर्व ६ व्या शतकात सुत्तनिपातात पैठणचा उल्लेख अश्मक देशाची राजधानी पोतन नगर असा आलेला आहे. एरिअन,लिनी,थेलेमी या प्राचीन पाश्चात्त्यांनी प्रवासासाठी पैठण हे तात्कालीन प्रसीद्ध नगर व व्यापारी केंद्र म्हणुन उल्लेख केलेला आहे. संस्कृत

व पाली वाङमयात दक्षिण पंथातील राजधानी असा उल्लेख येतो. अशोका नंतरचे सातवाहन यांची राजधानी प्रतिष्ठान उर्फ पैठण होती . काशी प्रमाने पैठण हे दक्षिणेकडील संस्कृत विद्येचे महापीठ म्हणुन आळखले जात होते. येथे बृहत्कथाकर्ता गुणाढ्य हा सातवाहनांचाआश्रीत म्हणुन राहत होता. येथे व्याकरण व धर्मशास्त्र याचे अध्ययन व अध्यापन चालत होते. देश व देशाबाहेरील विद्यार्थी येथे शिकण्यासाठी येत असत. निर्णय सिंधूकर्ता–कमलाकर भट, सिद्धांत कौमुदीकर्ता–भटोजी दिक्षीत मीमांसाशास्त्र पारंगत गागाभट्ट इ. पंडीत येथे होऊन गेले.चक्रधर स्वामीच्या महानुभवाचे प्रसाराचे प्रमुख केंद्र हाते. चक्रधरांचा मुक्काम पैठणच्या भोगणारायन मंदिरात दहा महीने होता. हा मठ सध्याला पडीत अवस्थेत आहे. पैठणला पुढे ज्ञानदेव व त्यांचे भावंडे उपनयनाचा अधिकार मिळविण्यास आले हाते. तेथेच रेड्यामुखी वेद बोलविले. पुढे भानुदास येथे जन्माला आले व त्यांच्या कुळात श्री एकनाथ महाराज जन्माला आले. हे भक्तिपीठ म्हणुन उदयास आले. पैठणमध्ये नाथांच्या वाड्याचे रूपांतर सध्याला मंदिरात झाले आहे. येथे विजय विठ्ठल मुर्ती, श्री खंड्याने पाणी भरलेला रांजन, नाथ किर्तन करत हाते त्या सभामंडपाची जागा आज पाहता येते. आज या वाड्यात नाथांचे वंशज राहतात या स्थानास आतले नाथ असे म्हणतात. गावाबाहेरच्या बाजुस जेथे नाथांनी आपला देह विसर्जन केला त्या गोदावरीच्या प्रवाहानजीक नाथांचे समाधी मंदीर आहे. फाल्गुन वद्य ६ ला त्यांनी देह समाधी घेतली. या पुण्यतिथीला दरवर्षी पैठणला मोठा उत्सव भरतो. नाथ समाधी शेजारी दंडवते स्वामी व गावबा यांच्या समाध्या आहे. गोदावरीच्या मुंगी उरावर मोरजुद्दीन या इस्लाम प्रसारकाची कबर आहे ज्याने महालक्ष्मी व इतर मंदीरे पाडली व मशिदा बांधल्या. कृष्णदय यार्णव व त्याच्या गुरूच्या समाध्या व त्याच्या पुजेची कृष्णाची सुंदर काळ्या काष्टाची मुर्ती आहे. शिवदीन केसरीचा वाडा आहे. पैठणच्या वारीला महाराष्ट्रातील ,मराठवाडा भागातील वारकरी प्रतिवर्षी फाल्गुन वद्य६, षष्ठीला येत असतात. तसेच महीन्याच्या वारीला येणारे वारकरी ही आहेत. दर महीन्याच्या शुद्य पक्षात वारी भरून दशमी, एकादशीस व द्वादशीस किर्तन खिरापत होते.

**श्रीक्षेत्र देहु :–**

पुणे जिल्ह्यात हे गाव पुण्यापासुन १८ मैल व आळंदीपासुन ९ मैल ऐवढ्या अंतरावर आहे. इंद्रायनी नदीच्या तिरावर आहे.१८८५ साली मुंबई गॅझेटीयर मध्ये देहुची लोकसंख्या १४९८ एवढी

तर तुकोबांच्या बीजेला ३००० लोक येतात म्हटले आहे. या देहु गावाबद्दल तुकाराम महाराज लिहीतात.

धन्य देहु गाव पुण्याभुमी ठाव । तेथे नांदे देव पांडुरंग ।।

धन्य क्षेत्रावाशी लोक ते दैवाचे । उच्चारीती वाचे नाम घोष ।।

तुकोबांच्या वेळी १५०–२०० वस्तीचे खेडे हाते. आता देहु रोड डेपो मुळे लोकसंख्या चांगली वाढली आहे. प्रथमीक शाळा व हायस्कुल सध्या शिक्षणाची सुविधा आहे. गावाचा कारभार ग्रामपंमचायत पाहते. दोन मैलावर येलवाडी, २ मैलावर भांडारा डोंगर, तळेगावला जायला रोड तयार आहे. देहुजवळ असलेल्या डोंगरावर भजन करण्यासाठी तुकोबाराय भजनाला जात असत ते डोंगर आजही वारकरी लोकांचे व वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आहे.

१. भंडारा डोंगर :– हा देहुपासुन २ मैलावच्या अंतरावर आहे.
२. भामचंद्र डोंगर :– देहुपासुन ६ मैल अंतरावर आहे. या डोंगरावर ३०/५० फुट उंचावर एक घळ आहे. तेथे त्यांनी एकांतात भजन केले त्यानंतर त्यांना भगवंताचा साक्षात्कार झाला. तेथेच भामचंद्र महादेवाचे मंदीर आहे.
३. घोराडा डोंगर.

तुकोबांची मुळ परंपरा ही विठ्ठलाची उपासना करणारी होती. विठ्ठल रखुमाईचे मंदिर भंगले होते ते तुकोबांनी दुरूस्त केले. देवस्थानाच वर्चस्व चालवण्यासाठी १५ विघ्यांची जमीन इनाम मिळालेली हाती. तुकोबाराय यांचे धाकटे चिरंजीव नारायन महाराज यांना सन १६९५ मध्ये राजाराम यांच्या काळात देवस्थानाच्या खर्चापोटी व तुकोबारायांच्या दर्शनास व यात्रेस येणाच्या लोकांच्या अन्नदानासाठी राजाकडुन बेलवाडी इनाम मिळाले. तुकोबा थोर सत्पुरूस,विश्ववंद्य,यांचा महीमा खुप आहे. तुकोबांच्या दर्शनास कित्येक येतात,त्यासी अन्नदाने गोसावी करवीताती,कित्येकास प्रसाद घालावा लागतो व यात्रा मोहात्सव प्रत्यही हातो. १७२३ साली सध्याचे देहु येथील विठ्ठलाचे मंदिर बांधले आहे. तुकोबाराय अदृश्य झाले त्या दिवशी तुकोबांचा उत्सव व्हावा असे रामेश्वर भटजींनी सांगितले. तेव्हापासुन पंचमीपर्यंत उत्सव होऊ लागला. नारायण गोसावी व खंडोबा गोसावी यांनी गावकऱ्यांकडुन देणग्या व वर्षासने मिळुन हा उत्सव सुरू ठेवला. सध्याच्या काळात हा उत्सव तुकाराम बीज या नावाने सात दिवस फाल्गुन द्वितीया ते अष्टमी पर्यंत उत्सव चालतो. महाराष्ट्रातुन अनेक दिंड्या व वारकरी दरवर्षी देहुला या काळात

येतात. तुकाराम बीज या दिवशी २ लाखावर वारकरी जमतात. गोपाळपुरा येथे दपारी १२ वाजता हा उत्सव अश्वत्थ वृक्षाखाली किर्तन होऊन फुले गुलाल उधाळुन साजरा केला जातो. पंचमिस रथ व पालखिची मिरवणुक निघते. षष्ठीला गोपाळपुऱ्यात दहीहंडी काला होतो. सप्तमिला महाद्वाराबाहेर काल्याचे किर्तन हाते व रात्री १२ वा. छबीना निघतो अष्टीमीला दुपारी १२ ला नारळ प्रसादाचे वाटप मानकऱ्यांना केले जातात व नंतर उत्सव समाप्त होतो.देऊळामध्ये तुकोबारायांचे वृंदावन सन १७०४ मध्ये नारायन बाबांनी बांधलेले आहे. मंदिराजवळ नारायण बाबा व घरातील इतर काही लोकांच्या समाध्या देऊळात आहे. येथील इंगळे पाटलांनी १८ व्या शतकात देऊळाभोवती भिंत, द्वार, आतील बाजुस राम मंदिर बांधले आहे. तुकोबारायांच्या जन्मस्थानी तुकोबांची मुर्ती ठेवण्यात आली आहे. ती आठराव्या शतकाच्या शेवटच्या काळातील आहे. मंदिराच्या पाठीमागे जहागिरदारांच्या वाड्यात तुकोबांची मुर्ती १९३० साली स्थापन करण्यात आली. आज देहुगाव हे पुणे व पिंपरीचिंचवड शहरालगतचे व चिखली येळील एम.आय.डी.सी.याक्षेत्रामुळे शहरीकरन झालेले दिसते. दररोज अनेक वारकरी व यात्रेकरू , प्रवासी देहुगावाला भेट व दर्शनास येतात.सध्याला गोपाळपुराच्या बाजुला ज्या ठिकानी तुकोबाराय यांच्या अभंग गाथा बुडविण्यात आली होती. त्या इंद्रायनीच्या पवित्र डोहाच्या किणाऱ्यावर श्री पांडुरंग म. घुले यांनी भव्य गाथा मंदिर बांधले. येथे अनेक भावीक व वारकरी दर्शनास येतात.

**श्रीक्षेत्र पिंपळनेर :-**

हे क्षेत्र निळोबाराय यांचे समाधी स्थान आहे.हे छोटेसे गाव नगर जिल्ह्यात पारनेर या तालुक्यात वसलेले आहे. ग्रामपंचायत गावाचा कारभार पाहते. तुकोबारायांनी अनुग्रह देऊन पुढे वारकरी संप्रदाय चालविण्याची आज्ञा केली ते म्हणजे संत निळोबाराय होय. ते स्वतः सांगतात.

निळा म्हणे मज उपदेश केला । संप्रदाय दिला सकळ जना । ।

निळोबांनी तुकोबारायानंतर त्यांनी परंपरा पुढे चालु ठेवली. तुकोबांचा उपदेश ते पुढे सकळ जनाला सांगतात. त्याची समाधी ही गावाजवळुन वाहणाऱ्या चंद्रभागा नदीच्या तीरावर आहे. त्यांनी आपला देह हा आपल्या गुरुच्या निर्वाण दिनी फाल्गुन शुद्ध ०२लाच ठेवला परंतु याच दिवशी देहु येथे तुकोबाराय यांचा उत्सव येत असल्याने निळोबाराय यांचा उत्सव फाल्गुन वद्य ०२ ला साजरा केला जातो. आसपासच्या जवळच्या व महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहुन वारकरी,भावीक, यात्रेकरू

,व अनेक दिंड्या या काळात पिंपळनेरला जमा होतात. जवळ जवळ लाख भावीकांची गर्दी येथे होते.

**निळोबांचे वंशज :–**

श्री निळोबा,श्री भिकोबा,श्री मुकुंदबाबा,श्री देवराय,श्री गुजाबा उर्फ तुकाराम,श्री एकनाथ बुवा व त्यांच्या बंधु कृष्ण बुवा यांचे दोन पुत्र लक्ष्मण बुवा व भागवत बुवा मकशीर हे सध्याला निळोबांची वारी चालवतात.

**श्रीक्षेत्र त्र्यंबेकश्वर :–**

हे तीर्थक्षेत्र नाशिक जवळ हे प्रसीध्द वारा ज्योतीलिंगापैकी त्र्यंबकेश्वर या नावाने प्रसिध्द आहे. श्री ज्ञानदेवाचे गूरू व जेष्ठ बंधू श्री निवृतीनाथ महाराज यांची समाधी आहे. देऊळापासून काही अंतरावर ब्रम्हगिरी हा प्रसिध्द गोदावरीचे तेथे उगमस्थान आहे. तेथे पोहचण्यासाठी सातशे पायऱ्या चढाव्या लागतात. याच ब्रम्हगिरीमध्ये श्री निवृत्तीनाथाचे गुरू श्री गहिनीनाथ यांची गुहा आहे. त्यांच्या सहवासात श्री निवृत्ती नाथांनी जेष्ठ वद्य १२ शके१२१६ ला समाधी घेतली. श्री निवृत्ती नाथाचा समाधी सोहळा उत्सव मात्र त्र्येंबकेश्वरी पौष वद्य ११ ला करण्याचा प्रघात पडला आहे. कारण निवृत्ती नाथाच्यासमाधी काळात ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान पंढरपुरकडे जात असते. बहुसंख्य वारकरी या सोहळ्यासोबत जात असतात. म्हणुन श्री निवृत्ती नाथांच्या सोहळ्यास उपस्थीत राहता यावे म्हणुन श्री निवृत्तीनाथ यांचा पुण्यतिथी उत्सव सोहळा पौष वद्य ५ ला सुरू होतो.महाराष्ट्रातील लाखो भावीक वारकरी दिंड्या सह त्र्येंबकेश्वरला हजर होतात. भजन, किर्तनाचा दररोज कार्यक्रम येथे सपन्न होतात.

**त्रंबकेश्वर वारीला प्रमुख दिड्या येतात :–**

१. पंढरपूरहून :–

कृष्णाबुवा ,एकनाथबुवा, व सोलापुरकररुच्या दिंड्या

२. देहु :– सोपानकाका देहुकर यांची दिडी

३. ह.भ.प. अमळनेकर दरवर्षा आड दिंडी आणतात.

४. आळंदी येथुन :– श्री हैबतराव बाबा यांच्या तर्फे दिंडी

५. एदलाबाह येथुन :– ह.भ.प. काशिराम बुवा हे मुक्ताबाइची दिंडी आणतात.

६. पैठणनची दिंडी

७. सासवड येथुन ह.भ.प. परकाळेबुवा यांची दिंडी .

या व्यतिरीक्त महाराष्ट्रातुन अनेक गावातुन अनेक दिंड्या त्र्यंबकेश्वरला येतात.यात्रेच्या वेळी श्री निवृत्तीनाथाच्या रथाची प्रदक्षिणा काढली जाते. त्यांच्याबरोबर आलेल्या सर्व दिंड्या भजन करत प्रदक्षिणा करतात. ही प्रदक्षिणा मिरवणुकशेवटी श्री त्र्येंबकेश्वराच्या मंदिरात येते. तेथे दिंडीप्रमुखाचे अभंग होतात. नंतर निवृत्तीनाथाला पालखित घालुन मंदिरात नेतात व नंतर पुढे ५ ते ७ दिवस सोहळा भजन,किर्तनाच्या माध्यमातुन चालु असतो. त्रयोदशीला काला होतो व समाधी उत्सवाची सांगता होते. श्री निवृत्तीनाथाच्या मंदिरात पुजा व व्यवस्था कारभार गोसावी घराकडे आहे. तेच आषाढी वारीला निवृत्तीनाथाची पालखी पंढापुरला घेऊन येतात.

**श्रीक्षेत्र सासवड :-**

पुणे जिल्ह्यातील पुणे येथुन ३४कि.मी. अंतरावर कऱ्हा नदीच्या तीरावर वसलेले हे गाव एक तीर्थक्षेत्र आहे. श्री ज्ञानदेवांचे कनिष्ठ बंधु श्री सोपानकाका यांच्या समाधीने पवित्र धार्मिक क्षेत्र म्हणुन नावा रूपाला आले आहे. तसेच आळंदीहुन पंढरपुरला जाणाऱ्या पालखी सोहळ्यातील दिवे घाट चढल्यानंतर २ नंबरच्या मुक्कामाचे ठिकाण म्हणुन सासवड ओळखले जाते.मागशीर्ष वद्य १३ शके १२१५ ला श्री सोपानकाका यांनी येथे समाधी घेतली. येथुन दरवर्षी आषाढी वारीला सोपानकाका यांची पालखी पंढरपुरला जाते. सध्या सासवड हे शहर बनलेले आहे. सासवड्याच्या बाजुला अनेक छोटे मोठे उद्योग सुरू झालेले आहे. हे गाव पुरंदर तालुक्यामध्ये आहे. तालुक्याचा सर्व कारभार सासवड येथुन चालविला जातो. सासवडचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र नगरपरिषद आहे. त्यामुळे या क्षेत्राचा चांगला विकास झालेला आहे.

**श्रीक्षेत्र एदलाबाद**

हे तीर्थक्षेत्र खान्देशात जळगाव जिल्ह्यात येते. श्री ज्ञानदेवांचा छोटी बहिण मुक्ताबाई यांचे समाधीस्थान म्हणुन ओळखले जाते. वैशाख वद्य १२ शके १२१६ ला मुक्ताबाई विजेच्या कडकडाटात गुप्त झाल्या. एदलाबाद जवळ तापी नदीच्या तीरावर मेहुन हे स्थान आहे. काहीच्या मते हे त्याचे निर्याण स्थान मानले जाते. त्यामुळे एदलाबाद व मेहून येथे महाराष्ट्रातील असंख्य वारकरी वद्य १२ ला जमतात. भजन किर्तनाच्या माध्यमातुन सात दिवसाच्या मोठा उत्सव साजरा होतो.एदलाबादच्या जवळ चार मैलावर तापी व पुर्णा नदीचा संगम आहे. या संगमावर चांगदेवांचे हेमांडपंती देऊळ आहे.

**श्रीक्षेत्र अरण :-**

हे क्षेत्र पंढरपूरपासून २२ मैल अंतरावर समाधीने सावता महाराजांचे पवित्र क्षेत्र बनले आहे. यांच्या समाधीवर सासवड माळी शुगर फॅक्टरीने भव्य मंदीर उभारले आहे. दरवर्षी येथे सावता महाराज निर्याण दिनी मोठी यात्रा भरते. परंपरेनुसार देहुकर येथे दिंड्या घेऊन येतात. यात्रेच्या वेळी ह.भ.प सोपानकाका देहुकर यांची किर्तन होते. चैत्र महिन्यात वद्य पक्षात दशमी ते द्वादशी असे तीन दिवस यात्रा भरते. ह. भ. प. वासकर मंडळी येथे तीन दिवस भतन व किर्तन करतात

**श्रीक्षेत्र तेर**

उस्मानाबाद जिल्ह्यात तेरणा नदीच्या तीरावर हे क्षेत्र आहे. येथे संत श्री गोरोबा काक यांचे निर्याण चैत्र वद्य १३ शके १२३९ ला झाले त्यांचे मंदीर येथे बांधले. यामुळे हे गाव तीर्थक्षेत्र म्हणुन गणले जाते. लातुर ते कुर्डुवाडी या रेल्वेमार्गावर तेर स्टेशनपासुन दोन मैलावर हे गाव वसलेले आहे. प्राचीन काळातील भरभराटीचे शहर होते. येथे प्राचीन काळातील दोन हजार वर्षापुर्वीचे सातवाहन व रोमन काळातील सुवर्णमुद्रा मुर्ती मातीची नक्षीची भांडी पाषाणाची शिल्पे बौद्धरूपाने अवशेष सापडले आहे. दक्षिण भारतात या पुर्वी नगर हे नाव होते. येथुनच रोमाशी व्यापार चालत असेल हे स्पष्ट होते. काकांच्या पुण्यतीथीला येथे दरवर्षी २५/३० हजार यात्रेकरू जमतात. भजन किर्तन येथे होतात. आषाढ वारीत येथुन दरवर्षी पंढरपुरला गोरोबा काकांची पालखी जाते.

**श्रीक्षेत्र मंगळवेढे :**

के क्षेत्र पंढरपुर पासुन १४ मैलावर असलेले तालुक्याचे मोठे गाव आहे. पुर्वी हे सांगली संस्थानात येत होते. या मंगळवेढेला प्राचीन भव्य ईतिहास लाभलेला आहे. अकराव्या शतकात हे कल्चुरी घराण्याची राजधानीचे शहर होते. येथे प्राचीन काळच्या मुर्ती शिलालेख व नाणीही मिळतात. येथे श्री चोखोबा महाराज यांचे निर्याण वैशाख वद्य पंचमीस झाले. तेथे फलटणच्या निंबाळकरांनी समाधी बांधली. तेव्हापासुन हे एक धार्मिक क्षेत्र म्हणुन आळखले जाते. तसेच श्री दामाजी पतं व कान्होपात्रा हे दोघेही मंगळवेढ्याचेच दामाजी पंताचे समाधीस्थान येथे भव्य मंदीर आहे. व तेथे दरवर्षी उत्सवही साजरा केला जातो. मध्वाचार्याच्या गादीवरील प्रसिद्ध जयतीर्थ हे मंगळवेढ्याचेच आहे. भाऊसाहेब करंदीकर यांच्या पुढाकाराने दहा वर्षापासुन मंगळवेढाहुन आषाढीस पंढरपुरला पालखी आणण्याचे परंपरा सुरू झाली

**श्रीक्षेत्र नेवासे :**

हे क्षेत्र नगर जिल्ह्यात तालुक्याचे मोठे गाव आहे. प्रवरा नदीच्या काठावर येथे श्री ज्ञानदेव यांनी ज्ञानेश्वरी सांगितली व सच्चिदानंद बाबा करवी यांनी लिहुन घेतली या ठिकाणी हल्ली पैसा खांब मंदीर व सभामंडप उभारलेआहे. नाथ षष्ठीला पैठणला येण्याच्या दिंड्यांपैकी बऱ्याच दिंड्या परत जाताना फाल्गुन वद्य ११ ला मंदिरापुढील विस्तीर्ण पटांगणात उतरतात. येथे भजन व किर्तन होते. व यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. यामुळे हे एक धार्मिक क्षेत्रात गणले जाते. पंढरपूर व आळंदी व इतर धार्मिक स्थळे येथे दरवर्षी यात्रा भरते. त्या ठिकाणी अनेक अडचणी व गैरसोयी यात्रेकरूंना भोगाव्या लागत. पंढरपुरात उतरण्यास धर्मशाळा नाही. शौचालयाची सोय नाही. याबाबत विनायक साखरे महाराज यांनी तत्कालीन सरकारकडे पत्र पाठविले होते. तसेच यात्रेकरूनां पंढरपुरातून बाहेर नेण्यासाठी रेल्वेबोर्ड ज्या प्रमाणे घाई करते, तसेच एकादशीला पोचण्यासाठी जादा रेल्वे गाड्यांची सोय करावी. सन १९१३ ची ही स्थिती होती.[१८३]

**सारांश**

या प्रकरणात वारकरी संप्रदायाचा इतिहास मांडलेला आहे ज्ञानदेवांच्या पुर्वीचा वारकरी संप्रदाय असुन ते अलीकडील संत मंडळीच्या कार्याचा आढावा या प्रकरणात मांडलेला आहे संत ज्ञानदेव, संत नामदेव,श्री भानुदास महाराज,श्रीएकनाथ महाराज,श्री संत तुकोबाराय,श्री निळोबाराय व यांच्या समकालीन इतर संत मंडळी यांनी वारकरी संप्रदायाचा विकास व प्रचार करण्यासाठी महत्वाची भुमीका बजावलेली दिसुन येते.तसेच संप्रदायाच्या कार्यामध्ये त्यांनी प्रचारासाठी साध्या व सोप्या भाषेत वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी अनेक ग्रंथ व अभंगरचना केल्या. तसेच अनेक धार्मिक तिर्थक्षेत्राच्या माध्यमातुन वारकरी संप्रदायाचा प्रसार आजपर्यंत होत आहे .

# संदर्भ


१. प्रा. शं. वा. दांडेकर, वारकरी पंथाचा इतिहास, वारकरी प्रकाशन मंडळ, नागपूर, पृ.१०

२. पं. महादेव शास्त्री जोशी, भारतीय सांस्कृति कोश, खंड १०, १९७९ पृ. ४६८

३. कित्ता, पृ.७८९, अभंग क्र. ३४०५

४. नामदेव गाथा, अभंग क्र. ८८९ (आवटे प्रत)

५. कित्ता, अभंग क्र. ९५

६. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, पृ.२४, प्रा. शं. वा. दांडेकर, वारकरी पंथाचा इतिहास, पृ.१२

७. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हिनस प्रकाशन १९८८, पृ.२४

८. श्री. गोविंद महाराज केंद्रे, सुलभ तुकाराम गाथा, केंद्रे संस्था आळंदी, २००६ अभंग क्र. २९१०, पृ.६३३

९. कित्ता, पृ.७२६, अभंग क्र. ३३४९

१०. गीता प्रेस, गोरखपूर, ज्ञानेश्वर महाराज गाथा, अभंग क्र. १८४

११. श्री. गोविंद महाराज केंद्रे, सुलभ तुकाराम गाथा, केंद्रे संस्था आळंदी, अभंग क्र. ७९१, पृ.१७९

१२. कित्ता, पृ.४९८, अभंग क्र. २२६८

१३. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. नामदेवाची गाथा, गीता प्रेस, पृ.३६९, अभंग क्र. २३६६

१४. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी गीता प्रेस, गोरखपूर पृ.१०, अभंग क्र. ६९, कित्ता पृ.३६९, अभंग क्र. २३६६

१५. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन १९८८, पृ.२५

१६. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, ए. गो. रहिरकर, अश्विन–९, १९३३ पृ.६२७, अभंग क्रमांक ४२७२

१७. गीता प्रेस, गोरखपूर, खंड पहिला, श्री. सकलसंतवाणी, गीता प्रेस, पृ.९, अभंग क्र. ६४

१८. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, १९३३, पृ.२७३, अभंग क्रमांक १९५३

१९. पांडुरंगास्टकम्, शंकराचार्य

२०. प्रा. शं. वा. दांडेकर, वारकरी पंथाचा इतिहास, वारकरी प्रकाशन मंडळ, नागपुर, सन १९९४, पृ.१९, २०

बहिरट, भालेराव, वारकरी संप्रदाय उगम व इतिहास, पृ.१३

२१. प्रा. शं. वा. दांडेकर, वारकरी पंथाचा इतिहास, वारकरी प्रकाशन मंडळ, नागपुर, सन १९९४, पृ.३०

२२. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, रहिरकर, १९३३, पृ.६१०, अभंग क्रमांक ४१८३

२३. महाभारत, भीस्मपर्व, अध्याय–९

२४. प्रा. ग. खरे, विठ्ठल आणि पंढरपुर (नृ आ) पृ.४४

२५. संजय शिवाजीराव काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, १९३२, २०१३, पृ.६६३, अध्याय १६, ओवी २०

२६. कित्ता, सार्थ ज्ञानेश्वरी, आ. १८, ओ. १७९५, पृ.८८०

२७. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. नामदेवाची गाथा, गीता प्रेस, पृ.२०९, अभंग क्र. १३९२

२८. संजय शिवाजीराव काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी, २०१३, अमोल प्रकाशन, पृ.८७७, अध्याय १८, ओवी १७५२–१७५९

२९. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, १९३३, पृ.५२१, अभंग क्रमांक ३६१३

३०. कित्ता, पृ.२६०, अभंग क्र. १८५७

३१. प्रा. (डॉ.) रा.द.रानडे,मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग पुणे १९९३ पृ.१५०

३२. प्रा. शं. वा. दांडेकर, वारकरी पंथाचा इतिहास, वारकरी प्रकाशन मंडळ, नागपुर, पृ.३८

३३. नामदेव महाराज गाथा, अभंग क्र. ८८९

३४. संजय शिवाजीराव काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, ओवी ३४, अध्याय ६

३५. गीता प्रेस, गोरखपूर, खंड पहिला, श्री संकलसंतवाणी, गीताप्रेस, पान क्र. ६०, अभंग पृ.४२३

३६. कित्ता, क्र. ६२, अभंग क्र. ४४७

३७. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन १९८८, पान नं. २८

३८. गीता प्रेस, गोरखपूर, श्री संकलसंतवाणी (सोपानदेव), गीताप्रेस, पान क्र. १५८, अभंग क्र. ३

३९. कित्ता (बहिणाबाई अभंग) पृ.८९५, अभंग क्र. १

४०. कित्ता पृ.१३१

४१. कित्ता पृ.१३४

४२. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन १९८८, पृ.३६

४३. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. नामदेवाची गाथा, गीता प्रेस, पृ.११४, अभंग क्र. ८८५

४४. गीता प्रेस, गोरखपूर, श्री संकलसंतवाणी, खंड पहिला, (श्री. ज्ञानेश्वराचे अभंग)गीताप्रेस, पृ.४६, अभंग क्र. ३४२

४५. कित्ता, पृ.९०, अभंग क्र. ६६७

४६. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, २०१०, अभंग ९ वा

४७. गीता प्रेस, गोरखपूर, श्री संकलसंतवाणी, (श्री. ज्ञानेश्वराचे अभंग)गीताप्रेस, पृ.९ अभंग क्र.६१

४८. कित्ता, पृ.३१, अभंग क्र. २२७

४९. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, २०१०, अध्याय १८ वा

५०. (डॉ.) मु. ग. पानसे, यादवकालीन महाराष्ट्र, पृ.१३४

५१. (डॉ.) रा. द. रानडे, ज्ञानेश्वर वचनामृत

५२. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, २०१०, अध्याय १८ वा, ओवी क्र. ८६७

५३. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंत गाथा, श्री. ज्ञानेश्वरांचे गाथा, गीता प्रेस, पृ.२६, अभंग क्र. १९१

५४. कित्ता , पृ.२८

५५. कित्ता, पृ.३१ अभंग क्र. २२६

५६. कित्ता, पृ.३१ अभंग क्र. २२७

५७. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, २०१०, अध्याय १८ वा, ओवी क्र. ८६७

५८. कित्ता, अध्याय १० वा, ओवी १२७–१२८

५९. शं. पु. जोशी, पंजाबातील नामदेव

६०. कित्ता, पंजाबातील नामदेव (पान क्र. ७०–७१)

६१. श्री. नामदेवांच्या आंतरभारतीचे दर्शन, शिवाजी विद्यापिठ प्रकाशन

६२. दै. सकाळ, १४–१–१९८०

६३. श्री. परशुराम चतुर्वेदी – उत्तर भारतातील संत परंपरा, पान क्र. १०७

६४. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. नामदेवांची गाथा, गीता प्रेस

६५. कित्ता, पृ.६१, अभंग क्र. ४०९

६६. कित्ता, पृ.६४, अभंग क्र. ४२६

६७. कित्ता, पृ.५३, अभंग क्र. ३६७

६८. कित्ता, पृ.६६, अभंग क्र. ४४४

६९. कित्ता, गोदांचे अभंग – पृ.४०८, अभंग क्र. १५, पृ.२५३, अभंग क्र.१७७३

७०. कित्ता, पृ. २५३, अभंग क्र. १७७३

७१. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, ए. गो. रहिरकर, १९३३, पृ.५५६, अभंग क्रमांक ३८३२

७२. कित्ता, पृ.२८८, अभंग क्र. २०५४

७३. श्री. सकलसंत गाथा पृ.६१ अभंग क्र.९

७४. कित्ता, पृ.२८८, अभंग क्र. २०५४

७५. श्री. सकलसंत गाथा पृ.२८७ अभंग क्र.४

७६. कित्ता, पृ.२८८, अभंग क्र. २०५४

७७. श्री. सकलसंत गाथा पृ.७६

७८. कित्ता पृ.२८७, अभंग क्र. २०४५

७९. श्री. सकलसंत गाथा, श्री भानुदास गाथा पान क्र. ४, अभंग क्र. ३४ पृ. ९४

८०. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंत गाथा, खंड दुसरा (भानुदास गाथा, गीता प्रेस, पृ. ४, अभंग क्र. ३६

८१. कित्ता, पृ.२, अभंग क्र. ११

८२. कित्ता, पृ.७, अभंग क्र. ५७

८३. कित्ता पृ.९

८४. कित्ता पृ. .११

८५. रंगनाथ महाराज खरात भक्तीविजय कथासार राहुल धार्मिक सेवा प्रकाशन सन २०१४ पृ.२५

८६. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन १९८८, पृ.६०

८७. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंत गाथा, (भानुदास गाथा), गीताप्रेस

८८. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी, श्री. भानुदासाचे अभंग, गीता प्रेस, पृ.३, अभंग क्र. २२

८९. कित्ता, पृ.६, अभंग क्र. ५०

९०. कित्ता, पृ.१०, अभंग क्र. ८६(काला प्रकरण)

९१. शुकाल्टकटीका, ओ. ४३–८५

९२. स्वात्मसुख – ५०६

९३. सर्व एकनाथ भागवत, अध्याय १, ओवी १३०, १३१, १३२

९४. कित्ता अध्याय १, पृ. १३६

९५. श्री. सकलसंतवाणी पृ.३१२

९६. कृ.ना.आठले एकनाथी भागवत ,रामचंद्र कामत सन १९९६ अध्याय १

९७. कित्ता अध्याय १, पृ. १३५

९८. कित्ता अध्याय १ पृ.८ व ९ ओवी क्र २३,२४,२९

९९. कित्ता अध्याय १ पृ.९ ओवी १३०

१००. कित्ता अध्याय ३१ पृ.१३११ ओवी क्र ५१

१०१. कित्ता अध्याय ३१ पृ.१३०९ ओवी क्र २६

१०२. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, वै. गो. श. रहिरकर, १९३३, पृ.५४२, अभंग क्रमांक ३७५५

१०३. साखरे संप्रदायिक, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, २०१३, अध्याय १८ ओवी

१०४. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी (खंड दुसरा), श्री. एकनाथ महाराज अभंग, गीता प्रेस, पृ.१६९, अभंग क्र. १४७७

१०५. कित्ता, पृ.१८७, अभंग क्र. १६७५

१०६. कित्ता, पृ.६७, अभंग क्र.३४६

१०७. कित्ता, अभंग क्र.४५९

१०८. कित्ता, पृ.६६, अभंग क्र.३४१

१०९. कित्ता, पृ.१८२, अभंग क्र.१६२१

११०. कित्ता, पृ.१५२, अभंग क्र.१२५८

१११. भा. प. बहिरट, प. ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हीनस प्रकाशन १९८८, पृ.६९

११२. पांडुरंग अनाजी घुले, श्री. एकनाथी भागवत, श्री. संत तुकाराम महाराज वाङ्मय प्रकाशन संस्था, आळंदी देवाची, २०११, अभंग क्रमांक ६६६, पृ.४४४

११३. कित्ता, अध्याय क्र.२५, अभंग क्र.३१०

११४. कित्ता, पृ.४७३, अध्याय क्र. ११, ओवी ११० अभंग क्र.१२५८

११५. कित्ता, पृ.११०१, अध्याय क्र. २७, ओवी ३१

११६. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी, श्री. एकनाथ महाराज अभंग, गीता प्रेस, पृ.४४६–४४७, अभंग क्र. ३९०५

११७. कित्ता, पृ.४६३, अभंग क्र. ३९४९, ३९५१

११८. भा.द. खेर आषाढी – कार्तीकी पब्लीशर्स प्रा. लि. मुंबई १९६० पृ.६५

११९. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, ए. गो. रहिरकर, पुणे १९३३, पृ.६१०, अभंग क्रमांक ४१८३

१२०. कित्ता, पृ.६०९, अभंग क्र. ४१७८

१२१. कित्ता, पृ.५४१, अभंग क्र.३७५०

१२२. कित्ता, पृ.४२९, अभंग क्र. ३०५०
१२३. कित्ता, पृ.३५२, अभंग क्र. २५३६
१२४. नथुसिंग डोंगरसिंग राजपुत, श्री. तुकाराम महाराजांची सार्थगाथा, वारकरी शिक्षण संस्था, १९९६, पृ.६४७, अभंग क्र. ३६०२
१२५. ल.रा.पांगारकर,संत तुकाराम चरित्र, वरदा बुक्स ,१९९८ पृ.२४९
१२६. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, (पंढरीपर) ए. गो. रहिरकर, १९३३, पृ.२९५, अभंग क्र २१०८
१२७. ल.रा.पांगारकर,संत तुकाराम चरित्र, वरदा बुक्स ,१९९८ पृ.७४ ,७५
१२८. कित्ता, पृ.२९८, अभंग क्र. २१२३
१२९. कित्ता, पृ.४२१, अभंग क्र. २१८९, तुकारामगाथा,
१३०. कित्ता, निळोबा गाथा
१३१. कित्ता, निळोबा गाथा, पृ.५३३, अभंग क्र. ३६९६
१३२. कित्ता , निळोबा गाथा, पृ.१००८, अभंग क्र. ८८३
१३३. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, निळोबा अभंग, ए. गो. रहिरकर, १९३३, पृ.२१६, अभंग क्र १५४४
१३४. कित्ता, पंढरीपर, पृ.३१०, अभंग क्र. २२१९
१३५. कित्ता , निळोबा गाथा, पृ.७९३, अभंग क्र. ३४५३
१३६. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, निळोबा अभंग, ए. गो. रहिरकर, १९३३, पृ.५३३, अभंग क्र ३६९७
१३७. रमेश पंढरीनाथ सोनवणे, श्री. संत ज्ञानेश्वर महाराज कृत हरिपाठ आरती ग्राफीक्स सोलापुर पृ.५६, अभंग क्र. ६
१३८. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, श्री एकनाथ अभंग, ए. गो. रहिरकर, १९३३
१३९. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, १९३२, २०१०, अध्याय ७ वा, ओवी क्र. २३२
१४०. कित्ता, अध्याय १, ओवी १

१४१. पांडुरंग अनाजी घुले, श्री. एकनाथी भागवत, श्री. संत तुकाराम महाराज वाड्मय प्रकाशन संस्था, आळंदी देवाची, २०११, अभंग क्र.३, ओवी क्र. ६७५

१४२. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१०

१४३. पांडुरंग अनाजी घुले, श्री. एकनाथी भागवत, श्री. संत तुकाराम महाराज वाड्मय प्रकाशन संस्था, आळंदी देवाची, २०११

१४४. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१० अध्याय ४, ओवी क्र. २६–२७

१४५. कित्ता अध्याय ४

१४६. कित्ता, अध्याय४, ओवी क्र. ३३–३४

१४७. कित्ता, अध्याय १, ओवी १२

१४८. पांडुरंग अनाजी घुले, श्री. एकनाथी भागवत, श्री. संत तुकाराम महाराज वाड्मय प्रकाशन संस्था, श्री क्षेत्र आळंदी, २०११, ओवी ३९२–३९७

१४९. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१० अध्याय १३, ओवी क्र. ९४९–९५२

१५०. कित्ता, अध्याय ७, ओवी क्र.१२

१५१. कित्ता, अध्याय ७, ओवी क्र. ९२

१५२. विष्णू महाराज जोग,माधव कृष्णा देशमुख ,शके १८२७ अमृतानुभव

१५३. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१० अध्याय ७, ओवी क्र. १२५

१५४. पांडुरंग अनाजी घुले, श्री. एकनाथी भागवत, श्री. संत तुकाराम महाराज वाड्मय प्रकाशन संस्था, श्री क्षेत्र आळंदी, २०११, ओवी ६९–७४

१५५. श्री. ह. भ. प. गोविंद म. केंद्रे सुलभ तुकाराम गाथा, श्री. ह.भ. प. गोविंद महाराज केंद्रे संस्था आळंदी २००६, पृ.६५४, अभंग क्र. ३००९

१५६. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१० अध्याय १३, ओवी क्र. ३८५–३८६

१५७. कित्ता, अध्याय ६, ओवी १२४

१५८. अमृतानुभव अध्याय ९ ओवी १–३

१५९. भावार्थ रामायण, युध्दकांड ६८–१२८

१६०. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१० अध्याय ९, ओवी क्र.४३० व ४३८

१६१. कित्ता, अध्याय ६, ओवी ५१६

१६२. कित्ता, अध्याय १८, ओवी ८६७

१६३. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा, ए. गो. रहिरकर, पुणे १९३३

१६४. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१० अध्याय १८, ओवी क्र.१११७

१६५. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी, खंड पहिला, गीताप्रेस, पृ.१२५–१५७

१६६. (डॉ.) ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे २०१०

१६७. कित्ता, पृ.९१०–९११

१६८. कित्ता, हरिपाठ, अभंग पृ.८८९–८९१

१६९. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी, खंड पहिला, गीताप्रेस, पृ.१२४

१७०. कित्ता, श्री. सोपानदेवाचे अभंग, पृ.१५८–१६२

१७१. कित्ता, श्री मुक्ताबाईचे अभंग, पृ.१६३–१६६

१७२. गीता प्रेस, गोरखपूर, १९७१, श्री नामदेवांची गाथा, गीताप्रेस पृ. ७७

१७३. गो. श. रहिरकर, श्री. सकल संतगाथा (ओळीचे अभंग), ए. गो. रहिरकर, पुणे १९३३ पृ. ४०

१७४. पांडुरंग अनाजी घुले, श्री. एकनाथी भागवत, श्री. संत तुकाराम महाराज वाङ्मय प्रकाशन संस्था, श्री क्षेत्र आळंदी, २०११ पृ. ५०

१७५. भावार्थ रामायण, युद्धकांड पृ. २१५

१७६. गीता प्रेस, गोरखपूर, श्री. सकलसंतवाणी (१४७५), श्री एकनाथ गाथा, गीताप्रेस पृ.१९–४८६

१७७. कित्ता, श्री संत तुकाराम महाराजांचे अभंग पृ.४८७–८८७

१७८. कित्ता, बहिणाबाईंचे अभंग, पृ.८९५–९००

१७९.	कित्ता, श्री. निळोबा महाराजांची गाथा, पृ.९०१–१०८२

१८०.	प्रा.द.रा.बेंद्रे, विठ्ठल संप्रदाय, पृ.१९

१८१.	गॅजेट आँफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी ,पुणे डिस्ट्रीक्ट १८८५ व्हॉल्यूम १८ पार्ट ३ चॅप्टर १४ पृ.१०२ ,१०३

१८२.	शासकीय पुराभिलेखागार, (पेशवे दत्पर), पुणे, रुमालसूरी ५६, सिडी नं. ०६, १५३१

१८३.	केसरी मंगळवार, तारीख १८ माहे नोव्हेंबर, सन १९१३ इसवी

## प्रकरण चौथे

# श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी वारी दिंडी पालखी सोहळा

४ .१ प्रास्ताविक

४.२ देहू येथून संत तुकाराम महाराज दिंडी सोहळा प्रस्थान

४.३ दिंडी प्रवासातील रोजचा नित्यक्रम–

४.४ दिंडी प्रवासाचा मार्ग, मुक्काम, वाटचाल

४.५ दिंडीच्या वाटचालीतील रिंगण–

४.६ सारांश

# श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी वारी दिंडी पालखी सोहळा

## ४.१ प्रस्ताविक :

आपल्या भारत देशाला प्राचीन काळापासून आध्यामिक सांस्कृतिक पार्श्वभमी लाभलेली आहे. भारतात कैलास यात्रा, जगन्नाथ यात्रा, अमरधाम यात्रा याप्रमाणे, आषाढी पंढरपूर वारीची थोर परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. आषाढ महिन्यात आषाढ शुद्ध दशमी पासून ते आषाढ शुद्ध पौणिमेपर्यंत श्रीक्षेत्र पंढरपूर येथे 'आषाढी वारी सोहळा' भरलेला असतो. देशातील सर्वात मोठा जनसमुदाय एकत्र होणारा हा सोहळा मानला जातो. या आषाढी वारीसाठी महाराष्ट्र व विशेषतःमहाराष्ट्राबाहेरून अनेक वारकरी अनेक दिंड्या, संतांच्या पालखी–दिंडी सोहळे पायी प्रवास करत मुखाने हरिनाम घेत, टाळ–मृदंगाच्या तालावर अभंग गात दिंड्याच्या माध्यमातून पंढरपूरला पोहचतात. या संत पालखी सोहळ्यापैकी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज ते संत निळोबाराय अलिकडील संतांपर्यंत सर्वांचे पालखी रथ तयार करुन वारकरी दिंड्या घेऊन पंढरपूरकडे आपल्या गावाहून तसेच संतांच्या समाधी क्षेत्राहून पालखी सोहळे निघत आहेत.या सोहळ्यामध्ये वारकरी सांप्रदायातील मुख्य संत परंपरेतील श्री संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या नावाने अनुक्रमे क्षेत्र देहू येथुन व श्रीक्षेत्र आळंदी येथून या दोन स्वतंत्र पालखी सोहळे पायी प्रवास करत पंढरपूरला पोहचतात. या दोन्ही संत पालखी सोहळ्यास वारकरी सांप्रदायात अग्रभागी स्थान आहे. आषाढी वारीला पंढरपूरला जाणाऱ्या सर्व पालखी सोहळ्यातील सर्वांत मोठा पालखी सोहळा लाखो वारकरी समुदाय सहभाग असलेला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज क्षेत्र आळंदीहुन निघणारा व दुसरा संतश्रेष्ठ तुकाराम महाराज क्षेत्र देहू येथून निघणारा पालखी सोहळा मानला जातो. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे धाकटे पुत्र नारायण महाराज यांनी तुकोबाराय यांची पंढरपूरला वारकऱ्यांसह दर महिन्याला पंढरपूरला जाणारी पायी वारीची परंपरा सुरू ठेवली. पंढरपूरला पायी वारीला जातात त्यांनी तुकोबाराय यांच्या पादुका पालखीत ठेवून पालखी सोहळा सुरु केला. आजूबाजूच्या गावातील वारकरी, अनयायी यांच्यासह दिंडी घेऊन पालखी सोहळा सन १६८५ मध्ये सुरु केला. यावेळी त्यांनी तुकोबांच्या या पालखी बरोबर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून संत तुकोबा व संत ज्ञानेश्वर महाराज यांचा संयुक्त पालखी सोहळा सुरु केला व वारकरी संप्रदायात पालखी सोहळ्याची स्वतंत्र परंपरा सुरु केली. तेव्हापासून ते सन १८३२ पालखी सोहळा अन्यहातपणे सुरु होता.

१८२९ च्या दरम्यान देहू संस्थान मध्ये तुकोबाराय यांच्या वंशजामध्ये मालकी हक्कावरून आणि सेवेच्या प्रश्नावरून वाद सुरू झाला याचा उपसर्ग पालखी सोहळ्याला होऊ शकतो या शंकेने या काळातील थोर माऊलीभक्त व पालखी सोहळ्याबरोबर चालत असलेले शिंद्यांचे सरदार श्री हैबतबाबा आरफळकर यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज यांचा स्वतंत्र पालखी सोहळा आळंदी येथून सुरू केला.देहू,आळंदी ते पंढरपूर आषाढी वारी पालखी दिंडी सोहळा याविषयी या प्रकरणात मांडणी केलेली आहे.

## ४.२ देहू येथून संत तुकाराम महाराज दिंडी पालखी सोहळा प्रस्थान :-

**प्रस्थान :**

''प्रस्थान म्हणजे प्रवासास निघणे, मार्ग चालण्यास आरंभ करणे. असा अर्थ आहे.''

''परस्थानी म्हणजे दुसऱ्या ठिकाणी जायला निघणे. म्हणजे प्रस्थान असाही अर्थ आहे.'' 'जेष्ठ वद्य सप्तमी' या दिवशी तुकाराम महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होते. या ठरलेल्या शुभमुहूर्तावर प्रस्थान करणे याला प्रस्थान असे म्हणतात.'प्रस्थानच्या दोन दिवस अगोदर देहुमध्ये अनेक वारकरी, गावोगावच्या दिंड्या जमा होतात. पालखी सोहळ्यासोबत पंढरपूरला जाण्यासाठी जमा होतात. देहू परिसर भक्तीमय वातावरणात गजबजलेला असतो. देहू परिसरात आपल्या सोयीनुसार जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी राहुट्या (तंबु) उभे करतात. तसेच धर्मशाळाचा उपयोग राहण्यासाठी करतात. सर्व वारकरी आपल्या बरोबर आवश्यक साहित्य यामध्ये आंथरुण-पांघरुण, ताट, तांब्या, इ. घेऊन येतात. पालखी वाटचालमध्ये दररोज मुक्काम बदलत असतो. पालखी काळ हा पाऊसाळ्यामध्ये येत असल्याने आवश्यक निवाऱ्याची व्यवस्था वारकरी व दिंडी मालक, चालकांना करावी लागते.देहूत जमा झालेले वारकरी इंद्रायणीचे स्नान करून पांडुरंगाचे व महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी रांगा लावतात.

याचे वर्णन :

आषाढीवारी, इंद्रायणी काठी जमती वारकरी ।
विठ्ठलाचे नाम मुखी, अवघी दुमदुमली पंढरी ।
पांडुरंगा, तुकोबारामा भेटी, सजली देहू नगरी ।।[२]

या अभंगात असे वर्णन येते की, आषाढीवारीला पंढरपुरला जाण्यासाठी देहू मध्ये, इंद्रायणी काठी वारकरी जमलेले आहे. त्यांच्या मुखामध्ये विठ्ठलाचे नाम आहे. या रुपाने तुकोबाराया ची देहू नगरी दुमदुमली आहे.

## तुकाराम महाराज पालखी प्रस्थान :

जेष्ठ वद्य सप्तमी या दिवशी परंपरने दरवर्षीप्रमाणे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होते. सात दिवसाचा सप्ताहाची समाप्ती होऊन या दिवशी प्रस्थान असते. पहाटे ४ वा. मुख्य मंदिरात विठ्ठलाची महापूजा होते. त्यानंतर तुकाराम महाराजांचे वैकुंठस्नान मंदिर व तपोनिधी नारायण महाराज यांच्या समाधीची पुजा होते. सकाळी १० वा. सप्ताहाची समाप्ती काल्याच्या कीर्तनाने होते.दुपारी बरोबर ४ वा. प्रस्थानाची सुरुवात होते. परंपरेनुसार इनामदारांच्या वाड्यात मानकरी मसलेकर कुटुंबियांकडून पादुकांची पुजा होते. त्यानंतर तुकोबांच्या पादुका त्यांच्यावतीने विठ्ठल–रुक्मणीच्या मुख्य मंदिरात आणल्या जातात. मंदिराला प्रदक्षिणा पुर्णकरून त्या मंदिरात नेल्या जातात. त्यानंतर प्रस्थानासाठी उपस्थित मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते पादुकांची पुजा होते. तसेच गणेश कलश, वरुण, पृथ्वीपूजा यांची षोड्शोपचारे पूजा होते. विष्णुसुक्त व महाभिषेक झाल्यावर संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांची आरती होते. त्यानंतर पालखीत सन्मानपुर्वक 'ज्ञानोबा–तुकोबा'च्या जयघोषात पादुका ठेवण्यात येतात. यानंतर देवस्थानच्या वतीने उपस्थित सर्व दिंडी प्रमुखांचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येतो. याकाळात सर्व दिंड्यांचे टाळकरी, झेंडेकरी, विणेकरी आपल्या दिंडीसह उपस्थित असतात. हे सर्व टाळ, पखवाजाच्या नादात, तालावर, 'ज्ञानोबा–तुकारामाचा' जयघोष करीत नाचत असतात. फुगड्या खेळणे, मनोरे रचणे, टाळकरी चाली लावणे, वेगवेगळ्या चाली तयार करत नाचणे. हे मंदिरात चालू असते. हा अनुभव व सोहळा अगळावेगळा व देखणा असतो. पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते. असा आनंदात पालखी हरिनामाच्या जयघोषात मंदिराची प्रदक्षिणा पूर्ण करून मंदिराच्या बाहेर येते. पालखीचा पुढे मानाचा घोडा डौलतपुढे चालतो. चोपदार, गरुड टक्याची चांदीची अबदागिरी घेतलेले अबदागिरी पादुकांवर चवऱ्या ढाळीत पालखी निघते. सर्व दिंड्यांच्या समवेत पालखी मंदिराच्या बाहेर प्रदक्षिणा मार्गाने पालखी इनामदार वाड्यात पोहचते. येथे पालखीचा पहिला मुक्काम असतो. इनामदार वाडा देहू येथे पहिल्या मुक्कामाला पालखी थांबल्यानंतर इनामदाराच्या वतीने पुजा होते. गावातील सर्व भाविक भक्त उपस्थित वारकरी येथे

दर्शनासाठी रांगा लावतात. रात्री पालखी समोर म्हातारबुवा पाथ्रुडकरांचे कीर्तन होते. यांना परंपरागतय या दिवशी कीर्तनाचा मान आहे. संपुर्ण देहू नगरीत रात्री दिंड्यादिंड्यामध्ये कीर्तन, भजनाचे कार्यक्रम सुरू असतात. देहू नगरी भक्तीय वातावरणात डुबून जाते. सन २०१३ साली रथाच्या पुढे २५ दिंड्या आणि रथाच्या मागे २९६ दिंड्या सोहळ्यात सहभागी झालेल्या होत्या. दरवर्षी या संख्येत वाढ होते.

तुकोबांच्या पालखी प्रस्थान कार्यक्रम– जून २०१४

पहाटे ४ वा. : शिळा मंदिरात महापूजा

पहाटे ५.३० वा : श्री विठ्ठल–रुक्मीणी मंदिरात महापूजा

सकाळी ६ वा. : वैकुंठस्थान मंदिरात महापूजा

सकाळी ७ वा. : तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिरात महापूजा

सकाळी ९ वा. : देहूकर महाराजांचे काल्याचे कीर्तन

दुपारी ४ वा. : पालखी सोहळा प्रस्थान प्रारंभ[३]

परंपरेनुसार वारीतील जेष्ठ वारकऱ्यांच्या हस्ते पादुकांची महापूजा होते. सहकार मंत्री (२०१४) हर्षवर्धन पाटील सपात्निक पादुकांची पूजा केली.

## ४.३ दिंडी प्रवासातील रोजचा नित्यक्रम

संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे प्रस्थान देहूतून झाल्यानंतर पंढरपूरच्या दिशेने दररोजची वाटचाल सुरू होते. दररोज पालखी मुक्कामाच्या ठिकाणाहुन निघण्या अगोदर पहाटे चार वाजता महाराजांच्या पादुकांची विधीवत पूजा होत असते. त्यानंतर काकडा आरती होते. जर वारीच्या वाटेवर ज्या दिवशी लांबचा पल्ला असेल तर त्या दिवशी पहाटे सहा वाजता व जवळचा पल्ला असेल तर सकाळी आठ वाजता पालखी निघते. पालखी रथाच्या पुढे २५ व मागे अधिकृत २०० दिंड्या चालतात. पालखी सोहळा सुरू झाल्यावर दिंडया मधून सकाळी काकडा आरतीचे अभंग व भजने म्हटले जातात. त्यानंतर संतपर अभंग व गौळणी पर अभंग असतात. दुपारी नाट, पत्रिका, तिर्थावळी, समाधी प्रकरण असे नियमाचे भजन असते. विश्रांतीच्या ठिकाणी जोहार व भारुडांचा कार्यक्रम दिंड्यातून रंगत असतो. सकाळी पालखी निघल्यावर दोन तासाने विसावा असतो व त्यानंतर साधारणतः दोन तासानेच दुपारचा विसावा व भोजन असते.सायंकाळचा विसावा चार वाजण्याच्या सुमारास होतो व संध्याकाळ पालखी ठरलेल्या मुक्कमाच्या ठिकाणी

पोहचते वारकरी व भाविक ठरलेल्या राहुटया रोजच्या ठरलेल्या ठिकाणीच रोज विश्रांती घेतात.हा रोजचा नित्यक्रम पंढरपूरला पोहचेपर्यंत ठरलेला असतो यामध्ये कोणताही बदल होत नाही. सर्व दिंड्या, वारकरी व सहभागी भाविक आनंदाने व शिस्तीने या नियमाचे नित्यक्रमाने पालन करतात.

## पालखी सोहळ्यातील मानाचे 'अश्व' वैभव :

श्री संत तुकोबारामांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो भाविकांसह त्यामधील लवाजम्यामुळे सोहळ्याला मोठी भव्यता प्राप्त झाली आहे. या सोहळ्यातील अश्व म्हणजे वैभवाचे प्रतिक मानले जाते.आषाढी वारीला पंढरपूरला जाणाऱ्या पालखी सोहळ्यास काळानुरुप खुप बदल होत गेला. सुरुवातीला काही भाविकांसह पालखी पंढरपुरला नेली जात होती. चौघडागाडी, चोपदार, अश्व हत्ती असा लवाजमा वाढत गेला. सोहळा अधिकाधिक भव्य कसा होईल यासाठी संस्थानने पावले उचलली. सोहळ्यात सहभागी अश्वाना अनन्य साधारण महत्त्व आहे. अश्व म्हणजे वैभवतेचे प्रतिक मानले जाते. सध्या सोहळ्यातही दोन अश्व आहेत. यामध्ये परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील पेठ बाभूळगाव येथील अश्व आहे. परंपरेप्रमाणे अनेक वर्षांपासून हा अश्व सोहळ्यात आहे. या अश्वावर तुकाराम महाराज स्वार असल्याचे मानले जाते. हा 'अश्व' विनायक रणेर बाभूळगावकर यांच्या मालकीचा असून ते हा अश्व घेऊन येतात. यापूर्वी त्यांचे वडील नारायण रणेर घेऊन जात होते. पूर्वी हा 'अश्व' बाभूळगावहून देहूला पायी आणला जात होता. अलीकडे मागील पाच वर्षांपासून बाभूळगाव ते पंढरपूरपर्यंत हा अश्व वाहनाने आणला जातो. या अश्वासोबतच बाभूळगावातील माई, दिंडीतील भाविक असतात. प्रस्थान सोहळ्याच्या अगोदर बारा (१२) दिवस अश्व व माई दिंडी पंढरपूरकडून देहूकडे मार्गस्थ होते. तुकोबाराय या अश्वावर बसलेले असल्याचे मानले जात असल्याने या अश्वाला देवाचा अश्व असे म्हणतात.[४]आतापर्यंत बाभुळगावकरांनी चार अश्व दिले वयोमानानुसार ठराविक कालावधी अश्व बदलले जातात. या चारही अश्वांचे नाव 'राजा' हेच ठेवले. सोहळ्यात दुसरा 'अश्व' अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील यांचा असतो. १९८३ पासून हा अश्व सोहळ्यात दाखल झाला. दोन्ही अश्व परंपरेनुसार प्रस्थान सोहळ्याच्या आदल्या दिवशी देहूत दाखल होतात. आल्यावर त्यांचे पुजन होते व देहूत मिरवणूक काढली जाते.पालखी सोहळ्यात हे अश्व रथाचे पुढे चालतात. त्यांच्या पाठीमागे मानाच्या दिंड्या व त्यानंतर रथ व पाठीमागे नंबराप्रमाणे मानाच्या दिंड्या व आता नवीन सहभागी होणाऱ्या दिंड्या चालतात. पालखी सोहळ्यात ठिकठिकाणी होणाऱ्या 'रिंगण' सोहळ्यात

सर्वात मोठे आकर्षण म्हणजे अश्वांचे रिंगण हे दोन्ही अश्व शिस्तबद्ध रित्या धावतात पाहून भाविकांना वेगळाच आनंद मिळतो. रिंगणातील अश्वांच्या पायाखालची माती उचलून कपाळाला लावण्यासाठी झुंबड उडते. हीच माती काही जण आपल्या शेतातही टाकण्यासाठी नेतात.

श्रीक्षेत्र देहू ते पंढरपूर आषाढी पालखी सोहळ्यासाठी असणाऱ्या तुकाराम महाराजांच्या रथासाठी आवश्यक बैलजोडीसाठी देहू संस्थानच्या वतिने इच्छुक बैलमालकांकडून अर्ज मागविले जातात त्यानंतर अर्जांची छाननी होवून संस्थान सोडत चिठ्ठीव्दारे ज्यांचे नाव निघेल त्यांना त्या वर्षीचा बैलजोडीचा मान दिला जातो.

### ४.४ दिंडी प्रवासाची वाटचाल ,मार्ग व मुक्काम

### आकुर्डी मुक्काम– दुसरा दिवस देहू ते आकुर्डी

'जाय जाय तू पंढरी । हाय होय वारकरी ।।'

इनामदार वाड्यात दुसऱ्या दिवशी जेष्ठ वद्य अष्टमीला सकाळी भल्या पहाटे (४ वा.) काकडा आरतीचे अभंग भजन होते. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पादुकांची पुजा होते. ठरलेल्या नेहमीच्या वेळेनुसार स. इनामदार वाड्यातून ग्रामस्थ पालखी खांद्यावर घेऊन टाळ–मृदंगाच्या गजरात तुकोबाच्या नामघोषात देहूच्या वेशी पर्यंत आणतात. फुलानी हारानी सजावलेल्या रथामध्ये पालखी ठेवली जाते.

देहू संस्थाच्या व तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या ठरलेल्या नियमानुसार रथापुढे चालणाऱ्या परंपरागत दिंड्या व रथापाठीमागे चालणाऱ्या नंबरप्रमाणे दिंड्या उभ्या असतात. चोपदाराच्या इशाऱ्याबरोबर पालखी सोहळा चालायला सुरुवात होते.

## अनगडशहाबाबांचा येथे आरती :

गावाच्या वेशीवरून पालखी सोहळा पुढे सरकला की थोड्याच वेळात अनगडशहा बाबांचा दर्गा येतो.

एकीकडे देवा धर्माच्या नावावर संघर्ष होत असताना तुकोबारायांचा पालखी सोहळा मात्र हिंदु–मुस्लीम ऐक्याचा संदेश देत आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या काळात रचलेला सर्वधर्म सहभावाचा पाया आजही वारकरी संप्रदायाने अबाधीत ठेवला आहे. संत तुकोबाराय यांच्या पालखी सोहळ्याचा पहिला विसावा देहुतील अनगडशहा बाबांच्या दर्ग्यावर होतो. त्यामुळे तुकोबारायांचा

पालखी सोहळा केवळ अध्मात्मीक परंपरेतील एक प्रतिक न राहता सर्वधर्म समभावाचा सोहळा असल्याचे ठळकपणे दिसते. तुकोबारायांनी ८० अभंग उर्दू भाषेत रचले आहे.

अल्ला देवे, अल्ला रवलावे,

अल्ला दारु, अल्ला दुवां

अल्ला तुजवीन कोई नही हुवा ।।[५]

भेदाभेद अमंगळ असे सांगणाऱ्या तुकाराम महाराजांनी प्रत्यक्ष कृतीतूनही हा विचार दिला आहे. त्यामुळेच तुकोबांना जगद्गुरु संबोधले जात असावे.या दर्गावर दरवर्षी विसावा व महाआरती होते.[६] अनगडशहा बाबाच्या संदर्भात अशी कथा येते श्री तुकोबारायांच्या काळात रामेश्वर भट्ट येथून पुण्याकडे येत होते. त्यावेळी येथील दर्गाच्या जवळील विहीरीत त्यांनी व त्यांच्या सहकार्यानी अंघोळ केली. त्यांना अनगडशहाबाबांनी पाहिलं आणि रामेश्वर भट्टांना शाप दिला. त्यांच्या अंगाची लाही लाही होऊ लागली. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांना तुकाराम महाराजांना भेटण्याचा सल्ला स्वप्नदृष्टांत दिला. त्याप्रमाणे ते तुकाराम महाराजांच्या भेटीला गेले. तुकाराम महाराजांनी त्याला अलिंगन दिल्यापासून त्याचा दाह शमला. आपण दिलेला शाप कोणी मोडून काढला याचे आश्चर्य अनगडशहाबाबांना झाले. त्यांनी भिक्षा मागणाऱ्याचे रूप घेऊन देहूमध्ये तुकाराम महाराजांचे घर पाहण्यासाठी फिरू लागले. घरोघरी भिक्षा घेत होते, पण त्यांचा कटोरा भरत नव्हता. ते तुकाराम महाराजांच्या घराजवळ आले. त्यावेळी महाराजांच्या पत्नी जिजाबाई व मुलगी भगीरथीमाता दळण दळीत होत्या. भगिरथीमाता दळलेले पीठ हाताच्या ओंजळीत घेऊन भिक्षा देण्यासाठी निघाल्या, त्यावेळी जिजाबाईंनी थप्पड मारल्यामुळे पीठ सांडले. काही पीठ हाताला लागले होते. त्यांनी ते तसेच जाऊन कटोऱ्यात हात झटकले. तेवढ्याच पिठाने त्यांचे कटोरे भरले, हे पाहून बाबा तिला म्हणाले, आप तुकाराम महाराज है क्या? त्यावेळी भगिरथीमाताने ते भंडारा डोंगरावर भजन करीत असल्याचे सांगितले. महाराजांच्या मुलीच्या हाताने एवढे महान कृत्य होत आहे. तर महाराज किती महान असतील, याची कल्पना बाबांना आली. ते महाराजांना जाऊन भेटले व त्यांचे अनुग्रही झाले. ते तुकाराम महाराजांचे शिष्य झाले. त्यामुळे या शिष्याच्या, दर्ग्याजवळ पालखीच्या प्रवासात आरती करण्याची परंपरा सुरु झाली.येथे पालखी सोहळा १२ वा. पोहचतो. येथील आरती झाल्यानंतर, तुकाराम महाराज पालखी सोहळा पुढे निघतो. यानंतर पालखी चिंचोली पादुका येथे विश्रांतीला थांबते व तेथे आरती होते. विश्रांती नंतर पालखी सोहळ्यासह पुढे निघते. निगडीच्या

दिशेने निगडी हे पिंपरी–चिंचवड भागातील औद्योगिक भाग आहे. येथील अनेक भक्त पालखी सोहळ्याच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने सहभागी होतात. स्वागत करण्यासाठी शहरातील शहर प्रमुख महापौरांसह अनेक नेते मंडळी उपस्थित असतात. रस्त्याच्या दुतर्फा भाविक स्वागत व दर्शनासाठी उपस्थित असतात. अशा आनंदाच्या वातावरणात दुपारी निगडी येथे पालखी सोहळा भोजन व विश्रांतीसाठी थांबतो. पालखी सोहळ्यातील सर्व दिंड्या भोजनासाठी थांबतात. दिंड्याचे मालक, चालक, आपल्या सोयीनुसार सर्व भाविकांची भोजनाची व्यवस्था करतात.

दुपारच्या भोजन व विश्रांतीनंतर पालखी सोहळा मुक्कामाचे ठिकाण आकुर्डीच्या दिशेने साधारण दुपारी ३.०० वा. निघतो. सर्व दिंड्या ठरलेल्या क्रमाने भजन करत निघतात. भजनामध्ये नाट, पत्रिका, तिर्थावळी, समाधीचे अभंग, नियमानुसार व परंपरेप्रमाणे म्हटले जातात. मुक्कामाचे ठिकाणजवळ आल्यावर संत ज्ञानेश्वरांचा हरिपाठ म्हटला जातो. हरिनामाच्या गजरात, आनंदान हा पालखी सोहळा संध्याकाळी आकुर्डी (पिंपरी–चिंचवड) येथे मुक्कामासाठी पोचतो. आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात तुकाराम महाराजांची पालखी मुक्कामाला असते. पालखी सोहळ्यातील सर्व दिंड्यातील सहभागी वारकरी, भाविक आकुर्डी शहरात सोयीनुसार मुक्कामाला थांबतात, सर्वांची भोजनाची व्यवस्था दिंडीचालक मालक, आकुर्डी शहरातील नागरिकांच्या मदतीने व सहकार्याने करतात.रात्री भजन, कीर्तनाचे कार्यक्रम असतात. सर्व दिंड्यांचे चालक, सहभागी वारकरी, भाविकांना दुसऱ्या दिवशी सकाळच्या प्रस्थानाचे व वाटचालीची वेळ सांगुन तयारीत रहा असे सांगतात आणि मग सर्व वारकरी निवांत रात्रीची विश्रांती घेतात. अशा रितीने पहिल्या दिवसाचा पालखीचा प्रवास आकुर्डी मुक्कामी संपतो.

पहिली विश्रांती अनगडशहाबाबा, आरती १२ वा. माळवाडी, झेंडेमळा, दुसरी विश्रांती– चिंचोली पादुका, शनि मंदिर अभंग आरती, दुपार मुक्काम– निगडी पालखी मुक्काम – श्री विठ्ठल मंदिर, आकुर्डी (पुणे) [७]

**आकुर्डी ते पुणे वाटचाल :**

जारे तुम्ही पंढरपुरा । तो सोयरा दिनांचा ।।

आकुर्डीचा मुक्काम संपवुन दुसऱ्या दिवशी सकाळी ५ वा.[८] अभिषेक व आरती केल्यानंतर तुकाराम महाराज पालखी सोहळा पुणेकडे मार्गस्थ होतो. सकाळी ६.३० वा. पालखी सोहळ्याच्या ठरलेल्या

नियमानुसार सर्व दिंड्या ठरलेल्या वेळेत पालखी तळावर हजर राहतात. आपल्या ठरलेल्या क्रमांकावर आपल्या दिंडीसह उभे राहतात. पालखी सोहळ्याच्या चोपदारांच्या इशाऱ्यानुसार दंडक वरती उचलल्यानंतर पालखी सोहळा मार्गस्थ होतो. सकाळच्या सत्रात पालखी सोहळा हरिनामाच्या गजरात जयघोष करत नित्यनेमाचे भजन करत दिंडी सोहळा हळूहळू वाटचाल करीत असतो. नगारा, मानाचा घोडा, मानाच्या सर्व दिंड्या पालखीरथ, त्यांच्या पाठीमागे सर्व नंबरच्या दिंड्या चालतात. असा हा सोहळा टाळ, मृदंग, हरिनामाच्या गजरात चालत असतो.आकुर्डी येथून निघालेला  पालखी सोहळा सकाळी ७.३० वा. पहिला विसावा पिंपरी येथील एच. ए. कॉलनी विठ्ठलनगर येथे थांबतो. येथे पहिली विश्रांती होते. या वेळेत बाजूच्या परिसरातील नागरीक पालखी दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित असतात. अनेक नागरिक, सामाजिक संस्था, भाविकांना अन्नदान करतात. मोफत अन्नाचे पाकीट, बिस्किटे, लाडू, पाणी यांचे वाटप करत असतात.रोजच्या वर्दळीचा महामार्ग हा पालखी सोहळ्याच्या दिवशी गाड्यांऐवजी भाविकांनी फुलून जातो. गाड्यांच्या आवाजा ऐवजी हरिनामाच्या जयघोषाचा आवाज दुमदूमुन जातो.  विश्रांतीनंतर  पालखी  सोहळा हळूहळू पुढे वाटचाल करतो. कासारवाडी (पुणे) येथे दुसरा विसावा (विश्रांती) साठी पालखी सोहळा थांबतो. दर्शनासाठी येथे देखील भाविकांची अलोट गर्दी असते.दुसऱ्या विश्रांतीनंतर पालखी सोहळा दुपारच्या भोजन व विश्रांतीसाठी दापोडी येथे दुपारी पोहचतो. ठरलेल्या ठिकाणी आपल्या सोयीनुसार सर्व दिंड्या भोजनासाठी थांबतात. भोजन व विश्रांतीनंतर पालखी सोहळा पुढच्या दिशेने मार्गस्थ होतो.तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा वाकडेवाडी (शिवाजीनगर) येथे पोहचतो त्यावेळी आळंदी येथून पंढरपुरकडे निघालेला संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पोहचत असे. तुकाराम महाराज पालखी व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याची भेट या ठिकाणी होत असते. हा प्रसंग सोहळ्यातील आनंदमय मानला जातो. पुण्यनगरीत दोन्ही पालखी एकत्र येतात.

अशा वेळी पुणे शहराचे विद्यमान महापौर, आमदार, खासदार, नगरसेवक, स्वागतासाठी उपस्थित असतात. येथे मोठा विसावा असतो. या काळात भाविक वारकरी देहभान विसरुन फुगड्या, विविध खेळ, भारुडे, येथे सादर करतात. या आनंदात पुणेकर सहभागी होतात. रोजच्या व्यवहारातून आजचा दिवस फक्त पालखीसाठी मोकळा ठेवून हा आनंद लुटतात. व वारकऱ्यांच्या सोयी व सेवेसाठी स्वतःला धन्य मानतात.दोन्ही पालखी एकत्र येऊन स्वागत समारंभ, पादुकांची पुजा नंतर विश्रांती झाल्यानंतर अगोदर तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा मार्गस्थ होतो. संपुर्ण

सोहळा गेल्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा मार्गस्थ होतो. तुकाराम महाराज पालखी सोहळा वाकडेवाडीवरून संचेती रुग्णालय, गणेश खिंडरस्ता, फर्ग्युसन रस्ता, डेक्कन, लक्ष्मीरोड मार्गे पालखी उशिरा निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामाला पोहचते.ठरलेल्या वेळेपेक्षा पालखी नेहमी उशिरा पोहचते. कारण वाटेत जागोजागी स्वागतासाठी अनेक मंडळे, कार्यकर्ते, नागरीक गर्दी करतात. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी निवडुंग्या विठोबा देवस्थानच्या वतीने वारकरी व पालखी सोबतच्या सर्व कर्मचारी, मानकरी, चोपदार, मालक यांची सोय केली जाते.

पुणे शहाराच्या कोथरुड, कर्वेनगर, धनकवडी, कात्रज, बालाजीनगर व जवळच्या सोयीनुसारच्या भागात पालखी सोहळ्यातील दिंड्या विसावतात. या भागातील नागरीक, सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे कार्यकर्ते शहराचे महापौर आमदार, खासदार, नगरसेवक, विविध उद्योगपती, आपआपल्या सोयीने सर्व भाविकांची भोजनाची व राहण्याची व्यवस्था करतात. सर्वच पेठांतून वारकऱ्यांच्या भोजनाच्या पंगती उठत असतात.सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत, निवडुंग्या विठोबा देवस्थानच्या विश्वस्तांच्या वतीने पादुकांची महापुजा होते. आरती होते. पालखी रात्रीच्या मुक्कामाला थांबते. दोन दिवस मुक्कामासाठी हा पालखी सोहळा पुणे येथे थांबत असतो. रात्री कीर्तन, भजन, भारूडे, असे कार्यक्रम चौकाचौकात आयोजित केले जातात.पुणे शहर परिसरातील अनेक नागरीक पालखीच्या दर्शनासाठी दिवसरात्र मुक्कामाच्या ठिकाणी रांगा लावतात. पुणेकर आनंदाने या उत्साहात आपला सहभाग नोदंवतात. दुसरीकडे पुण्यात पालखी दोन दिवस मुक्कामाला असल्याने दिंडी मालक, दिंडीचे उपयुक्त साहित्य खरेदी करतात. पुढील प्रवासात लागणारे सर्व साहित्य येथे खरेदी केले जाते. त्यामुळे प्रचंड मोठी आर्थिक उलाढाल दोन दिवसात पुणे शहरात होत असते. या प्रवासात वारकऱ्यांच्या संरक्षणासाठी प्रचंड मोठा पोलिस बंदोबस्त असतो. तसेच पुणे भागातील अनेक संस्था, यामध्ये नाशिक फाटा ते दापोडी मार्गावर फिनोलेक्स कंपनी, ॲटलास कॉप्को, अल्फा लावल, सॅन्डविक एशिया, फुगेवाडी माथाडी कामगार संघटना, यांच्या वतीने वारकऱ्यांना चहा, नाष्टा, जेवण, खाद्यपदार्थ वाटप करण्यात येते. पाण्याचा टँकर, रुग्णवहिका, आणि वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.[१]

## आकुर्डी ते पुणे प्रवास :

पहिली विश्रांती – एच.ए. कॉलनी पिंपरी विठ्ठल मंदिर, दुसरी विश्रांती– कासारवाडी, दुपारचे भोजन– दापोडी, तिसरी विश्रांती– शिवाजीनगर, चौथी विश्रांती– संत तुकाराम महाराज पादुका मंदिर, पालखीचा मुक्काम – नाना पेठ निवडुंग्या विठोबा मंदिर.[१०]

## पुणे ते लोणी वाटचाल :

पंढरीशी जारे आलेनो संसारा । दोनांचा सोयरा पांडुरंग ।।

दोन दिवसाचा पुणे येथील तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा मुक्काम संपल्यानंतर जेष्ठ वद्य ११ (एकादशीला) [११]सकाळी ६ वाजता पालखी लोणी काळभोर कडे निघते. या आगोदर पहाटे विश्वस्तांच्या हस्ते महाराजांच्या पादुकांची पुजा होत असते. रोजच्या नित्य पुजेनंतर पालखी मार्गस्थ होते. सकाळच्या सत्रातील प्रवासात रोजच्या ठरलेल्या नैमत्मिक भजन मालिका सुरु होते. रोजच्या नियमानुसार सर्व पालखी सोहळा चालतो. शहरातून ग्रामिण भागात प्रवेश करणारा हा पालखीचा पहिला दिवस असतो. एकादशीचा दिवस असल्याने सर्व वारकरी उपवास करतात. ग्रामिण भागातील पहिल्या मुक्कामासाठी लोणी काळभोर येथे स्वागतासाठी नागरीक सज्ज असतात.'ज्ञानोबा–तुकाराम'च्या जयघोषात पंढरीच्या विठोबाच्या भेटीची आस लागल्याने वारकरी आनंदात निघतात. रस्त्यांच्या दुतर्फा गर्दी असते. सजावलेला तुकाराम महाराजांचा रथ ताजे तवाने वारकरी टाळ, मृदंगाच्या नादात वाटचाल करतात. प्रवास करता करता पहिला विसावा तासाभरात गाडीतळ पुणे येथे येतो. पालखी स्थळावर परिसरातील मोठ्या संख्येने भाविक येत असतात. हे दिवस पाऊसाच्या सुरुवातीचे असतात. त्यामुळे कधी ऊन, सावल्यांच्या खेळ, तर कधी भरपुर पाऊस येतो. येथील पहिल्या विसावानंतर पालखी हडपसरकडे मार्गस्थ होते. चोपदाराच्या इशाऱ्यावर सर्व पालखी सोहळा मार्गस्थ होतो. सर्व दिंड्यांमधील टाळ, पखवाज व मुखातून भजनाचा आवाज, हरिनामाचा जयघोष, यामुळे आनंदाला उधाण येत असते. ठिकठिकाणी पालखी स्वागतासाठी कमान उभरलेल्या असतात. भाविक नागरीक मोठ्या संख्येने उभे असतात. उपवासाचे फ राळाचे वाटप, केळीचे वाटप या मार्गावर मोठ्या प्रमाणात केले जाते. पुणे, हडपसर परिसरातील अनेक नागरिक, वारकऱ्यांसाठी अन्नदान व फराळाचे वाटप येथे करतात. येथील नागरीकांच्या दृष्टीने हा मोठा भाग्याचा दिवस मानला जातो.हडपसर येथे माऊलींची पालखी सासवड मार्गे निघते तर तुकाराम महाराजांची पालखी सरळ लोणीकडे जाते. पुणे करांसाठी हा मोठा योगच असतो. हा दोन्ही पालख्यांना निरोप देण्यासाठी पुण्यातुन अनेक भाविक हडपसर पर्यंत

चालत येतात. हडपसर येथे तुकाराम महाराजांच्या पालखीचा दुपारचा मुक्काम असतो. दुपारच्या फराळासाठी आपल्या सोयीच्या जागेनुसार थांबत असतात. एकादशीचा उपवास असल्याने फराळ येथे घेतला जातो.साडे आकराच्या दरम्यान पालखी मुक्काम दुपारचा हडपसर येथे २०१४ ला झाला. हडपसरवासीयांनी मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत करुन फु लांचा वर्षाव केला. येथे मोठा विसावा झाल्यानंतर पालखी मार्गस्थ होते. दुपारच्या सत्रातील अभंग सर्व दिंड्यामध्ये चालतात. भजनात सर्व वारकरी रंगलेले असतात. शहरातून पालखी ग्रामीण भागात प्रवेश करते. आजूबाजूला शेतीचे मळे फुललेले दिसतात. सगळीकडे हिरवेगार, जणूकाय सर्व पीक भजनात वारकऱ्यांबरोबर डोलते. असेच एकवेळ वाटते. रस्त्यांनी जवळच्या गावातील नागरीक, पालखीच्या दर्शनासाठी गर्दी करतात. या प्रवासात टाळ, मृदंगाच्या तालात दुपारचा आंधळ्या पांगळ्या गात, गौळणीवर नाचत ताल धरत तिसऱ्या विसाव्यासाठी पालखी मांजरी फार्म येथे पोहचते. मांजरीचे ग्रामस्थ पालखीचे मोठ्या आनंदाने ज्ञानोबा–तुकारामाच्या गजरात स्वागत करतात व दर्शन घेतात. सर्व सहभागी वारकऱ्यांची सेवा हे ग्रामस्थ करतात. येथे एक तास विश्रांती असते. येथे वारकरी शेतीत, शेती शिवारात, फुगड्या खेळतात. भारुडाचा कार्यक्रम करतात. यानंतर दुपारी चार वाजता (४ वा.) पालखी मार्गस्थ होते. विठोबाच्या नामस्मरणात वारकरी पंढरीच्या दिशेने वाटचाल नाचत, डोलत वाटचाल करतात. संध्याकाळी पाच (५ वा) च्या सुमारास पालखी कवडीपाट टोलनाक्यावर, आल्यावर शिरुर हवेलीचे आमदार स्वागताला असतात. २०१४ ला ॲड. अशोक पवार आणि कदम वाकवस्तीचे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी स्वागत केले. येथे वारकऱ्यांना केळी, फ राळ व पाणीवाटप करण्यात येते. या विसाव्यानंतर पालखी लोणी काळभोरकडे रात्रीच्या मुक्कामासाठी मार्गस्थ होते. हरिपाठ, गुरुपरंपरेचे अभंग यावेळेत भजनात सर्व दिंड्यांमध्ये म्हणत असतात. या वारीच्या वाटचालीच्या आनंदात पालखी सोहळा सायंकाळी ७ वा. लाणी काळभारे येथे पोहचतो. लोणी काळभोरला सनई–चौघडा व तुतारीच्या निनादात भव्य स्वागत केले जाते. तसेच स्थावर पुष्पवृष्टी केली जाते. यानंतर पालखी सोहळा रात्रीच्या मुक्कामासाठी येथे विसावा घेतो. रात्रीचे फराळ कीर्तन, भजन भारुडाचे आयोजन केलेले असते. सर्व दिंडी मालक, चालक सर्व सहभागी मार्गस्थ होईल असे जाहीर करतात व सर्वाची रात्रीच्या आरामाची व्यवस्था करतात. लोणी काळभोरचे प्रशासन, या सर्व वारकऱ्यांना रात्रीचे मुक्कामाची व्यवस्था करतात. पालखी तळाला स्वतंत्र जागा, तसेच दिंड्या उतरण्यासाठी मोकळी जागा अनेक शेतकरी

आपल्या शेतातील पीक काढून करून देतात. दिंडीचालक, मोकळ्या जागेवर राहुट्या टाकुन राहण्याची सोय वारकऱ्यांसाठी करत असतात. पंढरपूर पर्यंत प्रत्येक मुक्कामी बहुतांश दिंड्यांना राहुट्या टाकुनच मुक्कामाची व्यवस्था करावी लागते. अधिक आषाढ कृ. ११, रविवार, दि. १२/७/२०१५ पालखी निघण्याचे ठिकाण– श्री निवडुंगा विठ्ठल मंदिर, नाना पेठ, पुणे

पहिली विश्रांती : भैरोबानाला, गाडीतळ, पुणे

दुपारचा मुक्काम : हडपसर

तिसरी विश्रांती : मांजरी फार्म

चौथी विश्रांती : लोणी काळभोर, रेल्वे स्टेशन

पालखीचा मुक्काम : लोणी काळभोर, श्री विठ्ठल मंदिर

## लोणी काळभोर ते यवत वाटचाल :

होय होय वारकरी । पाहे पाहे पंढरी ।।[१६]

दौंड तालुक्यातील हे यवत गाव येते पुणे–सोलापुर महामार्गावरील तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील यवत हे मुक्कामाचे गाव आहे.लोणी येथील मुक्काम आटपून सकाळी ६.३० वा श्री तुकोबारायांची पालखी, सकाळची पुजा उरकुन मार्गस्थ होते. सकाळी पहाटे ३.०० पासून वारकरी उठतात. आंघोळ करून आपले सर्व साहित्य. तंबू आपल्या दिंडीतील माल वाहतूक गाडीत टाकतात. व आपल्या दिंडीमध्ये सकाळी ठरल्याप्रमाणे वाटचालीसाठी उपस्थित असतात. लोणी ते यवत हा बागाईती शेतीचा पट्टा आहे. त्यामुळे पालखी सोहळ्याची वाटचाल दोन्ही बाजूला असलेल्या हिरव्यागार शेतांच्या मधुन होत असते. रस्त्याच्या सभोवती झाडे व शेतामधून सकाळच्या प्रहारी सोहळ्यास सुरुवात होत असताना पक्ष्यांचा किलबिलाट होत असतो. हा प्रवास अति आनंद देणारा असाच असतो.

वृक्षवल्ली आम्हां सोसरे वनचरें ।
पक्षी ही सुस्वरे आळविती ।।[१७]

या महाराजाच्या अभंगाप्रमाणे पक्षी देखील वारकऱ्यांच्या समवेत जणू पालखी सोहळ्यात सहभागी होत असतात. हरिनामाच्या गजराने पीकेही डोलत असतात. असा आनंदात हिरव्या शिवारातून टाळ–मृदंगास जणू भक्तीचा मळा फुललेला दिसत असतो.

उंच पताका झळकती । टाळ मृदंग वाजती ।

प्रेमे आनंदे नाचती । भद्र जाती विठ्ठलाचे ।

याप्रमाणे पालखी सोहळ्याचे रुप असते. लोणी येथून सकाळी पालखी सोहळा निघाल्यानंतर पहिला विसावा कुंजीरवाडी फाटा येथे असतो. या दिवसात ऊन–पावसाचा खेळ सुरु असतो.श्री तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील प्रवासातील सर्वात मोठा २७ मैलांचा टप्पा आहे. त्यामुळे विसाव्याचा वेळ कमी केलेला असतो. पालखी मुक्कामाला पोहचण्यास या दिवशी रोजच्या पेक्षा जास्त उशीर होतो. दिवसभरातील प्रवासात वारकऱ्यांसाठी दोनच विसावा पालखी सोहळ्याने ठरविलेला आहे. पहिला विसावा उरकल्यानंतर दुपारच्या मुक्कामाकडे पालखी मार्गस्थ होते. दुपारचा मुक्काम उरुळीकांचन येथे पालखी भोजनासाठी थांबते सर्व वारकरी, भाविक सहभागी, दुपारच्या भोजनासाठी आपल्या ठरलेल्या ठिकाणी पोहचतात. पालखीरथ नेहमीच्या ठरलेल्या तळावर विसाव्याला थांबतो. आजूबाजूचे सर्व गावातील भाविक पालखीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. या दिवशी उरुळी कांचन येथे मोठी जत्राच भरते. घरोघरी वारकरी भोजनासाठी आलेल्या असतात. ग्रामस्थ वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सण उत्सवाप्रमाणे सर्व तयारी करतात. सडार्चण, रांगोळी. पताका, मंडप, कमानी उभारलेल्या असतात. दुपारचा मोठा विसावा येथे असतो. या भोजन विश्रांतीनंतर पालखी पुढील प्रवासासाठी निघते. ज्ञानोबा– तुकारामच्या जयघोषात पालखी सोहळ्यातील सर्व दिंड्यातील वारकरी पुढील प्रवासासाठी आपल्या दिंडीत बरोबर सहभागी होतात. आणि रोज नित्यनियमाप्रमाणे अभंग भजनात म्हटले जातात. संध्याकाळच्या विसावाकडे पालखी सोहळा मार्गस्थ असतो. एक एक टप्पा पुर्ण करुन पंढरपूर जवळ येते आहे. हा आनंद वारकऱ्यांच्या मनात असतो. त्यामुळे ते पुढील प्रवासासाठी आनंदाने वाटचाल करतात. कासुर्डीफाटा, खामगावफाटा येथे ग्रामस्थ पालखीचे स्वागत करतात. या ठिकाणी देखील मोठी गर्दी होते. येथेही यात्रा भरत असते. काही क्षणासाठीच येथे पालखी थांबत असते. येथे विसावा नसतो. तरीपण मोठी गर्दी आजूबाजूच्या गावातील भाविकांची ग्रामस्थांची असते. यानंतर पालखी यवतच्या दिशेने मार्गस्थ होते. संध्याकाळची वेळ असते. दिंड्यातील वारकरी मुक्कमाच्या अगोदर नियमीप्रमाणे हरिपाठ, भजन, गुरुपरंपरेचे अभंग म्हणत असतात. काही दिंड्यांमध्ये निवडक अभंग म्हटले जातात. जावजीबुवाची वाडी येथे संध्याकाळचा विसावा येतो. येथे थंडीची चाहूल लागते. रोजच्या सवयीतील वारकरी चहापान घेत असतात. ग्रामस्थांनी देखील येथे चहापानाची मोफत व्यवस्था केलेली असते.

यानंतर पालखी अंधाराच्या सावलीत यवत येथे मुक्कामाला पोहचते. ग्रामस्थ, गावकरी, आमदार, जिल्हापरिषद अध्यक्ष, सदस्य, पालखीच्या स्वागतासाठी यवतच्या बाहेर आलेले असतात. पादुकांचे दर्शन घेऊन पालखी वाजत गाजत आणली जाते. यवतमध्ये आनंदाला उधाण येते. प्रत्यक्ष तुकोबा आपल्या घरी आले या आनंदात गावकरी वागत असतात. पालखी ठरलेल्या ठिकाणी 'श्री भैरवनाथ मंदिर' यवत येथे ठेवली जाते. दिंड्यांतील वारकऱ्यांची मुक्कामाची सोय इतर मोकळ्या जागत तंबु टाकुन दिंडीमालक, चालक करत असतात.यवत मुक्कामी वारकऱ्यांच्या जेवनात पिठलं-भाकरी हा विशेष आवडीने बनवलेले असतात. हे भोजन ग्रामस्थ आवडीने बनवत असतात. तसेच चहा, नाष्टा याची सोय ग्रामस्थ करतात. याशिवाय विशेष व्यवस्था ग्रामस्थ करतात. यामध्ये एकाचवेळी पाचशेहून अधिक वारकरी आंघोळ करू शकतील अशी आंघोळीची नळव्यवस्था व वारकऱ्यांना मोबाईल चार्ज करण्यासाठी यवत ग्रामस्थ दरवर्षी सोय करतात.या सर्व व्यवस्थेची शासनाकडून पाहणी केली जाते. जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच, उपसरपंच, हे सर्व अधिकारी या संदर्भात कार्यवाही करून वारकऱ्यांना उत्तम व्यवस्था देण्याची तरतुद करतात. मुक्कामी रात्री कीर्तन, भजनात सर्व वारकरी व ग्रामस्थ दंग होतात. यवत गावाला भक्तीसागराचे स्वरुप येते. पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील ग्रामस्थांची मोठी गर्दी होत असते.

**लोणी ते यवत**

पहिला विसावा : कुंजीरवाडी फ ाटा

दुसरा विसावा : उरुळी कांचन

तिसरी विश्रांती : जावळीबुवाची वाडी

पालखी मुक्काम : श्री भैरवनाथ मंदिर, यवत[१९]

**यवत- वरवंड वाटचाल**

पंढरीचे लागा वाटे । सखा भेटेल विठ्ठल ।[२०]

सकाळी पहाटे वारकरी व दिंडी सोहळा उठून स्नान संध्याकरुन तुकोबाराय यांच्या पादुकांची पूजा होऊन पालखी सोहळा सकाळी ६.३० वा. वरवंडच्या दिशेने मार्गस्थ होतो. हा दिवस पालखी

सोहळ्याचा आठवा दिवस असतो. जेष्ठ कृ. १३,२०१५ मध्ये निज आषाढ कृ. १३ हा पालखीचा आठव्या दिवसाचा प्रवास आलेला होतो. अधिकमास असल्याकारणाने जेष्ठ ऐवजी अधिक मास आलेला आहे. रोजच्या नित्याप्रमाणे दिंड्या क्रमाने वाटचालीस निघतात. आपल्या ठरलेल्या वेळेमध्ये वारकरी दिंडीमध्ये टाळासह हजर राहतात. टाळ-मृदंगाच्या नादात सकाळचे काकडा भजन ताला-सुरात सुरु असते. यवत ते वरवंड हे कमी अंतराचा प्रवास आहे. त्यामुळे वारकरी या दिवशी रोजच्या पेक्षा निवांत प्रवास करतो. रस्त्याच्या लगत द्राक्षबागा असल्याने त्याचा अस्वाद घेत व सकाळचे ओले कपडे या द्राक्षाच्या बागेवर सुकविण्यासाठी वारकरी टाकत असतात. हे वेगळे दृश्य या ठिकाणच्या प्रवासात दिसते. या दिवसाच्या अंतराचा टप्पा कमी असल्याने सकाळची न्याहारी, पहिली विश्रांती, दुसरी विश्रांती अशी या प्रवासात घेतली जात नाही. या विश्रांती ऐवजी दुपारचा मुक्काम 'भांडगाव' येथे भोजनासाठी घेतला जातो. हे या आजच्या प्रवासात महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.[२१] लवकरच दुपारचा मुक्काम येत असतो. त्यामुळे दुपारचा भोजन व विश्रांतीचा काळ हा रोजच्या वाटचालीपेक्षा आठव्या दिवसाच्या वाटचालीत मोठा विश्रांतीचा काळ असतो. तीन तास येथे विश्रांती घेतली जाते.सर्व दिंड्यांचे जेवन येथे बनवले जाते. सर्व दिंडी चालक, मालक आपले भोजन या दुपारच्या मुक्कामाच्या ठिकाणी आपल्या सोयीनुसार बनवत असतात. काय अगळावेगळा सोहळा येथे पाहावयास मिळतो.

कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।

लसून मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ।।[२२]

या अभंगाच्या पंक्तीप्रमाणे सर्व वारकरी भोजनाचा अस्वाद घेतात. अशी भावना वारकऱ्यांची या पालखी सोहळ्याच्या रोजच्या वाटचालीत होत असते. दुपारच्या तीन-तासाच्या विश्रांतीनंतर पालखी सोहळा वाटचालीसाठी मार्गस्थ होतो. वाटेमध्ये बारीपारधी, भीमा पाटस कारखान्याचे अध्यक्ष, संचालक, पालखीच्या स्वागतासाठी हजर असतात. तुकोबाच्या पादुकांचे पुजन दिंडीचालक, मालक, विणेकरी, पालखी सोहळाप्रमुख यांचे सत्कार सन्मान केले जातात. पालखी दुपारच्या वाटचाल तिसरा विसावा दुपारच्या नंतरचा पहिली विश्रांती केडगांव चौफुला येथे घेते. या चौफुल्यावर विश्रांतीसाठी पालखी थांबते. आजुबाजूच्या परिसरातील अनेक भाविक येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने गर्दी करतात. मोठी यात्रा भरते.तिसऱ्या विश्रांतीनंतर पालखी रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणाकडे वाटचाल सुरु करते. मुक्कामजवळ आल्याने वारकरीही उत्साहाने मार्गस्थ

होतात. एक दिवस प्रवासातील कमी होणार आणि पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला पोहचणार वारी पुर्ण होणार ही भावना वारकऱ्यांची यापाठीमागे असते. सायंकाळी पालखी सोहळा वरवंड गावात पोहचतो ग्रामस्थ मोठ्या आनंदाने, उत्साहाने, फटाके वाजवून पालखीचे स्वागत करतात. तुकोबांच्या पादुकांची पुजा, समाज आरती, पालखी तळावर होते व पालखी येथील प्रसिद्ध श्री विठ्ठल मंदिर रात्रीच्या मुक्कामासाठी थांबते.वारकरी आपल्या दिंडीच्या मुक्कामाच्या जागी पोहचातात. बहुतांश राहुट्या उभारलेल्या असतात. राहुट्यामध्ये मुक्कामाची व्यवस्था केलेली असते. भोजन करून वारकरी शांत झोपतो.

**यवत ते वरवंड :**

दुपार मुक्काम : भांडगाव

तिसरी विश्रांती : केडगाव चौफुला

पालखी मुक्काम : श्री विठ्ठल मंदिर वरवंड

## वरवंड ते उंडवडी वाटचाल

पावलो पंढरी पार नाही सुखा । भेटला हा सखा मायबाप ।

वरवंडचा मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी पालखी सोहळा उंडवडी गावात मुक्कामाला असतो.वरवंडचा मुक्काम संपल्यावर सकाळी दुसऱ्या दिवशी विठ्ठल मंदिरात नित्यपुजा, झाल्यानंतर ठरलेल्या वेळाप्रमाणे पालखी सोहळ्याचे प्रस्थान स.६:३० वा जेष्ठ कृ.१४ होते.[२५] पालखी प्रस्थान सकाळी झाल्यानंतर नित्यनेमाने भजन करत वाटेत रोटी घाट चढण्याच्या तयारीत डोंगर घाटाचा आनंद घेण्याच्या इरादाने घाईने चालत असतात. विठ्ठल विठ्ठल नामाचा गजर ज्ञानोबा–तुकारामाचा भजनाचा आनंद घेत सोहळा, सकाळी पहिल्या विसावासाठी 'भागवत वस्ती' येथे थांबतो. विसावा घेतल्यानंतर सकाळचा चहापाणी नाष्टा वारकरी येथे घेत असतात. यानंतर पालखी पाटसकडे प्रस्थान ठेवते. या मार्गात कधी ऊन, पाऊस असा प्रवास असतो. पाऊसाळ्याचे दिवस असल्याने पाऊसाचा आनंद घेत वारकरी नाचत, डुलत प्रवास करतात. वारकरी पाऊसापासुन स्वरक्षणासाठी कागदी गोंगटे, छत्री घेत असतात. हा प्रसंग दृश्य काही अगळेवेगळेच दिसतात. पालखीच्या या दिवसाचा दुसरा विसावा घेतला जात नाही. सकाळी वारकरी ताजे तवाने असतात त्यामुळे वारकऱ्यांचा चालण्याचा वेगही जास्त असतो भजनाच्या नादात हा पालखी सोहळा दुपारच्या भोजनासाठी, कसबे पाटस येथे विसावा घेतो. सर्व वारकरी दुपारच्या भोजन, विश्रांतीसाठी कसबे पाटस येथे एकत्र येतात. श्री तुकोबाराय यांची पालखी पाटस येथील पालखी तळावर थांबते. येथे

पाटसचे आमदार, जिल्हापरिषद सदस्य इतर पुढारी, ग्रामस्थ पालखीचे भव्य स्वागत करतात. पालखीतील तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पुजन केले जाते. त्यानंतर नैवद्य दाखविला जातो. सोहळ्याचे प्रमुख व इतर सर्व त्यांचे सहकारी, व्यवस्थापक यांच्या भोजनाची व्यवस्था येथे केलेली असते. वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था आपआपल्या दिंड्यामधून दिंडी मालक, करत असतात. तसेच पाटस ग्रामस्थ आपल्या वतीने वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था करतात. पाटस येथील व जवळच्या गावातील ग्रामस्थ आपल्या सोयीनुसार वारकऱ्यांना जेवण व्यवस्था करत. वारकऱ्यांना भोजन देण्यात हे ग्रामस्थ स्वत:ची धन्यता समजत असतात. एकप्रकारे पांडुरंगाची, तुकोबाराय, माऊली यांची सेवा आपल्या हातून होते ही भावना असते. पाटस गावात या दिवशी मोठी यात्राच भरते. दुपारच्या मोठ्या विश्रांतीनंतर पालखी सोहळा पाटस येथून पुढील प्रवासासाठी रोटी घाटाच्या दिशेने प्रस्थान करतो. १५ ते २० मिनिटाच्या अंतरानंतर रोटीघाटाची वाटचाल होते. श्री तुकोबारायच्या पालखी सोहळ्यातील प्रवासात पहिला घाट प्रवास असतो. घाट प्रवासाचा वारकरी आनंद घेत, घाटाच्या वळणावर डोंगराची ठेवण, सौंदर्य पाहत पालखी सोहळा पुढे सरकत असतो. या काळात पाऊसळा असल्याने घाटात सगळीकडे हिरवेगार असते. वारकऱ्यांच्या आनंदात यामुळे भर पडते. घाटात दिंड्या–पाताकांची गर्दी होताना येथे दिसते. 'ज्ञानोबा–तुकारामा'च्या जयघोषात वारकरी रोटीघाट सहजतेने पार करतात. रोटी हे गाव हे येथे येते,रोटे हे गाव सरदार शितोळे यांचे दैवत आहे.[२६] सरदार शितोळे यांचे पालखी सोहळ्याच्या आरंभापासून श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास मदत व माऊलीचे मानाचे अश्व आजपर्यंत येत आहेत. तुकोबाराय पालखी सोहळा घाटावर पोचल्यावर येथे पालखी सोहळ्याच्या नियमाप्रमाणे तिसरी विश्रांती होते. घाट संपवुन घाटावर आल्याचे समाधान वारकऱ्यामध्ये स्पष्टपणे जाणवत असते. या विश्रांतीनंतर पालखी सोहळ्याची वाटचाल पुन्हा सुरु होते या प्रवासात पालखी सोहळा कारखेल ग्रामपंचायतीच्या गुंजरखेड चौकांत बारामती तालुक्यात प्रवेश होतो. येथे तालुक्याच्यावतीने भव्य स्वागत करण्यात येते. यानंतर पालखी सोहळा पुढे चालण्यास सुरुवात होते. बारामती तालुक्यात या दिवशीची चौथी विश्रांती वासुंदे, खराडवाडी येथे होते. संध्याकाळी हा पालखी सोहळा मुक्कामासाठी उंडवडी गावळ्याची येथे पोहचतो. येथील ग्रामस्थ, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, वारकऱ्यांचे स्वागत करतात. ग्रामस्थांच्या वतीने येथील माळरानावर पाणी, वीज यांची सोय वारकऱ्यांना करून देण्यात

येते. येथील विशेष म्हणजे, या गावातील प्रत्येक कुटुंबाकडून भाकरी व पिठलं जमा करण्यात येते. आणि रात्रीच्या जेवनात पालखी सोहळ्यातील सर्व वारकऱ्यांन पिठल भाकर दिले जाते.

वरवंड ते उडवडी–प्रवास

प्रस्थान – वरवंड–

पहिली विश्रांती – भागवत वस्ती,

दुपारचा मुक्काम – पाटस

तिसरी विश्रांती – रोटी, येथे अभंग आरती, हिंगणी गाडा.

चौथी विश्रांती – १) वसुंदे २) खराडवाडी

पालखी मुक्काम – उंडवडी गवळ्याची

## उंडवडी ते बारामती वाटचाल

आता जावे पंढरीसी । दंडवत विठोबासी ।।[२८]

उंडवडी ते बारामती, हे तुकोबाराय पालखी सोहळ्याचे प्रवासातील कमी अंतराचा पल्ला आहे. त्यामुळे पालखी सोहळा रोजच्या प्रवासाच्या वेळेपेक्षा उशीरा सकाळी ठीक आठ वाजता उंडवडी येथून वाटचालीसाठी निघतो. रोजच्या पेक्षा हा दिवस वारकऱ्यांसाठी निवांत प्रवासाचा दिवस असतो. आठ वाजता, प्रवासासाठी निघालेला पालखी सोहळा दिवसभरातील पहिल्या विश्रांतीसाठी सकाळी ११ वा. उंडवडी पठार येथे पोचतो. येथे नित्य, चहापाणी वारकरी घेत असतात. पालखी सोहळ्यात अनेक चालती हॉटेल्स, दुकाने असतात. त्या दुकानावर वारकरी चहापान करत असतात. या विश्रांती नंतर पालखी सोहळा दुपारच्या मुक्कामासाठी, भोजनासाठी बऱ्हाणपूर येथे थांबतो. येथील ग्रामस्थांकडून भजन करत पालखी गावामध्ये नेली जाते. सर्व वारकरी बऱ्हाणपूरच्या माळरानावर विसवतात. विशेष म्हणजे येथे दुपारचा विसावा रोजच्या वाटचालीतील सर्वात मोठा दुपारचा विसावा आहे. वारकरी तंबू टाकून विश्रांती घेतात. नागरलेल्या खाचरातून रस्त्याच्या कडेला दिंड्यांचे तंबू येथे लावले जातात. येथील विश्रांती नंतर पालखी सोहळा दुपारी दोन वाजता बारामतीकडे मार्गस्थ होतो अनेक वेळा या प्रवासात पाऊस येत असतो. वारकरी भक्तिरसाबरोबर पाऊसाच्या सरीत चिंब होतात.

पाऊस आला, ओला झाला हरिचा विठा। [२९]

तुम्ही ज्ञानोबा– तुकाराम म्हणा,

असे चालीत अभंग येथे गायले जातात. बारामती जवळ असल्याने अनेक वारकरी बारामती मुक्कामाला दुपारीच पोचतात. तिसरी विश्रांती 'मोरेवाडी' येथे पालखी सोहळा येतो. या विश्रांतीनंतर संध्याकाळच्या सत्रात दिवसातील चौथ्या विश्रांतीसाठी पालखी सोहळा सराफ पेट्रोल पंप, बारामती येथे पोचतो. या विश्रांतीनं तर पालखी सोहळा रात्रीच्या मुक्कामासाठी बारामती येथे पोचतो. बारामती हे तालुक्याचे मोठे औद्योगिक शहर आहे. बारामतीकरांच्या वतीने पालखीच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केलेली असते. शहराच्या प्रवेशाला कमानी टाकलेल्या असतात. शहरात, रांगोळ्या काढलेल्या असतात. बारामती शहर भक्तिभावाने भारावलेल्या वातावरणात न्हाऊन निघते. तालुक्यातील लोकांची, भाविकांची पालखीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी होत असते. त्यामुळे संपूर्ण बारामती शहरात अलोट गर्दी लोटली जाते. श्री तुकाराम महाराज पालखीचा तळ, शारदा विद्यालय बारामतीच्या प्रांगणात असतो. त्यामुळे मोठ्या संख्येने भाविकांना दर्शन घेता येते. स्वयंसेवी संस्थाकडून वारकऱ्यांना मोफत भोजन, चहा, नाश्ताची सोय करण्यात येते.[३०]

**बारामती कृषी पंढरी–**

बारामती ही कृषी पंढरी म्हणून भारतात प्रसिद्ध आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून आलेले वारकरी बारामतीतील आंतराष्ट्रीय पातळीवरील संशोधन केंद्र, शैक्षणिक संस्था उद्योग, शेतीतील पिकांची नविन संशोधने, अवजारे, पाहण्यासाठी गर्दी करतात. तसेच साखर कारखाने ,येथील दुध व्यवसाय, ग्रीन व पॉलिहाऊस, शीतकरण केंद्र, या ठिकाणासाठी वारकरी भेटी देतात. वारकऱ्यांना शेती व औद्योगिक क्षेत्रातील हा नविन अनुभव येथे घेता येतो असा वेगळा अनुभव या दिवसाच्या प्रवासात वारकऱ्यांना मिळतो.

**उंडवडी ते बारामती–**

प्रस्थान– उंडवडी गाळ्याची,

पहिली विश्रांती– उंडवडी पठार

दुपारचा मुक्काम– बह्मणपूर

तिसरी विश्रांती– मोरेवाडी

चौथी विश्रांती– सराफ पेट्रोल ५५, बारामती

पालखी मुक्काम– शारदा विद्यालय बारामती, प्रांगण[३१]

**बारामती ते सणसर वाटचाल**

एवढा करा उपकार । सांगा देवा नमस्कार ।

भाकावी करूणा । विनवा पंढरीा राणा ।।[३२]

बारामती करांचा वरील पंक्तीप्रमाणे भावपुर्ण निरोप घेऊन पालखी सोहळा, सकाळी लवकर बारमती ते सणसरच्या प्रवासासाठी मार्गस्थ होतो. सकाळचा पहिला विसावा मोतीबाग येथे होतो. तेथे वारकऱ्यांचे, पालखीचे स्वागत होते. त्यानंतर बांदलवाडी येथे ग्रामस्थ पालखी सोहळ्याचे स्वागत करतात. या दिवसातील वाटचालीतील दुसरी विश्रांती सकाळच्या सत्रात १) पिंपळी ग्रेप, २) लिमटेक येथे घेतली जाते या ठिकाणी पालखी सोहळ्याचे स्वागत होते.यानंतर पालखी सोहळ्याची वाटचाल सुरू होऊन दुपारच्या मुक्कामासाठी पालखी सोहळा, भारताचे माजी कृषीमंत्री, दिग्गज नेते, मा.श्री. शरदचंद्र पवार साहेब यांच्या मूळ गावी, काटेवाडी येथे पोचतो. येथील विशेष, पालखीसाठी ग्रामस्थ, पारंपारिक पद्धतीने धोतराच्या पायघड्या येथे घालतात. या पायघड्यावरुन पालखी वाडीत नेली जाते. ही परंपरा आजपर्यंत या ग्रामस्थांनी टिकुन ठेवली आहे.

दुपारच्या भोजन विश्रांती नंतर काटेवाडीच्या चौकात मेंढ्याच्या रिंगणाची परंपरा आहे. येथील ग्रामस्थ काळे व महानवर यांच्या कुटुंबाच्या वतीने मेढ्या असतात. पालखी चौकात मध्यभागी ठेवण्यात येते. पाचशे मेंढ्या पालखी भोवती सोडल्या जातात. या मेंढ्या न घाबरता पालखीस पूर्ण प्रदक्षिणा घालतात[३३] यावेळी दिंड्या मधून, वारकऱ्याकडून ज्ञानोबा–तुकाराम असा जोरदार जयघोष सुरु असतो. रिंगण पाहण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांची मोठी गर्दी झालेली असते. या तुकोबा पालखी सोहळ्यातील वेगळे रिंगण म्हणून हे ओळखले जाते. प्राणी सुद्धा समाजात मिसळुन, मानवाप्रमाणे वागत असतो याचे मोठे उदाहरण आहे. ईश्वर भक्तीत प्राणी देखील सहभाग घेतो याचे उदाहरण आहे. या बाबत असे म्हणतात.

काटेवाडीच्या अंगणी । मेंढ्या धावल्या रिंगणी ।

पायघड्या धोतराच्या । झाल गजर हरिनामाचा ।। [३४]

या पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या नविन वारकऱ्यांसाठी हा दिवस काही वेगळाच अनुभव देणार असतो.

### इंदापूर तालुक्यात प्रवेश–

या रिंगणानंतर पालखी सोहळा पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होतो. काही वेळानंतर तुकोबारायांचा पालखी सोहळा दहाव्या दिवसीच्या प्रवासात भवानी नगर येथे पालखी सोहळा

इंदापूर तालुक्यात प्रवेश करतो.पालखी सोहळ्यातील प्रवास मार्गातील हा तिसरा तालुका येतो.येथे कमानी टाकून स्वागत होते तालुक्याचे सभापती, छत्रपती कारखान्याचे चेअरमन व संचालक यांच्यावतीने वारकऱ्यांचे, पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात येते. येथे पालखी सोहळ्यचा या दिवसातील वाटचालीतील तिसरी विश्रांती असते. यानंतर पालखी सोहळा उर्वरीत वाटचाल उरकून रात्रीच्या मुक्कामासाठी सणसर येथे संध्याकाळी पोचतो. त्यावेळी ग्रामस्थांकडून जोरदार स्वागत होत असते. तुकोबाची पालखी, मारूती मंदिर येथे मुक्कामाला असते.

**बारामती ते सणसर,**

पहिली विश्रांती – मोतीबाग

दुसरी विश्रांती– पिंपळीग्रेप, लिंमटेक

दुपारचा मुक्काम– काटेवाडी,

तिसरी विश्रांती– भवानीनगर

पालखी मुक्काम– माऊती मंदिर, सणसर[३५]

**सणरस ते लासुर्णे– आधुर्णे वाटचाल**

धरिता पंढरीची वाट । नाही संकट मुक्तीचे ।।

सणसरचा मुक्काम आटोपून सकाळी लवकर वाटचाल सुरु होते. रोज नित्यक्रमाप्रमाणे तुकोबाचा पालखी सोहळा पंढरीच्या मार्गाने मार्गस्थ असतो. तुकोबारायाच्या वाटचालीतील हा प्रवास दिवस वेगळाच आहे. तुकोबाराय पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण आजच्या प्रवासात 'बेलवडी' येते असल्याने वारकऱ्यांच्या आनंदाने व उत्साहाचे वातावरण असते. वारकऱ्यांना व भाविकांना रिंगणा विषयी नेहमीच कुतुहल वाटते. सकाळी वाटचालीला वेग येतो. भजनाचा जोर वाढतो सगळे रिंगणाच्या ओढीने वेगात बेलवडीकडे प्रवासात असतात काही वेळान पहिल्या सत्रातच पहिल्या विश्रांतीच्या अगोदर बेलवडी येथे रिंगणासाठी पालखी सोहळा दिड्या समवेत पोचतो. येथे पहिल्यांदाच उखळीच्या तोफांनी पालखी, दिंड्यांचे भव्य स्वागत करण्यात येते. तसेच येथील विद्यार्थी ढोल– लेझीमच्या खेळात पालखीचे स्वागत करतात.[३६]बेलवडी येथील पहिल्या गोल रिंगणाचे सर्व नियोजन छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या वतीने केले जाते. पालखी येथे आल्यानंतर ग्रामस्थ खांद्यावर पालखी घेऊन तेथे बनवलेल्या चौथऱ्यावर आणून ठेवतात. तुकाराम महाराज संस्थान देहुचे अध्यक्ष व विश्वस्त मोरे कुटुंबीय रिंगण लावतात. पालखी चौथऱ्यावर

ठेवल्यानंतर एक– एक दिंडी रिंगणात येऊ लागते. चोपदारांनी आदेश देताच रिंगणाला सुरुवात होते. सुरुवातीला मेंढ्या रिंगणात धावतात. त्यानंतर पताकाधारी वारकरी, तुळशीवृंदावन घेतलेल्या महिला, विणेकरी, मृदंगमणी, टाळकरी, असे एकामागे एक बरोबर गोल फेऱ्या मारतात त्यानंतर मानाच बाभुळकरांचा अश्व व विजयसिंह मोहिते पाटलांचे अश्वाच्या गोल फेऱ्या होतात.

''रमणीय व नेत्रदिपक दृश्य लाखो डोळ्यांचे पारणे फेडतात. '' सोहळा अतिशय सुंदर असतो. वारकरी या रिंगणात सहभागी होतात. या रिंगणा विषयी असे म्हंटले आहे.

सकळाच्या रम्य प्रहारी । अश्व धावले रिंगणी ।

ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष गळा ।

लाखो नयनांनी टिपला अनुपम सोहळा ।

अश्व धावत्यानी दिसणारे चित्र, काही वेगळेच असते. लाखो वारकरी हे दृश्य पाहण्यासाठी आतुर असतात. टाळ्यांच्या गजरात ज्ञानोबा तुकोबारायाचा जयघोष, वारकरी या वेळी करतात. रिंगण संपल्यावर वारकरी, फुगड्यांचा खेळ खेळतात. मृदंगाच्या तालावर टाळकरी आकर्षक चाली खेळतात. महिला फेर धरतात. वारकरी मनसोक्त आनंद लुटतात. आणि दुपारची विश्रांती व नंतर भोजन 'बेलवडी' येथेच घेतले जाते. रिंगणात थकलेले वारकरी भोजन व विश्रांती घेऊन दुपारनंतरच्या वाटचालीसाठी तयार होतात.हिरव्या शिवारातून रिंगणाचा आनंद मनात साठवत पालखी, दिंडी सोहळा पुढे सरकत असतो. या भागात पाणी जास्त असल्याने शेतात केळीच्या बाग, ऊसाचे मळे, असा परिसरातून वारकरी हा प्रवास करत असतात. असा प्रवास तिसऱ्या विश्रांतीसाठी 'लासुर्णे जंक्शन' येथे पोचतो. थोड्यावेळच्या विश्रांतीनंतर पालखी सोहळा दिंड्याबरोबर पुढे वाटचाल करतो. सायंकाळच्या भजनात दंग वारकरी चौथी विश्रांती लासुर्णे येथे घेतात.

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडी उच्चार ।

विठ्ठल अवघ्या भांडला । विठ्ठल बोला विठ्ठल ।।

या असे अभंग मुखाने गात विठ्ठल भक्त सायंकाळच्या सत्रात रात्रीच्या मुक्कामाकडे वाटचल करतात. दिवसभराच्या पायी वाटचालीत करणारा पालखी दिंडी सोहळा सायंकाळी मुक्कामासाठी अंथुर्णे येथे पोचतो.पुर्वी हा मुक्काम लासुर्णे येथे असायचा. आता या दिवसाचा मुक्काम अंथुर्णे येथे होत आहे.[३७]

पहिली विश्रांती – गोलरिंगण – बेलवडी

दुपारचा मुक्काम– बेलवडी

तिसरी विश्रांती– लासुर्णे जंक्शन

चौथी विश्रांती – लासुर्णे

पालखीचा मुक्काम – अंथुर्णे

## आथुर्णे ते निमगाव केतकी – वाटचाल

पंढरीची वारी आहे माझे घरी । आणीक न करी तीर्थव्रत ।।

स.७वा तुकाराम दिंडी, पालखी सोहळा, आथुर्णे येथुन निमगाव– केतकी कडे मार्गस्थ होतो. या भागात रस्त्याच्य कडेने वडाची मोठी झाडे आहेत. गर्द झाडीतुन कोवळ्या सूर्यकिरणातून सर्व दिंड्या काकडा भजन गात चालतात. काही किलो मीटर दिंड्या व वारकऱ्यांची गर्दी असते. ही वारकऱ्यांची गर्दी पहिली विश्रांती शेळगाव फाटा येथे होते. तुकाराम महाराज पालखी रथसह विसावासाठी सर्व दिंड्या येथे थांबतात. दिंडी, पालखी सोहळा विश्रांतीनंतर पुढे सरकतो. काही वेळानंतर पालखी सोहळा दुसरी विश्रांती झाल्यानंतर दिंडी– पालखी सोहळा पुन्हा दिवसभरच्या वाटचाली साठी सुरुवात होते. भजनात दंग हा सोहळा दुपारच्या मुक्कामाला 'गोमंडी' गावात पोचतो. येथे इंदापूर साखर कारखान्याच्यावतीने स्वागत करण्यात येते. येथील ग्रामस्थ भजन दिंडी काढुन पालखी गावामध्ये नेतात. वारकऱ्यांना पांडुरंगाच्या भेटीची आस लागलेली असते. ते प्रचंच टाकून वारीला आलेले असतात. दुपारचा हा मोठा भोजन विश्रांतीचा विसावा उरकून पांडुरंगाच्या ओढीने हे वारकरी मुक्कामाच्या दिशेने झपाझपा पावले टाकीत चालतात. मुक्कामाचे ठिकाण निमागाव केतकीचे अंतर कमी असल्याने दुपारनंतरचे तिसरी विश्रांती, चौथी विश्रांतीसाठी पालखी सोहळा न थांबता लवकरच निमगाव केतकी येथे पोचतो. येथील ग्रामस्थ रस्त्याने पताका, कलश, कमानी टाकून पालखीचे मनोभावे स्वागत करतात. निमगाव केतकी हे गाव राज्यात पानवेलीसाठी प्रसिद्ध आहे.

पहिली विश्रांती – शेळगाव फाटा

दुसरी विश्रांती – ५४ फाटा

दुसरा मुक्काम – गोतंडी

पालखी मुक्काम – निमगाव केतकी

## निमगाव केतकी ते इंदापूर  वाटचाल

पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ।।

पानवेलीच्या निमगाव केतकीचा मुक्काम आटपुन दुसऱ्या दिवशी सकाळी तुकोबाराय दिंडी पालखी सोहळा इंदापूरच्या दिशेने वाटचाल सुरु करतो. वाटेत सोनाई गावात स्वागत होत असते. त्यानंतर पहिली विश्रांती तरंगवाडी– कॅनाल येथे असते. अर्धातास विश्रांती नंतर दिंडी–पालखी सोहळा पुढे सरकतो. थोड्यावेळानंतर दुसरी विश्रांती गोकुळीचा ओढा येथे असते. हा विसावा या दिवसातील पहिल्या विसाव्यापेक्षा मोठा असतो. या विश्रांतीनंतर पालखी सोहळा पुढे सरकतो तो पालखी सोहळ्यातील दुसऱ्या रिंगणासाठी इंदपुराकडे दिंडी पालखी सोहळा स. ११ वा च्या सुमारास पोचतो. इंदापूर हे गाव स्वरुपात शहर म्हणून सध्या विकसित झालेले गाव आहे. येथे पालखी आल्यानंतर उखळी तोफांनी टाळ्यांच्या गजरात फटाके वाजवून हरिनामाच्या जयघोषात स्वागत केले जाते. यानंतर पालखी रिंगणात आणून चौथाऱ्यावर ठेवण्या अगोदर एक प्रदक्षिणा मारली जाते वारकरी रथातुन पालखी खांद्यावर घेतात व रिंगणात आणतात. रिंगणात विश्वस्तांच्या मदतीने पहिली प्रदक्षिणा पताकाधारी, तुळशीवृंदावन व हंडा घेतलेले, पखवाज वादक, त्यानंतर विणेकरी, नंतर टाळकरी अनुक्रमे प्रदक्षिणा घालतात. यानंतर मानाचे अश्व रिंगणात धावतात. भाविक, वारकरी या अश्वांच्या पायाखालची माती घेण्यासाठी झुंबड करतात. ती माती कपाळाला लावतात.हे गोल रिंगण पाहण्यासाठी तालुक्यातील ग्राम्स्थांची मोठी गर्दी होत असते. सभोवतालच्या झाडे, शाळा व इतर इमारतीवर जाऊन ग्रामस्थ रिंगण पाहतात. रिंगण संपल्यावर सर्व वारकरी इंदापूरात मुक्कामाला पोचतात. हा मुक्काम दुपारीच असल्याने अनेक वारकरी वस्तुची खरेदी करतात. रात्रीचे या मुक्कामात दिंड्यात प्रवचन, किर्तन, भजन असतात.

## निमगाव केतकी ते इंदापूर–

पहिली विश्रांती– तरंगवाडी–कॅनॉल

दुसरी विश्रांती– गोकुळचा ओढा

दुपारचा मुक्काम –इंदापूर (गोल रिंगण)

तिसरी, चौथी विश्रांती–

पालखीचा मुक्काम –इंदापूर

२०१४ साली इंदापूर येथे तुकोबाराय दिंडी पालखी सोहळा दोन दिवस मुक्काम होता. तिथीचा सय झाल्यास या दिवसाचा मुक्काम एकच दिवस असतो.

## इंदापूर ते सराटी

अवघे जेणे पाप नासे । तेहे असे पंढरीसी ।

इंदापूर येथील दोन दिवस पालखीचा मुक्काम झाल्यानंतर संत तुकाराम पालखी सोहळा आषाढ शुद्ध ५ सकाळी ६ वा सराटीकडे रवाना होतो. रोजच्या पेक्षा 'सराटी' हे अंतर जास्त असल्याने रोज पेक्षा अर्धा तास पालखी सोहळा लवकर निघतो. इंदापूरचे अंतर कमी असल्याने वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद वाढत जातो. पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीची ओढ, अंतर कमी व्हावे यासाठी वारकरी झपाझपा पावले टाकीत हरिनामाच्या जयघोषात अंतर पार करीत असतात. इंदापूर वरुन निघाल्यावर रस्त्याच्या कडेने केळीच्या बागा, उसाचे मळे यातून जणू भक्तीचा मळा फुलवीत पालखी सोहळा चाललेला असतो. वाटेत सुरवड येथे भव्य स्वागत होत असते. विशेष वडापुरी या गावातील ग्रामस्थ वारकऱ्यांना वडापाव देतात. त्यानंतर चिंचाच्या डेरेदार झाडांतून मृदंग टाळाच्या निनादान पालखी सोहळ्याची दिवसभराची वाटचाल सुरु असते. दुपारी अडीच वाजण्याच्या (२:३० वा) सुमारास पालखी सोहळा 'बावडा' या गावी पोहचतो. राज्याचे माजी पणणमंत्री हर्षवर्धन पाटील यांचे हे गाव असल्याने ते येथे आवर्जुन पालखीच्या स्वागताला असतात. विशेषताहा: येथील सर्व शाळेतील विद्यार्थी वारकऱ्यांच्या वेषात दिंडी काढून पालखीचे स्वागत करतात येथे ग्रामस्थाच्या वतीने वारकऱ्यांना अन्नदान करण्यात येते. यानंतर पालखी सोहळा 'सराटी'च्या दिशेने आगेकुच करतो सायंकाळी सराटी येथे पालखी सोहळा मुक्कामाला पोचतो.

पहिली विश्रांती– गोकुळीचा ओढा, विठ्ठलवाडी,

दुसरी विश्रांती– वडापुरी, सुरवड.

दुपारचा मुक्काम – बावडा.

पालखीचा मुक्काम– सराटी

## सराटी ते अकलुज वाटचाल

अनिक ऐसे कोठे सांगा । पांडुरंगासारिखे ।।

## निरास्नान :

'सराटी' येथे विश्वस्तांच्या हस्ते दुपारच्या दिवशी आजाळशुद्ध षष्ठीला तुकोबारायांच्या पादुकांचे सकाळी निरा नदीत अभ्यंग स्नान घालण्यात येते. येथे अनेक वारकरी या स्नानात सहभाग घेतात. या नंतर पालकी रथामध्ये ठेवून तुकोबाराय दिंडी पालखी सोहळा मोठ्या डौलाने निरानदीवरील पूल ओलांडून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करते. येथे पालखी सोलापूर पोलिसांकडे व्यवस्थापन सुरक्षा देण्यात येते. तोफांची सलामी येथ दिली जाते. अकलुजच्या गांधी चौकात मंत्री, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, दिंडी सोहळा, पालखीचे स्वागत करतात. त्यानंतर सर्व सोहळा रिंगणाकडे जातो. येथील माने विद्यालयाच्या भव्य प्रांगणात सकाळी गोल रिंगण भरते. पताकधारी ते टाळकरी यांचे रिंगण तयार करण्यात येते. येथील रिंगण मोठे असते. या रिंगणात वारकऱ्यांसमवेत मा. ग्रामविकास मंत्री मा. विजयसिंह मोहिते-पाटील उपस्थित राहुन स्वत: फुगड्या खेळतात. आनंद लुटतात. येथेही दोन्ही मानाचे अश्व वेगने धावतात. ते पाहण्यासाठी वारकरी व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती असते. रिंगणानंतर वारकऱ्यांच्या खेळात विशेष रंगत येते. येथेच रात्रीचा मुक्काम असल्याने वारकऱ्यांना पखवाज व टाळाच्या नादात चाली खेळण्यासाठी खुप वेळ असतो. येथील मैदान मोठे असते. त्यामुळे खुप वारकरी येथेल रिंगणात सहभाग घेतात. तसेच येथे भारुडे सादर केली जातात. भारूडातील कला पाहण्यासाठी परिसदातील ग्रामस्थ मोठ्या संस्थेने गर्दी करतात. मोहिते कुटुंबीय वारकऱ्यांच्या जेवणाची सोय करतात. यानंतर पालखी सोहळा मुक्कामासाठी येथेच विसावतो.

सराटे ते अकलूज-

पहिली विश्रांती-मानेविद्यालय, रिंगण, अकलूज

पालखी मुक्काम- श्री विठ्ठल मंदिर अकलूज.

या दिवसाच्या वाटचालीत सकाळी निरास्नान, आणि गोल रिंगण हे महत्वाचे वैशिष्टे मानले जाते.

**अकलूज ते बोरगाव वाटचाल**

**माळीनगर येथे उभे रिंगण-**

पंढरीच्या विठुरायाला भेटण्यासाठी खांद्यावर पताका, मुखात हरिनाम, असा निघालेला हा वैष्णवांचा मेळा, एक एक टप्पा पूर्ण करत जात असतो. सोळा मुक्काम करून हा सोहळा बोरगांवकडे आषाढ शुद्ध सप्तमी (७) मार्गस्थ होतो. सकाळी नऊ वाजता हा पालखी सोहळा माळीनगर येथे पोचतो. येथे श्रीपूरच्या रस्त्यावर एक किलोमीटर उभे रिंगण भरते. रस्त्याच्या

दुर्तफा सर्व दिंड्या उभ्या राहून टाळा मृदुंगाच्या तालावर खेळ खेळतात. येथे अश्वांचे रिंगण होते. चोपदार सुरुवातीला मानाचा बाभूळकरांचा अश्व व नंतर मोहिते पाटलांचा अश्व रथा जवळून सोडता तो अश्व बरोबर रिंगणाच्या शेवटपर्यंत वेगाने धावतात. येथे पहिली विश्रांती व दुपारचा मुक्काम, भोजन असते. यानंतर दुपारी पालखी सोहळा मार्गस्थ होते. पाथरीचा पूल येथे तिसरी विश्रांती असते. कदमवस्ती श्रीपूर कारखाना असा प्रवास करत तुकोबारायांचा दिंडी पालखी सोहळा सायंकाळी बोरगाव येथे मुक्कामाला पोचतो. आजच्या दिवसभरात उभे रिंगणाचे महत्व असते.

### अकलूज ते बोरगाव

पहिली विश्रांती–मालीनगर उभे रिंगण

दुपारचा मुक्काम–माळीनगर

तिसरी विश्रांती– पाथरीचा पूल

चौथी विश्रांती–कदमवस्ती, श्रीपूर साखर कारखाना

पालखीचा मुक्काम–बोरगाव

### बोरगाव ते पिराची कुरोली– वाटचाल

### वारकऱ्यांचा धावा

बोरगाव येथील मुक्काम आटोपून पालखी सोहळा सात वाजता मार्गस्थ होतो. मळखांबी गावात सकाळची व दुपारची विश्रांती होते. व त्यानंतर पुन्हा वाटचाल सुरू होते. टेकडीवर सोहळा दुपारी दोन वाजता पोहचतो यानंतर येथुन धावा सुरू होतो. अशी परंपरा आहे की, संत तुकाराम महाराज पंढरपूरला जात असतात. ‘टप्पा’ येथे आल्यावर त्यांना पांडुरंगाच्या मंदिराचा कळस दिसला होतो. हा अनुभव तुकाराम महाराज अभंगात प्रकट करतात.

सिंचन करिता मूळ । वृक्ष ओलावे सकाळ ।
नको कृतकाचे भरी । पडो एक सार धरी ।
पाण चोऱ्यांचे दार । वरिले वाटवे थोर ।
वश झाला राजा । मग आपल्या त्या प्रजा ।
एक आतुंडे चिंतामणी । फिटे सर्व सुख धनी ।
तुका म्हणे धावा । आहे पंढरी विसावा ।।

त्यामुळे ही परंपरा आजही वारकरी 'टप्पा' येथून धावत जातात व पळतात. येथे पालखी पोहचल्यावर चोपदार एका एका दिंडीला सोडतात. धावा झाल्यानंतर दिंडी पालखी सोहळा पंढरपूर तालुक्यात प्रवेश करतो पंढरपूर जवळ आल्याने वारकऱ्यांचा उत्साह वाढतो. या आनंदात पालखी सोहळा मुक्कामासाठी 'पिराची कुरोली' गायरान येथे पोचतो.

**बोरगाव ते पिराची कुरोली–**

दुपारचा मुक्काम–माळाखांबी

तिसरी विश्रांती–तोंडले बोंडले

चौथी विश्रांती– टप्पा

पालखीचा मुक्काम– पिराची कुरोली गायरान

**पिराची कुरोली ते वाखरी वाटचाल**

पिराची कुरोली येथे ताराबाई मोरे यांची समाधी आहे. त्या देहु संस्थानच्या सरपंच होत्या. पालखी सोहळा पंढरपूरला जात असताना त्यांनी येथे देह ठेवला. येथे त्यांची समाधी बांधण्यात आली आहे. तुकाराम महाराज पालखी सोहळा येथुन जाताना त्यांच्या समाधीपुढे आरती म्हटली जाते. पिराची कुरोली ते वाखरी हे अंतर कमी असल्याने पालखी सोहळा दुपारचे भोजन करूनच पालखी सोहळा दिवसाच्या वाटचालीसाठी दुपारी बारा वाजल्यानंतर सुरु होतो. वाघडवस्ती व भेंडीशेगाव येथे तिसरी विश्रांती म्हणजे या दिवसाची पहिली विश्रांतीसाठी थांबते येथेच माऊलींचा पालखी सोहळा थांबलेला असतो. तुकोबाच्या पालखी सोहळ्यानंतर माऊलीचा पालखी सोहळा येथुन वाटचालीसाठी या दिवसी सुरू होतो. तुकोबाच्या पालखी सोहळा वाखरीच्या अलीकडे 'बाजीराव विहीर' येथे उभे रिंगणासाठी थांबत असतो. बाजीराव विहीर येथे रिंगणासाठी महाराष्ट्रातील व बाहेरील अनेक संतांच्या पालख्या आलेल्या सतात. वाखरी येथे संतांचा मेळा जमलेला असतो.

वैष्णवांचा मेळा पताकांचा भार । वाखरीस जमला भक्तीचा सागर ।

पांडुरंगाच्या भेटीसाठी केला आटापीटा । भक्तीसागरात उसळाती भक्तीच्या लाटा ।।

अलोट भक्तीचा जनसमुदाय येथे लोटलेला असतो. अशा स्थितीत तुकाराम महाराजांचा दिंडी पालखी सोहळा शेवटच्या मुक्कामासाठी वाखरी येथे पालखी तळावर विसावा घेतो. जणू पंढरीतच पोचलो हा आनंद वारकऱ्याच्या चेहऱ्यावर असतो.

**पिराची कुरोली ते वाखरी**

दुपारचे मुक्काम– पिराची कुरोली

तिसरी विश्रांती–वाघडवस्ती, भेंडीशेगाव

चौथी विश्रांती–बाजीराव विहीर उभे रिंगण

पालखीचा मुक्काम–वाखरी तळ

## ४.५ दिंडीच्या वाटचालीतील रिंगण

**रिंगण:–**

संत तुकाराम महाराज दिंडी–पालखी सोहळ्यात गोल रिंगण ३ व उभे रिंगण ३ असे एकूण ६ रिंगण वाटचालीच्या प्रवासात असतात.

पंढरीची वारी आणि त्यातील आविष्कार हाच एक बहुरुपी संतखेळ आहे. दमलेल्या चाललेल्या वारकऱ्यांना खेळायला मिलालेला अविष्कार म्हणजे रिंगण. या रिंगणामुळे काही शारीरिक व्यायाम आणि योगासने ही आपोआपच घडतात आणि वाटचाल सुलभ होतात. रिंगण करायला, त्यात खेळायला आणि पाहायलाही खुप लोक उत्सुक असतात. लोकगीतात रिंगणाचे वर्णन येते,

पंढरीच्या वाटे दिंड्या पताका लोळती ।

देवा त्या विठ्ठलाचं साधु रिंगण खेळती ।।

रिंगण म्हणजे गोलाकार खेळ एखाद्या सरळ रेषेतील सुरुवातीचा आणि शेवटचा बिंदू दाखविता येतो. रिंगणात मात्र कोणत्याही बिंदुपासून वर्तुळ सुरू होते आणि पुन्हा त्याच बिंदुला येऊन मिळाल्यावर परिपूर्ण होते. तसेच जीवनाच्या कोणत्याही क्षणापासून आपल्याला पारमार्थिक रिंगणात प्रवेश करता येतो. ज्ञानेश्वर महजाराज सांगतात, हृदय शुद्धीचा आवारी अंतकरणाच्या शुद्धतेच्या आवारात हे मानाचे रिंगण सुरु होते. आत्मस्वरूपापासून निघून व्यापक शिवस्वरूपाला वळसा घालून पुन्हा आत्मस्वरूपाला स्थिरावणे म्हणजे वर्तुळपूर्ण होणे. ज्ञानेश्वर महाराज ह्या विश्वव्यापी रिंगणात मनाला सोडतात आणि म्हणतात.

म्हणेन तुमचा देवा । परिवारू जो आघवा ।

तेतुले रुप होआवा । मीचि एकु ।।

माऊली सांगतात–

देवा तुमचा जो सर्व परिवार आहे तितक्या रुपाने मी एकट्यानेच बनावे. मीच सर्व रिंगणभर असावे आणि रिंगणा इतकं व्यापकत्व माझ्यात यावे. हे प्रत्येकासाठी माऊली सांगतात. रिंगणाचे रुपक माऊली देतात. ज्या प्रमाणे विश्वाची निर्मिती हा भगवंताचा खेळ तर जीवन जगणं हाच जीवाचा खेळ घालून दिलेल्या मर्यादेच्या आत म्हणजेच धर्म, नीती, तत्त्व, आचार या परिघातच जीवनाचा खेळ रंगवून आनंदाच रिंगण या वारकऱ्यांना करायचे आहे.

**श्री तुकाराम महाराज दिंडी–पालखी सोहळा रिंगण–**[३८]

| स्थळ | तिथी | वेळ | रिंगणप्रकार |
|---|---|---|---|
| १ ले बेलवडी | अषाढ शु ।।२ | पहिली विश्रांती | गोलरिंगण |
| २ रे इंदापूर | आषाढ शु।।३ | दुपारचा थांबा | गोलरिंगण |
| ३ रे आकलूज माने विद्यालय | आषाढ शु।।६ | पहिली विश्रांती | गोल रिंगण |
| ४ थे माळीनगर | आषाढ शु।।७ | पहिली विश्रांती | उभे रिंगण |
| ५ वे तोंडले–बोंडले | आषाढ शु ।।८ | पहिली विश्रांती | धावा |
| ६ वे बाजीराव विहीर | आषाढ शु।।९ | चौथी विश्रांती | उभेरिंगण |
| ७ वे पादुका वाखरी | आषाढ शु. १० | तिसरी विश्रांती | उभे रिंगण |

क्षेत्र देहू येथून नारायण महाराजांनी संत तुकोबाराय आणि ज्ञानेश्वर महाराजांच्या पादूका पालखीत ठेवून पादूकांसह म्हणजे ज्ञानोबा तुकोबांसह, ज्ञानोबा–तुकाराम भजन करीत पालखी पंढरपूरची वाट धरते. वासकर वगैरे दिंडीवाले यांचे म्हणने असे कि, दांडीपुढे चालणे किंवा पालखीमागे चालणे, याबाबत वाद होत होता. यांनी हा वाद समजुतीने व आपल्या खुशीने मिटवून पालखीमागे किंवा दांडीपाशी चालावे वाद करू नये.[३९]

या वेळच्या वारीसाठी लागणारे साधने व वस्तू–

श्री पंढरीचे व आळंदीचे व गावचे यात्रेचा सरजाम मंडप–३, पडदे २, जहाजम ५, पाल ४, घोडी २, पालखी अबदागिरी, छत्री व डेरा, राहुटी, हिलाल ४ व बुधल्या व पडताळ्योच बैल २ बंदुखी, दोन तलवारी, पताका १०० व बुक्याची तबके ३० श्री ज्ञानेश्वरी पुस्तके २, भागवत एक, सप्तकांड रामायण, अभंगाच्या वह्या ५, गीतेची पुस्तके ३, सत्तरंज्या २, तीवशा दोन लोड दोन शत्रूपासून संरक्षणासाठीचा व राहण्याची सोय वारीबरोबर होती. या पालखी सोहळ्यात वर्षानुवर्षे बदल होत गेला. व वारकरी संख्येत वाढ झाली. त्यानुसार साहित्यांची संख्या वाढत गेली. बैलगाडी, नंतर वाहने दिंड्यांसाठी वापरली जाऊ लागली. वाहनामध्ये ट्रकची व्यवस्था सुरु झाली.[४०]

## ४.६ सारांश

देहू ते पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा,श्री नारायण बुवा यांनी सुरू केलेला संत तुकोबाराय पालखी सोहळा देहू ते पंढरपूर वाटचालीचा मार्ग,मुक्काम तसेच रोजचा नित्यक्रम,रोजच्या प्रवासामध्ये सकाळी पालखी प्रस्थान होण्याच्या अगोदर तुकाराम महाराजांच्या पादूकांची नित्यपूजा ,आरती व प्रसाद त्यानंतर ठरलेल्या वेळेनुसार चोपदारांच्या परवानगीनुसार पालखी सोहळा प्रस्थानासाठी सज्ज होतो. सकाळी रोजच्या नियमानुसार काकडा आरती,भजन सर्व दिंड्यामध्ये सुरू असते साधारण दोन तासानंतर पहिल्या विसाव्यासाठी पालखी सोहळा ठरलेल्या ठिकाणी थांबतो. त्यानंर दुपारचे जेवण व विसावा घेऊ न पालखी रात्रीच्या मुक्कमासाठी मार्गस्थ होते. हा नित्यनेम परंपरेनुसारच होत असतो.

## संदर्भ


(डॉ.) रामचंद्र देखणे, वारी स्वरुप आणि परंपरा, पद्‌मगंधा प्रकाशन १ जुलै २००७ पृ. २८

२. राजेंद्र मारणे, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी, पुणे २००८ पृ. २०

३. मुलाखत ,अशोक मोरे पालखी सोहळा प्रमुख संत तुकाराम म देहू संस्थान २०.१२.२०१५

४. दै. लोकमत हॅलो, पुणे मंगळवार, ७ जुलै २०१५, पृ. ४

५. दै. लोकमत हॅलो पुणे जिल्हा सोमवार १ जुलै २०१३ पृ. ८

६. कित्ता पृ. ८

७. दै. सकाळ पुणे जिल्हा , सोमवार १० जुलै २०१३, पृ. ३

८. दै. लोकमत हॅलो पुणे जिल्हा, मंगळवार २ जुलै २०१३ पृ. ८

९. कित्ता पृ. ८

१०. दै. सकाळ पुणे जिल्हा , बुधवार १८ जुन २०१४ पृ. १२

११. डॉ. रामचंद्र देखणे, वारी स्वरुप आणि परंपरा, पद्‌मगंधा प्रकाशन, १ जुलै २००७, पृ. ११०

१२. दै. लोकमत हॅलो पुणे जिल्हा, मंगळवार २५ जुलै २०१३ पृ. ८

१३. दै. लोकमत, शहर आवृत्ती दि. २४ जुन २०१४ पृ. ३

१४. कित्ता पृ. ३

१५. दै. पुढारी, माय पुणे, मंगळवार पुणे ७ जुलै २०१५ पृ. ५

१६. सेवासूर्य शिंदेनाना, पंढरीची वारी, लाईव्ह लाईन, नाशिक २०११ पृ.२०

१७. श्री. राजेंद्र मारणे, जगद्‌गुरु संत तुकाराम पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी, पुणे जुन

२००८ पृ. ३०

१८. दै. सकाळ पुणे जिल्हा बुधवार १८ जुन २०१४, पृ. १२

१९. कित्ता पृ. १२

२०. सेवासूर्य शिंदेनाना, पंढरीची वारी, लाईव्ह लाईन, नाशिक २०११ पृ. ७४

२१. श्री. राजेंद्र मारणे, जगद्गुरु संत तुकाराम पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी, पुणे जुन २००८ पृ. ३१

२२. नथुसिंह डोंगरसिंग रजपूत,तुकाराम महाराज गाथा वा.शि.संस्था १९९६

२३. दै. पुढारी, माय पुणे, मंगळवार पुणे ७ जुलै २०१५

२४. सेवासूर्य शिंदेनाना, पंढरीची वारी, लाईव्ह लाईन, नाशिक २०११ पृ. ७५

२५. डॉ. रामचंद्र देखणे, वारी स्वरुप आणि परंपरा, पद्मगंधा प्रकाशन, १ जुलै २००७, पृ. ११०

२६. श्री. राजेंद्र मारणे, जगद्गुरु संत तुकाराम पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी, पुणे २ जुन २००८ पृ. ३१

२७. दै. सकाळ पुणे जिल्हा बुधवार १८ जुन २०१४, पृ. १२

२८. सेवासूर्य शिंदेनाना, पंढरीची वारी, लाईव्ह लाईन, नाशिक २०११ पृ. २७

२९. श्री. राजेंद्र मारणे, जगद्गुरु संत तुकाराम पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी, पुणे २जुन २००८ पृ. ३४

३०. दै. पुढारी, माय पुणे, बुधवार पुणे ७ जुलै २०१५ पृ. ६

३१. दै. पुढारी, माय पुणे, बुधवार पुणे ७ जुलै २०१५ पृ. ५

३२. ह.भ.प. बाळासाहेब नि. पवार व श्रीगुरु हैबतराव यांची भजनी मालिका, ह.भ.प नरहरि बाबा ढाकणे, नोव्हेंबर २०१३ पृ. १

३३. राजेंद्र मारणे, जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी पुणे २

जुन २००८ पृ.  ३६

३४. कित्ता पृ. ३६

३५. दै. सकाळ, पुणे, बुधवार १८ जुन, २०१४

३६. राजेंद्र मारणे, जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी पुणे २ जुन २००८ पृ. ३७

३७. दै. सकाळ पुणे जिल्हा, बुधवार १८ जुन २०१४ पृ. ६

३८. सेवासूर्य शिंदेनाना, पंढरीची वारी, लाईव्ह लाईन, नाशिक सन २०११ पृ. ३९

३९. अस्सल पत्र श्रीसंत तंकाराम महाराज संस्थान देहू

४०. कित्ता

## प्रकरण पाचवे

# श्रीक्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा

५.१ प्रस्ताविक

५.२ आळंदी येथून, संत ज्ञानेश्वर महाराज दिंडी सोहळा प्रस्थान

५.३ दिंडी प्रवासातील रोजचा नित्यक्रम

५.४ दिंडी प्रवासाचे वाटचाल ,मार्ग, मुक्काम

५.५ दिंडीच्या वाटचालीतील 'रिंगण'

५.६ दिंडी सोहळा परतीचा प्रवास

५.७ पालखी सोहळयाची आर्थिक स्थिती

५.८ सारांश

# श्रीक्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी पायी दिंडी पालखी सोहळा

## ५.१ प्रस्ताविक

पंढरीची वारी ही मुक्त आणि समाज जागृती करणारी चळवळ आहे. संतांनी भजन, कीर्तन,प्रवचन, अभंग भारूड यामधून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला, श्री नामदेवरायांपासून, अलिकडील संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराजापर्यंत सर्वांचा समाजप्रबोधन हाच मूळ हेतू होता. या संतांनी वारकरी संप्रदाय जोपासला आणि मराठी मातीत रुजवला वारीची परंपरा शेकडो वर्षांची आहे. वारीची परंपरा श्री ज्ञानदेवांच्याही अगोदरची आहे. हे मगील प्रकरणात आपण पाहिले आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या वारीला पालखी सोहळ्याचे श्री हैबतबाबा यांनी मिळून सोहळ्याचे दिलेले आहे. श्री तुकोबारायांच्या घरामध्ये ही फार वर्षापासून पंढरीच्या वारीची परंपरा होती. तुकोबारायाच्या वैकुंठगमनापर्यंत तुकोबाराय यांनी ती सुरू ठेवली त्यानंतर ही परंपरा त्यांचे धाकटे बंधु श्री कान्होबा पुढे सुरु ठेवली. इ.स. १६८५ मध्ये श्री तुकाराम महाराजांचे तृतीय चिरंजीव श्री नारायणबाबा यांनी वरील पालखी सोहळ्याचे रुप दिले. ते श्री क्षेत्र देहूहुन श्री तुकोबाराय यांच्या पादुका घेऊन आळंदीत येत श्री आळंदी मधून श्री ज्ञानदेवांच्या पादुका त्याच पालखीत घालुन दोन्ही पादुका घेऊन पंढरपुरी जात. इ.स.१८३० पर्यंत हा सोहळा व्यवस्थित पणे चालू होता.तुकोबारायांचा वंश व देहु संस्थानच्या वादाचा उपसर्ग वारीला होऊ नये म्हणून १८३२च्या दरम्यान हैबतबाबांनी स्वतंत्रपणे आळंदीहून श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा सुरु केला.श्री हैबतबाबांनी स्वतंत्र्यपणे पालखी सोहळा सुरु केल्यानंतर त्यावेळचे औंधचे प्रतिनिधी यांच्याकडून हत्ती, घोडे पालखी बरोबर मागविले. काही दिवस हा लवाजमा पालखी बरोबर येत होता. पुढे तो लवाजमा येण्याचे बंद झाले. पुर्वी हैबतबाबा ग्वाल्हेर येथील शिंदे सरकारच्या नोकरीस असताना, बेळगाव जिल्ह्यतील अंकली गावचे सरदार शितोळे त्यांचे सहकारी होते. त्यांच्याकडून त्यांनी घोडे, तंबू इ. लवाजमा मागविला. यापैकी जरी पटका घेतलेला एका स्वारीचा घोडा असतो; या शिवाय श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या स्वारीकरिता दुसरा घोडा असतो. या घोड्यावर माऊली बसतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. म्हणून या घोड्याचे दर्शन घेतले जाते. या घोड्यावर बारा महिने इतर कोणी बसत नाही. सोहळ्यात ज्या ज्या ठिकाणी पालखी थांबते, त्या त्या ठिकाणी पालखीचा तंबू, सामान वाहण्यासाठी बैलगाड्य, नैवद्य वगैरेसाठी सेवेकरी, इ.या सोहळ्यात विणा आरफळकरांचा, समाज आणि भजन वासकरांचे होते. लवाजमा पालखी बरोबर आजपर्यंत शितोळे सरकारकडून

चालू आहे. या सेवेसाठी प्रसाद म्हणून वाखरीहून पंढरपूरापर्यंत पालखी जाते तेव्हा पालखीत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका काढून त्या शितोळे सरदारच्या घराण्यातील व्यक्तीच्या गळ्यात बांधण्यात येतात. या पालखी सोहळ्याची मूळ कल्पना सत्पुरुष हैबतबाबाची होय. या कार्यात त्यांच्या बरोबर खंडोजीबाबा यांनी सोहळ्यासाठी मोठी सेवा केली; त्यांचे सहकारी टाळकरी शेडगेबाबा यांनी ही पालखी सोहळा वाढण्यासाठी महत्वाची मदत केली. या दोघांच्या दिंड्यांना आज पालखी सोहळ्यात फार मोठा मान आहे. पहिली दिंडी आळंदीकरांची दुसरी श्री खंडुजी बाबांची व तिसरी श्री शेडगेबाबांची त्यानंतर इतर दिंड्या असा क्रम असतो.सन १९६८ पर्यंत या पालखी सोहळयात रथापाठीमागे ४३ दिंडया चालत होत्या त्याकाळात तिन दिंड्यांचे एकत्र साहित्य एका ट्रकमध्ये ठेवले जात असे. दरवर्षी दिंड्या व वारकऱ्यांची संख्या वाढत गेली सन २०१४ साली सर्व मिळून एकूण ४०० दिंड्या सहभागी होत्या.

**व्यवस्थापक पंच कमिटी:–**

पालखी सोहळ्याचा खर्च सुरुवातीस औंधचे राजे व श्रीमंत पेशवे करीत असत. नंतर ईस्ट इंडिया कंपनी हा खर्च देत होती. इ.स.१८५२ मध्ये सोहळ्याच्या व्यवस्थापनासाठी एक पंच कमिटी स्थापन झाली. या कमिटीच्या देखरेखीखाली हा सोहळा सुरु आहे. पूजेसाठी ब्राह्मण, नैवेद्यासठी स्वयंपाकी, चोपदार, कर्णेकरी, पंखाधारी, कारकून, व्यवस्थापक ही मंडळी श्री ज्ञानेश्वर संस्थान आळंदी यांच्याकडून नेमली जातात. सामानासाठी एक ट्रक असतो. पालखीसाठी एक मजबूत व चांदीच्या पत्र्याने मढविलेला सुंदर रथ बनवलेला असतो तो बैलजोडीने ओढला जातो. १९८२ पासून तिसरा मोठा बदल करून 'कार्बन कंपोझिट' चा नवा रथ बनवला गेला. १९८१ साली, आळंदी देवस्थान ट्रस्टच्या वतीने पुण्यातील रमेश मिस्त्री यांनी पहिला रथ तयार केला. बैलजोडीच्या सहाय्याने रथ ओढण्यासाठी असतात. रथाचे वजन पावणेतीन टन असल्याने व रथावर मानकऱ्यांबरोबर हवशा नवशांची गर्दी वाढत असल्याने बैलांना रथ ओढणे मुश्कील झाले होते. २००६ मध्ये दुसरा चांदीचा रथ राजस्थान उदयपूर येथे बनविण्यात आला होता. २५० किलो चांदी वापरून ७० लाख खर्चून तो बनवला परंतु वजनाने जुन्या रथापेक्षा तो जास्त झाला त्यामुळे बैलांना ओढने जिकरीचे व अवघड झाले. सन २०१२ मध्ये एका बैलाचे रस्त्यात विश्रांतवाडीनंतर निधन झाले होते. सन १९८० पासून रथ देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सैन्य दलाच्या दिघी येथील आर ॲन्डडी विभागाने घेतली होती. या विभागाने वर्षभर मेहनत घेऊन आत्याधुनिक

तंत्रज्ञान वापरून सन २०१३ मध्ये नवा रथ बनवला तो म्हणजे कार्बन कंपोझिट नवा रथ.[१] कार्बन कंपोझिट मुळे रथ हलका झाला आहे. तो बॅटरीवर चालणार असून, बैल चालू लागले की रथामधील बॅटरीच्या साह्याने रथ पुढे पुढे सरकत राहणार आहे. यामुळे दिवेघाटात होणारी कसरत थांबणार असून एकच बैलजोडी रथ घाट पार करणार आहे. या रथाचा संपूर्ण खर्च सैन्य दलाने केला आहे. या अधुनिक रथामध्ये संगणक बसविण्यात आला आहे. सीसीटीव्ही बरोबर सेन्सर व जीपी आर.एस. सिस्टीमचा वापर करण्यात आला आहे. सैन्यदलाच्या वतीने दिघी येथून जी.पी. आर.एस द्वारा रथाची प्रत्येक हालचाल टिपता येणार आहे. रथामधील अडचणी दूर करून व आणखी सुसुत्रता निर्माण व्हावी. या संदर्भात संचालक डॉ. एस.गुरुप्रसाद व संस्थानचे विश्वस्त सुधीर पिंपळे यांनी हे काम करून घेतले.

**मानकरी :–**

१. तंबू व अश्व– बेळगाव जिल्ह्यातील अंकली, ता. चिकोडी येथील सरदार श्री शितोळे यांचे कडून ही सेवा पुरविली जाते. श्री. माऊलींच्या सकाळच्या नैवेद्याचा मान सरदार श्री. शितोळे यांच्याकडे आहे.

२. चौरी– चौरी दाळण्याचा मान श्री कुऱ्हाडे पाटील, आळंदी देवाची.

३. पंखाधारी– श्री माऊलींच्या पादुकांना वारा घालण्याची सेवा करणारास पंखाधारी म्हणतात. वाल्हे येथील श्री. मांडके वंशपरंपरागत हा मान आहे.

४. अब्दागिरी– हा मान श्री मोरेश्वर माळी, आळंदी देवाची.

५. नगारा– बाळासो भोसले, आळंदी देवाची.

६. आरती– हा मान श्री श्रीपती गोसावी, आळंदी देवाची

७. कर्णेकरी– सोहळ्यातील भाविकांना सूचना देण्यासाठी कर्णावापरला जातो. हा २५ कि.ग्रॅम वजनाचा आहे. हा मान श्री भीमाशंकर लक्ष्मण वाघमारे यांना गेल्या तीन पिढ्यापासून आहे. हा कर्णा सांभाळण्याची सेवा श्री निवृत्ती नरसिंह बुट्टे करतात.[२]

८. शिपाई– श्री चौधरी रमाकांत गोपाळ

९. पालखी रथाचे बैल– श्री कुऱ्हाडे पाटील, श्री घुंडरे पाटील, श्री. वरखडे पाटील, श्री रानवडे, श्री भोसले पाटील व श्री वहिले या सहा घराण्याकडे बैल जोडी पुरविण्याचा मान क्रमाक्रमाने वर्षानंतर येत असतो. सन २०१५ साली श्री पांडुरंग वरखडे यांची बैलजोडी होती.

१०.चोपदार– पालखी सोहळ्यावर नियंत्रण ठेवणे, रिंगण लावणे, समाज आरतीच्या वेळी दिंड्यांचा तक्रारींची नोंद घेणे. इ. कामे चोपदार यांना करावे लागतात. श्री कृष्णराव तथा बाबूराव चोपदार व त्यांचे बंधू श्री वसंतराव चोपदार यांचे वतीने सध्या श्री बाळासाहेब चोपदार, श्री राजाभाऊ चोपदार, श्री उद्धव चोपदार व श्री रामभाऊ चोपदार, हे काम पाहतात. यांना हा मान परंपरेने चालत आला आहे. या सर्वांच्या सहकार्याने व मदतीने ज्ञानेश्वर महाराज संस्थान, श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा जेष्ठ वद्य अष्टमी ते आषाढ शु. दशमी ते पौर्णिमेपर्यंत पंढरपुर परतीचा प्रवास आळंदीपर्यंत संपूर्ण व्यवस्था पाहतात.

### ५.२ प्रस्थान– जेष्ठ वद्य अष्टमी–

श्री ज्ञानेश्वर संस्थान आळंदी देवाची वतीने पालखी सोहळ्याची संपुर्ण तयारी केली जाते. पालखी सोहळ्याची सुरुवात म्हणजे जेष्ठ वद्य अष्टमी या दिवसास प्रस्थानचा दिवस म्हटले जाते. प्रस्थान म्हणजे प्रवासास निघणे, मार्ग चालण्यास आरंभ केला. अष्टमीला दुपारी ४ वा. नेहमीच्या ठरलेल्या वेळेनुसार प्रस्थान होत असते. या तिथीला जर गुरुवारचा दिवस आला तर हा प्रस्थानचा कार्यक्रम रात्री ९ ते १० च्या सुमारास सुरु होतो. दुपारी दोन वाजता पहिली दिंडी ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदीराच्या महाद्वारात प्रवेश करते नंतर एकामागोमाग दिंड्यांची रांग लागते. चोपदारांनी अनुमती दिल्यानंतर पोलिस एक एक दिंडी आत सोडते. मंदीरात आल्यावर माऊलींच्या दर्शन होताच वारकऱ्यांच्या मनी आनंदाचे डोही आनंद तरंगाचा भाव वाटतो.आत येणाऱ्या दिंड्या मंदीर परिसर दुमदुमला जातो. एकामागुन एक मानाच्या माऊलीच्या रथापुढील २७ दिंडया आत येतात. संध्याकाळी ४ नंतर गाभाऱ्यात वेदपठण, मंत्रोच्चाराच्या घोषना श्रींची पुजा संस्थानचे प्रमुख विश्वस्त करतात. सन २०13 साली प्रमुख विश्वस्त सुधीर पिंपळे, सोहळा प्रमुख विश्वस्त प्रशांत सुरु श्यामसुंदर मुळे या वेळी उपस्थित होते. ५ वाजून ३५ मिनिटांनी, पुजेनंतर ही गुरु हैबतबाबांचे वंशज राजभाऊ बाबासाहेब पवार (आरफळकर) यांच्या हस्ते श्री माऊलींची आरती झाली.[३] आरती झाल्यावर विश्वस्तांच्या हस्ते मानाचा नारळ पालखी सोहळ्याचे मालक राजाभाऊ पवार (आरफळकर) यांना देण्यात येतो. यानंतर उपस्थित सर्व दिंड्यांना नारळ व प्रसाद वाटप केला जातो. तसेच माऊलींना मेवा, मिठाई, पंचखाद्य, पंचामृत व शेंगदाण्याचा नैवेद्य देण्यात येतो. यानंतर माऊलींच्या पादुका प्रमुख विश्वस्त वीणा मंडपात फुला–पानांनी सुशोभित केलेल्या पालखीमध्ये ठेवतात.जवळ जवळ अर्धा तासात सर्व दिंडी मालक, वारकरी यांना नारळ वाटप केले

जाते. सायंकाळी जेमतेम ६ वा पर्यंत हा कार्यक्रम सुरू असतो. मंदिराच्या बाहेर असंख्य वारकरी पालखीची वाट पहात असतात. आळंदीचे सर्व नागरिक, तरुण वर्ग, पादुकांस्थित पालखी उचलतात. एकच जयघोष माऊली, माऊली असा सुरु होऊन पालखी आळंदीच्या प्रदक्षिणासाठी मंदिराबाहेर येते. ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरातुन पालखीच्या अगोदर मानाचे अश्व पुढे असतात. मानाच्या २७ दिंड्या व रथामागील २० दिंड्या या आळंदीला प्रदक्षिणासाठी निघतात. वारकऱ्याच्या व आळंदीकरणांची प्रचंड गर्दी असते. भराव रस्ता, हजेरी मारूती मंदिर चावडी चौका मार्गे पालखी पहिल्या मुक्कामासाठी माऊलींच्या आजोळघरी देवळाच्या उजव्या अंगाला हे घर आहे. येथे सध्याला माऊलींच्या नवीन दर्शन बारीबांधकाम चालू आहे. येथे पालखी यात्री ९ वा पर्यंत पोचते तेथे समाज आरती होते. नंतर सर्व वारकरी, दिंडीवाले मुक्कामाला जातात. भाविक पालखीच्या व पादुकाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. दुसऱ्या दिवशी स. ६ वा. पालखी दिंडी सोहळा पंढरपूरकडे मार्गास्थ होतो. क्षेत्र आळंदी ते पुणे हा पहिला मोठा प्रवास सुरु होतो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा सन २०१३ साली प्रस्थान व दुसरा मुक्काम असे आळंदीत दोन मुक्काम रविवार व सोमवार होते. असे दोन मुक्काम आळंदीत होती तिथीत वाढ झाल्यास आलेला पंधरवाड्यातील दिवस वाढल्यास नेहमाप्रमाणे पालखी सोहळा पंढरपुरात दशमीला पोहचलाच असावा. यामुळे मुक्कामात कमी जास्त दिवस होत असतो. या संदर्भात दरवर्षी पंचकमिटी समाजाला अगोदर सूचना करत असते.

### ५.३ दिंडी प्रवासातील रोजचा नित्यक्रम:

पालखीसोहळा दिनक्रम ठरलेला असतो. पहाटे श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या चांदीच्या पादुकांची षोडशोपचार पूजा पालखीच्या तंबूत होते. या पादुका म्हणजे श्री माऊलींचे प्रतिक चलमूर्ती होय. अभंग चालू असतात. त्याच वेळी पूजेचे ब्राह्मण मंत्र म्हणतात पंचामृत पूजा, अभिषेक होतो. त्यानंतर सरदार श्री शितोळे यांच्यातर्फे नैवेद्य दाखविण्यात येतो. नैवेद्याच्या वेळी पडदा लावतात. सर्व जन डोळे झाकुन घेतात. नैवेद्यात दुध व शेंगदाणे असतात. त्यानंतर आरती होते. सर्वेऽपि सुखिन: सन्तु व आता विश्वात्मके देवे हे माऊलींचे पसायदान सुरू होते. नंतर दोन्ही घोडे माऊलींच्या तंबूजवळ आणतात. ते मान वाकून पालखीतील पादूकाना नमस्कार करतात. यानंतर सकाळी ६ वा पर्यंत हे सर्व चालू असते. स.६ वा. सर्व वारकऱ्यांना कळविण्यासाठी कर्णा वाजवतात. पहिला कर्णा वाजला की, सर्व वारकरी आवरुन तयार होतात. दहा मिनिटांनी दुसऱ्यांदा

कर्णा वाजला की वारकरी दिंड्या सोहळ्याच्या वाटेवर क्रमांकाप्रमाणे उभे राहतात. दहा मिनिटांनी तिसऱ्यांदा कर्णा वाजला की, सर्वात पुढे चौघड्याची बैलगाडी स्वाराचा अश्व श्री माऊलींचा अश्व,निघतो. पाठोपाठ पालखी पुढील २७ दिंड्या क्रमाक्रमाणे चालू लागतात. या अधिकृत सर्व दिंड्या आहेत. १ नंबरच्या एकूण रथापाठीमगे २०१ दिंड्या व नंतर नंबर नसलेल्या जवळ जवळ २०० दिंड्या क्रमाने चालतात. पालखी सोहळा सकाळी निघण्याची वेळही रोजच्या प्रवास अंतरावर ठरलेला असतो. प्रवास अंतर जास्त असेलतर स.६ वा प्रवास अंतर कमी असेल तर स.६:३० वा. पालखी निघते काही ठिकाणी पालखी दुपारी प्रवासाला निघते. रोजच्या प्रवासातील रोजच्या अंतरानुसार व मुक्कामानुसार वाटचाली निघण्याची वेळ पालखी पंच कमिटी ठरविते. या संदर्भातील वेळ व ठिकाण पालखी सोहळ्याच्या अगोदर पालखी पंच कमिटी आपला कार्यक्रम जाहिर पत्रकाद्वारे समाजा पर्यंत पोचविते. पाालखी सोहळा निघाल्यानंतर सकाळचा विसावा, दुपारचा नैवेद्य, भोजन, दुपारचा विसावा, रात्रीचा मुक्काम हे सर्व ठिकाण परंपरेनुसार ठरलेले असतात. तेथेच पालखी सोहळा विसवितो.सकाळचा व दुपारचा विसावा अर्ध्यातासाच असतो. भोजनासाठीचा विसावा दीड तासचा असतो. विश्रांतीनंतर कर्णावाजविला जातो व सोहळा पुढे निघतो. दुपारी सोहळा थांबतो तेव्हा श्रीमाऊलींना नैवेद्य दाखवतात. यावेळेत वारकरी भोजन करतात. भोजन विश्रांतीनंतर वाटचाल सुरू होते. पुन्हा दुपारी विश्रांतीसाठी सोहळा अर्धातास थांबतो. त्यानंतर वाटचाल सुरू होते. आणि सायंकाळी ठरलेल्या ठिकाणी मुक्कामासाठी ठरलेल्या ठिकाणी सोहळा विसावतो.

**हरकरा:–**

पुर्वी जेव्हा पालखी सोहळ्याचे स्वरूप मर्यादित होते तेव्हा सोहळा ठरलेल्या मुक्कामी पोहोचण्याच्या अगोदर एक दिवस निरोप पोहोचविणारे लोक असत. त्यांना हरकरा म्हणत.[४] सुरुवातीच्या काळात हरकरा चालत, घोड्यावरुन नंतर सायकल व अलिकडे मोटार सायकल ने येत. तो गावातील जेष्ठपंच मंडळी, पोलिस पाटील यांना भेटे, दिंडीत कितीलोक आहेत, त्यांच्या निवासास किती जागा लागेल अशा बाबी सांगत, त्यानुसार वारकऱ्यांची भोजन, मुक्कामाची व्यवस्था करणे ग्रामस्थांना शक्य होत असे. सध्या विज्ञानाने अनेक सुविधा उपलब्ध झालेल्या आहे. मोबाईल, इंटरनेट, ही माहिती काही मिनिटात पोचवितो. त्यामुळे हरकारा संस्कृती हरवली आहे. तरीही संत श्री एकनाथ महाराज, संतश्री निवृत्तीमहाराज, संतश्री मुक्ताबाई महाराज अशा

दिंड्यामध्ये आजही हरकारे कार्यरत आहे. पालखी सोहळा सकाळी निघाल्यापासुन प्रत्येक दिंडी मध्ये म्हणावयाच्या अभंगाचा क्रम ठरलेला असते. या अभंगाची मांडणी श्री हैबतबाबांनी केली आहे. ती त्यांच्या श्रीगुरु हैबतबाबांच्या भजनी मालिकेत उपलब्ध आहे.'जयजय रामकृष्ण हरी' या भजनाने सुरुवात होते. यानंतर मंगलचरण, १–१० अभंग, २–५ अभंग,३–७ अभंग २) काकड आरती–१४, भूपाळी–१२ पूजेचे अभंग १५–५ ३) वासुदेव– श्री तुकोबाराय १, श्रीनाथ महाराज –१, श्री नामदेव महाराज–१, माऊली–१, जोगी–१ ४) आंधळे, पांगुळ– श्री तुकोबाराय–१ श्री नाथ महाराज–१, श्री नामदेवराय–१, श्री माऊली–१, ५) गौळणी– श्री तुकोबाराय१, श्री एकनाथ महाराज–१, श्री नामदेवराय–१ श्री माऊली १या संतांचे अभंग म्हणतात. या प्रमाणे दुपारच्या भोजनापर्यंत अभंग म्हंटले जातात.

**भोजनानंतर–वाटचालीत अभंग–**

**६)** नियम– तुकोबाराय–२ पत्रिका–२ नाट–२, श्री ज्ञानदेव समाधीचे–२ अभंग, श्री नामदेव तिर्थावळी–१ अभंग, श्री तुकोबाराय बाळक्रीडा–१, हिंदुस्थानी–१, श्री माऊली–१, हा अभंग बापरुखमा मुद्रा असलेल्या अभंग, यानंतर हरिपाठ सुरू केला जातो. वेळ शिल्लक असेल तर श्री तुकाराम महराजांचे प्रासंगिक, माऊली, मदलसा, बाळछंद हे अभंग म्हणतात. हरिपाठाचा शेवटचा अभंग 'सर्वसुख गोडी सही शास्त्रे निवडी ।' यातील शेवटच्या कडव्याच्या वेळी ज्ञानदेवाप्रमाण निवृत्ती देवी ज्ञान । समाधी संजीवन हरिपाठ । यावेळी दिंडी थांबते आणि दिंडीतील वारकरी उभे राहून ते चरण म्हणतात.[५] तेथूनच वाकून व जमिनीला स्पर्श करून श्री माऊलींना वंदन करतात. नंतर दिंडी पुढे चालू लागते. तसेच प्रसंगोपात, कांही विशिष्ठ अभंग विशिष्ट ठिकाणी म्हणतात. उदा. जेजुरी जवळ आल्यानंतर श्री खंडोबाचे मंदिर दिसू लागले की, श्री खंडोबारायाच्या आळवणीचे अभंग म्हणतात., नातेपुते येथे शिखर शिंगणापूरच्या महादेव डोंगर दिसताना शिवस्तुतीपर कापडीचे अभंग म्हटले जातात. वेळापूरला 'धावा' आल्यावर धाव्याचे अभंग म्हटले जातात.

**समाज आरती :–**

पालखी तळावर समाज आरतीसाठी सर्व दिंड्याचे झेंडेवाले, वीनेकरी, टाळकरी उपस्थित असतात. येथे सर्व दिंड्या वर्तुळाकर उभ्या राहतात. मध्ये गालिच्या घातलेला असतो. ज्ञानोबा तुकारामचा गजर करीत सर्व दिंड्यातील वारकरी टाळ वाजवतात. श्री माऊलीचे चोपदार व मागे खांद्यावर पालखी वाहणारे भोई– सेवेकरी पालखी खांद्यावर घेऊन येतात. पालखी गलीचावर

ठेवली जाते पालखी जवळ पंच उभे असतात तेथे चोपदार जातात. चोपदाराने, चांदीची मूठ असलेला चोप (काठी) वर उभा करून होऽऽ म्हणतात होऽऽ या आवाजांबरोबर सर्व दिंड्या टाळ वाजवणे एकदम बंद करतात. सर्वत्र कमालीची धीरगंभीर शांतता पसरते.एखाद्या दिंडीची काही तक्रार असेल तर ती दिंडी टाळ वाजवत राहते. त्यांची तक्रार ऐकूण घेऊन ती दूर करण्याची हमी दिली जाते. मग ती दिंडी चालविणे बंद करते.सावकाशपणे चोपदार हरवलेल्या व सापडलेल्या वस्तुंची यादी वाचतात कोणाचे काही हरवले असेल अगर कोणास काही सापडले असेल तर ते श्री माऊलींच्या तंबूजवळील कमिटीच्या तंबूत कळविण्याची प्रथा आहे. यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी सोहळा किती वाजता मार्गस्थ होणार ते चोपदार सांगतात. यानंतर श्री आरफळकर आरती ज्ञानराजा या आरतीस सुरवात करतात. येथे प्रचंड वारकरी, ग्रामस्थांची गर्दी होत असते.या समाज आरतीनंतर सर्व दिंड्या आपल्या मुक्कामाच्या ठिकाणाकडे जातात. हा रोजच्या वाटचालीचा नित्यक्रम सर्व दिंड्यांसाठी लागू असतो. हा नित्यक्रम नियमाप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व दिंड्या शिस्तीत पाळतात.पालखी तळावर रात्रीचे कीर्तन, नंतर हरीजागर असतो. क्षेत्र आळंदी येथे श्रीगुरु बाबासाहेब आजरेकर यांचा जागर असतो. कीर्तन व जागर सोपवण्याची जबाबदारी मा.श्री.चोपदारांची असते.

**५.४ पालखी दिंडी सोहळा वाटचाल मार्ग मुक्काम,**

**आळंदी ते पुणे वाटचाल –१६ मैल**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी–दिंडी सोहळ्याचे प्रस्थान होऊन पालखी पहिल्या दिवशी आळंदी प्रदक्षिणा पुर्ण करून आळंदीत मुक्कामाला राहते. म्हणजेच पालखी सोहळ्यास सुरुवात होते एक दिवस आळंदीत मुक्काम असतो. तिथीनुसार हा मुक्काम एक ते दोन दिवसाचा ठरवला जातो. सन २०१५ ला प्रस्थान रात्री ९ वा झाले[६] या दिवशी, गुरुवार होता अन्यथा प्रस्थान परंपरेने नुसार ४ वा. पालखी प्रस्थान होत असते. जेष्ठ वद्य नवमीला पालखी आळंदी ते पुणे या वाटचालीसाठी स. ६:३० वा आळंदीहून प्रवासासाठी निघते. मध्यभागी पालखी,मागे पुढे भजनी दिंड्या, सर्वात पुढे घोडे, त्यांच्यापुढे नगारा, पालखी रथापुढे मानाच्या २७ दिंड्या, रथाच्या पाठीमागे क्रमाने संस्थान नंबराप्रमाणे २०१ व त्यांच्यापाठीमागे संस्थानच्या नंबरव्यतिरिक्त अर्ज केलेल्या व नविन सुरु झालेल्या दिंड्या साधरण २०० पर्यंत एकुण ४०० दिंड्या, सुमारे दोन मैल लांब हा सोहळा रस्त्याने चालत असतो. पालखी सोहळा आळंदीहून नगर पालिकेच्या समोरून

नविन पुलामागे हळूहळू पुढे सरकतो. सर्व आळंदीकर माऊलींना वाटे लावणेसाठी निघालेले असतात. प्रचंड गर्दी होते बँण्ड पदक व टाळ मृदंगाच्या तालात ज्ञानोबा–तुकाराम माऊली, माऊली या भजनात उत्साहात सर्व वारकरी, भाविक पंढरीच्या दिशेने वाटचाल सुरु करतात हा प्रवासाचा पहिलाच दिवस असल्याने नविन वारकरी आपल्या दिंड्या शोधण्यात मग्न असतात. हा आगळा वेगळा सोहळा टिपण्यासाठी भाविक गर्दी करतात. सर्व टाळकरी, भजन म्हणणारे आपल्या दिंडीत नित्यनेमाचे भजन सुरु करतात. या दरम्यान पालखी सोहळा ७ वा पर्यंत नदीच्या पलीकडे पादुका जवळ थांबून पालखी मार्गस्थ होते आळंदीकर माऊली निरोप देऊन जड पावलाने पाठीमागे निघतात. काही पुणे पर्यंत पोहचतात. तर काही आळंदीकर भाविक थोरल्या पादुकापर्यंत पालखी बरोबर चालत असतात. आळंदीहून निघलेली पालखी दिंडी सोहळा पहिल्या विसाव्यासाठी थोरल्या पादुका, साई मंदिर, भोसरीफाटा, येथे थांबते, थोरल्या पादुका, येथे मऊलींची आरती होते. ही पालखी सोहळ्याच्या वाटचालीतील पहिली मार्गावरील आरती आहे. यानंतर मोठा विसावा भोसरीफाटा येथे पालखी सोहळा विसावाला थांबतो·[७]चांदीचा रथ, रंगीबेरंगी जर्बेरा फुलांच्या माळांनी आकर्षणपणे सजविलेला रथ लक्ष वेधून घेत असतो. या रथाची सजावट दररोज वेगवेगळ्या फुलांच्या माळेने आळंदीचे श्री. गरुड कुटुंब अनेक वर्षापासून करत आहे. १८३ व्या (१ जुलै २०१३ ला) या पालखी सोहळ्यावर भोसरीफाटा थोरल्या पादुका येथे आरती झाल्यावर हेलिकॉप्टरमधून फुलांची उधळण करण्यात आली. तसेच चऱ्होली ते साई मंदीर पर्यंत पायी प्रवासात मा.उद्धव ठाकरे सेनाध्यक्ष गजानन कीर्तीकर, आमदार चंद्रकांत मोकाशी, महादेव बाबर, श्रीरंग बारणे, सुलभा उबाळे इ. शिवसेना राजकीय नेते सहभागी होते.[८]अर्धा तासच्या विश्रांतीनंतर कर्णावाजला जातो. साधारण स. १० वा. माऊलीची पालखी दिंडी सोहळा मार्गस्थ होतो. नगारा–चौघडा गाडी, श्रीमाऊलीचे अश्व मार्गस्थ होतात. म्हणजे सोहळा सुरू झाला. वारकरी आपल्या दिंडीत सहभागी होतात. पुन्हा नेहमीप्रमाणे अभंग–भजन प्रत्येक दिंडीत सुरु होते. वारकरी आपल्या दिंडीत येताना जमिनीला वाकून स्पर्श करतात. प्रवास सुरु झाल्यावर उन्हाचा तडाखा असतो. प्रवासाचा पहिला दिवस असल्याने थोडासा चालण्याचा त्रास जाणवत असतो. प्रचंड भाविकांची गर्दी शहरातुन शेजारील भोसरी, दिघी, विश्रांतवाडी, पुणे दर्शनासाठी होत असते. रस्त्याचा दुर्तफा गर्दी असते. थोरल्या पादुका, भोसरी फाटा नंतर दिघी, व पुढे विश्रांतवाडीत दोन तास प्रवास करुन पालखी सोहळा दाखल होतो. येथे पुणे महानगर पालिकेच्या वतीने सावित्रीबाई फुले

विद्यापीठ पुणे यांच्यावतीने पालखीचे भव्य स्वागत होते. सर्व वारकऱ्यांना मोफत प्रसाद, फराळाचे वाटप करण्यात येथे. पुणे येथे पालखी पोहचते तो पर्यंत जागोजागी असे वाटप चालू असते. अनेक सामाजिक मंडळे व भाविक वारकऱ्यांना भोजन व अन्नपदार्थांचे वाटप या वाटचालीत करत असतात.विश्रांतवाडी हे पहिल्या दिवसाच्या भोजन व विश्रांतीचे ठिकाण आहे. दुपारी १.०० वा. पालखी येथे दत्त मंदीरात फुलेनगर येथे थांबते. येथे दुपारचा नैवद्य होतो. सर्व वारकरी भोजनासाठी या परिसरात थांबतात. दुपारच्या भोजनानंतर सधारणत: ३:३० वा. पालखी सोहळा पुण्याकडे मार्गस्थ होती. कर्णा वाजविला जातो. सर्व दिंड्या तयार होतात. चौघडा, नगरा, अश्व, पुढे मार्गस्थ होतात व सोहळा वाटचालीस सुरू होतो.यानंतर संगमवाडी येथे संध्याकाळच्या सत्राचा विसावा असतो. या दरम्यान संत तुकाराम महाराज पालखी सोहळा पुण्यात आलेला असतो. तो सोहळा पुढे सरकल्यानंतर माऊली पालखी सोहळा संगमवाडीतून मार्गस्थ होतो.

२०१३ नंतर पालखी सोहळा संगमवाडी मार्ग पुण्याकडे प्रवास करत आहे. यापुर्वी वाकडेवाडी असा प्रवास होता. या बदलामुळे जुन्या मार्गावरील रहिवाशी, ग्रामस्थ यांनी नाराजी व्यक्त केली. संचेती पुलावर माऊली पालखी सोहळा पुणे शहरात ६.०० वा प्रवेश करतो. महापौर, खासदार, पालकमंत्री, इतर अनेक राजकीय नेते, पुणेकर मंडळी पालखीच्या स्वागताला संचेती चौकात हजर असतात. पालखीच प्रवास पुढे शिवाजीनगर मार्गे फर्ग्युसन रस्त्यावर श्री ज्ञानेश्वर महाराज पादुका, येथे ७.०० वा., पालखी सोहळा येतो. पुढे. तुकाराम महाराज पादुका, खंडोजी बाबा मंदिर यानंतर लकडीपुल ओलांडून पुढे केशव महाराज देशमुख व जोगमहाराज या वारकऱ्यांच्या घराजवळून पालखी पुढे प्रवासकरत लक्ष्मीरोड येथे पोचते. येथे भव्य कमानी, मंडप, भाविकांची प्रचंड गर्दी आनंदात पुणेकर स्वागत करतात. सेवा सदन, आप्पा बळवंत चौक, सोमेश्वर देऊळ, बुदडीपुल ते भवानी पेठ येथे विठोबा देऊळात रात्री ९:०० वा पर्यंत माऊली पालखी पोचतेविठोबा विठोबा मंदीराजवळ भाविकांची गर्दी, झुंबड, मोठी रोशनाई असते वारकरी सुखावत असतात. पहिला टप्पा चालत पुर्ण केला. येथे समाज आरती होते व नंतर सर्व दिंड्यातील वीणेकरी, टाळकरी आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी पोचतात. दोन दिवस पालखी पुण्यात मुक्कामाला असतात. संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम दोन्ही पालख्यांतील लाखो भाविकांची निवास व भोजन व्यवस्था पुणेकर करतात. पुणे महानगर पालिकेच्या सर्व शाळा, तसेच धर्मशाला, मंगलकार्यालय, वाडे राहतेघर या ठिकाणी वारकऱ्यांच्या राहण्याची सोय केलेली असतो. कोटी रुपयांची उलाढाल

या दोन दिवसा येथे होत असते. श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मुक्कामच्या पुणे जेष्ठ वद्य नवमी व दशमी खडकतकर दिंडी यांचे जागर असतो. बहुतांश सर्व दिंडीचालक, दिंडीचे साहित्य पुणे येथे या दोन दिवसात खरेदी करत असतात. तसेच वारकरी देखील आवश्यक व गरजेच्या वस्तु पुणे येथे खरेदी करतात. पंढरीच्या वाटेवरील प्रवासाचा हा पहिला दिवस सुरुवात असल्याने वारकरी दमलेले, थकलेले असतात. त्यामुळे येथे दोन दिवसाचा मुक्काम असतो. वारकरी ताजे तवाने होऊन जेष्ठ वद्य एकादशीला स. ६:०० वा. सासवडकडे मार्गस्थ होतात. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी, आळंदीहुन पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्यानंतर पुन्हा पंढरपूरहून आळंदीत दाखल होऊ पर्यंत क्षेत्र आळंदीत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात रोज कीर्तन सेवा सुरु आहे. ही परंपरा अनेक वर्षापासुन सुरु आहे. आळंदीची पालखी पुणे गावाबाहेरून दोन मैलावरून जाते, कळत नाही मुन्सीपाल्टीला की हजारो लोकांना ते हवे आहे. सरकारचे डोके फिरलय उचलली आळंदी पालखी ठेवली पर्वतीच्या डोक्यावर हा संदर्भ केसरी मंगळवार तारीख ०३ नोव्हेंबर सन १८८५ मधील आहे.

१९६३ पासुन चक्रांकित महाराजांचे वंशज सेवा करत आहे. विष्णु ज्ञानेश्वर चक्रांकित ही पाचवी पिढी आज कीर्तन सेवा करत आहे.[९] हरिपाठ या ग्रंथावर ही कीर्तन सेवा सुरु असते आषाढी वारीसाठी आळंदी मंदिरातून प्रस्थान झाल्यानंतर श्री माऊलींची पालखी आजोळघरी जाण्यापूर्वी फक्त एकाच ठिकाणी चक्रांकित महाराज घर येथे जमिनीवर ठेवली जाते. त्यानंतर आजोळघरी पोचते.

### क्षेत्र आळंदी ते पुणे– जेष्ठ ९

सकळ विसावा – थोरल्या पादुका, भोसरी फाटा.

दुपारचे जेवन– फुलेनगर

दुपारचा विसावा– संगमवाडी,

रात्रीचा मुक्काम – विठोबा मंदीर भवानी पेठ पुणे.

मुक्काम दोन दिवस.

### पुणे ते सासवड– जेष्ठ वद्य ११ (एकादशी) स.६वा. पुण्याहून प्रस्थान, –१९ मैल

७:१५ वा. शिंदे छत्री येथे आरती, ९ वा हडपसर गाडीतळ, ११:५० वा. देवाची उरळी ४:१५ वा. झेंडे वाडी, ७:१५ वा. सासवड.[१०] दोन दिवसाचा मुक्काम आटपुन पुणे येथुन स.६ वा. श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर म. पालखी सासवडकडे मार्गस्थ होते. अनेक पुणेकर या सोहळ्याबरोबर हडपसर, सासवड

पर्यंत चालतात. सकाळची नित्यपुजा होऊन रोजच्या नित्याप्रमाणे पालखी सोहळ्यात वाटचाल सुरु होते वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, असतो. एकादशीचा हा दिवस असतो. वारकऱ्यांना उपवास असतो. बहुतेक वारकऱ्यांना दुपारचे फराळ सकाळीच मिळते. ज्ञानोबा तुकाराम भजनात पालखी सोहळ्यातील दिंड्या क्रमाने हळूहळू मार्गस्थ होतात. हडपसरला सकाळी ९ वा पालखी सोहळा पोचतो. २९ मैलाचा हा सर्वात मोठा वाटचालीतील प्रवासाचा टप्पा आहे. हडपसरला सकळचा विसावा असतो. हडपसर ते सासवड चौदा मैलचे अंतर आहे. दिवेघाट तीन मैला पासून हा सर्वात खडतर प्रवास मानला जातो. पालखी रथ ओढण्यासाठी आसपासच्या गावातील ५ ते ७ बैलजोड्या जोडल्या जातात. दिवे घाटाच्या अगोदर देवाची उरळी येथे विसावा असतो. आणि या नंतर वारकरी दिवेघाट चढण्यास तयार असतात. नामघोषात हा घाट वारकरी सहज पार करतात. रथाच्या आधुनिकरणामुळे सहज रथ घाट पार करतो. बैलांना त्रास होत नाही. कडक उन्हाचा पार असतो. वारकऱ्यांच्या पाण्याची व्यवस्था ठिकठिकाणी केलेली असते. जिल्हा परिषद पुणे, सामाजिक संस्था यांच्याकडून ही व्यवस्था असते. हा प्रवास अतिशय आनंदायी व रमणीय असते दिवेघाट वारकऱ्यांनी फुलुन जातो. या घाटाच्या डाव्या बाजूला दरी मध्ये मस्तानी तलाव आहे. थोरले बाजीराव यांनी तो बांधलेला आहे. साधारण साडेपाच हेक्टर क्षेत्रफळाचा हा भाग आहे. तलावाजवळ श्रीशिव मंदिर व श्रीहनुमान मूर्ती आहे. दिवेघाट ही सह्याद्रीची पूर्व पश्चिम डोंगर रांगेत येतो हिचे नाव भुलेश्वर रांग होय. वरतीचढून आल्यावर झेंडेवाडीला पालखी विसावाला थांबते. जवळच्या डोंगरावर रक्षणासाठी माधवराव कृष्णा पानसे पेशवाईतील तोफखाना प्रमुख यांनी किल्ला बांधला किल्ले मल्हार गड उफ किल्ले सोनेरी होय. या किल्ल्याच्या पायथ्याशी आळंदी चोरांची हे गाव आहे. 'झेंदेवाडी'चा विसावा झाल्यावर उत्साहाने सोहळा मार्गस्थ होतो येथे सीताफळे जास्त असल्याने वारकरी त्यांचा अस्वाद घेतात. 'सतत चालत राहतो त्याला काळचे भय राहते जो थांबतो त्याचे डबके बनते. चालण्याने गती येते. त्यात प्रगती असते. समूहाने एकोपा वाढतो. मतभेद मावळतात. येथे जवळ पिलाजी जाधव मराठा सरदार यांची जाधवगढी म्हणजे आजचा जाधवगड आहे. १७०७ ते १७१२ च्य दरम्यान गढी बांधली. ते पांडुरंगाचे भक्त होते त्यांच्या शिक्क्ाावरून ते दिसने 'श्री पांडुरंग चरणी दृढ भाव । चांगोजीसुत पिलाजी जाधवराव.' दिवेघाटातून पालखी सोहळा पुरंदर तालुक्यात पोचतो सायंकाळी ७:१५ वा. श्री संत सोपानदेव यांच्या सासवड नगरीत सोहळा दाखल होतो. भव्य स्वागत महापौर, नगर सेवक व आमदार गावकरी यांच्याकडून

होते पालखी तळावर पालखी पोहचते समाज आरती होते. नित्य उपक्रम पार पडतात. दोन दिवस मुक्कामासाठी सोहळा येथे विसावा घेतो. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर सुखाचा भाव स्पष्ट दिसतो. हा दिवस प्रवसातील व मुक्कामाची खरी सुरुवात मानली जाते मुक्कामासाठी सर्वांना तंबुत, राहुटीत डाव्या किंवा उजव्या बाजूस ज्या नंबर वरती जागा मिळेल त्याप्रमाणे वाखरी पर्यंत राहुटीत, त्याच नंबरवरती राहवे लागते. असा प्रत्येक दिंडीत प्रधान शिस्त आहे. दिंडीत स्वयंपाक बनवला जातो. तेथेच फराळ, होऊन रात्रीचा मुक्काम केला जातो. स्वयंपाक बनवण्यासाठी व तंबू लावण्यासाठी स्वातंत्र्य लोकांची व्यवस्था दिंडी मालकांकडून केली जाते. या लोकांसाठी स्वतंत्र गाडीव्यवस्था ठेवून अगोदरच मुक्कामाच्या ठिकाणी पोहचून ही सर्व व्यवस्था रोजच्या रोज नियमितपणे सर्व सहभागी दिंडीमध्ये सुरू असते

द्वादशी– कीर्तन रा. जामकर,

रात्री– वालूरकर

जागर– श्री. हैबतबाबा

पुणे ते सासवड, जेष्ठ वद्य ११,

सकाळचे ठिकाण :– पुणे

सकाळचा विसावा :– शिंदे छत्री– आरती

दुपारचा नैवद्य व भोजन :– हडपसर

दुपारचा विसावा :– १ उरळी देवाची, २ वडकीनाला, ३ झेंडेवाडी

रात्रीचा मुक्काम:– सासवड– दोन दिवस.

एकदशी ११ :– कीर्तन सेवा– भाईजी भोगलगावकर, जागर मोझे

द्वादशी सकाळ :–कीर्तन जामकर, रात्री कीर्तन वालूरकर, जागर– हैबतबाबा.

**सासवड ते जेजुरी– जेष्ठ वद्य– १३, – १० मैल**

दोन दिवसाचा मुक्काम संपवुन जेष्ठ वैद्य १३ (त्रयोदशीला) सकाळी ६ वा. पालखी जेजुरीकडे मार्गस्थ होते हरिनामाच्या गजरात सकाळी नित्यनेमानुसार गोड, मधुर आवाजात, टाळमृदंगाच्या तालावर भजन गात सर्व दिंडीतील वारकरी पांडुरंगला भेटण्यासाठी प्रवास करतोय. कऱ्हा नदी ओलांडून बोरावके मळ्यापाशी पालखी वारकऱ्यांच्या स्नानासाठी अर्धा–पाऊण तास थांबते. येथे या दिवसातील वाटचालीचा पहिला विसावा असतो अनेक वारकरी सकाळाच्या स्नानचे ओले कपडे

येथे सुकविण्याचे काम करतात. अनेक वारकरी सकाळचे स्नान करण्याची सोय नसेल तर येथे स्नान करतात.या विसाव्यानंतर पालखी दिंडी सोहळ्यापुढे सरकतो. सकाळी ११ वा. च्या सुमारास भोजना व नैवद्यासाठी पालखी सोहळा ‘यमाई शिवरी’ येथे थांबतो मोठ्या मैदान परिसरात सर्व वारकरी दुपारचे भोजन घेतात. येथे मोठा विसावा असतो. स्वयंपाक बनवणे भोजनासाठी लागणारा वेळ त्यामुळे दोनतास येथे पालखी साधारणत: थांबते.दुपारी ३ वाजता पालखी दिंडी सोहळा जेजुरीकडे रवाना होतो. दुपारच विसावा साकुर्डे येथे असतो या विसावानंतर जेजुरीचे अंतर कमी राहते जेजुरी गड वारकऱ्यांच्या नजरेत आल्यावर महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा ‘जय मल्हार’ यांचे अभंग प्रत्येक दिंडीत गायले जातात. श्रीनाथ महाराजांचे अध्यात्मिक अभंग खंडोबाच्या संदर्भात रचले आहे–

अहंवाघा सोहंवाघा प्रेमनगरावारी।
सावध होऊनी भजनी लागा देवा करा कैवारी।
मल्हारीची वारी माझ्या मल्हारीची वारी ।।धृ।।
इच्छा मुरळीस पाहू नका पडाल नर्कद्वारी।
बोधबुधली ज्ञानदिवरी उजळा महाद्वारी ।।२।।
आत्मनिवेदन भरित रोडगा निवतिल दारोदारीं।
एका जनार्दनीं धन्य खंडेराव त्यावरी कुचा वारी।।३।।[११]
वारी वो वारी । देई कां गा मल्हारी।
त्रिपुरारी हरी। तुझे वारीचा मी भिकारी।।
वाहन तुझे तोड्यावरी। वरी बैसली म्हाळसा सुंदरी
वाघ्यामुरळी नाचती परोपरी। आवडी ऐसी पाहीन जेजुरी।।
ज्ञान कोटंबा घेऊनी आलो हारीं। बोध भंडार लाविन परोपरी।
एका जनार्दनी विनवी श्रीहरी। वारी देऊनी प्रसन्न मल्हारी।।[१२]

हे अभंग गात, सर्व वारकरी दिंडीत भंडारा उधळात नाचत चालतात. पांडुरंग ‘खंडोबाच्या रुपात सर्व वारकरी पाहतात. या आनंदात सर्व सोहळा सायंकाळी जेजुरी मुक्कामी पोहचतो. पालखी तळ्यावर समाज आरती होऊन सर्व वारकरी आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहचतात. अनेक वारकरी खंडोबाचया दर्शनासाठी गडावर पोहचतात. अतिशय सौंदर्याने नटलेला हा गड आहे.

पाऊसाळा असल्याने निर्सगरम्य दिसते रात्रीची लाईट डेकोरेशन नगरपालिकेने केलेले असते. कडेपठार कमानी समोर जेजुरी पालिकेच्या वतीने स्वागत होते. शिवाजी चौकात मार्तंड देवस्थानच्या वतीने स्वागत होते. पालखी तळावर स्वच्छता व सुशोभना केलेली असते. पाण्यासाठी सोनावणे, डोंबे, पानसरे, खोमणे यांच्या विहीरी अधिग्रहीत केलेल्या असतात. नियंत्रणकक्ष पोलिसांकडून स्थापण केलेला असतो. मोबाईल टॉयलेट उभारलेले असतात. फिरत्या शौचालयाची सोय असते. टिंबर मार्केट येथील जैन व पटेल बंधू यांच्यावतीने विठ्ठल मंदिर येथे सुमारे पंचवीस हजार वारकऱ्यांच्या भोजनाची सोय केलेली असते.[१३]एक दिवसांचा मुक्काम 'जेजुरी ता. पुरंदर, जि. पुणे येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळ्याचा असतो.

रात्रीचे कीर्तन– कुंभार गावकर.

रात्रीचा जागर– राजुरकर

सासवड ते क्षेत्र जेजुरी पर्यंतच्या या वाटचालीत विशेष म्हणजे. दुपारच्या नैवद्यचे 'यमाईशिवरी येथील ठिकाणी 'माऊलीच्या पादुका प्रथमच पालखीतून काढल्या जातात व येथील स्वयंभू यमाईमातेच्या मंदिरात देवीच्या भेटीसाठी नेतात. हा अलौकिक भेटीचा सोहळा येथे होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.[१४]

### जेजुरी ते वाल्हे– जेष्ठ वद्य १४ (अधिक आषाढ) –७ मैल

क्षेत्र जेजुरीचा एक दिवसाचा मुक्काम संपवुन दुसऱ्या दिवशी जेष्ठ वद्य१४ ला सकाळी ठरलेल्या नित्यनियमाप्रमाणे स. ६.३० ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळा वाल्हे मुक्कामकडे पायी प्रवासाला निघतो.नित्यक्रमाने सर्व दिंड्याक्रमाने सकाळच्या नित्येनियमाने भजन गात निसर्गरम्य वातावरणात उत्साहाने चालतात. सर्व वारकरी आनंदात व उत्साहात वाटचाल करतात. एकाच वेळीच वाटचाल या प्रवासात असते. दुपारीच हा सर्व सोहळा मुक्कामाल पोहच असतो.सकाळच्या नित्यनेम भजनात पहिला विसावा 'दौंडज शिव'ला सोहळा येऊन पोचतो. सकाळी ९ च्या दरम्यान पालखी सोहळा नाष्टा व विसावाला पोहचतो. 'दौंडज गावची ही शिव आहे. सर्वत्र आजूबाजूला मोकळेरान असते डोंगरची एक रांग येथे आहे. या डोंगररांगेत हा सोहळा विसावतो. दर्शनी सोहळा येथे दिसतो. भाकरीची न्याहारी येथे वारकऱ्यांना वाटप केले जाते. सकाळच्या न्याहरी, विसावा संपल्यावर पालखी दिंडी सोहळा पुढे सरकतो. यानंतर पालखी सोहळा दुपारच्या मुक्कामच्या अगोदरच्या दुसऱ्या विसाव्यासाठी पालखी दिंडी सोहळा 'दौंडज' या गावी थांबतो. आजूबाजूच्या

परिसरातील अनेक भाविक दर्शनासाठी येतात. घरोघरी भाविकांची गर्दी होते. ग्रामस्थांचे हा सर्वात मोठा उत्साह असतो. मोठ्या आनंदाने ते याचे स्वागत करतात.

या विसाव्यानंतर सोहळा वाल्हेकडे सरकतो दुपारच्या १२.३० च्या दरम्यान पालखी सोहळा वाल्हे येथे दिवसभरच्या मुक्कामासाठी पोहचतो या गावचे सरपंच, ग्रामस्थ, सोहळ्याचे भव्य स्वागत करतात. समाज आरती होते. 'पालखी' पालखीतळावर मुक्कामाला पोहोचते येथे रामनामाचा मोठा जयघोष होत असतो कारण वाल्हे क्षेत्र वाल्मिकी ऋषींचे गाव आहे. गर्द झाडीने वेढलेले, डोंगर दऱ्यांच्या फेरा असलेल्या निसर्गरम्य ठिकाणी श्री वाल्मीची ऋषींची समाधी आहे. वाल्मिकीऋषी म्हणजे रामायण लिहिणारे. पूर्वाश्रमीचा वाल्ह्याकोळी सभोवार डोंगर येथे निवास असे वाटसरूंना मारहाण करून तो लुटीत असे तो नामजपाने पुढे ऋषी झाला व रामायण लिहिले. ह्या त्यांचे हे नावावरून'वाल्हे' हे नाव मिळाले.[१५] येथे दुपारचा मुक्काम असल्याने येथे सायंकाळी सर्व दिंड्यामध्ये प्रवचन, कीर्तने होतात. सर्व वारकऱ्यांना मोठा विसावा मिळतो. व पुढील प्रवासासाठी ते ताजेतवाने होतात. कपडे धुणे, गावाकडे फोन लावणे, इतरांची विचारपुस करणे यासाठी मोठा वेळा वारकऱ्यांना मिळतो. गावातील ग्रामस्थ, गावकरी आपली घरे यात्रेकरूंना देऊन त्यांचे उत्साहाने स्वागत करतात, हे विशेष आहे.

जेजुरी ते वाल्हे– जेष्ठ वद्य–१४,

पहिला विसावा–१, दौंडज शिव २, दौंडज

दुपारचा मुक्काम– नैवद्य– वाल्हे

रात्रीचा मुकाम – वाल्हे

रात्रीचे कीर्तन– गंगुकाका शिरवळकर

रात्रीचा जागार– जळगावकर

**वाल्हे ते लोणंद जेष्ठ वद्य ३०– १२ मैल**

भजनात पालखी सोहळा पहिला विसावा साठी 'पिंपरे खुर्द विहीर' या ठिकाणी पोचतो. अर्ध्यातासाचा विसावा नंतर पालखी सोहळा पुन्हा मार्गस्थ होतो. कर्णा वाजला की सर्व दिंड्यातील वारकरी आपल्या दिंड्यामध्ये सहभागी होतात. नंबराप्रमाणे सर्व दिंड्या वाटचाली लागतात.या दिवसांच्या वाटचालीतील 'नीरा' या गावात नीरा या नदीवर माऊलीच्या पादुकांना स्नान घातले जाते हा वेगळा अनुभव सर्व वाकऱ्यांसाठी आनंददायी असतो. साडेदहा वा. साधारण पालखी

सोहळा नीरा येथे पोहचतो. हे व्यापारी पेठ असल्याने दर्शनासाठी आजबाजूच्या खेड्यातून हजारो भाविक येत असतात. वारकरी भान हरवून गात आणि नाचत असतात. गावाला संपुर्ण प्रदक्षिणा घालून हा पालखी सोहळा निरा गावातील तळावर विसावतो. दुपारी दोन वाजता माऊलींच्या पादुका पालखीतून बाहेर काढू  जातात. श्रीदत्त घाटावर श्रीसोहळा मालक आरफळकर, विश्वस्त, पुजारी यांचे हस्ते स्नान घातले जाते. गवातील सरपंच, ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने हजर असतात. हा सोहळा पाहण्यासाठी दोन्ही तीरावर व दोन्ही पुलावर अलोट गर्दी होत असते वारकरी पताका नाचवतात, टाळ–मृदुंगाचा एकच नाद घुमलेला असतो. माऊली–माऊली जयघोष शिगेला पोचतो. एकच आनंद कल्लोळ असतो.अनेक वारकरी येथे स्नान करतात. दुपारचे भोजनानंतर हा 'नीरा स्नान' कार्यक्रम असतो भोजनासाठी नदी पलिकडे पाडेगाव फाटा परिसरात अनेक दिंड्या थांबलेल्या असतात. पालखी सोहळा नीरा स्नान, नैवद्यनंतर पुढे चालण्यास सुरू होतो. हा परिसर सुपीक शेतीचा आहे. ऊसाची शेती या भागात जास्त आहे. रस्त्याच्या दुतर्फा शेती व झाडी आहेत. तसेच केळी, टोमॅटो ह्या पिकांनी समृद्ध हा भाग येतो.या वातावरणात वारकरी अभंगात दंग होत, पालखी सोहळा पुढे सरकतो. थोडाच वेळात पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातून 'सातारा' या जिल्ह्यात प्रवेश करतो. यावेळी पुणे जिल्हा प्रशासन पालखी सोहळाचे सर्व सुत्रे सातारा जिल्हाप्रशासनाकडे सुर्पुत करतात. गेली ७/८ दिवस अहोरात्र पोलिस बंदोबस्त व प्रशासकीय सेवा पुरविणाऱ्या पुणे जिल्ह्याच्या सेवकांना निरोप दिला जातो. साडे तीन वाजता. पाडेगाव फाटा येथे सातारा जिल्ह्याचे आमदार व इतर मान्यवर श्रीमाऊलीस पुष्पहार अर्पण करून स्वागत करतात. त्यानंतर पालखी दिंडी सोहळा लोणंदकडे मार्गस्थ होतो. लोणंदच्या जवळ शासकीय विश्रामधामाजवळ मान्यवरांनी श्री सोहळ्याचे भव्य स्वागत केले. तानाजी चौकात पालखी रथातून काढून ग्रामस्थांनी खांद्यावर घेतात. श्री विठ्ठल मंदिर मार्गे श्री पालखी तळाकडे निघते. महात्मा फुले चौकातून पालखी तळावर ६ वाजता सोहळा पोहचतो. सर्व दिंड्या वारकरी समाज आरतीसाठी एकत्र येतात हा तळ लहान असल्याने येथे गर्दी जाणवते. त्यामुळे अनेक वारकरी परस्पर मुक्कामाच्या ठिकाणी पोहचतात.शाळा, महाविद्यालये, मोकळ्या जागा, रेल्वे मार्गाकडे अनेक दिंड्यांचे तंबू उभारलेले असतात. येथे दोन दिवस आणि अर्ध्या दिवस पालखी सोहळा मुक्कामाला असतो. जर प्रतिपदा व एकादशी यांमध्ये एक तिथी कमी असेल तरच प्रतिपदेला दुपारी पालखी निघते अन्यथा पालखीचा मुक्काम सर्व दिवस लोणंद येथेच असतो. क्षय असला व

दुसऱ्या तीथीची वृद्धी असली म्हणजे दिवसभरून निघतात.जास्त दिवस मुक्काम असल्याने वारकरी लोणंदच्या व्यापारी पेठेत खरेदीला जात असतात. तसेच आजूबाजूच्या भागातील सातारा, सांगली तसेच कोकण भागातील अनेक भाविक दर्शनासाठी लोणंदला पोचतात. पुणे सोडल्यावर हे सर्वांत मोठे गाव आहे येथे वारकरी सुखवतात. न अर्ध्या प्रवास संपल्याचा आनंद वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर असतो.

वाल्हे ते लोणंद– जेष्ठ वद्य ३०.

पहिला विसावा:– पिंपरे खुर्द विहार

दुपारचा मुक्काम – नीरा– नैवद्य,

दुपारचा विसार – नीरा स्नान,

रात्रीचा मुक्काम– लोणंद

रात्रीचे कीर्तन– वद्य ३०– गुरुजीबुवा राशीनकर

जागर– डांगे, फडताळे, काक फाळके

आषाढशुद्ध १– कीर्तन– सकाळी– चाकणकर

रात्री वासकर

जागर– सोपानकाका कराडकर

आषाढ शु. २– लोणंद– सकाळ कीर्तन– निकम महाराज

**लोणंद ते तरडगाव– आषाढ शुद्ध १ – ६ मैल**

दुपारी लोणंद येथुन पालखी सोहळा तरडगावच्या प्रवासाला निघतो. या दिवशी रोजच्या पेक्षा वेगळाच आनंद वारकऱ्यांच्या मनात असतो या दिवसातील प्रवास फक्त सहामैलाचा असतो. या वाटचालीत लोणंदनंतर श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळ्यातील पहिले रिंगण असते. हे रिंगण उभे रिंगण आहे. त्यामुळे वारकऱ्यांमध्ये मोठा उत्साह या दिवशी असतो. नविन सहभागी वारकऱ्यासाठी, येणारा भाविकांसाठी हा रिंगण सोहळा अदभुत अनुभव असतो.हे रिंगण भरते ‘चांदोबाचा लिंब’ येथे दुपारी १२.३० वा. आरती व श्री माऊलींचा नैवद्य झाल्यानंतर श्री सोहळा मार्गस्थ होतो. चांदोबाचा लिंब येथे पालखी सोहळ्यातील पहिल्या रिंगणास सुरुवात होते. [१६]

**उभे रिंगण:-**

लाखो भाविकांच्या श्री विठ्ठल गजरातील हा अपूर्व सोहळा अनुभवणे ही प्रत्येक वारकऱ्याची आंतरिक इच्छा असते. सरहद ओढ्याजवळ कापडगाव नजिक फलटण तालुक्याचे आमदार व इतर मान्यवर श्री सोहळ्याचे स्वागत करतात.चार वाजता चांदोबाचा लिंब याठिकाणी सोहळा पोहचतो. चोपदार, सेवेकरी आणि स्वयंसेवक सर्व दिंड्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस लावतात यावेळेत भजनाचा जोर वाढतो. टाळ-मृदंगाचा आवाज टिपेला पोहचतो. चांदोबाचा माळ गर्दीने फलतो. अनेक भाविक प्रेक्षक हे रिंगण पाहण्यासाठी रस्त्याकडेच्या उंच झाडावर बसतात.रथावर चढून ललकारी देत चोपदारांनी चोपवर केला की सर्व दिंड्या शांत होतात. चोपदाराचा इशारा झाला की समोरच्या टोकाकडून श्री माऊलींचा अश्व व स्वाराचा अश्व दिंड्या मधून ठेवलेल्या रस्त्यावरून वेगाने दौडतात. ते सोहळाच्या मागच्या टोकापर्यंत जाऊन पुन्हा माघारी परतात. पालखी रथाजवळ येऊन श्रीपादुकांना मान वाकवून नमस्कार करतात. नंतर अश्वांना डाळ, गूळ व खारीक देऊन त्यांच्या गळ्यात पुष्पहार घालतात. त्यानंतर पुन्हा वेगाने ते समोर दौडतात. टाळमृदंग वाजतात, वारकरी श्री माऊली, माऊली जयजयकार करतात. हेलिकॉप्टर मधून श्री माऊली पालखी रथावर पुष्पवृष्टी केली जाते. अश्वांच्या टापाखालची माती कपाळी लावण्यासाठी भाविकांची झुंबड उठते. वारकरी जल्लोषात फुगड्या, कोंबडा खेळात असतात. पाच वाजता सोहळा तरडगावाकडे वाटचाल सुरू होते. तरडगावात वाटेत पूजा होतात आणि पालखीचे भव्य स्वागत होते गाव लहान पण माणसे उदार अंत:करणाची आहेत. येथे देवळेही भव्य आहेत. पण त्यांची डागडुजी वेळावर होत नाही म्हणून ती जीर्ण होत चालली आहेत. गावाबाहेर पालखीतळ आहे. जवळच मोठ्या विहीरी आहेत. त्यामुळे पुरेसे पाणी सोहळ्यास उपलब्ध होते पालखी तळ मोठा असल्याने मोठा जमाव जमतो कीर्तनाला मोठी शोभा येते.

**लोणंद ते तरडगाव**

सकाळ -लोणंद

दुपारचा नैवद्य व भोजन - लोणंद

दुपारचा विसावा- चांदोबाचा लिंब- उभे रिंगण १ले

रात्रीचा मुक्काम- तरडगाव

रात्रीचे कीर्तन- वासकर फड

रात्रीचे जागर– केदारबुवा कराडकर

**तरडगाव ते फलटण –आषाढ शु.३ –१३ मैल**

दैनंदिन श्रीपूजा, आरती, नैवद्या झाल्यानंतर कैवल्य सम्राट संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळा सकाळी ६ वाजता फलटणकडे मार्गस्थ होते.सभोवार हिरवेगार शिवार आहे अभंग गात सकाळचा टप्पा पुर्ण करून पावणे नऊ वाजता सोहळा पहिला विसावासाठी काळज येथे थांबतो. श्री दत्त मंदिरचा हा परिसर नयनरम्य आहे दर्शनासाठी साखरवाडी तडवळे, घाडगेमळा, डोंबाळावाडी, मुरुम इ. गावातील भाविक गर्दी करतात. विश्रांती झाल्यावर सोहळा मार्गस्थ होतो. उन्ह तापलेले असते सोहळा थोडासा मंदावतो बडेखान, सुरवडी येथे श्रीपालखीत पुष्पहार अप्रण करून स्वागत केले जाते. मानकऱ्यांचा फेटा बांधून श्रीफळ देऊन सन्मान होतो. भाविक, अबालवृद्ध, माताभगिनी, पानफूल अर्पण करून श्रद्धेने श्रीमाऊलीचे दर्शन घेत आहे 'ज्ञानोबा–तुकाराम' जयघोष सर्वत्र होत असतो. वडजल, काशिदवाडी, गिरगाव इ. ठिकाणाहून भाविक बैलगाडी, ट्रॅक्टर, जीपमधून वाकऱ्यांना अन्नपदार्थ घेऊन येतात. वारकऱ्यांना वाटतात. 'निंभोरे ओढा' येथे दुपारचे भोजन असते.टाळमृदंगाच्या गजरात अभंग गात सोहळा निघाला. सभोवार ऊस, कापूस डोलत आहे. पालखी सोहळा या परिसरातून पुढे सरकतो. दुपारचा विसावा वडजल येथे पालखी सोहळा विश्रांती घेतो.विश्रांतीनंतर पालखी सोहळा फलटणकडे रवाना होतो. सायंकाळी गोरज मुहूर्तावर श्रीपालखी सोहळाचे फलटणच्या जिंनी नाक्यावर फलटणकर गुलाबपाण्याचे शिंपण करून, पुष्पहार अर्पण करून, वाद्यांच्या गजरात, फटाक्यांची आताषबाजी करून स्वागत करतात. दिंड्याचा उत्साह वाढतो. पुढे संत श्रीहरिबुवा महाराज मंदिराजवळ रथावर पुष्पावृष्टी केली जाते. श्रीराम मंदिर परिसरात आकर्षक रांगोळ्यानी रस्ते सजवले जातात. पालखी रथ श्रीराम मंदिरासमोर येताच नाईक निंबाळकर, राजघराण्यातर्फे स्वागत होते. श्री गजानन चौक, सांस्कृतिक भवन मार्गे सोहळा सायंकाळी सात वाजता फलटण विमानतळावर मुक्कामाला पोहचतो सर्व दिंड्या शिस्तीने उभ्या राहून समाज आरती पार पडते. फलटण:– १३ व्या शतकात 'महानुभव' वाङ्मयात यास 'फलेठाठा' तर काही ठिकाणी 'फलपत्तन' म्हटले आहे. पुर्वी येथे फळसाडांच्या बागा होत्या. त्यामुळे याला 'फलस्थान' म्हटले जात होते. त्याचा अप्रभंश होऊन फलटण झाले.यास महानुभाव पंथाची दक्षिणकाशी म्हणतात. श्रीचक्रपाणी यांचा जन्म फलटण गावी झाला. तसेच नाईक निंबाळकर हे फलटण संस्थानचे संस्थापक उत्तर भारतातील परमार

घराण्यातील 'निंबराज' हा दक्षिणेत आला काही काळ संपत्ती साठवून त्यांनी एक गाव बसविले त्यास निंबळक असे म्हणतात. त्यामुळे या घराण्याला निंबाळकर म्हटले जावू लागले यांच्या घराण्यातील राणी सईबाई छ. शिवाजीची पत्नी होय.तसेच मालोजीराजे भोसले यांची पत्नी दीपाबाई, व सईबाईची मुलगी सखुबाई हिचा विवाह महादजी निंबाळकरांशी झाला. अशा तीन पिढ्याचा सोयर संबंध शिवरायाशी येतो.अशा फलटण मुक्कामी पालखी सोहळ्याची उत्तम व्यवस्था नगरपरिषदेच्या वतीने पार पाडली जाते.तिथीची वृद्धी असेल तर येथे एक दिवस मुक्काम वाढविला जातो. अन्यथा एकच दिवस मुक्काम असतो. सन २०१३ ला 'फलटण' येथे पालखी सोहळ्याचे दोन दिवस मुक्काम होता.[१७].

रात्रीचे कीर्तन– श्री गुरुबाबासाहेब आजरेकर

रात्रीचा जागर– बापू तांबट शिरवळकर

अधिकचा दिवसचे कीर्तन व जागर चोपदार– सांगतात.

**फलटण ते बरड आषाढ शुद्ध ४– ११ मैल**

फलटणचा मुक्काम संपवून पालखी दिंडी सोहळा आषाढ शुद्ध ३ ला स. ६.३० वाजता बरडच्या दिशेने मार्गस्थ होतो. राजेशाही स्वागत व पाहूणचार घेऊन श्री पालखी सोहळा फलटणकरांचा निरोप घेतला जातो पोलिसांचे बँड पथक शहरातील गिरवी चौकापर्यंत साथ देते. भारवलेल्या अंत:करणाने फलटणकर प्रचंड संख्येने उपस्थित राहून निरोप देत असतो.अभंग गात, माऊलीचा जयजयकार, पाण्याचा कालवा भरून वाहतोय. ऊस आणि केळीचे हिरवेगार मळे यामुळे मन अधिकच सुखदायक होते रमणीय परिसरातून हा पालखी सोहळा सकाळी ९.३० वा. दरम्यान पहिला विसावासाठी 'विडणी' येथे पोहचतो. ग्रामस्थ स्वागत करतात.येथे विशेष म्हणजे– गावकरी वाकऱ्यांसाठी थाली पीठ, दही, लाह्या आणल्या जातात. हा प्रसाद परंपरेनुसार दरवर्षी येथे वारकऱ्यांसाठी गावकरी, आजूबाजूचे गावातील भाविक येथे घेऊन येतात.सव्वा दहा वाजता पालखी सोहळा पुढे सुरू होतो या काळात ऊन जास्त असते पाऊसाळा कमी झाल्याने सहभागी शेतकरी वारकरी पाऊसाची आस मनात घेऊन पांडुरंगाच्या भेटीची अनिवार ओढ लागलेली असते. दुपारचे वित्य भजन गात सोहळा दुपारच्या नैवद्य व भोजनासाठी दुपारी १२.३० च्या दरम्यान पिंपरद येथे पोहचतो परिसरात ऊस, द्राक्षमळे, द्राक्षरोप, वाटीका आहेत. समृद्ध शेती परिसर आहेत. तसेच या परिसरात डाळिंब, चिक्कू, पेरू बागा मोठ्या प्रमाणात दिसत आहे. गायी–म्हैशी या दुभत्या

जनावरांचे गोठे मोठ्या प्रमाणावर दिसतात.दुपारच्या भोजनानंतर पालखी दिंडी सोहळा पुढे सरकतो एक तासाच्या वाटचाली नंतर दुपारचा विसावा 'निंबळक फाटा' येथे पालखी सोहळा थांबतो वारकरी सावली शोधतात व विसावा घेतात.सायंकाळच्या सावलीत पालखी दिंडी सोहळा रात्रीच्या मुक्कामासाठी दिवसभराची वाटचाल पुर्ण होऊन सायंकाळी सहा बरडमुक्कामी पालखीतळ येथे येथे पोहचतो.

श्री. रात्रीचे कीर्तन– गोविंदराव भाई

रात्रीचे जागर– भोपळे लखोबा सोनार

### बरड ते नातेपुते– आषाढ शु. ५ – १० मैल

सकाळी ६.३० वा सातारा जिल्ह्यातील शेवटचा मुक्काम असलेला बरड गावचा निरोप श्री माऊली सोहळ्याने घेतला. सकाळच्या काकड भजन, भुपाळ्या गाव वारकरी दिंडीत पंढरपुर जवळ आले या आनंदात झाप झाप चालतात. नऊच्या सुमारास साधुबोवांच्या ओढ्याजवळ विसाव्यासाठी सोहळा थांबतो. साधुबुवांच्या मंदिरात पालखी ठेवली जाते. बरड ते साधुबुवांचा ओढा हे तीन मैल अंतर आहे. प्रथेप्रमाणे येथे कुंभार गावकरांचे प्रवचन होते श्री साधुबोवा हे हैबतबाबांचे समकालीन हैबतबाबांनी सुरू केलेल्या या माऊली सोहळ्याबरोबर ते असत. त्यांच्या भक्तीने प्रभावित होऊन त्यांना हैबतबाबाने जेजुरी येथील सोहळ्यातील कीर्तन सेवा दिली. त्यांच्या घराण्यात आजपर्यंत ही कीर्तन सेवा परंपरेने सुरू आहे. त्यांनी दैनंदिन वाचनासाठी श्री तुकोबारायची गाथा हस्तलिखित प्रत केली होती. गावातील काही समाजकंटकांनी ही प्रत वांग नंदीत वैशाख वद्य ६ इ. स. १९७३ या दिवशी बुडविली. वैशाख वद्य १३ लामासे पकडणाऱ्या कोळ्याच्या जाळ्यात ती सापडली. एवढ्या दिवस पाण्यात राहून ती कोरडी होती. पोथी सापडल्यानंतर सव्वा महिन्यानी आषाढवद्य ४ सन १९७३ रोजी बरड मुक्कामी त्यांनी जाहीर केले' आपण उद्या श्री. माऊीसमोर देहसमर्पण करणार' त्याप्रमाणे आषाढ वद्य ५ रोजी सकाळी १० वा. भजनात दंग असताना देह त्याग केला. तो ओढा महादेवाचा ओढा म्हणून ओळखला जात होता त्यास 'साधुबोवाचा ओढा' हे नाव प्राप्त झाले. यांच्या समाधीवर माऊलींच्या पादुका आणल्या जातात. साधुबोवांच्या वंशाच्या हस्ते पादुका व समाधीतील अभिषेक केला जातो व वंशजाच्यावतीने प्रवचन केले जाते आणि दिंडीतील लोकांना अन्नदान केले जाते.'राजुरी' गावचे लोक वारकऱ्यांसाठी बाजरीच्या भाकरी, आमटी घेऊन येतात.येथे कॅनॉल असल्याने अनेक वारकरी येथे स्नान करतात व तापलेल्या उन्हात थंड

होतात.या मोठ्या विसाव्यानंतर पालखी सोहळा मार्गस्थ होऊन दुपारच्या नैवद्य व भोजनासाठी धर्मपुरी पाटबंधारे बंगला कॅनॉल येथे थांबते हे गाव कॅनाल गाव म्हणून प्रसिद्ध आहे.सोलापुरकरच्या वतीने उखळी तोफांची लोकांची सलामी देवून पालखी सोहळ्याचे स्वागत केले जाते. येथे सातारा जिल्ह्यातील पोलिस व प्रशासन यंत्रणेस निरोप दिला जातो. नीरा कॅनॉल येथे सोलापूर हद्द सुरू होते.दुपारच्या भोजनानंतर उन्हात सोहळा सुरू होतो. रस्त्यावरून बाजूचे डोंगरावरील शिखर शिंगणापुरचे प्रसिद्ध श्री महादेव मंदिराचे शिखर दिसते. या प्रसंगात सर्व दिंड्यामध्ये श्री शंभू महादेवाचे अभंग सुरू होतात.शिंगणापूर फाट्यावर पालखी सोहळा दुपारच्या विसावा साठी थांबतो अनेक वारकरी येथून महादेवाच्या दर्शनासाठी जात असतात. 'पानसरकरवाडी' येथे हा विसावा आटापल्यावर पालखी सोहळा मार्गस्थ होता कर्णा वाजविला जातो. सोहळा पुढील प्रवासाला सुरू होतो ठरलेल्या क्रमाने सर्व सुरू असते यात कोणताही खंड होत नाही. हा सर्व परिसर हिरवागर, शेतात पिक डोलताना वेगळाच सुखद आनंद मिळतो. सायंकाळी सातच्या सुमारास पालखी सोहळा नातेपुते येथील पालखी तळावर पोहचतो. समाज आरती, चोपदारांच्या सुचना होऊन सर्व वारकरी आपल्या मुक्कामाला पोहचतात.

रात्रीचे कीर्तन– डांगे गुंजाळ,

रात्रीचा जागर– पांडोबा बडबडे नांदेडकर.

## नातेपुते ते माळशिरस शुद्ध ६ – ११ मैल

प्रथेप्रमाणे काकडा पहाटे ३ ते ६, पालखी तळावर रोज होत असतो. धो–धो पाऊस पडत असला सर्वत्र चिखल असला तरी हा नित्यनेम दररोज होत असतो. नित्यनेम संपवून पालखी सोहळा उत्साहाने स. ६.३० वा. नातेपुते येथून माळशिरसकडे मार्गस्थ होतो. आजच्या दिवसांत सदाशिवनगर येथे दुपारचे पालखीचे सोहळ्यातील दुसरे रिंगण असते. हे रिंगण ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळ्यातील गोल रिंगण पहिले असल्याने वारकऱ्यामध्ये मोठा उत्साह असतो. यामुळे आजच्या दिवसाचा सकाळी विसावा न घेता मांडवी ओढ्यावर सकाळच्या न्याहारीसाठी सोहळा थांबतो. अनेक दिंड्याचा स्वयंपाक सकाळीच तयार झालेला असतो. तर काही दिंड्याचा चालू असतो. सकाळी पहाटे स्वयंपाक करणारे सर्व मंडळी या विसावावर पुढे येऊन स्वयंपाक करणारे सर्व मंडळी या विसावावर पुढे येऊन स्वयंपाक बनवत असतात. लवकरच भोजनासाठी सोहळा येथे पोचला असल्याने 'दिंडी बाहेरून चालणाऱ्या 'मोकळा समाज' मधील लोक स्नान–

कपडे धुण्यात गुंतलेले असतात. जिकडे–तिकडे पताका, मोटारी, फळे भाजी विक्रेते, खेळणी विक्रेते यांची गर्दी असते.येथे श्री माऊलींचा नैवेद्य, वाकऱ्यांचे भोजन व विश्रांती होते. यानंतर पालखी सोहळा सदाशिवनगर साखर कारखान्याकडे मार्गस्थ होतो. हा परिसर समृद्ध आहे. आंबा, पेरू, चिकूच्या बागा आणि ऊस– मळा ही पीके शेतात मोठ्या प्रमाणात दिसतात.दु १ वा. चौघडा गाडी, श्री माऊलींचा अश्व सदाशिवनगरला पोचतात त्यापाठोपाठ रथापुढील दिंड्या– १.४५ वा. श्री माऊलींचा पालखी रथ रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पोहचतो.सदाशिवनगर येथे श्रीशंकर सहकारी साखर कारखान्याने रिंगण सोहळ्यासाठी आखीव रेखीव प्रचंड मैदान तयार केलेले असते. चोपदार क्रमाने एकेक दिंड्या आत सोडतात.रिंगण पाहण्यासाठी दुरवरच्या गावातून पंचवीस हजारवर स्त्री–पुरुष मुले अगोदरच सदाशिव नगर येथे पोचलेले असतात.श्रीमाऊलींच्या पादुकांची विधिवत पुजा माजी सहकारमंत्री प्रतापसिंह मोहिते–पाटील यांच्या हस्ते पार पडली. अश्वांचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष धवलसिंह मोहिते–पाटील यांनी केले.रिंगण सोहळा संपल्यावर विसावा असतो. यानंतर सोहळा पुढे सरकतो. मैलावरच पुरंदरदास ओढा लागतो. येथे दुपारच्या दुसऱ्या विसावासाठी सोहळा थांबतो. येथे भारुडाचे कार्यक्रम अनेक दिंड्यामधे सुरू असतात. हा प्रवास मोठा असल्याने कमी वेळातच विसावा संपवून सोहळा मार्गस्थ होतो. वाटेत सरकारी व इतर पूजेमुळे वेळ जातो असतो. मुक्कामाचे ठिकाण 'माळशिरस' हे तालुक्याचे ठिकाण आहे. लोकवस्ती नागरी स्वरुपाची आहे. गावापासून पालखीतळ एक–दीड कि.मी. आहे. काही दिंड्या गावातच उतरतात. काही पालखीतळाजवळ असतात. आपल्या सोयीनुसार दिंड्या जागा निवडत असतात. रात्री ८ वा. सोहळा श्री पालखी तळावर पोचतो. ही तळाची जागा श्री जोशी परिवार यांनी श्री माऊली चरणी अर्पण केली. ती आता संस्थान कमिटी च्या मालकीची आहे समाज आरती होऊन वारकरी आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी पोचतात. माळशिरस येथील ओढ्याच्या काठी प्रसिद्ध मारुतीराय यांचे मंदिर आहे. येथे तुकोबाराय रंगलेले पाहून सर्व श्रोते निघुन गेले घोंगडीवाले फक्त श्रोते बसले होते. तुकोबाराय भजनातून जागे झाले. त्यांनी ओळखले हा श्रोता घोंगडीसाठी बसलेला आहे घोंगडी दिल्यावर तोही निघुन गेला. तेव्हा तुकोबाराय श्री मारुतीराय यांना म्हटले सर्व श्रोते गेले. आपण कशाला जागता. आपण सुखाने निद्रा घ्या. यानंतर मारुतीरायांनीही आपले मस्तक टेकून निद्रा घेण्यास डोके ठेवले. अशी आख्यायिका आहे.[१८]

## माळशिरस ते वेळापूर शु.७ –११ मैल

सर्व वारकरी भल्या पहाटे उठवून प्रात:कर्ते आटोपून सर्व साहित्य गाड्यामध्ये भरून आपल्या दिंड्याबरोबर स. ६.३० वा. सोहळ्यासाठी तयार असतात. कर्णा वाजला. माळशिरस येथून नातेपुतेकडे सोहळा ६.३० वाजता मार्गस्थ होतो रस्त्याच्या दुर्तफा चांगली झाडी आहे. वातावरण आल्हादायक असते माळशिरस परिसरात द्राक्षे, डाळींब, केळी, ऊस, शेवगा अशी पिके दिसतात. उत्साहाने अभंग गात पालखी सोहळा खडूस फाटा' येथे पोचतो स. ८.३० वा. येथे दुसरे गोल रिंगण होते. सुमारे दीड तास हे रिंगण असते. प्रचंड गर्दी येथे असते. येथे पुर्वी दुपारचे भोजन असायचे.येथे जवळच्या अनेक गावाहून लोक मुला–लेकरांसह नटून येत असतात गाडीच्या बैलांना उत्कृष्ट झुली घातलेली असतात शिंगांना शेंब्या, गळ्यात घुंगर माळ, पितळेच्या साखळ्या घालून रंगाने सजविलेले असतात. तसेच अनेक वाहने, गाड्या, टॅक्टर करून लोक श्री माऊली दर्शनासाठी येत असतात. या बाजूच्या गावांचा हाच मोठा उत्साह असतो.यानंतर पालखी सोहळा वेळापुरकडे मार्गस्थ होतो. थोड्या वेळात दुपारच्या भोजन व नैवद्यासाठी 'विंझोरी ज्ञानेश्वरनगर' येथे सोहळा थांबतो. परिसर बागायती हिरवा–गार आहे. बाजूला इको बोर्ड इंडस्ट्रिजचा गर्द झाडीने युक्त परिसर आहे. येथे बगॅस पासून ते इकोबोर्ड तयार केले जातात. यासाठी हे प्रसिद्ध आहे. उजव्या बाजूस काही अंतरावर ह.भ.प. श्री भाईनाथ महाराज या संतपुरुषाची सुंदर समाधी आहे. यांची समाधी सहकारमहर्षी शंकरराव मोहितेपाटील साखर कारखान्याचे चेअरमन श्री जयसिंह मोहिते पाटील व सौ. सुलक्षणादेवी यांनी बांधली. येथे दरवर्षी श्री गुरुपौर्णिमेला उत्सव असतो.

भोजनानंतर पालखी सोहळा 'धावाबावी' जवळ पोचतो. येथे उतार आहे. प्रत्येक दिंडीतील वारकरी स्त्री–पुरुष येथील उताराच्या रस्त्यावरून भान हरपून माऊली माऊली गरज करीत धावत आहेत. दिंड्या सोडण्याचे काम चोपदार करतात. रथापुढील दिंड्या संपल्यानंतर श्री माऊलीचा रथ धावत निघतो हा भव्य प्रसंग पाहण्यासाठी भाविक गर्दी करतात.येथे, तुका म्हणे धावा। आहे पंढरी विसावा। हे अभंगाचे शेवटचे चरण म्हटले जाते.धाव्यानंतर 'धावाबावी माऊंट' हा दुपारचा विसावा येतो. यानंतर थोड्याच अंतरावर पालखीतळ आहे. लवकरच पालखी सोहळा तळ्यावर पोहचतो.येथे मानचे दिंडी श्री शेडगेबाबा दिंडी यांचे 'भारुड' असते ते पाहण्यासाठी अनेक वारकरी, भाविक गर्दी करतात.वेळापूर–हे ऐतिहासिक, धार्मिक व पौराणिकदृष्ट्या महत्त्वाचे गाव आहे. काही उद्योग, कापडदुकान, ट्रॅव्हल एजन्सीज येथे आहेत. पुरातन मंदिरे, शिलालेख, तळघरे येथे आहेत.

महाभारत काळातील प्रसिद्ध राजा विराटराजाची 'एकचक्रानगरी' म्हणजेच वेळापूर होय. बकासुराचा वध भीमाने येथेच केला अशी आख्यायिका येते. पुर्वी शंकराचे महान उपासक शांडिल्य ऋषी तपश्चर्या येथे करीत होते त्यांनी येथे शंकराचे भव्य मंदिर उभारले. राजा रामदेव यादव यांचे प्रधान हेमाद्री यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. ते मंदिर अर्धनारी–नटेश्वर नावाने प्रसिद्ध आहे. या बांधकाम हेमांडपंती बांधकाम म्हणतात.श्री महालक्ष्मी अंबाबाई हे गावाच्या मध्यभागी मंदिर आहे. कांक्षिणी महाल (कलावंतीण नृत्य महाल) गावाच्या पूर्वेकडे ही वास्तू आहे. सिद्धनाथ मंदिर गावाच्या पुर्वेकडेच आहे. तसेच वेळापुर गावात पुरातन वस्तू संग्रहालय आहे.वेळापूर येथील पालखी तळावर मंडप व इलेक्ट्रिक दिव्यांची सोय 'ब्रह्नमहाराष्ट्र सिंडिकेट' चे कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे हे करीत असत. त्यांच्या पश्चात डायरेक्टर बोर्ड ही व्यवस्था करत आहे.[१९]

## वेळापूर ते भंडीशेगाव शु.८ –१२ मैल

सकाळी ठरलेल्या वेळेप्रमाणे श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळा सुरू झाला. भंडीशेगाव ला पालखी सोहळा मुक्कामाला पोचणार आहे. दोन दिवस सोहळ्याचे शिल्लक असल्याने वेगळाच आनंद वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर जाणवत असतो. सकाळी ८.३० वा. पालखी दिंडी सोहळा ठाकुरबुवांच्या समाधी मंदिराजवळ सोहळ्यातील 'तिसरे गोल' रिंगणासाठी पोहचतो. रिंगण कार्यक्रम ठरलेल्या नियमाने दिडतास चालते त्यानंतर तोंडले बोंडले येथे प्रवासात मोठा ओढा लागतो. त्यास नेहमी भरपूर पाणी असते. रिंगणानंतर अनेक वारकरी येथे स्नान करतात. पूर्वी येथे मुबलक दही व दूध येत असे म्हणून याला 'नंदाचा ओढा' असेही म्हणतात येथे श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री तुकाराम महाराज श्री सोपानदेव महाराज आणि विविध संतांच्या पालखी एकत्र येतात. जवळजवळ ८ लाख वारकरी येथे या दिवशी पोहचतात. या दिवसाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे या प्रवासात श्री माऊली व श्री सोपान देव या दोन्ही बंधुच्या पालखी भेट सोहळा' संपन्न होतो. 'टप्पा' येथे हा भेट सोहळा होते. हा प्रसंग पाहण्यासाठी भाविक प्रचंड गर्दी करतात. यानंतर सोपानदेव यांची पालखी पुढे जाते. त्यानंतर श्री माऊलींची पालखी शेगावकडे निघते. 'नंदाचा ओढा' येथून दोन वाजता पालखी शेगावकडे मार्गस्थ होत असते यानंतर 'सोपानदेव पालखी सोहळा भेट' होती. दोन्ही भावांचे रथ एकमेकांना खेटतात व विश्वस्त मंडळी दर्शन घेतात व श्रीफळाचे आदान–प्रदान करतात.टप्पा येथे प्रथम श्री तुकोबाराय यांची पालखी सोहळा 'पिराची

कुरोली' ग्रामपंचायतीच्या हद्दीतून पंढरपूर तालुक्यात प्रवेश करते. साडेचार वाजता श्री माऊलींचा सोहळा पोहचतो तोफांची सलामी व आतषबाजी करून स्वागत केले जाते यानंतर श्री सोपानदेव पालखी सोहळा येतो. ५ वा. भेटीचा सोहळा होतो मोठा जयघोष येथे होतो. एकच आनंद वाकऱ्यामधे असतो श्री सोपान काका सोहळा संपल्यानंतर श्री माऊली सोहळा येथुन मार्गस्थ होतो. वारकरी उत्साहाने झपाझपा पाऊले टाकीत संध्याकाळी ६.३० वा. पालखी सोहळा भंडीशेगावला पोहचतो. या दिवसापर्यंत भाविक लोकांची सोहळ्यातील संख्या प्रचंड वाढलेली असते. दोन, तीन दिवस आषाढीवारी साठी शिल्लक असल्याने पालखी सोहळ्यात ही संख्या वाढते हे गाव लहान आहे पाऊस जर आला तर वारकऱ्यांची प्रचंड गैरसोय होते. बऱ्याच वेळा हा अनुभव वाकऱ्यांना वारीत अनुभवास येतो परंतु या वारीच्या आनंदात त्यांना पाऊस, वारा' याचा विसर पडतो. गैरसोय असताना त्यात ते आनंदच मानतात. हे विशेष आहे. या संदर्भात कोणाकडेही कोणतेही तक्रार वारकरी करत नाही.''पिराची कुरोलीत टप्प्याजवळ संत ज्ञानेश्वर आणि संत सोपान देव यांचे रथ शेजारी उभे केले त्यावेळी पालखी सोहळाप्रमुख ''डॉ. शिवाजी मोहिते आणि गोपाळ गोसावी, संत तुकाराम पालखी सोहळा, प्रमुख यांनी एकमेकांना अलिंगण देत नारळप्रसाद दिला. बंधुभेटीच्या प्रसंगाने अवघा सोहळा गहिवरून गेला. [२०]

## भंडी शेगाव ते वाखरी शु.९ – ६ मैल

आषाढ शुद्ध नवमी यादिवशी सकाळी ९ वाजता श्री माऊलीची पूजा, आरती व नैवेद्य असतो.दुपारी १२ वा. पालखी सोहळा वाखरीकडे मार्गस्थ होतो. वारी सोहळ्यातील हा आजच शेवटचा मुक्काम वाटचालीत आहे. वारकऱ्यांची आतुरता वाढलेली असते वाटचालीत कमी अंतरचा हा टप्पा असल्याने पालखी सोहळा दुपारी मार्गस्थ होतो. सकाळी कीर्तन, प्रवचनाचे कार्यक्रम सर्व दिंड्यामध्ये व पालखी तळावर पार पडतात.सोहळा मार्गस्थ होताच पहिली भजनी मालिका सुरू असतानाच एक–दिड तासच्या प्रवासात उभे रिंगणासाठी सोहळा भांबतो. दोन्ही अश्व अगोदर वेगाने धावतात. दोन्ही बाजूला रस्त्याला वारकरी टाळ, मृदंगच्या तालावर नामघोष करत असतात.रिंगण संपते सोहळा मार्गस्थ होतो. दुपारी ३ वा. सुमारास बाजीराव विहीहीजवळ श्री माऊलीचा सोहळा शेवटच्या रिंगणासाठी थांबतो. पालखी सोहळ्यातील सर्वात मोठे गोलरिंगण येथे असते. वाखरीजवळ हे रिंगण भरते. महाराष्ट्रातील अनेक भाविक हे रिंगण पाहण्यासाठी मोठी गर्दी करतात. पंढरपुरहून लाखो भाविक येथे पोहचतात. अफाट जमाव येथे गोळा होतो. सर्वात मोठा

सोहळा येथे पार पडतो. वारकऱ्यांचे विराट रुप येथे पहावयास मिळते.चोपदार एकेका दिंडीस रिंगणासाठी प्रवेश देतात. रिंगण लावून घेतले जाते. श्री माऊलींच्या व स्वाराच्या अश्वांनी नेत्रदीपक दौड करीत तीन फेऱ्या पुर्ण करतात व प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. जनसमुदाय माऊली– माऊलीचा जयघोष करत असतात शेवटचे रिंगण असल्यामुळे वारकरी उडीच्या खेळासाठी सरसावून उठतात, अभंगात, पाऊले खेळण्याचा, नाचण्याचा, फुगड्यांचा मनमुराद आनंद लुटतात. कोणतेही पर्वा येथे वारकरी करत नाही त्यांना कपडे, वयाचे, सभोवरच्या जनसमूहाचे भान नसते ते आत्मसुखातच रमलेले असतात.सर्व स्तराचे लोक, श्रीमंत, गरीब, मालक–सेवक, श्री पुरुष जात–पात वगैरे भेदभाव कोठेही दिसत नाही. सर्व विसरून मुखात माऊली, माऊली हाच शब्द असतो खऱ्या अर्थाने हा सोहळा एकात्मतेची कार्यशाळा आहे.रिंगण संपल्यावर सायंकाळी ७.०० पर्यंत पालखी सोहळा तळावर पोहचतो. वाखरीतळावर अनेक पालखी सोहळ्यातील शेकडो दिंड्या मुक्कामास असतात. महाराष्ट्रातील प्रमुख सर्व संतांच्या पालखी दिंडी सोहळा या दिवसीअसा शु दशमीला 'वाखरी येथे मुक्कामाला असतात. त्यामुहे हा तळ फार महत्त्वाचा आहे. येथे पंढरपूर नगरपालिकेने पाण्याची फार चांगली सोय केलेली असते. शासनाकडून येथे विशेष व्यवस्था केलेली असते. येथे प्रत्येक दिंड्याचे मुक्कामतळ पुर्वापार ठरलेले असतात. ज्या दिंड्यांना नंबर नाही त्यांनी शिवारात इतरत्र सोईनुसार आपली मुक्काम व्यवस्था करावी लागते. दिंडी शिवाय 'मोकळा समाज' यात्रेकरू म्हणजे ज्यांनी दिंडीत प्रवेश घेतलेला नाही. अशा लोकांची सोय नसल्यास रात्रीच ते पंढरपुरामध्ये मुक्कामास जातात. व दुसऱ्या दिवशी अनेक लोक सकाळी पुन्हा वाखरीला येतात.

## वाखरी ते पंढरपुर– आषाढ शु. १० –४ मैल

श्री माऊली पालखी सोहळा व इतर सर्वच पालखी सोहळ्याच्या वाटचालीत हा शेवटचा दिवस. सर्वत्र जनसागर उसळलेला असतो. पहावे तिकडे पतकांचे भार, टाळ–मृदंगांची धुमाळी श्रीहरिनामाचा जयघोष, वाकऱ्यांची दाले आहे. वारकरी संप्रदायाचे खरे वैभव येथे पहावयास मिळते. १८ दिवसांचा पायी प्रवास करीत या आनंद सोहळ्यात महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र, मध्यप्रदेश, गोवा, गुजरात या प्रांतातील वारकरी दाखल झाले होते.सकाळी श्री माऊली पालखी समोर श्री धोंडोपंत दादा फडाच्या वतीने कीर्तन होते. सकाळी दहाच्या सुमारास श्री पालखीतळावर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी झाली. यानंतर नैवेद्य, श्री माऊलीची आरती होते. वारकऱ्यांचे भोजन

होतात. दुपारी दोनच्या सुमारास श्री माऊली पालखी सोहळा वाखरीतून क्षेत्र पंढरपुराकडे मार्गस्थ होतो वाखरीचा ओढा ओलांडल्यावर परंपरेप्रमाणे श्री माऊलींची पालखी श्री. भाटे यांच्या रथात ठेवण्यात आली. हा रथ ओढण्याचा मान वडार समाजाला असतो. माऊली–माऊलीचा गरज करीत 'वीसबावी' जवळील मंदिरांपर्यंत रथ ओढीत नेला जातो. येथे शेवटचे उभे तिसरे रिंगण असते चोपदार रिंगण लावतात. परंपरेप्रमाणे हे रिंगण होते. श्री विठ्ठल व श्री माऊलीची आरती होते.श्री ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा मालक श्री. आरफळकर यांनी श्री माऊली पादुका रथातून काढून श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरदार यांच्या गळ्यात दिल्या जातात व पादुकांचा दुसरा जोड पालखीत ठेवण्यात येतो. ही परंपरा आहे. शितोळा सरकारच्या मदतीने हा सोहळा अगोदर सुरू झाल्याने त्यांना हा मान असतो शितोळे सरदार यांनी श्री माऊलींच्या पादुका नाथ चौकातील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरात आणल्या. येथे समाज आरती होते श्री शितोळे यांच्या गळ्यातील पादुका काढल्या जातात. यानंतर शितोळे व मानकऱ्यांना श्री आरफळकर यांचे मार्फत मानाचे श्रीफळ देण्यात येते. पंढरपूरपर्यंतचा सोहळा संपन्न होतो. व सर्व वारकरी असे म्हणतात.

''पावलो पंढरी वैकुंठ भुवन। धन्य आजि दिन सोनियाचा।।''

पंढरपूरहून संत नामदेवरायांची पालखी या सोहळ्याला सामोरी आलेली असते. त्यानंतर सर्व पालख्या ठरलेल्या क्रमाने वाखरीतून ठरवलेल्या वेळेनुसार पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. संत तुकाराम महाराज पालखी, संत एकनाथ महाराज पालखी, संत निवृत्ती महाराज पालखी, संत सोपानकाका, संत मुक्ताबाई व यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी असते.[२१]

सन २०११ मध्ये संतश्रेष्ठ पालखी सोहळा जेष्ठ कृ. ८ शुक्रवार दि. २४.६.११ प्रस्थान आळंदी ते आषाढ शु. १० रवि. दि. १०.७.११ क्षेत्र पंढरपूर हा कालखंड होता– एकूण १७ दिवस वाटचालीचा कालखंड होता. सन २०१३ मध्ये जेष्ठ वद्य ८ रविवार दि. ३० जून २०१३ ते आषाढ शुध्द १० गुरूवार, १८.७.२०१३ असे एकूण १९ दिवस पाणी प्रवास क्षेत्र आळंदी ते पंढरपूर आषाढी वारी दिंडी सोहळा होता. [२२]सन २०१५ मध्ये मिती अधिक आषाढ वदय ८, ९/०७/२०१५ गुरूवार प्रस्थान रात्री ९ क्षेत्र आळंदी, ते निज आषाढ शुध्द १०, २६/०७/२०१५ क्षेत्र पंढरपूर एकूण १८ दिवस पायी प्रवास–आषाढी वारी पालखी सोहळा कार्यक्रम आहे. ब्रिटीश काळात पंढरपूरला यात्रेकरूंना पोचण्यासाठी रेल्वेची सुविधा सुरू झाली होती. यात्रेकरूंना प्रवासात उतारूंच्या डब्याऐवजी मालडब्यात बसूनच प्रवास करावा लागत असे.[२३]

पहिली दिंडी ही आळंदीहून या देहूतून पंढरपूरकडे न जाता संत नामदेवांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानदेवांच्या समाधी सोहळयाच्या वेळी पंढरपूरहून आळंदीत आली.

## ५.५ दिंडी प्रवासातील रिंगण

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी दिंडी सोहळयात परंपरेनुसार वाटचालीत 'रिंगण' हा वेगळा सोहळा पार पडत असतो.या वाटचालीत एकूण '७ रिंगण' असतात. यापैकी गोलरिंगण– सदाशिव नगर–येथे १ ले रिंगण,

- खुडूसफाटा येथे २ रे रिंगण
- ठाकुरबुवांची समाधी ३ रे रिंगण
- बाजीराव विहीर– वारकरी– ४ थे रिंगण
- उभे रिंगण– चांदोबाचा लिंब– १ ले रिंगण
- बाजीराव विहीर– २ रे रिंगण
- वाखरी, पादुकाजवळ– ३ रे रिंगण
- उभे रिंगण–

श्री चोपदार मा.श्री. राजाभाऊ चोपदार, बाळासाहेब चोपदार सेवेकरी आणि स्वयंसेवक सर्व दिंडया रस्त्याच्या दोन्ही बाजूस उभ्या केल्या जातात. भजनाचा जोर टाळ–मृदंगाच्या आवाजात गगणात भिडणारा असतो. वासुदेवाला खांद्यावर घेऊन वारकरी नाचत असतात.यावेळी रथावर चढून ललकारी देत श्री चोपदार हातातील चोप वर करतात. तत्क्षणी सर्व दिंडया एकदम शांत होतात. हे स्वयंशिस्तेचा प्रकार आहे चोपदारचा इशारा झाल्यावर समोरच्या टोकाकडून श्री माऊलींचा अश्व व स्वाराचा अश्व दिंडयामधून ठेवलेल्या रस्त्यावरून वेगाने दौडत निघतात सोहळयाच्या मागच्या एकापर्यंत जातात आणि परत माघारी येतात श्री पालखी रथाजवळ येऊन श्रीपादुकांना मान वाकवून नमस्कार करतात. यानंतर अश्वांना डाळ, गूळ व खारीक देऊन त्यांच्या गळयात पुष्पहार घालतात. यानंतर पुन्हा वेगाने ते समोर दौडतात. यानंतर टाळमृदंग वाजतात. भाविक श्री माऊली, माऊली .... नामाचा गजर करतात. यानंतर वारकरी, भाविक अश्वांचा टापाखालची माती कपाळी लावण्यासाठी झुंबड उठते. यानंतर वारकरी जल्लोषात फुगडया, कोंबडा खेळतात व विसावा घेतात.

## ५.६ वाखरी येथील भव्य गोल रिंगण :–

रिंगण सोहळयासाठी आखीव रेखीव प्रचंड मैदान तयार केलेले असते. चोपदार एक एक दिंडया आत सोडतात. एकूण क्रमांकाच्या १०० दिंडया आत सोडतात. श्री माऊलीची पालखी मध्ये ठेवलेली असते. १०० पेक्षा जास्त दिंडयांना जागेअभावी प्रवेश दिला जात नाही. 'वाखरी' येथील गोल रिंगणात सर्व नंबरच्या दिंडया आत येतात. सर्व दिंडया गोलाकार उभे करतात. दिंडयांच्या बाहेरून अश्व धावण्यासाठी चाळीस फूट रूंदीचा वर्तुळकार जागा ठेवून त्या बाहेर इतर वारकरी व प्रक्षेक वर्तुळकार उभे असतात. सर्व दिंडयाचे भजन रंगात येते ज्ञानदेव तुकाराम भजन करत मोकळया जागेतुन धावत वारकरी रिंगण पुर्ण करतात. यानंतर श्री माऊलींच्या पादुकांची विधिवत पूजा होते उपस्थित मान्यवरच्या हस्ते पूजा होते. श्री भोपळे दिंडींचा जरी पटका ध्वज घेऊन मानकऱ्यांनी तीन प्रदक्षणा पूर्ण करतात. चोपदार माऊलीचा अश्व, रिंगणात फिरवतात. दोन्ही अश्व रिंगणात दौडना साठी सज्ज होतात. चोपदारानी चोप उचलतात सर्व वारकरी शांत होतात. इशाऱ्या बरोबर डोळयाचे पाते लवतेन लवते तोच स्वराचा अश्व चौखूर उधळला. त्या पाठोपाठ श्री माऊलींचा अश्व रिंगणात धावू लागला. [२४] यावेळी सर्वत्र भजनाचा जोर वाढला जातो पताका उंचवल्या जातात. वारकरी, भाविक, उपस्थित सर्व माऊली माऊली जयघोष करीत असतात. दोन्ही अश्व तीन प्रदक्षिणा पूर्ण करतात. दोन्ही अश्व श्री माऊलींचे दर्शनास जातात. वाकून माऊलींना नमन करतात.यानंतर वारकरी 'उडीचा खेळ' फुगडी, बसफुगडी, कुरघोडी, अमृतमंथन, मनोरे, हुतूतू असे खेळ खेळतात. टाळा–मृदूंगाच्या तालावर वारकरी वेगवेगळया पध्दतीने लयीत नाचतात. चोपदारांचे निमंत्रण येते. हजारो टाळकरी, शेकडो पखवाज, वादक शेकडो वीणेकरी श्री माऊलींच्या सभोवार गोलकार उभे राहतात. उभे राहून, बसून पाठीवर झोपून टाळकरी टाळाचा गजर एका तालावर करीत असतात. उभे राहून मागे पुढे झेपावत गिरक्या घेत, बैठक मारीत भजन करतात. 'नाद ब्रम्हाचा खेळ' रंगला जातो यानंतर शेकडो वारकरी धावुन माऊलींना प्रदक्षिणा घालतात.

अश्व दौडले रिंगणी । होता टाळ–मृदंगाचा ध्वनी ।
माऊलीच्या जयघोसे । गेले रिंगण रंगुनी ।।
रिंगण संपते वारकरी विसावा घेतात.

श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर म. आषाढी वारी दिंडी–पालखी सोहळ्यातील सर्वांना मोठे गोल रिंगण बाजीराव विहीर वाखरी येथे भरले जाते. महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरून आलेले लाखो वारकरी या रिंगणात सहभागी होतात. पालखी सोहळा परंपरेनुसार हे 'गोल रिंगण' दरवर्षी आयोजित केले जाते.

**रिंगण वेळापत्रक**

| अ.नं. | तिथी | ठिकाण | वेळ | प्रकार | रस्त्याची बाजू |
|---|---|---|---|---|---|
| १. | आषाढ शु.२ | चांदोबाचा लिंब | दुपारी | उभे | -- |
| २. | आषाढ शु.६ | सदाशिव गड | दुपारी | गोल | उजवी बाजू |
| ३. | आषाढ शु.७ | खुडस फाटा | सकाळी | गोल | डावी बाजू |
| ४. | आषाढ शु.८ | ठाकुरबुवा समाधी | सकाळी | गोल | उजवी बाजू |
| ५. | आषाढ शु.९ | बाजीराव विहीर | दुपारी | उभे व गोल | डावी बाजू |
| ६. | आषाढ शु.१० | पादुका (पंढरपूर) | दुपारी | उभे | -- |

## ५.७ परतीचा प्रवास :–

### संत तुकाराम महाराज पालखी परतीचा प्रवास

### संत तुकाराम महाराज पालखी सोहळा

| तिथी | निघण्याचे ठिकाण | दुपारचा मुक्काम | पालखी मुक्काम |
|---|---|---|---|
| आषाढ शु.१५ | पंढरपूर | पंढरपूर | वाखरी |
| आषाढ कृ. १ | वाखरी | तोंडले बोंडले | म्हाळुंगे माकडाचे |
| आषाढ कृ. २/३ | म्हाळुंगे माकडाचे | माळीनगर | वडापुरी |
| आषाढ कृ. ४ | वडापुरी | निमगाव केतकी | लासुर्णे |
| आषाढ कृ. ५ | लासुर्णे | काटेवाडी, साखर कारखाना | बऱ्हाणपूर |
| आषाढ कृ.६ | बऱ्हाणपूर | वासुंदे | वरवंड |
| आषाढ कृ.७ | वरवंड | यवत, भैरवनाथ मंदीर | उरळी कांचन |
| आषाढ कृ.८ | उरळीकांचन | वाकवस्ती | हडपसर |
| आषाढ कृ.९ | हडपसर | जुनी मंडई गणेश मंदिर पुणे | नवी पेठ मंदिर पुणे |
| आषाढ कृ.१० | नवीपेठ, विठ्ठलमंदिर | पोलीस हेडक्वार्टर | पिंपरीगाव |
| आषाढ कृ.११ | पिंपरी गांव | चिंचवड, रेल्वेस्टेशन | श्रीक्षेत्र देहूगाव |

दरवर्षी या तिथी प्रमाणे परतीचा प्रवास संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा असतो. तिथीचा क्षय झाल्यास दिवस कमी होतात.

### माऊली पालखी सोहळा परती प्रवास :–

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पंढरपूरात दशमीला पोहचतो. एकादशीला स. सर्व दिंडी नगर प्रदक्षिणा करतात. दिवसभराचा उपवास वारकरी करतात. दुसऱ्या दिवशी द्वादशीला पारणे सोडतात. अनेक वारकरी, भाविक याच दिवशी आपल्या गावाकडे परतात. काही पोर्णिमेच्या काल्यापर्यंत राहतात नंतर आपल्या गावाकडे परतात. आषाढी एकादशीस ‘देवशयानी’ व कार्तिकी एकदशीस ‘प्रबोधिनी’ एकादशी म्हणतात. या दोन एकादशी मध्ये ४ महिने काळ असतो.

पौर्णिमेचा काला, गोपाळपुरात पार पाडला जातो. श्रीमाऊलीचा नैवेदय देवळात जातो. दुपारी चार वाजता श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी पंढरपूरहून क्षेत्र आळंदीकडे परतीच्या प्रवासाला निघते. परतीचा प्रवास म्हणजे श्री माऊलीस पंढरपूराहून आळंदीस पोहोच करणे होय.पंढरपूरात जकात नाक्याजवळ श्री. शितोळे सरकार यांचे अश्व आणि पंढरपूर मधील महाराज मंडळी निरोप देण्यासाठी येत असतात. तेथे मानकरी व पंढरपूरातील महाराज मंडळींना मानाचे श्रीफळ दिले जाते.परतीच्या वारीत श्री पालखी सोहळयातील दिंडयांचे सुमारे २५० वीणेकरी, टाळकरी, मृदंगवादक, काही इतर भाविक असे सुमारे एकदीड हजार वारकरी सहभागी होतात.'नीरा' येथे श्री हैबतबाबांच्या वंशांच्या वतीने श्री माऊलींच्या पादुकांना स्नान घालण्यात येते. पुण्यात पालखीचा मुक्काम दोन दिवस असतो. या प्रवासात श्री संतज्ञानेश्वर महाराज व्यवस्थान च्या वतीने श्री माऊलींना नैवदय केला जातो. तसेच वाखरी ते क्षेत्र सासवड या वाटचालीत कल्याण येथील श्री. सखाराम भोईर यांच्या मार्फत सन २००४ पासून वारकऱ्यांची दोन्ही वेळची पूर्ण भोजन व्यवस्था केली जाते. पहाटेच्या विसाव्याच्या वेळी गावोगावाचे ग्रामस्थ वारकाऱ्यांच्या चहा-फराळाची व्यवस्था करत असतात. पंढरपूर ते आळंदी हे आंतर परतीच्या प्रवासात वारकरी पालखीसह दहा दिवसात पायी चालत पूर्ण करतात. दररोज पायी वाटचालीत सरासरी ३० ते ३५ कि.मी. प्रवास करतात. पहाटे २ ते सकाळी ११ आणि दुपारी २ ते सायंकाळी ६ वा. असा पायी प्रवास करतात. सकाळी ११ ते २ वा. आणि सायंकाळी ६ ते पहाटे २ वा. यावेळेत विश्रांती घेतात. पहाटे ४ वा. पालखी पहिल्या विसाव्यास थांबते. तेथे वारकरी चहा घेतात. दुसरा विसावा सकाळी ६ ते ६.३० वा. असतो यावेळी श्री माऊलींना ना पवमान अभिषेक सकाळी ७ च्या दरम्यान न्याहारी विसावा. सकाळी १० च्या दरम्यान श्रीमाऊलींना नैवेदय व वारकऱ्यांना भोजन. सायं. ६ वा. पालखी मुक्कामास थांबते. येथे वारकरी नैमित्तिक भजन व रात्री ग्रामस्ता तर्फे जागर असतो.

**परती प्रवास वाटचाल-**

| | | |
|---|---|---|
| १. | पंढरपूर ते वारकरी | ०६.७ कि.मी. |
| २. | वाखरी ते वेळापूर | २४.३ कि.मी. |
| ३. | वेळापूर ते नातेपुते | ३५.९ कि.मी |
| ४. | नातेपुते ते फलटण | ३८.९ कि.मी. |
| ५. | फलटण ते पाडेगाव | ३५.० कि.मी. |

६. पाडेगाव ते वाल्हे १६.० कि.मी.

७. वाल्हे ते सासवड ३१.८ कीर्तन चोपदार सोपवतात.

८. सासवड ते हडपसर २१.५

९. हडपसर ते पुणे ०८.२ जागर, खडकतकर, कीर्तन–शेडगे पंच मंडळ ४/ शेडगेपंच ३

१०. पुणे–ते आळंदी देवाची २५.०

आषाढ वदय दशमीला श्री माऊलींची पालखी आळंदीत धाकटया पादुकावर पोचते यावेळी पंरपरा अशी आहे. चोपदार आळंदीमध्ये चक्रांकित महाराजांना निरोप पाठवितात. आळंदीत श्रीमाऊजींच्या आगमनाची दवंडी दिली जाते. श्री चक्रांकित महाराज आळंदीहून श्रीमाऊलींना आणण्यासाठी आळंदीकरासह दिंडी घेऊन सामोरे जातात. तेथे सीमेवर दहीभाताचा नैवेदय श्रीमाऊलींना दाखवून आरती केली जाते. नंतर पालखी सोहळा आळंदीकडे निघतो. श्रीराम मंदीर, श्रीविष्णु मंदिर, श्रीहरिहरेंद्र स्वामी मठ येथे आरतीहून पालखी महाद्वाराने मंदिरात प्रवेश करते. दुसरे दिवशी एकादशीला नगर प्रदक्षिणा होऊन हजेरी मारूतीजवळ सर्व दिंडया हजेरी देऊन श्री. नाईक यांचे वतीने सर्वांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. नंतर श्रीमाऊली पादुका समाधी मंदीरात ठेवतात आरती होते. एकूण ३२ दिवसाचा हा पालखी सोहळा पुर्ण होतो. ‘आषाढी वारी साठी पंढरपूरला पोहचणाऱ्या एकूण नोंदणीकृत दिंडया सुमारे ०२ लाख आहेत. [२५]

## ५.८ पालखी सोहळयातील आर्थिक स्थिती–

संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी दिंडी सोहळा क्षेत्र आळंदी ते पंढरपूर संत तुकाराम महाराज आषाढी दिंडी पालखी सोहळा व महाराष्ट्रातील इतर दिंडी पालखी सोहळे या माध्यमातून लाखो वारकरी पायी प्रवास करत पंढरपूरला आषाढी एकादशी यात्रे करीता पोहचतात.या वेगवेगळया प्रवास दिवसात प्रत्येक दिंडयातील वारकरी पंढरपूर पर्यंत पोहचे पर्यत खर्च करत असतो. यामध्ये प्रत्येक दिंडया मध्ये प्रवेश फी ‘भिसी’ भरावी लागते. काही दिंडयामध्ये अशी भिसी घेतली जात नाही. क्षेत्र आळंदी, क्षेत्र देहू येथुन जाणाऱ्या बहुतेक सर्व दिंडया मध्ये वारकऱ्याकडून सहभाग फी घेतली जाते रू.१०००/–, ११०० ते २०००/– ही भिसी म्हणुन आकारले जातात. या गोळा होणाऱ्या रक्कमेतून दिंडी मालक, दिंडी चालक रोजच्या दिवस क्रमातील सकाळचा नाष्टा, दुपारचे, रात्रीचे भोजन, राहण्याची व्यवस्था याचा खर्च भागवला जातो उर्वरीत रक्कम दिंडी

मालक, ट्रस्टला शिल्लक राहते. तसेच स्वतंत्र मालकीच्या असणाऱ्या दिंडयांची उर्वरीत रक्कम त्या मालकाला राहते. दिंडयामध्ये नाष्टा , जेवन , तसेच मालवाहतुकीचे ट्रक, वाहने यासाठी खर्च होत असातो. ही व्यवस्था पाहण्यासाठी आवश्यक असणारे अनेक लोक दिंडयामध्ये असतात. यांना रोजगार देखील उपलब्ध होतो. मोठया दिंडयामध्ये ३००० ते ३५०० पर्यंत सहभागी वारकरी भाविक असतात. लहानात लहान दिंडी मध्ये साधरणतः १०० ते ५०० पर्यंत भाविक सहभागी असतात. या दोन्ही सोहळयात नोंदणीकृत दिंडया २०० पर्यंत आहेत व नोंदणी नसलेल्या इतर २०० दिंडया असतात.सन २०१४ साली क्षेत्र आळंदी ते पंढरपूर माऊली च्या पायीवारी बरोबर १८४ वा सोहळा व ४०० दिंडया सहभागी होत्या. तर संत तुकाराम महाराज पायीवारी दिंडी सोहळयात ३२९ सोहळा म्हणून ३२९ दिंडया सहभागी होत्या. या सर्व दिंडया विचारात घेऊन जमा होणारी एकूण रक्कम काही कोटी संख्येत असेल. याशिवाय हॉटेल्स, चहापानी खर्च रोजचा होणारा खर्च या सोहळयातील सहभागी वारकऱ्यांचा खर्च, एकूण प्रचंड मोठी रक्कम होईल.लाखोंच्या संख्येने पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांच्या रोजच्या व्यवस्थेत प्रचंड रोजगार उपलब्ध होत असतो. चहापानाच्या अनेक गाडया सोहळयात स्वतंत्र छोटे दुकाने, इतर वस्तुची दुकाने यांची छोटी छोटी हजारो दुकाने सोहळयाबरोबर असतात. वर्ष भराची कमाई ते या सोहळयात करत असतात.

**खेळणी व्रिकी–**

जालना जिल्हयातील 'पाडोळी' गाव तलावामुळे पाण्याखाली गेले. शासनाकडून मदत मिळाली.येथील काही लोक वारीला आले पाहिले वर्ष त्यांनी सोहळा पाहिला. मुक्काम विसावा यासंबंधी कल्पना आली आणि विचार केला. खेळणी विक्रीचा व्यवसाय चांगला चालेल पुढील वर्षी या लोकांनी बाबूंच्या कामठयांना रंगीत कागद लावून आकर्षक तलवारी लगोऱ्या, गदा, वाजवण्याच्या वस्तु स्वतःघरी तयार करून वारीच्या प्रवासात धावाधाव करून विक्री सुरू केली. 'पाडोळी' गावातील प्रत्येक घरातील किमान दोन गाडे खेळणी विक्रीसाठी येतात आणि चांगले उत्पन्न मिळते. असे अनेक व्यावसायिक वारी सोहळयाबरोबर असतात व उत्पन्न मिळवतात. साधारणातः मोठी दिंडीतील  सहभागी वारकारी, भाविक यांच्याकडील जमा होणारी भिसी रक्कम २० लाख रूपर्यांत पर्यत असते. लहानात लहान दिंडीत रक्कम साधारणतः १ लाख ते ५ लाखापर्यंत असते. सर्व दिंडया मिळून एकूण जमा रक्कम अंदाजे अब्जापर्यंत असेल.एवढा आर्थिक

व्यवहार या सोहळया दरम्यान होत असतो. ही आर्थिक उलाढाल रोजगारच्या दृष्टीने मोठी मानली जाते. पंढरपूरात १७ ते १८ लाख भाविक आषाढी एकादशीला जमा झालेले असतात.सन २०१५ च्या लोकमत, हॅलो सोलापूरच्या आकडेवारी नुसार दररोज ५० ते ७५ हजार लाडू प्रसादासाठी बनवले जातात. किंमत ५ रू. २०० टन केळीची आवक, ५ लाख लिटर दूध, चुरमुरे व बत्ताशांची ८० लाखाची उलाढाल सन २०१२ ला, ११० टन माल, २०१३ ला ८० ते ९० टन, २०१४ ला ७० टन, २०१५ ला ५० टन अशी विक्री होत असते.[२६] १०० गाडया या विक्रीसाठी पंढरपूरात येतात. प्रचंड मोठी आर्थिक उलाढाल आषाढी वारी सोहळयाच्या दरम्यान होते.'सोहळया' दरम्यान होणाऱ्या अस्वच्छेतचा प्रश्न गंभीर असतो यासाठी चोपदार फाऊंडेशन, अनेक स्वयं संस्था स्वच्छता मोहिम हातात घेतात. चोपदार फाउंडेशनच्या वतीने स्वच्छतावारी अभियान अंतर्गत आषाढी वारी सोहळया मध्ये कचरा गोळा करण्यासाठी ४७ हजार पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पालखी तळावर पालखी गेल्यानंतर स्वच्छता करण्यात येते. ७० स्वयंसेवकाच्या मदतीने स्वच्छता मोहिम व एसएमएस सेवा संदेश दिला जातो.

## सारांश

भारत देशातील सर्वात मोठा पायी दिंडी पालखी सोहळा म्हणुन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा श्रीक्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर हा मानला जातो. महाराष्ट्रातील अनेक दिंडी सोहळयापैकी या दिंडी सोहळयात सर्वात जास्त भावीक व वारकरी सहभागी होतात. हा पालखी सोहळा श्री हैभतबाबा आरफळकर यांनी सुरू केला असुन दिवसेंदिवस या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांची व वारकऱ्यांची संख्या वाढत आहे. एवढा मोठा हा दिंडी सोहळा अतिशय शिस्तबध्द पद्धतीने १८ दिवस वाटचाल करत आषाढ शुध्द  १० ला पंढरीस पोहचतो. तर आषाढ शुध्द ११ ली पंढरपूर येथे फार मोठी यात्रा भरते व त्यात काही लाखो भाविक व वारकरी सहभागी होतात.

# संदर्भ


१. दै. लोकमत हॅलो पुणे जिल्हा, सोमवार १ जुलै २०१३ पृ. ८

२. कै. स. के. नेउरगावकर, पालखी सोहळा, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी देवाची, २३ जुन २०११ शासकीय पुरालेखागार (पेशवेदत्त) पुणे रूमालसूमारी, ५६ पृ ८

३. मुलाखत, पालखी सोहळा प्रमुख संत ज्ञानेश्वर म. पालखी सोहळा आळंदी
१० जून २०१५

४. श्री. के. एन देसाई संत संग देर सदा, सौ. मंगल के. देसाई, कराड,
३०/०६/२०१३ पृ. ३२

५. कित्ता, पान नं. ३४

६. मुलाखत, चोपदार पालखी सोहळा संत ज्ञानेश्वर म. पालखी सोहळा, आळंदी
११ जून २०१५

७. श्री. के. एन देसाई संत संग देई सदा, कराड, २०१३ पृ.५१

८. दै. लोकमत पुणे, मंगळवार २ जुलै २०१३ पृ. ८

९. दै. लोकमत पुणे, सोमवार १ जुलै २०१३ पृ. ८

१० कार्यक्रम पत्रिका ,संत ज्ञानेश्वर म. संस्थान पालखी सोहळा

११ वारकरी शिक्षण संस्था, भजनी मालीका,२०११ आळंदी देवाची पृ. १५६ अभंग क्र ४४१

१२ कित्ता पान क्र १५६ अभंग क्र ४४०

१३ दै. सकाळ, पुणे, बुधवार, ३ जुलै २०१४ पृ. ४

१४ दै. लोकमत पुणे, रविवार २२ जुन २०१४ पृ. २

१५ श्री. के. एन देसाई संत संग देई सदा, कराड, २०१३ पृ. ८६

१६ संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी वारी पालखी सोहळा कार्यक्रम पत्रिका, ज्ञा.म. संस्थान आळंदी देवाची

१७ ह.भ.प. गोविंदमहाराज केंद्रे संस्था, दिंडी नंबर ४३ रथामागे, कार्यक्रम पत्रिका

१८ महीपतीकृत ओवीबध्द , तुकाराम चरित्र, का.अ. जोशी पुणे

१९ कै. स. के. नेउरगावकर, पालखी सोहळा, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी देवाची, २३ जुन २०११

२० दै. सकाळ, पुणे, सोमवार, ७ जुलै, २०१४ पृ. ५

२१ प्रा. डॉ. सौ. स्वराली कुलकर्णी, पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील ऐतिहासिक स्मारके, लक्ष्मी बुक, पब्लिकेशन सोलापूर, २०१५

२२ ह.भ.प. गोविंदमहाराज केंद्रे संस्था, श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा, २०१३

२३ केसरी, मंगळवार तारीख २४ माहे एप्रिल सन १९१७ इसवी पृ. ५

२४ श्री. के. एन देसाई, संत संग देई सदा, कराड, २०१३ पृ.१३३ देवीचिया द्वारी, श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी, दे.

२५ दै. लोकमत पुणे जिल्हा, रविवार, २२ जुन, २०१४

२६ दैनिक लोकमत, हॅलो सोलापूर, जुलै २०१५ पृ. २

### प्रकरण सहावे

## महाराष्ट्रातुन पंढरी (पंढरपूरकडे ) येणाऱ्या विविध दिंडया

६.१ पार्श्वभूमी

६.२ संत निवृत्तीनाथ दिंडी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर

६.३ संत सोपानकाका दिंडी सासवड ते पंढरपूर

६.४ संत मुक्ताबाई दिंडी एलाहाबाद ते पंढरपूर

६.५ संत एकनाथ महाराज दिंडी पैठण ते पंढरपूर

६.६ संत गजानन महाराज दिंडी शेगाव ते पंढरपूर

६.७ संत गुरू चैतन्य महाराज दिंडी ओतुर ते पंढरपूर

६.८ ज्ञानेश्वर महारज दिंडी नेवासे नेवासे ते पंढरपूर

६.९ श्री साईबाबा दिंडी सोहळा शिर्डी ते पंढरपूर

६.१० जनार्दन स्वामी दिंडी देवगिरी दौलताबाद ते पंढरपूर

६.११ महिपती महाराजांची दिंडी ताराहाबाद ते पंढरपूर

६.१२ संतराज महाराज दिंडी राजगाव बेट ते पंढरपूर

६.१३ संत नरहरी दिंडी सोहळा

६.१४ इतर दिंडी सोहळे

# महाराष्ट्रातुन पंढरी (पंढरपूरकडे ) येणाऱ्या विविध दिंडया

## ६.१ पार्श्वभूमी

महाराष्ट्र ही अनेक साधुसंताच्या वास्तव्याने आणि पादस्पर्शाने पुनित झालेले भुमी म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील बहुतांश भागात संतांची जन्मभूमी कर्मभूमी समाधी स्थळे आहेत. या सर्व ठिकाणे तीर्थक्षेत्र म्हणून उदयास आले आहे. या महाराष्ट्रातील सर्व भागातील कानाकोपऱ्यात वाड्यापासून ते गावापर्यत संतांची शिकवण देणारे शिष्यगण आहेत. या संतांच्या प्रबोधनामुळे भजन, किर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून वारकरी सांप्रदयाच्या प्रसारकार्यामुळे महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदयाचे आस्तित्व दिसून येते. आज या सर्व तीर्थक्षेत्रातून व इतर सर्व ठिकाणाहून पुढरपुरच्या आराध्य दैवत विठ्ठल यास भेटण्यासाठी त्याच्या दर्शनाला व वारीला जाणाऱ्यांची संख्या खूप आहे तसेच वर्षातून एक वेळेस पायी वारीला पंढरपुरला जाणारे वारकरी या ठिकाणाहुन दिंडीच्या माध्यमातून पोचत असतात.पंढरपुरच्या विठ्ठलाकडे हरीनाम भजन करीत गावागावाहून वारकरी दिंडीच्या माध्यमातुन पोचतात. तसेच अनेक वारकरी गावागावाहून एकत्र येऊन आपल्या जवळच्या तीर्थक्षेत्रातील संतांच्या दिंडी सोबत तसेच गावाजवळील एखाद्या संतांच्या नावाने चालत असलेल्या दिंडी सोबत पंढरपुरकडे पायी प्रवास करत दिंडी पायी करत आहेत व अनेक वर्षापासून परंपरागत वारी आजपर्यंत चालू आहे. तसेच याशिवाय काही वारकरी गावाहून आळंदी येथे पोचतात तर काही देहू येथे पोचतात. आळंदी या ठिकाणाहून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा व देहू या ठिकाणाहून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज दिंडी सोहळा मध्ये सहभागी होतात. या दोन मुख्य पालखी सोहळ्या शिवाय महाराष्ट्रातून आषाढी शुद्ध एकादशीला पंढरपूरला येणाऱ्या अनेक पायी दिंडी सोहळे आहेत. यामध्ये प्रसिद्ध संत निवृत्तीनाथ त्र्यंबकेश्वर, संत सोपानकाका सासवड, संत मुक्ताबाई एलाहाबाद, संत एकनाथ महाराज पैठण, संत गजानन महाराज शेगाव, संत गुरू चैतन्य महाराज ओतुर , ज्ञानेश्वर महाराज नेवासे या नावाने पायी दिंडी त्या ठिकाणाहून पायी प्रवास करत टाळ मृदंगात हरीनाम भजन करत पंढरपुरला पोचतात. प्रवास मार्गात अनेक वारकरी त्यांना येऊन मिळतात. गावोगाव मुक्काम करून आपल्या दैनंदिन नित्यनेमाने प्रवास करतात. या सर्व दिंड्यांच्या प्रवासाचे ठिकाणे वेगवेगळी येतात. रोजचे अंतर कमी जास्त असते. अनेक गावे तालुके, जिल्हे बदलत पायी प्रवास करत हे दिंडी सोहळा वाखरी या ठिकाणी एकत्र येतात.

वाखरी येथे मोठे गोल रिंगण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी शुद्ध दशमीला माऊली ज्ञानेश्वर महाराज दर्शन भेट घेऊन इतर पालखी सोहळे पंढरपुरच्या दिशेने निघतात. सर्वांच्या निघण्याचे प्रवासाचे क्रमांक ठरलेले असतात. त्यानुसार वाखरी ते पंढरपूर पायी दिंडी प्रवास होतो.महाराष्ट्रातून आलेले सर्व दिंडीतील वारकरी या वेळेस या पायी दिंड्या मध्ये सहभागी होतात. त्यामुळे येथे उपस्थित वारकरी व दिंडीत चालणारे वारकरी  या सर्वांची संख्या दहा लाखापर्यंत असते. हरीनामाचा मोठा गजर जयघोषाच्या आनंदात पंढरपुरात दाखल झाल्याच्या समाधानाने आनंदात नाचत गात खेळत पंढरपुरात प्रवेश करतात हा एकच आनंद डोळ्यांचे पारणे फेडतो. हा सोहळा विशेष आनंद देणारा व सर्वांनी तो पाहावा असाच वाटतो अशा या महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून येणाऱ्या विविध दिंड्यांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न या प्रकरणात करणार आहे.

## ६.२ संत निवृत्तीनाथ पायी दिंडी प्रवास वर्णन श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर

### श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर

हे क्षेत्र श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे गुरू व जेष्ठ बंधू श्री निवृत्तीनाथ महाराज यांची समाधी व बारा ज्योतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वर हे एक ज्यातिर्लिंग म्हणून प्रसिद्ध असून ते नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध ठिकाण आहे.हे स्थळ ब्रम्हगिरी डोगराच्या पायथ्याशी रम्य अशा सृष्टी सौदर्यांने नटलेलं निवांत शांत ठिकाण आहे. या ब्रम्हगिरीमध्ये श्री निवृत्तीनाथांचे गुरू श्री गहिणीनाथ यांची गुहा आहे तसेच समोरील डोंगरावर श्री गोदावरीचे उगमस्थान या नदीला दक्षिणेची दक्षिणगंगा असे म्हणतात. अशा पवित्र ठिकाणी श्री निवृत्तीनाथांनी समाधी घ्यायचे ठरविले जेष्ठ वद्य १२ शके १२१६ (सन १२९७ )[1] ला समाधी घेतली .

श्री निवृत्तीनाथ यांचा समाधी सोहळा हा पौष महिन्यात वद्य ११ ला करण्याचा प्रघात आहे. कारण त्यांच्या समाधी काळात आळंदीहून श्री ज्ञानेश्वर महाराजांचे तसेच देहू येथून संत तुकाराम महाराजांचे पंढरपुरकडे प्रस्थान असते. सर्व वारकरी वारीत सहभागी होतात. प्रस्थान आळंदीहून जेष्ठ वद्य अष्टमी असते तर पंढरपूर येथे पंढरीची वारी आषाढ शुद्ध एकादशीला भरते. हा सर्व विचार करून श्री निवृत्तीनाथ महाराजांचा समाधी सोहळा सोयीनुसार पौष वद्य ११ स त्र्यंबकेश्वर येथे साजरा होतो. या सोहळ्याला महाराष्ट्रातून लाखो यात्रेकरू उपस्थित असते. अनेक ठिकाणाहून गावाहून क्षेत्राहून वारकऱ्यांच्या दिंड्या येतात. यात दिवस सप्ताहाचे आयोजन असते तर मंदिरात पाच दिवस कीर्तन भजन यांचे कार्यक्रम त्रयोदशी पर्यंत सुरू असतात.हे क्षेत्र नाशिक जवळ

असून नाशिकहून ३० कि.मी अंतरावर नाशिक जिल्ह्यात येत असून त्र्यबकेश्वर हा तालुका आहे. तर प्रशासनासाठी स्वतंत्र नगरपालिका आहे. या क्षेत्रामध्ये पुण्य संपादन करणारे अंतर्गत प्रसिद्ध तीर्थ आहे

**ब्रम्हगिरी**

हे क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे ब्रम्हगिरी हा पर्वत स्थापित आहे. ब्रम्हगिरी पर्वतावर शंकराचे एक प्रचंड स्वरूप मानले जाते. या ब्रम्हगिरीला प्रदक्षिणा करण्याची परंपरा अतिप्राचीन मानली जाते. या पर्वतावर वैनगंगा व गोदावरी या नद्या आहेत. गोदावरी या ब्रम्हागिरीवर तीन दिशेला वाहत आहे. पूर्वेस वाहते तेव्हा तिला वैतरणा असे म्हटले जाते. दक्षिण दिशेने वाहते तेव्हा तिला गोदावरी असे म्हणतात तर पश्चिम दिशेस वाहत जाते तेव्हा तिला पश्चिम वाहिनी गंगा असे म्हणतात. चक्रतीर्थाजवळ गोदावरी पर्ण नदीहून वाहत जाते.[२] ब्रम्हागिरी हे ठिकाण त्र्यबंकेश्वर गावाच्या पश्चिमेला आहे ते डोंगरावर १८०० फुट उंचावर आहे समुद्र सपाटीपासुन त्याची उंची ४२४८ फुट आहे. या डोंगरावर पाच शिखरे आहे.

दृष्टी पडता ब्रम्हगिरी। तया कैसी यमपुरी।।[३]

त्र्यंबकेश्वर मध्ये कुसावर्त हे प्रसिद्ध ठिकाण आहे. येथे स्नान करणे हे भाग्याचे व पवित्र मानले जाते दर १२ वर्षांनी या कुसावर्त तीर्थावर स्नान घडण्यासाठी कुंभमेळ्याचे आयोजन त्र्यंबकेश्वर येथे केले जाते. या नियमानुसार २०१५ मध्ये त्र्यबकेश्वर व नाशिक येथे कुंभमेळा भरला जात आहे. शैवपंथीय साधू भारतभरातून आपल्या आखड्यासह येथे हजर असतात. स्नानपर्वणीच्या निमीत्ताने कुंभमेळात शाहीस्नानाचे येथे आयोजन केले जाते. लाखो भाविक या पवित्र तीर्थावर स्नान करण्यासाठी उपस्थित राहतात. साधुसंताच्या स्नानानंतर लाखो भाविकांना येथे स्नान करता येते याशिवाय केव्हाही येथे या  तीर्थक्षेत्रात येणे व आल्यानंतर कुशावर्त स्नान करणे त्र्यंबक म्हणजे त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेणे पवित्र मानले जाते. याबाबत संत म्हणतात कुशावर्त येथे स्नान केलेला कोणीही पवित्र होऊन तो कैलासाला जातो

कुसावरती करता स्नाने । त्याचे कैलासावरती राहणे ।।[४]

अशा पवित्र ठिकाणी संत निवृत्तीनाथ यांनी समाधी घेतली या पवित्र ठिकाणाहुन पंढरपुरला जाणारा संत निवृत्तीनाथ पालखी सोहळा सर्वांत जुना मानला जातो.या दिंड्या सोहळ्याची ऐतिहासिक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सुरू

झाल्यानंतर इ.स. १८४० मध्ये श्री भाऊसाहेब महाराज देहुकर यांच्या फडावरील भानुदास महाराज बेलापुरकर यांनी पुढाकार घेऊन निवृत्तीनाथांचा पालखी सुरू केला[५] या दिंडी मध्ये पालखी घेण्याची प्रथा याच दिंडीने सुरू केली असे सांगितले जाते. जेष्ठ शुद्ध पौर्णिमेला त्र्यंबकेश्वर येथून पंढरपुरला जाण्यासाठी पालखीचे प्रस्थान होते.[६] पालखी प्रस्थानाच्या अगोदरच्या दिवशी परंपरागत बेलापुरच्या फडाच्या फडाधिपतीचे कीर्तन होते. दुसऱ्या दिवशी निवृत्तीनाथ देवस्थान संस्थानाच्या विश्वस्तांच्या हस्ते पादुका पालखीत ठेवून प्रस्थानास सुरूवात होते. गावातील ग्रामस्थ शिवेपर्यत पालखी बरोबर येतात पालखीला निरोप दिल्यानंतर पालखी हजारो वारकऱ्यांच्या सह पंढरपुरच्या दिशेने मार्गस्थ होते. ४५० किलोमीटरचे हे त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर अंतर पायी २५ दिवसात चालून शुद्ध दशमीला पंढरपूरात पालखी पोचते. पालखी सोबत झेंडेकरी, तुळशीधारक जरीपटका गरूड मारूती पाण्यांचा हंडा यांनंतर दिंडीमध्ये टाळकरी पखवाज वादक व विणेकरी असे दिंडीच स्वरूप असते.

## रोजची वाटचाल

निवृत्तीनाथ पालखी सोहळ्यात सुरूवातीपासुन देहुकरांच्या फडावरील निवृत्तीनाथांचे एकनिष्ठ वारकरी आनाजीबुवा आजोतीकर यांची दिंडी पालखीच्या पुढे चालते. सध्या या सोहळ्यात एकुण ४+२४ दिंड्या चालतात. [७]रथाच्या पुढे अनाजीबुवांची दिंडी चालते यामध्ये सर्व वारकरी व त्यांच्या दिंडीचा समाज चालत असतो. पुढे पालखी सोहळा बेलापुरजवळ येथे तेव्हा परंपरेनुसार येथील बेलापुरची दिंडी पालखी सोहळ्यात सहभागी होऊन रथाच्या पुढे चालते. यांच्या मागे श्री निवृत्तीनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वराची दिंड व यांच्यानंतर सिन्नरकरांची दिंडी अशा ४ दिंड्या व त्यांचा समाज रथापुढे चालत आहेत.

## रथाच्या पाठीमागे चालणाऱ्या दिंडया

कोनाबेकर दिंडी सिरस जि नाशिक, चिकारी दिंडी कुदेवाडी, दिंडी नांदगाव येवल पाथरेकर दिंडी नाशिक, दिंडी बरकुबाबा दिंडी, सुदाम महाराज काळे दिंडी, नानत तळेगाव दिंडी नाशिक दिंडी, वाबोरीकर दिंडी मारोती चरणी दिंडी,या दिंड्या रोजच्या प्रवासात बरोबर नंबराने एका पाठीमागे चालतात. विशेषतः या दिंड्यांना निवृत्ती महाराजकडून कोणताही नंबर दिलेला नाही. या सर्व दिंड्या स्वयंशिस्तीने नंबराप्रमाणे चालतात.[८]

## पालखी सोहळ्याचे मुक्कामाचे ठिकाण

पालखी सोहळा त्र्यंबकेश्वरहुन निघाल्यांनतर येणारे मुक्कामाचे ठिकाण सातपूर–नाशिक–पळसे लोणार वाडी–खंबाळै–पारेगाव– गोगलगाव – राजुरी – बेलापुर – राहूरी – डोंगरगाव – अहमदनगर – साकत – घोगरगाव – मिरजगाव – कर्जत– कोरेगाव – रायगाव – जेऊर – कंदर – दगड धानोरे – करकंब – चिंचोली – पंढरपूर पालखी सोहळ्यात निवृत्तीनाथांची पालखी प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी गावात फक्त मंदिरातच थांबते गावाच्या बाहेर कोठेही पालखी मुक्कामाला थांबत नाही  हे सोहळ्याचे वैशिष्ट्ये आहेत.आज २०१५ पर्यंत पालखी सोहळ्यात तीस हजारावर सहभागी संख्या झालेली आहे. दिंडी बरोबर साहित्य वाहतुकीसाठी ट्रक टँकर व फिरता दवाखाना अशी व्यवस्था असते. सध्या या पालखी सोहळ्यात निवृत्ती महाराज पालखी सोहळा समितीचे अध्यक्ष म्हणून ह. भ. प. हरीभाऊ वरपे नियोजक म्हणून ज्ञानेश्वर महाराज गोसावी हे काम पाहतात पालखी व्यवस्थापनाचे काम बेलापुरकर वंशत ह.भ.प मनु महाराज बेलापुरकर नववी पिढी काम पाहतात व सोहळा चालवतात  या दिंडी सोहळ्याचे वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे ,सोहळा नगरला पोहचतो तो दिवस जेष्ठ वद्य द्वादशी निवृत्तीनाथ यांचा समाधी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो सर्व कीर्तनकार व भजनी मंडळ जेष्ठ वारकरी मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो.वारीच्या वाटावर दिवसभर भजन चालते. दुपारी प्रवचन व संध्याकाळी ७ ते ९ किर्तन सेवा चालते. तोच परंपरागत ठरलेले नित्यक्रम चालतात. उत्तर महाराष्ट्रातून येणाऱ्या सर्व दिंड्या सोहळ्यातील सर्वात मोठी व शिस्थबद्ध दिंडी अशी या दिंडीची ओळख आहे.या सोहळ्यातील प्रमुख किर्तनकार ह.भ.प.सुरेश महाराज गोसावी ,पंढरीनाथ कोलंबेकर,आचार्य रामकृष्ण महाराज लहवीतकर ,एकनाथ महाराज गोळेसर ,गोविंद महाराज सानप इ. या दिंडीचा प्रवास म्हणजे चालती बोलती पंढरी वाटते. त्यामुळे दरवर्षी या सोहळ्यातील मुक्कामाचे गावकरी सोहळ्याची आतुरतेने वाट बघतात. परंपरागत नित्यनेमाने दैनंदिन कार्यक्रम करत पालखी सोहळा पंढरपुरात दाखल होतो.पंढरपुरात भानुदास महाराज बेलापुरकर यांच्या मठात पालखी मुक्कामाला असते.दशमीला वाखरीला पालखी संत ज्ञानेश्वर महाराज यांना आणण्यासाठी जात असते. वाखरीहुन माऊली पालखी सोहळ्याला आणण्यासाठी सामोरे जाण्याचर प्रथा आजपर्यंत जपली जाते. नामदेवराय यांची पालखी वंशज घेऊन निवृत्तीनाथ यांच्या सह सर्व पालखी साहळा वाखरीहून पंढरपुरला निघतो.निवृत्तीनाथ पालखी रथ पुढे व पाठीमागे संत ज्ञानेश्वर

महाराज व सर्व इतर पालखी सोहळा जगातील पंढरीला आगळा वेगळा दर्शनीय अनुभव येतो.पौर्णिमेपर्यंत निवृत्तीनाथ पालखीचा मुक्काम पंढरपुरात असतो काला घेऊन पालखी सोहळा त्र्यंबकेश्वराच्या दिशेने परतीला निघते.

**पालखी परतीचा प्रवास – मुक्काम– ठिकाणे**

पंढरपूर–तुळशी –पिंपळनेरकेम –निंबारे– देवळाली– जातेगाव– बाभुळगाव –वाटेफळ– अहमदनगर– नांदगाव गोगलगाव– नान्नज– सिन्नर– पिंपळगाव– या मार्गे पालखी १९ दिवसात त्र्येंबकेश्वरला पोहचते.त्र्येंबकेश्वर संस्थानाच्या रेकॉर्ड प्रमाणे संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी पालखी, सहभागी दिंड्या

**रथापुढील दिंड्या**

१. श्री संत निवृत्ती महाराज समाधी संस्थान त्र्यंबकेश्वर
२. श्री विठ्ठल मंदिर दिंडी गावढा सिन्नर
३. ह.भ.प. एकनाथ महाराज गाळेसर दिंडी कुंदेवाडी
४. मोहन महाराज बेलापुरकर दिंडी पंढरपूर

**रथामागील दिंड्या**

१. ह.भ.प. वै. गंगाराम महाराज डवारे दिंडी (कोनांबे)
२. ह.भ.प. भागवत बाबा चिष्णीकर दिंडी (चिकणी)
३. तळेगाव नान्नज संगमनेर दिंडी
४. ह.भ.प.वै. आईसो दिंडी (सोमठाण)
५. मखमलाबाद नाशिख परीसर दिंडी
६. सोतगाव निफाड दिंडी
७. ह.भ.प. सुदाम महाराज बाके दिंडी (धारणगाव)
८. शरद महाराज खालकर दिंडी (भेंडाळी)
९. श्रीराम भजनी मंडख दिंडी (पाथरे)
१०. ह.भ.प. नारायण पाटील दिंडी (दंवपूर)
११. गंगापूर महिरावणी दिंडी
१२. ह.भ.प. बन्सी दिंडी (पिंपळस)
१३. चापडगाव करंज गाव परीसर दिंडी

१४. हनुमान भजनी मंडळ दिंडी (गिरनार)

१५. ह.भ.प. अर्जुन महाराज गाढवे दिंडी (धामणगाव)

१६. संताजी महाराज जगनाडे दिंडी (घोटी)

१७. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज गरफळ दिंडी (शिववई)

१८. बांबोरी अहमदनगर दिंडी

१९. कै. नथुबाबा मालुंजकर दिंडी (वाडीवऱ्हे)

२०. ह.भ.प. निवृत्ती महाराज मोगल दिंडी (काठुर)

२१. श्री विठ्ठल भजनी मंडख दिंडी (वडागळी सिन्नर)

२२. श्री ह.भ.प. बबन महाराज गहाने दिंडी (अजंनापूर)

२३. श्री ह.भ.प. पंडीत महाराज कोल्हे दिंडी (उगाव )

२४. श्री ह.भ.प. अशोक महाराज खापरे दिंडी (कसबे सुकेगे)

### ६.३ श्री सोपानकाका दिंडी सोहळा प्रवास वर्णन श्री क्षेत्र सासवड ते क्षेत्र पंढरपूर

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचे कनिष्ठ बंधू संत सोपानकाका यांनी सासवड येथे कऱ्हा नदीच्या तीरेवर मार्गशीर्ष वद्य १३ शके १२१५ ला घेतली[१०] यानंतर सासवड हे आध्यात्मिक तीर्थक्षेत्र म्हणुन नावारूपाला आले. सर्व संताचे आराध्य दैवत पंढरपुरचे विठ्ठल होय त्याप्रमाणे संत सोपानकाकाचे आराध्य देवत पंढरपुरचा विठ्ठल होय पंढरपुरला जाऊन या विठ्ठलाना भेटावे अशी ओढ प्रत्येकाला असते. संत सोपानकाका सांगतात

गजर गोपाळांचा श्रवणी पढियेला ।<br>
शंख चक्र करी विठ्ठल समोरा आला ।।[११]

याचा अर्थ पुढरपुरला भक्त आला आहे हे कळाल्यावर विठ्ठल विटेवरून खाली उतरतात व त्याला नगरात आणण्यासाठी सामोरे जातात. अर्थात सर्व संतांनी श्रेष्ठ आषाढी वारी अंगिकारिली आहे. श्री तुकोबारायांची वारी निर्याणकाळानंतर त्यांचे चिरंजीव नारायणबाबांनी तुकोबाराय व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुका घेऊन एकत्र पालखी सोहळा सुरू केला पुढे हैबतबाबांनी श्री ज्ञानेश्वरांच्या पादुका गळ्यांत बांधून श्री क्षेत्र आळंदीहुन माऊलींचा पालखी सोहळा सुरू झाला.त्यानंतर श्री क्षेत्र पैठण येथून एकनाथ महाराजांचे वंशज श्री गोसावी यांनी श्री एकनाथ महाराजांचा पालखी सोहळा सुरू केला. पुढे श्री भागवत बेलापुरकर यांनी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून

श्री निवृत्तीनाथांचा पालखी सोहळा सुरू केला. हे आषाढी वारीला हे पालखी सोहळे जात असताना सोपान काका देवस्थान सासवड चे वहिवाटदार वै. ज्ञानेश्वर माऊली गोसावी यांनी पंढरपूर येथील फडकरी वै. धोंडोपंत दादा अत्रे यांच्याबरोबर विचार विनिमय करून  दोघांनी श्री क्षेत्र सासवडहून श्री सोपानकाकांचा पालखी सोहळा सुरू केला इ.स. १९०२ साली[१२]सुरूवातीच्या काळात स्वतः धोंडोपंत अत्रे हेच पालखीचा सर्व खर्च करीत मानकऱ्यांच्या सत्कार त्यांना फेटे बांधून पालखीतील वस्त्रे इत्यादी पुढे दोघांमध्ये गैरसमज झाल्यामुळे दादा या सोहळ्यातून बाहेर पडले त्यानंतर पालखीची सर्व जबाबदारी गोसावी यांच्याकडे आली तेव्हापासून सर्व समाज गोसावी या घराण्याला मालक या नावाने संबोधले जाते.[१३] श्री सोपानकाकांची पालखी सुरूवातीला भोईलोक खांद्यांवर वाहून नेत असत. या भोईलोकांनी जेवणासाठी मुक्कामाच्या ठिकाणाहूनच दुसऱ्या दिवशीसाठी चवड घ्यावी लागत असत. पालखी सोहळा हा ऐन पावसाळी येतो. रस्ते नसत. चिखल राडारोडा नदीला येणारा पूर अशा अवस्थेत पालखी प्रवास चालत असे. वारकऱ्यांच्या सामानासाठी बैलगाड्या असत. गावात पालखी पोचल्यानंतर चोपदारांनी चावडीत जाऊन तशी माहिती द्यायची त्यानंतर गावकरी एकत्र येऊन वैरणीच्या पेढ्या गोळा करत. प्रथम देवस्थानाच्या बैलांना वैरण नंतर दिंड्यांवाल्याच्या बैलांना वैरण वाटप केली जात होती. त्यानंतर पालखी उतरण्याची व्यवस्था चावडीत शाळेत किंवा मंदिरात सोयीनुसार करत असे. तेथील पटांगणातील चिखल माती बाजुला काढून व्यवस्थित करत असत. चारही बाजुला मशाली लावल्या जात.व नंतर किर्तनाला सुरूवात होत असे. त्यावेळी गावात दवंडी दिली जात किर्तन संपेपर्यंत गावातील गावकरी भाकरी कालवण गोळा करत. ते जेवण सर्व दिंडीवाल्यांनी वाटून जेवण होत व पुन्हा दुसऱ्या दिवशीचा प्रवास सुरू होई असा हा रोजचा कार्यक्रम ठरलेला होता.

श्री सोपानकाका यांची पालखी पंढरपुरच्याकडे सासवड येथून कऱ्हा नदीच्या तीरावरील समाधी स्थळाहून जेष्ठ वद्य द्वादशीला निघतो. पालखी सोहळा सुरू होण्याच्या कार्यक्रमाला प्रस्थान असे म्हणतात. पूर्वीपासून प्रवासाला निघताना मुहूर्त बघून निघत असत. तरीपण आपल्याला जाण्याचा दिवस  योग्य नसेल तर आदल्या दिवशी पिशवी भरून शेजारच्या घरी नेवून ठेवणे यास प्रस्थान करणे असे म्हटले जाते जेष्ट वद्य द्वादशी या दिवशी दुपारी १ वाजता समाधी स्थळावरील मंदिरातील सभामंडपातून निघते. यावेळी पालखी बरोबर सहभागी होणाऱ्या सर्व दिंड्या हजर असतात. यामध्ये टाळकरी. विणेकरी, झेंडेकरी पखवाज हंडाधारक व तुळशीधारक सर्व ऊभे

असतात.पालखी सोहळा प्रमुख नारायण महाराज गोसावी स्वतः रामकृष्णहरी या भजनाने सुरूवात करतात. वारीची परंपरा असलेले गोसावी महाराज भजनाची झाल्यानतंर ते वारीच्या परंपरेचा अभंग म्हणतात.

माझ्या वडिलांची मिरासी गा देवा ।
तुझी चरणसेवा पांडुरंगा ।।[१४]

हा अभंग झाल्यांनतर हा दिवस जेष्ठ वद्य द्वादशी श्री निवृत्तीनाथांचा समाधी दिन असल्याने त्यांचा समाधीचा अभंग म्हटला जातो.

धन्य धन्य निवृत्ती देवा । काय महिमा वर्णावा ।।[१५]

हा अभंग झाल्यानंतर निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम या भजनाचा जयघोष केला जातो. यानंतर उपस्थित सर्व प्रत्येक दिंडीवाल्यास एकएक संतपर अभंग म्हणण्यास सांगितले जाते.त्याच वेळी वंशपरंपरेने गोसावी यांच्या घरात ठेवलेल्या सोपान महाराजांच्या पादुकांना घरातील सासुरवाशिनी व माहेरवाशिनी औक्षण करून केंजळे बंधुंच्या हस्ते पादुका समाधी मंदिरात नेल्या जातात. नंतर त्या पादुका पालखीत आणून ठेवल्या जातात. या वेळात सर्व दिंड्यांचे अभंग म्हणून झाल्यावर विठोबा रखुमाई हे भजन घेतले जाते. चोपदार दंड वर केल्यावर भजन थांबवतो व सर्वत्र शांतता पसरते. देवस्थान तर्फे दिंडी प्रमुख, परंपरागत मानकरी ,सेवाधारी,या सर्वांचे स्वागत व नारळ प्रसाद दिला जातो. या नंतर सोपान महाराजांच्या नामाच्या गजरात प्रस्थान होते. प्रथम देवळात प्रदक्षिणा होते. या नंतर सर्व दिंड्या पालखीच्या समोर आपल्या क्रमांकानुसार चालतात. यांच्या पुढे परकाळे यांचा मानाचा अश्व असतो.संपुर्ण सासवड नगरातून मिरवणूक होऊन पालखी पंढरपुरला निघताना २०० च्या वर सासवड मधील भावीक निरोप देण्यास येतात.असे सांगितले जाते सोपान देवाच्या समाधी प्रसंगी श्री पांडुरंग स्वतः उपस्थित होते व सोहळा संपल्यावर पौष शु. प्रतिपदेला देव पंढरी क्षेत्री निघाले. गावाबाहेर आल्यावर सर्वांना निरोप देऊन देव अदृश्य झाले,अशी भावना असल्याने तेथे श्री पांडुरंगरायाचे देऊळ बांधले गेले. तेथे देवळासमोर पीलखी आल्यावर जनाबाईचा अभंग म्हटला जातो.

ब्रम्हाने तप केले । ब्रम्हपुरी म्हणविले ।
तेथे नांदे जिंवलग ओझा । सोपान अंतरंग माझा ।।[१६]

या अभंगानंतर श्री पांडुरंग रायाची आरती होते. जे ग्रामस्थ पालखीला निरोप देण्यास आले आहे ते सर्वांचा निरोप घेऊन जड अंतःकरणाने परत जातात.श्री सोपान काकाचा पालखी सोहळा जेष्ठ वद्य द्वादशी पासून आशाढ शुद्ध दशमी पर्यंत चालतो. दिवस बरोबर असल्यास हा सोहळा १४ दिवसाचा प्रवास करतो. तिथीचा क्षय झाल्यास प्रवासातील एक मुक्काम कमी होतो तर १३ दिवस प्रवास असतो. एखादी तिथी वाढल्यास एक मुक्काम जास्त होऊन प्रवास १५ दिवस सुरू असतो.

**पालखी सोहळ्यातील दिनक्रम**

पालखी सोहळ्यातील सर्व दिंड्यामध्ये सकाळ पासून ते रात्रीच्या मुक्कामापर्यंत दिवस भरातील कार्यक्रम नित्यनेमाने रोज होत असतात. यामध्ये सकाळी मंगल चरण भुपाळ्या, आंधळा पांगळा, वासुदेव, जोगी, गौळणी ,मुका बहिरा,गायिले जातात. तर दुपारच्या भोजनानंतर नाट, तिर्थावळी, बाळ क्रिडा,समाधी हिंदुस्थानी अभंग,माऊलीचा हरिपाठ,श्री सोपानदेवांचा हरिपाठ, गुरूपरंपरेचे अभंग असे अभंग म्हटले जाते.संध्याकाळी पालखी ठरलेल्या नियोजित जागी मुक्कामाला जाते त्यास पालखी स्थळ असे म्हणतात.

**समाज आरती–**

पालखी तळावरील सर्व दिंड्या संध्याकाळी एकत्र येतात. येथे सर्व समवेत एकत्र आरती घेतली जाते. त्यास समाज आरती असे म्हणतात. या आरतीच्या अगोदर चोपदार आपल्या हातातली दंडक वर करतात,व सर्व समाज शांत होतो.मग चोपदार दिवसभरातील सोहळ्यातील कोणी हरवलेली वस्तु,चुकलेले वारकरी,सापडलेल्या वस्तुची यादी सांगतात. त्यानंतर चोपदार रात्रीचे कीर्तन सकाळचे कीर्तन जागर कोणाचे हे जाहीर करतात. परंतु हे किर्तनाचे सर्व मुक्कामाचे कार्यक्रम परंपरेने ठरवलेले असतात. विषेशतः काही अडचण आसल्यास सभा कोठे व किती वाजता होईल व दिंडी प्रमुखानी उपस्थित रहावे असे सांगितले जाते व नंतर समाज आरती होते.रस्त्याने पालखीतील पादुकांची रोज षोडशोपचार पूजा होते. त्यावेळी परंपरेनुसार मुगाच्या डाळीची खिचडी व आंब्याच्या वडीचा नैवद्य असतो. दुपारी महानैवद्य व रात्री धुपारती असते.

**रिंगण**

श्री सोपानकाका पालखी सोहळ्यात रस्त्याने माळेगाव कारखाना येथे भव्य पटांगणात गोल रिंगण असते. तर पिंपरी ता बारामती येथे बकरी रिंगण असते. वाखरी व पंढरपूरच्या अलीकडे ऊभे रिंगण असते. सणसर व खंडाळी येथे भारूडाचा कार्यक्रम होतो. सोपानदेवांची पालखी सोहळ्यांचे

मानकरी दिंड्या सासवडकर दिंडी भाऊसाहेब महाराज खरवळकर दिंडी ह.भ.प. चांगदेव दिंडी रामचंद्रबुवा परकाळे दिंडी भगवान महाराज कदम दिंडी श्री सोपान संप्रदाय प्रसारक दिंडी गोविद कोळी दिंडी जनार्दनबुवा वंजारवाडीकर दिंडी[१८] पालखी सोहळा सुरू करण्यात मोलाचा वाटा आहे.

## सोहळ्यातील परंपरागत सहभागी दिंड्या

## सासवडकर दिंडी

श्री संत सोपानकाका पालखी सोहळा सुरू झाल्यांनतर प्रथम रथापुढे सोपानकाका देवस्थानाची दिंडी असावी या हेतूने पुरंदर तालुक्यातील पिंपरी गावचे श्री रंगोबा कुंभार हे त्यावेळेचे आळंदीतील गोरोबा मंदिरातील पुजारी यांना वीणा सांभाळण्यास सांगून पहिल्या क्रमांकाच्या दिंडीचे ते विणेकरी म्हणुन मान मिळाला ही दिंडी सासवडकर दिंडी म्हणून ओळखली जाते. पुढील काळात या दिंडीची सर्व व्यवस्था संस्थानाला पाहणे योग्य नाही म्हणून रंगोबा कुंभार यांचे पुतणे वै. दशरथ बुवा दाते हे चालक व देवस्थान हे दिंडी मालक अशी परंपरा आजपर्यंत चालू आहे.या दिंडीला पालखी जवळ उतरण्यासाठी जागा देण्यात येते. गाडीचा सर्व खर्च अगोदर संस्थान करते. दिंडी चालक या नात्याने यांच्या किर्तनाचा मान पंढरपुरला मुक्कामी शुद्ध त्रयोदशीला असतो. दशरथबुवा नंतर त्यांचे चिरंजीव वै. सुदामदेव दिंडी चालक तर आजपर्यंत त्यांचे चिरंजीव श्री शंकरदेव दिंडी चालवतात या दिंडीत सहभागी पिंपरी गावातील काही मंडळी तर भजनी मंडळी मुंबई घाटकोपर येथील गौरीबुवा मंडळातील असतात. या भजनी मंडळातील लोक आजही अतिशय श्रद्धेने पंढरपुरात पौर्णिमेपर्यंत राहतात.

## भाऊसाहेब महाराज रवरवळकर दिंडी

श्री संत सोपान काका दिंडी सोहळा करण्यामध्ये ह. भ. प. भाऊसाहेब महाराज यांचा मोलाचा वाटा होता. यांचे मुळ गाव लातुर जिल्ह्यातील खखळ होय ते खखह हुन दर शुद्ध वारीला महिन्याला पंढरपूरला येत असत. थकल्यानंतर ते घोड्यावर वारी करत होते. पण उतारवयात अत्यंत थकल्याने वारी करणे शक्य नाही अशा वेळी

देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो ।।

या भावनेने घोड्यावर बसले तो घोउा धरण्यासाठी शेरेकर बरोबर घेतले चालताना भाऊसाहेब महाराज विचारत आले का पंढरपूर यांनी नाही म्हणावे असे करत करत पंढरपुराजवळ

पोचले. भाऊसाहेब महाराजांनी विचाराले पंढरपूर आले का शेरेकरांनी सांगितले चंद्रभागेच्या तीरावर आलो असे म्हटल्यावर हात जोडले आणि तेथेच प्राण सोडले. या निष्ठावान वारकऱ्याला धोडापेपंत दादांनी सांगितले की तुम्ही श्री सोपानकाका पालखी बरोबर दिंडी घेऊन चालावे पालखी सुरू झाल्यापासून आजतागायत पालखी सोहळ्याबरोबर असणारी एकमेव दिंडी होय. भाऊसाहेब महाराज दिंडींचे ट्रस्ट मध्ये रूपांतर झाले आहे. श्री माऊली शेरेकर अव्याहत कारभार पाहत आहे.

### ह.भ.प. भगवान महाराज शिवणीकर दिंडी

शिवणी हे गाव लातूर जिल्ह्यातील असून येथील भगवान महाराज हे होय. यांनी सन १९४५ पासून शिवणीकर फडाची दिंडी श्री सोपान काका दिंडी सोहळ्यात रथापुढे क्र. ३ ने सुरू केली. ते आजपर्यंत आहे. या दिंडींचे वैशिष्ट्ये नियमाला न चुकणे अज्ञातवासात असतानाही महाराजांनी पंढरीची वारी चुकविली नाही अज्ञातवास काळ रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण भागात गेला त्यांच्या व्यक्तिमत्व प्रभावामुळे कोकणी लोक त्यांना भगवान मानत.

### ह. भ. प. चांगदेव दिंडी

ह.भ.प. चांगदेव महाराज हे पंढरीचे वारकरी यांची दिंडी सोपानकाका यांच्या पालखी समवेत ५० वर्षापासून आहे. यांची बाराही महिने प्रत्येक संताच्या ठिकाणी आपली दिंडी पुण्यतिथीला नेत असत. चांगदेवाचे विशेष म्हणजे स्वतः चांगदेव महाराज बैलगाडी चालविणार व बाकीचे दिंडीत चालणार त्यामुळे चांगदेव व बैलगाडी असे समीकरण झाले. ही फडावरील दिंडी असल्याने वारीचे परंपरेचे सर्व नियम कटाक्षाने पाळले जातात. आज ही दिंडी चांगदेवाचे भाचे चालवितात. रथाच्या पुढे ४ क्रमांक ही दिंडी चालते. या दिंडी मालकाला पालखी सोहळ्यात निंबुत मुक्कामी तळावर सकाळचे कीर्तन व निखांगी येथे रात्रीचा जागर असतो.चांगदेव महाराज म्हणजे बाराबंदी धोतर फेटा उपरणे कपाळावर गंध व मुद्रा गळ्यात मोठ्या तुळशीच्या माळाच्या माळा आणि अखंड तोंड पानाने रंगलेले अशी त्यांची मूर्ती होती.

### ह.भ.प. माणिकबाबा ढवळे दिंडी

माणिकबाबा ढवळे हे विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील आहे. वयाच्या ८० वर्षी ते आज आपल्या दिंडीचा विणा स्वतः घेताता. १९४५ साली बाबांनी वै. रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या मदतीने सोपानकाका पालखी सोहळ्यात घोड्याच्या मागे आणि रथाच्या पुढे पाचव्या क्रमांकावर दिंडी सुरू केली. या दिंडींचे खास वैशिष्ट्ये म्हणजे दिंडी बरोबर बैलगाडी घोडा तसेच कोणतेही

वाहन नसते. त्यामुळे दिंडीतील सहभागी सर्व वारकरी आपले सामान खांद्यावर घेऊन गळ्यात टाळ घेउन दिंडीत चालतात.

### ह.भ.प. रामचंद्रबुवा परकाळे दिंडी

रामचंद्रबुवा जातीने गुरव होते. ते दर महिन्याला वारीला परकाळे यांच्या दिंडीत चालत होते. त्यांना झाडापाल्यांची माहिती असल्याने ते त्यांचे औषध बनवत. रस्त्याने औषध विकुन त्यातून ते दिंडीचा खर्च भागवत यामुळे ते दिंडीचे मालक नसताना त्यांच्या या कार्यामुळे त्यांच्या नावावर दिंडी चालते व दिंडीला रामचंद्रबुवा परकाळे हे नाव प्राप्त झाले. पूर्वी परकाळे ही दिंडी पालखीचे भूषण होते. रामचंद्रबुवा यांच्या कारकिर्दीत कोकणातील कोंडीबा म्हणून वारकरी यांनी ४० वर्षे रामचंद्रबुवा दिंडीचा कारभार सांभाळला. ही दिंडी म्हणजे सासवडकरांची दिंडी अशीच होती. त्यामुळ या दिंडीत पुरंदर भोर बारामती हवेली या तालुक्यातील समाज चालत होता. यामुळे सर्वात मोठी दिंडी म्हणून परकाळे दिंडीचे नाव होते. विशेषतः म्हणजे ही दिंडी परतीचा प्रवासात पंढरपूर ते सासवड श्री सोपानकाका पालखी बरोबर असते. रस्त्याने पालखी प्रवासात बारामतीला या दिंडीचा जागर खंडाळी येथे कीर्तन व भंडी शेगाव येथे सकाळी कीर्तन ही सेवा असते.

### ह.भ.प. गणपत बुवा बांडेवाडीकर दिंडी

गणपत बुवांचे आडनाव जाधव पण ते हवेली तालुक्यातील बांडवाडी येथे राहत असल्याने त्यांना बांडेवाडीकर म्हणत असत. वडिलांपासुन भजन कीर्तनाचे संस्कार वडिलांबरोबर लहानपणापासून सासवडच्या वारीला येत असत. लहानवयात ते पखवाज वादन शिकले. ते पुढे महाराष्ट्रातील नामवंत मृदंगमणी व जुन्या पिढीतील पखवाज वादक होय. व जुन्या पिढीतील पखवाज वादक होय. अनेक नामवंत शिष्य त्यानी महाराष्ट्राला दिले. त्यापैकी सारमबुवासारखे प्रख्यात शिष्य होय. यांनी गुरूचर आज्ञा म्हणुन दिंडी सुरू केली. सुरुवातीला विणेकरी तुळस हंडा पाठवून परकाळे यांच्या दिंडीत ही माणसे चालत मुंबईकर मंडळी या दिंडीत चालत. गणपत बुवांची कीर्तन सेवा दौंडज निखांगी मुक्कामात रात्रीची असे.

### ह.भ.प.भगवान महाराज कदम दिंडी

भगवान महाराज हे आचरण संपन्न त्यागी आदर्शभूत विभूती होती त्यांचा जीवनक्रम गुरूंच्या आज्ञेनुसार चालत असे. ही सोपानकाकांची सेवा व्हावी म्हणून पालखी बरोबर दिंडी सुरू

केली. अखंडविणा हे त्यांचे खास वैशिष्ट्ये झोप घेत पण वाणी खाली ठेवत नव्हते. पुढे गुरूच्या आज्ञेनुसार आपला भाचा ह.भ.प निवृत्ती बुवा सुरवसे यांना दिंडीचे व फडाचे अधिकार दिंले. त्यांनी भगवानबुवा यांची परंपरा नेटाने सुरू ठेवली. वारी बरोबर असलेली भगवान बुवांची अखंड वीणा ही परंपर आजतागायत सुरू आहे. आज राम महाराज कदम हे परंपरेनुसार दिंडीचा कारभार पाहत आहे. चातुर्मास याकाळात पंढरपुरात मुक्काम चार महिने बाहेर जात नाही. पालखी रस्त्यात लासुर्णे येथे जागर सेवा असते तर कोऱ्हाळे व सोमेश्वर कारखाना येथे सकाळचे कीर्तन सेवा असते या दिंडी तर्फे रोज सकाळी मुगाच्या डाळीचा खिचडीचा नैवद्य आहे.

## ह.भ.प. जगन्नाथ महाराज शिवरीकर दिंडी

सासवड पासून ८ कि. मी. पूर्वेकडे शिवरी हे गाव जगन्नाथ महाराज म्हणून त्यांना शिवरीकर म्हणत. ते सोपान काकांचे एकनिष्ठ भक्त होय त्यांचे आडनाव कामथे हे होय. हे शिवरीहून दर महिन्याच्या शुद्ध एकादशीला सासवडला ८ ते १० मंडळी रात्रीची सायकलवर येत असत. रात्रीचे कीर्तन झाले की ते पुन्हा सायकलवर शिवरीला जात असत. जगन्नाथ बुवा यांनी चोपडज वाळुंत इ. ठिकाणी नाम सप्ताह सुरू करून लोकांना भक्ती मार्गाला लावले.शिवरी गावच्या लोकांनी सासवड ते पंढरपुर महाराजांच्या पालखी बरोबर दिंडी सुरू केली व दिंडीला जगन्नाथ महाराज शिवरीकर दिंडी असे या विभूतीचे नाव दिले १९६२ पूर्वी पालखी कापुरहोळ शिखर लोणंद निघून मार्गे पंढरपुरला जात असत. पानशेत धरण फुटल्यामुळे त्यावेळी पालखी मार्ग बदलला पालखीचा पहिला मुक्काम शिवरी सुरू झाला. जगन्नाथ बुवांनी सुरू केलेली परंपरा आजही शिवरी गावकरी पाळत आहे. पालखी बरोबर शिवरी गावात त्यांचा जागर असतो तर लासुर्णे मुक्कामी दुसऱ्या दिवशी दिंडी कीर्तन सेवा करते.

## श्री सोपान संप्रदाय प्रसारक दिंडी

शुद्ध एकादशीला पंढरपुरला जाता येत नव्हते म्हणून बारामती भोर हवेली खंडाळा या तालुक्यातील लोकांनी सासवडची शुद्ध एकादशीची वारी सुरू केली पुढे आळंदी यात्रेला सोय असावी या हेतूने सर्व मंडळी एकत्र येऊन १९६०च्या सुमारास श्री सोपानदेव सांप्रदायिक प्रसारक मंडळाची स्थापना करून या नावाने धर्मशाळा बांधली. ह.भ.प. नथोबा पाटील श्री चंद्रकांत कारकर गुरूजी आणि श्री शिंगटे गुरूजी यांनी संस्थतर्फे दिंडी श्री सोपानकाका पालखी सोहळा बरोबर सुरू केली. नथोबा पाटील हे अंगकाठी उंच शिरशिडीत गोरेपान आणि आवाज पहाडी असा पेहराव होता. भजनामध्ये

ते स्वतः काकड्यापासून ते रात्री जागरापर्यंत स्वतः वीणा घेऊन भजन करीत असत. व त्याच्या सौ पाटलीणबाई स्वतः टाळ घेऊन त्यांना उत्तम साथ देत असत. या दिंडीचे विशेष म्हणजे श्री सोपानदेव पालखीच्या सोहळयात सर्व दिंड्यांच्या नंतर शेवटच्या नंबरावर चालणारी दिंडी होय नवीन दिंड्या आल्या तरी देखील ही दिंडी शेवटच्या नंबरावरच चालणार असे संस्थेने ठरविले आहे. दुसरी विशेष बाब म्हणजे दिंडीतील सहभागी लोकांकडून वर्गणी घेतल्यांवर सर्व पैशांचा हिशोब पंढरपूर येथे आषाढ शुद्ध द्वादशीला पूर्ण करणे त्यातून उर्वरित राहिलेले पैसे प्रत्येकाला परत देण्यात येत असे. अर्थात ही दिंडी ना नफा ना तोटा या तत्ववर चालते. आजही दिंडी संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. तळेकर हे चालवितात.

**ह.भ.प. गोविंद कोळी दिंडी.**

गोविंदबुवा हे कोळी जातीतील असुन ते रंगाने सावळा गुडघ्यापर्यंत धोतर काळा कोट ठसठसीत बंध असे हे मराठवाड्यातील आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होय. सुमारे ५५ वर्षापासून ही दिंडी पालखी सोहळा बरोबर चालते. त्याकाळी दिंडी चालविणे हे एक दिंव्य असे दिंडीच्या सामानासाठी बैलगाडी होती पण दोन बैल सुद्धा नव्हते एका बाजुला बैल व दुसऱ्या बाजुला घोडा जुंपलेला असे. बुवा पालखीबरोबर दिंडीत चालत.या दिंडीला दौंड मुक्कामी एक जागर असतो. सुरूवातीला या जागराला एक विणेकरी व बुवा फक्त स्वतः टाळ घेऊन ऊभे राहत. वऱ्हाड भागातील एक मुक्ताबाई ही वारकरीन जागराला असे.गोविंदबुवाच्या निधनानंतर गेली ३० वर्षापासून त्यांच्या भागातील लोक एकत्र येऊन आजही ही त्यांची दिंडींची परंपरा चालवितात. गोविंदबुवाच्या पाठीमागे कोणीही नातेवाईक नसताना दिंडी मात्र गोविंदकोळी याच नावाने चालते.

**जनार्दनबुवा वंजारवाडीकर दिंडी.**

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील वंजारवाडीचा गावातील मंडळी ही दिंडी सुरू केल्याने या दिंडीला वंजारवाडीकर दिंडी असे नामकरण झाले. ही दिंडी भाऊसाहेब खरवळकर दिंडीत चालत. जनार्दनबुवांनी ही दिंडी सुरू केली या दिंडीला कोऱ्हाळे येथील मुक्कामाला जागर असते. व बारामती येथील सकाळचे कीर्तन असते.

**वैं. बापुसाहेब केंजळे**

वै बापुसाहेब केंजळे हे सोरटेवाडी ता बारामती येथील होय. ते दर महिन्याला शुद्ध एकादशीला सासवडची श्री सोपानकाकांची वारी तर वद्य एकादशीला आळंदीची श्री ज्ञानदेवांची वारी करत

होते. हे निष्काम भक्त कसा असावा त्याचा आदर्श हे होते. श्री सोपान महाराज पालखीला भोई लोकांनी खांद्यावर घेवुन जाण्याची प्रथा संपून गाडी म्हणजे रथ सुरू झाल्यापासून आजतागायत वै बाळुसाहेब यांची बैलजोडी पालखीला सेवा म्हणुन सुरू आहे. आठ वर्षापूर्वी विश्वस्त मंडळींनी ठराव करून दुसऱ्याची बैलजोडी लावली. व यांची बैलजोडी सेवा परंपरा खंडित करण्याच्या दुर्दैवी प्रयत्न केला पण सोपानमहाराजांना यांच्या घराण्याचीच सेवा हवी होती. म्हणुन रस्त्यात एक बैल मरण पावला. अशावेळी शेवटी केंजळे यांनाच बैलजोडी देण्याची विनंती करावी लागली. त्यांनी पण तत्काळ बैलजोडी विकत घेतली. विकास केंजळे व पणतु नितीन कुलकर्णी यांनी ही परंपरा बैलजोडी देवून सुरू ठेवली.सोपानकाका पालखीचा सध्याचा रथ १९८३ साली सोमेश्वर साखर कारखान्याकडून प्राप्त झाला. त्याच्या अगोदर बर्फाची गाडी[१९] त्याचा उपयोग होत होता. पालखी सोहळ्याबराबर सुरूवातीला सोलापूर जिल्हयातील धर्मपुरीचे श्री नवलेबुवा यांचा अश्व असे. पुढे श्री बापुसाहेब यांच्या सांगण्यावरून अनेक वर्षे केंजळे यांचा अश्व पालखीबरोबर असे यानंतर आजपर्यंत पालखीबरोबर अंतनगावचे परकाळे यांचा अश्व असतो. वरील सर्व दिंड्यांचे श्री सोपानकाका पालखी सोहळ्याला सुरूवातीपासून महत्वाचे योगदान आहे. पालखी सोहळा सुरू करण्यापासून ते पालखी सोहळा टिकविण्यापर्यंत व सुरू ठेवण्यात आजपर्यंत या दिंड्यांचा महत्वाचा सहभाग आहे.

### बँक ऑफ इंडिया शाखा सासवड पालखी सोहळ्यातील मदतकार्ये

श्री सोपानकाका पालखी सोहळ्यास सवतोपरी मदत करण्यात बँक ऑफ इंडिया शाखा सासवड ही एक संस्था आहे. येथील शाखेतील श्री धारे व श्री शेटे यांना सार्वजनीक कार्यांची अत्यंत आवड आहे. पालखी सोहळ्यात बँकेतर्फे भाविकांना फळे तसेच काही वस्तु वाटप करत असत. पुढे पालखी सोहळा प्रमुख मा. गोसावी यांचा संबंध आल्यांनंतर गोसावी यांनी त्यांना सासवड देण्यात मदत देण्यासंदर्भात चर्चा केली. ही घटना सुमारे १९९० च्या काळातील आहे. बँकेने देवस्थान पहिली भेट म्हणून संपुर्ण स्पीकर सेट पालखी प्रस्थान दिवशी देऊन त्यांच्या सेवेची सुरूवात केली. यानंतर भाविकांच्या अन्नदानासाठी भटारखाना बँकेने बांधून दिला. स्वयंपाकासाठी जुनी पीतळे व तांब्याची कत्ते संध्याकाळात सोयिस्कर नव्हते. म्हणुन बँकेने हल्लीची हिंडालिमयाच्या भांड्याचा एक सेट दान केला. पुढील वर्षी घमेली बादल्या चमचे इ. वाढप्याचा सेट दिला नंतरच्या वर्षात मंदिरातील सभा मंडपात बसण्यासाठी आवश्यक संतरज्या

दिल्या तसेच सभा मंडपात पंख्यांची सोय केली. मंदिरात कायम स्वरूपाची पाण्याची सोय व्हावी म्हणून देवस्थानाच्या शेतात २५० फुट बोअर घेऊन येणाऱ्या भाविकांना पाण्याची सोय केली १९९७ साली श्री सोपानकाका देवांच्या सोहळ्यानिमित्त भाविकांच्या सोयिसाठी सोपानमहाराजांचे समाधी काळाचे श्री नामदेव महाराज श्री एकनाथ महाराज श्री संत जनाबाई यांनी रचलेले अभंग संगमरवर दगडावर कायमचे कोरले जावेत म्हणून बँकेने ४० हजार रू खर्च केले.

तसेच सोपानकाकाच्या मंदिराच्या आवारात एक स्वागत म्हणून कमान असावी म्हणुन ३० ते ३५ हजार रूपये खर्च करून ते काम पूर्ण केले. सोपानकाका च्या पालखी सोहळ्यातील आजची पालखी पितळैची अवजड होती. ही पालखी जर्मन सिल्हरची बनवण्याचा संस्थानाचा मानस होता त्यासाठी लागणाऱ्या एकूण खर्चापैकी १६००० रू. सोपानदेवाच्या ग्रंथाच्या विक्रीतून केले होते. हा ग्रंथ श्रीमती कमलाबाई साबळे यांनी छापून दिला होता. उर्वरित रक्कम १८००० रू यामध्ये पालखी बजेट २५००० रू व दोन अब्दागिरी ९०००० असा एकूण ३४००० रू त्यापैकी १८००० रू चा खर्च बँक ऑफ इंडियाने केला.[२०] पालखी सोहळ्यातील सर्व नैवद्याचे गाव मुक्कामाचे गावी सोपानदेवांचा फोटो असावा यासाठी त्यांना फोटो पुरविण्याचा येणारा १६००० रू खर्च बँकेने केला. लॅमीनेशन केलेला फोटो या सर्व गावी वाटले. असे उपक्रम दरवर्षी बँक करत आलेली आहे. बँकेच्या संघटनेतर्फे एक सूचना काढली जाते. पुणे परिसरातील सर्व सेवकांना पाठविली जाते. त्यातुन जे सेवक वर्गणी देतील त्यातून ही सेवा चालू आहे. सेवकाकडून कोणतीही सक्ती केली जात नाही सर्व उपक्रम बँक ऑफ इंडिया तर्फे असेच लिहिले जाते.असा सुबक व समाजशील उपक्रम राबवून सोपानदेव सोहळ्यात मोलाचे योगदान बँक ऑफ इंडिया कर्मचारी देत आहेत जेष्ठ वद्य १२ ते आषाढ शुद्ध १० हा १३ दिवसाचा मुक्काम करत सोपानदेवांची पालखी पंढरपुरात पोचते यध्या रथापुढे १० दिंड्या वच रथाच्या पाठीमागे ३२ अशा एकूण ४२ दिंड्या पालखी बरोबर चालतात.[२१]

## ६.४ संत मुक्ताबाई दिंडी सोहळा

श्री क्षेत्र मुक्ताईनगर ते श्री क्षेत्र पंढरपुर आषाढी वारी पालखी सोहळा (र.जि.क्र.ए.६४० बुलढाणा महाराष्ट्र )चित्कला मुक्ताबाई श्री संत ज्ञानेश्वरमहाराजांची छोटी बहिण मुक्ताईनगर येथे समाधी स्थळ ता मुक्ताईनगर जि. जळगाव येथून आषाढी वारी पालखी योहळा पंढरपुरकडे प्रस्थान होतो. हा सोहळा सर्वांत जुना सोहळ्यापैकी एक मानला जातो. सन २०१५ मध्ये या

सोहळ्यास ३०६ वर्ष पूर्ण होतात.[२२]आदिशक्ती मुक्ताई जगन्माता मुक्ताई ब्रम्हाचित्कला मुक्ताई योगमाया मुक्ताई श्री संत मुक्ताई अशी उपाधी मुक्ताई यांना त्यांच्या शक्तीनुसार दिल्या आहेत. निवृत्तीनाथ ज्ञानदेव सोपानदेव व मुक्ताई हे चौघे भावंडे अवतार मानले जातात यांच्या नावावरून एक सूत्र मांडले जाते. निवृत्ती स्वीकारून ज्ञान मिळवावे ज्ञान मिळाल्यानंतर मुक्तीकडे जाण्याचा सोपान म्हणजे जिना (मार्ग ) मिळतो. म्हणजेच पुढे मुक्ती प्राप्त होते. अर्थात निवृत्ती– ज्ञानदेव – सोपान – मुक्ती.या भावंडानी वेगवेगळ्या ठिकाणी समाधी घेतली. वारकरी सांप्रदायाचे महान कार्य संपल्यानंतर या चौघांनीही समाधी घेण्याच्या निर्णय घेतला. त्यापैकी सर्वांत लहान मुक्ताई ह्या कोथळी या भागात विजेच्या लोळात सुप्त झाल्या व त्यानंतर हे स्थान मुक्ताईनगर या नावाने पुढील काळात नावारूपाला आले. या मुक्ताईने आपल्या आयुष्यात १४०० वर्ष तपश्चर्या करणाऱ्या चांगदेवाला आत्मज्ञान देऊन त्यांचे गुरूत्व स्विकारले म्हणुन योगी चांगदेवाला त्यांनी शिष्यत्व देऊन त्याला योग्य मार्गावर आणले. त्यांचा अहंकार नष्ट करून मुक्तीचा मार्ग दाखविला असा लौकिक लहान मिळविणारी संत म्हणून मुक्ताबाई कडे पाहिले जाते.

या संदर्भ मुक्ताई वर्णन केलले आहे.

तापी नराकवाशी श्री चांगदेव
ज्ञान बोधुनी त्यास दिधले वैभव
योग्याची ती मूर्ती निरसोनी सर्व
माया मिथ्या दावी नित्य स्वयंमेव
जय देवी जय देवी जय मुक्ताबाई
शेषाद्री यांची आरती[२३]

या महान चित्कला मुक्ताई चे संत श्रेष्ठ एकनाथ महाराज देखील वर्णन करतात.

जगत्रय जननी मुक्ताई माते
कृपा करी वरहस्ते आम्हावरी
आदीनाथ अनुग्रह नाथासी दिधला
नाथे हस्ते ठेविला मस्तकी तुमच्या
बाळलीला केली जगी ख्याती मिरविली
चांगयाची हरली चौसष्ट कला

कळा पासस्टावी ज्ञानदेवे दाविली

चांगयाची विराली अहंममता

चांगदेव शरण काया वाचा मने

एका जनार्दनी म्हणे तैशापरी

तसेच मुक्ताई या नावाचा जप केला तर मोक्ष पद मिळते असे वर्णन ग्रंथात केलेले आहे.

मुक्ताबाई चतुर्विद्या । जो जप करील सदा ।

तो जाईल मोक्षपदा । सायुज्या संपदा पावेल[२४]

अशा या महान संत मुक्ताबाई यांची दिंडी इतर संताच्या सोहळ्याप्रमाणे आषाढी वारी साठी मुक्ताईनगर ते पंढरपूर हे ६५० कि. मी. प्रवास करते. हा प्रवास ३४ दिंवसानंतर पालखी पूर्ण करून पंढरपुला पोचते. सुरूवात १८५३ साली सखाराम महाराज गोदुजी यांनी केली.[२५] पालखी प्रस्थान सुरूवात आषाढ शुद्ध ४ या दिवशी तिथीनुसार होते. तर पालखी पंढरपुरात आषाढ शुद्ध सप्तमी असा ३४ दिवस प्रवास करत पोचते. तिथीनुसार हा पालखी सोहळा प्रवास असतो. तिथी क्षय झाल्यास प्रवास दिवस कमी होतात. तर कधी तिथीनुसार प्रवास दिवस जास्तही होतात. तिथीमुळे काही ठिकाणी मुक्कामाचे दिवस वाढविले जाते. प्रवासाचे अंतर लक्षात घेऊन मुक्कामाचे दिवस त्या ठिकाणाचे मुक्काम ठरविले जातात परंत पालखी प्रस्थानाची तिथी व पालखी पोचण्याची तिथी यामध्ये परंपरेनुसार कोणताही बदल केला जात नाही. ही दिंडी पालखी सोहळा श्री संत मुक्ताबाई संस्थान कोथळी यांच्याद्वारे काढला जातो. या संस्थानाचे अध्यक्ष श्री भैय्यासाहेब ॲड रविंद्र प्रल्हादरावजी पाटील विश्वस्त कार्यकारी मंडळ व वारकरी यांच्या नेतृत्वाखाली तर दिंडी चालक श्री ह.भ.प. रविंद्र महाराज हरणे तर व्यवस्थापक म्हणून विनायक पाटील ह.भ.प निवत्ती महाराज वक्ते हे सर्व मंडळी नियोजन करतात. या दिंडी सोहळ्याबरोबर ह.भ.प. पंजपबराव महाराज दिलीपराव महाराज वासुदेव शास्त्री दिलीपबापू महराज प्रल्हाद महाराज सुळेकर हे किर्तन कार असतात. रात्री मुक्कामाच्या ठिकाणी हरीकीर्तन कार्यक्रम करत असतात.[२६]

या पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यामध्ये मध्य प्रदेशातील खांडवा व महाराष्ट्रातील अकोला, बुलढाणा, अमरावती, जळगाव या जिल्ह्यातील जवळपास एक हजार वारकरी सहभागी असतात.सर्व सहभागी वारकरी दिंडीत प्रवेशासाठी ३५० इतकी अल्प रक्कम भरत असतात. आपल्या बरोबर अंथरूण पांघरूण घेऊन येत असतात. वारकऱ्यांना ओळखीसाठी छापील बिल्ले

देण्यात येतात. हे बिल्ले वारकरी आपल्या जवळ वारी संपेपर्यंत ठेवतात.अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने वारकरी दिंडीत प्रवास करतात. रोजचा दैनंदिन कार्यक्रम ठरल्याप्रमाणे प्रवासात होत असतो. नेहमीचा ठरलेला सकाळचा विसावा दुपारचे जेवण व रात्रीचे मुक्काम व जेवण व्यवस्था नियमित रोज होत असते.दिंडीत रोजचे नियमित कार्यक्रम झाल्यांनतरच रात्रीचे वेळी झोपण्यापूर्वी वारकऱ्यांना अंथरून पांघरून दिले जाते. हे सर्व साहित्यासाठी एक ट्रक दिंडीकडून उपलब्ध केलेला असतो. रोजचे नास्ते जेवण यासाठी अननदाते यांच्याकडून सोय केलेली असते. मुक्ताईची पालखीसाठी एक रथ असतो. रथ ओढण्यासाठी बैलाचा वापर होत असतो. पंढरपुरात पालखी पोचल्यानंतर संध्याकाळी पाच वाजता सुत मुक्ताबाई पांदुकांचे चंद्रभागा स्नान व पंढरपुरात प्रवेश होतो.

**मुक्ताबाई पालखी सोहळ्यातील नियम.**

१) दिंडीत प्रवेशकरतेवेळी प्रत्येकाच्या गळ्यात तुळशीची माळ असावी तसेच पांढरा पायजमा धोतर नेहरू शर्ट गंध असा गणवेष असावा .
२) आपण घरून परमार्थ करण्याकरिता आलेलो आहे हे वेळोवेळी ध्यानात ठेवावे .
३) पालखी सोहळ्यात आपण आपले स्वतंत्र मत किंवा इतर सूचना न मांडता व्यवस्थापकाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे व त्यांच्याकडून निराकारण करून घ्यावे .
४) महिला वारकऱ्यांनी वाटचाली मध्ये नामस्मरण भजन करीत नंबरप्रमाणे चालावे.
५) वारकऱ्याने सोबत अवजड सामान गरजपेक्षा जास्त ओझे मौल्यवान वस्तू दागिने मोबाईल गरजेपेक्षा जास्त रोख रक्कम सोबत घेऊ नये .
६) पालखी सोहळ्यात जीवित व वित्तहानी याची जबाबदारी ज्याची त्यांच्यावर राहील त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.
७) पालखी सोहळ्याबरोबर ५० वर्षाच्या आतीलच स्त्री पुरूषांना प्रवेश मिळेल वृद्ध रोगी भिकारी लहानमुले यांना प्रवेश दिला जाणार नाही.
८) किर्तनाला सर्व वारकऱ्यांना हजर राहावेच लागेल.
९) दिंडी सोहळ्यात आपणहून दुसऱ्यास त्रास होईल असे वागू नये .
१०) गावागावी पाणी टंचाईमुळे टँकरवर हातपाय धुणे अंघोळ करणे टाळावे पाण्याचा पिण्यासाठीच वापर करावा.

११) पालखी सोहळ्यात नियमांचे पालन न केल्यास दिंडीतून काढून दिले जाईल .

१२) सोहळ्यासोबत भजन करत चालावे मागे पुढे जाता येणार नाही चालू दिंडी मध्ये भजन चालू असताना बाहेर लघुशंकेसाठी जावू नये.

१३) दिंडीत प्रवेश करतेवेळी पताकाधारी व टाळकरी व्यतिरिक्त वारकऱ्यांनी प्रत्येकी ३५० देणगी द्यावी

दिंडीसोबत सर्व संत मुक्ताबाई वारकरी फडावरील कीर्तनकार सेवेकरी भजनीमंडळी हजर राहतील.दिंडी पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्ताई मठ दत्तघाट येथे मुक्कामासाटी असतो. पंढरपूर येथे पौर्णिमेचा काला झाल्यानंतर दुपारनंतर पंढरपुराहून मुक्ताईनगर कडे परतीचा प्रवास सुरू होतो. परतीचा प्रवास करत जवळपास २१ दिवसात श्रावण शुद्ध ६ ला मुक्ताईनगर ला पालखी पोचते. पालखी परत पोचल्यानंतर पालखी आगमन सोहळा नंतर नवीन मंदिर जुने मंदीर कोथळी मुक्ताईनगर भव्य मिरवणुक व दिंडी स्पर्धा समारोप होतो. यानंतर श्री ह.भ.प. रविंद्र महाराज हरणे पा. दिंडी मालक यांचे काल्याचे कीर्तन होते. नंतर बक्षीस समारंभ व पायी चालत आलेल्या वारकऱ्यांना संस्थानतर्फे कपडे वाटप होऊन दिंडी कार्यक्रमाची सांगता होते.

### ६.५ संत एकनाथ महाराज दिंडी प्रवास क्षेत्र पैठण ते श्रीक्षेत्र पंढरपूर

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू व शांतीब्रम्ह पैठण निवासी एकनाथ महाराज यांचे वारकरी संप्रदायात व महाराष्ट्राच्या सामाजिक व वैचारिक परिवर्तनात मोठे योगदान आहे. इ.स.१५२४ ते १५९० या काळात संत एकनाथ महाराज यांनी गंरूपरंपरा अभंग गाथा,व एकनाथी भागवत या साहीत्याद्वारे कीर्तनाच्या माध्यमातून समाजात ईश्वराची शक्ती व ईश्वर विषय ज्ञान ते मिळवण्याचा भक्तीमार्ग व साधने पोचविले. मागसलेला व अंधश्रध्देने गुरफटलेल्या समाजाला सत्यवादी व भक्तवादी बनवण्यासाठी भारूडे,गौळणीची रचना केली.हे महान कार्य करून पैठण येथे गोदावरी नदीत आपले शरीर अर्पण केले. दरवर्षी नाथ षष्ठीला पैठण येथे मोठा उत्सव भरतो. महाराष्ट्र व बाहेरील वारकरी, समाज येथे जमा होतो. पांडुरंगाचे निष्ठावान भक्त एकनाथ महाराज असल्याने त्यांची पंढरपूर, आळंदीची वारी परंपरा त्यांच्या पुढे चालू राहण्यासाठी पैठणने पंढरपूर पायी दिंडी सुरू केली.संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांचा पालखी सोहळा सुरू झाल्यानंतर १८४५–४६ दरम्यान एकनाथ महाराजांचे वंशज व भक्त नवेगावचे रामभाऊ जनार्दन मुळे यांनी संत एकनाथांची पैठणहून पंढरपुरला पालखी नेण्याची प्रथा सुरू केली.[२७]

त्यांना आसेगाव व मुंगी येथील भाविकांनी पालखी सोहळ्याला मोलाची मदत केली. त्यामुळे एकनाथ महाराजांच्या या पालखी सोहळ्यात पालखीच्या उजव्या दांडीचा मान रामभाऊ मुळे यांना तर आसेगाव व मुंगी येथील भावीकांना पालखीच्या डाव्या दांडीचा मान परंपरागत देण्यात आलेला आहे. पालखीचा मुख्य मान नाथ वंशीकडे आहे. पण अशी एक परंपरा होती की,आषाढी वारीत गोपाळ काला झाल्यावर पांडुरंगाच्या अंगावरील कपडे रामभाऊ यांना देण्याचा होता. ही परंपरा १९५४ पर्यंत चालू होती. पुढे ही रामभाऊची ही परंपरा काशीनाथ,सखाराम,दामोदर,यांनी चालवली. अशी एक विषेशता म्हणजे आषाढी वारीच्या अगोदर असलेल्या जेष्ठ महीन्यातील पंढरपुरच्या वारीला पंढरपुरला पालखी सह येण्याचे आमंत्रण या वारीला दिले जाते म्हणून या वारीला अक्षदा पैठणला रामभाऊ यांच्या नावाने देण्यात येते. अर्थात त्यांच्या कार्यामुळे हा मान आजही चालू आहे. त्सांची समाधी पैठण जवळच असणाऱ्या नवेगाव येथे आहे. आज पैठणहून एकनाथ महाराज यांचा पालखी सोहळा रामभाऊ यांच्या समाधी ठिकानी थांबून आरती होते.[२८] रामभाऊ महाराज मुळे यांच्या शिष्यांनी व नवेगाव व आसपासच्या गावातील लोकांनी त्यांच्या नावे पायी दिंड्या सुरू करून एकनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होतात. जेष्ठ वद्य सप्तमीला पैठण येथे एकनाथ महाराजांच्या मंदिरातून नाथांच्या पादुका नाथांचे वंशज पालखीत ठेऊन रथामध्ये पालखी ठेवून संपूर्ण पैठण शहरात वाजत गाजत भजन व हरिनामाच्या गजरात टाळ मृदंग व नंतर पंढरपुरकडे पालखी मार्गस्थ होते. सकाळी ९ वा.पालखी प्रस्थान मंदिरातून सुरू हाते. रात्रीचा मुक्काम चनकवाडी येथे असतो.

**पालखी सोहळा मार्ग व मुक्काम**

चनकवाडी– हादगाव – लाडजवळगाव –कुंडलपारगाव –मुंगसवाडा– राक्षसभुवन –रायमोह – पाटोदा दिघोळ–खर्डा –दांडेगाव –अनाळे –परंडा– बिटरगाव – कुर्डू –करकंब – होळे – पंढरपूर. श्री एकनाथ महाराज पालखी जेष्ठ वद्य सप्तमीला पैठणहून निघते तर आषाढ शु.१० दशमीला पंढरपुरात पोचते. एकूण १७ दिवसाचा प्रवास करत पालखी पंढरपुरात दाखल होते. पंढरपुरातील एकनाथ मंदिरात पालखीचा मुक्काम असुन पौर्णिमेला काला झाल्यानंतर पालखी पैठणकडे परतीचा प्रवास सुरू होतो.पंढरपुर ते पैठण परतीचा मचर्क्ष व मुक्काम आषाढ शु. १५ पौर्णिमेला एकनाथ महाराजांची पालखी पैठणकडे परतीच्या प्रवासाला निघते. ११ दिवस पायी प्रवास करत पालखी आषाढ कृ.एकादशीला पैठणला पोहचते. तेथे पालखी सोहळयाचा सांगतेचा

कार्यक्रम होतो. सर्व वारकरी ,दिंडीतील मानकरी व जेष्ठ वारकरी ,सेवक,चोपदार,यांना नारळ दिला जातो. पुढील वर्षाचे वारीचे निमंत्रण दिले जाते.

**परतीचा मार्ग –** बार्डी–निमगाव–देवीचा माळ–हाळगाव–जामखेड–डोंगर किन्ही गोमळवाडा–टेंभुर्णी–येळी–शिंगोरी–पैठण

## ६.६ श्री गजानन महाराजांचा दिंडी प्रवास क्षेत्र शेगाव ते क्षेत्र पंढरपूर

महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक स्थळापैकी क्षेत्र शेगाव हे एक पवित्र क्षेत्र मानले जाते. अलिकडच्या संतामध्ये गजानन महाराज शेगावचे प्रसिद्ध विभूती मानली जाते. संत परंपरेनुसार निळोबारायाच्या नंतर महाराष्ट्रत धार्मिक विचाराची नवीन परंपरा सुरू करण्यात संतांपैकी गजानन महाराज शेगाव यांचे नाव घेण्यात येते.गजानन महाराजांचे समाधी स्थळ शेगाव हे होय. आध्यात्मिक क्षेत्रात उत्तुंग भरारी त्यांनी घेतली भक्ती, त्याग आणि ज्ञान यांचा प्रसार त्यांनी महाराष्ट्रभर केला. समाजातील अज्ञान दारिद्र्य अंधश्रद्धा दूर करून समाजाला ज्ञान देऊन समाजाची उन्नती घडवून आणण्याचे मोलाचे कार्य केले. आज महाराष्ट्र व बाहेर जगभर अनेक अनुयायी गजानन महाराजांचे आहे. शिस्तप्रिय व शांतता हा त्यांच्या विचारसरणीचा गाभा मानला जातो. येणाऱ्या सर्व भाविकांना निवास व मोफत भोजन हा त्यांचा आगळा वेगळा उपक्रम त्यांनी सुरू केला आहे. गजानन महाराज शेगाव संस्थानच्या वतीने सर्व धार्मिक क्षेत्रात निवासी भक्तनिवास उपलब्ध असून तेथे भोजन व्यवस्था व अल्प मूल्य घेऊन निवास व्यवस्था करण्यात येते. मोठमोठ्या भव्य देणग्या प्रेक्षणीय इमारती हे त्यांच्या बांधकामाची महत्त्वाची वैशिष्टये आहे. अशा पवित्र संताची त्यांच्या पवित्र समाधी क्षेत्र शेगाव ते पंढरपूर अशी पायी दिंडी पालखी सोहळा १९६८ पासून सुरू केला.[२९] आपल्या सर्व भक्तांना पवित्र ठिकाणच्या भेटीतून सक्षम बनविणे या उद्देशाने त्यांनी पालखी सोहळा सुरू केला. महाराष्ट्रातील सर्वांत लांब अंतर पार करून पंढरपुरला पोचणारी पायी दिंडी अशी ख्याती या दिंडीची आहे. शेगाव ते पंढरपुर ७५० कि.मी अंतर व पंढरपुर ते शेगाव परतीचे प्रवास अंतर ५५० कि.मी. आहे. एकू ण ही दिंडी १३०० कि. मी. पायी प्रवास करते. समाजातील वाईट प्रवृत्ती अंधश्रद्धा निर्मूलन करत भजन अभंग व नामस्मरण करत इतर दिंड्याप्रमाणे नित्यक्रम करत ही दिंडी पुढरपुरात पोचते. या आषाढी वारीसाठी पालखी ही चांदीची बनविली आहे. त्यासाठी बनारस उत्तरप्रदेश येथून कारागीर आणले गेले. आधुनिक पालखी बनविण्यात आली.

**गजानन महाराज पालखी प्रवास मार्ग**

श्री क्षेत्र नाजरी– क्षैत्र शिरपूर –जैनक्षेत्र नरसी– नागदेव क्षेत्र औढा नागनाथ – क्षेत्र गंगाखेड – क्षेत्र परळी वैजनाथ –अंबाजोगाई – क्षेत्र तुळजापूर –सोलापूर –मचनूर –मंगळवेढा – क्षेत्र पंढरपूरसर्व पवित्र क्षेत्रांना भेट देत ही पालखी पंढरपुरला पोचते. वारकऱ्यांना व सर्व भक्तांना क्षेत्रांना भेट देता यावी यात्रा घडावी हा प्रयत्न संस्थानचा असतो.

**परतीचा मार्ग**

कुरूमदास क्षेत्र बार्शी –कुंथलगिरी– कपिलधारा– शहागड जालना– न्हावा –सिंदखेड– राजालोणार मेहकर– खामगाव –शेगाव

**६.७ चैतन्य महाराज यांची दिंडी क्षेत्र ओतुर ते पंढरपूर**

जगतगुरू श्री संत तुकाराम महाराजांचे गुरू श्री चैतन्य महाराज यांची समाधी श्री क्षेत्र ओतूर येथे आहे. माघ शु. दशमीला तुकाराम महाराज यांना स्वप्नात येऊन चैतन्य महाराजांनी गुरूमंत्र दिला. राम कृष्ण हरी हा मंत्र सांगितला.

बाबाजी आपुले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्णहरी ।।

माघ शु.दशमी पाहुनी गुरूवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।

या अभंगावरून हे स्पष्ठ होते की बाबाजी चैतन्य हे तुकोबांचे गुरू आहे. ज्या तुकोबांना ईश्वर साक्षात्कार व अध्यात्मिक ज्ञान घडवून दिले. पंढरीच्या पाडंरुगाची भक्ती करण्याची बुध्दी दिली. त्यानंतर तुकोबाराय संतत्वा पर्यंत पोहचले. असा सदगुरू चैतन्याची आपल्या परमेश्वराला भेटण्याची परंपरा सुरू ठेवण्यासाठी ह.भ.प. कोंडाजी बाबा डेरे या सदगरूंनी चैतन्य महाराजांची दिंडी स्थापना केली. १९६१ सालापासुन आजपर्यंत सन २०१५ पर्यंत चैतन्य महाराज पायी दिंडी सोहळा ओतूर ते पंढरपूर सुरू आहे.[३०] अनेक संताच्या दिंड्या वर्षातुन एकदाच तिर्थक्षेत्राला पायी दिंडी नेत असतात. परुंतु हे या संताची दिंडी वर्षातून कार्तिक व आषाढी अशा दोन वेळेला पंढरपुरला जाते. ओतूर येथे या पायी दिंडी नियोजनासाठी श्री चैतन्य महाराज सेवा मंडळ वारकरी समाज जुन्नर आंबेगाव या संस्थेची नोंदणी करण्यात आली. या दिंडीत पुणे जिल्ह्यातील नगर जिल्ह्यातील वारकरी सहभागी होतात. ओतूर ते पंढरपूर एकूण ३५० किमी हे अंतर पायी १६ दिवसात पूर्ण करतात. इतर दिंड्याप्रमाने या दिंडीत रोजच्या रोज सकाळी काकडा,दंपारी नाटाचे अभंग,गौळणी सुध्याकाळी हरीपाठ, रात्री कीर्तन असा कार्यक्रम असतो. दिंडी मध्ये रोजच्या

सेवेसाठी दोन ट्रक,दोन जीप,एक पाण्याचा ट्रँकर व एक मोटार सायकल अशी वाहने असतात. पुणे जिल्हा परीषदेने पाण्यासाठी एक ट्रँकरची व्यवस्था केली आहे. वारकऱ्यांच्या औषधांची व्यवस्था दिंडी मार्फत केली जाते. रोजच्या वाटचालीमध्ये किर्तन व प्रवचन सेवेसाठी हभप बोडके महाराज,मांडे बाबा,दातखीळक महाराज,गुंजाळ महाराज,व शेरे मीराज,तांबे मीराज सहभागी असतात.

या दिंडीचे वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे दिंडीचे विणेकरी म्हणून वयाच्या नवव्या वर्षापासुन मारूती महाराज गावडे हे आहेत.[३१] या दिंडीत रोजच्या भजनाशिवाय व्यसन मुक्ती व अंधश्रद्धा निर्मुलनासाठी प्रवचन, कीर्तन व भारूडाद्वारे जनजागरन केले जाते. यासाठी बाबा महाराज चव्हाण,हरिचंद्र पोरे,श्री नेहरकर,सौ. पोहरकर,इ. मंडळी जनजागरण करण्यासाठी असतात. या दिंडीमध्ये महिला प.वचनकार देखील सहभागी होतात. यामध्ये मीराबाई जुंदरे,सुमनबाई जुन्नरकर व जिजाबाई पुंडे. ग्रामीण भागातुन जाणारी ही आगळी वेगळी समाजातील तरूण वर्गाला प्रोत्साहित करणारी ७० टक्के तरूणाचा सहभाग असलेली व्यसनमुक्त दिंडी म्हणुन प्रसिद्ध आहे.

### ६.८ ज्ञानेश्वर महाराज दिंडी नेवासे क्षेत्र नेवासे ते पंढरपूर

क्षेत्र नेवासा हे महाराष्ट्र प्रांतातील अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरेच्या तीरावर अनादी कालापासुन वसलेले ऐतिहासिक सांस्कृतिक व धार्मिक वारसा सांगणारे एक उत्तम क्षेत्र आहे. श्री क्षेत्र नेवासा मध्याभागात श्री विष्णुचे मोहिनी रूप धारण केलेले अती सुंदर हेमांडपंती पद्धतीने बांधलेले मंदिर आहे. त्या मंदिराच्या धार्मिक इतिहास भागवत पुराणामध्ये येतो. यानुसार

जेथे चोरूनी घेता अमृत ग्रासा निवटीला राहुचा घसा ।
तया कंदबावरी म्हाळसा वास नेवासा पै केला ।।[३२]

पुराणातील कथेनुसार समुद्र मंथन झाले देव व दानव यांच्या समुद्र मंथनाच्या वेळी जी चौदा रत्ने बाहेर पडली त्यामध्ये अमृतही होते. अमृताचा वाटा देवांना की दानवांना द्यावा यावरून देव दानवामध्ये भांडण सुरू झाले. हे भांडण मिटविण्यासाठी श्री विष्णुदेवांनी अति सुंदर असे मोहक स्त्रीचे रूप धारण केले व अमृत कळस आहाह घेऊन देव दानवांना अमृत वाटण्यासाठी पंक्तीत बसविण्यास सांगितले. मोहिनीरूपातील विष्णु देवांनी एकाच भांड्याचे दोन विभाग करून देवांना अमृत व दानंवाना मदिरा देण्यास सुरूवात केली विष्णची ही चातुर्य ओळखून राहु दानव रूप बदलून देवांच्या पंक्तीत जाऊन बसला तो देवांनी ओळखला. मोहिनी रूपातील विष्णु देवांनी

राहुचा हा कावा ओळखून अमृत प्राशनाच्या आतच सुदर्शन चक्राने त्याचा शिरच्छेद केला हा प्रसंग नेवासा येथे घडला. म्हाळसा मोहिनीराज होय या मोहिनीराज अवताराविषयी महानुभव पंथांचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळाचरित्र या ग्रंथामध्ये उल्लेख येतो.

साधे म्हाळासी पांडु गेला तव तिथेचे अलंकार ।

फेडीले असे मागुती केली तव शृंगार केला असे ।

पाटाऊ साऊ ला नेसली असे पाटाऊ चोळी कांकणे भरली असे

महालय महात्म्य या ग्रंथात मोहिनीराज रूपात बद्दल असे वर्णन येते दक्षिणे भागी गोद्या दक्षिणे तटे पंचकोशात्मक क्षेत्र प्रवर यंत्र नदी शुभा तथा पाप ह्या लोक विशाल भक्ती मुक्तींदा तथा निधी निवास मोहिनीराजांच्या निवास स्थानावरून नेवासे हे आजचे प्रचलित नाव पडलेले आहे. मोहिनीराज नेवासे येथील नेवासे यांचे वर्णन

प्रवरातीर निवासीनी निगम प्रतिपदा

पारावर विहरणी नारायणी हवे ।[३३]

पंढरपूर येथील कागदपत्रात श्री माळशी देवी असाच रूपाबद्दल उल्लेख आढळतो.[३४]नेवासा या क्षैत्राबद्दल परंपरागत वर्णन स्कंदपुराणात महालाया महात्म्य यामध्ये माहिनी अवताराबद्दल वर्णन येते. यासंदर्भात वाय आर गुप्ते भारत इतिहास संशोधक मंडख यांनी प्राचीन अवशेष या त्रैमासिक मध्ये वर्णन केलेले आहे.[३५]

शके १२०० बारोत्तरे ।

तै टीका केली ज्ञानेश्वरे ।

श्री सच्चिदानंद बाबा आदरे । लेखकु जाहला ।।[३६]

असे वर्णन ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या आध्यायात सापडते. श्री संत ज्ञानेश्वर ज्ञानदेवांचे पणजे त्र्यंबकपंत आजोबा गोविंदपंत आजी मीराबाई वडील विठ्ठलपंत आणि आई रूख्मिणीबाई असे हे घराणे होते. ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत यांच्या वतनाचे गाव पैठणजवळील आपेगाव हे होते. क्षेत्र आळंदी येथील सिद्धोपंत कुलकर्णी यांची कन्या रूख्मिणी यांच्याशी विठ्ठलपंत यांचा विवाह झाला. पुढे विठ्ठलपंताचे संसारात मन रमले नाही म्हणून त्यांनी संन्यास स्वीकारला पुढे पुन्हा आपले गुरू यांच्या आज्ञेवरून संसार करू लागले. त्यांनंतर त्यांना यथाक्रम चार भावंडे झाली. निवृत्ती ज्ञानदेव सोपानकाका मुक्ताबाई पण संन्यशासाची मुले म्हणून त्याकाळातील लोकांना या कुटुंबाला त्रास

दिंला.विठ्ठलपंत व रूख्मिणीबाई यांनी आपल्या मुलासाठी देहान्त प्रायश्चितासाठी निघून गेले. यानंतर देखील या भावंडाना आळंदीत त्रास कमी झाला नाही. निवृत्तीनाथांनी पुन्हा आळंदी ब्रम्हवृंदाकडे आमचे वृतबंध करा आम्हाला शुद्धीपत्र द्या अशी विनंती केली. त्यांनी पैठणच्या बृम्हवंदाकडे शुद्धीपत्र आणावयास सांगितले. पैठणकर शुद्धीपत्र देत नाही हे ज्ञानदेवांनी पाहिल्यावर ईश्वर सर्वभूती आहे हे सिद्ध करण्यासाठी रेड्यासारख्या पशुकरवी वेद उच्चारले.

ज्ञानदेव म्हणे बोल रे ऋग्वेद ।
ओंकार हा तुळ शब्द प्रणवाचा ।।

पैठणवरून आळंदीकडे येताना वरती वर्णन केलेल्या क्षेत्र नेवासे येथे करविरेश्वराच्या मंदिरात चार भावंडांनी मुक्काम केला. हे क्षेत्र नेवासे त्रिभुवने पवित्र असे स्थान होते या ठिकाणाविषयी डॉ.एच.डी. साकलीया यांच्या मते ज्ञानेश्वर महाराजाच्या मंदिराचा परिसर सुमारे एक दीड लाख वर्षापासून एक अति रमणीय व पवित्र तसेच एका प्रगत संस्कृतीचे स्थान असावे. तर सन १९५३–५४ साली डेक्कन कॉलेत पुणे येथील पुराण वास्तु संशोधक विभागाचे डॉ साकलीया सौ इरावती कर्वे व सहकाऱ्यांनी ज्ञानेश्वर मंदिराच्या उत्तरेस ज्या टेकड्या यांचे उत्खनन केले यावरून प्रवरा गोदावरीच्या खोऱ्यात मानव वस्तीचे स्थान हे अश्मयुगीन ताम्रपानयुगीन व सातवाहन काळातील असा निष्कर्ष निघाला. त्या काळात ग्रीक रोम या देशांशी व्यापार चालत होता हे प्राचीन काळातील व पवित्र ठिकाण आहे क्षेत्र नेवासे या क्षेत्राचे वर्णन करणारा शिलालेख ज्ञानेश्वर मंदिराच्या परिसरातील कनैरेश्वराच्या मंदिरातील आहे त्यावरील वर्णन स्वास्ते श्री शके ११६१ विकारी संवत्सरे श्री कर्ण स्वर देवालये पुराण वृत्तीकर शौनकगोत्रीय माध्यर्दिन श्री शीलु पंडीतः ।।तया पांची सीमागारे ।।पुरावृत्ती भुमी निर्वर्तने सर्वनमसे अठरा इये भुमी कणैरेश्वरीदेवी भुली हे भूमी देवे पुरूषेण जीवनादिधली ।।[३७] अशा पवित्र क्षेत्री श्री निवृत्तीनाथांनी आपले छोटे बंधु संत ज्ञानेश्वर महाराज यांना ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सांगण्यास सांगितले श्री ज्ञानेश्वर महाराजांनी करविरेश्वराच्या मंदिरात पवित्र खांब यास पैस असे म्हटले जाते. या मंदिरावर चंद्र सूर्य यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. याच खांबाला पाठ देवून ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी सांगितली व सच्चिदानंद बाबांनी लिहिली याच खांबाचे आज ज्ञानेश्वर मंदिर तयार आहे. हे बांधण्याच्या अगोदर अनेक वर्ष हे ठिकाण १५ व्या शतकानंतर काळाच्या ओघात नाश झाले. तो पवित्र खांब मात्र आपले आस्तित्व टिकवून होता. सर्वप्रथम जळके खूर्द येथील श्री परदेशी यांनी पवित्र खांबाचा जिणोद्धार केला. व छोटेसे

मंदिर बांधले त्यांनतर १९१७ सुमारास कृष्णाजी त्र्यंबकजोशी व वकील व इतर ग्रामस्थांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला पाच खणाचे १८ बाय १८ फुट गाभाराचे मंदिर बांधले दरवैद्य एकादशीला २० ते२५ लोक येऊन मंदिरात भजन करत ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या निर्मितीनंतर याच मंदिरात ज्ञानेश्वर महाराजांनी अनुभव सांगणारा अनुभवामृत येथेच लिहिला असे एक मत पुढे येते. त्यांनंतर १८०० पर्यंत या क्षेत्राचा विकास झालेला नव्हता अशा स्थितीत ईश्वर प्रतीत भगवान भक्त गुरूवर्य प.पूज्य ह.भ. प. बन्सी महाराज तांबे यांचे आगमन येथे झाले तो काळ चैत्र वैद्य एकादशी १९३९ असा होता. आल्यांनतर त्यांनी श्री ज्ञानेश्वरी मंदिर हे दुर्लक्षित होते. ते उर्जित अवस्थेत आणण्यासाठी महाराजांनी आपल्याबरोबर लोकांनाही घेऊन १९३९ ते १९४९ या संकटमय काळात अफाट परिश्रम घेतले त्यांनी या काळात नेवासे मंदिराचा कार्य केले या कामासाठी त्यांनी मंदिराचा कायदेशीर कब्जा मिळविला. त्यांनी १६/०६/१९४७ या दिवशी जिर्णोद्धाराच्या कार्यासाठी खालील मंडळीचा समावेश प्रथम करण्यात आला.

| | |
|---|---|
| १. बन्सी महाराज तांबे | २. बा. श. देवचक्रे |
| ३. श.य. फाटके | ४. हिरालाल जे गांधी . |
| ५. अ.रा. पवार | ६. आ.ग. पाटील |

७. न .वा.शहापुरकर ही प्रमुख मंडळी होती या सर्वांनी मिळून ३० –४० हजाराची वस्तू उभी करण्याचे ठरविले. बन्सी महाराजांनी गावोगावी लोकांना भेटून पैसा उभा केला. कामाच्या पूर्णतत्वाचा उद्घाटन सोहळा २२/०३/१९६३ रोजी महाराष्ट्राचे वारकरी सांप्रदयाची महान विभुती ह.भ.प. प.पु. गु. धुंडा महाराज देगलुरकर यांच्या हस्ते व सर्व श्री रावसाहेब पटवर्धन यांच्या उपस्थित मोठ्या थाटामाटात व उत्साही वातावरणात पार पडला.ज्यांनी आपले आयुष्य फक्त नेवासे क्षेत्र ज्ञानेश्वरी मंदिरासाठी वेचले ते बन्सी महाराज तांबे यांची जीवन ज्योत २५/१०/१९९४ सन मंगल वातावरणात काकडा आरती भजनात मालवली त्यांचे निर्वाण समाधी मदिर ज्ञानेश्वरी मंदिराच्या समोर बांधण्यात आले त्यांच्या समाधी उत्सव दरवर्षी साजरा होतो. असा महान तपस्वी कर्मयोगी बन्सी महाराजा यांनीचद पंढरपुरला क्षेत्र नेवासे ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा सुरू केला. सन १९६४ साली या दिंडी सोहळ्याला सुरूवात झाली आज या सोहळ्याचे मोठे स्वरूप झाले आहे. श्री क्षेत्र नेवासे ते पंढरपुर हे २५० कि. मी. इतके अंतर आहे ते अंतर पायी १० मुक्काम करून पंढरपुर येथे पोचते .या दिंडीमध्ये ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी असते या पालखीमध्ये

ज्ञानेश्वरांची चांदीचीमुर्ती व ज्ञानेश्वरांची प्रत ठेवली जाते. या दिंडीचे मालक सध्या ज्ञानेश्वरी संस्थानचे अध्यक्ष व सर्व सदस्य असतात. माधवराव भिकाजी दरदले. मॅनेजींग ट्रस्टी तसेच उत्तमराव मोटे बापु कर्डिले ह.भ.प. शिवाजी महाराज देशमुख तसेच गोविंद महाराज गाढे श्रीराम पेहरे इ. मंडळी असतात. प्रवासात रोज २०–२५ कि.मी एवढे सरासरी अंतर कापले जाते. दिंडीत समाविष्ट होण्याच्या वारकऱ्याकडून कोणतीही रक्कम शुल्क म्हणून स्विकारली जात नाही ते या दिंडीचे वैशिष्ट्ये आहे. तसेच दुसरे विशेष म्हणजे दिंडीत सहभागी सर्व वारकरी रस्त्याने ध्वनीक्षेपकातून सुरू असलेले एकच भजन करत जातात या दिंडीमध्ये दैनंदिन कार्यक्रम परंपरेनुसार नियमित पार पडतात. काकडा आरती भुपाळ्या हरीपाठ भजन प्रवचन कीर्तन हे नियमित व दररोज चालू असतात. दिंडीचे सर्व साहित्यिक सोयीसाठी दोन ट्रक एक टँकर व एक पालखी अशी वाहने दिंडीसोबत असतात. जवनासाठी देणगीदार यांच्या कडून रोजच्या पंक्ती ठरविलेल्या असतात. दिंडीचा मार्ग श्री क्षेत्र नेवासा –उत्सल –दुमाला –घोडेगाव –दरेवाडी –शिराढोण –घोरगाव –मिरजगाव –चापटगाव –देवकाळी–कविटगाव–टेंभूर्णी–चापडगाव–कुरकुंब–पंढरपूर असा आहे. एकूण १० मुक्कामात ही दिंडी पंढरपुरला पोचते.[३८]

### श्री साईबाबा यांची क्षेत्र शिर्डी ते पंढरपूर दिंडी सोहळा

श्री क्षेत्र शिर्डी हे अहमदनगर जिल्ह्यातील साईबाबाचे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. सर्व सामान्यापासुन ते श्रीमंतापर्यंत सर्व भाषिक भक्त दर्शनासाठी येतात. श्रद्धाळु भावीक भक्तांना साईबाबा हे आदराचे व प्रसन्न होणारे ठिकाण मानले जात. महाराष्ट्रातील व जगातील अनेक भक्त येथे भद्धेने येतात. साईबाबांना आपली ईच्छा बोलुन दाखवतात. बाबा प्रसन्न होतात या आशेवर अनेक भाविक प्रचंड देणगी येथे देऊ करतात. श्रीमंत लोकांचा येण्याचा मोठा ओढ येथे असतो. त्यामुळे या देवस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात देणग्या गोळा होतात. सोन्याच्या स्वरूपातही अनेक दागीने गोळा होतात. महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत व देशातील श्रीमंत देवस्थानापैकी एक देवस्थान म्हणुन शिर्डी देवस्थानाचे सध्या नाव घेतले जाते. ईश्वर विभूती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. साईबाबा आयुष्यभर दिन दुबळ्यासाठी ,सत्यवचनासाठी,लोकामध्ये जनजागृती करण्यासाठी परिम घेतले.ते विरक्त स्थितीत राहत. सर्वामध्ये ईश्वर आहे असे ते सांगतात. सबका मालीक एक है हे त्यांचे परमबोल मानले जाते. आज शिर्डी साईबाबा यांच्या मंदिरामुळे एक मोठे शहर बनले आहे. प्रचंड मोठी आर्थिक उलाढाल या शहरात होते. आधुनिक शहरीकरण येथे झपाट्याने वाढत आहे.

अशा या पवित्र ठिकाणाहून पंढरपूरकडे पायी दिंडी सोहळा सुरू झाला. शिर्डी ते पंढरपुरकडे जाणाऱ्या दिंडी सोहळ्याचे अगळे वेगळे वैशिष्ट्ये मानले जाते. शेकडो दिंड्या पंढरपुरला येतात. या दिंड्यापैकी शिर्डीची दिंर्डी वेगळी दिसते. ते यासाठी की ही दिंडी एकमेव दिंडी आहे की यामध्ये सहभागी वारकरी हे भटक्या जमातीमध्ये साठ टक्के वैदु समाजाचे वारकरी असतात. या सर्व लोकांना पारंपारिक व्यवसायातुन अलिप्त करून माळकरी बनवुन त्यांची पायी दिंडी सुरू केली. हे महान कार्य शिर्डी येथील लक्ष्मण महाराज वाघचौरे यांनी केले.

श्रेत्र शिर्डी ते पंढरपूर पायी दिंडीची लक्ष्मण महाराज यांनी १९६६ पासुन सुरू केली.[३९] यासाठी यांची प्रथमताः भटक्या जमातीच्या लोकांना भेटून त्यांना पंढरीच्या विठुरायाचे, आषाढी वारीचे व पायी दिंडीचे महत्व पटवुन दिले. व नंतर या भटक्या जमातीला व वैदु समाजाला वारकरी बनवण्यासाठी लक्ष्मण महाराज यांनी स्वतःचा किराणा व्यवहार सोडला व परमार्थ धरला. ते स्वतः तेली समाजाचे होते. परमार्थ क्षेत्राची पुरेपूर माहीती झाल्यावर त्यांना भटक्या जमातीच्या त्रासाची जाणीव झाली. या समाजाचा सर्वांगीण विकास करायचा असल्यास तर या आपल्या बांधवांना साक्षर करणे गरजेचे आहे. यासाठी पर्यंत्न करणे गरजेचे आहे. त्यांना त्यांच्या पारंपारिक व्यवसायातुन विशेषतः रान मांजर, मुंगूस, लांडगा, कोल्हा या प्राण्याच्या शिकारीपासून अलिप्त केले पाहिजे. हा विचार करून त्यांच्याकडून होणारी पशुहत्या टळेल व विचारांनाही बदल होईल म्हणून त्यांनी या समाजात फिरून सातत्याने प्रबोधन केले.या कार्यासाठी त्यांनी गावोगावी मेळावे घेतले. या मेळाव्यातत्यांनी तुळशीच्या माळीचे महत्व पटवून,पाडुरंगाच्या भक्तीतून मानसिक समाधान व साक्षरतेतून आर्थिक उन्नती होते या गोष्ट पटवुन दिल्या. त्यानंतर वैदु समाजातील काही व्यक्तीनी लक्ष्मण महाराज यांचा अनुग्रह घेतला व अल्पवधीत आपली उन्नती करून दाखविली. या लोकोची प्रगती पाहून या समाजातील इतर अनेक लोक महाराजाकडे अनुग्रह घेऊन आपले राहणीमान व विचार बदलले.[४०] यानंतर वाघचौरे महाराजांनी या बदललेल्या व वारकरी झालेल्या लोकांना एकत्र घेऊन महाराष्ट्रातील आषाढी वारीला पांडुरंगाला भेटण्यासाठी पंढरपुरकडे जाणारी पहिली वैदू समाजातील दिंडी सुरू केली.[४१] ६० टक्के समाज वैदू व उर्वरित समाज भटक्या जमातीतील या दिंडीत सहभागी असतो. या दिंडीत जवळपास स्त्री पुरूष एकूण ३५० वारकरी दरवर्षी सहभागी होतात.शिर्डी बरोबर राहजता,साकुरी,नाशिक,या परिसराबरोबर गुजरात राज्यातील सुरत ,पारडी,वापी,भाडोळी या भागातून वर्षभर टीन मेकिंगचा व्यवसाय करणारे वैदू समाजाचे या दिंडीत

सहभागी होतात. इतर दिंडीच्या नियमित कार्यक्रमाप्रमाणे सर्व कार्यक्रम पार पाडतात. दररोज दिवसभर चालताना वारकरी व दिंडी चालक भजन,देवाचे नामस्मरण करण्यावर भर देतात. दुपारचुया १ ते २ या वेळात प्रवचन व जेवण तर रात्री ८ ते १० या वेळात कीर्तनाचे कार्यक्रम होतात. या दिंडीत कीर्तन व प्रवचन कार्यक्रमासाठी लक्ष्मण महाराजांचे अनुयायी व धनगर समाजाचे हभप बाळु महाराज बोंदे माळी पिंपळगाव तसेच गोरख चौधरी हे असतात. दिंडीत नेहमीचे चोपदार म्हणून वैदू समाजाचे रामभाऊ शिंदे हे सेवा करतात. श्रेत्र शिर्डी ते श्रेत्र पंढरपूर हे सुमारे २७५ किमी अंतर १८ मुक्कामात दिंडी पार करते. याप्रवासात शिर्डी–राहता, राहुरी, नगर, धोगरगाव ,रूईछत्तीशी ,मिरजगाव, चापडगाव, करमाळा, टेभुर्णी, कुरकंब, या मार्गे पंढरपुरला पोहचते.

पंढरपूर येथे राम बागेत पौर्णिमाचा काला होईपर्यंत मुक्काम असतो. तिथी दशमी ते पोर्णिमा असा या दिंडीच्या मुकाम काळात पंढरपूर येथे रोज रात्री कीर्तनाचे वेगवेगळ्या महाराजांचे कार्यक्रम असतात. पौर्णिमा या दिवशी पंढरपूरात काल्याच्या कीर्तनाचा कार्यक्रम होऊन आषाढीची सांगता होते. पंढरपूराचा प्रसाद घेऊन पंढरीचे व पाडुरंगाचे दर्शन घेऊन वारकरी जड पायाने आपल्या घराकडे फिरतात. ही वैदु समाजातील पंढरपुरला येणारी राज्यातील ही एकमेव दिंडी आहे.[४२] या समाजातील अनेक भाविक आपल्या भागात वारकरी समाजाचा प्रसार करतात.

### ६.१० जनार्दन स्वामी दिंडी (दौलताबाद) क्षेत्र देवगिरी ते क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा

संत एकनाथ महाराज हे वारकरी सांप्रदायाचे व महाराष्ट्राचे महान संत मानले जातात. संत एकनाथ महाराजांना सेतच पदापर्यत पोचविण्याचे श्रेय एकनाथ महाराजांनी दिले. व हे सर्व सामान्यापर्यंत पोचविण्याचे एकनाथ महाराजांनी आपल्या सर्व अभंगात भारूडात व इतर साहित्यात एका जनार्दनी म्हणे असे प्रतिपादन केले या वाक्याने त्यांनी आपल्या गुरूचे महत्त्व आधोरेखित केले आहे. एकनाथ महाराज जे काय आहेत. ते फक्त त्यांच्या गुरू जनार्दन स्वामीमुळेच. अशी महान विभूती जनार्दन स्वामी यांची समाधी औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी किल्ल्यात आहे. ह्या आपल्या गुरूची किर्ती अविरत राहावी या दृष्टीने त्यांच्या परंपरेतील शिष्यांनी एकत्र येऊन जनार्दन स्वामींची दिंडी दौलताबाद ते पंढरपुर सुरू केली.[४३] ज्याप्रमाणे पैठण हे क्षेत्र त्याचप्रमाणे दौलताबाद हे क्षेत्र मानले जाते. भाविकांना हे दोन्ही क्षेत्र सारखेच वाटते. समान श्रद्धा भाविकांची दोन्ही ठिकाणी आहे. दौलताबाद मध्ये देवगिरी किल्ल्यावर जनार्दन स्वामी यांची समाधी आहे. त्यामुळे

दौलताबादच्या ठिकाणचे क्षेत्र म्हणून नाव घेतले जाते. येथे दरवर्षी जनार्दन स्वामींची मोठी पुण्यतीथी साजरी होत असते. फाल्गुन महिन्यामध्ये अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन होत असते. तसेच प्रत्येक महिन्याच्या वद्य एकादशीला परिसरातील अनेक वारकरी समाधी दर्शनासाठी येत असतात.अशा पवित्र ठिकाणाहून जनार्दन स्वामींची देवगिरी ते पंढरपूर पायी दिंडी ची सुरूवात होऊन सन २०१५ मध्ये ११० वर्षे झालेली आहे. एवढी मोठी परंपरा या दिंडीला लाभलेली आहे. जनार्दन स्वामींच्या शिष्यांनी ही दिंडी सुरू केली. व आज देखील परंपरेनुसार शिष्य मंडळी ही दिंडी चालवितात.[४४] दिंडी बरोबर लाकडी पालखी सुरूवातीच्या काळात होती . या पालखी मध्ये जनार्दन स्वामींच्या पादुका ठेवल्या जात असत. नंतरच्या काळात २५ वर्षापासून या दिंडीत पालखी साठी रथाची व्यवस्था करण्यात आली आहे. आजुबाजुच्या परिसरातील जवळपास ३५० वारकरी महिला व पुरूष सहभागी होतात. प्रत्येक वारकरी स्वतःचे साहित्य स्वतःबरोबर ठेवतो. साहित्यासाठी कोणतेही स्वतंत्र वाहन दिंडी बरोबर नसते. फक्त एक बैलगाडी दिंडी बरोबर असते. ही पूर्वीची परंपरा आजपर्यंत जतन केलेली आहे. इतर सर्व दिंड्याप्रमाणे नित्यनियमानुसार कार्यक्रम पार पडतात. संताचे अभंग व भजन दिंडीमध्ये नियमितपणे म्हटले जाते. या दिंडीत सकाळी काकडा वाटचालीत भजन सायंकाळी हरिपाठ पाच ते सहा ५.०० ते ६.०० प्रवचन व रात्री सात ते नऊ ७.०० ते९.०० हरीकीर्तन असा रोजचा नित्यकार्यक्रम ठरलेला असतो. वारकऱ्यांच्या सोयीसाठी व आरोग्यासाठी शासनाकडून रूग्णवाहिका आणि आरोग्यपथक दिले जाते.[४५] या दिंडीबरोबर या पथकाचा प्रवास चालू असतो. वारकऱ्यांच्या येणाऱ्या वैद्यकीय समस्या ते सोडवितात. तसेच दररोज कीर्तन सेवा करण्यासाठी कीर्तनकार म्हणून ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे व काका महाराज हारणे यांचा समावेश या दिंडीमध्ये सध्याच्या काळात आहे. या दिंडी चालक म्हणुन ह.भ.प. सुरेंद्र महाराज आनंदे सेवा करतात. प्रवासमार्ग – वडगाव – वदळगाव – जळगाव – बेंडाळा – खरंवडी – वांजुळ – भिंगार – वाळकी – मिरजगाव – पटीगाव – धोंडी – माही –जळगाव –चापडगाव– केंप –दहीवडी– करकम या मार्गाने २४ दिवस मुक्काम करत पालखी सोहळा पंढरपूरला पोहचतो.

### ६.११ दिंडी महीपती महाराजांची दिंडी

क्षेत्र ताराहाबाद ते क्षेत्र पंढरपुर ता.राहूरी, जि. अहमदनगर.अनेक संतांचे चरित्रे लिहिणारे महान संत कवी महीपती महाराज यांचे जन्म गाव ताराहाबाद ता. राहुरी जि. अहमदनगर होय

त्याचा जन्म १७१५ साली झाला. लहानवयात शिक्षणापासुन ते नोकरी करीत होते. शिक्षणानंतर ते नोकरीला लागले. नोकरी करत असताना एक दिवस पुजेमुळे कार्यालयात जाण्यास उशीर झाला त्यामुळे त्यांचे वरिष्ठ अधिकारी रागविले त्यांनी त्यांच्या बरोबर देवालही शिव्या दिल्या त्यांना त्यामुळे वाईट वाटले. त्यांनी आपल्या नोकरीचा राजिनामा देवून माझ्या पुढच्या सातही पिढ्या नोकरीसाठी हातात लेखणी घेणार नाही. अशी प्रतिज्ञा केली.त्यांनंतर घरी असताना एक दिवस स्वप्नात येऊन भगवंताने संतसेवा करावी असे सांगितले यानंतर महीपती महाराजांनी भगवंत व संतांची चरित्रे लिहण्यास सुरूवात केली. लागोपाठ त्यांनी पंधरा ग्रंथ लिहले. यामध्ये भक्तीविजय, अनंतव्रत, संतविजय, संत लीलामृत,अपराध,निवेदन कथासारामृत, मुक्तावरण, दत्तजन्म, भक्तलीलामृत, पांडुरंग स्तोत्र, तुलशी महात्म्य, ऋषी पंचमी कथा, पंढरी महात्म्य, व संत चरित्रपर अभंग असे ग्रंथ लिहले आहेत . तसेच हे कार्य करत असताना त्यांनी आषाढीवारीही सुरू केली होती. या महान संत कवी यांच्या या अद्‌भूत लेखनात संत तुकाराम यांचे याचाही सामावेश आहे. या केलेल्या कार्यामुळे आषाढी वारीची उज्वल परंपरा पुढे सुरू ठेवण्यासाठी ताराहाबादच्या ग्रामस्थांनी संत कवी महीपती महाराज देवस्थान ट्रस्ट स्थापन केला. व ताराहाबाद ते पंढरपुर आषाढी वारी दिंडी परंपरा नेटाने सुरू ठेवली या दिंडींची २६० वर्षांची जुनी मोठी परंपरा आहे.[४६] महिपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रावसाहेब साबळे पाटिल हे असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली पायी दिंडी सोहळा पार पाडला जातो.[४७] या दिंडीबरोबर रथ असतो. रथामध्ये पांडुरंग व महीपती महाराजांची प्रतिमा ठेवलेली असते. दिंडीबरोबर घोडा असतो. तो पुढे चालतो. त्यांच्या पुढे सनई चौघडा हे वाद्य असते. दिंडी सोबत साहित्यासाठी व सेवेसाठी पाच ट्रक व दोन टँकर तीन ट्रॅक्टर एक ॲम्बुलन्स असते. व एक जीप असते. व राहण्यासाठी राहुट्यांची व्यवस्था असते. दिंडीचे वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे दिंडीत सहभागी वारकरी २००० असतात. त्यामध्ये महिलांची संख्या दीडपट असते . या दिंडीमध्ये राहुरी पारनेर नगर व नेवासा या भागातील वारकरी सहभागी असतात.

दिंडीमालक म्हणून ह.भ.प. नाना महाराज गागरे हे आहे. कीर्तनसेवा करण्यासाठी दिंडीमध्ये ह.भ.प. चांगदेव महाराज जाधव आण्णा महाराज गागरे बाळकृष्ण महाराज काळंबे संजय महाराज शेटे दुर्गाप्रसाद महाराज तिडके शामानंद गिरी संतोष महाराज जाधव शितल महाराज साबळे हे कीर्तन कार असतात.पंढरपुरला ही दिंडी १४ मुक्कामात जाते. दिंडीप्रवासत दिंडीची ठेवण कलस

घेतलेल्या तुळशी घेतलेल्या महिला रथ व्यवस्था सनई ताफा यासाठी स्वतंत्र वारकऱ्याची नेमणूक केली जाते. स्वयंपाक बनविण्यासाठी स्वतंत्र वारकऱ्यांची व्यवस् असते याशिवाय हालकरी व्यवस्था व सुरक्षा व्यवस्था व टाळकरी प्रमुख अशी उत्तम व्यवस्था तयार केली असते. यामुळे दिंडीचा रोजचा नित्य प्रवास कार्यक्रम व दिंडीचे व्यवस्थापन उत्तम पद्धतीने पार पडते दिंडीत सहभागी वारकऱ्याकडून अल्प शुल्क वापरले जाते. ताराहाबाद ते पंढरपूर हे अंतर १४ दिवस मुक्काम करत दिंडी पार करते. या प्रवासात मल्हारवाडी, राहुरी, देहरे ,नगर, रूई छत्तीशी घोगरागाव, मिरजगाव, माहिजळगाव, चापडगाव, पाथरे, झरे, जेऊर, टेंभुर्णी, संगमल बंब ,गादेगाव, वाखरी व पंढरपूर असा प्रवास करत पंढरपूर येथील मुक्काम जुना अकलुज रोडवर ताराहाबाद संस्थानचे नियोजित भक्त निवास येथे असतो.दिंडीचे विणेकरी म्हणून विठ्ठल गागरे सीताराम गागरे हे सेवा करतात. तर दिंडीमध्ये कांता पाटील राजू चव्हाण भानुदास कुताळ दादाभाऊ काकडे हे चोपदार म्हणुन सेवा करतात. तर दशरथ धावरे रामभाऊ घाडगे रघुनाथ गाढे बाबुराव जाधव बबनराव पठारे इ. मंडळी दिंडीतील टाळकरी म्हणून काम पाहतात. या नियोजनात दिंडी ताराहाबाद ते पंढरपूर पंढरपुरात पौर्णिमा काला होईपर्यंत व तयानंतर काल्याचा महाप्रसाद घेऊन पंढरपूर ते ताराहाबाद असा पायी परतीचा प्रवास सुरू होतो.

## ६.१२ संतराज महाराज पालखी दिंडी सोहळा

क्षेत्र संगम वाळकी रांजणगाव बेट ते क्षेत्र पंढरपूर संत योगिराज संतराज महाराज हे मोगल साम्राज्यात मोठे सरदार होते. त्यांनी भागवत ग्रथांचे वाचन केल्यानंतर मुळा मुठा भीमा या त्रिवेणी संगमावर तपश्चर्या केली त्यांनी जीवंत समाधी घेतली आहे.[४८] त्यांच्या बाबत अशी कथा येते की ते पांडुरंगाचीवारी करत असताना नीरा नरसिंहपूर येथे नदीला पूर आला. त्यांना नदीपार करण्यासाठी मोठे कासव तेथे आले. कासवाने त्यांना नदीपार केले. अर्थात हे पांडुरंगाने कासवाचे रूप धारण केले व योगीराज संतराज यांना नदीपार केले. त्यांच्या समाधी स्थळी रांजणगाव बेट ता. दौड जि. पुणे या ठिकाणी संगमेश्वराचे मंदिर असून त्या ठिकाणी संतराज महाराज पवार विश्वस्त मंडळ या संस्थेने भव्य मंडप उभारलेला आहे. रांजणगाव बेट हे तीर्थक्षेत्र निसर्गरम्य असे ठिकाण आहे या नद्या व क्षेत्राचे महात्म्य पद्मपुराणात भिमा महात्म्य या प्रकरणात येते.

वरि आवश्यक पांडवा। ऐसा ठाव जोडावा।
तेथ निगुठ मठ होआवा। का शिवालय।।

त्यामुळे ही पवित्र व उत्तम जागा महाराजांनी तपश्चर्या साठी निवडली. याच बेटावर १९५७ ला ह.भ.प बापुराव महाराज कोंभळीकर यांनी अन्न सेवन न करता फक्त लिंबाच्या पाल्याचा रस ग्रहण करून चातुर्मास पूर्ण केला. या ठिकाणचे महत्त्व पुढे वाढत गेले. येथे येणाऱ्यांची संख्या वाढत गेली. वै. ह.भ.प. सदानंद महाराज साठे नागरगाव यांच्या प्रेरणेने या ठिकाणी पंधरा दिवसाच्या हरिनाम पंधरवाडा माघ शुद्ध प्रतिपदा ते माघ शुद्ध पौर्णिमा सुरू केला. यातूनच पुढे दिंडीची स्थापना झाली सन २०१५ ला या दिंडीला ४९ वर्षे होत आहे. क्षेत्र वाळकी ते क्षेत्र पंढरपुर हा असा दिंडी सोहळा प्रवास दोनशे किलामीटर तेरा दिवसात पूर्ण होतो. या दिंडी सोहळ्या पुरूष व महिला दोन हजार वारकरी सहभागी होतात. दिंडीमार्फत सहभागी वारकऱ्यांची भोजनाची व्यवस्था केली जाते. त्यासाठी स्वतंत्र आचाऱ्यांची नेमणूक केली जाते. या दिंडीची विशेषतः माळकरी असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला दिंडीत प्रवेश दिला जात नाही. तर वारकऱ्यांना अल्प शुल्क आकरले जाते. दिंडीमध्ये चांदीचा रथ असतो. वारकऱ्यांच्या सेवेसाठी या दिंडीत तीन ट्रक पाण्याचा टँकर असतो. वारकऱ्यामध्ये दौंड, शिरूर, पारनेर,श्रीगोंदा, बारामती ,हवेली ,इंदापूर या तालुक्यातील सहभागी वारकरी असतात. ह.भ.प. सुरेश महाराज साठे यांच्या नेतृत्वाखाली दिंडीचे योग्य नियोजन केले जाते.[५०] दिंडीत कीर्तनसेवा पार पाडण्यासाठी ह.भ.प. बबनबुवा गुरव, निवृत्ती काळे, सर्जेराव आष्टे गुरूजी, तुकाराम निंबाळकर हे कीर्तनकार असतात. पंढरपुर येथे मुक्कामासाठी लोकवर्गणीतुन वीसबावी येथे वीस लाखांची जागा घेऊन मठ उभारला जात आहे.

## ६.१३ संत नरहरी महाराजांची पालखी

## क्षेत्र नेवासा ते क्षेत्र पंढरपूर

महाराष्ट्रातून अनेक संताच्या पालख्या पंढरपुरला येतात. परंतु संत नरहरी महाराजांची दिंडी पालखी पंढरपुरला येत नव्हती . कारण संत नरहरी महाजांचा जन्म पंढरपुरात झाला. त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी पंढरपूर असल्याने त्यांच्या दिंडी पालखीचा संबंध येत नव्हता. त्यामुळे इतर संताप्रमाणे संत शिरोमणी यांचा पालखी सोहळा विश्वस्त समिती अशी संस्था नोंदणी करून नेवासा ते पंढरपूर नरहरी महाराजांचा पालखी सोहळा नेवासा व राहूरी या भागातील सुवर्णकार मंडळी एकत्र येऊ न सुरू केला.[५१] नरहरी महाराज जातीने सोनार होते. परंतु या पालखी सोहळ्यात अनेक जाती जमातीचे वारकरी सहभागी असतात. सहभागी वारकऱ्याकडुन कोणतेही शुल्क आकारले जात नाही.या पालखी मध्ये कोणीही प्रमुख चालक नसून संस्थाच या पालखीचे

संयोजन करते. राज्यातील विविध जिल्ह्यातील अनेक प्रतिनीधी वारकरी म्हणून या दिंडीमध्ये सहभागी होतात. नेवासा ते पंढरपुर हे २७५ कि.मी. चे अंतर तेरा दिवसात पायी चालत पूर्ण केले जाते.[५२] या पालखी सोहळ्यात कीर्तनकार म्हणुन ह.भ.प. पवणे महाराज सोनार महाराज विश्वनाथ महाराज ढाळे झुंजारे महाराज आणेगावकर रामदास महाराज दाते यासह २२ कीर्तनकार यामध्ये सिंधु मुंडलिक महिला कीर्तनकार सहभागी असतात. रस्त्यात संस्थेचे प्रतिनिधी कर्जत जि. अहदनगर येथे स्वामी समर्थ मठात एक पिंपळाचे झाड लावतात. व त्याची जोपासना करतात. पालखीच्या माध्यमातून दिंडीमधये भारूडाचे कार्यक्रम होतात. यामधून अंधश्रद्धा निर्मुलन साक्षरता व व्यसनमुक्ती प्रसार केला जातो. तसेच या संस्थेच्या वतीने राहुरी नेवासा अरडगाव येथे १५० स्वयंचे अद्यावत रूग्णालय उभारले आहे. असा आगळा वेगळा सामाजिक उपक्रम या दिंडी पालखी सोहळा संस्थेने हाती घेतला आहे.

## ६.१४ इतर दिंडी सोहळे.

१.ताजुद्दीन बाबांची दिंडी

नागपुर येथे ताजुद्दीन बाबा अवलीया या मुस्लीम धर्मीय साधुच्या नावाने पायी दिंडी नागपूर ते पंढरपूर सुरू केली. मुस्लीम समाजातील संताच्या नावाने असलेली एक आषाढी वारीला पंढरपूर जाणारी वैशिष्ट्यपूर्ण दिंडी मानली जाते. इ.स.सन १८६१ साली कामठी नागपूर येथे ताजुद्दीन बाबांचा जन्म झाला.[५३] ते पुढील काळात भक्तीमार्गाकडे वळाले. त्यांनी हिंदु मुस्लीमांना यात्रा उरूसाच्या माध्यमातून एकत्र आणण्याचे महत्वाचे कार्य केले. त्यांच्या या कार्यामुळे या दिंडीमध्ये हिंदू मुस्लीम दांन्ही समाजाचे वारकरी सहभागी असतात. यामध्ये उच्चविद्या भूषित व अडाणी भक्तगण असतात. दिंडी सोबत पालखी असते. पालखी मध्ये मुखवटा पांडुरंगाचा फोटो पक्षी ताजुद्दीनाथा नमः मुत्र उच्चारत असतात. ताजुद्दीन बाबा हे अक्कलकोटच्या स्वामी समर्थांच्या समकालीन आहे. बाबांनी कोणताही भेदभाव केला नाही. आज बाबांचे शिष्य सहजानंद महाराज तथा पाध्ये महाराज बाबांची सर्व सांप्रदायिक परंपरा चालवितात. बाबांचे सर्व कार्यक्रमनागपुरात शंकर दयाळ शर्मा यांच्या वाड्यात चालत असत. तर रथोजी भोसले यांच्या वाड्यात बाबांचा पतंग व इतर वस्तु आहे. विठ्ठलाच्या नामगजरात वारकरी सांप्रदयाचा प्रचार करत हिंदू मुस्लीम समाजाला एकत्र करत ही दिंडी पंढरपुरला जाते.

### २ सर्वोदयी दिंडी

आधुनिक संत आचार्य विनोबा भावे सर्वोदय संमेलनाच्या कार्यक्रमासाठी सन १९५२ मध्ये पंढरपुरात आले होते. तेव्हा पासून विनोबांच्या अनुयायांनी दरवर्षी पंढरपुरची पायी वारी सुरू केली. यानंतर पुढे १९७४ पासुन वारकरी सर्वोदय समन्वयांच्या माध्यमातुन भक्तीचा प्रसार मोठ्या प्रमाणात होवू लागला. सर्वोदयी वारकरी व अनुयायी भाविकांचा सामावेश वरच्या वरवाढत गेला. नशाबंदी भुतदया व मानवता या प्रमुख तत्वाचा प्रसार करत सवौदयी दिंडी पंढरपुरला येते. गांधीवादाच्या प्रभावी विचाराने प्रभावी झालेल्या सर्वोदयी चळवळीची दिंडी भक्ती भावाने प्रभावी भावाने पायी प्रवास करणारी वैशिष्ट्यपूर्ण दिंडी होय भक्ती व शक्तीचा सुंदर समन्वय या दिंडीमधून पाहावयास मिळतो.

### ३. भाकरे महाराजांची दिंडी

मध्यप्रदेशातून व्यसनमुक्तीचा संदश देत येणारी भाकरे महाराजांची वैशिष्ट्यपूर्ण दिंडी होय भाकरे महाराजांचनी मध्यप्रदेशात दारू गांजा व इतर व्यसन करणाऱ्या लोकांना तुळशीच्या माळा घालून त्यांना व्यसनापासुन मुक्त केले. असे जवळ जवळ १५००० लोकांना त्यांनी सन्मार्गाला लावले सुरूवातीच्या व्यसनमुक्त होऊन वारकरी झालेल्या लोकांच्या मदतीने व्यसन भक्तीचा प्रसार करून लाखो लोकांना व्यसनापासून भाकरे महाराजांनी दूर केले. या लोकांना भक्तीचे व आरोग्याचे महत्व पटवून देवून त्यांना पंढरपूरला पायी दिंडीला येण्याची परंपरा सुरू केली एक हजारा किलोमीटरचा प्रवास करत ७३ दिवसात ही दिंडी पंढरपूरला पोचतात. १५ वर्षापूर्वी या दिंडीची सुरूवात भाकरे महाराजांनी केली. पांढरता येथून दिंडीची सुरूवात होवुन मारूड ,मेवाड, सेलगाव, सिरापूर ,सेलगाव ,नांदपूर, नांदगाव ,वाशिम ,आंबाजोगाई, येरमाळा बार्शी, अरण यामार्गे पायी प्रवास करत दिंडी पंढरपूरला पोचते.[५४] वारीच्या वाटेने व्यसनमुक्तीचा संदेश देणे हे मुख्य कार्य करत व विठ्ठल भक्तीचा प्रसार करणे हे हा हेतू होय पायी प्रवासाच्या खर्च सहभागी झालेल्या वारकरी भक्ताकड्रन अल्प दरात भिशी आकारून भागविला जातो.

### ४ संत कबीर महाराज यांची दिंडी

### श्रीक्षेत्र काशी ते श्री क्षेत्र पंढरपूर

तीर्थक्षेत्र काशी येथून संत कबीर यांच्या नावाने प्रतिवर्षी पायी प्रवास करत दिंडी सोहळा आषाढी वारीला पंढरपूरला येतो. या दिंडीचे वेगळेपण म्हणजे दिंडीमध्ये ध्वजपताका

पांढऱ्या रंगाचा असतो. उत्तर भारतातुन पंढरपूरला येणारी ही एकमेव दिंडी आहे. **ब्राह्मणी ते पंढरपूर,** मुक्तादेवीच्या नावाने ब्राम्हणी ता.राहूरी जि. अहमदनगर येथून आषाढी पायी दिंडी अनेक वर्षापासून पंढरपूरला जाण्याची पंरपरा सुरू आहे. या दिंडीमध्ये जवळ जवळ २५० वारकरी सहभागी असतात. या दिंडीला गावातील अण्णा महाराज राजदेव तसेच डॉ.प्रा.राजदेव टी.बी.यांचे फार मोलाचे सहकार्य असते.

## ६.१५ जन प्रबोधन करणाऱ्या इतर दिंडया–

आधुनिक सामाजिक जीवनात अंधश्रध्दा, व्यवसनाधिनता, अस्वच्छता, प्रदूषण या गोष्टी वाढत चालल्या आहे. याचा दुष्परिणाम मानवी जीवनावर होत आहे. अध्यात्म जागृती करण्याबरोबर या संदर्भात मानवात व समाजात जागृती घडवून आणण्यासाठी पालखी सोहळया बरोबर वैशिष्टयपूर्ण दिंडया सुरू झालेल्या आहेत.

### अ) ग्राम विकास खात्याची स्वच्छता दिंडी :–

आषाढी वारीला पालखी सोहळया सोबत लाखोंनी समाज येत असतो. हे लोक वारीनंतर आपल्या गावी गेल्यानंतर त्यांनी आपल्या स्वस्थासाठी व गावाच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घ्यावा. म्हणुन ज्यांना स्वच्छतेचे महत्व पटवुन देण्यासाठी पालखी सोहळयात महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास खात्याने स्वच्छतेची दिंडी सुरू केली आहे. [५५]या दिंडीच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता, हुंडाबंदी, स्वच्छतागृहाची गरज, वृक्षरोपन इ. गोष्टी वारकऱ्यांना कलेच्या माध्यमातुन कलाकार पटवून देतात.

### ब) राष्ट्रीय सेवा योजना, प्रबोधन दिंडी :–

महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,सोलापूर विद्यापीठ,यांच्या राष्ट्रीय सेवा योजना या विभागाच्या वतीने दरवर्षी आषाढी वारी पालखी सोळया सबोत विद्यार्थ्यांच्या दिंडयांचे अयोजन केले जाते.[५६] या दिंडयांच्या माध्यमातून वारकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन केले जाते. तसेच अक्षय प्रकाश योजना, वीज बचत, वृक्ष लागवड,नैसर्गिक शेती आणि ग्राम स्वच्छता या संदर्भात विषय, पथनाटक, नाटिका, व्याख्याने यांच्या माध्यमातुन वारकऱ्यांच्या मनात बिंबावली जातात.

### क) सेवाभावी संस्थांच्या दिंडयाः–

लाखोंच्या संख्येने वारकरी आषाढी वारीत पालखी बरोबर सहभागी असतात. या वारकऱ्यांना वारीच्या वाटेवर काही अडचणी येऊ नयेत व काही अडचणी निर्माण झाल्यास दुर करण्यासाठी सेवाभावी दिंडया कार्यरत आहेत. यामध्ये या दिंडया स्नेहभाव वाढविण्याच्या दृष्टीने मोलाचे कार्य करतात. तसेच गरजूंना अन्न, चहा, छत्र्या, कपडे वाटप, रूग्णांची देखभाल, अशी कामे करून एकमेकांविषयी समाजात आपुलकी वाढविण्याचे काम करतात.

### इ) स्वच्छतादूत दिंडी :–

गाव तेथे शौचालय व स्वच्छतेचा संदेश देणारी स्वच्छता दूतांची दिंडी पंढरपूरला येते या दिंडीत रायगड, उस्मानाबाद, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, ठाणे या जिल्हयातील १४ पथके असतात. यातील शेकडो दूत अभिनयाद्वारे पथनाटय सादर करून स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्व पटवून देतात. त्यांच्या या कार्यामुळे पालखी सोहळयातील अनेक वारकऱ्यांनी आपल्या घरी शौचालय बांधल्याची उदाहरणे आहेत.

### ५. आंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) ची हरेकृष्ण संकीर्तन दिंडी

देहू ते पंढरपूर, आषाढी पायी दिंडी गेली अनेक वर्षे या संस्थेने, आध्यात्मिक कार्याक्रमांच्या माध्यमातुन भक्तांना व युवकांना भक्ती मार्गाला लावले आहे. इस्कॉन या संस्थेची स्थापना सन १९६६ ला न्यूयॉर्क येथे प्र.पू. श्री. प्रभूदादांनी केली. या संस्थेच्या माध्यमातून जगभर श्री राधाकृष्ण मंदिरे उभारली. त्याच बरोबर भगवान जगन्नाथ रथयात्रा, गुरूकुल शाळा, गोशाळा सुरू केल्या. आज जगभरात १६० देशात इस्कॉनच्या शाखा आहे 'हरेकृष्ण' या नावाने ही संस्था जगभरात प्रसिध्द आहे.भारतात पश्चिम बंगाल मधील नादिया जिल्हयातील मायापूर येथे 'इस्कॉन चे' मुख्य कार्यालय आहे.या संस्थेच्या वतीने क्षेत्र देहू ते क्षेत्र पंढरपूर हरेकृष्ण संकीर्तन पायी दिंडी सुरू आहेत. या दिंडीत सर्व धर्मातील, जगातील अनेक देशातील भाविक सहभागी असतात.जवळपास १५० भाविक सहभागी असतात. वेगवेगळया देशातील वेगवेगळी वेशभुषा करणारे भाविक या दिंडीचे आकर्षक ठरतात. आषाढीवारीला हि दिंडी संत तुकाराम महाराज पालखी सोबत पायी प्रवास करत असते.

पंढरपुरात चंद्रभागेच्या पुर्वेला 'हरेकृष्ण धाम' नावाचा या संस्थेचा मठ आहे. तेथे वर्षभर वेगवेगळे अध्यात्मिक कार्यक्रम असतात. आषाढ वारीला येथे ७ दिवसाचा उत्सव असतो. भक्तीचा प्रसार करणे हा मुख्य उद्देश दिंडीचा व या संस्थेचा आहे.

## ६. मुलींच्या नेतृत्वाखालील पायी दिंडी पाटणे ते पंढरपूर :–

स्त्री व पुरूष असा कोणताही भेदभाव वारकरी संप्रदायात नाही. याचे उदाहरण म्हणजे पाटणे ते पंढरपूर, महिला दिंडी सोहळयाचे नेतृत्व करणारी व चालक ज्ञानेश्वरीताई बागुल वय १५ वर्षे. पाटणे, ता. मालेगाव, जि. नाशिक येथे संत सावता महाराज पायी दिंडी सोहळा, सन २००० पासून सुरू केला आहे. [५७] ज्ञानेश्वरी ताई या पाटणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात शिक्षण घेतात. त्यांचे वडिल निवृत्तीनाथ बागुल हे स्वतःकीर्तनकार आहेत [५८] त्यानी आपल्या या छोटीला लहानपणा पासुन कीर्तनाची आवड निर्माण केली. वयाच्या १० वर्षापासुन ज्ञानेश्वरी कीर्तन करत आहे. नगर, नाशिक, धुळे या जिल्हयात त्यांनी कीर्तन सेवा करून अध्यात्माचा प्रसार केला.

ज्ञानेश्वरी ताई यांनी पाटणे येथे राज्यातील पहिला महिला संस्कार अभियानाचा हरीनाम सप्ताह अयोजित केला; राज्यातील मान्यवार महिला कीर्तनकार व प्रवचनकार यांचे कार्यक्रम या सप्ताहात आयोजित केले होते. असा कार्यक्रमातुन अनेक अनुयायी तयार झाले. या भाविकांनी आग्रह केल्यामुळे ज्ञानेश्वरी ताई यांनी सन २००० साली पाटणे ते पंढरपूर हि पायी दिंडी सुरू झाली. ४१० किलोमीटरचे अंतर हि दिंडी २१ दिवसाच्या मुक्कामात पार करते.या दिंडीत २५० च्या आसपास वारकरी असतात महालूबाबा कांदलकर हे दिंडी सोबत गायक असतात. दिंडी सोबत कीर्तनकार, सोपान महाराज कापसे, ज्ञानेश्वरीताई बागुल व त्यांचे वडिल, हे असतात. मृदंगवादक दिपक महाराज कोहकडे, राजेंद्र महाराज बागुल हे आहेत.दिंडीत इतर दिंडी प्रमाणे दैनंदिन कार्यक्रम पार पडतात. पहाटे काकडा, भजन, प्रवचन, संध्याकाळी हरीपाठ व रात्री कीर्तन, भारूड हे कार्यक्रम असतात. वारकऱ्यांकडून अल्पप्रमाणात शुल्क आकरले जाते.

## जलदिंडी :–

जलदिंडीचे मुख्य प्रवर्तक डॉ.विश्वास येवले, यांनी २० आक्टोबर २००२ या दिवशी आळंदी ते पंढरपूर इंद्रायणी, भीमा, नदीच्या पात्रातून होडीच्या साहाय्याने दिंडी प्रवास सुरू केला.

[५९] महाराष्ट्रातुन पायी प्रवास करत अनेक दिंडया पंढरपूरला पोचतात पण महाराष्ट्रातुन ही एक अगळीवेगळी दिंडी होय. नदीच्या पाण्यातून देवाचे भजन करत प्रवास करणारी पहिली दिंडी होय. या दिंडी सुरू करण्यामागे डॉ. विश्वास येवले यांची मुख्य भूमिका, पाण्यातील प्रदूषण आणि स्वच्छ पाण्याचे महत्व याची जनजागृती व्हावी यातून लोकांना चांगले स्वास्थ मिळेल. पर्यावरणाचे रक्षण व अध्यात्माची गोडी व सांगड घालणे.या दिंडी मध्ये आळंदी, पुणे परिसरातील वारकरी, इंजिनिअरींगचे विद्यार्थी, पर्यावरणाचे अभ्यास करणारे विद्यार्थी, विज्ञानशाखेचे विद्यार्थी हे पाण्यातील होडी मध्ये बसुन स्वतः भजन व होडी चालविणे मुक्कामाची ठिकाणी कीर्तन, भजन, प्रवचन, त्याच बरोबर पथनाटय, व्याख्यान, प्रदर्शन डॉक्युमेटरी फिल्म, या आधुनिक माध्यमाद्वारे नदीची स्वच्छता व पर्यावरण रक्षण, यासाठी जनजागृती करतात.एकूण ४५० कि.मी. अंतर इंद्रायणी व भीमा नदीच्या पात्रातुन, आळंदी ते पंढरपूर प्रवास करतात. वारी किंवा दिंडी ही संकल्पना आणि हे शब्द महाराष्ट्राच्या जनजीवनाचा एक अविभाज्य भागच झालेले आहेत. आळंदी त पंढरपूर प्रवास जलमार्गाने करणारी ही नवी दिंडी, जलदिंडी [६०].या जलदिंडीचे वैशिष्टये म्हणजे, लोकांना नदी ही गावाची कशी ' लाईफ लाईन' आहे. हे पटवून / समजावून देणे. मशीनवर चालणाऱ्या बोटीतून जलदिंडीत प्रवास करणे. नदी मध्ये सोडले जाणारे सांडपाणी, Industrial influents किंवा waste products, साबण व डिटर्जंटसचे पाणी, मलमूत्र विसर्जन इ. गोष्टींमुळे नद्यांमधील पाण्याचे मोठया प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्याचबरोबर पाण्यात असणारी eco system जलचर phytoplankton पान वनस्पती पाण्यालगत असणारे पक्षी, नदी, पात्रालगतची माती आणि महत्वाचे म्हणजे जलचक्र या सर्वच गोष्टींना प्रदूषणामुळे धोका निर्माण झाला आहे. या सर्व गोष्टी वाचवणे, त्यांचे संवर्धन करणे हे केवळ माणसाच्याच हातात आहे. असा हा व्यापक संदेश या जलदिंडीतून परिणामकारक रीतीने सर्व गावकऱ्यांपर्यंत पोचविता येतो. तसेच वेगळे वैशिष्टये म्हणजे वेगवेगळया गावांचे, नदयांचे, लोकांच्या घरातील, किल्ल्यांवरील पाणी गोळा करून जलकुंभा मध्ये भरून पंढरपूरला पोचल्यावर विठोबा–रखुमाईंच्या चरणी ते अर्पण करणे [६१] या मधून एकात्मेचा संदेश देणारा हा वेगळा प्रयत्न आहे.पाणी म्हणजे जीवन पाण्याला आपण जीवन म्हणतो ते सर्वार्थाने योग्य आहे. संस्कृत भाषेत पाण्याला जीवन असेच शब्दरूप आहे. मुळात पाणी नसते तर जीवसृष्टी जगू शकणार नाही. पाण्याचा थेंब आणि थेंब आपण अतिशय काळजीपूर्वक वापरायला हवा. [६२]नदी नसली तर या प्रश्नाचे उत्तर सोपे आणि सरळ आहे. आणि

तितके निर्णायक आहे. नदीच्या काठावर बहरलेली आजची संस्कृती मग कितीही समृध्द असो ती नाहीशी होणार हे काळया दगडावरच्या रेषेएवढे स्पष्ट आहे. म्हणूनच जलदिंडीची सुरूवात करून जलदिंडीचा महत्वाचा उद्देश नदीच्या जोपासनेत सकारात्मक लोकसहभाग वाढविण्याचा आहे. लोकांनी प्रत्यक्ष नदीवर यावे तीची ओळख करून घ्यावी. पाण्याशी मैत्री करावी.

ज्ञानियाच्या गावा । जळी सोडीलीया नावा । जनांच्या प्रवाहा । मेळविन [६३]

जल हे जीवन आणि जीवनाच्या प्रवाहात केलेली यात्रा म्हणजे दिंडी प्रत्येकजण हा जलवारकरी असतो. जलदिंडीत वारकरी आपली नौका घेऊन स्वतःची ओळख शोधाण्यासाठी आपले मुळ रूप बघण्यासाठी निघतो..... नावाडी. जल म्हणजे जीवन आणि दिंडी म्हणजे जीवनाची यात्रा स्वधर्माची पताका घेऊन केलेला प्रवास [६४]जलदिंडीचा हा उपरोक्त उपक्रम सुरू झाल्या पासुन आज २०१६ पर्यत दरवर्षी नियमित आळंदी ते पंढरपूर इंद्रायणी व भीमा नदीच्या पात्रातून जल प्रवास सुरू आहे. नदीचे अस्तित्व टिकविण्यासाठी जलदिंडीचे हे अयोजनाचे महत्वाचे व मुख्य वैशिष्टय आहे. हा उद्देश जोपासणाचा प्रयत्न डॉ. विश्वास येवले व त्यांचे सहकारी जलदिंडीच्या माध्यमातून करीत आहेत. विशेषतः यासाठी त्यांनी जागरच मांडला आहे. नदी संवर्धनाचा जलदिंडी करतेय जागर [६५] या जागतिक नदी दिवसाच्या लेखनात अमित गद्रे यांनी डॉ. विश्वास येवलेंचे विचार व जलदिंडीचे कार्य मांडलेले आहे. राष्ट्रभरात जलदिंडीचा विस्तार होत आहे. मुळा, पवना, घोडनदी, कुकडी, गोदावरी, प्रवरा या नदयांच्या काठावरील शहरे आणि गावामधील लोकांनी जलदिंडी प्रतिष्ठानाच्या सहकार्याने जलदिंडी उपक्रमास सुरवात केली आहे. अर्थातच जलदिंडीचा हा जलवारी प्रवास योग्य दिशेने होत आहे. विठ्ठलाला भेटायला जाणारा वारीचा निश्चित वेगळा ऐतिहासिक प्रवास आहे.

**जलदिंडी प्रवास कार्यक्रम – २०१०**

१८/१०/१० स. ८.३० आळंदी – महापूजा, ज्ञानेश्वर महाराज मंदिर[६६]

स. ९.३० आळंदी नगर प्रदक्षिणा, स. १०.१५ वा. इंद्रायणीघाट– जलकुंभ पुजा, सर्वधर्मीय प्रार्थना, स. ११ वा. इंद्रायणीघाट प्रस्थान, मुक्काम तुळापूर,

१९/१०/१०– विठ्ठलवाडी, २०/१०/१० वाळकीसंगम, २१/१०/१०– कौठे, २२/१० सिध्दटेक, २३/१० कुंभारगांव, २४/१० गंगावळण, २५/१० अजोती, २६/१० नरसिंगपूर, २७/१० आवे, २८/१० इसबावी, २९/१० पंढरपूर रोज रात्री मुक्कामाच्या ठिकाणी कीर्तन व नंतर जेवण, अन्नदान देत असतात. दरवर्षी कार्यक्रमाची तारीख व वारी प्रवासात नियोजनानुसार बदल केला जातो.

# संदर्भ

१. भा.प. बहिरट व प.ज्ञा. भालेराव .वारकरी संप्रदायाचा उदय व विकास व्होनस प्रकाशन पुणे दु.आ. १९८८ पृ. २८३
२. इंटरनेट
३. श्री.वि.भा.चौधरी.वारकरी संग्रह, वारकरी शिक्षण संस्था ,आळंदी दे. डिसें.१९९९, पृ. ६५६.
४. कित्ता
५. प्रा. (डॉ.) विकास कदम वारकरी संप्रादायाचा इतिहास व पालख्या, दिड्यांची परंपरा , अशरलेणं प्रकाशन सोलापुर ,२०११ पृ. ५६
६. कित्ता पृ. ५६.
७. सेवासुर्य शिंदेनाना, पंढरीची वारी.लाईव्ह लाइन, नाशिक, २०११ पृ. ५२
८. प्रा. डॉ. विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या, दिंड्याची परंपरा , अक्षर लेणं प्रकाशन सोलापुर –१९८८ पृ. ५६
९. ॲड बाबुराव हिरडे दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन पुणे, २जुलै २००६ पृ..१८
१०. भा. प. अहिरट व प.ज्ञा. भालेराव वारकरी उदय व विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे दुसरी आवृत्ती १९८८ पृ. २४४
११. गीता प्रेस, सकल संतवाणी, खंड पहिला, पंढरी महात्म्य, पान क्र. १५८, अभंग क्र. २
१२. प्रा.डॉ.विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्याची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापुर, २०११ पृ. ५९
१३. ह.भ.प. नारायण महाराज गोसावी श्री सोपान पालखी सोहळा श्री पोतदार ,नातेपुते, ५ जुलै २०१० पृ. २
१४. गीता प्रेस संतवाणी, खंड दुसरा, गोरखपुर, पृ. ६००, अभंग क्र. १२८७
१५. कित्ता
१६. ह.भ.प.ज.नारायण महाराज गोसावी,श्री सोपान देव पोलखी सोहळा श्री जनार्दन पोतदार नातेपुते ५ जुलै २०१० पृ. ५
१७. कित्ता, पृ. ५

१८. कित्ता, पृ. ९

१९. ह.भ.प.ज.नारायण महाराज गोसावी, श्री सोपान देव पोलखी सोहळा श्री जनार्दन पोतदार नातेपुते ५ जुलै २०१० पृ. २४

२०. कित्ता, पृ. २७

२१. सेवा सुर्य शिंदे नाना पंढरीची वारी लाईव्ह ,नाशिक २०१०, पृ. ५५–५६

२२. श्री संत मुक्ताबाई संस्थान कोथळी मुक्ताईनगर आषाढी वारी पालखी सोहळा २०१५,

२३. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. १३२

२४. श्री संत मुक्ताबाई संस्थान कोथळी मुक्ताईनगर आषाढी वारी पालखी सोहळा २०१५, पृ.४

२५. प्रा.डॉ.विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्याची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापुर, २०११, पृ. ६१

२६. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. १३६

२७. प्रा.डॉ.विकास कदम वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्याची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापुर, २०११, पृ. ५८

२८. कित्ता, पान क्र. ५९

२९. इंटरनेट , www.maulialandi.com , www.google.com , www.wikipidia.com 20 June 2015 Time 4.00 PM

३०. सेवा सुर्य शिंदे नाना, पंढरीची वारी, लाईव्ह, नाशिक २०१०, पृ. ६५

३१. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. ७३

३२. वै. ह.भ.प. गोविंद महाराज गाडेकर, ऐतिहासिक नेवासा तीर्थक्षेत्र, व वै. ह. भ.प. गु. बन्सीमहाराज तांबे जीवनचरित्र पृ. ०३

३३. आन्हिक सुत्रापात्री, पृ. १४९

३४. श्री. ग.ह. खरे चार दैवत पृ. १३३

३५. वाय आर गुफे, प्राचीन अवषेश, भारतीय इतिहास संशोधन मंडख, खंड, १९, अंक पहिला, पृ. १०७

३६. डॉ. ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पान क्र. ८८१, ओवी क्र. १८१०

३७. वै. ह.भ.प. गोविंद महाराज गाडेकर, ऐतिहासिक नेवासा तीर्थक्षेत्र, व वै. ह. भ.प. गु. बन्सीमहाराज तांबे जीवनचरित्र पृ. ०८
३८. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. १२६
३९. कित्ता पृ. १६
४०. सेवा सुर्य शिंदे नाना पंढरीची वारी लाईव्ह ,नाशिक २०१०, पृ. ६२
४१. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. १५
४२. प्रा.डॉ.विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्याची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापुर, २०११, पृ. ७५
४३. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. ११
४४. सेवा सुर्य शिंदे नाना पंढरीची वारी लाईव्ह ,नाशिक २०१०, पृ. ६०
४५. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. १२
४६. भा. प. बहिरट व प.ज्ञा. भालेराव वारकरी उदय व विकास, व्हिनस प्रकाशन ,पुणे दुसरी आवृत्ती १९८८ पृ. ८८
४७. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. ४४
४८. सेवा सुर्य शिंदे नाना पंढरीची वारी लाईव्ह ,नाशिक २०१०, पृ. ६३
४९. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. ७४
५०. कित्ता, पृ. ७५
५१. सेवा सुर्य शिंदे नाना पंढरीची वारी लाईव्ह ,नाशिक २०१०, पृ. ६६
५२. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. ७६
५३. प्रा.डॉ.विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्याची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापुर, २०११, पृ. ७६
५४. कित्ता, पृ. ७७
५५. कित्ता, पृ. ७७
५६. कित्ता, पृ. ७२
५७. ॲड.बाबुराव हिरडे, दिंड्या गावोगावच्या, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २ जुलै २००६, पृ. ६५

५८. प्रा.डॉ.विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्याची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापुर, २०११, पृ. ७४

५९. कित्ता, पृ. ७३

६०. अजित माळुंजकर, सचिन थोरवे, जलदिंडी विशेष अंक, नितीन कोतापल्ले, जलदिंडी प्रकाशन पुणे, २०१०, पृ. ६

६१. कित्ता, पृ. १६

६२. सुदर्शन तांदळे, जलदिंडी विशेषांक २०११, श्री. अभय टिळक, जलदिंडी प्रकाशन २०११, पृ. १२

६३. डॉ. विश्वास येवले, जलदिंडी २०१३, जलदिंडी प्रकाशन पुणे, पृ. ४

६४. डॉ. विश्वास येवले, नावाडी जलदिंडी प्रतिष्ठाण, येरवडा पुणे २००९ पृ. ८, ९

६५. दै. सकाळ, ॲग्रोवन स्पेशल लेखक अमित गद्रे, रविवार २७ सप्टेंबर २०१५, पृ. ९

६६. अजित माळुंजकर, सचिन थोरवे, जलदिंडी विशेष अंक, नितीन कोतापल्ले, जलदिंडी प्रकाशन पुणे, २०१०, पृ. ४

## प्रकरण सातवे

# सिंहालोकन ,निष्कर्ष, शिफारशी

## प्रास्ताविक

'देहू, आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास' या पीएच. डी. या संशोधन प्रबंधात 'क्षेत्र देहू ते क्षेत्र पंढरपूर पर्यंत संत तुकाराम महाराज पालखी दिंडी सोहळयाची वाटचाल व क्षेत्र आळंदी ते क्षेत्र पंढरपूर, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळा, वाटचाल या विषयी ऐतिहासीक पध्दतीने मांडणी करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे या दोन्ही पालखी सोहळयाचा उदयकाळ, सुरूवातीच्या काळातील स्थिती, तसेच २०१० नंतरच्या काळातील दोन्ही पालखी सोहळयाची वाटचाल. पालखी सोहळयाचे प्रस्थान, दैनंदिन कार्यक्रम, रोजच्या वाटचालीतील नित्यक्रम, प्रवासाची तिथी, त्यानुसार येणारी वार, दिनांक, रोजचे मुक्काम, प्रवासातील दिवसभराती विसावा, दुपारचा मुक्काम दुपारचा विसावा, रात्रीचा मुक्काम, मुक्कामाची सर्व ठिकाणे, वाटचालीत येणारी सर्व गावे, सकाळचे निघण्याचे ठिकाण ते रात्रीचे मुक्कामाचे ठिकाण वाटचालीतील सर्व नित्यक्रम, दिवसभरातील वारकरी गात असणारे अभंग, दोन्हीही पालखी सोहळयाची ही सर्व माहिती संशोधनात प्रामुख्याने येते.

तसेच दोन्ही पालखी सोहळयातील विशेष आकर्षण 'रिंगण सोहळा' असतो. परंपरेनुसार वाटचालीत प्रवासात लाखो वारकऱ्यांना मनमुराद आनंद लुटण्यासाठी रिंगण सोहळा घेतला जातो. दोन्ही सोहळयातील रिंगण सोहळयात 'उभे रिंगण व गोल रिंगण' असे दोन प्रकार असतात. रिंगण सोहळयाचे वेळापत्रक, ठिकाण, वेळ, रिंगण सोहळयाचे वर्णन केलेले आहे. 'वारकरी' येथे सर्व पालख्या, दिंडी सोहळे एकत्र येतात. दशमीला ठरलेल्या वेळेनुसार व क्रमाने पंढरपूरकडे रवाना होतात. रात्री साधारणतः १० वाजेपर्यंत दोन्ही पालखी सोहळे परंढरपूरात मुक्कामाला पोचतात. एकादशीला सकाळी सर्व वारकरी भाविक आपआपल्या दिंड्यामध्ये सहभागी होऊन नगर प्रदक्षिणा करतात. पांडुरंगाच्या दर्शनासाठी १८ ते २४ तास रांगा लावतात. कीर्तन, भजनाचा आनंद घेतात एकादशी ते पोर्णिमे पर्यंत 'पंढरपूरात ' वारकरी राहतात. पोर्णिमेला काला झाल्यानंतर संत तुकाराम पालखी देहूकडे परतीच्या प्रवासासाठी प्रस्थान करते. त्याच दिवशी संत ज्ञानेश्वर महाराजाची पालखी क्षेत्र आळंदी कडे परतीच्या प्रवासासाठी प्रस्थान करते. एकादशी या तिथीला

संत तुकाराम महाराज पालखी, देहु ला तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी, आळंदी येथे दशमी या तिथीला पोहचते.

**इतिहासचार्य कै.वि.का.राजवाडे यांचे वारकरी संप्रदायातील विवेचन**

यांनी विठ्ठल शब्दाची सर्वाकृष्ट व्युत्पात्ति दिली आहे ते म्हणतात विठ्ठल शब्द विठ्ठल शब्दापासून व्युज्यादावा विठ्ठल म्हणजे दूर एकीकडे रानावनात असलेली जागा,स्थळ व विठ्ठल देष म्हणजे दूर एकीकडे रानावनात असलेला देव.देवा या उत्तर पदाचा लोप होऊन विठ्ठल असा नामनिर्देश प्रचलित झाला आहे.तसेच ते म्हणतात जेथे सध्या विठोबाचे देऊळ आहे.तेथे पूर्वी बाभूळवन होते.त्या बाभूळ वनात पुंडलिकाने देवाची स्थापना केली. (हा संदर्भ भा.इ.सं.म.त्रै ७/२/९६) इतिहासचार्य राजवाडे यांची ज्ञानेश्वरी सर्वात जुनी मानली जाते.त्यांनी असे स्पष्ट मत मांडले आहे की गीतेतील श्लोकावर ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत विवेचन केले आहे असे काही नाही.सर्वात जुनी ही राजवाडे यांची ज्ञानेश्वरी आहे याविषयी सहस्त्रबुध्दे ,जोग म.,साखरे संप्रदाय यांचे मत वेगळे आहे.राजवाडे यांनी असे म्हटले आहे की,मूळ ज्ञानेश्वरीतअनेक उच्चार व्याकरणातील काना,मात्रा वुकार,यामध्ये काळानुसार बदल होत गेला यामध्ये संशोधन करण्याचे महत्वपूर्ण काम राजवाडे यांनी प्रथमताहा केले.राजवाडे ज्ञानेश्वरी म्हणून ती प्रकाशित केली.तसेच संतांळयाच्या उपदेशामुळे महाराष्ट्रात नवीन जोम आला असे न्यायमूर्ती रानडे म्हणतात तो खरा प्रकार नसून समर्थानी काढलेल्या नवीन रामदासी पंथाच्या उपदेशाने तो चमत्कार घडून आलेला आहे. **समर्थांचिया सेवका वक्र पाहे,असा सर्व भूमंडळी कोण आहे** अशी धमकी देणाऱ्या समर्थाच्याच महोपदेशाचा मो परिणाम होय.असे आपले मत राजवाडे यांनी ठामपणे मांडले आहे.

वारकरी संप्रदायाची विकास होताना वारकरी सहभाग वाढला आहे.धार्मिकेत वाढत असताना टाळकऱ्या बरोबर धारकरांची मोठी गरज या महाराष्ट्राला आहे.

इतिहासचार्य राजवाडे यांनी अनेक जुन्या घराण्यांचे संशोधन केले हे करत असतान. त्यांना खेड तालुक्यातील कडूस शेल पिंपळगाव परिसरात पुराणिक नावाचे घराणे आढळले.त्याच्या मुळाचा तपास करताना त्यांना अशी माहीती मिळाली की.या पुराणिकांचे खरे आडनाव सनकाडे होते.कोंडभर हा त्यांचा मूळपुरूष .तो शिवाजी महाराजाकडे पाणवड्या होता.तुकाराम महाराजांच्या कृपेने त्याला ज्ञान प्राप्त झाले व तो मोठा पुराणिक बनला त्यांची नियुक्ती दरबारात झाली तेव्हापासून घराण्याचे आडनाव सनकाडे बदलून पुराणिक असे झाले. तुकाराम गाथा,ज्ञानेश्वरी

,महीपतिकृत चरित्र वारकरी परंपरा यांना अशा प्रकारे राजवाडयांनी पुष्टी देऊन कथेचे, ग्रंथांचे प्रामान्य शाबीत केले आहे या दृष्टीने इतिहासचार्य वि.का.राजवाडे यांचे हे कार्य महत्वाचे मानले जाते.

**वारीचे महत्त्व :**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या वडीलांपासून पंढरपूरच्या वारीची परंपरा येते. संत ज्ञानेश्वरांच्या वडीलांपासूनची ही परंपरा संत ज्ञानेश्वरांनी पुढे चालू ठेवली. त्याचबरोबर त्यांच्यापासून इतर सर्व संत मंडळींनी ही परंपरा पुढे सुरु ठेवली. यामध्ये संत नामदेव, संत एकनाथ, संत बहिणाबाई, संत जनाबाई, संत गोरोबाकाका, संत सेना, संत रोहीदास, संत तुकाराम, संत निळोबाराय, सोयराबाई, कान्होपात्रा इ. या सर्व व इतर सर्व संत मंडळींनी पंढरपूरची वारी ही परंपरा स्वतः वारकरी, भाविकांना घेऊन दिंडीच्या रुपाने दरवर्षी चालू ठेवली.
'वारी' परंपराचे आज अनेक दिंड्यांच्या रुपाने भव्यदिव्य स्वरुपात लाखो भाविक, वारकऱ्यांसह दर वर्षी आषाढ महिन्यात पंढरपूरला पायी प्रस्थान करतात.सर्व संत मंडळीच्या नावाने आज पालखी दिंडी पायी वारी सोहळे मोठ्या स्वरुपात झालेले आहेत. या सर्व सोहळ्याचे स्वरूप दिवसेंदिवस वाढत चालले आहे. महाराष्ट्रातून व महाराष्ट्राबाहेरून अनेक दिंड्या पालख्या घेऊन पंढरपूरकडे आषाढी वारीला येतात. संत तुकाराम हे १४०० टाळकऱ्यांसह पंढरपूरच्या वारीला जात असे. ही परंपरा विश्वंभर बाबांपासून सुरु होती. तुकोबाराय हे आठवे वंशज होय. परंपरा पुढे तुकोबारायांचे धाकटे पुत्र श्री नारायण बुवा यांनी सुरू ठेवली. त्यांनी प्रथमच १६८० साली पालखीमध्ये संत तुकोबाराय यांच्या पादुका ठेवून ते क्षेत्र देहू येथून आळंदीला आले. व पालखीत तुकोबाराय यांच्या पादुकांबरोबर श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुका ठेवून संयुक्त पालखी दिंडी सोहळा सुरू केला. हे महत्त्वाचे मानले जाते. संयुक्त व एकत्रपणे पालखी सुरुवात होऊन प्रथम पालखी घेऊन वारी प्रथा सुरु झाली. या वारीमध्ये सर्व जातीतील संत मंडळींची पालखी पंढरपूरकडे जात असते. प्रत्येक दिंडी मध्ये सर्व जातीचे लोक एकत्र येत असतात. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील, खेड्यातून, तसेच शहरी भागातून, अशिक्षीत, शिक्षीत, पदवीधर, नोकरदार, पुढारी व्यावसायिक, मुले, मुली, वृद्ध स्त्री–पुरुष असे सर्व स्तरावरील समाज सहभागी होत असतो. विशेषतः क्षेत्र देहू ते पंढरपूर, क्षेत्र आळंदी ते क्षेत्र पंढरपूर या दोन्ही आषाढी दिंडी सोहळ्यात लाखो समाज १८ दिवस पायी प्रवास करतात. या सोहळ्यासाठी कोणतेही आमंत्रण नसताना दरवर्षी हा समाज या सोहळ्यात वाढत आहे. कोणीही न बोलावता कसलेही निमंत्रण नसताना लाखो लोक ठिकठिकाणाहून पायी निघून ठरल्या दिवशी, ठरल्या वेळी पंढरीत पोहचतात. धर्माचा, पंथाचा, वयाचा, स्त्री–पुरुष भेदाचा कसलाही प्रश्न निर्माण होत नाही. नम्रतेने व शांततेने चालणारा समाज जगातील एकमेव उदाहरण आहे ही वारी समाजात ऐक्यभाव निर्माण करतो. संघटीत समाज घडविण्याचे काम वारीत घडते. इ.स. १६८० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू होऊन संभाजीराजे गादीवर आले. अशा परिस्थितीत स्वतः औरंगजेब बादशाहा मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्याच्या निश्चयाने महाराष्ट्रात मोठ्या सामर्थ्यानिशी दाखल झाला. त्याच्या तुलनेत मराठ्यांचे

बळ फारच तोडके होते. अशावेळी महाराष्ट्रातील जनतेच्या मनातील नितीधैर्य कायम राखण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या उपक्रतांची गरज होती. नारायण महाराजांनी अत्यंत विचारपूर्वक ज्ञानोबा–तुकोबांचा पालखी सोहळा सुरु केला.सोहळ्यात सहभागी वारकरी, भाविक व सहभागी सर्वांना वर्षभराची उर्जा मिळते. बिकट परिस्थितीत, तसेच येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यासाठी लागणारी शक्ती या वारीच्या प्रवासात मिळते.

पालखी सोहळा ही महाराष्ट्राची एक सांस्कृतीक ओळख बनली आहे. महाराष्ट्र व देशभरात सामाजिक बांधीलकी, सामाजिक समतोल, समाज जागृती व सामाजिकरण घडविण्याचे काम वारीमुळे होत आहे. आषाढी वारीत पावसाळा मोठा असतो अशा वेळी वारकऱ्याना पोटाचे विकार होण्याची शकत्या असते मात्र वारीमध्ये वारकरी कमरेवर हात ठेवून विठ्ठल विठ्ठल म्हणत असल्याने पोटात तयार होणारा गॅस वरती छातीकडे न सरकता तो खाली सरकतो व त्यामुळे हृदयविकारासारख्या आजारापासून त्याचे संरक्षण होते असा वैज्ञानिक दृष्टीकोन देखील वारीमध्ये असणाऱ्या परंपरेमागे आहे.

**वारीबद्दल काही जेष्ठ व्यक्तींनी मांडलेली मते –**

**आर.आर. पाटील वारीबाबत बोलतात–**

वारीत चालत असताना होणारे शारीरीक क्लेकश वारकरी आनंदात सहन करतात नि पुढं–पुढं जात राहतात. एकदा पंढरीत पोहचल्यानंतर विठूरायाच्या दर्शनानं सर्व दुःखाचा नाश होणार आहे ही श्रद्धा हा विश्वास या वारकऱ्यांच्या ठायी असतो. या वारीत जीवनाचं तत्त्वज्ञान आणि सार आहे. ‘तु आणि मी’ असा भेदच वारीत राहत नाही. लहान–थोर प्रत्येक जण एक झालेला असतो. प्रत्येक जण ‘माऊली’ झालेला असतो.

**बबनराव पाचपुते म्हणतात–**

वारीत ८० वर्षाची म्हातारी व्यक्ती पाच वर्षाच्या मुलाच्या पाया पडते आणि इथं पत्नीसुद्धा पतीला ‘माऊली’ म्हणते. वारीचा हा खरा संस्कार आहे. राज्याची खरी संस्कृती वारीत पाहायला मिळते. एकही व्यक्ती चुकीच्या पद्धतीने वागत नाही. सगळेजण विठ्ठलमय होऊन चालत असतात. वारीचा आनंद हा परमानंद आहे, कायम टिकणारा आहे.

**डॉ. तारा भवाळकर–**

यात सर्व जातीपातीचे स्त्री–पुरुष समकक्ष आहेत. कुणी लहान नाही कुणी थोर नाही वारीला जाऊन आला तो विठ्ठलाचा अंश होऊन आला. म्हणून आजोबा नातवाचे पाय सहज धरतो.

**न्यायमूर्ती रानडे असे म्हणतात**–

महाराष्ट्र देशातील, सर्व ठिकाणचे सर्व जातींचे सर्व धंद्यातील व स्थितीतील लोक आपला व्यवसाय सोडून व भिन्नपणा विसरुन केवळ भक्तीभावाने या कामास प्रवृत्त होतात. तसेच दिंड्यांमध्ये ‘जाती, विद्या, अधिकार पदाचे भेद यात्रेकरू मानत नाहीत.

## डॉ. सदानंद मोरे –

परचक्र , अवर्तण, दुष्काळ अशा आपत्तींना न जुमानता वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरीची वारी करीतच राहील्या. त्यामुळे धर्म आणि संस्कृतीचे रक्षण झाले. तीन शतकात हा वारकरी संप्रदाय महाराष्ट्राच्या समाज जिवनाचा मुख्य प्रवाह बनला. या काळात दिंड्यांनीच सांभाळला.लष्कराच्या शिस्तीप्रमाणे वारी आज तागायत सुरु आहे. हैबत बाबा हे सरदार होते. त्यांच्याबरोबर शितोळे सरकार यांच्यातील शिस्त या सोहळ्यात दिसते. ठरलेल्या वेळेनुसार दररोज पालखी सोहळा सुरु होतो. व रात्री मुक्कामाला पोहचतो. लाखो वारकरी सहभागी हेस र्व नित्यनेमाने पाळतात. यासाठी कोणीही सांगण्यासाठी नसते. स्वयंशिस्तीने सर्व चालते. हे विशेष आहे.वारीमध्ये सामाजिकता दडलेली आहे. समता, बंधुता आणि शांतता या तिन्ही बाबी वारीत एकत्रपणे दिसतात. वारीत लाखो भाविक एकत्र चालतात इतक्या मोठ्या प्रमाणात समाज असला तरी कोणत्याही स्वरुपाची अनिष्ठ घटना घडत नाही. सर्व एकोप्याने नांदतात.वारी ही महाराष्ट्राची संस्कृती असून ती सात्विक विचारांची गंगा आहे. तिच्यात मिसाळणाऱ्या प्रत्येकाला ती आपल्यात सामावून घेते. आपल्या स्वरूपाला प्राप्त करते. ज्यामुळे ती वर्षानुवर्षे अखंडपणे प्रवाहित आहे.

## स्त्री संतांची वारी तील योगदान

महाराष्ट्राला थोर संतांची मोठी परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी मानली जाते. या संत परंपरेमध्ये पुरुष संतांप्रमाणे स्त्री संतदेखील महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मध्य युगात महाराष्ट्रात ‘स्त्री’ना समाजात विशिष्ट पद्धतीने वागवले जात असे. स्त्रीही फक्त उपभोगाची वस्तू हा दृष्टीकोन मध्ययुगाच्या कालखंडात होता. स्त्रीला ‘चूल आणि मूल’ एवढा एकच संस्कार उरलेला होता. तिला समाजात मोकळ्या पणाने जगता येत नव्हते. ती अनेक रुढीपरंपरेने तिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते.पुरुषाप्रमाणे स्वतंत्र्यपणे व्यवहारात वावरता येत नसे. गावामध्ये कोणत्याही सामुहिक कार्यक्रम, यज्ञ होम, शिक्षण, या पासून वंचित होती. मुलगी जन्माला येणे हे समाजात मोठे संकट वाटायचे. तिच्या आईला त्रास होत असे. लहान वयात तिचे लग्न लावून देणे. नवरा मेला तर तिला सती जावे लागे. नाहीतर आयुष्यभर विधवा म्हणून जगावे लागत असे. स्त्री ही अत्यंत हालगित व मराणोपाय जीवन जगत होती.

स्त्रीला पुरुषाप्रमाणे समानतेची वागणूक देऊन तिला तिचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी अनेक संत मंडळींनी याबाबत अभंगातून समाजासमोर प्रबोधन केले. या संत मंडळीत काही स्त्री संतांनी पुरुषांप्रमाणे स्त्रीची व्यथा त्यांनी मांडली. संत परंपरेतील संत ज्ञानेश्वरांपासून ते संत निळोबारायांच्या पर्यंतच्या कालखंड अनेक संत स्त्रींनी वारकरी संप्रदायाच्या विकासात हातभार लावताना अध्यात्मची व भक्तीची भूमिका मांडून स्त्री–पुरुष समानता समाजासमोर मांडून स्त्रीला देखील भक्ती करण्याचा अधिकार आहे आणि त्याप्रमाणे तिची भक्ती देवाला प्रिय आहे. तर ती स्त्री समाजाच्या दृष्टीने वाईट कशी या स्त्री संतांमध्ये संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत बहिणाबाई, संत मीराबाई, संत वेणाबाई या स्त्री संतांनी आपली भूमिका अभंगाच्याद्वारे स्पष्ट करून स्त्री विवेंचना व समाजात स्त्रीला असणारे मानाचे स्थान निर्माण केले. वारकरी संप्रदायात स्त्रीला भक्ती करण्याचे स्वातंत्र्य असुन ती भक्तीच्या द्वारे देवाला प्रसन्न करु शकते. हे दाखवून दिल.

वारीची परंपरा चालू ठेवण्यासाठी स्त्री संतांनी महत्त्वाचा वाटा उचलला आहे. विठ्ठलाला भेटण्यासाठी पायी वारीच्या माध्यमातून अभंग गात पंढरपूरला आषाढी एकादशीला वारकरी पोहचतात यात अनेक स्त्रीया सहभागी होतात. या पाठीमागे स्त्री संतांची भूमिका महत्त्वाची वाटते.वारीतील प्रत्येक दिंडीत वारकऱ्यांबरोबर तुळशी धारण करणारी एक स्त्री असतेच, त्याशिवाय दिंडी पूर्ण होत नाही. तसेच अनेक दिंडीचे नियोज स्त्री स्वतः करतात. फक्त महिलांची दिंडी आषाढी वारी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. अभंग, टाळ, मृदंग व वीणा आणि नियोजन हे सर्व कार्य महिलाच करतात. संत मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग हे आपले बंधू संत ज्ञानेश्वरांना जागे करण्यासाठी व सामान्य माणसाच्या जीवनाचे दुःख कळण्यासाठी रचलेले आहे. ते म्हणतात–

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।
विश्वरागें झालें वन्ही । संते सुखे व्हावे पाणी ।।

मुक्ताईचा स्वतंत्र हरिपाठ आहे. तसेच सांप्रदायची हरीपूजे बाबबत लिहितात.

पुजा पुज्य वीते पूजक पैचित्ते । घाली दंडवते भावशिळा ।

पंढरीरावो बद्दल ते म्हणतात–

मुक्त जीव सदा होति पै नाम पाठे । तेचि रूपे विटे देखिले आम्ही ।।
पुंडलिके विठ्ठल आणिला पंढरी । आणू ति लवकरी तारीले जग ।।

संत जनाबाई –

जनाबाई एक स्त्री आणि तीही एक दासी आहेत. याबद्दल मनात कष्टी होत नाही. त्या म्हणतात–

स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी ।
संतांचे घरची दासी मी अंकिली । विठोबाने दिली प्रेमकळा ।।

जनाबाई या पोरकटा होत्या. त्या नामदेव यांच्या कुटुंबात राहत असे. तेव्हा त्या अशी रचना करतात–

माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।
मी तुझे गा लेकरूं । नको मजशी अव्हेरूं ।।

सर्व संतांची विठोबाची असनिल जवळीक ते स्पष्ट करतात– विठो माझा लेकुरवाळा ।संगे लेकुरांचा मेळा ।अभंग, गाथा, हरिश्चंद्र आख्यान, दशावतार वर्णन, थालीपाठ, तिथवेळी, कृष्णजन्म, बालक्रिडा, काला, दशावतार इ.

संत बहिणाबाई –

तुकोबारायांची कौटुंबिक नाने बहिणा बाईंचे होते. बहिणाबाईंचे तुलशी महात्म्य, ब्रह्मकर्मपर अभंग रचना केलेली आहे. पंढरीनाथ, पंढरी महात्म्य

बहिणाबाई म्हणतात–

तू माझी माऊली तुझें मी बालक । करीते कौतुक नामी तुझीया ।।

संत वेणाबाई –

रामदास स्वामींचे शिष्यत्व त्यांनी पत्कारले व त्यांच्या संप्रदायाच्या आचार धर्मांचे काटेकोर पालन केले व असाधारण प्रतिष्ठा मिळविली.

त्यांनी रामायण क्षीराचरीत्र आदिकांडातील अभ्यासनीच ओवी

सितेराम जिकील हे दिसता हे । मुनी वाल्मिकी वाक्य होणार आहे ।

संत कोन्हापात्रा, संत मिराबाई या स्त्री संतांनी पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती करून भक्ती संप्रदायाचा प्रचार प्रसार केला. देवासी नादात जोडून मोक्ष रूपी आनंद मिळविला. या भक्ती मार्गात वारीला त्यांनी विशेष महत्त्व दिले.आषाढी वारी पालखी सोहळ्यातील संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात सर्व श्री. ह.भ.प. श्रीमती गिरीजाबाई टेकूरकर दिंडी सर्वश्री ह.भ.प. माई दिंडी सर्वश्री ह.भ.प. ताराबाई वारकरी दिंडी, सर्वश्री. ह.भ.प. मुक्ताबाई भजनी मंडळ दिंडी सर्वश्री ह.भ.प.संत भागिरथीबाई दिंडी, येलवाडी, सर्वश्री. ह.भ.प. सावित्रीबाई अहिवळे दिंडी संत बहिणाबाई महिला प्रासादिक दिंडी, वेष्णामाई प्रासादिक दिंडी केडगाव,पि.चि. येथील मंगलाताई कांबळे यांची बहिणाबाई प्रासादिक दिंडी,सुप्रिया साठे यांची जिजाबाई प्रासादिक दिंडी.श्री. ज्ञानेश्वरीताई बागुल यांची पाटणे ते पंढरपूर पायी दिंडी सर्व श्री. मीराबाई मिरीकर, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडी सोहळ्यासमवेत चालणाऱ्या दिंड्या वालूबाई दिंडी मु.पो. सातारा रोड, ता. कोरेगाव, जि. सातारा, गयाबाई वेळापूरकर दिंडी पंढरपूर वेदावती सीताबाई दिंडी मु.पो. मोळ, ता. खटाव, जि. सातारा, अहिल्यादेवी दिंडी तळेगाव दाभाडे इ.या सर्व दिंड्या स्त्री संतांची वारकरी पंरपरा चालवत आहेत.

**सिंहालोकन**

प्रकरण १ ले– ‘विषयप्रवेश’, या प्रकरणात, पंढरपूर धामची ऐतिहासिक पार्श्वभूमी, पंढरपूरचे ऐतिहासिक स्थान व महत्व, पंढरपूर क्षेत्र वर्णन, विठ्ठल शब्दाची उत्पत्ती, वारकरी तत्वज्ञान, नियम व गुण, वारी संकल्पना, दिंडी शब्दाची संकल्पना हैबतबाबा, दिंडी प्रवर्तक, श्री. नारायण बुवा, दिंडी प्रवर्तक, दिंड्यांची यादी.

प्रकरण २ रे– ‘संशोधन पध्दती’– या प्रकरणात प्रस्तावना, अभ्यास विषय निवड व हेतू, अभ्यास विषयाचे महत्व, अभ्यास विषयाचे उद्दिष्टे, संशोधन अभ्यासाची गृहिते, संशोधन अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती– अ) प्राथमिक तथ्य संकलन, ब) दुय्यम तथ्य संकलन

प्रकरणे ३ रे– ‘वारकरी संप्रदायाचा इतिहास’, या प्रकरणात श्री ज्ञानदेवांच्या पूर्वीचा वारकरी संप्रदायाचा काल, श्री ज्ञानदेव व श्री नामदेव याच्या काळातील वारकरी संप्रदाय, श्री भानुदास व श्री एकनाथ महाराज यांच्या काळातील वारकरी संप्रदाय, श्री तुकोबाराय व श्री निळोबाराय यांच्या काळातील वारकरी संप्रदाय, तद्नंतरच्या वारकरी संप्रदायचा इतिहास, वारकरी संप्रदायाचे

तत्वज्ञान वारकरी संप्रदायाची ग्रंथ संप्रदायाची ग्रंथ संपदा, प्रमुख क्षेत्रे, वारकरी संप्रदायाची ग्रंथ संपदा, प्रमुख क्षेत्रे, वारकरी संप्रदायाची कामगिरी.

प्रकरण ४ थे– 'श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी पायी पालखी दिंडी सोहळा ' या प्रकरणात क्षेत्र देहू ते पंढरपूर, पालखी दिंडी सोहळा, संत तुकाराम महाराज पालखी दिंडी सोहळा प्रस्थान, दैनंदिन नित्यक्रम, दिंडी प्रवास मार्ग, मुक्काम, वाटचाल, दिंडी प्रवासातील रिंगण.

प्रकरण ५ वे – श्रीक्षेत्र आळंदी ते क्षेत्र पंढरपूर पालखी दिंडी सोहळा, या प्रकरणात संत ज्ञानेश्वर म. पालखी दिंडी सोहळा प्रस्थान, दैनंदिन नित्यक्रम, दिंडी प्रवास मार्ग, मुक्काम, वाटचाल दिंडी प्रवासातील रिंगण, वाखरी येथील रिंगण, परतीचा प्रवास,

प्रकरण ६ वे – 'महाराष्ट्रातून पंढरीला (पंढरपूर) येणाऱ्या विविध दिंड्या', या प्रकरणात, संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी, संत सोपान काका दिंडी, संत मुक्ताबाई दिंडी, संत एकनाथ म. दिंडी, सद्गुरू चैतन्य महाराज दिंडी, संत गजानन म. दिंडी, ज्ञानेश्वर म. संस्थान दिंडी, श्री साईबाबा दिंडी, जनार्दन स्वामी दिंडी, संत महिपती म. दिंडी, संतराज म. दिंडी, संत नरहरी दिंडी, इतर दिंडी सोहळे

प्रकरण ७ वे– सिंहालोकन, निष्कर्ष, शिफारशी

**निष्कर्ष**

'' देहू, आळंदी ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास'' या संशोधन विषयातंर्गत क्षेत्र देहू ते क्षेत्र पंढरपूर संत तुकाराम म. पायी पालखी दिंडी सोहळा, क्षेत्र आळंदी ते क्षेत्र पंढरपूर, संत ज्ञानेश्वर म. पालखी दिंडी सोहळा पायी प्रवास या दोन मुख्य पालख्या सोबत चालणाऱ्या दिंड्या व लाखो वारकरी समाज या प्रवासाचे अभ्यास या प्रबंधात केलेला आहे हे काम करत असताना निरिक्षण, मुलाखती, उपलब्ध लिखित साधने याच्या आधारे काम केलेले आहे. प्रबंध लेखन करत असताना पुढील महत्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत.

१. या पालखी दिंडी सोहळ्यात लाखो वारकरी सहभागी होतात.

२. या सोहळ्यातील एकत्र प्रवासामुळे सामाजिक ऐक्य भावना वाढते.

३. समाजातील अनेक जातीचे लोक या सोहळ्यात सहभागी होतात त्यामुळे विषमता नष्ट होऊन समता निर्माण होण्यास अनकुल घटना घडतात

४. कुठलाही जातीभेद या सोहळ्यातील प्रवासात दिसत नाही.

५. सहभागी समाजात परस्पर मैत्रीची व प्रेमाची भावना वाढीस लागते.

६. परस्परांचे सुख, दुःख या वाटचालीत मांडले जातात त्यामुळे दुःखाची तीव्रता कमी होऊन समाधानी राहण्याचे नविन बळ समाजाला मिळते.

७. रोजच्या दैनंदिनीतून बाहेर पडून समाजात एकत्र येण्याची व समाधान मिळून मन प्रसन्न करण्याची मोठी संधी या सोहळ्यात मिळते.

८. नविन वेगळी गावे, परिसर तेथील राहणीमान, परिस्थिती अनुभवास या सोहळ्यात सहभागी भाविकांना मिळते.

९. नागरिकांना समाजात राहण्याची व प्रवासाची एक चांगली सवय लागते.

१०. प्रतिकुल परिस्थितीवर मात करून जगण्याची नविन जिद्द या प्रवासाने समाजात तयार होते.

११. समाजिक प्रबोधन व अंधश्रध्दा निर्मुलन होत असते.

१२. शासनाच्या वतीने, तसेच सामाजिक संस्था कडून या दिंडी सोहळयात, सामाजिक परिवर्तन घडण्यासाठी विविध पद्नाटके, समाज प्रबोधनपर व्याख्याने, पोस्टर या द्वारे हागणदारी मुक्त गाव, स्वच्छता जागृती, वृक्षारोपन, पाणी बचत, ऊर्जा बचत, हुंडाबळी, बेटी बचाव, असा अनेक विषयावर प्रबोधन केले जाते. याचा परिणाम वारकऱ्यांवर व सहभागी भाविकात होताना दिसतो.

१३. सहभागी वारकरी, भाविक यामध्ये सर्व प्रकारचे लोक असतात.

१४. काही भाविक प्रथमच वारीत सहभागी झालेला असतात. तर काही 'वारकरी' आपली परंपरागत वारीची परंपरा चालू ठेवण्यासाठी पिठाणपिढ्या पासुन या वारीत सहभागी असतात.

१५. दिंडीत सहभागी असलेले ठराविक दिवसभराचा भजना मध्ये असतात. इतर सर्व भाविक सोहळ्यात 'माऊली' बरोबर तुकाराम महाराजा बरोबर आपण चालतो या भावनेने चालत असतात.

१६. सहभागी वारकरी, भाविकांमध्ये जास्तीत जास्त वृध्द, प्रौढ लोकांचा सहभाग जास्त असतो. साधारणतः ४० वर्षा पेक्षा जास्त वय असलेल्याचा भरणा या सोहळ्यात निश्चित जास्त आहे.

१७. 'मराठवाडा' या भागातील दिंड्या व सहभागी भाविक जास्त असतात.

१८. या सोहळ्यात प्रचंड आर्थिक उलाढाल होते.

१९. दिंड्यात सहभागी वारकऱ्यांना सहभागासाठी 'भिसी फी' घेतली जाते. यातून प्रचंड मोठी रक्कम गोळा होते.

२०. प्रवासात वारकऱ्यांना लागणाऱ्या सुविधा मधून मोठा रोजगार उपलब्ध होतो.

२१. आर्थिक क्षेत्रात निश्चित भरीव वाढ करण्यात या सोहळ्याचे योगदान येते.

२२. या सोहळ्यात सहभागी भाविकांना खर्च करण्याची सवय लागते.

२३. आरोग्य व स्वच्छतेसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसतात.

२४. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वाटचातील प्रवासात अनेक ठिकाणी निर्माण होत असते.

२५. मुक्कामाच्या ठिकाणी पुरेशी उपलब्ध जागा नसते.

२६. अनेक भाविकांची दिंडी मध्ये गैरसोय होत असते.

२७. कोणतेही भाविक या संबंधात काहीही तक्रार कला नसताना ते समाधानाने या सर्व गोष्टीला सामोरे जातात.

२८. एक शिस्तबध्द व शांततेने लाखो समाज पायी प्रवास करत असतो १८ दिवसाचा हा प्रवास शांततेत व शिस्तीने नेहमीच चालते हे जगातील मोठे वेगळे पण आहे.

२९. जगाला एक सामाजिक ऐक्याचा सामाजिक भावनेचा, शांततेचा संदेश देणारा सोहळा आहे.

३०. राष्ट्रीय जनजागृती व ऐक्य भावना वाठीस लावणारा हा पालखी दिंडी सोहळा आहे.

३१. सहभागी वारकऱ्याना अनुपम्य आनंद देणारा हा सोहळा असल्याने दरवर्षी सहभागी वारकऱ्याची संख्या वाढते.

## शिफारशी

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी आषाढी दिंडी सोहळा क्षेत्र आळंदी ते क्षेत्र पंढरपूर व संत तुकाराम महाराज पालखी आषाढी दिंडी सोहळा, क्षेत्र देहू ते क्षेत्र पंढरपूर या दोन्ही पालखी, दिंडी सोहळाची पायी वाटचाल चे सविस्तर लेखन या संशोधन प्रबंधात केलेले आहे.निरिक्षण या दिंडी सोहळ्याचा अभ्यास करताना ज्या गोष्टीचे बारकाईने निरिक्षण केले, प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या गेल्या. यातुन असे स्पष्ट होते की, दिंडी सोहळ्यातील सहभागी समाजाला, वारकऱ्यांना तसेच

दिंडीचालक, नियोजक यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. त्या संदर्भात खालील शिफारशी मांडलेल्या आहेत.

१. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी उदाहरणार्थ क्षेत्र आळंदी, क्षेत्र देहू तसेच क्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकासाठी, शुध्द पाण्याची मोठी समस्या आढळते. शुध्द पाणी पुरवठा आवश्यक आहे.

२. स्वच्छतेची गंभीर समस्या आढळते. शासनाच्या वतीने पालखी सोहळ्याबरोबर फिरते मुबलक शौचालय उपलब्ध करणे गरजेचे आहे तसेच स्वच्छतादूत देणे आवश्यक आहे.

३. पालखी दिंडी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक वैद्यकीय सेवा मोफत व मुबलक प्रमाणात देणे गरजेचे आहे.

४. संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात रोजच्या मुक्कामाच्या ठिकाणी शासनाकडून कायमस्वरूपी पालखी तळ उपलब्ध करण्यात यावा. शासानाने ती जागा आरक्षित करावी.

५. या पालखीसोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकामध्ये प्रबोधनपर बेटी बचाव अभियान, स्वच्छता अभियान,व्यसनमुक्ती,पर्यावरण बचाव इ.बाबत मुक्कामाच्या ठिकाणी शासनाच्या वतीने कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची


प्राथमिक साधने

१. छत्रपती राजाराम महाराज यांचे श्री नारायण म. यांना पाठीविलेले वारीसंदर्भातील पत्रे

२. रामचंद्रपंत अमात्य यांनी श्री नारायण म. यांना पाठीविलेले वारीसंदर्भातील अस्सल पत्रे

३. श्री संत तुकाराम महाराज देहू संस्थान यांच्याकडील मूळ कागदपत्रे

४. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आळंदी संस्थान यांचे अहवाल

५. शासकीय पुरालेखागारात पुणे यांचेकडील दस्तऐवज, रूमालसूमारी ५६, ४८, दप्तर क्र. ३९, दप्तर क्र. ४४, पुडके ४, २२२, २३४

६. पंढरपूर संशोधन मंडळ ,पंढरपूर बडवे दप्तर येथील उपलब्ध कागदपत्र

७. केसरी अंक सन १९१३,१९१७,१९२०

शिलालेख

१. श्री पांडूरंगाच्या मंदिरातील चौऱ्यांशीचा शिलालेख शके ११९५

२. श्री पांडूरंगाच्या मंदिरातील १६ खांबी शिळेवरिल संस्कृत शिलालेख शके ११५९

३. श्री क्षेत्र आळंदी येथिल हरिहरेंद्र स्वामींच्या मठातील कोणा कृष्ण स्वामींच्या समाधीवरील शके ११३१

मुलाखती

१. श्री बाळासाहेब आरफळकर, ज्ञानेश्वर म. दिंडी सोहळा
(मालक) मु.पो. आळंदी दे. ता. खेड, पुणे. १० जून २०१५ सायं. ५ वा.

२. ह.भ.प. भास्कर निवृत्ती पवार, दिंडी चालक १० जुलै २०१५ संध्या ६ वा.
मु.पो. आळंदी दे. ता. खेड, पुणे

३. डॉ. शिवाजी राव मोहिते, विश्वस्त, ज्ञानेश्वर म. संस्थान आळंदी १२ जुलै २०१५ सकाळी १०.०० वा.

४. श्री श्याम सुंदर मुळे, विश्वस्त, ज्ञानेश्वर म. संस्थान आळंदी दे. १२ जुलै २०१५ सकाळी १२ वा.

५. डॉ. सदानंद मोरे, लेखक, (वंशज तुकाराम) देहू. –संत साहित्य अभ्यासक १० ऑगस्ट संध्या ०४.०० वा

६. बाळासाहेब चोपदार, ज्ञानेश्वर म. दिंडी सोहळा, १० जुलै २०१५ दुपारी २.०० वा.
आळंदी दे. ता. खेड, पुणे.

७. श्री. राजाभाऊ चोपदार, ज्ञानेश्वर म. दिंडी सोहळा,आळंदी दे. १० जुलै संध्या. ३.०० वा.

८. जयवंत बाळकृष्ण दाभोळकर २६ जुलै २०१५ दुपारी २ वा.
मु.पो. जालगाव, ता. दापोली, रत्नागिरी, नांदेडकर दिंडी रथाच्या पुढे क्र.१५.

९. राजकुमार आनंदराव पवार २६ जुलै २०१५ सायं. ३ वाजता
मु.पो. माळशिरस, सोलापूर, वडगावकर दिंडी, रथाच्यापाठी मागे क्र.२२

१०. बाबाजी म. चाळक २६ जुलै २०१५ सांय ४ वाजता
मु.पो.शिरूर (पसायदान गुरूकुल) चैतन्य, कानिफनाथ दिंडी संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, रथाच्यापाठी मागे दिंडी क्र. १२४ २६ जुलै २०१५ सायं. ५ वा.

११. कडू बन्शी पाटील २६ जुलै २०१५ सायं. ५.३० वा.
मु.पो. धामंडी, ता. मुक्ताईनकर, ता. जळगांव
बाबा महाराज सातारकर, दिंडी क्र.३०

१२. प्रभाकर मच्छिंद्र लांडे २७ जुलै २०१५ सकाळी ११.०० वा.
मु.पो. पारूंडी, ता. पैठण, जि. संभाजीनगर
श्री संत एकनाथ म. दिंडी

१३. निवृत्ती शेजराव खोसे २७ जुलै २०१५ दुपारी १२.००
मु.पो. चुडावा, ता. पुर्णा, जि. परभणी
संत मोतीराम म. दिंडी.

१४. शिवहारी दशरथ भाकरे २७ जुलै २०१५ दुपारी १.०० वा.
मु.पो. कृष्णनगर, अंबलवाडी, ता. परकी, जि. बीड
सोपान काका पालखी सोहळा.

१५. शत्रुघ्न विजय पायघन २८ जुलै २०१५ दुपारी ३.०० वा.
शै. औंठा नागनाथ, ता. औंठा, जि. हिंगोली,
श्री संत नामदेव म. दिंडी

१६. योगेश नारायण शिंदे १८ जुलै २०१५ सकाळी ११.०० वा.

मु.पो. वाठूर, ता. मंठा, जि. जालना

श्री संत निवृत्तीनाथ म. पालखी सोहळा त्र्यंबकेश्वर

१७. दत्तात्रय जयानंद ठाकरे १५ जुलै २०१५ दुपारी १२.०० वा.

अकोला, ता. अकोला, जि. अकोला,

संत वासुदेव म. दिंडी

१८. आकाश देविदास आमले १६ जुलै २०१५ संध्या ४.०० वा.

मु.पो. खुमगाव बुट्टी, ता. खामगाव, जि. बुलढाणा

मुक्ताबाई दिंडी, एहलाबाद

१९. किशोर सुधाकर कांबळे १७ जुलै २०१५ दुपारी ३ वा.

मु.पो.पिलीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर,

अहिल्याबाई दिंडी

२०. ह.भ.प. अनिल बळीराम देशमुख १८ जुलै २०१५ संध्या ५.०० वा.

अंत्री, ता. मेहकर, जि. बुलढाणा

टेंभुकर दिंडी, ज्ञानेश्वर म. सोहळा

२१. ह.भ.प. रामेश्वर बाळू लेंडे १९ जुलै २०१५ दुपारी १२.०० वा.

ता. पैठण, जि. औरंगाबाद, एकनाथ म. दिंडी पैठण

२२. संदीप परसराम गायकवाड १९ जुलै २०१५ दुपारी ०१.००

मु.पो. पैठण, श्री संत एकनाथ म. पालखी सोहळा

२३. सौ. संगिता सुभाष चौधरी १९ जुलै संध्या. ३.०० वा.

मु.पो. नायगाव, ता. हवेली, पु. तुकाराम म. दिंडी साहेळा

२४.श्री. अशोक मोरे, अध्यक्ष संत तुकाराम महाराज संस्थान देहू, २०.१२.२०१५ सायं. ०६

## दुय्यम साधने


१. ॲड. बाबुराव हिरडे, दिड्या गावोगावच्या, स्नेहवध्रन पुणे, २ जुलै २००६

२. आन्हिक सूत्रावली, जुनी प्रत.

३. अनंत वासूदेव वाईकर, श्रीक्षेत्र पंढरपूर महात्म्य, सरस्वती बुक कंपनी, पुणे २०१४

४. कै. श्रीधरबुवा देऊकर, डॉ.सदानंद मोरे, श्री.संत तुकाराम म.पालखी सोहळा, उगम आणि विकास जून २०१२, नवी आवृत्ती.

५. कै.स.के. नेऊरगावकर, पालखी सोहळा, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी दे. २३ जून २०११

६. कृष्णाजी नारायण आठले, एकनाथजी भागवत, रामचंद्र कामत, सन १९२६

७. गीता प्रेस, गोरखपूर, श्री सकल संतवाणी खंड पहिला, नामदेवांची गाथा, गोरखपूर.

८. गीता प्रेस, गोरखपूर, श्रीमद्‌भागवत गीता विष्णुसहस्त्र नामसहित, गोरखपूर.

९. गीता प्रेस, गोरखपूर, श्री सकल संतवाणी(मराठी) खंड दुसरा, श्री एकनाथ गाथा, गोरखपूर.

१०. गीता प्रेस सकल संतवाणी, खंड दुसरा, तुकाराम गाथा.

११. गो.रा. रहिरकर, श्री सकल संत गाथा, रहिरकर, अश्विन, १९३३

१२. गो.रा.रहिरकर, श्री.सकल संत गाथा, ओळीचे अभंगाची, राहिकर सन १९३३

१३. गोपाळ गोविंद गोसावी, श्री सोपान संत गाथा, श्री.सो.देव समाधी मंदिर संस्थान, सासवड, मार्च २०१६

१४. गीता प्रेस, गोरखपूर, श्री भगवत् महापुराण द्वितीय खंड, देसाई १९९८.

१५. गाथा मंदिर, देहु, श्री तुकोबाराय दिनदर्शिका, सन २०१४.

१६. गोपाळ बाबा देहुकर कृत, श्री संत तुकाराम महाराजांचे वैकुंठगमन, श्रीधरबुवा देहुकर, तु.म.संस्था देहु,१९९८

१७. प्रा.श.वा. दांडेकर, वारकरी पंथाचा इतिहास, वारकरी प्रकाशक मंडळी, नागपूर, जून १९९४

१८. द.रा.बेन्द्रे, विठ्ठल संप्रदाय, जुनी आवृत्ती

१९. गुरुदेव रानडे, अनुवाद मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग, सन १९९३

२०. प्रा. ग.ह.खरे, विठ्ठल आणि पंढरपुर

२१. प्रा.डॉ.विकास कदम, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंड्यांची परंपरा, असरलेणं प्रकाशन, सोलापूर २०११

२२. प्रा.डॉ.विकास कदम, पंढरपुरातील संप्रदायिक फड, असरलेणं प्रकाशन, सोलापूर २०१०

२३. प्रा.डॉ. शुभांगना अत्रे, रायरीकर, केंजळे, महाराष्ट्र संस्कृती, डायमंड पब्लिकेशन नोव्हे. २००८.

२४. प्रा.डॉ.सौ. स्वराली कुलकर्णी, पंढरपूर आणि मंगळवेढा, तालुक्यातील ऐतिहासिक स्मारके, लक्ष्मी बुक पब्लिकेशन, सोलापूर २०१५

२५. महादेव शास्त्री जोशी, भारतीय संस्कृती कोश, दहावा खंड, भा.र.सं.मंडळ १९७९

२६. मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ, १९८०

२७. महाराष्ट्रीय ज्ञानकोश डॉ. सौ. भाग्यलता पाटसकर, परिवर्धीत संस्करण, शके १९३४

२८. डॉ.सदानंद मोरे,श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, उगम आणि विकास, श्री संत तुकाराम म.संस्थान देहू २२ जून १९९२

२९. डॉ.रामचंद्र देखणे, वारी स्वरुप आणि परंपरा, पध्दगंगा प्रकाशन, पुणे २००७

३०. डॉ. शंकर अभ्यंकर, संत ज्ञानेश्वर भक्तियोग, आदिमाया प्रकाशन, पुणे १९८९

३१. डॉ.ज्ञानेश्वर तांदळे, सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, २०१०

३२. डॉ.मु.ग. पानसे, यादवकालीन महाराष्ट्र, कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००२

३३. डॉ.रा.द. रानडे ज्ञानेश्वर वचनामृत, जुनी आवृत्ती.

३४. डॉ.सदानंद मोरे, त्रयोदशी, सकाळ प्रकाशन, २०१५

३५. डॉ. रामचंद्र देखणे, आषाढी, उत्कर्ष प्रकाशन, पुणे २०१५

३६. डॉ.यू.न.पठाण, बहिणे म्हणे, सुनंदा प्रकाशन, अकोला २०१०

३७. डॉ. सुरेश गरसोळे, चला आळंदीला, स्वानंद ट्रेडर्स, २०१०

३८. डॉ. शिवाजीराव मोहिते, लोकदैवते; वारसा आणि परंपरा, आयडियल पब्लिकेशन२०१४

३९. डॉ.नारायण जाधव, ज्ञान–भक्तिसमन्वय, आनंदाश्रम प्रकाशन, आळंदी, देहू २०१५

४०. डॉ. सदानंद मोरे, तुकाराम दर्शन, सकाळ प्रकाशन, १ मे १९९६

४१. डॉ.रामकृष्ण दास महाराज लहवितकर श्री तुकाराम महाराजांचे सदैव वैकुंठगमन ऐश्वर्य योग, २०१४

४२. नामदेव जोती पाटील, वारकरी नित्यनेम भजनी मालिका १९८०

४३. नागनाथ जाधव, वारकरी स्वाध्याय, जाधव १९९८

४४. नथुसिंह डोंगरसिंग रजपूत, संत तुकाराम म., सार्थ गाथा, वा. शि. सं. आळंदी ०५ जुलै १९९६

४५. भा.द.खेर, आषाढी कार्तिकी, पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई १९६०

४६. भालचंद्र नेमाडे, तुकाराम, साकेत प्रकाशन, १९९४

४७. भावार्थ रामायण, युध्दकांड, जुनी आवृत्ती

४८. भारतीय सांस्कृतिक कोश, भा.र.सं. मंडळ १९७९

४९. भा.प. बहिरट, प्र.ज्ञा.भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास व्हीनस प्रकाशन, आ.दु. १९९८

५०. भा.इ.सं.म. त्रैमासिक ७/२/१९९६

५१. मालू सोनार, मालूनार ग्रंथ

५२. मंजुळा वा.ल. पंढरपूरच्या अलक्षित कथा, उत्कर्ष प्रकाशन, पुणे २००७

५३. माऊली पालखी सोहळा वारकरी संप्रदाय आळंदी ते पंढरपूर खंडकाव्य, दामिनी प्रकाशन, श्रध्देय बाजीराव म. जवळेकर, गीता मंदिर रोजनिशी, सन २०१४.

५४. म.स. घोलप, आळंदी दर्शन, प्रसादे प्रकाशन, पुणे

५५. राजवाडे लेखसंग्रह, भाग १ व २, वि.का. राजवाडे,वरदा प्रकाशन पुणे ,सन १९९२

५६. रा.चि.ढेरे,श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन , सन २००५

५७. रा.चि.ढेरे,लोक दैवतोचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन , सन २००५

५८. राजेंद्र मारणे, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, सुरज पब्लिसिटी पुणे, २००८.

५९. रमेश पंढरीनाथ सोनवणे, श्री संत ज्ञानेश्वर म. कृत हरिपाठ, आरती ग्राफिक्स सोलापूर

६०. विष्णू महाराज जोग ,अमृतानुभव,माधव कृष्णा देशमुख पहिली आवृत्ती १८२७

६१. वा.शि. संस्था आळंदी, सार्थ ज्ञानेश्वरी सन १९९६

६२. विष्णू वामन बापट शास्त्री, सुबोध भगवतगीता, बापट शास्त्री, सन १९३२.

६३. वा.शि.संस्था, भजनी मालिका, वा.शि. संस्था, २०११.

६४. शं.पु. जोशी, पंजाबातील नामदेव

६५. संजय शिवाजी काकडे, सार्थ ज्ञानेश्वरी अमोल प्रकाशन पुणे २१ जुलै २०१०

६६. यसेवासूर्य शिंदेनाना, पंढरीची वारी, लाईव्ह लाईन, नाशिक २०११.

६७. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषढीवारी पालखी सोहळा, कार्यक्रम पत्रिका, २०१५.

६८. साखरे संप्रदायिक, सार्थ ज्ञानेश्वर, अमोल प्रकशन, २०१३.

६९. सुरेश जोशी, पंढरीची वारी, राजीव दत्तात्रय बर्वे, २००८

७०. सरदेसाई यशवंत सुर्यराव, आळंदी ते पंढरपूर अंतरंग प्रकाशन, मुंबई १९५०

७१. ह.भ.प. ला.रा. पांगर कर, संत तुकाराम चरित्र, वरदा बुक्स पुणे, १९२०, १९९८

७२. ह.भ.प. बाळासाहेब नि. पवार, पै. गुरू हैबतराव बाबा, यांची भजनी मालिका, ह.भ.प. नरहरी बाबा ढाळणे, नोव्हेंबर २०१३.

७३. ह.भ.प. गोविंद महाराज केंद्रे संस्था, दिंडी नं.४३ रथामागे कार्यक्रम पत्रिका.

७४. ह.भ.प. गोविंद महाराज केंद्रे संस्था, श्री विठ्ठल रूक्मिणी रोजनिशी, आळंदी दे. सन २०१०.

७५. ह.भ.प. गोविंद महाराज संस्था, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा, २०१३.

७६. ह.भ.प. नारायण गोसावी, श्री सोपान महाराज पालखीचे सोहळा, श्री पोतदार नातेपुते, ५ जुलै २०१०.

७७. वै.ह.भ.प. गोविंद महाराज गाडेकर, ऐतिहासिक नेवासा, तिर्थक्षेत्र, वै.ह.भ.प. गु. बन्सी महाराज तांबे, जीवन चरित्र, १९९५

७८. ह.भ.प. भास्करबुवा साकतकर, श्री सोपान देव महात्म्य ग्रंथ, श्री सो. समाधी मंदीर, संस्थान, सासवड, १९७८.

७९. श्री. के. एन. देसाई, संत संग देई सदा, सौ.मंगल के. देसाई, ३०/०६/२०१३.

८०. श्री गोविंद म. केंद्रे, सुलभ तुकाराम गाथा, केंद्रे संस्थान आळंदी २००४

८१. श्री. परशुराम चतुर्वेदी, उत्तर भारतातील संत परंपरा.

८२. श्री. पांडुरंग अनाजी घुले, श्री एकनाथी भागवत, श्री सं.तु.म. वाड़मय प्रकाशन संस्था, आळंदी दे. २०११.

८३. श्री वि.भा.चौधरी वारकरी भजन संग्रह, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची, डिसें. १९९९.

८४. श्री.ग.ह.खरे, महाराष्ट्राची चार दैवते,भा.इ.सं.मं. पुणे

८५. श्री. के. बेलसरे, ज्ञानेश्वरी, रविंद्र गजानन रायकर, डिसेंबर २०१४

८६. श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू, २०१४. श्री गोपाळ गोविंद गोसावी, संत सोपानदेवांचे चरित्र, १४ डिसेंबर २००९

८७. श्री. ज.स. पवार, अलांघन चंद्रमा, देवगिरी चॅरिटेबल ट्रस्ट, मार्च २०१२.

८८. श्री. वि.भा. चौधरी, वारकरी भजन संग्रह, वा.शि. संस्था आळंदी, डिसेंबर १९९९

८९. श्री महन्त पुरूषोत्तम महाराज पाटील, वारकरी भजनी मालिका, स्वानंद प्रकाशन, फेब्रुवारी २०१४.

९०. श्री भग्वत महापुराणम्, 'पहिला खंड' विनायक गोविंद देसाई सन २०००

९१. श्री. ह.भ.प. गोविंद महाराज केंद्रे, ज्ञानेश्वर एकनाथ, महाराज हरिपाठ सन २००६

९२. श्री क्षेत्र देवगड संस्थान, माहिती पुस्तिका, सन २०१५

## वृत्तपत्रके व मासिक, शोध निबंध

### वृत्तपत्रे

१. दै. लोकमत, मंथन, ३० जून २०१३ (डॉ. सदानंद मोरे)

२. दै. सकाळ पुणे, दि. १ जुलै २०१३.

३. दै. लोकमत हॅलो पुणे जिल्हा, सोमवार १ जुलै २०१३.

४. दै. लोकमत हॅलो पुणे जिल्हा, मंगळवार २ जुलै २०१३.

५. दै. सकाळ, पुणे बुधवार, ३ जुलै २०१३.

६. दै.सकाळ, पुणे जिल्हा, १० जुलै २०१३.

७. सकाळ, सप्तरंग, रविवार, १४ जुलै २०१३.

८. दै. सकाळ १५ जुलै २०१३, रिंगण.

९. दै.लोकमत, रविवार, ४ मे २०१४.

१०.दै. सकाळ, पुणे जिल्हा, टुडे, बुधवार १८ जून २०१४.

११.दै. सकाळ, पुणे जिल्हा, टुडे, बुधवार १८ जून २०१४.

१२.दै. लोकमत पुणे, रविवार २२ जून २०१४.

१३.दै. लोकमत पुणे जिल्हा, सोमवार २३ जून २०१४.

१४.दै. लोकमत, पुणे शहर, २४ जून २०१४.

१५.सकाळ, सप्तरंग, रविवार, ६ जुलै २०१४.

१६.दै. सकाळ, पुणे सोमवार ७ जुलै २०१४.

१७.साप्ताहिक पंढरी संदेश, वारकरी संप्रदायाचे मुखपृष्ठ १२/७/२०१४.

१८.दै. पुढारी, माय पुणे मंगळवार ७ जुलै २०१५.

१९.दै. पुढारी, पुणे ८ जुलै २०१५.

२०.दै. सकाळ पुणे जिल्हा, बुधवार, ८ जुलै २०१५.

२१.दै. सकाळ Today, शनिवार २५ जुलै २०१५.

२२.लोकमत, आषाढी विशेष, २७ जुलै २०१५.

२३.दै.लोकमत, हॅलो सोलापूर, सोलापूर २७ जुलै २०१५.

२४.दै. सकाळ, ॲग्रोवन स्पेशल, अमित गद्रे, रविवार, २७ सप्टेंबर २०१५.

२५.श्री. एस.जी. शिंदे (माचीगडकर) वारकरी, दिवाळी अंक २०१५.

## मासिके

१. सुदर्शन तांदळे, जलदिंडी विशेष, विशेष अंक २०११, पै. जगी जीवना सारिखे, श्री अभय टिळक, जलदिंडी प्रकाशन, २०११.

२. अजित मालुंजकर, जलदिंडी विशेष अंक, जलदिंडी आणि परंपरा, नितीन कोतापल्ले जलदिंडी प्रकाशन, २०११.

३. डॉ. विश्वास येवले, जलदिंडी २०१३, संपादकीय विश्वास येवले, जलदिंडी प्रकाशन पुणे.

४. डॉ. विश्वास येवले, नावाडी, जलदिंडी प्रतिष्ठान, येरवडा पुणे, २००९.

५. दै. सकाळ, ॲग्रोवन स्पेशल, अमित गद्रे, रविवार, २७ सप्टेंबर २०१५.

६. श्री. एस.जी. शिंदे (माचीगडकर) वारकरी, दिवाळी अंक २०१५.

७. सा. पंढरी संदेश, श्री क्षेत्र पंढरपूर, दिवाळी विशेषांक, २०११.

८. वा.शि. संस्था आळंदी देवाची, संदेश, अमृतमहोत्सव १९९३

९. श्री संत तुकोबाराय सेवामंडळ, त.प. पूर्ती सोहळा, २००५.

१०.अखंड ज्ञान, नवम्बर, २०१०.

११.संदीप तापकीर, गणेश खंडाळे, दुर्गांच्या देशातून, दिवाळी अंक गरूड झेप, पुणे नोव्हेंबर २०१३.

१२.रोहिदास दिंडी क्र. २४, कार्य अहवाल २०१५.

१३.संदीप पुरूषोत्तम खाडीलकर, वारी विशेष, जुलै २०१४.

१४.प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन, त्रैमासिक, सक्षम समीक्षा, ISSN, मार्च २०१५.

१५.डॉ. राधाकृष्ण जोशी, शोधांकन, ISSN, २०१४.

१६.पांडुरंग अनाजी घुले, स्मृतिग्रंथ, १९९४.

१७.बाळ जाधव, श्री सद्गुरू साईकृपा, वारकरी संप्रदाय विशेषांक २००९

**शोध निबंध**

१. प्रा.पांडूरंग उत्तम मिसाळ, मराठी साहित्य,मराठी समाज आणि तिर्थक्षेत्र आळंदी , पुणे विद्यापीठ, पुणे, २००२

२. प्रा.पांडूरंग उत्तम मिसाळ, नामदेव ज्ञानदेव कालीन मराठी संत साहित्याचे सांस्कृतिक,सामाजिक व वाडमयीन आकलन एक अभ्यास , पुणे विद्यापीठ, पुणे, २०११

३. विशाल विठ्ठल गायकवाड, पुणे जिल्हयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची भुमिका, मार्च २०१४.

४. अरविंद एकनाथ नेरकर, पंढरपूर वारी आणि मराठी साहित्य, पुणे विद्यापीठ, पुणे.

**इंटरनेट –**

www.maulialandi.com, ,www.google.com, www.wikipidia.com, www.vitthalrukhminimandir.com,

# परिशिष्टे

## परिशिष्टे १

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

पी. एचडी संशोधन – इतिहास विभाग

विषय :– देहु, आळंदी ते पंढरपुर आषाढी दिंडी सोहळा एक अभ्यास

संशोधक :– पवार सुरेंद्र पोपट मार्गदर्शकः– प्रा. डॉ. राजदेव टी. बी.

---

## अनुसुची

### आळंदी ते पंढरपुर सोहळ्यातील दिंडी मालक / चालक

अ. वैयक्तिक माहिती

१. संपुर्ण नाव---------------------------------------------

२. कायमचा पत्ता-------------------------------------------

३. धर्म------------जात------------वय ------दिंडीचे नाव------------

पत्ता ----------------------------------------------

सध्याच्या कुटुंबाचा प्रकार एकत्र कुटुंब पद्धती / विभक्त कुटुंब पद्धती

४. आपल्या मुळगावी असलेल्या घराचे स्वरूप–स्लॅप /पत्रा/लाकडी /कौलारू /इतर---------

५. आपल्या गावी कुटुंबाचे उदर निर्वाहाचे साधन कोणते आहे ----------------------

अ. निश्चित उदरनिर्वाहाचे साधन होय /नाही

६. मुळ गावी आपल्या कुटुंबाच्या मालकीची शेतजमीन आहे का होय/ नाही

७. आपली दिंडी रजिस्टर आहे का होय / नाही

८. आपल्या दिंडीचे रजिस्टर नंबर व स्थापना वर्ष ------------------------------

९. आपणदिंडी सुरू करण्यापाठीचे मागचे ध्येय काय -----------------------------

१०. दिंडीमध्ये एकुण सहभागी संख्या एकुण-----------पुरूष---------स्त्री--------

११. सहभागी व्यक्तीकडुन घेतअसलेली रक्कम -------------------------------

१२. दिंडी मध्ये भजनास सहभागी टाळकरी संख्या -----------------------------

१३. आपल्या दिंडीत उपलब्ध वाहनव्यवस्था --------------------------------

१४. दिंडीच्या व्यवस्थेसाठी आवश्यक कामगारसेवक ----------------------------

१५. राहण्याची व्यवस्था इमारत/मोकळीजागा/ तंबु ----------------------------

१६. रोजची जेवनाची व्यवस्था उत्तम करता का -------------------------------

१७. रोजच्या दिवसभरात किती वेळा जेवण देता. ------------------------------

१८. जेवनास दररोज वेगवेगळे पदार्थ असतात का -----------------------------

१९. पाण्याची व्यवस्था सोय असते का ---------------------------------

२०. शासनाकडुन आपणास पाण्याची आरोग्यसंदर्भांत सेवा उपलब्ध होते का --------------

२१. अरोग्याची काळजी तुम्ही घेताका ------------------------------------

२२. शासनाकडुन आपल्या दिंडीसाठी व सोहळ्यासाठी विशेष मदत मिळतेका ------------

२३. शासनाच्या मदतीने व शासनधोरणाचा विशेष लाभ दिंडी सोहळ्याला मिळतो का----------

२४. दिंडी सोहळ्यात काही अडचणी/ समस्या येतात का -----------------------

२५. आपणास येणाऱ्यसा अडचणी सोडवण्यासाठी दिंडी सोहळाप्रमुख/ शासनाकडे पाठपुरावा करता का

२६. प्रवास करताना कोणत्या अडचणी येतात ---------------------------------

२७. आपणास मिळालेल्या फी / भीसीतुन खर्च भागतो का ----------------------

२८.अन्यथा आपण दिंडीच्या खर्चापोटी देणगी गोळा करता का --------------------

२९.उर्वरित रकमेचे आपण काय करता-----------------------------------

३०.आपल्या दिंडीत अनेक विभागातुन वारकरी सहभागी होतात का ------------------

३१.सहभागी वारकरी अनेक जातीधर्मांचे असतात का -------------------------

३२.आपल्या दिंडीत सहभागी वारकरी किती जिल्ह्यातील आहे --------------------

३३.आपल्या दिंडीतील सहभागी वारकऱ्यांना वारीत सुख,समाधान मिळते का ------------

३४.आपणास या वारीत सुखसमाधान मिळते ------------------------------

३५.या दिंडीसोहळ्याने सांस्कृतिक परंपरा जतन होते का -----------------------

३६.सामाजिक ऐक्य, समता, बंधुभाव जोपासना होते असे आपणास वाटते का ------------

३७.या वारीसोहळ्यात प्रचंड आर्थिक उलाढाल होते का ------------------------

३८.वारीसोहळ्यामुळे रोजगार उपलब्ध होतो का ----------------------------


३९.एकुण किती आर्थिक उलाढाल होतअसेल -----------------------------

४०.या सोहळ्याने इतरांना त्रास होतो, वेळ वाया जातो, असे आपणास वाटते का ----------


४१.हा सोहळा जगातील आगळावेगळा एकमेव सोहळा वाटतो का-------------------

४२.दरवर्षी हा सोहळा प्रवास सुरू रहावा का ----------------------------


# परिशिष्टे २– वारी संदर्भात अस्सल कागदपत्रे




छत्रपती राजाराम महाराज यांनी नारायण महाराजांना लिहिलेले पत्र




रामचंद्रपंत अमात्यांचे नारायण महाराजांना श्रींचे उत्सवास पेडगाव इनाम दिल्याचे पत्र




पालखीबरोबर चालणाऱ्या वासकर व इतर दिंडीवाल्यांचा वाद मिटवून ऐक्य करावे अशी संस्थानची विषाणजीला सूचना




खंडोबा गोसावी यांना आषाढी वारीस पंढरीला
मंडप घेऊन जाण्याबद्दलचे पत्र



देहू देवस्थानकडील पालखीच्या सामानाची जुनी यादी



## पेशवें कडुन दररोजच्या दिवाबत्ती व नैवद्यासाठी वर्षासनाची सोय



व त्याच्या इच्छेनुरूप पंच नेमले आणि वादीची मात्र संमति न विचारतां आपल्या मतानें जे पंच आपल्या मर्जीप्रमाणें वाटले त्यांची नेमणूक केली. असें असून देखील जर सरकारी अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें 'अरेरावीच्या मुद्दयाला टोमणा' असा प्रकार झाला असेल तर आतां रडून काय उपयोग! तुमची व तुमच्या इतकी लंगडी असली पाहिजे कीं, तिचें समर्थन करणें तुमच्याच विश्वासातल्या पंचांसहि अशक्य वाटलें. अर्थातच तीन वर्षांपूर्वी पंडितजींचे कान चोळले होते आणि पांच वर्षांपूर्वी सर चिमणलाल काय उद्गारले होते याचें संशोधन करून डायरसाहेबांच्या कृष्ण कृत्यांचा रंग थोडाच पालटणार आहे! आणि हिंदी सभासदांची तीन वर्षांपूर्वीची मतें काय होतीं याची चर्चा करणें जर आज अप्रस्तुत नसेल तर मेजर जनरल बॅरोज, मि. राइस वगैरे युरोपियन सभासदांच्या तोंडून हिंदी पुढाऱ्यांविरुद्ध आजपर्यंत जी कांहीं मुक्ताफळें बाहेर पडलीं असतील तीं तरी जमेस कां धरूं नयेत? सारांश पंडितजींच्या 'जुन्यापुराण्या' भाषणाचे उतारे उद्धृत करून डायर व ओडवायर यांच्या अत्याचारावर पांघरूण घालण्याचा सर फ्रेडरिक हॉलवगैरेंचा हा प्रयत्न [illegible] व चीड येण्यासारखा आहे.

---

११. तुर्कांचा देश फुकट मिळाला म्हणून तो लाटावा असें सहजच वाटलें. पण फुकट पदरांत पडलेला देश हातीं ठेवणें झालें तरी खर्च थोडाथोडका लागत नाहीं. मेसापोटेमिया इंग्रजांच्या हातून परत घेण्याला आज कोणी जर्मनीसारखा बलाढ्य शत्रु उत्पन्न झाला आहे असें नाहीं. तथापि सुमारें एक लक्ष सैन्य ठेवून देशाचें रक्षण करण्यास व नवी चूल मांडून तेथें प्रकारच्या राज्यकारभाराचा स्वयंपाक सिद्ध करण्यास दरसाल सुमारें ४०–५० कोटि रुपये खर्च येईल या भीतीनें इंग्लंडातले विचारी लोक गडबडून गेले आहेत. वास्तविक हा खर्च कितीहि झाला तरी तो सोसतां मेसापोटेमियाच्या प्रजेवरच पडणार हें उघड आहे. म्हणून सुचित लोकांचें म्हणणें असें आहे कीं, त्यांनी आपल्या स्वातंत्र्याचें सालंकृत कन्यादान करावें, आपल्याला जिंकण्याचा खर्च स्वतः द्यावा, आपल्या खर्चानेंच आपला नाश करून घ्यावा, आणि आपल्या सर्व नाशाचा खर्चहि आपणच सोसावा. आज दीडशें वर्षें इंग्लंड हिंदुस्थानावर इतक्या उदारपणानें राज्य करीत आहे; पण या खर्चाचा एक रुपया तरी विलायतच्या लोकांनी अजून सोसला आहे काय! पण तो त्यांनीं काय म्हणून सोसावा? पदरचें खाऊन व खर्च करून राज्य जिंकावयाचें तें कांहीं पुढें पैसा मिळण्याकरितां, मोक्षप्राप्तीसाठीं नव्हे! पण पीक येण्याला आधीं बीं तरी पेरावें लागतें. मेसापोटेमियाच्या राज्यांत पुढें जें उत्पन्न पीक येणार त्याला आधीं कांहीं वर्षें सालिना ४०।५० कोटि रुपयांचें बीं बियाणें, खतपाणी घातलें पाहिजे खरें. आणि हा खर्च करण्यास इंग्लंड स्वतः समर्थ नाहीं असें नाहीं. एका आंकडे पंडितानें असें सिद्ध केलें आहे कीं गेल्या दहा वर्षांत, युद्ध जमेस धरूनहि, इंग्लंडची राष्ट्रीय संपत्ति २४९८ कोटि रुपयांपासून ४४०८ कोटि रुपयांपर्यंत वाढली आहे. अशा राष्ट्राला ४०।५० कोटि रुपयांची काय कथा! पण इंग्लंड स्वतःचें काय वाटेल तें करो, मेसापोटेमियाच्या रक्षणानें परंपरेनें हिंदुस्थानचेंच हित होणारें आहे अशा युक्तिवादानें लवकरच तेथील लष्करी खर्चाचें ओझें अंशतः हलवून हिंदुस्थानावर न लादो म्हणजे आम्हांस मिळविली!

---

१२. रशियन बोल्शेव्हिकांची मतें दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्यांना कितीहि कडू वाटत असलीं तरी रशियांतील व्यापाराची आठवण होतांच दोस्त राष्ट्रांच्या तोंडाला पाणी सुटत असल्यानें रशियनांशीं व्यापारी तहाचें बोलणें करण्याला आतां बेल्जम, जपान, व फ्रान्सहि हळूहळू तयार होऊं लागला आहे. कारखानेहि आपल्या देशांत बोलावणार माल विकण्यास आज तयार आहे त्याचें तिखटमीठ लावून वर्णन करण्याचा क्रम सुरू केला आहे. रशियांत गहूं, चहा, भांड, तंबाखू, पेट्रोलियम, टर्पेंटाईन, लाकडी, कातडीं, इमारती लांकूड, कोळसा, मँगेनीज वगैरे वगैरे वस्तूंचा भरपूर पुरवठा असून कागदाच्या गिरण्या चालण्याला आणि व्होल्गा व डॉन या नद्यांतून रशियाच्या अंतर्भागांत व्यापार करण्यालाहि परवानगी दिली जाईल असें आमिष दाखविण्यांत येत आहे. या आमिषास भुलून बेल्जमच्या मंत्रिमंडळानें तर रशियाशीं व्यापारी तह करण्याचा ठराव मंजूर देखील केला. फ्रान्स देश अद्यापि थोडासा घुसमटत आहे, कारण रशियाच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी फ्रान्सकडून जें कर्ज घेतलें आहे तें फेडण्याची हमी हल्लींच्या बोल्शेव्हिक सरकारनें घ्यावी असा फ्रान्सचा आग्रह आहे. यावर रशियन मुत्सद्यांचें उत्तर दिलेलें आहे. पूर्वीच्या राज्यकर्त्यांशीं तुमचे झालेले सर्व करारमदार जर आम्ही पाळावयाचे व तुमच्या जुन्या कर्जांची आज हमी घ्यावयाची तर पूर्वीचा करार कायम ठेवून रशियाला कॉन्स्टँटिनोपल शहर कां देत नाहीं! हें निरुत्तर करणारें उत्तर दोस्त राष्ट्रांना बरेंच झोंबलें असून असलीं प्रश्नोत्तरें शालीन नाहींत असा बहाणा करण्यांत येत आहे. परंतु वरपांगी असला कितीहि बहाणा केला तरी रशियांतला स्वस्त व भरपूर माल जर पाहिजे असेल तर बोल्शेव्हिकांशीं निदान व्यापारी तह तरी केल्यावांचून दोस्त राष्ट्रांना गत्यंतर नाहीं.

---

१३. मध्यंतरी बोल्शेव्हिकांच्या पराभवाचें व त्यांच्या सैन्याची धूळधाण उडाल्याचें वृत्त येत होतें. अलीकडे तो वारा फिरून पोलंडच्या अपयशाच्या बातम्या सुरू होऊन उलट बोल्शेव्हिकांनी कीव्हसारखें महत्वाचें केंद्रस्थान परत घेऊन पोलंडच्या सैनिकांस कात्रींत धरल्याच्या बातम्या येऊं लागल्या आहेत. कीव शहरावर बोल्शेव्हिकांनी आकाशयानांतून बॉम्बची व जमिनीवरून तोफांची भडिमारानें सरबत्ती करून तें शहर काबीज केलें. हा हल्ला जर्मन सेनापतींच्या देखरेखीखालीं चालला होता व रशियन सैन्यांत चिनी बोल्शेव्हिकांची भरती होती. अशा रीतीनें जर्मनीचें अफाट बुद्धिबळ आणि चिनी लोकांचें अफाट मनुष्यबळ यांचा जर पाठिंबा रशियन बोल्शेव्हिकांना मिळत राहील तर त्यांचें पारडें हलकेंपणाहि ऐवजी जड होईल. या रशियन बोल्शेव्हिकांनी फिनलंडशीं तहाचें बोलणें चालविलें आहे. कॉकेशसच्या बाजूस जॉर्जिया [illegible] ता. १२ रोजीं स्वतंत्रपणें तह केला व [illegible]

१४ दोस्त राष्ट्रांनीं तुर्कांच्या शरीराचे लचके तोडून ते जरी अधाशीपणानें गिळंकृत करण्याचा यत्न चालविला आहे तरी ते त्यांस सहजासहजी पचनीं पडतील असें दिसत नाहीं. मेसापोटेमियाच्या सरहद्दीवर व [illegible] ब्रिटिश ठाण्यावर हल्ले वारंवार होत आहेत. कॉन्स्टँटिनोपल शहरांत व त्याच्या आजूबाजूस तुर्की मंडळींची चळवळ चालूच आहे. आतां [illegible] सिलिशिया प्रांतांतली ९८ बंद पलटण तुर्कांनी काबीज केल्याची बातमी आली आहे. ही पलटण त्या प्रांताच्या सरहद्दीवरील बोगद्याच्या ठाण्याची रखवाली करीत असतां तिजवर हा हल्ला चढविण्यांत आला व ती पलटण अदाना बंदराकडे मार्गे हटत असतां दारूगोळा संपल्यामुळें तुर्कांना शरण गेली. फ्रान्सशीं समेट करण्याचा तुर्कांचा विचार असून तो समेट करण्यास सुलभ पडावें म्हणून ही पाडाव केलेली पलटण सोडून देण्याचें तुर्कांनीं ठरविलें अशी त्याचीहि बातमी आहे. त्याचप्रमाणें फ्रेंच सरकार तुर्की तहाच्या अटींत फेरबदल करण्याचा विचार करीत असून ब्रिटिश सरकारहि तहाच्या कांहीं अटी बदलण्यास तयार आहे अशी वार्ता पसरली आहे. तथापि हींत विश्वसनीय भाग किती तें आजच सांगतां येत नाहीं. तुर्की तहावर सही होण्याच्या पूर्वीच तो तह बदलण्याची भाषा ऐकूं यावी हें चमत्कारिक तर खरेंच परंतु ज्याअर्थी मेसापोटेमियासारख्या सुपीक व तेलाच्या खाणींनी डबडबलेल्या मुलखांत प्रतिस्पर्धी प्रधान क्लेमेंसो यांच्या चुकीमुळें आपण आंचवलों असें फ्रेंच लोकांस वाटत आहे, त्याअर्थी तो तह बदलण्याची संधि प्राप्त व्हावी अशी फ्रेंचांची इच्छा असल्यास तींत असंभवनीय असें कांहींच नाहीं. तुर्की तहाच्या अटी खरोखरीच बदलण्यांत येतील व त्यांत खिलाफत कमिटीच्या सूचनांचा विचार होईल तर मुसलमानांच्या मनांतलें मोठेंच शल्य दूर होईल.

---

१५ रशियन बोल्शेव्हिकांनी इराणला शह देण्याचें चालूच ठेवल्यानें इराणनें राष्ट्रसंघापुढें फिर्याद मांडली आहे. भावी राजकारणांत राष्ट्रसंघाची उपयुक्तता कितपत आहे त्याचें प्रत्यंतर पाहण्यास या फिर्यादीचा उपयोग होईल. राष्ट्रसंघाच्या कारभाराकरितां आतापर्यंत २५ लक्ष रुपये खर्च झाले; पण त्या संघाच्या हातून कामगिरी कोणती झाली! या प्रश्नास मि. बाल्फोर यांनीं असें उत्तर दिलें कीं, राष्ट्राराष्ट्रांतील दळणवळणाचीं साधनें सुधारणें, लोकांच्या रोगाच्या प्रसारास प्रतिबंध करणें, सार नदीचें खोरें व डान्झिक बंदर यांची राष्ट्रसंघातर्फे व्यवस्था ठेवणें हीं कामें चालू आहेत; राष्ट्राराष्ट्रांतील तहनाम्यांची नोंद करण्याकरितां नोंदणी-कचेरीहि स्थापिली आहे! यांतलीं पहिलीं कामें तर अगदींच क्षुल्लक आहेत. तहनाम्यांची नोंद व्हावी हें उत्तम, परंतु तेवढ्यानें गुप्त तहांचा नायनाट होईलच असें मानतां येत नाहीं. सर्व राष्ट्रांनीं आपापलें आरमार व लष्कर कमी करावें अशासाठींहि एक कमिटी राष्ट्रसंघानें नेमली आहे परंतु या कामांत मात्र राष्ट्रसंघाची निराशा होत राहणार. अमेरिकेला राष्ट्रसंघच मान्य नसून अमेरिकेनें आपलें आरमार कमी करण्याऐवजीं उलट वाढविलेंच आहे. अमेरिकेची ही कृति पाहून जपान व इंग्लंड यांनींहि आपलें लष्करी व आरमारी बळ वाढविण्याचें सुरू ठेवलें आहे. त्यामुळें राष्ट्रसंघाची स्थापना करूनहि इकडे लष्करी तयारीच्या चढाओढीची शर्यत चालूच आहे.

---

१६. राष्ट्राराष्ट्रांतील तंटे मिटविण्याकडे तरी राष्ट्रसंघाचा उपयोग होईल म्हणावें तर आजमितीस [illegible] ठिकाणीं तरी महायुद्धाचे अवशेष दिसत असून ते राष्ट्रसंघाच्या हातून नष्ट होत नाहींत. इराण व रशिया, आल्बेनिया व इटाली, पोलंड व रशिया, चीन व जपान यांच्या तंट्यांना आळा घालण्याला राष्ट्रसंघ अगदीं असमर्थ आहे हें उघड दिसत आहे. मग या राष्ट्रसंघाचा उपयोग तरी काय! आणि राष्ट्रसंघाचा जर उपयोग नाहीं तर ज्या जर्मन तहानें हा राष्ट्रसंघ निर्माण केला तो जर्मन तह तरी मान्य कितपत मानावा असा प्रश्न अमेरिकेंत जोरानें पुढें येत आहे. हल्लींचे प्रे. विल्सन हे जर्मन तह व राष्ट्रसंघ मान्य करण्याच्या धोरणाचे असून मि. टॅफ्ट हेहि त्याच मताचे आहेत. रिपब्लिकन पक्षातर्फे अमेरिकेच्या निवडणुकींत ज. वुड यांचा पराभव करून यशस्वी झालेले उमेदवार सीनेटर हार्डिंग हे जर्मन तहानें अमेरिकेच्या स्वातंत्र्य धोरणास, विशेषतः मनरो डॉक्ट्रिनला, बाध येत असल्यानें तो तह झिटकारावा असें म्हणणारे असून या प्रश्नावर रेफरेंडम घ्यावें असें प्रे. विल्सन यांचें आव्हान त्यांनी स्वीकारलें आहे. आतां या प्रश्नावर प्रत्यक्ष रेफरेंडम घेण्यांत आलें नाहीं तरी अध्यक्षांच्या निवडणुकीची झटापट मुख्यतः याच मुद्द्यावर होणार हें निर्विवाद आहे. या झटापटींत प्रे. विल्सन किंवा त्यांचे अनुयायी उमेदवार विजयी झाले तर राष्ट्रसंघाचें घडगत आहे. आणि जर का सीनेटर हार्डिंग हे अध्यक्षपदारूढ झाले तर राष्ट्रसंघाची सपशेल उचलबांगडी होऊन पुनः लष्करी चढाओढ, गुप्त तह, गुप्त कारस्थानें व तंटे यांचा सुळसुळाट होईल व महायुद्धाचा सर्व खटाटोप व्यर्थ गेल्यासारखें होईल.

---

१७ दक्षिणआफ्रिकेंतील कमिशननें साक्षीपुरावा घेण्याचें काम संपण्यापूर्वीच त्या कमिशननें इच्छा असेल त्या हिंदी इसमास हिंदुस्थानास परत पाठविण्याची तजवीज करावी असा रिपोर्ट केला. हा रिपोर्ट हिंदुस्थानांत प्रसिद्ध झाला नाहीं आणि त्यावर हिंदी जनतेचें मत कळविण्यालाहि अवसर मिळाला नाहीं तोंच तिकडे आफ्रिकन सरकारनें हिंदी लोकांस बोळवण करण्याच्या कामावर एका कामगाराची नेमणूक देखील करून टाकली! या एकंदर हातचलाखीच्या व मखलाशीच्या प्रकारावरून हिंदी लोकांची ही पाठवणी केवळ ऐच्छिक नसून जवळजवळ अर्धसक्तीनें देण्याच्या प्रकारांतलीच दिसते. असें नसतें तर कमिशननें रिपोर्ट काय केला, त्यावर हिंदी लोकांचा अभिप्राय काय पडतो, किंवा हिंदी व्यापारी केवळ आपखुशीनें स्वदेशाला परत जाऊं इच्छितात या प्रश्नांची चौकशी करण्यांतच आफ्रिकन सरकारनें वर्ष सहा महिने सहज लोटले असते. फिजी बेटांतल्या हिंदी मजुरांना परत पाठवून देण्याची तजवीज करा असा हिंदुस्थानसरकार, हिंदी जनता व स्वतः फिजी बेटांतले हिंदी मजूर आग्रह करीत असतां, फिजी सरकार आज एका महिनेया प्रश्नाची टाळाटाळ करीत आहे [illegible] 'हक्क करवले आणि आज पितर झालें' [illegible]

करीत आहेत. या एकंदर प्रकारावरून हिंदी लोकांचें दक्षिणआफ्रिकेंतून उच्चाटन करण्याचा हा कट असून हिंदी लोकांना आपलें मत जाहीर करण्याचीहि संधि यावयाची नाहीं असा डाव दिसतो. या वेळीं हिंदी लोक व हिंदुस्थान सरकार हे एकमतानें या अन्यायाच्या व अनिष्ट [illegible] प्रतिकार करण्यास झटतील काय? [illegible] हिंदुस्थानांत येण्याच्या पूर्वी अशा रीतीनें हिंदी लोकांच्या [illegible] विविध प्रकारचा [illegible] काय! ब्रिटिश पार्लमेंटांत गेल्या [illegible] ब्रिटिश घटकावयवांत ऐक्यमत वाढावें, परस्परविषयींचा गैरसमज दूर व्हावा आणि साम्राज्याची बळकटी वाढावी या हेतूनें इंपीरिअल कॉन्फरन्सखेरीज दुसरी एक कायमची कमिटी नेमावी अशी चर्चा झाली. एकीकडे साम्राज्याच्या एकीकरणाचे विचार चालावे आणि त्याच वेळीं दुसरीकडे एका घटकानें दुसऱ्या घटकास कायमचा बहिष्कार घालावा हें साम्राज्यांतील तरी सुसंगत व सुरक्षितपणाचें वाटतें काय!

---

१८ पुढील राष्ट्रीयसभा नागपूर येथें भरवावी असा स्पष्ट ठराव अमृतसरच्या बैठकींत झाला असूनहि जबलपूरकरांनीं आम्हीं राष्ट्रीय सभा भरवितों असा वाद सुरू केला. त्यानंतर खास काँग्रेस भरविण्याचा ठराव झाला तेव्हां येथील ऑ. इं. कॉं. कमिटींत नेहरू झाल्यानें जबलपूरकरांना ही कांग्रेस पर्वणी चालून आली त्यावेळीं केवळ जबलपूरकरांची निराशा होऊं देऊं नये एवढ्यासाठींच ऑ. इं. कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांतून ३६ सभासदांनीं जबलपूरच्या बाजूनें मतें कळविलीं पण एवढ्या अवधींतच जबलपूरकरांच्या उत्साहाला ओहोटी लागून त्यांनीं खास कॉंग्रेस भरविण्याचें नाकारलें. अर्थातच आंध्र प्रांतांतील ब्रह्मपूर आणि कलकत्ता या दोन ठिकाणच्याच [illegible] पुनः मतें घेण्याचें काम चालू असून कलकत्त्याच्या बाजूनें १५ आणि ब्रह्मपूरच्या बाजूनें १७ मतें पडलीं आहेत. यावरून खास कॉंग्रेस मद्रास इलाख्यांत, आंध्र प्रांतांत, गंजम जिल्ह्यांत ब्रह्मपूर येथें भरविण्याचें ठरलेसें दिसतें. आंध्रबंधु ही खास बैठक आग्रहपूर्वक भरविण्यास तयार आहेत. जबलपूरकरांना मात्र अनायासें आलेली ही संधि दवडल्यानें त्यांना आतां डिसेंबरच्या कॉंग्रेस संबंधानें नागपूरशीं वाद करण्याला जागा राहिली नाहीं हें उघड आहे. आंध्र प्रांतीयांचा हा उत्साह असाच कायम टिकेल आणि १९१८ च्या ऑगस्ट महिन्यांत ज्याप्रमाणें पश्चिमसमुद्रतीरावर मुंबापुरींत खास काँग्रेस अपूर्व थाटानें भरली होती त्याच थाटानें १९२० च्या ऑगस्ट महिन्यांत पूर्वसमुद्रतीरावर ब्रह्मपुरींतली खास कॉंग्रेस भरून ती यशस्वी होईल असा आम्हास भरंवसा आहे.

---

१९. गेल्या आठवड्यांत मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेट सभेनें बी. ए. च्या ऐच्छिक विषयांत देशी भाषांचा समावेश करण्याची परवानगी दिली हें कळविण्यास आम्हास आनंद वाटतो. ही परवानगी मिळविण्याच्या कामीं या वेळीं सर नारायण चंदावरकर व रँग्लर परांजपे हे प्रमुख होते याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों. देशी भाषांना खचित चांगले दिवस आले म्हणावयाचे. डॉ. चंदावरकर, परांजपे यांचे सारख्या कट्या इंग्रजीच्या भक्तांनाहि देशी भाषांची वकिली करण्याची बुद्धि झाली. हें कालमहात्म्य राष्ट्रीयत्वाची प्रगतीच सुचवितें. युनिव्हर्सिटीच्या अगदीं प्रथमच्या दिवसांत देशी भाषाच मुख्य होत्या. मोडक रानडे प्रभृति विद्वान मराठी भाषांची परीक्षा देऊनच बी. ए. झाले. पुढें संस्कृतचा प्रवेश अभ्यासक्रमांत झाल्यावर मराठी वगैरे भाषा इतक्या मागें पडल्या कीं, आवश्यकच काय पण ऐच्छिक विषयांतहि त्यांना स्थान मिळेना. प्रथम मोडक व नंतर रानडे यांच्या प्रयत्नानें मराठी एम. ए. च्या ऐच्छिक विषयांत ठेवली गेली. पण बी. ए. च्या अभ्यासक्रमांत तिचा समावेश न झाल्यानें 'आधीं शिखर मग पाया रे' असाच थोडासा प्रकार या सुधारणेचा झाला. हा विपरीतपणा सेनेटच्या हल्लींच्या ठरावानें निघून गेला आहे. तथापि देशी भाषांस युनिव्हर्सिटीच्या दरबारांत याहूनहि अधिक मानाची जागा मिळाली पाहिजे. युनिव्हर्सिटीच्या प्रत्येक परीक्षेंत इंग्रजीप्रमाणें देशी भाषा हाहि आवश्यक असा एक विषय ठेवल्यानेंच ती जागा मिळेल. उपयुक्त ज्ञानरूपी एकाच मोठ्या हौदाची इंग्रजी भाषा ही पाणी आंत येण्याची तोटी मानली, तर देशी भाषा ही पाणी बाहेर जाण्याची तोटी मानली पाहिजे. एरवीं त्या हौदाचा व्यवहारांत व्हावा तसा उपयोग होणार नाहीं. पाण्याप्रमाणें ज्ञानाचाहि उपयोग मुख्यतः स्वारस्य व्यक्तींतच आहे. कित्येक इंग्रजी भाषेवर भाळलेले लोक तिला साखरेची उपमा देतात. पण त्यांनाहि हें कबूल करावें लागेल कीं, साखर गोड असेल पण पोट भरण्याकरितां लाडू करावयाचे तर ते नुसत्या साखरेचे कोणी करीत नाहीं. साखरेहि इतर पौष्टिक पदार्थांत गोडी आणण्यापुरतीच घालतात. इंग्रजी भाषा हि राष्ट्रीय व्यवहारांत तितक्या बेतानेंच वापरली पाहिजे.

---

२०. मुंबई इलाख्याची लोकसंख्या लक्षांत घेतां या इलाख्यांत एकच मेडिकल कॉलेज सर्वांची गरज भागविण्यास अगदीं अपुरें आहे. याकरितां मुंबई इलाख्यांतले अनेक विद्यार्थी वैद्यक शिक्षणाकरितां इलाख्याबाहेर, विशेषतः कलकत्याला, जातात. पण तेथेंहि शिक्षणाची सोय भरपूर नाहीं असें युनिव्हर्सिटी कमिशननेंच आपलें मत दिलें आहे. वरिष्ठ कायदेकौन्सिलांत डॉक्टरांच्या पुरवठ्यासंबंधीं वादविवाद चालला असतां त्या वेळचे मेडिकल खात्याचे डायरेक्टर-जनरल सर पार्डे ल्युकीस यांनींहि कॉलेजांची वाढ करण्याची आवश्यकता दर्शविली. असें असून मुंबई शहरीं 'एकमेवाद्वितीयम्' अशा मेडिकल कॉलेजांत विद्यार्थ्यांची संख्या नियमित करण्यांत येत आहे, व त्यामुळें शेंकडों विद्यार्थ्यांची इच्छा असूनदेखील त्यांना त्या कॉलेजच्या शिक्षणाचा फायदा घेतां येत नाहीं. कॉलेजांत नवीन दाखल करावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित केल्यानें, आणि सतत तीन वर्षे नापास झालेल्या विद्यार्थ्यांस कॉलेजला मुकावें लागणार असा नियम केल्यानें, मेडिकल कॉलेजच्या विद्यमान व भावी छात्रगणांत खळबळ उडाली आहे. हा नवीन निर्बंध काढून टाकण्याविषयीं आणि मेडिकल शिक्षणाची सोय वाढविण्याविषयीं सरकारास विनंति करण्याकरितां आणि गव्हर्नर साहेबांकडे एक डेप्युटेशन पाठविण्याकरितां नुकतीच मुंबईस डॉ. राव यांचे अध्यक्षतेखालीं [illegible]

त्याच्या केंद्रस्थानीं मेडिकल कॉलेज काढणें सांप्रतच्या [illegible] अनारोग्याच्या प्रसंगीं अत्यावश्यक आहे. मुंबईच्या ग्रँटमेडिकल कॉलेजांतील विद्यार्थ्यांची संख्या एक हजाराजवळ असल्यानें त्याच कॉलेजांत अधिक विद्यार्थी घेणें इष्ट नाहीं. म्हणून दुसरें मेडिकल कॉलेज पुण्यासारख्या सोयीच्या ठिकाणीं काढल्याखेरीज जनतेची डॉक्टरांची मागणी पुरी पडणार नाहीं व शिक्षणेच्छु [illegible] छात्रगणांचीहि आकांक्षा पूर्ण होऊं शकणार नाहीं.

---

२१. गेल्या अंकांत वाचकांस रा. भाऊसाहेब थाने यांचें पंढरपूरच्या धर्मशाळेकरितां जमलेल्या फंडाबद्दलचें पत्र आम्ही छापलें होतें त्याबद्दल त्या फंडाचे एक ऑनररी सेक्रेटरी रा. विठ्ठल नरहरी जकल हे कळवितात कीं, "सदर फंडाची व्यवस्था सुमारें ५० नॉन-ऑफिशिअल मेंबर लोकांच्या हातीं आहे. सुमारें ३६००० रुपये जमले असून ते येथील बँकेच्या शाखेंत व्याजीं ठेवले आहेत. आतापर्यंत एक पैदेखील खर्च करण्यांत आली नाहीं. रा. भाऊसाहेब थाने यांच्या सूचनेप्रमाणें पुढें वसूल होणारी रकम येथील सेंट्रल बँकेंत व्याजीं ठेवण्याविषयीं परवानगी ता. २६ रोजीं पंढरपूर येथें भरणाऱ्या मेंबरांच्या सभेंत घेणार आहे. धर्मशाळेचें काम जितकें लवकर हातीं घेतां येईल तितकें लवकर घेण्याची खटपट चालू आहे. या खर्चविषयीं कोणास कांहीं सूचना करावयाची असेल अगर मदत करावयाची असेल तर त्यांनीं ती मजकडे पाठवावी."

---

२२ रा. जकल यांच्या या पत्रावरून फंडाची रकम ३६००० रुपये जमली आहे व ती बँकेच्या शाखेंत व्याजीं लाविली आहे, एवढ्या दोन गोष्टी निश्चितपणें कळल्या. पण तेवढ्यावरून यासंबंधाच्या सर्व शंकांचें व आक्षेपांचें निरसन होत नाहीं. मुख्य तक्रार हा फंड रयतेकडून कोणत्या प्रकारानें जमविला या विषयीं आहे. कलेक्टरसारख्या सर्वाधिकारी अंमलदारानें मामलेदारास राजरोस अगर अर्धवट राजरोस हुकूम देऊन शेतसाऱ्याबरोबर प्रत्येक रयतेकडून त्याची इच्छा असो वा नसो, रकम जमा केली कीं काय हा मुख्य प्रश्न आहे. रयतेनें शेतसाऱ्याची रकम देऊं केली असतां प्रथम त्यांतून या फंडाची रकम वजा करून घ्यावी आणि नंतर साऱ्याचा भरणा पुरा केला नाहीं म्हणून रयतेवर बाकी काढावी असाहि प्रकार कोठें कोठें घडल्याच्या कागाळ्या आमच्या कानीं आल्या आहेत. आणि कलेक्टरनें ज्या फंडाचा पुरस्कार केला त्या फंडाच्या बाबतींत गांवकामगारांकडून असे जुलमाचे प्रकार घडणें अशक्य नाहीं. यास्तव [illegible] वरिष्ठ अधिकाऱ्याकडे यासंबंधांत काय हुकूम दिले होते ते जाहीर होणें अवश्यक आहे. अज्ञानी रयतेस सक्तीचा कर आणि ऐच्छिक फंड यांतला भेद नीटसा समजत नसल्यानें सरकारची तशी इच्छा नसली तरी अशा बाबतींत सक्ति होते; यास्तव यापुढें सरकारी अधिकाऱ्यांनीं असले फंड वसूल करूं नयेत असाच नियम सरकारनें जाहीर करणें जरूर आहे.

---

२३. यासंबंधानें इतर प्रश्नहि या मानानें किरकोळ असले तरी महत्वाचे आहेत. यापुढें वसूल होणारी रकम सेंट्रल बँकेंत ठेवण्याचा विचार ता. २६च्या सभेंत होणार आहे असें रा. जकल लिहितात. परंतु पूर्वीची तरी रकम बाँबे बँकेंत कां? तिच्याहि फायदा शक्य तितके दिवस कोऑपरेटिव्ह सेंट्रल बँकेला कां मिळूं नये? या फंडाची व्यवस्था ५० नॉन-ऑफिशिअल मेंबरांकडे आहे; पण त्याशिवाय आणखी ऑफिशिअल मेंबर किती व ते कोण कोण आहेत हेहि जाहीर होणें जरूर आहे. त्याचप्रमाणें ही रकम एकंदर किती जमवावयाची व तिच्यांतून किती यात्रेकरूंची सोय करावयाची हाहि महत्वाचा प्रश्न आहे. कारण स्मारकाची दृष्टि भपकेबाजपणाकडे असणार. पण धर्मशाळा बांधणाऱ्याची दृष्टि थोडक्या खर्चांत जास्तीत जास्त यात्रेकरूंची सोय कशी करावी इकडे असली पाहिजे. यास्तव या परस्परविरोधी भावनांचा मेळ नीटपणें बसून रयतेच्या निढळाच्या घामाचा पैसा हजारोंचे यात्रेकरूंची राहण्याच्या थाटाची सोय करण्यांत खर्च न होईल अशी खबरदारी घेणें जरूर असल्यानें कमींत कमी खर्चांत अधिकांत अधिक सोय कोणत्या प्रकारें करतां येईल याचा विचार झाला पाहिजे. त्याचप्रमाणें यापुढें या फंडाकरितां जी रकम वसूल होईल ती रयतेकडून किंवा इतराकडून कोणत्याहि प्रकारें सक्ति होईल अशा प्रकारानें वसूल न करितां केवळ ऐच्छिक धर्मादाय पद्धतीनेंच वसूल केली जाईल याबद्दल सरकारनें खबरदारी घ्यावी.

---

२४ काल रोजीं सिमल्यास प्रसिद्ध झालेल्या सरकारी हुकमानें परदेशाहून आणावयाच्या सोन्याच्या व परराष्ट्राच्या नाण्यांस आतापर्यंत असलेला प्रतिबंध ता. २१ जूनपासून दूर करण्यांत आला आहे. आतां यापुढें येथील सॉव्हरिनचा भाव १० रुपये करावयाचा असल्यानें हिंदुस्थानसरकारनें असा वटहुकूम प्रसिद्ध केला आहे कीं, ता. २१ जूनपासून पुनः नवीन जाहिरनामा प्रसिद्ध होईपर्यंत ब्रिटिश सॉव्हरिन (पौंड) हें हिंदुस्थानांत कायदेशीर चलन मानूं नये. म्हणून ज्यांच्या ज्यांच्याजवळ असें नाणें (पौंड, सॉव्हरिन, मोहर, अर्धा पौंड वगैरे) असेल त्यांनीं तें सर्व नाणें ता. २१ जूनपासून ता. १२ जुलैपर्यंतच्या तीन आठवड्यांत सरकारी खजिन्यांत भरणा करून त्याबद्दल दर पौंडास १५ रुपयेप्रमाणें मोबदला चांदीचें नाणें घ्यावें. असें न करितां जर कोणाजवळ सोन्याचें नाणें राहिलें तर ता. १२ जुलै नंतर त्याचा भाव १० रुपये मानला जाईल. ता. १२ जुलैनंतर इंग्लंडांतून ब्रिटिश सॉव्हरिनहि इकडे आणण्यास परवानगी दिली जाईल आणि सरकारच्या कायदेकौन्सिलांत सोन्याचे नाण्याची किंमत १० रुपये १ पौंड अशी ठरविण्याचें बिल सादर करण्यांत येईल. व तें बिल पास झालें म्हणजे १० रुपयांस एक पौंड या भावानें सोन्याचें नाणें पुनः कायदेशीर चलन मानण्यांत येईल. ता. २४ जूनपासून पुनः दुसरा हुकूम होईपर्यंत हुंडणावळीचा भाव तारेनें दर रुपयास १ शिलिंग ११ [illegible] पेन्स आणि तारेशिवायचा दर दररुपयास १ शिलिंग ११ [illegible] पेन्स असा राहील व या भावानें दर आठवड्यास १० लक्ष पौंडांच्या हुंड्या सरकार पुनः दुसरा हुकूम होईपर्यंत विकीत राहील.

---

२५ ज्या ज्या ठिकाणीं सरकारनें डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्टान्वयें नोटिफाइड एरिआकमिट्या स्थापन [illegible]

ठिकाणीं तर नो. ए. कमिटी स्थापन केल्यापूर्वी जी व्यवस्था लोकांनी केवळ आपल्या हिंमतीनें चालू ठेवली होती तीहि [illegible] बिघडली, व मुलखा बखेडा आणि असंतोष मात्र गांवच्या लोकांच्या पदरीं पडला. अशीहि उदाहरणें दाखवितां येतील. तरी या कमिट्यांचा प्रश्न [illegible] एक वेळ सरकारनें हातीं घेऊन त्याचा योग्य निकाल लावावा असें आमचें म्हणणें आहे. गेल्या सार्वजनिक कायदेकौन्सिलच्या बैठकींत मामलेदार मेजर फर्नांडीस यांच्या प्रश्नावरून सरकारनें असें जाहीर केलें कीं, मुंबईनजीक सांताक्रूज येथील लोकसंख्या २००० हून कमी असल्यामुळें तेथील नो. ए. कमिटी रद्द करण्यांत येणार आहे. लोकसंख्येची ही मर्यादा व इतर परिस्थिति म्हणजे स्थानिक लोकांचा असंतोष या बाबतींत सांताक्रूजशीं साम्य पावणारीं दुसरीं कित्येक गांवें, उदाहरणार्थ कुलाबा जिल्ह्यांतील कर्जत वगैरे आहेत त्यांच्या बाबतींत ही नो. ए. कमिटीची ब्याद सरकारनें कां काढू नये समजत नाहीं.

---

२६. रा. रा. गोपाळ मोरेश्वर पटवर्धन, सरपंच [illegible] पर्वती, कळवितात कीं:—पर्वतीवर हल्लीं पाण्याचा पुरवठा मुळीच नाहीं, यात्रेकरूंना पाणी मिळत नाहीं, [illegible] किंवा देवपूजेस उपयोगी पडणारी फुलझाडेंहि नाहींत, या गैरसोयी दूर होण्यास टेकडीवर कालव्याचें पाणी चढविलें पाहिजे. हायड्रॉलिक रॅम या यंत्राच्या योजनेनें तें योग्य रीतीनें वर चढवितां येईल असा सल्ला मिळाल्यामुळें पंचकमिटी, एक्झिक्युटिव्ह एंजिनियर व कलेक्टरसाहेब यांच्या संमतीनें हें यंत्र बसविण्याची मागणी करण्यांत आली आहे, व या मागणीप्रमाणें रा. माधवराव [illegible] यांनीं ती शिफारस करून कमिटीस देण्याचें कबूल केलें आहे. पण यंत्र तयार करून पाणी वर चढवून सर्व व्यवस्था मनाजोगी होण्यास सुमारें ४०००० रुपये लागतील असा अंदाज आहे. तरी सर्व हिंदुधर्माभिमानी सद्गृहस्थांनीं, तसेंच पर्वतीविषयीं आदर बाळगणाऱ्या व धर्माच्या लोकांनी, या कामांत मदत करावी अशी विनंति आहे. इतकी महत्वाची सरकारकडून देवस्थानास मिळणाऱ्या नियमित रकमेंतून यावेळीं भागत नाहीं, ही गोष्ट उदार धनिकांनीं यावेळीं ध्यानीं आणावी अशीहि पंचकमिटीची सविनय विनंति आहे.

---

२७ हल्लीं पुणें शहरबाहेर टाउन प्लॅनिंगच्या हद्दींत युरोपियन ऑफिसर लोकांच्या सोयीसाठीं बंगले बांधण्याकरितां सुमारें ५०।६० एकर जमीन घेण्याचें सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें. तसेंच शहरांतून चतुःशृंगीस जाणाऱ्या मार्गानें जाण्याची जी पायवाट आहे आवतीहि बरीच एकर जमीन या कामाकरितां सरकार घेणार आहे. परंतु असें केल्यानें लोकांस व सरकारास उभय पक्षींहि गैरसोय होणार. कदाचित चतुःशृंगीची पायवाट जुन्या वहिवाटीची म्हणून सरकार मोकळी सोडील, पण तेवढ्यानें कार्यभाग होत नाहीं. कारण जुन्या वाटेनें यात्राकरितां चतुःशृंगीला जावयाचें तीं सर्व कार्यें-उत्सव शिलक राहतातच व त्यांत सरकारास हातांहि घालतां येत नाहीं. हीं कार्यें व उत्सव अबाधित चालावयाचीं तर बाजार व जत्रा भरणें, खेळण्यावळी होणें, वाद्यें वाजणें यांना हरकत होतां कामा नये. उलट हीं सर्व कार्यें अबाधित चालावयाचीं तर आसपासच्या बंगल्यांतील लोकांस त्रास होणार; व हे प्रायः युरोपियनच असल्यामुळें ते हा त्रास सोसून न घेतां हरकतीनें कज्जा करतील हें उघड आहे तरी सरकारनें या जागेचा नाद सोडून देऊन हे बंगले खिडकीपलीकडील प्रशस्त मैदानांत बांधावे. टाऊन प्लॅनिंग ॲक्टानें सरकारचे हातीं असलेले अधिकार व तिकडे जागा दोन्हींहि मनःक्षोभ आहेत. या बाबतींत हजारों [illegible] सरकारकडे गेले व जात असल्यानें समजतें. तरी सरकार या बाबतींत जरूर लक्ष पुरवील अशी आशा आहे.

---

## इहवृत्त

**कीर्तनें**—१ कीर्तनभूषण शंकरशास्त्री जोशी पिंपळगांवकर यांचें सुन्या मुरलीधराचे देवळांत दररोज ता. ५ ते ७ पर्यंत चालू असून शिवाय सोमवार पेठेंत नागेश्वराचे देवालयांत ता. २७ व २८ रोजीं रात्रीं १० ते १२ पर्यंत कीर्तन होणार आहे.

२ विठ्ठलरामबोवा पाठक यांचें तुळशीबागेच्या मागील दत्त मंदिरांत दररोज सा. ५ ते ७ पर्यंत चालू आहे.

**गीतानिरूपण**—सांगलीचे ह. भ. प. केशव भिकाजी केळकर यांचें श्रीरामेश्वर-मंदिरांत आषाढ शु. १० पासून दररोज रात्रीं ९ ते १० पर्यंत गीतेवर निरूपण चालणार आहे.

---

### गृह्यसंस्कार

रा. अनंत हरि पानसे मुक्काम सोनोरी, ता. पुरंदर, जि. पुणें, यानीं पुणें मुक्कामीं रविवार मिती ज्येष्ठ शु. ६ शके १८४२ ता. २३ मे. १९२० इ. रोजीं रा. कृष्णराव दामोदर पानसे राहणार मु. सदर यांचा मुलगा चि. गंगाधर यास हिंदु धर्माप्रमाणें विधियुक्त दत्तक घेऊन त्याचें नांव रामचंद्र असें ठेविलें आहे.

धनी व नोकर, तसेंच शेतकरी व व्यापारी अशा सर्वांना उपयुक्त दररोज पाहिजे असें 'महाधिकार' पाक्षिक एकच होय. किरकोळ अंकास ०।॥ आणा. वार्षिक वर्गणी टपालखर्चासह रु. २ आहे.
म्यानेजर—महाधिकारी—बेळगांव.

---

वर्ष ४० वें ] २२।६।१९२०. [ अंक २५ वा.

## अनुक्रमणिका

अग्रलेख— बढाईखोर जाहीरनामा; पृ. २.
स्फुटसूचना—१-३ खंडेराची कुत्सित टीका; ४-६ निवडणुकीसंबंधीं खुलासा; ७-१० डायरच्या बचावाचा प्रयत्न; ११ मुलख हवा, खर्च नको; १२-१३ बोल्शेव्हिकांशीं सख्य; १४ तुर्की तह बदलणार! १५-१६ राष्ट्रसंघाचें काय होणार! १७ हिंदी लोकांची हकालपट्टी; १८ ब्रह्मपूरला खास काँग्रेस; १९ युनिव्हर्सिटी व देशभाषा; २० पुण्यास मेडिकल कॉलेज काढा; २१-२३ पंढरपूरचा धर्मशाळा फंड; २४ सॉव्हरिन देऊन पंधरा रुपये घ्या; २५ नो.ए. कमिटीची ब्याद; २६ पर्वतीवर पाण्याची सोय; २७ बंगले दुसरीकडे बांधा. पृ. ४ व ५.
[illegible]

ठरावास म्युनिसिपालिटींतील लोकनियुक्तांप्रमाणेंच सरकार-नियुक्त सभासदांनींहि अनुकूल मत दिलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. शहर म्युनिसिपालिटीच्या कित्येक बाबतींतला कारभार ज्यांना नापसंत वाटतो असे कित्येक लोक या शहरांत आहेत हें आम्हांस माहीत आहे. पण कोणत्याहि शहरांत जा, तेथील म्युनिसिपालिटीस नांवें ठेवणारे कांहीं तरी लोक त्या शहरांत भेटणार नाहींत असें होणारच नाहीं. मग तें हिंदुस्तान असो कीं इंग्लंड असो. पण अशा नाखुष लोकांच्या मतावरच सरकार मिस्त ठेवूं लागेल तर आहे ही म्युनिसिपालिटी देखील त्यांना उठवावी लागेल. ते कशाला! स्वतः सरकारच्या कारभारावर तरी सर्व लोक सारखेच खुष आहेत अशी सरकारची खात्री आहे काय! व नाखुष लोकांना खुष करण्याचेंच मन आपण घालूं असें सरकार म्हणूं लागेल तर स्वतः त्यांना आपला हि अधिकार सोडावा लागेल. असो; स्थानिक स्वराज्य पूर्णपणें यशस्वी व्हावयाचें व तें चालविण्याची पात्रता लोकांच्या अंगीं यावयाची तर या छोटेखानी स्वराज्यांतील सर्व अधिकार सरकारानें केव्हां तरी लोकांच्याच स्वाधीन करणें जरूर आहे. म्हणून पुणें शहर म्युनिसिपालिटीनें वरील ठराव करून आपल्या महत्त्वाकांक्षेचें व्यक्त स्वरूप दिलें ही फार चांगली गोष्ट झाली. आकांक्षेचें पाऊल केव्हांहि प्रत्यक्ष अधिकारभोगापुढें थोडेंसें असावयाचेंच!

४ दुय्यमशिक्षण देशभाषेंतूनच दिलें जावें या- [illegible]

[illegible]

## इहवृत्त

**स्वराज्यसंघाचा वाढदिवस**—शनिवार ता. २८ एप्रिल १९१७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां संघाच्या वाढदिवसानिमित्त सार्वजनिक सभेनंतर शिवाजीमंदिरांत संघाच्या सभासदांची खासगी सभा भरणार आहे. त्या वेळीं सेवासंघाच्या पुण्यांतील सर्व सभासदांनीं अवश्य हजर रहावें अशी चिटणिसांची विनंति आहे.

**श्रीशंकराचार्योत्सवाचा कार्यक्रम**—ठिकाण नारायण पेठेंतील मोदींच्या गणपतीचें देवालय. रोजचा सामान्य कार्यक्रम—सकाळीं ६-७ पूजा-रुद्राभिषेक; ७-८ वेदब्रह्मपारायण भाष्यपारायण; ८-१० भाष्यप्रवचन; रात्रौ ७-९ आरती, मंत्रपुष्प, कांकडादि सेवा ९-१०॥ व्याख्यान; १०॥-१२ कीर्तन, भजन वगैरे. मंगळवार वै. शु. १० सकाळीं ६ वाजतां पादुकारोहण ११-१२ कीर्तन, आचार्यजन्मोत्सव. सर्वांनीं वरील प्रसंगीं अवश्य यावें. व्याख्यानांचा व इतर विशेष कार्यक्रम पुढील आठवड्यास प्रसिद्ध होईल. या उत्सवास ज्यांना द्रव्यद्वारा साह्य करावयाचें असेल त्यांनीं तें कार्यदर्शी यांजकडे करावें अथवा उत्सवसंस्थेच्या पेटींत टाकावें असें वे. शा. विष्णुशास्त्री बापट, कार्यदर्शी शंकराचार्योत्सव, पुणें. हे कळवितात.

**मोफत वाचनालय**—सोमवार पेठेंत नागेश्वराच्या देवालयांत येथील बंधु समाजमार्फत श्रीनागेश्वर मोफत वाचनालय आज (मंगळवार ता. २४ एप्रिल) रोजीं सायंकाळीं सहा वाजतां रा. हरि नारायण आपटे यांच्या हस्तें उघडण्यांत येणार आहे. त्या प्रसंगीं रा. अ. ब. कोल्हटकर यांचें भाषण होईल.

**स्थानिक स्वराज्य सुधारणा मंडळ**—या संस्थेच्या विद्यमानें आज मंगळवार ता. २४ रोजी [illegible]

[illegible]

## स्वराज्यसंघवार्ता

[illegible]

## मुंबई येथील वेदशास्त्रोत्तेजक [illegible]

[illegible]

## मराठी शिक्षणविषयक फेडरेशन

[illegible]

## युरोपांतील महायुद्ध

**पश्चिमरणांगण**—फेंच रणभूमीवर [illegible] ब्रिटिश सैन्यानें मोठा विजय संपादन केल्याचें मान गतांकीं दिलेंच आहे. त्यांत लेन्स शहर ब्रिटिश सैन्यानें काबीज केल्याचीहि बातमी दिली होती, पाठीमागून आलेल्या तारांवरून असें कळतें कीं, लेन्स शहर कांहीं ब्रिटिशांच्या हातीं लागलें नाहीं. त्यांचें सैन्य त्या शहराच्या नजीक ५ कोसांवर जाऊन पोहोंचलें आहे, परंतु अद्यापि मुख्य शहर ब्रिटिशांच्या हातीं आलें नसून त्याप्रमाणें [illegible] भाग जर्मनांनीं जलमय करून सोडला [illegible] नजीकचा प्रदेशहि जलमय करून सोडला आहे [illegible] या बाजूस युद्धाची धामधूम कांहीं कमी नाहीं. लॅमिकोर्ट येथें तर जर्मनांनीं फेरहल्ले करून ब्रिटिशांची एक बाजू हस्तगत केली व तीनशें लोक [illegible] करून टाकल्या; परंतु तिनवेळां ब्रिटिशांनीं परत फिरून नेटानें हल्ला करून त्या तोफा [illegible] हिसकावून घेतल्या. चालू आठवड्यांत [illegible] मात्र लाओनच्या बाजूस एक मोठा जय मिळविला [illegible] ब्रिटिशांनीं ज्यावेळीं आरासकडून लेन्सवर हल्ला केला त्याचवेळीं फेंचांनीं लाओनच्या बाजूस [illegible] करून शत्रूंस नमोहरम केलें आणि त्यांचे [illegible] हजार सैनिक दहाट केले. आणि ही रणधुमाळी अद्यापि शांत झालेली नाहीं. ता. ९ एप्रिलपासून ता. २० एप्रिल पर्यंतच्या ११ दिवसांत ब्रिटिश व फेंच या उभयतांनीं मिळून शत्रूचे ३३ हजार शिपाई कैद केले आणि लहान मोठ्या मिळून ३ [illegible] तोफा हस्तगत केल्या. या सटापटींत शत्रूंचे एकंदर एक लाख [illegible]

[illegible]

## अनुक्रमणिका

[illegible]

२. मुंबई शहर हें सार्वजनिक करमणुकीचें केवळ आगर असल्यामुळें तेथील करमणुकीचीं साधनें निर्दोष असावीं असें सरकारास वाटणें साहजिक असून, सरकारची व लोकांची या बाबतींत एकवाक्यताच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि मुंबईंतील सार्वजनिक नाटकगृहांविषयीं व्यापक असे नवीन नियम करून नाटकगृहांचा कारभार सर्वस्वी निर्दोष होईल अशी जी योजना मुंबईचे पोलीस कमिशनर यांनीं हल्लीं चालविली आहे, तिचें मूलभूत तत्त्व कोणासही मान्यच होईल. तथापि, सार्वजनिक हित साधण्याच्या सबबीवर अधिकाऱ्यांना अनियंत्रित अधिकार सर्वस्वी आपल्या हातीं ठेवण्याचा मोह प्रायः दुर्निवार होतो; व मुंबईचे पोलीस कमिशनर यांच्या हातीं मुंबईंतील सार्वजनिक नाटकगृहांचा अखत्यार देण्याच्या कामीं जो नियमांचा मसुदा करण्यांत आला आहे त्याचीही गोष्ट अशांतलीच आहे. नाटकगृहें प्रशस्त हवाशीर असावीं, त्यांत आगीनें घातपात होण्याचा संभव नसावा, नाटकगृहें दीड वाजण्याचे आंत बंद व्हावीं, त्यांत आक्षेपकारक प्रकार नसावेत, शांततेचा भंग होऊं नये, कोणी व्यक्ती किंवा कोणी समाज अगर सरकार यांना कमीपणा आणण्यासारखें दृश्य, चीड आणण्यासारखे शब्दप्रबंध किंवा नाट्यरचना कोणत्याही नाटकांत नसावी, आणि नाटकवाले वगैरे मंडळींवर अधिकाऱ्यांचा ताबा बरोबर रहावा, याकरितां सरकारानें पसंत केलेल्या नियमांन्वयें आगाऊ परवाना काढला असल्याशिवाय नाटकगृहांचा उपयोग केला जाऊं नये वगैरे गोष्टी बिलकुल वादग्रस्त नाहींत. पण या अनेक बाबतींत बरें-वाईट, सरस-निरस, पात्रा-पात्र ठरविण्याची सर्व योग्यता आपलीच आहे अतएव सर्व अधिकार पोलिसांच्याच हातीं असावा, अशा कांहींल अहंकाराचा ध्वनी प्रस्तुतच्या नियमांच्या मसुद्यांतून निघतो. सार्वजनिक करमणुकीच्या दृष्टीनें नाट्य वाङ्मय कोणत्याही देशांत श्रेष्ठ दर्जाचें मानलें जातें, इतकेंच नव्हे तर धर्म, तत्त्वज्ञान, काव्य वगैरे उच्च गोष्टींचा संबंधही त्यांत बराच येतो. अर्थात् अशिक्षित किंवा अर्धशिक्षित पोलिस अधिकाऱ्यांना त्यावर अधिकारयुक्त वाणीनें निर्णय देतां येईल, व तो निर्णयही इतका बिनचूक असेल कीं कोणाही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे त्यावर अपील ठेवण्याचें कारण नाहीं, असें जर अधिकाऱ्यांस वाटत असेल तर त्यांच्या अविचाराची सीमाच झाली असें म्हटलें पाहिजे. इंग्लंदांत नाट्य वाङ्मयाची शेंडी अधिकाऱ्याच्या हातीं दिलेली असते; पण तो अधिकारी सुशिक्षित असून त्याजकडे सोंपविलेला कारभार करण्याची थोडीबहुत पात्रता तरी त्याच्या अंगीं असते. पण हिंदुस्थानांत उदार शिक्षणाचा पोलिसच्या लायकींत समावेश होतो असें कधीं मानलें जात नाहीं, व अशा मनुष्याच्या हातीं सरस्वतीचा राजदंड दिल्यानें पदोपदीं अन्याय होतील यांत शंका कशाला! प्रस्तुत नियमांत नाट्यप्रयोगास परवाना तर अनिवार्य केलाच आहे; पण परवाना दिल्यावरही त्याचा अंमल वाटेल तेव्हां निमिषार्धांत रद्द करण्याचाही अधिकार पोलीस अधिकाऱ्यांस दिला जात आहे. यावर आमचें म्हणणें इतकेंच कीं, सार्वजनिक करमणुकीमध्यें सदोष कोणतें व निर्दोष कोणतें याची छाननी होणें जरूर आहे. पण तो अधिकार एकट्या पोलीस कमिशनरचे हातीं राहूं नये, हरकत घेतेवेळीं असतां कोणत्या गोष्टीला काय म्हणून हरकत घेतली हें स्पष्ट दाखवून देणें त्यास भाग पाडावें, व पोलीस कमिशनरनें दिलेल्या ठरावावर वरिष्ठ अशा एका अधिकाऱ्याकडे किंवा सरकारी व बिनसरकारी अशा एखाद्या मिश्र कमिटीकडे अपील करण्याचा अधिकार असावा. आज असले हे नियम मुंबई शहरास एकदां का लागू झाले म्हणजे त्याच नमुन्यावर इतर सर्व इलाख्यालाही असेच नियम लागू होण्याचा संभव आहे. या विषयावर पूर्वी रा. रा. दादासाहेब करंदीकर यांनीं कौन्सिलमध्यें प्रश्न विचारलेला होता त्या वेळीं सरकाराकडून विशेष विचार झाला नाहीं; तरी प्रस्तुतच्या नियमांच्या प्रसंगानें कौंसिलचे कोणी सभासद या विषयाची चर्चा कौंसिलांत करवितील तर बरें होईल.

३. कायद्याचा भंग करणें हा गुन्हा खरा; पण तोही सरकारच्या मर्जीला येईल तेव्हां! फौजदारी कायद्याचें तेज जाज्वल्य असतें खरें; पण सरकारची इच्छाशक्ती स्फुरण पावेल तेव्हां! विस्तवाला स्पर्श झाल्याबरोबर अंग भाजावयाचेंच हा सिद्धांत नेहमीं अबाधित असतो. पण फौजदारी कायद्याच्या अग्नीची गोष्ट तशी नाहीं. कायदा मोडला तरी खटला होणें, खटला झाला तरी शिक्षा होणें, व शिक्षा झाली तरी तुरुंगवास भोगावा लागणें किंवा न लागणें या गोष्टी केवळ सरकारच्या आधीन असतात. अर्थात् कायदा मोडणें व तुरुंगवास भोगणें यांचा संबंध नित्य व निश्चित नाहीं. ईश्वरा अंश अंगांत संचारलेलें सरकारही कायदे मोडणाराचा परामर्ष केवळ मानवी म्हणजे विकारवशबुद्धीनें घेत असतें, हें उदाहरणें देऊनही सहज सिद्ध करून देतां येईल. सर एडवर्ड कार्सन यांनीं सशस्त्र प्रतिकार व बंड यांचा अगदीं उघड उपदेश केला एवढेंच नव्हे तर राजरोसपणें त्याची पूर्वतयारीही चालविली आहे व त्यास बोनर लॉसारखे भावी मुख्य प्रधान उघड पाठबळ देत आहेत! असें असतां त्यांच्या केंसासही धक्का लावण्याची सरकारची इच्छा नाहीं. आयरिश मजूरसंघाचा पुढारी मि. लार्किन यानें केवळ संपांचा म्हणजे निष्क्रिय प्रतिकाराचा उपदेश केला म्हणून त्याजवर खटला करून त्याला शिक्षा देण्यांत आली, पण मजूरपक्षानें चळवळ केल्याबरोबर त्यास सोडून देण्यांत आलें! निवडणुकीच्या खेळांत विजय मिळविण्याकरितां त्यांनीं ही युक्ती योजिली असा सरकारावर आरोपमुद्रा करण्यांत आला आहे. तिसऱ्या प्रकाराचीं उदाहरणें हवीं असतील तर हिंदुस्थानाकडे पहावें. इकडे खटला होण्यास फारसें प्रबळ कारण लागत नाहीं. राजकीय बाबतींत खटला झाला कीं शिक्षा व्हावयाची हें बहुतेक ठरलेलेंच! आरोपी सुटला अशी गोष्ट विरळा! आणि शिक्षा होऊन मनुष्य तुरुंगांत गेला म्हणजे मुदतींत त्याची मुक्तता होणें ही गोष्ट तर त्याहून विरळा! हिंदुस्थानांतील राजकीय गुन्हेगार सर एडवर्ड कार्सन किंवा बोनर लॉसारखे प्रधानपदाभिषिक्त नाहींत किंवा लार्किनसारखे उद्योन्मुख अशा मजूरपक्षाचे पुढारी नाहींत. तेव्हां त्यांच्यावर वाटतील तसे खटले करावे, वाटतील तितक्या शिक्षा द्याव्या, व त्या वाटतील तितक्या [illegible]

[illegible]

प्रमाणें योग्य त्या तजविजी करीत असतात. परंतु या यात्रांतील मुख्य अवयव जे यात्रेकरू त्यांची या तजविजींनीं नेहमींच सोय होते, अगर ते ज्या हेतूनें यात्रेस जातात तो या तजविजींनीं पूर्णपणें सफल होतो, असें मात्र म्हणतां येत नाहीं. याचें मुख्य कारण हें आहे कीं, ज्यांची सोय करावयाची व ज्यांचें आरोग्य संभाळावयाचें त्या यात्रेकरूंच्या इच्छा व तक्रारी त्यांच्या लायक पुढाऱ्यांकडून प्रत्यक्ष सरकारास, रेलवेकंपनीस किंवा म्युनिसिपालिट्यांस कळतील असें कांहींच साधन नाहीं. गेल्या आषाढी यात्रेसंबंधानें नुकताच प्रसिद्ध झालेल्या सरकारी रिपोर्टांतही यासंबंधाचा प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. यात्रेकरूंस बिन्हाडानें देण्यालायक अशीं ११८९ घरें आषाढी यात्रेच्या वेळीं परवाने देऊन मुकर करण्यांत आलीं होतीं; म्हणजे यांपासून सरासरी २९००० यात्रेकरूंच्या उतरण्याची सोय झाली. १२३००० यात्रेकरूंपैकीं एकपंचमांशाचीच राहण्याची सोय होऊन इतर चारपंचमांशास विशेषतः पावसाळ्यांत व थंडीचे दिवसांत उघड्यावर मैदानांत किंवा वाळवंटांत पालें देऊन राहावें लागावें ही फार शोचनीय गोष्ट होय. याकरितां यात्रेकरूंसाठीं क्षेत्रांचे ठिकाणीं प्रशस्त व स्वच्छ धर्मशाळा पुष्कळ होणें अगत्याचें असून हें कार्य सरकार, म्युनिसिपालिट्या व धनिक परोपकारी गृहस्थ यांनीं मनावर घेऊन केलें पाहिजे. तसेंच कुर्डुवाडीवर पाण्याच्या तोट्यांची व पायखान्यांचीही अगदीं अपुरी व्यवस्था रेल्वे कंपनीनें ठेवली होती असें सरकारी रिपोर्टांतच म्हटलेलें आहे.

५. पंढरपूर व आळंदी येथें मोठ्या यात्रांचे वेळीं यात्रेकरूंस कोणत्या अडचणी व गैरसोयी सोसाव्या लागतात आणि त्यांचें निवारण कसें करावें यासंबंधानें येथील एक प्रमुख वारकरी ह. भ. प. विनायकबोवा साखरे यांजकडून आमचेकडे एक पत्र आलें आहे. त्यांचेंही असें म्हणणें आहे कीं "पंढरपुरास यात्रेकरूंस उतरण्याकरितां धर्मशाळा नाहींत. शौचाची जी सोय म्हणून केलेली असते तिनें उलट यात्रेकरूंची गैरसोयच होते. पाण्याच्या जागजागीं तोट्या उभ्या केलेल्या असतात, पण त्यांनीं यात्रेकरूंचा वेळ फार मोडून तंटे-बखेडे होतात; करितां तोट्यांऐवजीं हौद केले तर जास्त सोईचें होईल. (?) सरकाराकडूनही कधीं कधीं यात्रेकरूंच्या गैरसोयी अशा होतात कीं, एखादे वेळीं यात्रा बंद करण्यांत येते. कधीं कधीं काल्याचे आधींच यात्रा घालवून देतात. आळंदी येथें नदीचे पाण्यांत दोरी बांधून तिथें स्नाणीं, धुणीं व स्नानें उरकावीं आणि वर पिण्याचें पाणी घ्यावें अशी व्यवस्था असून शौचास घर, उजेडास ग्यासच्या २०।२५ बत्त्या, याहून जास्त सोय तेथील म्यु. नें केलेली नसते. सरकार व म्युनिसिपालिट्या यांच्या कांहीं नियमांनीं यात्रेचा मुख्य हेतु जें विशिष्ट धर्माचरण त्यास व्यत्यय येतो; करतां स्वच्छतेचे व आरोग्याचे जे नियम करावयाचे ते, हा प्रधान हेतु निष्फळ करतील असे नसावे." तसेंच यात्रा परत नेण्यास रेल्वेकंपनी जशी घाई करते तशी तिनें सर्व यात्रेकरू आदले दिवशीं रात्रीं १२ पासून एकादशीचे सकाळीं ८।९ वाजण्याचे आंत लागोपाठ स्पेशल गाड्या सोडून पंढरीस पोंचविण्याचीही तजवीज केली पाहिजे. ती न होईल तर कितीही नियमित व्यवस्था केली तरी ती यात्रेकरूंच्या दृष्टीनें निरुपयोगीच होय. तसेंच या स्पेशल गाड्यांस मालाचे डबे जोडण्यापूर्वींच ते सर्व स्वच्छ धुवावे; म्हणजे यात्रेकरूंचे कपडे राकेल तेल किंवा कोळसे यांनीं खराब होणार नाहींत.

६. ह. भ. प. साखरेबुवांच्या या तक्रारी योग्य असून त्यांचा सरकारानें, कंपनीनें व म्युनि० नीं अवश्य विचार करावा. यात्रेकरू पंढरी-आळंदीक्षेत्रीं जातात ते विशिष्ट धार्मिक हेतूनेंच जात असतात; आरोग्यशास्त्राचे वस्तुपाठ अधिकाऱ्यांकडून घेण्याकरितां ते कांहीं तेथें जात नाहींत. करतां त्यांचा धार्मिक हेतु निष्फळ करणारे नियम आरोग्यदृष्टीनें कितीही चांगले असले तरी त्यांस कोणीही विशेष महत्व देणार नाहीं. यात्रेची व्यवस्था ठेवण्याचे बाबतींत सरकार, रेल्वे कंपनी व म्युनिसिपालिट्या यांस परस्परांचीं मतें कळण्याचीं साधनें तयार आहेत. पण यात्रांचे बाबतींत या तिघांइतकेंच किंबहुना त्यांचेहून जास्त महत्व यात्रेकरू या चवथ्या संस्थेस दिलें पाहिजे; व वरील त्रिकुटाचे सल्लामसलतींत यात्रेकरूंचेही प्रतिनिधी असले पाहिजेत. ते जसे जोंपर्यंत असणार नाहींत तोंपर्यंत यात्रेकरूंची तक्रार व गैरसोय नाहींशी होणार नाहीं. या बाबतींत ह. भ. प. साखरेबोवा यांची अशी सूचना आहे कीं, यात्रेकरू वारकऱ्यांनीं आपली एक संस्था स्थापावी व या संस्थेनें वारकऱ्यांचे प्रतिनिधी पंढरपूर व आळंदी—म्युनिसिपालिटींत निवडून द्यावे; आणि एकंदर म्यु. सभासदांपैकीं निदान एकचतुर्थांश तरी सभासद वारकऱ्यांचे असावेत. ही सूचना चांगली आहे, पण ती अमलांत येण्यास व्यावहारिक व कायद्याची अडचण येणार आहे. सदरहू म्यु. चें बहुतेक उत्पन्न यात्रेकरू देतात हें खरें आहे; व त्यासाठीं त्यांचे प्रतिनिधी त्यांत असणें जरूरही आहे. पण म्युनिसिपालिटींत सभासद होण्यास प्रतिनिधी तेथला रहिवाशी असावा लागतो किंवा त्याची तेथें मालमत्ता तरी असावी लागते असा कायदा आहे. म्हणून यात्रेकरू वारकऱ्यांस आपले प्रतिनिधी या म्युनिसिपालिट्यांत 'निवडून' पाठवितां येणें—कायदा बदलल्यावांचून—शक्य दिसत नाहीं. तथापि या म्यु. चें बहुतेक उत्पन्न यात्रेकरूंकडूनच येतलेलें आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारानेंच यात्रेकरू व वारकरी यांचे कांहीं प्रमुख पुढारी या म्युनिसिपालिट्यांत 'नॉमिनेटेड' सभासद म्हणून नियमानें नेमावे, अशी आमची मुंबईसरकारास विनंति आहे.

७. राज्यकारभाराचे बाबतींत लोकांची सल्ला सनदशीर लोकप्रतिनिधिसभेमार्फत घेण्याचा पहिला धडा म्हैसूर संस्थानानें घालला असून त्याचें अनुकरण पुढें त्रावणकोर, पदुकोटा, सांगली वगैरे संस्थानिकांनीं केलें. हैद्राबाद, बडोदें वगैरे ठिकाणीं इंग्रजी धर्तीचीं कायदेकौन्सिलें आहेत; पण त्यांस सदरहू लोकप्रतिनिधिसभेइतकें—रयतेच्या राजकीय हक्कांचे व शिक्षणाचे दृष्टीनें—महत्व देतां येत नाहीं. असल्या प्रतिनिधिसभेचें ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे बिकानेर संस्थानाचें आहे. [illegible]

मुळें तूर्त या सभेचे सर्व सभासद महाराजांनींच नेमले आहेत; पण त्यांची ३ वर्षांची मुदत भरतांच लोकांचे प्रतिनिधी त्यांपैकडूनच निवडून घेतले जातील. शिवाय लोकांस राजकीय कामाचा जसजसा अनुभव येत जाईल तसतसें लोकनियुक्त प्रतिनिधींचें प्रमाण वाढविण्याचेंही महाराजांनीं वचन दिलें आहे. तसेंच म्हैसूरप्रमाणें प्रतिनिधिसभा वेगळी व कायदेकौंसिल वेगळें, अशी पद्धत बिकानेरच्या महाराजांनीं अंगीकारलेली नसून या लोकप्रतिनिधिसभेसच त्यांनीं कायदे करण्याचे अधिकार दिलेले आहेत. ३५ पैकीं फक्त १० म्हणजे एकतृतीयांशाहूनही कमी इतके थोडे लोकनियुक्त सभासद जीत आहेत, तिला लोकप्रतिनिधिसभा (Representative Assembly) हें नांव कितपत शोभेल याची शंकाच आहे. पण याबद्दल महाराजांस फारसा दोष न देतां म्हैसूरप्रमाणें लोकसभा निवळ सल्ला देणारी न ठेवतां तिला कायदे करण्याचेंही त्यांनीं अधिकार दिले व राजपुतान्यांतील रजपूत संस्थानांस लोकसभेचें अनुकरणीय उदाहरण घालून दिलें, याबद्दल महाराजांचें हिंदुस्थानानें आदरपूर्वक अभिनंदनच केलें पाहिजे. 'लोकसभेच्या सभासदांनीं स्वार्थ किंवा स्वज्ञातिहित यांच्या संकुचित दृष्टी बाहेर ठेवून मग सभागृहांत आलें पाहिजे, आणि व्यापक व सार्वलौकिक हिताचेच दृष्टीनें सर्व प्रश्नांची चर्चा केली पाहिजे. तसेंच आपलें मत महाराजांस किंवा त्यांच्या दरबारास आवडेल कीं नाहीं अशी शंका किंवा भीति मनांत न आणतां सर्व सभासदांनीं आपलें खरें मत स्पष्टपणें व निर्भीडपणें व्यक्त करावें. त्यांचीं हीं मतें कशींही असलीं तरी त्याबद्दल त्यांस दरबाराकडून कदापि त्रास किंवा तोशीस पोंचणार नाहीं' अशा प्रकारचा महाराजांनीं आपल्या भाषणांत जो उपदेश केला व जें अभिवचन दिलें त्याचें योग्य व पुरतें चीज बिकानेरचे प्रजाजन व त्यांचे प्रतिनिधी करतील, अशी आम्हांस उमेद आहे.

८. बंगालमध्यें कायम धारेबंदी होऊन कमीत कमी एकशेंवीस वर्षें झालीं. या कायम सारापद्धतीचे सुपरिणाम बंगालच्या सुस्थितीवरून सिद्ध होत असून इतर प्रांतांनाही कायम धारेपद्धति चालू करावी, अशी हिंदी रयतेची मागणी आज कैक वर्षें चालू आहे. परंतु बंगाली लोकांना मिळालेली ही सवलत इतर प्रांतांना लाभण्याची आशा कोणासच वाटत नाहीं. तथापि आपल्यास नाहीं तर नाहीं पण आपल्या बंगाली बंधूंस तरी सुदैवानें जो लाभ झाला आहे, तो त्यांना तरी चिरकाल लाभो, अशीच इतर प्रांतांतील रयतेची इच्छा असणें साहजिक आहे. परंतु बंगालच्या कायम धारेपद्धतीवर देखील अप्रत्यक्ष रीतानें कांहीं तरी धाड येते कीं काय, अशी भीति वाटूं लागली आहे. प्रत्यक्षपणें बंगालची जमीनदारी पद्धति रद्द करणें सरकाराला शक्य असलें तरी इष्ट नाहीं किंवा इष्ट असलें तरी शक्य नाहीं, व तसा सरकारचा हेतुही नाहीं. परंतु जमीनदारी पद्धतीमुळें अधिकाऱ्यांचा रयतेशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं, त्यामुळें रयतेचीं सुखदुःखें सरकाराला कळत नाहींत, आणि अर्थात् सरकारचे रयतेच्या संरक्षणार्थ व कल्याणार्थ जे प्रयत्न चाललेले असतात ते रयतेला प्रत्यक्षपणें न कळल्यामुळें रयतेच्या मनांत सरकारी अधिकाऱ्यांविषयीं जी कृतज्ञता व पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी ती होत नाहीं, असें अधिकारी वर्गाच्या मनांत हल्लीं भरलें आहे. वरिष्ठ अधिकारी आणि रयत यांचा मध्यस्थामार्फत नव्हे तर प्रत्यक्ष संबंध न आल्यामुळें बंगालच्या स्थितींत आणि इतर प्रांतांतील स्थितींत काय अंतर आहे, याची चौकशी करून असा संबंध येण्याला कोणते उपाय योजावे! जिल्ह्याचे लहान लहान विभाग करून अधिकाऱ्यांची संख्या वाढवावी, का वरिष्ठ अधिकारी आहेत तितकेच ठेवून त्यांच्या हाताखालीं अधिक मदतनीस द्यावे! का करावें तरी काय! हें सुचविण्याकरितां बंगालसरकारानें एक कमिटी नेमिली आहे. बंगालप्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत येऊन आज दीडशें वर्षें झालीं. इतक्या दीर्घकालांत जी अडचण भासली नाहीं ती आतांच कां भासूं लागली! बरें, पूर्वीपेक्षां रयतेशीं अधिकाऱ्यांचा अधिक निकट संबंध यावा, अशी सरकारची इच्छा असल्यास त्याला उपाय विभागणी-कमिशननें सुचविलाच आहे कीं, जिल्ह्याच्या कलेक्टरच्या मदतीला एक लोकनियुक्त डिस्ट्रिक्ट कौन्सिल असावें. ही सूचना अमलांत न आणतां निराळी चौकशी करण्याचें प्रयोजन काय! बंगालप्रांत फार विस्तृत म्हणून त्याची जशी फाळणी करण्यांत आली होती, आणि नुकतीच मैमनसिंग व मिदनापूर जिल्ह्यांची फाळणी करण्याचा जसा विचार चालला होता, तसा बंगाल्यांतील आणखी कांहीं जिल्ह्यांची फाळणी करण्याचा विचार आहे, का कायमधारेपद्धतीचे दुष्परिणाम शोधून काढण्याचा मानस आहे, का इकडच्या लँड रेव्हिन्यूबिलाप्रमाणें तिकडे कांहीं नवेंच पिल्लूं बाहेर पडणार आहे, यासंबंधानें कांहींच तर्क होत नाहीं. परंतु, ही कमिटी नेमण्यांत बंगालसरकारचा कोणताही हेतु असला तरी बंगाली लोक स्वहिताला जपण्यांत पूर्णपणें दक्ष असल्यामुळें कोणताही स्वहितविरोधी नवा प्रकार ते निमूटपणें मान्य करतील असें नाहीं. नव्या कमिटीच्या कामाचें धोरण निश्चित होतांच, त्यापासून स्वतःचें नफा-नुकसान कोणतें होईल याचा दूरदृष्टीनें विचार करून त्याविषयीं आपण कोणतें धोरण स्वीकारावें, हें पक्कें ठरवून तदनुरूप एकतंत्रानें व निश्चयानें वागून ते आपलें हित संभाळतील यांत संशय नाहीं.

९. व्हाइसरायसाहेबांची स्वारी दक्षिणहिंदुस्थानची सफर करीत करीत म्हैसूर संस्थानांत गेल्या वेळीं तेथें त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत झालें. त्या वेळीं त्यांच्या स्वागतार्थ झालेल्या दरबारांत लॉर्ड हार्डिंज यांनीं म्हैसूर संस्थानाच्या प्रगतिपर राज्यकारभाराची प्रशंसा केली. म्हैसूर संस्थानांत प्रातिनिधिक सभा असून त्या सभेला अलीकडे वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा व प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यांत आला आहे, आणि संस्थानांत औद्योगिक परिषद् स्थापून संस्थानांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याकरितां औद्योगिक पहाणी करण्याचें ठरविलें आहे; ही खरी 'प्रामाणिक स्वदेशी चळवळ' होय असें व्हाइसरायांनीं बोलून दाखविलें. [illegible]

पुरत नाहीं, म्हणून नवीन तलाव बांधून पाणीपुरवठा वाढविण्याचा विचार आहे, इत्यादि सर्व गोष्टींवरून संस्थानाच्या भरभराटीची व्हाइसरॉयांनीं प्रशंसा केली.

१०. इ. स. १८८१ च्या पूर्वी म्हैसूर संस्थानाचे अधिपती अज्ञानावस्थेंत असल्यामुळें पुष्कळ वर्षें संस्थानाचा कारभार ब्रिटिश सरकाराकडेच होता. त्यानंतर १८८१ सालीं हल्लींच्या महाराजांचे वडील चमुराजेंद्र यांस मुखत्यारी देऊन संस्थानाचीं सूत्रें त्यांच्या स्वाधीन केलीं त्या वेळीं ब्रिटिश सरकारानें संस्थानाच्या राज्यकारभाराच्या धोरणासंबंधानें व महाराजांच्या अधिकारासंबंधानें जो खलिता पाठविला होता त्यांतील कांहीं अटी संस्थानाच्या अधिपतीच्या अधिकाराला उणेपणा आणणाऱ्या होत्या. त्या अटी रद्द व्हाव्या म्हणून हल्लींच्या महाराजांनीं चार महिन्यांपूर्वींच व्हाइसरायांकडे एक थैली लिहिली होती. तिचा योग्य विचार करून लॉर्ड हार्डिंज यांनीं स्टेट सेक्रेटरीच्या अनुमतीनें पूर्वींचा खलिता रद्द केला आणि इतर अव्वलदर्जाच्या संस्थानांप्रमाणें उभयतांचा संबंध दर्शविणारा तह केला आणि असा फेरबदल केला असल्याचें या दरबारांत जाहीर केलें. हे फेरफार कोणकोणते केले त्याचा खुलासा महाराजांच्या किंवा व्हाइसरायांच्या भाषणांतही नाहीं. तथापि पूर्वींच्या अटींत वारस ठरविणें, संस्थानांतील राज्यव्यवस्थेंत फरक करणें, कर वाढविणें, वसुलाची किंवा न्यायाची पद्धति बदलणें, इ. इ. कोणत्याही प्रकारचे फेरबदल ब्रिटिश सरकारच्या संमतीखेरीज करूं नयेत आणि या अटी पाळल्या गेल्या नाहींत तर हा दिलेला अधिकार परत घेण्यांत येईल; अशा स्वरूपाच्या अत्यंत निर्बंधकारक अटी होत्या. या अटी शब्दशः पाळल्या पाहिजेत असा आग्रह ब्रिटिश सरकारानें धरिला नाहीं, हें आजपर्यंतच्या म्हैसूर संस्थानाच्या सुधारणावरूनच उघड दिसत आहे. तरी पण कोणत्याही प्रकारें स्वतंत्र अधिकाराला उणेपणा आणणाऱ्या अटी असणें हेंच अयोग्य असल्यामुळें म्हैसूरच्या हल्लींच्या महाराजांनीं त्या राज्यकारणपटु व्हाइसरायांच्या नजरेस आणिल्या, आणि त्यांनींही त्या रहित करून वस्तुस्थितिदर्शक असा नवा तहनामा करून घेतला हें उभयतांसही भूषणावह आहे.

११. गेल्या रविवारीं सायंकाळीं सातारा येथील आर्थर हॉलमध्यें शहरवासीयांची जाहीरसभा भरून अध्यक्षस्थानीं रा. दादासाहेब करंदीकर यांची योजना करण्यांत आली होती. रा. नारायणराव आगाशे यांनीं आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या दुःखाचें हृदयद्रावक वर्णन केलें. नंतर रा. ब. पाठक आणि सरदार मुतालिक यांनीं सभेपुढें मांडलेला मुख्य ठराव मंजूर झाला. स्वतः हिंदी नसतां, केवळ उदार मनानें हिंदी लोकांच्या या चळवळीस मनोभावानें व स्वार्थत्यागपूर्वक मदत करणाऱ्या पोलक वगैरे गृहस्थांचे आभार मानण्याचाही एक स्वतंत्र ठराव पास करण्यांत आला. नंतर सरदार मुतालिक, आगाशे व पाणेकर वकील यांची कमिटी नेमून तिजकडे वर्गणी जमविण्याचें काम सोंपविण्यांत आलें. बॅरिस्टर गांधी यांच्या अपूर्व कामगिरीबद्दल त्यांचे आभार मानण्याचा ठराव रा. सा. मनोहरपंत काथवटे यांनीं सभेपुढें मांडला. तो मंजूर झाल्यावर, अध्यक्ष दादासाहेब करंदीकर यांचें सविस्तर व जोरदार असें भाषण समारोपादाखल झालें. सरकारी व खाजगी सर्व प्रकारच्या लोकांनीं मदत करण्याचा हा प्रसंग आहे. आफ्रिकेंतील हिंदी लोक स्वतःच्या हक्कापेक्षां साम्राज्याची अब्रू वाचण्याकरितांच दुःख सोशीत आहेत, असें सांगून दादासाहेबांनीं स्वतःकरितां व आपल्या कुटुंबाकरितां मिळून शंभर रुपये वर्गणी दिली. जागच्या जागीं ३०० रुपये रोख जमले असून आणखी वर्गणी गोळा करण्याचें काम सुरू आहे.

१२. मुंबईचे एक प्रसिद्ध व्यापारी शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांस गेल्या आठवड्यांत मुंबई येथें देवाज्ञा झाली, हें कळविण्यास आम्हांस फार वाईट वाटतें. शेट दामोदरदास हे केवळ आत्मनिष्ठेनें व दीर्घ परिश्रमानें मुंबईच्या व्यापारीवर्गांत बऱ्याच वरच्या दर्जास जाऊन पोंचले होते. पण त्यांनीं मिळविलेल्या द्रव्यराशीपेक्षां सत्कार्यांत वेंचलेल्या द्रव्यराशीमुळेंच ते चिरस्मरणीय होऊन राहतील यांत शंका नाहीं. शेट दामोदरदास हे दिसाऊ सुशिक्षित नव्हते. शिक्षण केवळ जुन्या पद्धतीचें असतांही मतस्वातंत्र्याच्या जोरावर ते कर्त्या सामाजिक सुधारकांच्या पुढारी वर्गांत मोडण्याच्या योग्यतेचे बनले होते. सत्पात्रीं दान करून शिवाय गुप्तपणें दान करण्याची त्यांना मोठी हौस होती. त्यांच्या मृत्यूमुळें मुंबईच्या गुजराथी समाजांतील एक नामांकित, परोपकारी, विचारवंत, विनयसंपन्न व दानशूर असा पुढारी नाहींसा झाला.

कंपाझिटर्स पाहिजेत.—मराठी कंपाझिटर्सची जरूर आहे. पगार लायकीप्रमाणें मिळेल. तरी गरजूंनीं समक्ष भेटावें. म्यानेजर केसरी पुणें.

शंभर फ्रीशिप्स व ५० स्कॉलरशिप्स—पंडित इंग्लिश स्कुलांत (भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार) नवंबरांत येणाऱ्या विद्यार्थ्यांस देऊं व प्रवेशफी माफ. यंदां चार यत्ता. पुढें द. सा. १ वाढवूं. अंडर ग्राज्वेट व ग्राज्वेट शिक्षक. फी दरमहा २ रु. अभ्यासक्रम नवा व सोपा. उघडणार ता. ६ नवंबर. हस्तपत्रक पहा.

विकावयाचा आहे, ठाणें स्टेशनरोडवरील मु. नं. १८१ चा उत्तम हवाशीर मध्यवस्तीतील बंगला विकावयाचा आहे. गरजूंनीं गोविंद बाबाचे चाळींत अभ्यंकर यांजकडे चौकशी करावी.

माथेरान रॉयल हिंदु हॉटेलः—ता. १ आक्टोबरपासून सुरू झालें. जेवणाची व राहण्याची उत्तम सोय. ना. मुधोळकर, गोखले, न्यायमूर्ती राव वगैरे सद्गृहस्थांचे उत्तम अभिप्राय. दर माफक. पत्रव्यवहार इंग्रजींत करावा. मॅनेजर माथेरान रॉयल हिंदु हॉटेल.

महारोग, रक्तपित्त, सुनबहिरी, गलितकुष्ट इ. रोगांवर वनस्पतींचें खात्रीचें औषध. गरिबांस फुकट. विशेष माहितीकरितां ८१ चें तिकीट. गणेश केशव एकबोटे, माधवाश्रम, गिरगांव, मुंबई.

[illegible]

## इहवृत्त.

प्लेगः—येथील प्लेगच्या मृत्युसंख्येचें मान गेल्या आठवड्यांत आणखी उतरलें आहे. हें उतरतें मान याच प्रमाणानें चालू राहिल्यास महिना दीड महिन्यांत यंदाचा प्लेग बहुतेक नाहींसा होईल असें वाटतें.

| ता. | वार | प्लेग-केसेस | प्लेगमृत्यु | एकंदर मृत्युसंख्या |
|---|---|---|---|---|
| १० | सोमवार | १२ | १२ | २४ |
| ११ | मंगळवार | २२ | २५ | ३२ |
| १२ | बुधवार | ११ | १२ | २१ |
| १३ | गुरुवार | १० | १० | १३ |
| १४ | शुक्रवार | १३ | १३ | १७ |
| १५ | शनवार | १६ | १७ | २१ |
| १६ | रविवार | १७ | १७ | २३ |

## निःशस्त्र प्रतिकाराचा फंड.

१६८८ रु. मागील पोंच. ५. रु. तांदुळाची वखार सदाशिव पेठ पुणें; ५. रु. शिवथापजर शीव, मुंबई; १ रु. वि. ग. लिमये पुणें; ५० रु. बाळाजी दामोदर इसवर्नीसमार्फत बत्तीसशिराळें; १७४१२ यावल हितचिंतक मंडळी; २५ भागिर्थीबाई गोखले पुणें; १०. रु. एस्. एम्. एस्. चिपळोण; १०. रु. नाडे मित्र व मंडळी, रावेर; १४१५ गोविंद बल्लाळ जोशी वकील चिपळूण; १ रु. स. का. कमरकर; १ रु. के. [illegible]

[illegible]

# परिशिष्टे ३ – फोटो



पालखी सोहळा जनक - तपोनिधी श्रीसंत नारासण महाराज देहूकर



संत ज्ञानेश्वर म.पालखी सोहळा जनक - श्रीसंत हेबतबाबा आरफळकर



संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान, आळंदी



संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान, देहू

## पालखी सोहळा कार्यक्रम पत्रिका

माय पुणे ५ पुढारी | पुणे, मंगळवार ७ जुलै २०१५

### आळंदी-पंढरपूर पालखी सोहळा कार्यक्रम

| तिथी | दिनांक | वार | सकाळी निघण्याचे ठिकाण | सकाळचा विसावा | दुपारचा नैवेद्य (भोजन) व निघण्याचे ठिकाण | दुपारचा विसावा | रात्रीचा मुक्काम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अधिक आषाढ वद्य ८ | ०९/०७/२०१५ | गुरुवार | -- | -- | -- | प्रस्थान रात्री ९ वाजता | आळंदी |
| अधिक आषाढ वद्य ९ | १०/०७/२०१५ | शुक्रवार | आळंदी | १ थोरल्या पादुका-आरती, २ भोसरी फाटा | फुलेनगर | संगमवाडी | पालखी विठोबा मंदिर, भवानी पेठ. |
| अधिक आषाढ वद्य १० | ११/०७/२०१५ | शनिवार | -- | -- | -- | -- | पुणे |
| अधिक आषाढ वद्य ११ | १२/०७/२०१५ | रविवार | पुणे | शिंदे छत्री-आरती | हडपसर | १ उरुळी देवाची, २ वडकीनाला, ३ झेंडेवाडी | पुणे |
| अधिक आषाढ वद्य १२ | १३/०७/२०१५ | सोमवार | -- | -- | -- | -- | सासवड |
| अधिक आषाढ वद्य १३ | १४/०७/२०१५ | मंगळवार | सासवड | बोरावके मळा | यमाई शिवरी | साकुर्डे | सासवड |
| अधिक आषाढ वद्य १४ | १५/०७/२०१५ | बुधवार | जेजुरी | १ दौंडज शिव, २ दौंडज | वाल्हे | -- | जेजुरी |
| अधिक आषाढ वद्य ३० | १६/०७/२०१५ | गुरुवार | वाल्हे | पिंपरे खुर्द विहीर | निरा | श्रींचे निरा स्नान | वाल्हे |
| निज आषाढ शुद्ध १ | १७/०७/२०१५ | शुक्रवार | -- | -- | -- | -- | लोणंद |
| निज आषाढ शुद्ध २ | १८/०७/२०१५ | शनिवार | लोणंद | -- | लोणंद | चांदोबाचा लिंब उभे रिंगण १ ले | लोणंद |
| निज आषाढ शुद्ध ३ | १९/०७/२०१५ | रविवार | तरडगाव | १ दत्तमंदिर काळज, २ सुरवडी | निंभोरे ओढा | वडजल | तरडगांव |
| निज आषाढ शुद्ध ४ | २०/०७/२०१५ | सोमवार | फलटण | विडणी | पिंपरद | निंबळक फाटा | विमानतळ-फलटण |
| निज आषाढ शुद्ध ५ | २१/०७/२०१५ | मंगळवार | बरड | साधुबुवाचा ओढा | धर्मपुरी पाटबंधारे बंगला कॅनॉल | शिंगणापूर फाटा-पानसकरवाडी | बरड |
| निज आषाढ शुद्ध ६ | २२/०७/२०१५ | बुधवार | नातेपुते | -- | मांडवी ओढा | १ सदाशिवनगर गोल रिंगण १ ले २ येळीव | नातेपुते |
| निज आषाढ शुद्ध ७ | २३/०७/२०१५ | गुरुवार | माळशिरस | खुडुसफाटा गोल रिंगण २ रे | विझोरी- ज्ञानेश्वर नगर | धावाबावी माउंट | माळशिरस |
| निज आषाढ शुद्ध ८ | २४/०७/२०१५ | शुक्रवार | वेळापूर | ठाकुरबुवांची समाधी गोल रिंगण ३ रे | तोंडलेबोंडले | टप्पा - संत सोपानदेव भेट | वेळापूर |
| निज आषाढ शुद्ध ९ | २५/०७/२०१५ | शनिवार | भंडी शेगाव | -- | भंडीशेगाव | बाजीरावची विहीर उभे रिंगण २ रे व गोल रिंगण ४ थे | भंडीशेगाव |
| निज आषाढ शुद्ध १० | २६/०७/२०१५ | रविवार | वाखरी | पादुकाजवळ आरती व उभे रिंगण ३ रे | पंढरपूर | -- | वाखरी |
| निज आषाढ शुद्ध ११ | २७/०७/२०१५ | सोमवार | -- | सकाळी नगरप्रदक्षिणा | श्रींचे चंद्रभागा स्नान | -- | पंढरपूर |
| निज आषाढ शुद्ध १२ | २८/०७/२०१५ | मंगळवार | -- | -- | -- | -- | पंढरपूर |
| निज आषाढ शुद्ध १३ | २९/०७/२०१५ | बुधवार | -- | -- | -- | -- | पंढरपूर |
| निज आषाढ शुद्ध १४ | ३०/०७/२०१५ | गुरुवार | -- | -- | -- | -- | पंढरपूर |
| निज आषाढ शुद्ध १५ | ३१/०७/२०१५ | शुक्रवार | पंढरपूर | श्रींचे चंद्रभागा स्नान, श्री विठ्ठल-रुक्मिणी भेट व गोपाळपुरा काला | पंढरपूर | पादुकाजवळ विसावा परतीचा प्रवास सुरू | वाखरी |





संतवाणी

संत तुकाराम महाराज

नका दंतकथा येथे सांगों कोणी।
कोरडे ते मानी बोल कोण।।
अनुभव येथे पाहिजे साचार।
न चलती चार आम्हांपुढें।।

परि कोण मानी रसाळ बोलणें।
नाही झाली मनीं ओळखी तो।।
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी।
राजहंस दोन्ही वेगळालीं।।

सकाळ

बुधवार, १८ जून २०१४

१२

आर.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०१२-२०१४.

### श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा

आषाढी वारी श्री क्षेत्र देहू ते श्री क्षेत्र पंढरपूर

(ता. १९ जून ते ८ जुलै २०१४)

| तारीख | वार | पहिली विश्रांती | दुसरी विश्रांती | दुपारचा मुक्काम | तिसरी विश्रांती | चौथी विश्रांती | पालखीचा मुक्काम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/६/१४ | गुरुवार | पालखी प्रस्थान सोहळा | | | | | इनामदार साहेब वाडा, श्री क्षेत्र देहू |
| २०/६/१४ | शुक्रवार | अनगडशहा बाबा अभंग आरती | चिंचोली पादुका अभंग आरती | निगडी | ---- | ---- | श्री विठ्ठल मंदिर, आकुर्डी |
| २१/६/१४ | शनिवार | एच. ए. कॉलनी, पिंपरी, श्री विठ्ठलनगर | कासारवाडी | दापोडी | शिवाजीनगर | श्री संत तुकाराम महाराज पादुका मंदिर | श्री निवडुंगा विठ्ठल मंदिर, नाना पेठ, पुणे. |
| २२/६/१४ | रविवार | संपूर्ण दिवस श्री निवडुंगा विठ्ठल मंदिर पुणे (मुक्काम) | | | | | |
| २३/६/१४ | सोमवार | भैरोबानाला | ---- | हडपसर | मांजरी फार्म | लोणी काळभोर रेल्वे स्टेशन | श्री विठ्ठल मंदिर, लोणी काळभोर |
| २४/६/१४ | मंगळवार | कुंजीरवाडी फाटा | ---- | उरुळी कांचन | जावजीबुवाची वाडी | ---- | श्री भैरवनाथ मंदिर, यवत |
| २५/६/१४ | बुधवार | ---- | ---- | भांडगाव | केडगाव-चौफुला | ---- | श्री विठ्ठल मंदिर, वरवंड |
| २६/६/१४ | गुरुवार | भागवत वस्ती | ---- | पाटस | १) रोटी, अभंग आरती २) हिंगणी गाडा | १) वासुंदे २) खराडवाडी | उंडवडी गवळ्याची |
| २७/६/१४ | शुक्रवार | उंडवडी पठार | ---- | बऱ्हाणपूर | मोरेवाडी | सराफ पेट्रोल पंप, बारामती | बारामती शारदा विद्यालय प्रांगण |
| २८/६/१४ | शनिवार | मोतीबाग | १) पिंपळी ग्रेप २) लिमटेक | काटेवाडी | भवानीनगर साखर कारखाना | ---- | मारुती मंदिर, सणसर |
| २९/६/१४ | रविवार | बेलवडी (गोल रिंगण) | ---- | बेलवडी | लासुर्णे जंक्शन | लासुर्णे | अंथुर्णे |
| ३०/६/१४ | सोमवार | शेळगाव फाटा | ५४ फाटा | गोतंडी | ---- | ---- | निमगाव केतकी |
| १/७/१४ | मंगळवार | तरंगवाडी-कॅनॉल | गोकुळीचा ओढा | इंदापूर (गोल रिंगण) | ---- | ---- | इंदापूर |
| २/७/१४ | बुधवार | संपूर्ण दिवस (मुक्काम) इंदापूर | | | | | |
| ३/७/१४ | गुरुवार | गोकुळीचा ओढा, विठ्ठलवाडी | १) वडापुरी २) सुरवड | बावडा | ---- | ---- | सराटी |
| ४/७/१४ | शुक्रवार | माने विद्यालय (गोल रिंगण) | ---- | ---- | ---- | ---- | श्री विठ्ठल मंदिर, अकलूज. |
| ५/७/१४ | शनिवार | माळीनगर (उभे रिंगण) | ---- | माळीनगर | पायरीचा पूल | १) कदम वस्ती २) श्रीपूर साखर कारखाना | बोरगाव |
| ६/७/१४ | रविवार | ---- | ---- | माळखांबी | तोंडले बोंडले (धावा) | टप्पा | पिराची कुरोली गायरान |
| ७/७/१४ | सोमवार | ---- | ---- | पिराची कुरोली | १) वाघड वस्ती २) भंडीशेगाव | बाजीराव विहीर उभे रिंगण | वाखरी तळ |
| ८/७/१४ | मंगळवार | ---- | ---- | वाखरी | पादुका अभंग आरती (उभे रिंगण) | ---- | श्री क्षेत्र पंढरपूर |

पाउले चालती पंढरीची वाट...



मुक्कामाच्या ठिकाणी भजनात दंग असणारे वारकरी



वारीमध्ये सहभागी झालेली महिला दिंडी



भव्य गोल रिंगण सोहळा



रिंगण सोहळ्यात धावणारे विणेकरी



दिवे घाट , पुणे - सासवड पालखी प्रवास



रिंगणामध्ये खेळात दंग असणारे वारकरी

**लोकमत** २३ जुन २०१४

आषाढी वारी : १०० टक्के अनुदान दिले, तर पंढरपुरात २००० शौचालये उपलब्ध होतील

# जागेअभावी विकासकामांचा निधी पडून

बाळासाहेब बोचरे • पुणे

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी शौचालये बांधण्यासाठी सरकारकडे निधी आहे; पण जागा नाही. याउलट वारकऱ्यांकडे जागा आहे; पण शौचालयासाठी निधी नसल्याने तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतेचे तीन तेरा वाजल्याचे वास्तव असून, सरकारने १०० टक्के अनुदान दिल्यास हा प्रश्न सुटेल, असा सूर वारकऱ्यांनी व्यक्त केला.

पंढरपूरमध्ये होणारी अस्वच्छता साफ करण्याची क्षमता नसेल, तर वारकऱ्यांना पंढरपूरला यायला बंदी घालावी का, असा सवाल न्यायालयाने केल्यानंतर सरकार खडबडून जागे झाले आहे. पंढरपूरला तीर्थक्षेत्र विकासासाठी १८१ कोटी रुपये मिळाले असून त्यापैकी नगरपालिकेला १५ कोटी मिळाले आहेत. या निधीपैकी ३८ कोटी केवळ शौचालयासाठी असून त्यातील केवळ १६ कोटी खर्च झाले आहेत. उर्वरित निधी खर्च करण्यासाठी शौचालये बांधण्यासाठी जागाच मिळेनासी झाली आहे.

आळंदीला सुमारे दोन लाखांच्या आसपास भाविक येतात. आळंदी नगरपालिकेने तीर्थक्षेत्र विकास निधीतून कायमची ४०० सार्वजनिक शौचालये बांधली आहेत. १०० तात्पुरती शौचालये उपलब्ध केली. पण, तीही अपुरी पडत आहेत. नवीन शौचालये बांधायची कोठे, हा प्रश्न आहे. तीर्थक्षेत्र विकासासाठी १८७ कोटींच्या निधीपैकी ३५ कोटी रुपये शौचालयांवर खर्च केले आहेत. पंढरपूरला येणाऱ्या १० लाख वारकऱ्यांपैकी २५ टक्के वारकरी सुविधा नसल्याने अंघोळीसाठी नदी व शौचालयासाठी पटांगणाचाच वापर करतात.



सध्या सरकार ५० टक्के अनुदान देते. त्याऐवजी शंभर टक्के अनुदान दिल्यास स्थानिक आपापल्या निवासस्थानी शौचालयांची संख्या वाढवतील.
- ज्ञानेश्वर माऊली जळगावकर, अध्यक्ष, अखिल भारतीय फडकरी-दिंडीकरी संघटना

शासन दर वर्षी स्वच्छतेवर कोट्यवधी रुपये खर्च करते. जागा निश्चित करून सार्वजनिक शौचालये वाढवली, तरच ही समस्या सुटेल. पंढरपुरात वारी काळात जी तात्पुरती शौचालये असतात ती कुचकामी ठरतात.
- ह.भ.प. विठ्ठलमहाराज वासकर

आम्ही आमच्याकडे येणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी शौचालये वाढविण्यास तयार आहोत. आमच्याकडे जागाही आहे. शासनाने १०० टक्के अनुदान दिले, तर हे काम झटपट होईल.
- संजय महाराज मोरे, देहूकर, तुकाराम महाराज पालखी सोहळा

| पंढरपुरात उपलब्ध शौचालये | ६५४ सध्या बांधून तयार | ८०० तात्पुरती शौचालये | ५०० मंदिर समिती पुरवणार | २०० न.पा. पुरवणार | ११६ बांधकाम सुरु | २२७० एकूण उपलब्ध |
|---|---|---|---|---|---|---|

- वारीत एकूण ४००० शौचालयांची गरज असून, आणखी १८०० शौचालये कशी पुरवायची, या विवंचनेत प्रशासन आहे. एसटी, रेल्वेस्थानक अशा सार्वजनिक ठिकाणांसह विविध ठिकाणी वर्षभरात ८०० शौचालये उभी करण्याचे उद्दिष्ट आहे, पण अद्याप जागा निश्चित झालेली नाही.
- याबाबत रविवारी पुणे येथे पालखीतळावर विविध दिंडीकऱ्यांशी चर्चा केली असता, प्रशासनाने आसपासच्या विविध पालिका व जि. प. कडे उपलब्ध असलेली फिरती शौचालये मागवावीत, असा उपाय सुचविण्यात आला.
- सरकारकडे निधी आहे, परंतु शौचालये बांधण्यासाठी जागा नसेल, तर मठांचा विचार करता येईल. पंढरपुरात सुमारे ४०० मठ आहेत. अशा मठांमध्ये जादा शौचालये बांधण्यासाठी सरकारने १०० टक्के अनुदान दिल्यास किमान दोन हजार शौचालये मठातच उपलब्ध होतील. मठात मुक्काम करणारे वारकरी शौचासाठी बाहेर जाणार नाहीत. पर्यायाने सार्वजनिक स्वच्छतेला हातभार लागेल. मात्र, सरकारने ती शौचालये सार्वजनिक असल्याचे घोषित करू नये, असे वारकऱ्यांना वाटते.

वारीच्या तोंडावर न्यायालयाने निकाल दिल्याने आता दिवस थोडे राहिल्याने कोणालाच सुविधा देणे शक्य नाही. तरीही तातडीने फिरती शौचालये पंढरपुरात दाखल केल्यास न्यायालयाचा मान राखला जाईल. तरीही तात्पुरती शौचालयेही स्वच्छ कशी राहतील, याकडे न.पा.ने लक्ष द्यावे.
- ह. भ. प. माधवमहाराज शिवणीकर



**सकाळ** उदय भविष्यपत्राचा ७ जुलै २०१४



## दीनानाथ नाट्यगृहाचा पडदा ... ऑगस्टला पुन्हा उघडणार

मुंबई : विलेपार्ले येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. नूतनीकरणानंतर या नाट्यगृहाचे १ ऑगस्टला उद्घाटन होणार आहे. नूतनीकरणाच्या कामाची महापौर सुनील प्रभू यांनी रविवारी पाहणी केली. या वेळी महापौर म्हणाले, "मुलुंड येथील कालिदास नाट्यगृह आणि गिरगाव चौपाटीजवळचे राजा बलदेवदास बिर्ला क्रीडा केंद्रातील नाट्यगृह यांच्या नूतनीकरणाचे काम लवकरच हाती घेण्यात येईल. मुंबईकरांच्या सेवेत नवीन नाट्यगृहे रुजू व्हावीत म्हणून भांडुप, गोरेगाव, घाटकोपर आणि कुर्ला येथे नाट्यगृहांसाठी आरक्षित असणाऱ्या जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे."




टप्पा (पिराची कुरोली) : पंढरपूर तालुक्यात पिराची कुरोली येथे माउली आणि सोपानदेव यांच्या पालख्यांची रविवारी भेट झाली.

# बंधुभेटीने वरुणराजाला फुटला पाझर

विलास काटे : सकाळ वृत्तसेवा

ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा

भंडीशेगाव, ता. ६ : सकाळी गोल रिंगणात रंगलेल्या उडीच्या खेळानंतर उकाड्याने हैराण झालेला माउलींचा सोहळा सायंकाळी टप्प्यावर पोचला. माउलींच्या रथाशेजारी सोपानकाकांचा रथ शेजारी-शेजारी थांबला. दोन भावंडांच्या भेटीच्या सोहळ्याने अवघा सोहळा भावुक झाला. इतकेच नाही

संत ज्ञानेश्वर आणि संत सोपान देव यांचे रथ शेजारी उभे केले, त्या वेळी पालखी सोहळाप्रमुख डॉ. शिवाजी मोहिते आणि गोपाळ गोसावी यांनी एकमेकांना आलिंगन देत नारळप्रसाद दिला. विश्वस्त प्रशांत सुरू, ऊर्जितसिंह शितोळे सरकार, मालक राजाभाऊ

प्रसंगाच्या आठवणींना आज पुन्हा उजाळा मिळाला.

'पुंडलिक वरदे'चा गजर करत दोन्ही पालख्या पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होत भंडीशेगाव येथे माउलींची पालखी विसावली. दरम्यान, वेळापूरहून सकाळी माउलींचा पालखी सोहळा

माउलींच्या पालखीवर ग्रामस्थांनी पुष्पवृष्टी आणि फटाक्यांची आतषबाजी करून स्वागत केले.

### नंदाचा ओढा कोरडाच

तोंडले बोंडले दरम्यान माउलींचा पालखी सोहळा दुपारच्या जेवणासाठी पोचला. तोंडले गावात प्रवेश करतेवेळी नंदाच्या ओढ्यात दरवर्षी पाणी असते,

तुकाराम महाराज पालखी सोहळा

# सोहळ्याच्या परंपरेत महिलांच्याही दिंड्या

सचिन शिंदे : सकाळ वृत्तसेवा

पिराची कुरोली, ता. ६ : 'तुका म्हणे धावा, पंढरी आहे विसावा....' सावळ्या विठुरायाच्या भेटीसाठी आर्त हाक देत जगद्गुरू संत तुकोबाराय यांच्या पालखी सोहळ्याचा धावा येथे भक्तिमय वातावरणात झाला. बोंडल्याच्या उतारावरील सोहळा डोळ्यांत साठवण्यासाठी पंचक्रोशीतील भक्तांनी गर्दी केली होती. तुकाबाराय, सोपनकाका व माउली तिन्ही सोहळे एकाच रस्त्यावर आल्याने उत्साह दुणावला होता. त्याच वेळी महिलांच्या एका दिंडीने लक्ष वेधून घेतले ते त्यांच्या सुरेख अभंगाने. पिंपरीच्या बहिणाबाई प्रासादिक दिंडीतील महिला अत्यंत सुरेख अभंग म्हणत होत्या. त्यांना मृदंग व टाळांची साथही महिलाच देत होत्या.

आषाढी वारी

सोहळ्यातील पहिली महिलांची दिंडी म्हणून यांची ओळख आहे. मंगलाताई कांबळे दिंडीचालक आहेत. संस्थानकडे तशी नोंदही आहे.

सतरा वर्षांपूर्वी संत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात पहिली महिला दिंडी काढण्यात आली. पिंपरी-चिंचवड येथील मंगलाताई कांबळे यांनी पहिली महिलांची बहिणाबाई प्रासादिक दिंडी सुरू केली. त्यांच्या प्रेरणेतून सोहळ्यात सध्या दोन महिला दिंड्या आहेत. दुसरी दिंडी सात वर्षांपूर्वी पिंपरीच्या सुप्रिया साठे यांनी सुरू केली. जिजाबाई प्रासादिक दिंडी असे तिचे नाव आहे. दोन्ही दिंड्यांत महिलांची संख्या जास्त आहे. त्यात अभंग म्हणण्यासह टाळ, मृदंगही महिलाच वाजवतात. मंगलाताई कांबळे यांच्या दिंडीत चोपदारही महिलाच आहे. श्रीमती कांबळे म्हणाल्या, 'आमच्या दिंडीत महिलांची संख्या जास्त आहे. मात्र ती आम्हीच मर्यादित ठेवली आहे. सव्वाशे लोक दिंडीत आहेत. त्यात दांपत्यांची संख्या अधिक आहे. १९९८ मध्ये प्रथम महिलांची दिंडी काढली. ती अव्याहतपणे सुरू आहे.'

### तुकोबारायांचे आज उभे रिंगण

पिराच्या कुरोलीचा मुक्काम संपवून जगद्गुरू संत तुकोबारायांचा पालखी सोहळा उद्या (ता. ७) वाखरीला मार्गस्थ होणार आहे.



रिंगणातील अश्वदौड



रिंगणाचा आनंद लुटणाऱ्या महिला वारकरी